म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र.

मुंबई नगरी

ना.र.फाटक

REFBK-0023229

REFBK-0023229

६१४
भू-प्रवास

आर्टपेपरवरील एकूण ८० चित्रे आहेत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा यगॅणी भरावी लागेल. 1990

16 AUG 1981
16 SEP 1981
19 SEP 1981
30 SEP 1981
18 OCT 1981
4 NOV 1981
6 JAN 1982
26 MAY 1982
11 JUL 1982
12 JUN 1985
22 MAY 1985
13 OCT 1985
10 MAY 1989
6 JUL 1988
14 DEC 1988
1989

भू-प्रवास

REFBK-0023229

मुंबई नगरी

न.र. फाटक

वृहन्मुंबई महानगरपालिका
शताब्दी प्रकाशन

प्रथमावृत्ती : मार्च १९८१

प्रती : ३०००

मुखपृष्ठ व छायाचित्र - संकल्पन :
गजानन भागवत

प्रकाशक :
का० तु० पंडित
जनतासंपर्क अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत : २० रुपये

मराठी अंग संग्रहालय आणि
ई 97
ग्रं. क्र. 23229
अभ्यासार्थ
प्रत

गेटवे ऑफ इंडिया
आणि ॲकबेपर्यंतचा
परिसर तेव्हा असा
दिसत होता

महापालिकेच्या इमारतीसमोरील
सर फेरोझशहा मेथा यांचा
भव्य पुतळा

बृहन्मुंबई
महानगरपालिका
मुख्यालय
१८८७–१८९३



लकडी बंदर, चौपाटी

परवाची ▲

कालची ▲

आजची ▼

महाराष्ट्र राज्य महाविद्यालय मुंबई
दिनांक 23226
मुंबई प्रवासी दर्शन

अनुक्रम

महापौरांचे निवेदन		सात
संपादकीय		अकरा

विभाग पहिला – नगरी

प्रकरण पहिले	कालाय तस्मै नमः	१
प्रकरण दुसरे	व्यापारी सत्तेचा आरंभ	९
प्रकरण तिसरे	विकासाची आगेकूच	१७
प्रकरण चौथे	मुंबईतील प्राणी व वनस्पती	२२
प्रकरण पाचवे	बहुजिनसी लोकवस्ती व दर्शनी समाजक्रांती	३०
प्रकरण सहावे	पाण्याची टंचाई व भरपाई	३८
प्रकरण सातवे	दळणवळण आणि वाहने	४३
प्रकरण आठवे	लोकांचे सण, उत्सव	५३
प्रकरण नववे	मुंबईतील न्यायदान	६४
प्रकरण दहावे	शिक्षणाचा प्रारंभ व प्रसार	७३
प्रकरण अकरावे	नवयुगाची पहाट	८२
प्रकरण बारावे	आस्मानी – सुलतानी	९२
प्रकरण तेरावे	करमणूक – मनोरंजन	१०२
प्रकरण चौदावे	वृत्तपत्रे	१११
प्रकरण पंधरावे	खानावळी, हॉटेले	१२१
प्रकरण सोळावे	नगरपर्यटन	१२८
प्रकरण सतरावे	टपाल, तारायंत्र	१४७
प्रकरण अठरावे	जनावरे, वाहने, उपद्रव	१५१
प्रकरण एकोणिसावे	खाद्यपेये, पोषाख वगैरे	१५६
प्रकरण विसावे	छापखाने, वृत्तपत्रे, ग्रंथ	१६०

विभाग दुसरा – मुंबईचे मानकरी

एक	पार्श्वभूमी	१६७
दोन	पहिले मानकरी	१७६
तीन	जगन्नाथ शंकरशेट	१८०
चार	विश्वनाथ नारायण मंडलीक	१८४
पाच	भाऊ दाजी लाड	१८९
सहा	काशीनाथ त्र्यंबक तेलंग	१९४
सात	जमशेटजी जीजीभाई बाटलीवाला	१९९
आठ	दादाभाई नौरोजी	२०८
नऊ	जमशेटजी टाटा	२१४
दहा	फेरोजशहा मेथा	२२०
अकरा	डेव्हिड ससून	२२७
बारा	अबदुल्ला – अल्बर्ट ससून	२३०
तेरा	प्रेमचंद रायचंद	२३४
चौदा	करसनदास मूळजी	२३८
पंधरा	डॉ० जॉन विल्सन	२४४

महापौरांचे निवेदन

सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक, नामवंत पत्रकार आणि साहित्यिक कै० प्राध्यापक नरहर रघुनाथ फाटक यांनी लिहिलेल्या 'मुंबई नगरी' या ग्रंथाचे बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे आज प्रकाशन होत आहे. महापौरपदाच्या माझ्या कारकिर्दीत या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे हे मी माझे भाग्य समजतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची शताब्दी ४ एप्रिल १९७३ रोजी साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने महाराष्ट्राची राजधानी असलेल्या या गौरवशाली शहराचा अव्वल इंग्रजीतील जुना इतिहास कथन करणारा एक ग्रंथ महापालिकेतर्फे प्रकाशित करण्यात यावा अशी सूचना करण्यात आली आणि त्यावर महापालिकेत विचारविनिमय सुरू झाला. त्या सुमारास, १९७४ साली, लोणावळा येथे मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कै० दि० गो० तेंडुलकर स्मृतिमंदिर या वास्तूचे भूमिपूजन कै० न० र० फाटक यांच्या हस्ते झाले. त्या वेळचे महापालिका-आयुक्त कै० श्री० म० वा० देसाई यांनी या समारंभाच्या निमित्ताने कै० फाटक यांच्याशी अशा प्रकारच्या ग्रंथाबाबत चर्चा केली.

त्या सुमारास कै० फाटक यांची 'मुंबईचे ऐतिहासिक दर्शन' ही लेखमाला महापालिकेच्या 'सिव्हिक जर्नल' या मासिकात क्रमशः प्रसिद्ध होत होती. ही लेखमाला कै० फाटक यांनी महापालिकेच्या शताब्दीच्या निमित्ताने मुंबई मराठी साहित्य संघात जी व्याख्याने दिली होती त्यांवर आधारलेली होती. शिवाय, १९६० साली कै० फाटक यांनी 'मुंबईचे मानकरी' ही व्याख्यानमाला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे गुंफिलेली होती. मुंबईची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या भरभराट होण्यास कोणी कसा हातभार लावला याबद्दलची महत्त्वाची माहिती त्यात उपलब्ध होत होती.

या पार्श्वभूमीच्या आधारे कै० म० वा० देसाई यांनी कै० न० र० फाटक यांना लोणावळा येथे उपर्युक्त समारंभाचे वेळी मुंबई महानगरपालिकेसाठी प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचा आग्रह केला आणि कै० फाटक यांनी त्याला अगदी मनापासून होकार दिला. मुंबईला परतताच कै० देसाई यांनी कै० फाटक, मौज प्रिंटिंग ब्यूरोचे व्यवस्थापक कै० विष्णुपंत भागवत व महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्री० का० तु० पंडित यांची

एक बैठक आपल्या कचेरीत भरवून याबाबत तपशीलवार चर्चा केली आणि त्यानंतर त्यांनी श्री० पंडित यांना योग्य तो प्रस्ताव महापालिकेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यास सांगितले. दुर्दैवाने त्यानंतर अगदी थोड्याच अवधीत, म्हणजे ऑगस्ट १९७५ मध्ये, म० वा० देसाई यांचे देहावसान झाले.

श्री० भालचंद्र देशमुख यांनी आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर या विषया-संबंधीची संपूर्ण माहिती मिळविली आणि त्यात मनापासून लक्ष घालून या योजनेस मंजुरी मिळविली. त्यानुसार जून १९७७ पासून कै० फाटक यांनी आपले लेखनकार्य सुरू केले आणि सतत तीन वर्षे त्यांनी हा क्रम चालू ठेवला. "ज्या शहरात आपण लहानाचे मोठे झालो, आपला व्यवसाय केला, उपजीविका केली, त्या शहराचा इतिहास लिहिण्याचे काम मी कर्तव्यबुद्धीने करीत आहे" अशी त्यांची शुद्ध भूमिका होती. आणि त्यामुळेच डिसेंबर १९७९ पर्यंत, म्हणजे वयाच्या ८६ व्या वर्षापर्यंत, आपले लिखाण सतत चालू ठेवून त्यांनी हा ग्रंथ बहुतांश लिहून पुरा केला. शेवटी उपसंहार, प्रस्तावना आणि थोडासा इतर मजकूर त्यांना लिहावयाचा होता. परंतु आठ दिवसांच्या आजारानंतर दि० २१ डिसेंबर १९७९ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. अंगावर घेतलेली जबाबदारी त्यांनी जवळजवळ पुरी केली होती. प्रकृतीने साथ दिली तर महात्मा गांधी यांचे चरित्र लिहून त्यानंतर आपले लेखन थांबविण्याचा आपला विचार आहे असे त्यांनी आयुक्त श्री० बापूसाहेब चौगुले यांचेकडे एकदा बोलून दाखविले होते. परंतु तसे व्हायचे नव्हते आणि प्रस्तुत ग्रंथ हाच त्यांचा अखेरचा ग्रंथ ठरला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शंभर वर्षांच्या इतिहासात अशा तऱ्हेचा मुंबई शहराबद्दलचा मौलिक ग्रंथ एखाद्या थोर व्यक्तीकडून खास लिहवून घेऊन प्रकाशित करण्याचे हे पहिलेच उदाहरण आहे. त्यातूनही कै० न० र० फाटक यांच्यासारख्या व्यासंगी, अधिकारी आणि आदरणीय व्यक्तीने आपल्या वयाची ८३ वर्षे पूर्ण झाल्यानंतर हा ग्रंथ आमच्या विनंतीनुसार लिहून दिला ही गोष्ट महापालिकेला खरोखरच भूषणावह आहे आणि त्यासाठी मुंबई महानगरपालिका त्यांची सदैव ऋणी राहील. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव श्री० वा० न० फाटक यांचेदेखील या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामी सतत आणि संपूर्ण सहकार्य लाभले.

प्रस्तुत ग्रंथ कै० न० र० फाटक यांचेकडून पुरा करून घेण्यासाठी महापालिकेचे जनसंपर्काधिकारी श्री० का० तु० पंडित यांनी गेली पाच-सहा वर्षे सतत परिश्रम घेतले. कै० फाटक यांच्या घरी जाऊन त्यांची नियमितपणे भेट घेणे, त्यांना हवी असलेली पुस्तके आणि इतर साहित्य मिळवून देणे आणि विशेष म्हणजे त्यांच्याशी गप्पागोष्टी करून त्यांना उत्तेजित करणे हा कार्यक्रम श्री० पंडित यांनी मोठ्या श्रद्धेने आणि चिकाटीने शेवटपर्यंत चालू ठेवला. शिवाय अधूनमधून श्री० भालचंद्र देशमुख व श्री० बापूसाहेब चौगुले या आयुक्तद्वयांना त्यांनी कै० फाटकांकडे चर्चेसाठी नेले.

सारांश, श्री० पंडित यांचा हा संपर्क प्रस्तुत ग्रंथ पुरा होण्यासाठी खरोखर सहायभूत ठरला.

या पुस्तकात मुंबईची जुनी छायाचित्रे छापली पाहिजेत असा कै० न० र० फाटक यांचा आग्रह होता. त्यानुसार पार्शी पंचायत, एशियाटिक लायब्ररी, ठक्कर बुकसेलर्स, भाऊ दाजी लाड म्युझियम इत्यादी संस्थांनी आपल्या संग्रहांतील दुर्मिळ छायाचित्रे, पुस्तके इत्यादी साहित्य आमच्या स्वाधीन केले. तसेच कै० न० र० फाटक यांचे परमस्नेही श्री० वा० शं० वारे आणि महापालिकेचे माजी जनसंपर्काधिकारी श्री० के० वि० वेल्हे ॲडव्होकेट, यांचीदेखील या कार्यात बरीच मदत झालेली आहे.

कै० न० र० फाटक आणि मौज प्रिंटिंग ब्यूरोचे भागवतबंधू यांचे गुरुशिष्याचे नाते होते; म्हणूनच या ग्रंथाच्या निर्मितीचे एकूण सर्व काम त्यांनी आपलेपणाने पूर्ण केले.

बाबुराव शेटे
महापौर

वृहन्मुंबई महानगरपालिका
मुख्यालय, मुंबई
दिनांक १९ मार्च १९८१

संपादकीय टिपण

कै० गुरुवर्य प्रा० न० र० फाटक यांचे २१ डिसेंबर १९७९ रोजी निधन झाले तेव्हा ते लिहीत असलेल्या 'मुंबई नगरी' या ग्रंथाचे लेखन पूर्ण झाले आहे अशी समजूत होती. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या वर्षांत लेखनाचे काही परप्रेरित संकल्प त्यांनी आवरते घेतले होते. मात्र आपल्या स्वतःच्या आवडीने व स्वतंत्र प्रेरणेने केलेले, महात्मा गांधींचे चरित्र आणि मुंबई शहराचा इतिहास हे दोन संकल्प तरी मृत्यूपूर्वी पुरे करावेत असा ध्यास त्यांनी बाळगला होता. पैकी मुंबई शहराचा इतिहास लिहिण्याच्या त्यांच्या संकल्पाचा मेळ मुंबई महानगरपालिकेच्या अशाच संकल्पाशी जुळला आणि तो ग्रंथ लिहिण्याचे काम त्यांनी आधी हाती घेतले. प्रकृतीने साथ दिली तर मुंबईच्या इतिहासानंतर गांधीचरित्रदेखील लिहून पुरे करायचे अशी तीव्र कामना त्यांच्या मनात होती. पण उत्तरोत्तर प्रकृतीची साथ कमी होत गेली. गांधीचरित्राचा संकल्प सोडून द्यावा लागणार ही वस्तुस्थिती नाइलाजाने पत्करावी लागली आणि उरलेल्या क्षीण शक्ती त्यांनी मुंबईच्या इतिहासावर केंद्रित केल्या. त्यांच्या निधनानंतर प्रस्तुत ग्रंथाचे ते करीत असलेले लेखन पाहिले तेव्हा असे आढळले की तेही मनात योजिले होते त्याप्रमाणे पूर्ण करण्याचा अवसर मृत्यूने त्यांना दिलेला नाही.

प्रस्तुत ग्रंथात सामान्यतः एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत मुंबई शहराचा विकास कसा झाला आणि त्या सर्वांगीण विकासाला मुंबईच्या काही ज्येष्ठ व कर्तबगार नागरिकांनी कसा हातभार लावला याचे वर्णन करावे असा प्रा० फाटकांचा मनोदय होता. प्रस्तुत संपादकासारख्या जिज्ञासूंजवळ त्यांनी तो अनेकवार बोलून दाखविला होता. ग्रंथाच्या पहिल्या भागात ते मुंबई शहराच्या विविधांगी विकासाचा इतिहास सांगणार होते आणि दुसऱ्या भागात विशेषतः अर्वाचीन मुंबई घडवणाऱ्या कर्तबगार नागरिकांच्या कामगिरीचे वर्णन करणार होते. पैकी पहिल्या भागाचे लेखन त्यांनी नव्याने हाती घेतले आणि मृत्यूपूर्वी ते जवळजवळ पूर्ण केले. दुसऱ्या भागाची रचना ते 'मुंबईचे मानकरी' या आपल्या काही वर्षांपूर्वी दिलेल्या व्याख्यानमालेच्या आधारे करणार होते. या व्याख्यानांचा वृत्तांत पूर्वी 'नवयुग' व 'आलमगीर' या दोन

अकरा

नियतकालिकांत प्रसिद्ध झाला होता. पण त्याचे या ग्रंथासाठी संपूर्ण पुनर्लेखन करण्याचा त्यांचा बेत होता. त्यांच्या मृत्यूमुळे तो बेत अपुराच राहून गेला.

एखादा ग्रंथ अथपासून इतीपर्यंत लिहून पूर्ण करावा, आवश्यक त्या संस्कारांनी त्याची पक्की मुद्रणप्रत तयार करावी, आणि मगच तो छपाईसाठी द्यावा, अशी कै० प्रा० फाटक यांच्या लेखनाची रीत नव्हती. प्रकृत विषयाचे त्यांचे अध्ययन व संशोधन अनेक वर्षे चालू असे. त्याचे चिंतन ते मनात सतत करीत राहत. इतर अभ्यासकांशी, इतकेच नव्हे तर आल्यागेल्याशीही, त्यासंबंधी चर्चा करीत किंवा नुसते बोलून आपल्या विचाराचे आवर्तन करीत. आणि अशा रीतीने मनात तयार झालेला विषय कोणत्या तरी निमित्ताने व्याख्यानांतून किंवा लेखनातून मांडीत. ते जसजसे लिहीत तसतसे छापले जाई आणि जसजसे ते छापले जाई तसतसा लेखनाचा उत्साह वाढून ते पुढे लिहीत जात. त्यांची ही लेखनप्रकृती ध्यानात ठेवली म्हणजे प्रस्तुत ग्रंथाची काही प्रकरणे मृत्यूमुळे अपूर्ण राहिली याचे आश्चर्य वाटणार नाही. मुंबईतील पोलिसखाते, कामगारसंघटना आणि मुख्य म्हणजे मुंबई-तील स्थानिक स्वराज्याचा झालेला विकास यांच्यासंबंधीची त्यांची प्रकरणे अशी अपूर्ण राहिली आहेत. ती पूर्ण करायची तर त्यांच्याइतक्याच अधिकाराचा चिकित्सक संशोधक व समर्थ लेखक लाभायला हवा. शिवाय, ती इतकी अपुरी आहेत की प्रस्तुत ग्रंथाचे परिशिष्ट म्हणून त्या अपूर्ण प्रकरणांचा समावेश करण्यातही स्वारस्य वाटले नाही. 'मुंबईचे मानकरी' या व्याख्यानमालेचा 'नवयुग' साप्ताहिकात १७ जुलै ते २० नोव्हेंबर १९६० या काळात प्रसिद्ध झालेला वृत्तांत त्यांच्या हातचा आहे असे तो प्रसिद्ध करताना 'नवयुग'च्या संपादकांनी तर म्हटले आहेच, पण त्या वृत्तांताची भाषाशैली हीच लेखकाची ओळख पटवण्यास पुरेशी साक्ष आहे. शिवाय, कै० प्रा० फाटकांकडून व्याख्यानमालेचे हे वृत्तांत ज्यांनी लिहवून घेतले आणि जे त्या वेळी 'नवयुग'चे सहसंपादक होते त्या श्री० र० गो० सरदेसाई यांची आठवणही वरील निष्कर्षाला पुष्टी देणारी ठरली. तेव्हा प्रस्तुत ग्रंथाचा दुसरा भाग म्हणजे 'नवयुग' साप्ताहिकात पूर्वी प्रसिद्ध झालेले पण कै० फाटक यांनी स्वतःच लिहिलेले 'मुंबईचे मानकरी' या व्याख्यानमालेचे एकत्रित वृत्तांत होत. त्यांच्या इतर ग्रंथांच्या बाबतीत त्यांनी जे संपादकीय स्वातंत्र्य घेऊ दिले होते तेवढेच, किंबहुना त्यापेक्षा कमीच, स्वातंत्र्य या वृत्तांतांच्या संस्कारांत प्रस्तुत संपादकाने घेतले आहे. त्यात श्री० वि० गो० खोबरेकर व श्री० र० गो० सरदेसाई यांचे जे साहाय्य झाले त्याचा कृतज्ञतेने उल्लेख करतो.

श्री० पु० भागवत





विभाग पहिला

नगरी

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. 23225
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



प्रा० न० र० फाटक आपल्या अभ्यासिकेत वाचनात मग्न असताना

आयुक्त म० वा० देसाई
आणि प्रा० न० र० फाटक
१९७४

प्रा० न० र० फाटक
आणि आयुक्त
भालचंद्र देशमुख
१९७८

आयुक्त बापूसाहेब
चौगुले आणि
न० र० फाटक
१९७८

आज ओळखून येणारी कालची मुंबई.
मलबार हिलवरून दिसणारे मुंबईचे दृश्य. दूरवर कारंज्याचे
डोंगर दिसत आहेत : १७७१

प्रकरण पहिले

कालाय तस्मै नमः

साधारणपणे विनाश, विध्वंस, विलय, संहार किंवा मृत्यू यांच्या संदर्भात 'कालाय तस्मै नमः' हा संस्कृत चरण उच्चारण्याचा प्रघात आहे. ज्यातला हा चरण आहे त्या मूळ श्लोकाचा संबंध विनाशाच्या वर्णनाशीच आहे. 'ते रम्य शहर गेले, तो महान राजा, तो मांडलिकांचा समुदाय यांचाही मागमूस राहिला नाही...'' याप्रमाणे कोणा राजाच्या गतवैभवाचा तपशील सांगून त्या अवदशेचा समारोप 'कालाय तस्मै नमः' या शब्दांनी त्यात केला आहे. विनाश म्हटला की तो काळाचा प्रभाव हा समज रूढ होण्याला 'कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धः' या प्राचीन गीतावचनाचाही आधार दाखविता येतो. महाभारतात प्रल्हाद, वली, नमुची या प्रचंड पराक्रमी पुरुषांच्या वैभवलोपाचे 'काळ' हेच कारण असे सिद्ध केले आहे. परंतु 'काळ'संज्ञक कल्पनेच्या विस्तारात काळ जसा नाश करतो तसा जन्मही देतो अशी अनेक विधाने आहेत आणि त्यांचा विचार केल्याशिवाय अखंड चाललेल्या जगाच्या घडामोडीत कालाचे स्थान कोणते व महत्त्व किती याविषयी अनुमान करता येणार नाही. 'जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च' या वचनावरून काळाचे स्वरूप लक्षात येण्याला हरकत नाही. ज्याचा नाश होतो, असे (काही) जमेला धरल्याशिवाय नाशाला काही अर्थच नाही. गवत असेल तर विस्तव त्याला जाळील, त्याचा नाश करील. विस्तव नसेल तर पाणी विझवील कुणाला? सारांश, उत्पत्तीखेरीज नाश नाही, हा न्याय स्वीकारणे भाग पडते. म्हणजे काळाकडे उत्पत्तीचेही श्रेय दिले पाहिजे. यामुळे काळाला कोणी ब्रह्म तर कोणी नियती तर कोणी स्वभाव अशी नावे देऊन आपले काम भागवितात. महाभारतात एका ठिकाणी काल हा जसा विपरीत कर्ता (विकर्ता) आहे, तसाच कर्ताही आहे असे म्हटले आहे. शेताचे पीक उभे राहावे आणि ऐन कापणीच्या वेळी कडाक्याच्या थंडीने करपावे किंवा अनपेक्षितपणे मुसळधार पाऊस पडून जमीनदोस्त व्हावे हे 'कालः कर्ता विकर्ता च' या वचनाचे उदाहरण आहे.

ज्याच्या नावाने जगाच्या अखंड घडामोडीविषयी मनुष्य आपले समाधान करून घेतो, त्याचे स्वरूप सांगणे अशक्य असले तरी काही लक्षणे सांगता येतात.

ऋतून्मासार्धमासांश्च दिवसांश्च क्षणस्तथा
पूर्वाण्हमपराण्हंच् मध्यान्हमपिचापरे ॥
मुहूर्तमपिचैवाहुरेकं संतमनेकधा
तं कालमिति जानीहि यस्य सर्वमिदंवशे ॥

क्षण, दिवस (यातच रात्र आली), त्याचे सकाळ, दुपार, संध्याकाळ हे विभाग. ऋतू (उन्हाळा, पावसाळा वगैरे), अर्धमास (शुक्लादी पक्ष; पंधरवड्यातच आठवड्याचा समावेश आहे) कोणी मुहूर्त म्हणतात. त्या सर्वांना 'काळ' असे जाणावे. जे सर्व काही अनुभवास येते ते त्याच्या प्रभावाचा परिणाम होय. येथे दिवस, महिना, ऋतू हे शब्द काळाच्या स्थूल लक्षणाचे आहेत. उजेडाचा व अंधाराचा म्हणजे दिवसरात्रीचा (अहोरात्राचा) एक फेरा हे काळाचे प्रमुख लक्षण आहे. या फेऱ्यांना खंड नाही. त्या फेऱ्यांचे गणित भारतीयांनी वर्षापासून युगकल्पापर्यंत पोचविले आहे. बाकीचे गणित सर्व जगतात अत्यंत प्राचीन काळापासून सुबुद्ध मानवी व्यवहारामध्ये परिचित आहे. याप्रमाणे विचार केल्यास काळ ही संज्ञा ज्या वस्तुस्थितीला लावली जाते तो काळ कर्तृत्व-अकर्तृत्व या दोन्हीपासून अलिप्त उरतो तरी सृष्टीतील घडामोड चालूच राहते. 'घडामोड' या शब्दातील मोडाचा संबंध बहुधा काळाशी जोडला जातो. मोडाची जबाबदारी जर काळाची तर घडा = घडणे याचीदेखील जबाबदारी काळाचीच असता माणसे तसे मानीत नाहीत. 'कालाय तस्मै नमः' हा चरण रचणाऱ्याने विनाशाचे वर्णन देऊन शेवटी हा चरण तात्पर्यार्थी ठेवला आहे. काळ जसा विकर्ता तसा कर्ता असल्याचे जे वचन पूर्वी दाखल केले आहे, त्याचा खुलासा महाभारतकर्त्याने पुढील श्लोकात केला आहे.

कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणं ।
इति ते संशयो माभूद्राजा कालस्य कारणम् ॥

राजसत्तेचे (राज्ञः) मूळ काळ की राजा (राज्यसत्ता) हे काळाचे मूळ असा घोटाळा नको. राजा हाच काळाचा निर्माता. व्यवहारात 'राजा कालस्य कारणम्' हा सिद्धान्त शंभर टक्के खरा असल्याचे अनुभवास येईल. आपण इतिहासात प्रायः राजकुळाच्या संदर्भाने 'काळ' हा शब्द वापरतो. कौरव-पांडवांचा काळ, अशोकाचा काळ, मुसलमानी सत्तेचा काळ, त्यात पुन्हा बाबर, अकबर, औरंगजेब या पुरुषांच्या नावाने काळाचे लहान लहान विभाग पडतात. मग येतो शिवछत्रपतींचा व मराठ्यांचा काळ वगैरे. ही सर्व 'राजा कालस्य कारणम्' या वचनाची यथार्थता पटविणारी उदाहरणे आहेत. त्यात अगदी अलीकडील इंग्रजांचा काळ विचारात घेतला की मुंबई शहराचा इतिहास सुबोध होतो, कारण हे शहर सर्वस्वी इंग्रजाच्या कर्तृत्वाचे फळ आहे.

मुंबई हे स्थळ टॉलेमी नावाच्या प्राचीन भूगोलज्ञाने इ० स० १५० मध्ये आपल्या यादीत नोंदले आहे. म्हणजे आज (१९७७ साली) ती नोंद १८२७ वर्षांइतकी जुनी

ठरते. उपलब्ध झालेल्या भूमिगत खुणा या स्थळाच्या अस्तित्वाची पुरातनता प्रागैतिहासिक काळापर्यंत मागे ओढतात. प्रिन्सेस बंदरासाठी जमीन खणीत असता समुद्र-सपाटीपासून वत्तीस फूट खाली जमिनीत खैराची ३८२ इतकी (२२३ ताठ उभी व १५९ आडवी पडलेली) झाडे उघडकीस आली. त्याखेरीजच दगड बनलेली बेडकेही सापडली. अशा व इतर भूरचनेच्या आधाराने प्रागैतिहासिक काळात मुंबईचा समुद्र-किनारा अनेक प्रचंड भूकंपांनी तयार केल्याचे भूस्तरशास्त्रज्ञ सांगतात. पहिल्या भूकंपाने मुंबईला बेटाचे रूप आले आणि त्यानंतरच्या कोणा भूकंपामुळे ज्याला आज माहीम व एस्प्लेनेड (मैदान) म्हणतात तो प्रदेश पाण्याबाहेर पडला. मुंबईच्या इतर भागांचा असाच वृत्तांत आहे. या भूकंपाच्या काळात येथे मनुष्य उगवला नव्हता याची साक्ष वर जो झाडांचा उल्लेख आहे, त्यांतल्या एका झाडाची आहे. हे झाड वाकलेले व त्याचा मध्यभाग जळून कोळशाच्या स्थितीस पोचलेला, असे त्याचे रूप होते. त्यावर शस्त्राघाताची चिन्हे मुळीच नव्हती. तेव्हा सहजच अनुमान करता येते की, येथे माणसे अवतरण्यापूर्वीच तो झाडे गाडणारा उत्पात घडला असला पाहिजे. मनुष्याची वस्ती आणि व्यवहार या 'सप्तद्वीपा वसुंधरे'वर टॉलेमीच्या नोंदीपूर्वी किती वर्षे व कसा चालला होता, हे समजून घेण्याला आज कोणतीच साधने हाती आलेली नाहीत; पण इ० स० दीडशे वर्षांपासून पुढच्या काळाचा इतिहास निवेदन करण्याची सुदैवाने सोय आहे.

टॉलेमीने नोंद केली, तेव्हा पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रात सातवाहनांचे राजकीय प्राबल्य होते. त्यांच्या कारकिर्दीत ईजिप्तपर्यंत भारताचा व्यापार चालू होता. त्यांच्याच काळात नाशिकची बौद्धलेणी व उत्तर कोकणातील शैलमंदिरे कोरली गेली. सातवाहनांचे प्रभुत्व सन २२० मध्ये संपून ३०० पर्यंत या भागावर क्षत्रपांचा अंमल चालू होता. नंतर पाचव्या शतकात कृष्णराज हे नाव मुंबई व नाशिक येथे सापडलेल्या नाण्यांवरून आढळात येते; पण तो कुणाचा कोण हे निश्चित नाही. पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात व सहाव्या शतकात मुंबईच्या भूपरिसरात मौर्यकुळाचे वंशज लहान लहान टापूंवर राज्य करीत होते. याला 'मोरे' शब्दाचा ('मौर्य' शब्दाचा अपभ्रंश) ठाण्याजवळच्या वाडा गावातील एका शिलालेखाचा आधार आहे. त्यावरून मौर्य-कुलोत्पन्न सुकेतुवर्मा असा स्पष्ट बोध होतो. त्याच्या राज्यकाळात ४३० साली ईजिप्तचा एक ख्रिस्ती धर्मगुरू इकडे आला होता. त्याने कल्याण हे एक उत्कृष्ट बंदर म्हणून तेथील व्यापाराचे वर्णन दिले आहे.

सन ५९० मध्ये बदामीच्या चालुक्यांनी उत्तर कोकणावर स्वारी करून मौर्यांची वाताहत केली. आणि ६१० पर्यंत त्या भागातल्या विरोधाची पाळेमुळे खणून काढून चालुक्यांनी आपला कारभार निर्विघ्न केला. मौर्यांची राजधानी 'पुरी' काबीज केली. 'पुरी' म्हणजे ठाणे की एलेफंटा बेट हा बहुत काळ संशोधक पंडितांच्या वादाचा विषय होता. पण सांप्रत एलेफंटा बेट हीच पुरी हे निश्चित झाले आहे. तथापि ते मौर्य राज्य

नाशकाहून करीत होते. यांच्याच काळात ६३६ मध्ये इस्लामची पहिली लाट ठाण्यावर धडकून तिने ठाण्याचे अतोनात नुकसान केले. चालुक्यांच्या दुसऱ्या विक्रमादित्य राजाने ७२४ मध्ये ती थोपविली.

चालुक्य ७५७ मध्ये अस्तास गेले व त्यांचे स्थान राष्ट्रकूटांनी घेतले. तेही नाशिक-नर्जाकच्या मार्किंडहून राज्य करीत होते. दक्षिणेस त्यांची सत्ता फार दूरवर पसरल्याने ८१० मध्ये मार्किंड सोडून राष्ट्रकूटांची राजधानी मालखेड हे ठिकाण झाले. उत्तर कोकणचा कारभार कपर्दिन या नावाच्या सुभेदाराकडे सोपविला. या कपर्दिनाने मांडलिकाच्या नात्याने शिलाहार घराणे स्थापन केले. जवळजवळ साडेचारशे वर्षे शिलाहारांचे राज्य टिकले. त्यावर चालुक्यांचे व गोव्याच्या कदंबांचे आघात होत; १२६५-मध्ये देवगिरीच्या महादेव यादवाने शिलाहारांचा राजा सोमेश्वर याला लढाईत संपूर्णपणे जिंकून त्याची 'पुरी' ही राजधानी पादाक्रांत केली. तेव्हा जगणे नकोसे होऊन पुरीला वेढणाऱ्या समुद्रात सोमेश्वराने जीव दिला. राजधानीच्या सान्निध्यामुळे शिलाहारांच्या वैभवकाळी अंबरनाथचे शिवमंदिर आणि मुंबईत मलबार टेकडीच्या (बॅकबेलगतच्या) टोकावर वालुकेश्वराचे देवालय अशी दोन चिरायू बांधकामे अस्तित्वात आली. प्रथम मुसलमान व मागून पोर्तुगीज यांच्या परधर्मद्वेषाने वाळकेश्वराचे पहिले देऊळ जमीनदोस्त बनले. नंतर त्याची अठराव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीत उभारणी करण्यात आली. ती हकीकत पुढे यथावकाश येणार आहे. शिलाहारांमागून तीस वर्षांनी यादवांचे वैभव अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणेतील धडाक्याच्या विजयी आक्रमणामुळे (१२९४) उतरत जाऊन सन १३१७ मध्ये यादवराज्याची इतिश्री घडली. खिलजीची स्वारी झाल्यावेळी तेव्हाचा यादवराजा रामदेव याने आपल्या मुलांपैकी भीमदेवाला कोकणात पाठविले. किंवा कदाचित तो स्वतःच अल्लाउद्दीनाच्या तडाख्यातून सुटण्याकरिता देवगिरीहून पळाला असावा. त्याबरोबर काही जातींचा परिवारही होता. भीम या नावाचा अपभ्रंश बिंब. तो अपभ्रंश मुंबादेवीच्या संस्कृत माहात्म्यात शिरून त्याला प्रसिद्धी मिळाली. गेल्या शतकातील इतिहाससंशोधनाने बिंबराज हा दुसरा कोणी नसून देवगिरीच्या अंतिम यादवांतला भीमदेव, असा निर्णय केला. या भागात आल्यावर भीमदेवाने माहीम (महिकावती) हे बेट पसंत करून तेथे आपली राजधानी वसविली. प्रत्यक्ष मुंबई बेटाशी राज्यकर्तृत्वाचा हा पहिला संबंध. महिकावती हे माहीमचे शाब्दिक रूपांतर होय.

भीमदेवाने माहीमचा कायापालट मानव आणि निसर्ग अशा दोन प्रकारे घडवून आणला. भीमदेवाच्या बरोबर पाताणे, प्रभू, पाचकळशी, पळशीकर ब्राह्मण वगैरे मंडळी देवगिरीकडून मुंबईस वस्तीला आली. त्याच्या आमदानीत प्रभादेवीचे देऊळ बांधले गेले. न्यायदानाचे स्थान न्यायगाव (नायगाव) ही एक जागा मुंबईत जन्मास आली. भीमदेवाने पूर्वी ज्याला 'बरडबेट' हे नाव होते ते माहीम फळांच्या बागांनी व नारळांच्या वाड्यांनी सजविले. त्यातच त्याचा विशाल प्रासाद होता. भीमदेवाच्या

राज्याचे वारा विभाग होते. भीमदेव १३०३ मध्ये निधन पावला असा इतिहासज्ञांचा समज आहे. त्याच्यामागून अठ्ठावीस वर्षे त्याच्या मुलाचे राज्य चालले. त्याला चौलच्या नागरदेव नावाच्या नायकाने जिंकून यादवांची सत्ता संपुष्टात आणली. गुजरातेतील मुसलमानांनी १३४८ मध्ये नायकाला निकालात काढले. येथे कोकणपट्टीतील हिंदूंच्या स्वतंत्र राज्यकारभाराला कायमचे ग्रहण लागले. मुसलमानांचे माहीमला लष्करी ठाणे होते. त्यांचा राज्यकारभार ठाण्याहून चालत होता. येथील धार्मिक जुलमाचा पाया मुसलमानांनी घातला. त्यांनी आरंभिलेल्या देव-देवळांच्या विध्वंसात मुंबईतील मुंबादेवी व महालक्ष्मी ही दोन देवळे बळी पडली. पंधराव्या शतकात माहीमला शेख अली पारू किंवा मखदुम फकी अली याचा दरगा व मशीद स्थापन झाली. एकदा नागरदेवाने व एकदा भोंगले-भंडाऱ्यांनी स्वातंत्र्य संपादण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण तो वाया गेला.

हिंदूंची मुस्लिमविरोधी गडबड थांबली आणि दक्षिणेचे बहमनी सुलतान आणि गुजराती सुलतान यांची झोंबाझोंबी सुरू झाली. ठाणे व माहीम या दोन्ही ठिकाणांच्या संगरात बहमनींना ठोकून गुजराती सुलतानांची सत्ता स्थिरावली व बळावली. सुलतान महमूद बेगडाच्या (१४५९–१५११) कारकिर्दीत पोर्तुगीज परचक्राचे उत्पन्न झालेले संकट पोर्तुगीजांना आरमारी लढाईत जबर मार देऊन मागे रेटण्याच्या पराक्रमाने प्रत्ययास आले. तथापि पोर्तुगीजांच्या मुंबई जिंकण्याच्या प्रयत्नाला अडथळा आला नाही. शेवटचा गुजराती सुलतान बहादूरशहा याने उत्तरेकडून मोगलांचे दडपण व दक्षिणेत वाढणारे पोर्तुगीजांचे आक्रमक सामर्थ्य या पेचातून अंशतः मोकळे होण्यासाठी मुंबई आणि वसई ही ठिकाणे पोर्तुगीजांच्या हवाली केली (१५३४). तेव्हापासून १६६१ पर्यंत त्यांच्या हाती चार बेटांची मुंबई आणि तिच्या लगतची माहीम, वांद्रे, साष्टी, वगैरे ठिकाणे होती. १५०९ च्या जानेवारीत पोर्तुगीजांच्या नजरेस प्रथम मुंबई आली.

पोर्तुगीज सत्तेची दृष्टी व्यापारापेक्षा ख्रिस्तीधर्मप्रसाराकडे अधिक होती. यामुळे त्यांच्या ताब्यातील प्रदेशात वाटवून ख्रिस्ती केलेल्या लोकांची वस्ती वाढली. ख्रिस्ती प्रार्थनामंदिरांची शिखरे इकडेतिकडे दिसू लागली. हिंदु-मुसलमानांची धर्मस्थाने पाडणे आणि त्या इमारतींचे सामान चर्चकरिता वापरणे हा पोर्तुगीजांचा धर्मनिष्ठ उद्योगच होता. या कामाचे पुढारी फ्रान्सिस्कन, डोमिकन वगैरे रोमन कॅथलिक संप्रदायांचे पाद्री होते. अधिकाऱ्यांपेक्षा या पाद्यांची प्रतिष्ठा जास्त होती. हिंदु-मुसलमानांना धार्मिक स्वातंत्र्य नव्हते. त्यांनी वाटल्यास पूजाअर्चा किंवा निमाज वगैरे धर्मव्यवहार खाजगी रीतीने करावा. तो जाहीरपणे करण्याला सक्त मनाई होती. अशा रीतीने जोरजुल्म व हत्या हे प्रकार त्या वेळी मोठ्या प्रमाणात घडत होते, असेही ऐतिहासिक साधने जिज्ञासूला पटवितात. हे पोर्तुगीज सत्तेचे धार्मिक स्वरूप सोडल्यास इतर कित्येक गोष्टी भारतीय जीवनाला उपकारक झालेल्या आहेत. पोर्तुगीजांच्या राहणीचा

हिंदूंवर प्रभाव पडून त्यांच्या जीवनचर्येत फेरफार उत्पन्न झाले, त्याचा विस्तार येथे करण्याची आवश्यकता नाही.

मागे जी मुंबईची हकीकत निवेदन केली तिच्यावरून सहज दिसून येणारे आहे की हे स्थळ इंग्रजांच्या पदरी पडेपर्यंत पराकाष्ठेचे उपेक्षित होते. मुंबईच्या ज्या बंदराने पूर्वीपासून परदेशी लोक प्रवास करीत आले त्याची उपयुक्तता पोर्तुगीज सत्ताधरांना ते दर्याबर्दी असूनही नीट समजलेली नव्हती. हिंदूंची अवस्था अशीच सांगता येईल. सातवाहनकाळी भारताच्या ईजिप्तशी होणाऱ्या व्यापाराचे ठिकाण जंजिरा हे होते. त्यानंतर माहीम, एलेफंटा, ठाणे, कल्याण यांची नावे पुढे येतात. एकट्या शिलाहारांनीच वाळकेश्वराचे देऊळ बांधून आपले मुंबईकडे लक्ष असल्याचे दृष्टोत्पत्तीस आणले. मात्र त्याची मर्यादा देवळापुरतीच समजावी लागते. शिलाहारांमागून मुसलमान व पोर्तुगीज आले, पण त्यांनीही मुंबईचे महत्त्व देवळे उद्ध्वस्त करण्यापुरतेच मानले. इंग्रजांच्या कबजात मुंबई आल्यावर पोर्तुगीजांचा जमाना संपून नवे युग चालू झाले. या युगाच्या सुरुवातीस येथील पोर्तुगीजांनी विघ्ने उपस्थित केल्यामुळे मुंबई इंग्रजांना ठरल्या वर्षी मिळाली नाही. पोर्तुगीज राजकन्या आणि इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स यांच्या विवाहाचा तहनामा जून १६६१ मध्ये लिहिला गेला. त्यानंतर मे १६६२ मध्ये लग्नसमारंभ उरकला आणि त्याच वर्षी मुंबई बेट ताब्यात घेण्यासाठी इंग्रजांची एक आरमारी तुकडी येथे आली. इंग्रजांनी मुंबईची मागणी केली; तिला मुंबई देण्याऐवजी वाटाण्याच्या अक्षतांनी येथील पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी बोळविले. कारण मुंबईत ज्याने अधिकारपरत्वे राहावयाचे तो इंग्रज अब्राहम शिपमन, आरमारावरोबर आलेला नव्हता. तो मुंबईस येऊन पोचल्यावर त्याने बरोबर आणलेले कागद पोर्तुगीजांच्या कायद्याप्रमाणे व्यवस्थित नाहीत असा दावा मांडून गोव्याच्या मुख्याधिकाऱ्याने इंग्रज लोकांना मुंबईस उतरू दिले नाही. जर तेथे उतरावयाचे असेल तर निःशस्त्र उतरावे, ही अट इंग्रजांनी झिटकारली. तेव्हा त्यांचा आपसात जो पत्रव्यवहार सुरू झाला तो १६६२ हे वर्ष उलटले तरी संपला नाही. एकदा सुरतेचे कंपनीवाले इंग्रज जमिनीवर उतरू देतील अशा अपेक्षेने इंग्लंडचे आरमार तिकडे गेले. सुरतेच्या मुघल सुभेदाराला ही गोष्ट मानवणारी नाही, हे कारण दाखवून कंपनीवाल्यांनी आपल्या राजाच्या आरमारी सैनिकांचा पाय सुरतेस लागू दिला नाही. तेव्हा शिपमनवर दक्षिणेस कारवारजवळचे अंजदीव बेट गाठण्याची पाळी आली. ते बेट निर्जन, तेथील हवा वाईट, एखादा जिन्नस हवा तर तो कारवारहून किंवा गोव्याहून आणवणे प्राप्त. अंजदीव आदिलशाहीच्या मालकीचे. कारवारला आदिलशाहीचा जो अंमलदार होता, त्याला खूष ठेवण्यासाठी उंची वस्तूंचे नजराणे मधूनमधून शिपमन पाठवीत असे. शिपमनबरोबर अंजदीवला पाचशे शिपाई होते. त्यांची संख्या वाईट हवा आणि दुष्ट व्यसने यामुळे झपाट्याने घटत होती. शेवटी अंजदीव बेटावरच ६ एप्रिल १६६४ रोजी शिपमन वारला. मरणापूर्वी त्याने आपले अधिकार हंफ्रे कुक नावाच्या इसमाकडे

दिल्याचा कागद तयार करून ठेवला होता म्हणून पुढचा घोळ थोडक्यात आवरला. तरी हंफ्रे कुकला मुंबई घेण्यासाठी शिपमनच्या मृत्यूनंतर आठ महिने अंजदीवलाच घालविणे भाग पडले.

१६६५ साली जानेवारीच्या सुरुवातीस इंग्रज शिपाई मुंबईच्या भूमीवर उतरले. मुंबई ताब्यात घेण्याचा कुकने समारंभ केला. मुंबईवर प्रभुत्व स्थापन करतेवेळी कुकला येथील पोर्तुगीजांनी तयार करून ठेवलेल्या नव्या चौदा कलमी तहनाम्यावर सही करावी लागली. हा तहनामा इंग्लंडच्या इभ्रतीला कमीपणा आणणारा असूनही कुकने त्यावर सही करावी याचे नवल वाटायला नको. १६६२ पासून १६६५ च्या जानेवारीपर्यंत इंग्रजांना जे हाल सोसावे लागले ते संपतात केव्हा या आतुरतेमुळे कुकने नवा तहनामा विनतक्रार पत्करला. कुकचे हे धोरण तात्त्विक दृष्ट्या अयोग्य असले तरी त्यामुळे पुढील पुष्कळ संकटे टळली. मुंबईची देणगी वेकायदेशीर असल्याचा निर्णय पोर्तुगीज न्यायखात्याने दिला, परंतु त्या निर्णयाचा अंमल करण्यापूर्वीच मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यात गेले होते.

इंग्रज व पोर्तुगीज यांनी पोर्तुगीज राजकुमारीच्या लग्ननिमित्त जो तह केला त्याच्या अंमलबजावणीकरिता अँटोनियो डीमेलो डी कॅस्ट्रो या नावाच्या इसमाची व्हाइसरॉय या नात्याने पोर्तुगीज राजाकडून नेमणूक करण्यात आली होती. इंग्लंडची आरमारी तुकडी मुंबई तहाप्रमाणे ताब्यात घेण्यासाठी निघाली तेव्हा तिच्यातील एका इंग्लिश जहाजात बसून डी कॅस्ट्रो मुंबईची वाट चालू लागला. डी कॅस्ट्रो हा मोठा मिजासखोर स्वभावाचा मनुष्य होता. आपण कुणीतरी श्रेष्ठ दर्जाचे पुरुष आहोत या भावनेने तो ज्या मानमरातबाची अपेक्षा बाळगून इंग्लंडच्या जहाजात बसला ती अपेक्षा पुरेपूर सफल न झाल्यामुळे आपला प्रवासाच्या काळात प्रत्यही उपमर्द घडत होता, कसा तरी जीव मुठीत धरून दिवस काढीत आपण प्रवास पुरा केला असा त्याने आपला ग्रह करून घेतला व त्या अनुरोधाने इंग्रज-पोर्तुगीज तह मोडण्याच्या युक्त्या काढण्यात त्याने आपल्या बुद्धीचा व्यय आरंभिला. तहाची कागदपत्रे बारकाईने तपासून ती पोर्तुगीज कायद्याप्रमाणे नाहीत हा व असेच इतर काही दोष काढून त्याने तहाचा अंमल लांबणीवर टाकला. त्या योगाने जो इंग्रज-पोर्तुगीज यांच्यात खुलाशाचा पत्रव्यवहार चालू झाला, तो मुंबई इंग्रजांच्या हवाली होईतोवर चालला होता. त्या पत्रांत डी कॅस्ट्रोची तक्रारपत्रे आहेत. ती पाहताच कोणीही सहज सांगू शकेल की आत्मसंभावनेच्या तारेत डी कॅस्ट्रोने अधिकाराच्या गंभीरपणाला न शोभण्यासारखे क्षुद्र पोरकट आरोप इंग्रजांवर केले आहेत. रोमन कॅथॉलिक संप्रदाय बुडण्याची काळजी, इंग्रजांविषयी द्वेष, हिंदुस्थानातील पोर्तुगीजांचे महत्त्व खालावण्याची भीती वगैरे विकारांचे प्रदर्शन त्याच्या पत्रांतून प्रगटले आहे. या सर्वांचे बीज म्हणजे मुंबई बेट इंग्रजांच्या हाती जाऊ नये ही भावना होय. एका पत्रात त्याने इंग्रज राजाला मुंबईऐवजी पैसा द्यावा, असेही सुचविले होते. पण पोर्तुगालच्या तिजोरीत पुरेसा पैसा नव्हता. इंग्रजांनी

एक लाख पौंडांचे नुकसान दाखविले होते. डी कॅस्ट्रोची सूचना चार-सहा हजार पौंडांची होती. शेवटी जेव्हा पोर्तुगालच्या राजाने मुंबई वेट इंग्लंडच्या हवाली करण्याबद्दल तंबीचे पत्र पाठविले तेव्हा मुंबई १६६५च्या प्रारंभी इंग्रजांच्या ताब्यात आली. तरीदेखील मुंबई सोडताना तहाच्या मूळ स्वरूपात बरेच फेरफार डी कॅस्ट्रोने केलेच, हे मागे सांगितले आहेच.

या तहाच्या मुळाशी राजकारण होते. पोर्तुगाल १६४९ मध्ये स्पेनच्या वर्चस्वाखालून मोकळा झाला. परंतु त्याला डचांच्या आरमाराचे भय वाटत असल्यामुळे आपले डचांपासून संरक्षण होण्यासाठी पोर्तुगीज राजाने इंग्लंडच्या दुसऱ्या चार्ल्स राजाला आपली बहीण देऊ केली. राजाने सदर योजनेला संमती दिली. लग्नासाठी हा तह होता. तहाचा जो एक गुप्त भाग होता त्यात डचांपासून संरक्षण यासंबंधाचा मजकूर होता. लग्नाच्या तहातील मुंबई देण्याच्या मजकुरात काही शब्द अतिसंदिग्ध असल्यामुळे घोळ पडला. तो तीन वर्षांनी कसाबसा उलगडला. त्या तीन वर्षांत काय घडले त्याचे निवेदन येथवर आलेले आहेच.

इंग्लंडच्या राजाच्या नावे मुंबईचा कारभार अवघा तीन वर्षेच चालला होता. उत्पन्नाच्या मानाने खर्च जास्त, शिवाय ईस्ट इंडिया कंपनीशी कटकटी यामुळे चार्ल्सने मुंबई कंपनीला देऊन टाकण्याचे ठरवून त्याप्रमाणे १६६८ च्या सप्टेंबरमध्ये मुंबईची पहिली राजेशाही संपली. कंपनीची व्यापारशाही सुरू झाली आणि या नव्या शाहीने आपला व्यापार आणि लढाऊ सामर्थ्य वाढवीत आपल्या देशाची सत्ता साऱ्या हिंदुस्थानात स्थापिली. मुंबई हा जो १६६१ मध्ये एक बेटवजा, लहानसा, दरिद्री व उपेक्षित भूविभाग होता, त्याला भारतीय स्वराज्यप्राप्तीपर्यंतच्या सुमारे पावणेतीनशे वर्षांत प्रचंड भव्य शहराचे स्वरूप आले. विनाशाचा दोष जर काळावर लादला जातो, तर विकासाची पुण्याई काळाच्या पदरात न्यायानेच टाकणे प्राप्त आहे. यासाठीच प्रस्तुत इतिहासाचा आरंभ 'कालाय तस्मै नमः' या वचनाने केला आहे.



प्रकरण दुसरे

व्यापारी सत्तेचा आरंभ

ईस्ट इंडिया कंपनीकडे १६६८ साली मुंबई हे वेट गेले हे कंपनीला इष्ट असेच झाले. १६१२ मध्ये व्यापारासाठी सुरतेस ठाण मांडल्यापासून कंपनीच्या कामगारांना मुघल सार्वभौम सत्तेचा जो उपद्रव सोसावा लागत होता, त्याला कंटाळून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अन्यत्र एखादे सुरक्षित बंदर मिळवावे अशी कंपनीच्या मनात आकांक्षा होती. ती १६६८ मध्ये पूर्वोक्त रीतीने सफळ झाली. मुघलांचा मुख्य उपद्रव म्हणजे लाचखाऊपणा व दिरंगाई हा होय. कंपनीचे लोक व्यापाराला परवानगी मिळावी म्हणून १६०८ मध्ये जहांगीर बादशहाच्या भेटीस गेले. 'देंगे दिलाऐंगे' चालवीत बादशहाने १६१२ मध्ये चार वर्षांनी वखार स्थापण्याला परवानगी दिली. तेव्हा कंपनीची काही जहाजे सुरतेनजीक नदीवर होती. त्यावर गोव्याहून पोर्तुगीजांची बरीच लढाऊ जहाजे तेथे चालून आली. पण पोर्तुगीजांनी मार खाऊन पळ काढावा असा योग होता. इंग्रजांच्या या पराक्रमाने परवान्याचे रेंगाळलेले प्रकरण काहीसे लवकर निकालात निघाले. हिंदुस्थानातील राज्यांची कमजोरी आरमारी शक्तीची. त्यांचे आरमार होते पण त्याची दौड अरबस्तानापर्यंत. हिंदुस्थानातून मक्केस हाजला जाणाऱ्या (मुसलमान) यात्रेकरूंची ने-आण एवढीच त्या आरमाराची कामगिरी. याच प्रदेशातून एखाद्या वेळी मालवाहू व्यापारी जहाजे यावयाची, तथापि त्यांचा बचाव करणे कठीण असे. हिंदुस्थानात पूर्वी समुद्राकडून जे विशेष भय नव्हते ते पोर्तुगीजांनी गोवे जिंकून व तेथे राज्य स्थापून उत्पन्न केले. ते या देशात आले तेव्हा गुजरातमध्ये मुसलमान सुलतानाचे राज्य होते. त्याने पोर्तुगीजांचा पाडाव साधण्याचा निष्फळ प्रयत्न केला. पोर्तुगीजांची आरमारी बलाढ्यता त्या प्रयत्नात सिद्ध झाली आणि त्यांच्या वाटेस जाण्याचे गुजरातच्या सुलतानी सत्तेने सोडले तरी पोर्तुगीज सत्तेने सुलतानांचा पिच्छा सोडला नव्हता. मुंबई यामुळेच गोव्याच्या राज्यात दाखल झाली. इंग्रज येण्यापूर्वी पोर्तुगीजांचा जो धाक मुसलमानी सत्तेला बाळगावा लागे तो इंग्रजांनी सुरतेच्या पाण्यात पोर्तुगीजांना झोडपल्यामुळे कमी झाला. पोर्तुगीज कधी उच्छृंखलपणे टुरटूर करू लागल्यास त्याला शह देण्याला हे नव्याने येथे व्यापारानिमित्त राहू इच्छिणारे इंग्रज मोहरे बरे आहे, या कल्पनेने जहांगीरने परवान्याचे

प्रकरण संपविले. इंग्रज सुरतेस स्थायी झाला.

सुरतेस व्यापाराचे बस्तान जमले तरी इंग्रज कंपनीला निर्वेधपणा नव्हता. जेथे उठल्यासुटल्या मुघलांचा किंवा इतर कुणाकडून उपद्रव होणार नाही, अशा एखाद्या ठिकाणाचा विचार व शोध करीत असता कंपनी-कामगारांच्या मनात मुंबई हे ठिकाण भरले. एखादी गोष्ट मनात भरणे व हातात पडणे यांतल्या फरकाने इंग्रजाला आशेने मुंबईकडे कित्येक वर्षे पाहत राहावे लागले. १६२६ मध्ये डचांशी हात मिळवून इंग्रजाने एकदा प्रत्यक्ष चढाई करून मुंबई तुडविली, जाळली, लुटली; पण ती हातात कायम धरून ठेवण्याचे धाडस तेव्हा दोघांनाही झाले नाही. कर्मधर्मसंयोगाने या दोघांचे त्या वेळी सख्य जुळले व मुंबई लुटण्याजाळण्याचे शतकृत्य दोघांनी पार पाडले. शत्रुत्वाच्या नात्याने मात्र डच-इंग्रज एकमेकाशी सदैव वागत होते. १६३५ मध्ये सुरत-वखारीचा अध्यक्ष मेथवोल्ड याने फिरंग्यांशी मैत्रीचे संबंध जुळविले. राजकारणातले शत्रुमित्रत्व त्या त्या वेळच्या स्वार्थावर अवलंबून असते, या सिद्धान्तानुसार या वेळचा हा सलोखा होता. उभयपक्षी मानपान-आदर-सत्काराचे सोहळे वगैरे सर्व यथासांग पार पडले; पण इंग्रजांच्या अपेक्षांना फळ आले नाही. मेथवोल्डने या बाबतीत पुष्कळच धडपड चालविली होती. आणि तोच चार्ल्स राजा व पोर्तुगीज राजकन्या यांचे लग्न ठरले त्यापूर्वीच्यान जीकच्या काळात पोर्तुगाल येथे इंग्लंडचा वकील होता आणि लग्नात वरपक्षाला नेमके मुंबई बेटच आंदण मिळते, हा एक विलक्षण योग लक्षात ठेवण्या-सारखा आहे. मुंबईच्या वास्तव्य-काळात जो मेथवोल्ड ते बेट कंपनीच्या हाती पडण्यासाठी धडपडत होता, तो लग्नाच्या भानगडीच्या प्रसंगी अगदीच मौन धरून बसला असेल हे विशेष संभवनीय नाही. मात्र तो वारला लग्नाचा तह होण्यापूर्वी.

पूर्वेकडील देशात व्यापाराचे रान मोकळे आहे, असे दिसून आल्यावर युरोपची अनेक राष्ट्रे त्या व्यवहारात अहमहमिकेने घुसली. त्यांच्यात चुरस उत्पन्न होऊन एकमेकाच्या नाशासाठी त्यांनी संधी पाहत राहावी हे स्वाभाविक होते. यात युरोपियन चाचे जास्त गुंतागुंत उत्पन्न करीत. गोरा म्हटला की तो इंग्रजाशिवाय दुसरा कोणी नव्हे, अशा भ्रमाने सुरतेच्या इंग्रजाला पुष्कळदा मुघलाकडून भयंकर आपत्ती सोसावी लागली. येथील किंवा इंग्लंडचा राजा मेला की ते इंग्लंडच्या या कंपनीला एक प्रकारे संकटाचे आव्हानच असे. १६२६ मध्ये जहांगीर मरण पावला आणि १६२७ मध्ये इंग्लंडच्या पहिल्या जेम्सची तीच गती झाली. जेम्सचा मुलगा पहिला चार्ल्स याच्या वेळी इंग्लंडात राज्यक्रांतीच घडली. लोकांनी बंड केले. राजाच्या फौजेशी लढाया खेळून राजाला पकडले व त्याला ठार मारले. हा प्रसंग कंपनीसंबंधात थोडा आणी-बाणीचा होता. तरी तिने अनेक लटपटी करून आपला मार्ग इंग्लंडच्या सरकारापुरता बराच निर्विघ्न केला. क्रॉमवेलच्या कृपेने जे त्यांच्या स्पर्धेला उभे राहिले, ते थोड्याच अवधीत निमाले. इकडे बादशहाची खपामर्जी, सुरतेच्या मुघल गव्हर्नराचे लाच खाणे, असे आघात चालूच होते. क्रॉमवेल हा प्यूरिटन पंथाचा—अर्थात रोमन कॅथॉलिकांचा

हाडवैरी. फिरंगी हे कॅथॉलिक; त्यांच्याकडून मुंबई काढावी असे क्रॉमवेलच्या मनात भरवूनही तेव्हा या मसलतीला फळ आले नाही. इंग्लंडचा राजा व पोर्तुगालची राजकन्या यांच्या विवाहानिमित्त मुंबई आंदणादाखल मिळाल्यावर हे बेट कंपनीच्या हाती देऊन आपण मोकळे व्हावे, असा राजाचा बेत होता, परंतु ज्या वेळी त्याने हा बेत कंपनीच्या कानावर घातला त्या वेळी डच स्वारी करणार अशी अफवा हवेमध्ये दाट होती. म्हणून राजाचा हेतू कंपनीने मनावर घेतला नाही. शेवटी १६६८ मध्ये मुंबई बेट वर्षाच्या अवघ्या दहा पौंड भाड्याने ईस्ट इंडिया कंपनीच्या पदरात पडले.

बेट कंपनीला मिळाले खरे, पण ही प्राप्ती सुखाची नव्हती. या प्राप्तीने सुरतेचा मुघल सुभेदार रागावला. अणि त्याने बादशहाचे मन विथरवले. मुंबई गमावल्याने फिरंगी आधीपासूनच नाराज होता. डचांनी एकदा मुंबईवर प्रत्यक्ष आरमारच आणून इंग्रजाला भीती उत्पन्न केली आणि जंजिऱ्याच्या शिद्द्यांनी तर मुंबईत वारंवार चढाई करून इंग्रजाचा छळ मांडला होता. शिद्दी हा मुघल आरमाराचा मोठा अधिकारी. त्याचीही त्याला गुर्मी होती. मुंबईच्या बंदरात तो बेधडक घुसायचा. माजगावा-सारख्या एखाद्या भागात मन चाहील तितके दिवस दांडगाईदंगा करीत राहायचा. बाजार लुटणे, खून करणे इत्यादी अत्याचार हा तर शिद्दी सैनिकांचा खेळ होता. १६७२ पासून जंजिरेकरांचा असा उपद्रव सालोसाल १६९० पर्यंत चालू होता. इंग्रज त्यांच्या उपद्व्यापांना आळा घालण्याचा प्रयत्न करीत; पण त्याचा उपयोग होत नसे. शिद्दी मुंबईस येत ते पावसाळ्यात निवाऱ्यासाठी. १६८९ मध्ये तर त्यांनी मुंबईवर खऱ्या अर्थाने स्वारी केली. मुंबई कंपनीच्या हातून जावी अशी वेळ येऊन ठेपली होती. तेव्हा चाइल्ड नावाचा कंपनीचा गव्हर्नर होता. रिकामा डौल हाच त्याचा विशेष. त्याने शिद्द्याच्या जहाजांतील माल मुंबईत उतरवून घेतला होता. त्याने तो परत मिळविण्याविषयी मुदत देऊन कळविले. चाइल्डने त्याची दाद न घेतल्यामुळे शिद्द्याने मुंबईवर आक्रमण केले व त्याच्याशी लढण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही असे दिसून आल्यावर चाइल्डने शिष्टाईकरिता दोन आसामी बादशहाकडे पाठविले. त्यांनी दोन्ही हात पाठीशी बांधून अक्षरशः लोटांगण घातल्यावर नुकसानभरपाई, दंड वगैरे देणी कंपनीवर लादून मग बादशहाने त्यास माफी केली. कंपनीच्या बेअब्रूचा हा उच्चांक होता. माफीच्या मजकुरात चाइल्डने इंग्लंडला नऊ महिन्यांच्या अवधीत जावे अशी एक निकराची अट होती. या प्रसंगानंतर लवकरच चाइल्ड वारल्यामुळे हकालपट्टीच्या सोहळ्यातून तो वाचला. १६९० पासून शिद्दी कायमचे आवरले. इंग्रजांमागचा त्यांचा उपद्रव थांबला. तरी त्यांच्याप्रमाणेच ज्यांच्या उपसर्गाचा इंग्रजांना धाक बाळगून वागावे लागे अशा आणखी ज्या शक्ती होत्या त्यांत मराठ्यांना अग्रस्थान देणे भाग आहे. मागे क्वचित दिलेल्या वर्षांवरून सहज लक्षात येणारे आहे की इंग्रजाने मुंबईस ठाण मांडले तेव्हा शिवाजीमहाराजांच्या वाढत्या वर्चस्वाचा अनुभव येऊ लागला होता. जेथे इंग्रजांची मुख्य वखार होती ते सुरत शहर महाराजांनी १६६४ मध्ये यथेच्छ लुटले.

त्यानंतरची पाच वर्षे महाराजांना वाईट गेली. १६७० मध्ये त्यांनी उठाव करून पुन्हा सुरत लुटले. दोन्ही प्रसंगी इंग्रजांनी लुटीपासून आपला बचाव केला. १६७० हे वर्ष मुंबईला इंग्रज आपल्या राज्याची घडी बसवू लागले ते आहे. शिद्दी वारंवार मुंबईस येतो व मराठी प्रजेस त्रास देतो यामुळे शिवाजीमहाराजांनाही त्याबद्दल इंग्रजांकडे करड्या भाषेत जाब विचारावा लागे. जेव्हा महाराज व शिद्दी यांचे कटाकटीचे युद्ध जुंपे तेव्हा तर अतिसावधपणाने इंग्रज वागत असत. शिद्द्याची शिरजोरी वर्षानुवर्ष सोसूनही इंग्रजांचा ओढा आतून हबशाकडे जास्त, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. महाराजांच्या आरमाराबद्दल इंग्रजांच्या मनात तितकासा धाकही नव्हता. पण महाराजांच्या मुलखात इंग्रजांच्या कुठे कुठे वखारी होत्या. त्यांना व त्यांच्याद्वारे चालणाऱ्या व्यापाराला धोका नसावा, या हेतूने शिवाजीमहाराजांशी उघड बेबनाव होऊ नये म्हणून इंग्रज खबरदारीने वागत. १६७४ मध्ये महाराजांचा राज्याभिषेक साजरा झाला तेव्हा रायगडावर इंग्रज प्रतिनिधी उपस्थित होते, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. प्रसंग आला तेव्हा महाराजांनी काही इंग्रज पकडून कैदेतही डांबले. एरवी त्यांचे परस्परसंबंध उघड वैरापर्यंत कधीच गेले नाहीत. महाराजांमागून संभाजीराजांची कारकीर्द कधी राग तर कधी लोभ अशा ओढाताणीतच गेली. त्यानंतर १६८९ मध्ये संभाजीराजे मारले जाऊन त्यांचा मुलगा शाहू औरंगजेबाच्या कैदेत तर भाऊ राजाराम महाराष्ट्रापासून लांब दक्षिणेत जिंजीस, अशा मराठ्यांच्या दोन तऱ्हा झाल्यामुळे इंग्रज मराठ्यांच्या धाकातून तेवढ्यापुरता सुटला. याच सुमारास कान्होजी आंग्रे उदयास येऊन त्याच्या हालचालींवर नजर ठेवण्याची इंग्रजांना आवश्यकता उत्पन्न झाली होती. याखेरीज डच, फ्रेंच, पोर्तुगीज हे इंग्रजाच्या काळजीत भर टाकायला होतेच.

इतक्या आपत्तींना तोंड देत असताही इंग्रजाने मुंबईच्या भूमीची सुधारणा चालूच ठेवली होती. मुंबई एकूण सात बेटांची हा उल्लेख पूर्वी आला आहे. मोठा कुलाबा, धाकटा कुलाबा, माजगाव, परळ, वरळी, माटुंगा, माहीम ही बेटे एकमेकास जोडून त्यांचा सलग एक भाग करणे हे इंग्रजांचे आद्य कर्तव्य होते. आज परळ, माजगाव, वरळी वगैरे सर्वांची मिळून एकच मुंबई असे मानले जाते. इंग्रजाने मुंबई वहिवाटीस आपल्या मालकीने घेतली तेव्हा अपोलो बंदर-गेटवेपासून सरळ गिरगावाकडे जाऊ लागले की धोबीतलावापासून उजवीकडे काळबादेवी, मुंबादेवी वगैरे देवतांच्या नावे ओळखला जाणारा जो प्रदेश तो मुख्य मुंबईचा भाग—असे त्याचे थोडक्यात वर्णन करता येईल. म्हणजे गिरगाव या भागाच्या बाहेर पडले असे मात्र नव्हे. मागे दिलेली बेटे ही खाड्यांनी वेगळ्या केलेल्या त्याच्याच शाखा होत. (गिरगाव हे वेगळे बेट नव्हते.) मलबारगिरी (टेकडी) खालची वस्ती म्हणून गिरगाव. माहीम–कुलाबा ही मात्र निराळी बेटे. त्यांतले माहीम हे आपल्या सत्तेखालचे असा पोर्तुगीजांचा दावा असूनही मुंबईचा भाग कंपनीच्या ताब्यात आल्यावर थोड्याच काळात इंग्रजाने ते मुंबईस जोडले. मूळच्या मुंबईचा विस्तार येथून सुरू झाला. कंपनीच्या नोकरीत जेराल्ड ऑंजिअर या

नावाचा, खोल विचार करणारा, भविष्यासंबंधात दूरवर दृष्टी टाकणारा, शत्रूचे बलाबल नीट पारखून त्याप्रमाणे वागगारा (१६७०–७७) एक अधिकारी होता. मुंबईच्या विकासाचा खरा भक्कम पाया त्याने घातला असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी कंपनी. व्यापाऱ्यांशिवाय व्यापार कुठला? त्यासाठी ऑंजिअरने मुंबईस जाऊन राहण्याला इतर ठिकाणांहून व्यापारी यावे या हेतूने इतर धर्मांच्या लोकांना आपापल्या धर्माने विनतक्रार राहता येईल, असे आश्वासन पुकारले. मालाच्या आयात-निर्यातीच्या बाबतीत जरूर तेथे जकात-माफी, द्रव्यसाहाय्य वगैरे सवलती कारागीरवर्गाला दिल्या आणि त्यांना मुंबईस ओढले. धार्मिक स्वातंत्र्याचे एक उदाहरण पारश्यांच्या स्मशानभूमीचे आहे. पोर्तुगीज काळाच्या इतिहासात चुकून एखादा पारशी मुंबईत राहणारा आढळतो. मरण जवळ आले की त्याला मुंबई सोडून अन्यत्र जाणे प्राप्त असे; कारण मुंबईत पारशी समाजाचे स्मशान नव्हते. मलबार टेकडीवरील 'दोख्मा' (स्मशान) १६७० सालानंतर म्हणजे ऑंजिअरच्या कारकिर्दीमध्ये अस्तित्वात आले. धर्मसहिष्णुतेच्या या धोरणामुळे मुंबईस भल्या लोकांची वस्ती साहजिकच वाढू लागली. हबशांच्या चढाईने काही ठिकाणची वस्ती तेवढ्यापुरती ओहटत असे. नवी वस्ती किल्ल्यात व त्याच्या आश्रयाने बाहेर वाढत असल्याने तिला कधी फारशी ऊठपळ करावी लागली नाही.

ऑंजिअरने मुंबई बेटाच्या संरक्षणासाठी किल्ला आणि आरमार म्हणजे जमीन व पाणी अशी दोन्ही अंगांनी कडेकोट बंदोबस्त आरंभला होता. मुंबईच्या बंदरात ज्या लढाऊ बोटी सुरुवातीस काम करू लागल्या, त्या लहान आकाराच्या व संख्येने थोड्या होत्या. पण प्रसंगानुसार वेळोवेळी त्यात वाढ होत गेल्यामुळे शेवटी अर्थात ऑंजिअरच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनी ज्या व्यवस्थेला आरंभी 'बॉंबे मरीन' हे कामापुरते हलके नाव होते तिलाच पुढे 'इंडियन नेव्ही—हिंदी आरमार' असे महत्त्वदर्शक नाव प्राप्त झाले. तथापि ऑंजिअरचे यासंबंधातले श्रेय इतिहासाला मान्य आहे. आरमाराप्रमाणे मुंबईच्या लष्कराचे शिपाई रोगातून वाचावे यासाठी याच पुरुषाने इस्पितळ (रुग्णालय) कंपनीसरकारला बांधायला भाग पाडले. औषधे सुरतेहून आणि इंग्लंडाहून मागविली जात. रुग्णालय नव्हते तोवर आजारी शिपाई बेतालपणाने वागून मृत्युमुखी पडत. रुग्णालयाने सर्व प्रकारच्या बेतालपणाला आळा पडला. माणसाचे जीवन सुखात जावे अशी ऑंजिअरची दृष्टी होती.

धार्मिक स्वातंत्र्यामुळे येथे सर्व धर्मांच्या लोकांची, त्यातल्या त्यात हिंदूंची, वस्ती वाढली. ही वस्ती ऑंजिअरच्या डोळ्यादेखत दहावरून साठ हजारांवर गेली. प्रजेचे संरक्षण हे राज्यसत्तेचे मुख्य कर्तव्य; ते चुकू नये म्हणून मुंबईत त्याने कोर्ट (न्यायदान) चालू केले. चोऱ्या, दरवडे, खून, शिपायांची बंडे, वगैरे गुन्हेगारीला कडक प्रतिबंध हे प्रजेच्या रक्षणाचे एक अपरिहार्य अंग आहे. त्याचेही ऑंजिअरला भान होते. त्याने भंडारी लोकांना हाती धरून ते काम बजावले. मुंबईमुळे आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची

कंपनीला जाणीव होऊन आपले स्वतःचे नाणे असावे या आकांक्षेने ऑंजिअरने लंडन येथील मुख्य कंपनीचालकांकडे स्वतंत्र टाकसाळ स्थापण्याची परवानगी मागितली. ती परवानगी मिळाली. टाकसाळही निघाली. या टाकसाळीच्या नाण्यांची देवघेव मुंबईत व आसपासच्या मराठी मुलखात होत असे. मुंबईच्या टाकसाळीला मदत या नात्याने सुरतेसही नाणी पाडीत असत. हा मजकूर वाचीत असता 'सुरती रुपया' हे शब्द पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वी लोकांत रूढ असल्याचे पुष्कळांना आठवेल. सुरतीऐवजी 'कलदार' या विशेषणाचाही पुष्कळदा वापर होत असे. या नाण्यावरील फारसी लिपीने मुघल अधिकाऱ्याची मर्जी विघडली. नाण्याप्रमाणे आपली निराळी वजने-मापे हवी हे स्वतंत्र सत्तेचे स्वरूपही ऑंजिअर आपल्या योजनेत विसरला नव्हता. येथे कंपनीच्या नोकरीखातर येणारे इंग्रज बहुधा अविवाहित असत. त्यांना बायका पाहिजेत, पण येथील स्त्रियांशी त्यांनी लग्न करू नये; अशा लग्नाची प्रजा आईबापांच्या गुणांवाचून जन्मास येते, असा ऑंजिअरचा ठाम समज होता. यासाठी इंग्लंडहून विवाहोचित स्त्रिया इकडे आणाव्या, या बायकांनी सभ्यपणाने राहावे, लग्न होईतोवर त्यांच्या पोषणाचा खर्च काही मर्यादेपर्यंत कंपनीने सोसावा, लग्न होण्याची शक्यता नाही असे दिसल्यास त्यांना कंपनीच्या जहाजांनी परत पाठवावे, अशीही ऑंजिअरची सूचना होती.

मुंबई बेटाची हजारो एकर जमीन दररोज समुद्राच्या भरतीने पाण्यात बुडायची, ओहटीच्या काळात ओली राहायची आणि पावसाळ्यात तर जिकडेतिकडे पाण्याचेच राज्य व्हायचे. सारांश, पिकाच्या किंवा घरबांधणीच्या दृष्टीने तिचा काही उपयोग नव्हता. रोगराईला मात्र ही स्थिती निस्संशय क्रूर मदत करीत असे. यावर शक्य असेल तेथे समुद्र हटविणे किंवा भरून काढणे हा एकच उपाय होता. या कामी खर्च होईल, पण तो वाया गेला असा पश्चात्ताप करावा लागणार नाही; उलट उत्पन्न कायमचे वाढेल, असा अभिप्राय ऑंजिअरने लंडनच्या वरिष्ठांना कळविला होता. प्रथम या अभिप्रायाची दाद लागेना, तेव्हा ऑंजिअर व त्याचे कंपनीच्या नोकरीतले काही सहकारी यांनी स्वतःची पदरमोड करून समुद्र बांधाने अडवून किंवा दगड-मातीने भरून जमीन संपादावी असा बेत लंडन येथील वरिष्ठांच्या नजरेस आणला. त्याचीही डाळ शिजली नाही. मुंबईची माती सुपीक आहे. तेथे अनेक जातींची फळे व भाजीपाला व तांदूळ हे धान्य आणि ताडमाड वगैरे खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. ते समुद्रातून काढलेल्या भूमीत नव्याने अधिक पिकवावे, मुंबई स्वयंसंपन्न करावी; कारण अन्नधान्यासाठी पोर्तुगीज, शिद्दी व मराठे यांच्या तोंडाकडे पाहण्याशिवाय तेव्हा इंग्रजाला गत्यंतर नव्हते; आपसातल्या संबंधात बिघाड झाला की, अन्नधान्याचा प्रश्न इंग्रजापुढे उभा राहायचा, वगैरे युक्तिवाद ऑंजिअर करीत होता. तोही निष्फळ ठरला. शेवटी समुद्राची समस्या सोडविण्याची आवश्यकता लंडनच्या कंपनीवरिष्ठांना मुंबईतील स्वबांधवांच्या मोठ्या अकाल-मृत्युसंख्येने पटविली. मग खर्चाकडे न पाहता

समुद्राला शक्य तेथे गवसणी घाला, असा लंडनच्या कंपनीचालकांचा मुंबईतील नोकरांमागे तगादा सुरू झाला. नंतर ते काम सुरू झाले. आणि आजवर ते थोड्याफार प्रमाणात चालू असल्याचे सर्वांना ठाऊक आहेच.

ऑंजिअरने दाखविलेला मार्ग आक्रमीत असता कंपनीच्या कामगारांना ज्या संकटाशी झगडावे लागले त्यांतल्या काही संकटांचा निर्देश मागे केला आहे. त्यांत १६८३ सालातील अंतःस्थ फुटीच्या एका संकटाचे वृत्त आलेले नाही. मुघल, मराठे, शिद्दी किंवा पोर्तुगीज, फ्रेंच, डच यांचा उपद्रव हा बाहेरचा उपद्रव होता. कीगविनचे बंड हे संकट आपसातल्या वेबनावाचे होते. कीगविन हा कंपनीचा एक लष्करी अंमलदार. हा जसा अचाट साहसी तसाच संयमी होता. वेतनावरून त्याने कुरकूर आरंभिली. त्याची तक्रार ही कंपनीच्या साऱ्या लष्कराची तक्रार होती. त्याने १६८३ च्या डिसेंबराच्या सुमारास अचानक उठाव करून गव्हर्नराच्या दुय्यमाला अटकेत ठेवून मुंबईचा किल्ला इंग्लिश राजाच्या नावाने आपल्या ताब्यात घेतला. ही वातमी सुरतेस कळल्यावर तेथून कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बंडाचे वर्तमान लंडनला राजास कळविले. राजाने किल्ला कंपनीच्या हवाली करण्याविषयीचा हुकूम एका बड्या आरमारी अधिकाऱ्याच्या हाती मुंबईस पाठविला. त्या अधिकाऱ्याने बंडाच्या चौवा मुख्य पुढाऱ्यांखेरीज इतर सर्वांना माफी जाहीर केली, तरी कीगविन किल्ला सोडीना. पुढे त्यालाही सुटकेचे आश्वासन मिळून तो राजाच्या अधिकाऱ्याबरोबर लंडनला गेला. कीगविनच्या वागणुकीत कायदेशीर मालकाविरुद्ध उठाव या एका गुन्ह्याखेरीज दुसरे कोणतेही पाप नव्हते. खून, लूट किंवा पैशाची अफरातफर यासारखा कोणताही दोष त्याच्या पदरी बांधता येत नाही. कंपनीशी द्रोह केला, पण इंग्लंडच्या राजासंबंधीची श्रद्धा त्याने कायम ठेवली. त्याने कंपनीच्या तिजोरीला मुळीच स्पर्श केला नाही असे नाही. त्याच्या अनुयायांनी लष्कराला रीतसर पगार देण्यापुरताच तिजोरीत हात घातला. एक वर्ष त्याच्या अधिकारात किल्ला होता. तेव्हा संभाजीराजांशी त्याने तह केला, शिरजोरीने बंदरात शिरू पाहणाऱ्या शिद्दयाला जरबेने माघारी फिरविले, वगैरे हे परराष्ट्रीय राजकारण होते. संभाजीराजांच्या तह करणाऱ्या हस्तकांनी आपण कुणाशी तहाचे बोलणे करतो याची विचारपूस केली नाही, हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. या सर्व गोष्टी कीगविनच्यातर्फेच्या होत्या.

एलिझाबेथ राणीच्या सनदेने जन्मास आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीचा इंग्लंडात व्यापारी वृत्तीच्या धनिकांना मत्सर वाटत होता याचे दिग्दर्शन पूर्वी केले आहे. कधी या कंपनीशी सरकारी अनुकूलतेने संघ स्थापून स्पर्धा करणारे लोकही निघाले. मुंबईस ईस्ट इंडिया कंपनीने कारभार सुरू केला तेव्हा हा स्पर्धाभावाचा हृद्रोग बळावून नवी कंपनी अस्तित्वात आली आणि तिने पहिल्या कंपनीला खो देण्याचा यत्न अरेरावीने चालू केला. या कंपनीचा निकोलस वेट नावाचा एक गृहस्थ नव्या कंपनीच्या वतीने सुरतेस आला. त्याने 'आयत्या पिठावर रेघोट्या' म्हणतात तसा उपद्व्याप

आरंभला. जुन्या कंपनीचे निशाण एकदा सक्तीने पाडले. ते जुन्या कंपनीच्या लोकांनी हट्टाने उभारले. आपला माल म्हणण्यासारखा चांगला नाही; मुघल बादशहाची मान्यता नाही; जुन्या कंपनीची सनद इंग्लंडच्या राजाने रद्द केलेली; अशा स्थितीत वेटला जुन्या कंपनीच्या लोकांनी धूप दाखवू नये, हे स्वाभाविक होते. लाच चारून आपलासा केलेला सुरतेचा सुभेदार हाच काय तो नव्या कंपनीवाल्यांचा एक आधार. हा आधार म्हणजे दिल्लीच्या बादशहाची मान्यता नव्हे. त्या मान्यतेसाठी मॉरीस नावाचा इसम बादशहाकडे गेला, पण हात हालवीत परत आला. तथापि जुन्यानव्यांचे तंटे चालू राहिले. १७०२ मध्ये दोघांचा समेट झाला. तो केवळ वरकरणी होता. अर्थात दोन्हीकडे धुसफूस-कटकट चालूच राहिली. हा प्रकार १७०८ मध्ये खऱ्या अर्थाने निकालात निघाला. दोन्ही कंपन्यांचे एकीकरण घडून त्यांचा संयुक्त व्यापार-व्यवहार सुरळित होऊ लागला. आता इसवी सनाचे अठरावे शतक उगवून कंपनीच्या कारभाराच्या उत्कर्षाला जोर चढला.

कंपनीला मुंबईचा स्वायत्त आधार मिळाल्यावर सुरतेचे महत्त्व कमी व्हावे हे ठरलेलेच होते. सुरतेचे महत्त्व ओसरणे म्हणजे मुघल सत्तेचे आर्थिक नुकसान; हे जाणून सुरतेहून मुंबईस जाणाऱ्या इंग्रजाला सुरतेच्या सुभेदाराची आगाऊ परवानगी काढणे प्राप्त असे आणि पुष्कळदा तो सुभेदार इंग्रजाला केवळ सतावण्याकरिता परवानगी नाकारून त्याच्या कामाची बुद्धिपुरस्सर कुचंबणा करी. मुंबईवर स्वतंत्र अधिकार राबवून सुरक्षित राहण्यासाठी फौजफाटा बाळगणे, वाढविणे आणि प्रसंगी लढणे इंग्रजाला अवश्यच होते. फौजेचे स्थानिक बळ कमी; यामुळे जंजिऱ्याच्या हबशांवर इंग्रज प्रारंभी कित्येकदा मात करू शकला नाही. याला लष्करी बळाच्या कमतरतेप्रमाणेच आणखी एक बलवत्तर कारण होते. राज्य मुघलाचे. हबशी हा त्याचा नोकर. त्याला मुंबईस ठोकल्यास दिल्लीच्या मुघल सार्वभौमसत्तेचे दडपण इंग्रजावर पडण्याचे भय असे, म्हणून इंग्रजाने आपले प्रमुख ठाणे १६८७ मध्ये मुंबईस हालविले.

प्रकरण तिसरे

विकासाची आगेकूच

मागील प्रकरणात नमूद केलेल्या मुंबईसंबंधाच्या धावत्या आढाव्यात इंग्रजी सत्ता निरनिराळ्या अंतर्बाह्य संकटांतून कसे मार्गक्रमण करीत होती याचे दर्शन घडविले. त्या संकटांतही या नूतनस्थापित सत्तेची उत्कर्षाच्या दिशेने प्रगती थांबलेली नव्हती. सत्तेच्या पहिल्या चाळिशीतील काही संकटे नाममात्र शिल्लक राहिली; काही शत्रूंची आक्रमक वृत्ती बोथटली, तर काही शत्रू नव्याने उत्पन्न झाले. पण या चाळीस वर्षांत इंग्रजाची शक्ती वाढून असल्या संकटांची काळजी पूर्वीइतकी तीव्र राहिली नव्हती. इंग्रजाच्या हाती मुंबई आली तेव्हा औरंगजेबाची बादशाही देशभर गाजत होती; महाराष्ट्रात छत्रपती शिवाजीमहाराज उदयास आले होते. १६८० मध्ये महाराज वारले आणि त्यांचे राज्य आणि आदिलशाही, कुतुबशाही ही जुनी राज्ये बुडविण्याच्या उद्देशाने औरंगजेब दक्षिणेकडे उतरत होता. आदिलशाही व कुतुबशाही यांचा समूळ नाश औरंगजेबाने साधला. मराठे मोडले, पण बादशहाला त्यांचा उच्छेद करता आला नाही. त्यांनीच उलट (अनुक्रमे १६८६ व १६८७) बादशाही सामर्थ्य जेरीस आणले. शेवटी बादशहाची कबर मराठ्यांच्या मुलखात बांधली गेली. दिल्लीचे सिंहासन एकाच्या मृत्यूने उघडे पडले की त्यावर चढू इच्छिणारांपैकी किती जणांचे मुडदे पडतील, किती जणांना डोळे फुटून मरेतोवर किती दिवस कैदेत काढावे लागतील वगैरे अत्याचारांना मर्यादा नव्हती. औरंगजेबानंतर सुरतेतील सुभेदाराची सूरत गेली; १७३९ मधील नादिरशहाच्या तडाक्याने मोगलाईत कसलेच त्राण उरले नाही. तेव्हा जंजिरेकर हबशांच्या शिरजोरीतले अवसान नाममात्र उरले. पोर्तुगीजांचेही बळ खचत चालले होते. त्यामुळे मुघल, हबशी, फिरंगी यांच्या संबंधाचा इंग्रजाला वाटणारा धाक कमी झाला तर हबशांची जागा आंग्र्यांनी घेतली. मुघल मागसले तर मराठे पुढे आले. त्यांनी पोर्तुगीजांचा ठाण्यापासून वसईपर्यंतचा प्रदेश पादाक्रांत करून (१७३९) त्यांचे राज्य व सामर्थ्य खूपच खची केले. या क्रांतीच्या काळात मुंबई बेटाचा विकास इंग्रज करीत होते.

कंपनीच्या कर्तबगार अधिकाऱ्यांनी मुंबईवर ठाणे ठेवल्या दिवसापासून समुद्राचे आक्रमण थांबवून त्याखाली जाणारी जमीन मोकळी करणे हे एक अपरिहार्य ध्येय मानले

होते आणि ते सफळ करण्यासाठी इंग्रजांची सतत खटपट चालली होती. या खटपटीआड येणाऱ्या अडचणीही पुष्कळ होत्या. पहिली अडचण पैशाची. कंपनी व्यापार आणि नफा यासाठी जन्मास आलेली; तिच्या तिजोरीच्या किल्ल्या लंडन येथील संचालकांच्या हाती; तिच्या परवानगीवाचून नेहमीच्या सामान्य खर्चाबाहेर एक पैदेखील मुंबईतील कंपनीच्या कारभाऱ्यांना वापरणे मुष्किलीचे असे. पुष्कळदा दार ठोठावून परवानगी मिळविली व समुद्र हटविण्याचे काम चालीस लावू म्हटले तर अनेक वेळा पुरेसे मजूर जमविण्याची दिक्कत पडे. मुंबईची वस्ती वाढत असली तरी ती दगडामातीच्या टोपल्या वाहणारांची नव्हती. व्यापारी व कारागीर हे मोठ्या संख्येने मुंबई सुरक्षित म्हणून मुंबईच्या आश्रयाला येत. त्यांचा अर्थातच समुद्र हटविण्याच्या कामाला तितकासा उपयोग होत नसे. कित्येक वेळा शेजारचा शत्रू आपले एखादे काम उभे करून त्यात आजूबाजूच्या गावातील मजूर गुंतवून ठेवी आणि ते मुंबईला जाऊ शकत नसत. जंजिरेकर हबशांनी एकदा नागोठण्याकडे किल्ला बांधण्याचे काम काढले. तिकडे बांधकामाचे मजूर अडकल्याने मुंबईस त्या कामाच्या मजुरांची हाकाहाक आहे, असा त्या कामाच्या दिरंगाईचा खुलासा मुंबईसंबंधाच्या इंग्रजी ऐतिहासिक साधनांत आढळतो. कधी कधी या कामावर कैद्यांना राबविल्याचे उल्लेख आढळतात. समुद्राच्या आक्रमणातून सोडविलेल्या जमिनी शेतकीकडे लावून वाढत्या वस्तीच्या आहाराच्या पुरवठ्याला थोडी मदत होत असे.

मुंबईत पोर्तुगीजांचा भरणा फार होता. त्यातल्या त्यात निरनिराळ्या पंथांच्या कॅथॉलिक पाद्र्यांची संख्या जास्त. ते आपल्या राज्यकर्त्यांनाही धाब्यावर बसवून स्वैरपणे वागण्याइतके उन्मादले होते. गोव्याच्या एका पोर्तुगीज व्हाइसरायाने पाद्री आपल्याला कःपदार्थ लेखतात, अशी तक्रार पोर्तुगालच्या राजाला लिहून कळविली होती. हे मनसोक्त वागणारे पाद्री इंग्रजाचे प्रजाजन झाल्यावर इंग्रजाला सदैव पाण्यात पाहत. इंग्रजांनी सर्व धर्मांच्या लोकांना आपापले धर्माचार उघडपणे पाळण्यास दिलेल्या सवलतीने ते पाद्री निरंतर जळफळत होते आणि त्यामुळे इंग्रजांविरुद्ध त्यांचे पाताळयंत्र चालू असे. कॅथॉलिक पाद्री हा अस्तनीतल्या निखाऱ्यासारखा इंग्रजाला वाटत होता, म्हणून तो झटकून फेकण्याची संधी साधण्याची इंग्रजही वाट पाहत होता. १६८९–९० मध्ये हबशाने मुंबईवर जी चढाई केली तिच्याशी या वेटातील पोर्तुगीज पाद्र्यांचा संबंध असल्याचे दिसून येताच त्या सर्वांच्या जमिनी इंग्रजांनी जप्त केल्या. मागाहून चौकशीत जे पाद्री बेगुन्हा ठरले त्यांच्या जमिनी त्यांनी परत केल्या. तथापि पाद्र्यांची हिरावलेली जमीन थोडी नव्हती; तिचा उपयोग इंग्रजांनी भरपूर करून घेतला.

भव्य, विस्तृत व सुंदर कारागिरीचे प्रार्थनामंदिर चर्च (कॅथीड्रल) मुंबईत इंग्रजाने याच काळात किल्ल्यानजीक उभे केले. यापूर्वी रविवारची सामुदायिक प्रार्थना किल्ल्यातील गव्हर्नराच्या राहत्या जागी दोन खोल्या प्रार्थनेसाठी राखून ठेवल्या होत्या त्यामध्ये

चालत. पोर्तुगीजांची पुष्कळ प्रार्थनामंदिरे असूनही प्रोटेस्टंट पंथाचे हे पहिलेच प्रार्थना-मंदिर मुंबईमध्ये अस्तित्वात आले. ते उघडण्याचा १७१८ साली मोठा समारंभ करण्यात आला. इंग्रजांच्या धार्मिक जीवनातील एक मोठी उणीव या मंदिराच्या उभारणीने नाहीशी झाली. या मंदिरासंबंधात संकल्प आणि सिद्धी यांमध्ये जवळ जवळ पन्नास वर्षांचे अंतर आढळते. ऑंजिअरने त्याचा पाया घातला. इमारतीच्या भिंती उभारल्या व ते काम अर्धवट थांबले. शेवटी १७१८मध्ये ते यथासांग पार पडले. कंपनीच्या नोकरांची लहान-मोठी वर्गणी आणि कंपनीची देणगी यांच्या बळावर हे मंदिर उभे ठाकले. त्याला एक शाळा जोडण्यात आली. मुंबईत पुष्कळ इंग्रज शिपायांची गरीब अनाथ मुले होती. त्यांच्या शिकण्याची सोय या शाळेने केली.

१६९०–९१ सालानंतर मुंबईची वस्ती सत्तर हजारांवरून सोळा हजारांइतकी वसरली. हबशांची वारंवार होणारी व महिनोगणती टिकणारी अत्याचारी आक्रमणे, पोर्तुगीजांच्या कटकटी, यामुळे मुंबईच्या रहिवाशांना प्राण व धन याबद्दलचा विश्वास गेला आणि ते मुंबई सोडून अन्यत्र जाऊ लागले. परंतु रोगाची साथ हे वस्ती उतरण्याचे सर्वात बलवत्तर कारण होते. १६९० मधील हबशांच्या स्वारीने लुटालूट, जाळपोळ, खून वगैरे अत्याचार तर केलेच आणि ते मागे रोगाची साथ ठेवून गेले. त्या साथीने इंग्रजांची पुष्कळ हत्या घडली. पण त्याहून अधिक ती हिंदी वस्तीला बाधली. वस्ती नाही तर व्यापार चालायचा कसा? या विपरीत अवस्थेतही इंग्रजाचा आत्मविश्वास व उद्योग कायम होता. अठराव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीत ग्रह पालटून इंग्रज जे एकदा सरसावले ते त्या शतकाच्या अखेरीअखेरीस साऱ्या देशाचे मालक बनले. इंग्रजांनी आपली अंतःस्थ फूट मिटविल्यावर बचावाचे धोरण सोडून चढाईचे धोरण स्वीकारले. या धोरणाचा पहिला प्रयोग १७२० च्या सुमारास पोर्तुगीजांच्या मदतीने आंगऱ्यावर केला, तो यशस्वी झाला नाही. इंग्रजाच्या म्हणण्या-प्रमाणे पोर्तुगीजांच्या भेकडपणामुळे तो प्रयत्न फुकट गेला. १७५६ पर्यंत आंगऱ्याविरुद्ध इंग्रजाची मात्रा चालली नाही. फिरंगी, हबशी व समुद्रावरील उपटसुंभ लुटारू (चाचे) आणि चोरटे व्यापारी (इंटरलोपर), पूर्वेकडे एकट्या कंपनीनेच व्यापार करावा असा इंग्लंडचा संकेत असूनही त्याची पर्वा न बाळगता कंपनीची नजर चुकवून स्वतंत्रपणे व्यापार करणारे, या सर्वांची वाट लागली तरी कोकणकिनाऱ्यावर मुंबईच्या इंग्रजाला जाचणारे एक आंगरेच शेवटी शिल्लक राहिले होते.

आंगरे घराण्याचा मूळ पुरुष कान्होजी. शककर्ते श्रीशिवाजीमहाराज व संभाजी यांच्या कारकिर्दी संपून छत्रपती राजाराम महाराष्ट्र सोडून कर्नाटकात जिंजी येथे गेल्यावर कान्होजी उदयास आला आणि १७२९ मध्ये मृत्यू घडेपर्यंत त्याच्या पराक्रमाचा दरारा सारखा वाढत होता. त्याच्यामागून शेखोजी व संभाजी हे दोघे भाऊ आरमारी अधिकार अनुक्रमे कुलाबा (अलीबाग) व विजयदुर्ग येथे वेगळे राहून पाहू लागले. शेखोजी १७३४ मध्ये वारला. तेव्हा मानाजी (कान्होजीचा दासीपुत्र) हा शेखोजीच्या

जागी आला. पण संभाजीचे व त्याचे जमेना. पुढे पुढे त्यांचे आपसात इतके बिघडले की मानाजीस ठार मारावे असा संभाजीने प्रयत्न आरंभला. इतक्या निकरावर गोष्टी आल्या तेव्हा मानाजीला कुलाबा सोडून कुणा परक्याच्या आश्रयास जाणे भागच होते. शेजारच्या इंग्रजाने स्वार्थाकडे लक्ष देऊन त्याचा पक्ष घेतला. संभाजी १७४१-मध्ये मृत्यू पावला. तोवर मानाजीशी त्याचा झगडा चालू होता. संभाजीनंतर विजयदुर्ग तुळाजीच्या हाती गेला. तुळाजीने विजयदुर्गास मुक्काम ठेवून समुद्रावरील व्यापारा-संबंधात उत्पातांचे सत्र आरंभले. मानाजीलाही तो जुमानीत नव्हता. वस्तुतः कुलाब-कर आंगरे हे साताऱ्याच्या छत्रपतींचे सेवक म्हणवीत. छत्रपतींचा सर्वाधिकार शाहू छत्रपतीच्या हयातीत कसाबसा चालून नंतर सर्व सत्तासूत्रे पेशव्यांच्या हाती गेली. परंतु त्यापूर्वीच ज्या इतरांनी, पेशव्यांना संकटाच्याखेरीज इतर वेळी ओळखायचे नाही अशी वागणूक सुरू केली त्यांपैकी तुळाजी आंगरे हा एक होता. तो पेशव्यांना धूप दाखवीनासा झाला तेव्हा त्याची मस्ती जिरविण्यासाठी बाळाजी बाजीराव पेशव्याने इंग्रजांशी संधान बांधून त्याच्या आरमारी मदतीने १७५६ च्या फेब्रुवारीत विजयदुर्गावर हल्ला चढविला आणि विजयदुर्ग जिंकून तुळाजीस कैद केले. या हल्ल्यात मराठ्यांच्या आरमाराचा जो नाश झाला तो कायमचा. इंग्रजाचे आरमार हे सगळे मुंबईच्या कंपनीवाल्यांचे नव्हते. इंग्लंडच्या शाही आरमाराची त्यात काही जहाजे होती. तुळाजीच्या पारिपत्यासाठी पेशव्याने इंग्रजाचे साह्य घेतले ही गोष्ट चांगली की वाईट असा मराठी इतिहासज्ञांत वाद आहे. परंतु मुंबईकडील तुळाजीच्या नाशाने भारताच्या पश्चिमेकडील सारा समुद्रकिनारा इंग्रजापुरता निष्कंटक झाला याविषयी दुमत नाही. १७५५ मध्ये इंग्रजांनी सुवर्णदुर्गही किल्ला बळकावला होता.

१७५६ मध्ये कोकण किनाऱ्यावरील शत्रूंचा निःपात साधण्यापूर्वीच्या दिवसांत मुघल बादशाहीचा आधार जाऊन हबशी निष्क्रिय झाल्यावर त्याला मुघल आरमा-राचा नेता या नात्याने मुघल दरबारातून मिळणारा सालीना तीन लाखांइतका तनखा आपल्यास मिळावा, आपण मुघलांच्या सागरी व्यापाराचे संरक्षण करू, असाही प्रयत्न इंग्रजाने १७३३ त करून पाहिला. त्या प्रयत्नाचा तपशील नाट्यमय आहे, पण तो सुरतेचा असल्यामुळे मुंबईच्या इतिहासात याला उल्लेखापलीकडे जास्त स्थान देता येत नाही. मुंबईकरांच्या वाढत्या आकांक्षा समजण्यासाठी त्याचा उल्लेख केला आहे. इंग्रज हा पारशी किंवा बेन इस्त्रायल यांच्यासारखा स्वदेश गमावून हिंदुस्थानात आलेला निर्वासित नव्हता. त्याला इंग्लंड हा स्वदेश होता व तो वर्धिष्णू पराक्रमाचा होता. युरोपच्या राजकीय उलाढालीत त्या देशाला आकाराने आणि लोकसंख्येने लहान असूनही चांगले महत्त्वाचे स्थान होते. युरोपातील फ्रान्स, हॉलंड (डच) वगैरे राष्ट्रे पूर्वेकडील देशांतून आपले व्यापाराचे तळ निर्माण करण्यासाठी इंग्रजाप्रमाणेच उद्योग करीत होती. युरोपात त्यांचे आपसांत बिनसले की हिंदुस्थानात त्यांच्या लढाया सुरू होत. १६७० च्या सुमारास इंग्लंड व हॉलंड यांच्यामध्ये युरोपात वैर

उद्‌भवले तर डच आरमार १६७३ मध्ये मुंबईवर आले. पण मुंबईचा किल्ला लढाईला सज्ज पाहून एकही बार न वाजविता ते परत गेले. १७४० नंतर युरोपातील राजकारणात काही खुसपट निघून तिकडे इंग्लंड-फ्रान्स या देशांत लढाई जुंपली तर इकडे हिंदुस्थानच्या कर्नाटक भागात वरील दोन्ही देशांची व्यापारी मंडळे आपसांत लढू लागली. या घडामोडींनी मुंबईच्या व्यापारावर आणि नागरी उत्कर्षावर ताद्दश परिणाम झाला नाही.

मुंबईकडे ठिकठिकाणाहून व्यापारी, कोष्टी वगैरे व्यावसायिकांचा भरणा चालू होता. गुजरात व कोकणपट्टीतील पोर्तुगीज, शिद्दी यांपैकी कुणाचेही राज्य सुरक्षित नसल्याचे अनुभवून लोक मुंबईची वाट धरीत. इंग्रजही त्यांना उदारपणे आश्रय देत असे. उदारपणे म्हणण्याचे कारण गूढ नाही. मानाजी आंग्रे याने एकदा चौलवर हल्ला करून तेथे लूटमार केली. तेथील पोर्तुगीज राज्यकर्ते मानाजीच्या धाडीचा प्रतिकार करू शकले नाहीत. तेव्हा तेथील रेशमाच्या विणकरांनी इंग्रजाचा आश्रय घेतला. मुंबईस आपली राहण्याची सोय व्हावी, अशी त्यांच्या अर्जात मागणी होती. इंग्रजाने ती मागणी मान्य करून त्या विणकारांना आश्रय दिला. याप्रमाणे मुंबईत राहणाऱ्यांच्या गरजांकडे लक्ष पुरवून त्यांच्यात मुंबईची ओढ उत्पन्न केली.

आपण स्वतःच्या बळावर विसंबून शत्रूशी दोन हात करण्याला योग्य ठरेपर्यंत पडते घेऊन वागायचे असे इंग्रजाचे धोरण अठराव्या शतकाच्या पहिल्या पंचविशी-पर्यंत होते. आपल्या घराबाहेर लांब जाऊन शत्रूच्या अंगणात त्याच्याशी झुंज करायची तर आपले घर पक्के सुरक्षित पाहिजे हे लक्षात घेऊन पहिल्या किल्ल्याबाहेर वाढणाऱ्या वस्तीभोवती इंग्रजाने भक्कम तटबंदी उभी केली. शिबंदी वाढवून, रात्रीची गस्त चालवून गुन्हेगारीचा बंदोबस्त केला. याचा अर्थ गुन्हेगारी साफ थांबली असा समजू नये. १६७० पासून न्यायदानाची जी तरतूद होती ती मोडून इंग्लंडच्या राजाच्या सनदेने 'मेयर्स कोर्ट' नावाची न्यायदानासाठी रीतसर संस्था स्थापन केली (१७२७). कंपनीच्या हाती मुंबई बेट आल्यापासून टाकसाळ होतीच. तिच्यातून बाहेर पडणाऱ्या नाण्यांना मुघल, मराठे यांच्या राज्यात मनाई होती. मुंबई बेट व त्याच्या नजिकची कोकणातील गावे, यांतूनच त्या नाण्यांचा प्रसार होता. हळूहळू तो नाण्यांच्या गुणामुळे वाढत गेला. वजन, आकार, त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या धातूंचा चोखपणा वगैरे हे त्या नाण्यांचे गुण होत. टपाल व बँक या आणखी दोन लोकोपयोगी व्यवस्था अमलात आल्या. मुंबई बेटावरील काही स्थळे केवळ पायचालीला अगम्य असल्यामुळे त्यासाठी नावांचे दळणवळण सुरू केले. लोकांना फंदफितुरी करण्याची दुष्ट इच्छा होऊ नये म्हणून रामजी कामत नावाच्या प्रतिष्ठित व्यापारी गृहस्थावर फितुरीचा गुन्हा लादून त्याला जन्मठेपीची शिक्षा ठोठावली (१७२०). त्याची स्थावरजंगम मालमत्ता जप्त केली. पुढे हा सारा खटला म्हणजे रामजीच्या हितशत्रूंनी रचलेले एक कुभांड होते, असे निदर्शनास आले. इंग्रज इतिहासकारांनाही खटल्याचा हा प्रकार लज्जास्पद वाटतो.

प्रकरण चौथे

मुंबईतील प्राणी व वनस्पती

आजच्या मुंबई शहराकडे पाहून एकदा येथे माणसांच्या तुरळक वस्तीची राने व त्यांत क्वचित रानटी जनावरे होती अशी कुणाला कल्पनादेखील करवणार नाही. पण व्यापारी इंग्रजाने या बेटाचा कबजा घेतला आणि तिथे राज्यकारभार आरंभला तेव्हा (१६७०) येथे वर म्हटल्याप्रमाणे स्थिती होती. समुद्रकिनाऱ्यावर एखादे वेट व त्यावर दीडदोन हजार कोळ्यांची वस्ती. किर्रर झाडी—नारळीपोफळींची, ताडामाडांची; दुभती जनावरे होती, पण अगदीच थोडी. घोडा हा प्राणी जवळ जवळ नव्हताच. इंग्रजाने जेव्हा मुंबईच्या संरक्षणासाठी शिबंदीला घोडदळाची एक लहानशी तुकडी जोडली तेव्हा घोडा हा प्राणी मुंबईच्या लोकांनी दर दिवशी पाहावा असा योग आला. मुंबईस घोडा नव्हता म्हणजे तो येथील वस्तीला माहीत नव्हता असे नसून तो लोकांच्या नित्य वापरात नव्हता एवढेच सुचविले आहे. मुंबईभर इतस्ततः भातशेती होती, त्यामुळे बैल होते याविषयी संशय बाळगायला नको. माणसाला आनंद देणारे खाण्याच्या उपयोगाचे हरिणासारखे पशू कुलाब्याच्या भूमीवर होते, पण ते पाळलेले होते. मुंबईस कोरडी जमीन थोडी. बाकीची सगळी चिखलट, दलदलवजा. अशी जमीन मोठी जंगली जनावरे राहण्याला अगदीच अयोग्य. अशी जमीन कोल्हे, तरस यासारख्या पशूंना आवडते. अठराव्या शतकातील अनेक इंग्रज लोकांनी त्याबद्दल लिहिले आहे. वाघदेखील मुंबईस केव्हातरी आपल्या पायांचे ठसे उठवून जात. माहीमची खाडी पार करून पलीकडे साष्टीच्या प्रदेशात गेले की सह्याद्रीची राने असल्यामुळे वाघासारखी तेथली मोठी हिंस्र श्वापदे कधी कधी मुंबईस फेरी मारून जात. सतराव्या शतकाच्या शेवटशेवटच्या इंग्रजांच्या लिखाणातून मलबार टेकडीच्या संदर्भात वाघाचे नाव निघते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी-अखेरीस मुंबईस वाघ, चित्ते मारल्याचे उल्लेख आढळतात. मुंबईस कोल्ह्यांचा तुटवडा नव्हता. नव्याने मुंबईस आलेले इंग्रज स्त्रीपुरुष रात्री स्वस्थ झोप न लागण्याच्या कारणांत कोल्हेकुई, डास, उकाडा वगैरेची नोंद हटकून करतात. गेल्या शतकातील एका इंग्रज लेखकाने इंग्रज मुंबईस मालक या नात्याने स्थायिक झाल्या दिवसापासून ज्यांनी मुंबईचे अनुभव लिहून ठेवले त्यांच्या आधारे किंचित अतिशयोक्तीने असे

विधान केले आहे की, रात्रभर कोल्हेकुई, पहाटेस कोळ्यांच्या घरातील दळणाची घरघर व त्यावरोबरच दळणाऱ्या बायांची उच्च स्वरात म्हटली जाणारी गाणी ही स्वस्थ झोपेची विघ्ने होती. सकाळी मुंबईजवळच्या किनाऱ्याकडे नजर टाकावी तर रात्रीच्या परचक्राचे साक्षीदार जे आगीचे डोंब ते दिसावे.

मुंबईत जर आज कोणत्या प्राण्याची विपुलता असेल तर झुरळांची. हा प्राणी मुंबईत काहीसा नवा आहे. परंतु घरांना ज्यांचा एक प्रकारे निसर्गदत्त वर म्हणावे असे उंदीर, पाली, सरडे, मुंग्या, मुंगळे इत्यादी भुईसरपट चालणाऱ्या प्राण्यांची मुंबईस सतराव्या-अठराव्या शतकात मुळीच कमतरता नव्हती. मुंबईत घोडा नव्हता, पण गाढवही नव्हते, हेसुद्धा नमूद करणे अवश्य आहे. आजसुद्धा गाढव शहराच्या वस्तीत दृष्टीस पडत नाही. लांबच्या उपनगरातून चालणाऱ्या बांधकामाच्या उपयोगाचे दगड, विटा वगैरे सामान वाहण्याच्या कामासाठी आणलेली गाढवे पाहावयास मिळतात. मुंबईत जन्मास येऊन येथेच वाढणाऱ्या मुलांना गाढव हे जनावर कित्येक वर्षे माहीतदेखील नसते. ही अतिशयोक्ती नसून वस्तुस्थिती आहे. एकेकाळी मुंबईत वानरेमाकडेसुद्धा होती. तीनशे वर्षांमागे मुंबईच्या भूमीवर व समुद्राच्या पाण्यात ज्याला शोधण्याची गरज नव्हती, जो दिवसा सहज दिसायचा, असा प्राणी साप हा होता. कोकण हा प्रदेश सर्पप्रचुर आहे व त्या प्राण्याचे सर्व प्रकार कोकणात आढळतात. कोकणच्या खेड्यात नव्याने जाणाऱ्या बहुधा प्रत्येकाला प्राधान्याने सापाच्या आणि भुताखेतांच्या गोष्टी ऐकायला सापडतात. हा अनुभव निदान पंचवीस-तीस वर्षांपूर्वीपर्यंत तरी उत्कटपणे येत असे. मुंबईच्या बंदरात शिरता शिरता पाण्यावर तरंगणारे साप दृष्टीस पडणे हा युरोपातून येणाऱ्या प्रवाशांचा एक शुभशकुन होता. हे साप दिसले की महिनेच्या महिने चाललेल्या प्रवासाचा शेवट जवळ आला, या खात्रीने जहाजातले लोक समाधानाचा सुस्कारा टाकीत, अशी माहिती बऱ्याच प्रवाशांच्या लिखाणातून पाहायला सापडते. हे साप आकाराने लहान व तांबूस रंगाचे असत. शिडांच्या बोटी जाऊन (वाफेच्या) आगबोटी सुरू झाल्यापासून हे साप दिसानासे झाले, असा जिज्ञासूंचा तर्क आहे. या प्रदेशात साप फार असत याचे आश्चर्य वाटायला नको. कुकुण—अपभ्रंश कोकण—या देशवाचक शब्दातच सापाचा ध्वनी आहे. महाभारताच्या उद्योगपर्वात एका ठिकाणी नागकुलांची यादी दिलेली आहे. त्या यादीत कुकुण हे एक नाव आहे. नाग आणि साप हे सामान्यतः एकाच वर्गातले समजले जातात. नाग हे मनुष्यातल्या एका समाजाचे नाव असून एकदा हा समाज देशभर पसरलेला होता आणि त्याची ठिकठिकाणी राज्ये होती. भारताच्या ईशान्येकडील नागभूमी ही प्राचीन नागसमाजाची साक्ष आहे. इतिहाससंशोधक कै० वि० का० राजवाडे यांनी लहानसा 'कोकण व नागलोक' या विषयावर लिहिलेला टिपणवजा लेख 'इतिहाससंग्रह' या मासिकात प्रसिद्ध झाला होता. एकदा ज्या प्रदेशाला महीतल, पाताल, रसातल, अपरान्त ही

नावे होती, तोच प्रदेश आता 'कोकण' या नावाने ओळखला जातो, असे राजवाड्यांनी दाखवून दिले आहे. देशाचे नाव सर्पवाचक व त्या देशात सर्प या प्राण्याची विपुलता हा एक प्रकारे बादरायणसंबंध आहे. कोकणातल्या सापांनी तो संबंध जुळविला आहे.

मुंबईत इंग्रजी राज्याच्या सुरुवातीस सापांचे वीत-दीड वीत लांबीच्या व करंगळी-इतक्या जाडीच्या फुरशापासून दहावारा हातांइतक्या व कदाचित त्याहून थोड्या जास्त लांबीच्या व मध्यभागी माणसाच्या मांडीइतक्या जाडीच्या अजगरापर्यंत, माणसाला चावल्यापासून अर्ध्या तासाच्या आत ठार करणाऱ्या किंवा काही तास मरणप्राय वेदनांत लोटणाऱ्या सापांच्या शेकड्यांनी मोजाव्या इतक्या जातींचे अस्तित्व होते. त्यात फणीदार नागांची ओळख जास्त. पुंगीच्या नादाने नागांना लोकांसमोर दहा-पाच मिनिटे डोलवून लहानमोठ्या प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे गारुडी सर्पांच्या माहितीत विसरून चालणार नाही. पहिल्या दोन शतकांत जे इंग्रज स्त्रीपुरुष येथे आले त्यांतल्या बहुतेक लेखकांनी गारुडी व नाग यांच्या कथा वर्णिल्या आहेत. पुंगी वाजवून सापांना बिळाबाहेर आणणारे गारुडी सापाला बिळाबाहेर काढण्याच्या प्रयोगात पाहणारांना कसे फसवितात, याचाही पाढा कित्येकांनी वाचला आहे. मुंबईत माणसांची वर्दळ वाढण्यापूर्वी येथील साप घराच्या तळमजल्यावरच नव्हे तर दुसऱ्या मजल्या-वरील कॉटवर चढून अंथरुणापांघरुणांच्या उबेत पडून राहायचे, असेही दाखले इंग्रजलिखित मुंबईवर्णनातून दृष्टीस पडतात. मुंबईत माणसांची गर्दी वाढत असता येथील सापही स्थलांतर करीत होते. गेल्या शतकाच्या उतरार्धात जेव्हा ससून बंदर बांधण्याचे काम चालू झाले तेव्हा तेथील खडकांतून सापांच्या झुंडी प्रसंगी बाहेर पडल्याचे वृत्त पाहता येते. आता साप मुंबईच्या वस्तीत सहसा किंवा मुळीच दृष्टीस पडत नाही. तो पाहावयाचा असेल तर प्राणिसंग्रहालयात जाऊन पाहावा किंवा शेवटी चित्र आहेच. विंचवाबद्दल असेच म्हणता येईल.

सुरुवातीस ज्यांचा उल्लेख केला, त्यांतल्या पाली अजून घरांतून दृष्टीस पडतात, पण अगदी तुरळक सरपटणाऱ्या प्राण्यांत जिला संस्कृतामध्ये 'शतपदी' (शंभर पायांची) हे नाव आहे—देशी भाषेत जिला 'बोण' किंवा 'गोम' म्हणतात—तीही एखाद्या वेळी घरातल्या केरकचऱ्यातून नजरेसमोर येते. मुंगी-मुंगळ्याच्या वर्गातला एक प्राणी म्हणजे 'वाळवी'. मुंबईस या प्राण्याचे राज्य आहे. लोखंड सोडल्यास दुसरा असा एकही पदार्थ नाही की ज्याला वाळवीचा उपसर्ग बाधत नाही. कागद, लाकूड याचा नाश करणाऱ्या वाळवीचे निःशब्द सामर्थ्य भयप्रद असते. या प्राण्याचा उपद्रव मुंबईला जास्त. दप्तरखाने, राज्यप्रकरणी किंवा खासगी कारभाराच्या कागदवह्यांचा संग्रह, ग्रंथसंग्रह यांच्या संबंधातील झाडलोटीकडे जास्त दुर्लक्ष घडले की त्यावर वाळवीची स्वारी झालीच म्हणून समजावे. या स्वारीने होणाऱ्या विध्वंसातही काही चमत्कार आढळतात. एखाद्या पुस्तकातील साऱ्या पानांचा वाळवीच्या प्रतापाने

फडशा उडालेला असतो, पण त्याचे मागलेपुढले पुट्ठे अगदी जसेच्या तसे शाबूत असतात. पुस्तक धड असल्याच्या कल्पनेने ते हाती घ्यावे तर पुट्ठ्यातला ऐवज साफ झालेला दृष्टोत्पत्तीस येऊन पुस्तक बहुमोल किंवा दुर्मिळ असेल तर हळहळत बसावे लागते. हल्ली या कागदशत्रूवर इलाज निघाल्यामुळे वाळवीचा उपद्रव पुष्कळसा आटोक्यात आला आहे.

वाळवीच्याच वर्गातला कागद, कापड, धान्य, खाद्ये यांचा दुसरा शत्रू म्हणजे उंदीर. मुंबईत याचा पूर्वी त्रास होता. या प्राण्याची मराठीत उंदीर, घूस ही दोनच नावे आहेत. इंग्रजीत उंदराच्या आकारावरून चारपाच जाती ठरविल्या असून त्यांची नावे भिन्न आहेत. दिवसभर घरावरील कौलारात राहून रात्री घरातून उंदरांचा धुडगूस चालायचा. अलीकडे मुंबईच्या काही भागांत त्यांचा धिंगाणा कमी झाला आहे. मुंबईत मांजरे आहेत, ती चांगली धष्टपुष्टही असतात. घरांतून बाहेर फेकल्या जाणाऱ्या उष्ट्याखरकट्यावर ही मांजरे पोसली जात असल्यामुळे त्यांची उंदीर मारून खाण्याची नैसर्गिक प्रवृत्ती इतकी मंदावली आहे की, किंचित अतिशयोक्ती पत्करून सांगावेसे वाटते की समोरून नव्हे तर अंगावरून उंदीर गेला तरी त्याला तोंडाने किंवा पंजाने पकडण्याचेही श्रमही त्यांना करवत नाहीत. ऐतखाऊपणाचा हा परिणाम असल्याचे कुणीही सांगू शकेल. सारांश, माणसाखेरीज इतर कुणापासूनही मरणाचे भय नसल्यानेही उंदरांच्या वाढीला एकदा मर्यादा नव्हती. उंदीर हा एक हुशार प्राणी असल्याने त्याला माणसांनी योजलेल्या नाशाच्या उपायांची ओळख झाली की तो उपाय चुकविण्याची त्याची शिताफी कौतुक वाटण्यासारखी ठरते. उंदीर आपल्या कर्तबगारीने माणसांच्या वस्तीतच नव्हे तर त्यांच्या वाङ्मयात शिरून अजरामर झालेला आहे आणि उदाहरणे म्हणून पंचतंत्र–हितोपदेशादी कथावाङ्मयाचे नाव येथे नमूद करण्याला हरकत नाही. गणेशदेवतेचे वाहन या नात्याने त्याचा पुराणातून जसा संचार आहे तसाच तो महाभारतासारख्या भारदस्त ग्रंथांतसुद्धा आहे. येथे एका उंदराच्याच भारतीय माहात्म्याचा चमत्कार वाचकांच्या नजरेवर घालावासा वाटतो. राजस्थानात बिकानेर शहरानजीक एक लहानसे 'देशनोक' नावाचे गाव आहे. पण येथे राठोडांच्या एका कुलदेवतेचे मंदिर असल्यामुळे त्याला साहजिकच महत्त्व आले आहे. ते विशाल मंदिर जणू काय उंदरांनाच वाहिल्याप्रमाणे तेथे जिकडेतिकडे उंदरांचेच राज्य आहे. चुकून एखाद्याच्या पायाखाली (कारण प्रदक्षिणेच्या अंधाऱ्या वाटेवर उंदरांची पळापळ चाललेली असते) किंवा हाताने एखादा उंदीर मेलाच तर उंदराची सुवर्णप्रतिमा काशीविश्वेश्वराला वाहावी, हे त्या हत्येचे प्रायश्चित्त असल्याचे तेथील पुजारी सांगतात. उंदरांची संख्या मुंबईत इंग्रजाने आपले बिऱ्हाड मांडले तेव्हा व त्यानंतरसुद्धा प्रचंड असूनदेखील त्याचे फारसे वर्णन मुंबईत आलेल्या पहिल्या पहिल्या इंग्रजांपैकी कोणीही केलेले नाही. मुंबईचा उंदीर प्रथम सर्वांच्या तोंडी गाजला तो

१८९६ मधील प्लेगाच्या साथीमुळे. बिळातून बाहेर पडून उंदीर उघड्यावर मरू लागला की लोक तो प्रकार प्लेग पसरण्याची खूण समजून नेहमीची राहती घरे सोडून दुसरीकडे जाण्याच्या विचारास लागत. प्लेगानिमित्त आणखी एक अतिसूक्ष्म प्राणी उघडकीस आला. तो म्हणजे पिसू. या प्राण्याच्या दंशाने प्लेग हा रोग माणसांना बाधतो या शोधापायी पिसवांना महत्त्व चढले. या रोगाचा पहिला हल्ला मुंबई शहरावर १८९६ साली झाल्यामुळे ह्या प्राण्याला जीवजंतूंमध्ये स्थान देणे अवश्य झाले.

उंदीर-मांजरांबरोबरच आपोआप हटकून सुचणारा प्राणी म्हणजे कुत्रा. कुत्रे बाळगणाऱ्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने काही नियम पाळावे लागतात; यामुळे त्यांचा सामान्यपणे लोकांना उपद्रव वाटत नाही. पण न पाळलेल्या कुत्र्यांची थोड्या वर्षांमागे मुंबईत रेलचेल होती. अलीकडे त्यांची गर्दी कमी झाली आहे. गाड्यांच्या रहदारीला अडथळा हा एक सर्वांच्या माहितीचा असा त्रास होता. कुत्री वेडावतात, पिसाळतात व या विकृतीच्या भरात दुसऱ्यांना चावतात. कुत्र्याचा वेडातला दंश विषारी असतो. त्याने माणसे दगावतात. एखाद्या ठिकाणी कुत्र्यांचा समुदाय राहत असेल आणि त्यातला पिसाळलेला कोणता हे ओळखण्याचे निश्चित साधन नसेल तर तो समुदायच नष्ट करावा लागतो. म्हणून बिनमालकीची कुत्री मारावी, मारलेल्या प्रत्येक कुत्र्यासाठी आठ आणे बक्षीस, अशी सरकारी प्रथा गेल्या शतकाच्या आरंभी होती. मारलेले कुत्रे बक्षिसाकरिता अधिकाऱ्यासमोर न्यावयाचे तर कष्ट फार. तेव्हा मारलेल्या कुत्र्याचे शेपूट अधिकाऱ्याकडे नेऊन दाखवावे, अशी सोय करण्यात आली. सोय ही अप्रामाणिकपणाची आई. कुत्रा न मारता त्याच्या शेपटीचा तुकडा दाखवून बक्षिसाची रक्कम लफंगी माणसे उपटतात हे निदर्शनास आल्यावर शेपटीचा व्यवहार बंद व्हावा, यात नवल नाही. वस्तुतः बिनमालकीची कुत्री लोकांच्या हितासाठी मारली जात असता त्यानिमित्त दंग्यास प्रवृत्त करण्याइतका क्षोभ लोकांत पेटावा, हा चमत्कार १८३२ साली मुंबईत घडला. या दंग्याने दोन दिवस किल्ला व त्याबाहेरचे शहर यांतली रहदारी व खाद्य पदार्थांची किल्ल्याकडील वाहतूक बंद पडली होती. लष्कर बोलावले तेव्हा दंगा संपला. पारशी हे सामान्यतः दंगेखोर स्वभावाचे नाहीत, पण धर्मदृष्ट्या तो समाज कुत्र्याला मानतो. हिंदू सांगूनसवरून जीवदयेचे पुरस्कर्ते. यामुळे कुत्रे मारण्याच्या विरोधात ते एक होऊन त्यांतल्या गुंडांनी कायदा आपल्या हाती घेतला आणि कुत्री मारणाऱ्यांच्या अंगावर हात टाकला. कुत्र्यांचे मारेकरी पळाले. हे प्रकरण पुढे योग्य स्थळी येणार आहे म्हणून मुंबईच्या प्राण्यांपुरती नोंद येथे थांबविण्यास हरकत नाही.

गाय, बैल, म्हशी, रेडे, शेळ्या, मेंढ्या हे प्राणी पिण्याला दूध व प्रसंगविशेषी खाण्याला मांस पुरविणारे म्हणून त्यांना मुंबईच्या इंग्रजपूर्व वस्तीतही स्थान होते, हे न सांगताही समजण्याजोगे आहे. वस्ती आणि दळणवळण वाढले तेव्हा या पशूंची

उत्तरोत्तर गरज वाढत जाऊन गाईम्हशींसाठी स्वतंत्र जागा नेमून देण्यात आल्या. आज त्या ठिकठिकाणच्या वेगवेगळ्या गोठ्यांचे पर्यवसान आरे कॉलनीच्या रूपाने लोकांसमोर चांगल्या आकर्षक स्वरूपात उभे आहे. हिंदू हा पराकाष्ठेचा गोभक्त समजला जात असूनही या गौळवाड्यातून म्हशींचीच गर्दी दृष्टीस पडते. गाईच्या दुधाला गिऱ्हाईक नाही तर त्या कशाला पाळायच्या? असा खुलासेवजा प्रश्न चौकसाच्या कानांवर पडतो. हा प्रश्न गोहत्याप्रतिबंधासाठी हुल्लड माजविणाऱ्यांच्या गोभक्तीवरही विदारक प्रकाश टाकणारा आहे. पूर्वी मुंबईत हिंदू धनिकांच्या घरांतून गुरे ठेवण्याची मुभा होती तेव्हादेखील म्हशी पाळण्याची प्रवृत्ती बलवत्तर होती, हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे.

इतक्या प्राण्यांच्या हजेरीत ज्यांना अग्रस्थान द्यावयास हवे होते असे तीन, आकाराने लहान पण पराक्रमाने मोठे, प्राणी नमूद करायचे राहून गेले. ते कोण तर माशी, डास व ढेकूण. माशीपेक्षा डासांचे उल्लेख अव्वल काळातल्या इंग्रजांच्या लेखनात अधिक सापडतात. हे दोन्ही प्राणी मुंबईच्या काही भागांत नाहीसे झाले असले तरी उत्तरेकडील उपनगरांतून माश्यांचे व त्यांहून जास्त डासांचे प्राबल्य अद्यापि आहे. संस्कृत वाङ्मयातही या तिघांची दखल घेतली गेली आहे. भोजनकर्त्याच्या पोटात जाऊन स्वतः मरायचे पण त्याला पोटातले अन्न ओकायला लावायचे, हे माशीचे वैशिष्ट्य आहे. ना स्वार्थ ना परार्थ, असा 'ते केन जानीमहे' या कोटीतला दुष्टपणा माशीच्या ठिकाणी असल्याचे कवी सांगतात. डासावरदेखील कवींनी आपल्या प्रतिभालाघवाचा प्रयोग केला असून ढेकणांच्या चावण्याने वैतागलेल्या कोणा कवीने शंकर हिमालयावर, पाण्यावर विष्णू या स्थितीची उपपत्ती 'मन्ये मत्कुणशंकया' या वर्णनाने लावली आहे. दगड-माती-विटांच्या घरात ढेकणांचा त्रास चुकत नाही हे लक्षात घेऊन एकाने हिमालयासारख्या थंड जागेचा व दुसऱ्याने अपार समुद्राचा आश्रय घेतला, हे त्या वचनाचे स्पष्टीकरण आहे.

काव्याच्या प्रदेशात माशीचे कौतुक व्हावे, यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही; पण इतिहासाच्या क्षेत्रात तिने जागा मिळवावी याचे कुणालाही आश्चर्य वाटेल. एका वर्षी श्रावण महिन्यात पुण्याच्या पेशवेवाड्यातील ब्राह्मणभोजनाला माश्यांनी अडथळा केला, अशी ती कथा आहे. माश्या वेसुमार वाढल्या. पानात पक्वान्ने पडू लागली की त्यावर माश्यांच्या जमावाने असा हल्ला करावा की ब्राह्मणांना घास घेणे अशक्यप्राय व्हावे. यामुळे माश्यांच्या संहाराची योजना श्रीमंतांना करावी लागली; अशी ती कथा आहे. जेवताना होणाऱ्या माश्यांच्या त्रासाची हकीकत काही इंग्रजांच्याही लेखनातून आहे. इंग्रज हा थंड हवेच्या (काही अंशी निर्मक्षिक) देशातून येत असल्याने येथील माश्यांची बाब त्याला मुंबईच्या अनुभवात टाळता येऊ नये हे सरळच आहे. इंग्रजांच्या भोजनप्रसंगी माश्या वारायला निराळी माणसे ठेवावी लागत. जुन्या राजे लोकांबरोबर चवरी घेतलेली माणसे यासाठीच असत.

आता डास-माश्यांना सोडून मुंबईतील इतर मोठ्या आकाराच्या आकाशचर प्राण्यांकडे दृष्टिक्षेप केल्यास तीनशे वर्षांपूर्वीच्या इंग्रजांनी ज्याचा उल्लेख केलेला आढळतो, अशी पाखरे थोडी आहेत. चिमणी, कावळा, कोंबडे, पारवा, मैना हे पक्षी इतके परिचित आहेत की त्यांचा उल्लेख न करताही ते वाचकाला स्मरतील. शिकारी पाखरांत ससाणा प्रसिद्ध आहे; पण मुंबईच्या वातावरणात त्याचे अस्तित्व नाही. मोराचे तर नावच नको. कबुतरे आहेत पण फार कमी. पोपटांची अवस्था तीच. घरी हौसेखातर कोणी पाळले असतील तर ते पिंजऱ्यात पाहावे. पारव्यांना शहरात व समुद्रकाठी कुठे कुठे जीवदयेखातर दाणे चारण्यासाठी जागा राखून ठेवल्या आहेत. तेथे ते घोळक्यांनी पाहता येतात. इंग्रजाच्या डोळ्यांवर जो पक्षी आला तो गिधाड; तोही इंग्रजीत ज्याला अडज्यूटंट हे नाव आहे तो. पारशी लोकांच्या स्मशानभूमीच्या परिसरात ते दृष्टीस पडतात. त्यांच्या सोबतीस घार-कावळेही असतात. वांदऱ्यास जेव्हा मांसाकरिता जनावरे कापण्याचे पशुवधगृह होते तेव्हा तेथील छपरावर हे पक्षी मांसाच्या लोभाने बसलेले दिसत. खाण्याच्या उपयोगाचे अनेक पशुपक्षी मुंबईच्या प्रमुख बाजारांत पाहण्याला सापडतात. मुंबईत लहानमोठी घुबडे आणि वडवाघळेही होती.

मुंबईच्या प्राण्यांत मासा हा जलचर आद्य क्रमांकाचा आहे. मुंबईच्या वस्तीचे तो, काही जाती सोडल्यास, मोठ्या प्रमाणात अन्नच आहे म्हटल्यास चालेल. मुंबईच्या समुद्रकाठी पहिली वस्ती मच्छीमार (धीवर, कोळी) यांची. लांब किनाऱ्यापासून समुद्रात पन्नास-साठ मैलांइतक्या दूर अंतरावर जाऊन मासे धरायचे आणि ते मुंबईच्या बाजारांत खपवायचे हा कोळी समाजाचा मुख्य उद्योग. माशांचे प्रकार मोजायलाच बसले तर चाळिसाच्या घरात जातात आणि त्यांची नावनिशीवार नोंद मुंबई गॅझेटयरच्या एका भागात आहे.

येथील मानवी वस्तीत मानवी आकाराचे, अर्थात मानवच पण ज्यांचा जीवन-व्यवहार इतर सर्वांहून निराळा, म्हणून त्यांना वेगळे काढून विचित्र प्राणी समजावयाचे, अशांच्या जीवनसरणीचा इंग्रजांना चमत्कार वाटून त्यांचा समावेश आपल्या लेखनात करावा लागला. हा प्राणी भिकाऱ्यांपैकीच, पण भीक मागण्याचे त्याचे साधन आततायीपणाचे असते : भिक्षा पदरात पडावी, या आग्रहापायी स्वतःच्या अंगातून रक्त काढायचे वगैरे. यांना 'कडकलक्ष्मी' या नावाने ओळखले जाते. बालवयात एकच हात सतत उभारलेल्या स्थितीत ठेवून रक्ताभिसरणाच्या अभावी तो वाळवायचा व त्याच्या आधारे भिक्षा मागायची, या प्रकाराचा उल्लेखही काही लेखकांनी केला आहे.

या शहराच्या वनस्पतिसृष्टीचा आढावा घ्यावयाचा तर नारळ (ताडमाड), पोफळ यांची गणना प्रथम केली पाहिजे. एके काळी मुंबईभर त्यांचीच गर्द राने होती. त्यांत माहीम येथील ताडामाडांची दाटी विशेष प्रसिद्ध होती. स्थलनामावरून इतिहासाचा

बोध करून घ्यावयाचा तर वरळी, वडाळा ही नावे वडांच्या झाडांचे त्या ठिकाणी प्राधान्य असल्याचे दर्शवितात. मुंबईत कित्येक भाग फळांच्या नावाने लोकपरिचित असल्याने—जसे आंबेवाडी, जांभूळवाडी, फणसवाडी, केळेवाडी वगैरे—तेथे एकदा त्या त्या फळांच्या वाड्या होत्या असे अनुमान मुंबईविषयक ऐतिहासिक वाङ्मयात आढळते. आंब्याबद्दल माझगाव पूर्वी प्रसिद्ध होते. माझगाव म्हणजे मत्स्यग्राम—मासे विकण्याचे गाव; पण समुद्राबाहेर भूमीवर आंबे चांगले पिकत. पोर्तुगीजांनी आंब्याकडे लक्ष पुरवून हापूस, पायरी हे कायम कीर्तीचे आंबे निर्माण केले. उंची आंब्यामुळे काही काळ गोव्याचे नाव लोकांच्या तोंडी हमेश खेळत असे.

प्रकरण पाचवे

बहुजिनसी लोकवस्ती व दर्शनी समाजक्रांती

मुंबई बेटाची, त्याजवळच्या कोकणपट्टीवरील इतर सत्तांची आणि त्यांच्या अधःपाताची मागे सांगितलेली कहाणी लक्षात असेल त्यांना मुंबईची लोकवस्ती बहुजिनसी का, या प्रश्नाचे उत्तर सहज काढता येईल. तेराव्याचौदाव्या शतकापर्यंतची एकजात हिंदूंची वस्ती फुटली आणि मुसलमान हा नवा वर्ग हिंदूंच्या विस्तारातच उगवला. मुसलमान हा हिंदूंच्या झालेल्या आसेतुहिमाचल पाडावातूनच उदयास आला. पंधराव्या शतकात त्याचा पाय माहीम बेटावर सत्ताधारी या नात्याने भक्कम रुजला होता; परंतु सोळाव्या शतकात युरोपातल्या खिस्ती पोर्तुगीजांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आक्रमण करून त्यावर अमल गाजविणाऱ्या मुसलमानी सत्तेला इतके सतावून सोडले की त्या सत्तेने मुंबई बेट आणि वसईपर्यंतचा प्रदेश पोर्तुगीजांच्या हवाली केला. मग पोर्तुगीजांनी बाटवाबाटवीचा कहर उडवून मुंबईच्या वस्तीमध्ये खिस्ती रंग इतस्ततः भरला. दक्षिणेस हिंदी खिस्ती समाज (सीरियन ख्रिश्चन) पोर्तुगीजांच्या पूर्वी शेकडो वर्षे होता. मुसलमानांच्या तडाख्यातून सुटण्याकरिता जसा ईराणचा पारशी स्वदेश सोडून हिंदुस्थानाच्या आश्रयास आला तसा बेन इस्रायल या नावाने यहुदीही पॅलेस्टाइन, सीरिया वगैरे आशिया खंडाच्या सरहद्दीवरील देशांतून इकडे आला. या दोन्ही समाजांची संख्या सुरुवातीस शेकड्यांनी मोजावी एवढीच असली तरी आता हजारोंनी गणावी इतकी वाढली आहे. पैकी बेन इस्रायलबाबत सांगायला पाहिजे की पहिल्या जागतिक युद्धातून निघालेल्या इस्रायल देशात मुंबईच्या वस्तीचे पारशी आणि यहुदी हे आणखी दोन फाटे झाले आहेत. आता येथील बेन इस्रायल जाऊ लागले आहेत. संख्येने हिंदूंच्या खालोखाल मुसलमान असले आणि धर्मापुरते स्थूलमानाने सकृद्दर्शनी एकजिनसी वाटले तरी त्यांतही संप्रदायभेद पुष्कळ आहेत. सुन्नी, शिया हे भेद तर प्रसिद्धच आहेत. शेख, सय्यद, बोहरा, खोजा, मेनन वगैरे आणखी भेद आहेतच. यातच कोकणी मुसलमान धरावे. मुंबईत जगातल्या साऱ्या मुस्लिम देशांतले लोक आहेत : अरब, इराणी, मुघल, पठाण वगैरे. मुसलमानांहून संख्येने खिस्ती समाज फार कमी असला तरी त्याच्यातही रोमन कॅथॉलिक व प्रोटेस्टंट या मुख्य भेदाखेरीज आणखी भेद पुष्कळच

आहेत. धर्मव्यवहारांत त्यांचे काही बाबतींत एकमेकाशी पटतही नाही. पण हिंदू समाजातील जातिभेदासारखे त्या भेदांचे स्वरूप नाही.

धर्म, देश यांच्या भेदानुसार येथील वस्तीचाही प्रकार आहे. हिंदू मराठी भाषिकांची वस्ती गिरगाव भागात जास्त तर गुजराती समाजाची भुलेश्वर, काळबादेवी येथे अधिक. त्यापलीकडे भेंडी बाजार, शेख मेमन, अब्दुर्रहमान या नावाच्या भागांतच प्रामुख्याने मुसलमान राहतात आणि आपल्या उपजीविकेचा व्यवहार करतात. पारशी समाज प्रायः खेतवाडी, ग्रँटरोड या भागातला रहिवासी आहे. गिरगावच्या हिंदू वस्तीस लागून धोबीतलावाच्या दिशेला ख्रिस्त्यांची वस्ती आहे. ही सामान्य नागरिकांची स्थिती सांगितली. त्याहून द्रव्यदृष्ट्या वरच्या दर्जाचे लोक मलबार टेकडीवर आणि त्या टेकडीच्या व्यापात मोठाली घरे, त्याभोवती जमल्यास बागबगीचा अशा थाटाने राहतात. या टेकडीवरील बरेच मोठे क्षेत्रफळ हल्ली स्वराज्य-मंत्र्यांच्या आणि धनाढ्य कारखानदार-व्यापाऱ्यांच्या वस्तीने आवरले आहे. स्वराज्यप्राप्तीपूर्वी या टेकडीचा अनेक हिंदी राजेरजवाड्यांच्या महालांना आश्रय होता. हल्ली ते महाल जमीनदोस्त होत असून त्यांच्या जागी अनेक नव्या उपयुक्ततावादी अभिरुचीच्या गगनचुंबी इमारती उभ्या केल्या जात आहेत. त्यात सौंदर्य नसते. काड्यांच्या रिकाम्या पेट्या किंवा डब्या एकमेकात अडकवून त्यांची खोकेवजा उंच उभारणी जशी दिसेल तशा या नव्या इमारती जुन्या दृष्टीला वाटतात.

मुंबईसंबंधाच्या जुन्या इंग्रजी-मराठी पुस्तकांतून वस्तीच्या भेदानुसार प्रत्येक भेदाच्या घरगुती राहणीचे व सामाजिक व्यवहाराचे तपशीलवार वर्णन पाहायला सापडते. जोवर हे भेद स्पष्ट होते तोवर त्या वर्णनाचे सामान्य वाचकाला महत्त्व होते. आता दिखाऊ भेदांचे उच्चाटन झाले असल्याने त्या वर्णनाला असलेच तर ऐतिहासिक महत्त्व आहे. पूर्वीच्या मुंबईच्या हकीकतीत बायकांच्या वस्त्रालंकारांची देशपरत्वे आणि धर्मपरत्वे केलेली वर्णने पाहता येतात. आज या सर्वच गोष्टींत इतका विलक्षण फरक पडला आहे की ती वर्णने कल्पित आहेत असे वाटेल. एके काळी जी श्रीमंतीची लक्षणे समजली जात होती ती वस्त्रेभूषणे विस्मृतीच्या खाईत इतकी खोल जाऊन पडली आहेत की इतिहासालादेखील त्यांचे एकंदर स्वरूप झटकन सांगता येईल असा भरवसा नाही. चंद्रहारादी जड बहुमोल अलंकार सोडून नाकातल्या नथीचा विचार केला तर तो दागिना आज लोकांच्या सामान्य व्यवहारातून साफ गेल्याचे दिसून येईल. येथील महाराष्ट्रीय स्त्रिया कच्छ (कासोटा) घालतात, गुजराती स्त्रियांमध्ये त्याचा रिवाज नाही, अशी माहिती मागच्या शतकातील मुंबईच्या हकीकतीत दृष्टीस पडते. पण आजचा अनुभव त्या माहितीच्या अगदी उलट आहे. १८८९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मुंबईवृत्तांत' या पुस्तकातील पुढील उतारा आजच्या चालीरीतींचे फेरफार वाचकांच्या निदर्शनास आणील. "हिंदू लोकांच्या बायका सधवा असल्या तर कपाळास कुंकू लावतात. कारणपरत्वे रस्त्यातून जाणे

इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स आणि पोर्तुगालची राजकन्या कॅथरीन ब्रॅगान्झा यांच्या विवाहाप्रीत्यर्थ मुंबई वेट पोर्तुगीजांकडून इंग्रजांना १६६१ साली आंदण म्हणून देण्यात आले.





इंग्रजांनी काढलेले रुपयाचे पहिले नाणे : १६७८

१. चर्चगेट : १६७०. चर्चगेट हा त्या वेळचा मुख्य दरवाजा. सध्याच्या फ्लोरा फाउंटनसमोर तो उभारला होता.

२. बझार गेट : १६७०. सध्याच्या जनरल पोस्ट ऑफिससमोरील बझार गेट स्ट्रीटवर हा दरवाजा त्या वेळी होता.



१

२

१. अपोलो गेट : १६७०. सेंट ॲण्ड्रयूज चर्च आणि रॅम्पार्ट रो यांच्या आसपास हा दरवाजा बांधला होता.

२. बॉम्बे कॅसल : १५४८–१६२६. पोर्तुगीजांनी बांधलेला वाडेकिल्ला.



१

२





१. ब्रिटिशांनी बांधलेला
मुंबईचा किल्ला : १६७०

२. मुंबईच्या किल्ल्याची
तटबंदी : १६७०



१. शीवचा किल्ला : १६९५

२. माहीमचा किल्ला : १६९५

▲ वरळीचा किल्ला : १६९५

▼ शिवडीचा किल्ला : १६९५.

१

२

३

४

१. प्रभू जोडपे
२. मराठी (दक्षिणी) ब्राह्मण जोडपे
३. कोळी जोडपे
४. भाटिया जोडपे

१. भंडारी जोडपे
२. मराठा जोडपे
३. पारशी जोडपे
४. बोहरी

१

२



३

१. बनिया
२. मारवाडी
३. खोजा
४. गोयकर जोडपे
५. सफाई कामगार
६. पोस्टमन
७. पोलीस

४

५

६

७

१

२

३

१. कल्हईवाला
२. चांभार
३. चाकूसुऱ्यांना धार काढणारा

१, २, ३. मुंबईतील चाळी

४. जुन्या काळातील मुंबईच्या एका वाडीचे दृश्य

१

२



३

४

१. धनिक लोकांनी खास
स्वतःसाठी बांधलेल्या
बंगल्यांपैकी एक बंगला



१

२. एका वाडीतील
बंगलेवजा घर

२



१. हिंदू देवालय, काळबादेवी



२. ठाकुरद्वार मंदिर



३. महालक्ष्मीचे देऊळ : १८४६





१. मुंबादेवी मंदिर

२. वाळकेश्वर मंदिर, बाणगंगा : १७१५

३. दादीशेट अग्यारी, गिरगाव : १७८३. पारशी लोकांचे एक पुरातन प्रार्थना मंदिर.

१. माहीमचा दरगा

२. जुम्मा मशीद

३. हाजी अल्ली दरगा

१



२



३

दिसू लागले. अर्थात घेरेदार शेंड्या गेल्या. घेरा म्हणजे शेंडीच्या तळाशी एखाद्या चबुतऱ्याप्रमाणे माफक वाढविलेले केसांचे वर्तुळ. त्याच्यामागून थोड्याच अवधीत मिश्यांवर दर दिवशी नियमाने वस्तरा फिरू लागला. बाप किंवा त्याच्या अभावी त्याच्याइतक्या योग्यतेचा जो कोणी पालक असेल तो वारल्यास मिश्या काढायच्या अशी पूर्वीची रूढी होती. ओठावर मिश्या वा कपाळी गंध न दिसल्यास "काय रे तुझा बाप मेला का?" या प्रश्नाचा टोला कानांवर आदळल्याशिवाय राहत नसे. भालप्रदेशावर गंधाची आडवी किंवा उभी रेघ किंवा टिळा नसणे म्हणजे बापाच्या मरणाइतके अशुभ होय, अशी गेल्या शतकातील हिंदूंची बलवत्तर भावना होती, परंतु आता मिश्या व गंध या संबंधातील पूर्वोक्त धार्मिक भावना किती प्रमाणात समूळ नष्ट झाल्या आहेत याची कल्पना हल्ली बापादेखत रोज सकाळी मुलगा आनंदाने स्वहस्ते मिशी उतरीत असतो, कधी कधी बापलेक दोघेही शेजारी शेजारी बसून तेच काम करताना दृष्टीस पडतात, या दाखल्याने येईल. डोक्यावरील केशभार आपल्या हाताने हलका करणे शक्य नाही, तर त्यासाठी रस्तोरस्ती न्हाव्यांची दुकाने आहेतच. पूर्वी न्हावी घरोघरी जाऊन रोज किंवा ठरल्या वारी, ठरल्या वेळी ज्याच्याशी बांधिलकी असेल त्याचे काम उरकून मोकळे होत. इंग्रजी आमदानीत ही जुनी राहणी हळूहळू स्मृतिशेष होत चालली आहे. आणखी एखाद्या पिढीनंतर कदाचित त्या राहणीचे स्मृतिशेषत्वही जाईल असे वाटते.

पुरुषांच्या चालीरीतींच्या फेरबदलाप्रमाणे बायकांच्या राहणीतही असाच फरक पडत आहे. कुंकू व केश या बाबतीतला बायकांचा जुना श्रद्धाळू आग्रह पुष्कळच क्षीण झालेला आहे. कुंकू हे स्त्रीसौभाग्याचे अपरिहार्य लक्षण समजले जात होते. पूर्वी कपाळी अधेल्याच्या आकाराचा टिळा व आडवी चंद्रकोर अशा कुंकू लावण्याच्या दोन तऱ्हा असत. हल्ली बारीक टिकलीवर भागते. विधवांचे केशवपन आता लोक-व्यवहारातून जवळजवळ साफ गेले आहे. केशवपनाचा रानटी आचार पूर्वी फक्त हिंदू उच्चवर्णीयातच रूढ होता. नवऱ्याचा मृत्यू व त्याच्या बायकोचे केशवपन यांचे पूर्वकाळी अतूट साहचर्य होते. बायकोचे केस नवऱ्याच्या मरणोत्तर सद्गतीचे साधन समजले जात होते. इंग्रजांच्या राज्यकाळात जे समाजसुधारणेचे उत्कट आंदोलन सुरू झाले, त्याचे केशवपनाची चाल मोडणे हे एक फळ आहे. वपन गेले तरी नवरा जिवंत असता डोक्यावरील केशभार कातरून कमी करण्याचा नवा प्रघात रूढ होऊ लागला आहे, त्याला 'बॉब कट' म्हणतात. त्याच्या उलट तरुणांच्या डोक्यावर केसांची दाट छपरे अस्ताव्यस्त वाढू लागली असल्याचा अनुभव पसरत चालला आहे. त्याचप्रमाणे हिंदू तरुणांमध्ये मिश्यादाढ्यांची जंगले वाढविण्याची हौस बळावली आहे. दक्षिणेत हिंदू प्रायः दाढी वाढवीत नसत. उत्तर भारतात मुसलमानांचा संसर्ग व अमल अधिक म्हणून की काय दाढ्या वाढविणारे हिंदू मोठ्या प्रमाणात तिकडे आढळतात. महाराष्ट्रात शिवछत्रपतींच्या काळात व कदाचित त्यापूर्वी हिंदू सरदार

वराण्यातले पुरुष ओठाखाली दाढ्या व गालावर कल्ले वाढवीत असल्याचा पुरावा शिवाजी व संभाजी यांच्या चित्रांचा आहे.

एस० एम० एडवर्ड्स यांनी संपादित केलेल्या 'मुंबई शहर व वेट', गॅझेटीअर (खंड १) मधील 'लोकवस्ती' या प्रकरणात हिंदू पुरुषांची रामचंद्र, कृष्ण, विष्णू, नारायण, हरी, गोविंद, अशी नावे असतात तर बायकांना सीता, सावित्री, पार्वती, उमा, रमा ही देवतांची किंवा गंगा, सिंधू, सरस्वती, यमुना, गोदावरी, कावेरी, नर्मदा इ० नद्यांची नावे देण्याचा प्रघात आहे, असे निवेदन दृष्टीस पडते. हे पुस्तक १९०९ सालातले आहे. त्या वेळी स्त्रीपुरुषांच्या नावांसंबंधाचे पूर्वोक्त विधान बहुतांशी खरे ठरणारे होते. आज प्रभाकर, कमलाकर यांच्याप्रमाणेच ज्यात इंद्र शब्द गोवलेला असेल म्हणजे रवींद्र, सुरेंद्र यासारखी किंवा यापेक्षा कमी परिचित अशी कैवल्य, नितिन, निखिल वगैरे अशी नावे मुलांना आणि सोमलखेरीज कमल, विमल, अचल, जयश्री अशी नावे मुलींना लावतात. या फेरबदलाचा उगम बंगाली वाङ्मयात असून त्याचा परिचय महाराष्ट्राला करून देण्याचे श्रेय 'मनोरंजन' या मासिकाला द्यावे लागेल. ज्यांना या मासिकाची आठवण असेल त्यांना या विधानाबद्दल शंका वाटणार नाही.

मागील शतकात जमिनीवर पाट-ताट ही भोजनाची साधने होती. जमीन शेणाने सारवलेली व उष्टेखरकटे काढल्यावर त्या जागी शेणगोळा फिरवायचा. पुरुषांमागून बायकांनी आपले भोजन उरकायचे, पाणी भरायचे, भांडी व धोत्रे, लुगडी—गडी ठेवण्याची ऐपत नसेल तर—बायकांनीच धुवायची; झाडलोट त्यांनीच करायची. बहुधा घरातल्या दळणकांडणाचेही काम त्यांच्याकडेच असे. बाजारहाटही त्यांचाच. अद्यापि भाजीबाजारात पाहिले तर मोठी संख्या त्यांचीच दिसते. पण गिरण्या झाल्यामुळे बायकांच्या मागचा दळणकांडणाचा घोर सुटला. तथापि हाताशी गडी-माणूस नसेल तर गिरणीच्या दाराशी दळणाचे पीठ मिळेपर्यंत तिष्ठत राहण्याचे तप त्यांना करावे लागतेच. कधी शाळकरी मुले थोडी मोठी असतील तर हे आई-बहिणीचे काम ती मुले निभावून नेतात. दुसऱ्या महायुद्धापासून (१९३९–४०) उन्हापावसात अन्नधान्यानिमित्त सरकारमान्य दुकानापुढे तासचे तास तिष्ठत राहण्याची जबाबदारी संसारी माणसाच्या कारभारात शिरली आहे. उष्टेखरकटे व शेणाचे सारवण करणे, भोजनाच्या वेळी वाढताना वाकणे हा गतकालीन त्रास टेबलावर जेवण्याची चाल वाढत असल्याने कमी होत आहे. पूर्वी पुष्कळांच्या घरांतून, विशेषतः ब्राह्मणांच्या घरांतून (मुंबईचा पहिला ब्राह्मण पळशीकर हे येथे लक्षात ठेवावे. शेतीभाती, भिक्षुकी, वैद्यकी ही त्यांची उपजीविकेची साधने. त्यांची घरेही मोठी असत.) दोनदोन, तीनतीन गाई असत. यामुळे गोमय-गोमूत्राची अर्थातच टंचाई नव्हती. घराच्या भुया-भिंती सारवण्याची जी पद्धत होती ती विटा-चुन्याचा वापर वाढून भुया फरसबंदी झाल्यामुळे कायमची हटली. शेणसुद्धा सहज हातास लागेल अशी आज स्थिती उरलेली नाही. पूर्वी वाहनांच्या

गुरांचे रस्त्यावरील शेण गोळा करण्याचा व त्या शेणाच्या गोवऱ्या थापून त्या ग्रँटरोड स्टेशनच्या आवारातील रेल्वे हद्दीच्या भिंतीवर वाळविण्याचा एक व्यवसायच मुंबईत होता. आता मोटारींमुळे तो व्यवसाय बंद व्हावा, हे क्रमप्राप्त होते.

खाद्यपेयांच्या बाबतीत शास्त्रोक्त किंवा नियमित असे काहीच उरलेले नाही. चहा सेवनाला तर तो केव्हा व कितीदा घ्यावा यावर कसलेच नियंत्रण नाही. गेल्या शतकाच्या उत्तरार्धातील कादंबऱ्यांतील वर्णनावरून कचेरीतील काम आटपून घरी आल्यावर कॉफी घेण्याची चाल पडत होती असा निष्कर्ष काढता येतो. चहाच्या (लाल) रंगाचे रक्ताशी साद्दश्य आहे म्हणून तो एकेकाळी निषिद्ध होता. टोमॅटोचासुद्धा शंभर वर्षांपूर्वी रंगासाठीच अनादर होता. त्याला विलायती वांगे म्हणत. चहा, कॉफी, कोको यांच्याबरोबर सोडा, लेमन, गोल्डस्पॉट वगैरे पेयांची नोंद टाळल्यास तो प्रमाद ठरेल इतकी ती आज लोकप्रिय आहेत. आणखी एखादा ठळक फरक सांगायचा तर तो लेखनप्रकाराचा सांगता येईल. याचा अर्थ सुवाच्य हस्ताक्षर व शुद्धलेखन एवढाच नाही. बापलेक, सेव्यसेवक (धनी व चाकर) अथवा समान दर्जाचे गृहस्थ यांच्यात परस्परांना अनुलक्षून लिहिण्याचे काही मायने ठरले होते. ती० रा० रा० (तीर्थरूप राजमान्य राजश्री) ही विशेषणे वडील माणसांसाठी ठरलेली होती. लहानाने थोरास 'अपत्ये त्रिकाळचरणी मस्तक ठेऊन' याप्रमाणे लिहावे लागे. मुलामुलींना चि० (चिरंजीव-वी), सधवेला सौ० (वज्रचुडेमंडित सौभाग्यवती), विधवेला गंगाभागीरथी ह्या शब्दांनी संबोधीत. प्रिय, महाशय, महोदय ही पद्धत उसनवारीची आहे. इंग्रजीच्या अनुवादाचे हे शब्द बंगाल उत्तर भारत यांच्या भाषांतून उचललेले आहेत. पत्राच्या शिरोभागी एखाद्या देवतेचे नाव, आरंभी 'श्री' व शेवटी 'प्रसन्न' हे शब्द जोडून 'श्रीरामप्रसन्न' (रामाऐवजी जी इष्ट देवता असेल तिचे नाव) याप्रमाणे जी पद्धत होती, ती मोडून पत्राच्या डोक्यावर पत्ता, तारीख लिहिताच पत्रलेखनाला सुरवात करायची अशी सध्याची रीत आहे. क्वचित कोणी ॐ, जय हिंद इ० पर्याय योजतो. मजकुराच्या तळाशी सही हा प्रकार मराठेशाहीच्या कारभारात नव्हता. आपण कोण हे निदर्शनास आणून मग मजकूर लिहायचा. सही नव्हती तेव्हा तिचे 'आपला विश्वासू, स्नेहांकित, हिताकांक्षी' वगैरे इंग्रजीच्या अनुकरणाचे आजच्याप्रमाणे शाब्दिक अलंकारही नसावे हे सरळच आहे. इंग्रजांच्या साहचर्याचा हा परिणाम यापुढे टाळू म्हटले तरी टळणारा नाही. पूर्वी स्थलकालनिर्देश पत्राच्या मजकुरातच असे. स्वतंत्र नसे. लिपी मोडी. बाळबोध नव्हती.

खाण्याच्या पदार्थांत पाव, बिस्किटे अटळपणे समाविष्ट होण्यापूर्वी हे पदार्थ हिंदूला किती भयानक वाटत होते याचा सवाशे वर्षांमागील एक मासला ग्रथित केल्याने हिंदू मनोरचनेतील आमूलाग्र क्रांतीचा अंदाज करता येईल. बाबा पदमनजी हे नाव मराठी साहित्यज्ञात्यांना माहीत असणे काहीशा खात्रीने संभवते. हे जातीने कासार, त्यात पंथाने शाक्त, यामुळे मद्यमांसाचा निषेध नसलेले. हिंदुधर्मातील कर्मकांडाचा

मनात कमालीचा तिटकारा, जातिभेद मोडायची उत्सुकता. तरी मुंबईत जातिभेद-विध्वंस व विधवाविवाह यांसारख्या सुधारणा करण्यासाठी जन्मास आलेल्या 'परमहंस सभे'च्या सदस्याने बिस्किट खाण्याचे आव्हान देताच आपली जी अवस्था झाली ती बाबा पदमनजींनी आपल्या 'अरुणोदय' नामक आत्मचरित्रात वर्णिली आहे ती अशी: "एके दिवशी ह्यांनी (परमहंससभेच्या सभासदांनी) माझ्याशी...जातिभेदाविषयी फार निकराने वाद केला. जेव्हा जातिभेद खोटा आहे व तो मोडावयास आम्ही सिद्ध आहो, असे आम्ही कबूल केले, तेव्हा ते म्हणाले की आताच आमच्या देखत तुम्ही तो मोडाल काय? आम्ही म्हटले 'होय मोडू.' परंतु खरोखर तो मोडण्यास सांगतील असे आम्हास वाटले नाही. पण आमचे संभाषण होत असता त्यातून एकजण मुकाट्याने बाहेर जाऊन थोड्याच वेळाने काही बिस्किटे घेऊन आला व ती आमच्या पुढे ठेवून म्हणाला की, 'जर जातिभेद खोटा वाटतो तर ही खा पाहू.' आम्ही म्हटले 'प्रथम तुम्ही खा, मग आम्ही खाऊ.' तेव्हा त्यांनी त्यातून काही खाल्ली, मग आम्हासही खाणे प्राप्त झाले. परंतु त्या वेळी माझी जी गाळण झाली, ती सांगता पुरवत नाही. माझ्या अंगास कंप सुटून चळचळा घाम आला, व आता घरी गेल्यावर आई घरातून हाकून लावील असे वाटू लागले. जसा काही एखाद्यावर डोंगर कोसळून पडतो, तशी माझी गत झाली. आता मी कुटुंबाच्या सर्व माणसांस मुकलो व जातीतून उठलो, परागंदा झालो, सर्व जण मला बाट्या म्हणतील, असे वाटू लागले; कारण तोपर्यंत मी कधी पाव बिस्कुटे खाल्ली नव्हती." हे उदाहरण १८५०च्या सुमाराचे आहे.

लेखनप्रकाराकडे नजर टाकल्यास धूळपाट्या, साध्या दगडी पाट्या व त्यांच्या दगडी किंवा दुध्या पेन्सिली या वापरातून साफ गायब झाल्या. त्यामागून कागदाचे, शिस-पेन्सिलीचे माहात्म्य वाढले. त्यांच्या जोडीला शाई, टाक व बोरूच्या लेखण्या होत्या. त्या टाकाच्या एका टोकास लिहिण्यासाठी खोचली जाणारी नाना आकाराची टोके म्हणजे निबे. निबांच्या कितीतरी तऱ्हा होत्या. बोरूच्या लेखणीचा उपयोग नष्ट होण्यापूर्वी शाई साधारणपणे घरोघरी केली जात असे. शाई तयार करणे हा काहीसा खटाटोप होता. बाजारात शाईच्या पुड्या मिळू लागल्यावर तो खटाटोप साहजिकच व्यवहारातून गेला. विसाव्या शतकाच्या आरंभी फाउंटन पेन आले. त्यास 'झरणी' असा फाउंटनशी समानार्थक प्रतिशब्द आहे. झरणी व तिची शाई यांचे कारखानेच असल्याने शाईच्या पुड्यांना कायमची रजा मिळाली. फाउंटनमागून 'बॉल पेन' सरसावले. त्यांनी सध्याच झरण्यांना व शिसपेन्सिलींना मागे टाकले आहे. कालांतराने 'झरणी' बोरू-टाकांप्रमाणे इतिहासजमा होईल अशी शक्यता आहे. पूर्वीच्या पितळी किंवा तांब्याच्या शाईच्या जड दौती हल्ली दृष्टीस पडत नाहीत. तेव्हा कागदावरील शाई वाळविण्यासाठी तिच्यावर बारीक वाळू टाकण्याचा प्रघात होता. ती वाळू मुद्दाम तयार करावी लागत असे.

लेखनसाहित्याच्या प्रस्तुत फेरफारात सुवाच्य सुंदर हस्ताक्षराची कला गारद झाली. पूर्वकाळी हस्ताक्षराच्या वळणदार सौंदर्यावर लोकांचे लक्ष असे. चांगले हस्ताक्षर हे मुलांच्या विवाहयोग्यतेचे एक महत्त्वाचे अंग समजले जात असे. म्हणून त्यासाठी शाळांतून विद्यार्थ्यांना सुरुवातीस एक तास कित्ते गिरवून खरडावे लागत. इंग्रजी शाळातून 'कॉपी' असे. ही कॉपी म्हणजे एक पोरखेळच होता. आठवड्यातून शाळेच्या वेळापत्रकात एकदोन वेळा एखादा तास 'कॉपी'तील एकदोन इंग्रजी शब्द कसेबसे नकलल्याने सुवाच्य व वळणदार अक्षरांचे हाताच्या स्नायूंना कायमचे वळण लागणे सहसा शक्य नव्हते. अलीकडे प्रायः हस्ताक्षराचा सुबकपणा हजार-पाचशेमध्ये एखाद्याच लेखकाच्या ठिकाणी दृष्टीस पडण्याचा संभव असतो. याचे कारण 'टाइपरायटर' या अक्षरयंत्राचा वापर हेच होय, याबद्दल विवेचन नको. इंग्रजांच्या राज्यकाळात सदर यंत्राने लेखनाचे सर्व कार्य होऊ लागले. हा एक प्रकारे फायदा झाला तरी हस्ताक्षराची हानी झाली हेदेखील कबूल करणे अवश्य आहे. सरकारी व सावकारी कार्यालयांतून चालणाऱ्या कागदपत्रांच्या नकला दप्तरी ठेवाव्या लागतात. तशा नकला पहिल्या प्रतीबरोबरच झालेल्या हाती लागतात, ही या यंत्राची दुसरी सोय आहे. तरीही हस्ताक्षर चांगले असावे असे वाटणारे देशातील थोर पुरुष आहेत. म० गांधी हे एक उदाहरण पुरेसे आहे. ज्याचे गांधीजींकडे हस्तलिखित पत्र जाईल, त्याचे अक्षर गचाळ दिसल्यास गांधीजी त्याबद्दल ठपका उत्तरो नोंदल्याशिवाय राहत नसत. त्याबरोबरच पुष्कळदा आपले अक्षर वाईट असल्याचा खेदही नोंदीत असत. मुंबईत इंग्रजी राज्याच्या प्रारंभापासून सुमारे दोनशे वर्षे सारे सरकारी लेखन प्राधान्याने पाठारे प्रभूंच्या हस्ते घडत असे. या लेखकांचे हस्ताक्षर बहुधा सुश्लिष्ट असल्याची स्तुती अनेक वरिष्ठ इंग्रज अंमलदारांनी मुक्त कंठाने केल्याचे दाखले जुन्या कागदपत्रांतून पाहता येतात.

हा क्रांतीचा धावता आढावा हिंदू समाजापुरता असून ती क्रांती १९ व्या शतकाच्या शेवटच्या पंचविशीत सुरू होऊन चालू अर्थात विसाव्या शतकात त्या क्रांतीचा वेग आणि विस्तार सारखा वाढत आहे. त्यांच्या कारणांमध्ये विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत घडलेल्या दोन जागतिक महायुद्धांना महत्त्वाचे स्थान आहे.

हिंदू समाजाच्या क्रांतीचा विचार करण्याची आवश्यकता अशी की त्या समाजाच्या गतीला जसे पावलोपावली अडथळे आहेत व होते, तशी स्थिती देशातल्या दुसऱ्या कोणत्याही समाजासंबंधात आढळणार नाही. त्यामुळे त्यांच्यात हिंदूंप्रमाणे विशेष ठळक बदल दृष्टीस पडत नाहीत; आणि जे झाले आहेत त्यांना हिंदूंप्रमाणे विशेष सायास पडले आहेत असेही नाही.

वरील विवेचनात ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा पंक्तिप्रपंच टाळल्याचे दिसून येण्यासारखे आहे. राजकीय अधिकाराचा व्यवहार सोडल्यास इतर सामान्य व्यवहारात त्या प्रपंचाची जुनी धार अतिशय बोथटली आहे.

प्रकरण सहावे

पाण्याची टंचाई व भरपाई

मूळचे मुंबई बेट हे पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने ते इंग्रजांच्या हाती आले तेव्हापासून संपन्न नव्हते, पण जोवर येथील लोकवस्ती पाण्याची हाकाटी माजण्याइतकी वाढली नव्हती तोवर गंभीरपणे त्याबद्दल राजकर्त्यांना विचार करावा लागत नव्हता. सन १६६५ मध्ये ज्या वेळी हे बेट इंग्लंडच्या राजाने पोर्तुगीजांकडून आपल्या हाती घेतले तेव्हादेखील येथे पिण्याचे पाणी भरपूर व सर्वत्र होते अशातला प्रकार मानता येण्यासारखी स्थिती नव्हती; पण वस्तीच कमी होती यामुळे विहिरी, तळी ही साधने पुरेशी होती. पाण्याच्या दुष्काळाचा हाहाकार माजल्याचा १६६१ पासून एकोणिसाव्या शतकापर्यंत दाखला आढळत नाही. याचा अर्थ तोपर्यंत वस्ती वाढत नव्हती असा समजू नये. अठराव्या शतकात लोकवस्तीच्या वाढीस काही प्रतिबंधच नव्हता, व इंग्रज व्यापारी राज्यकर्त्यांना या बेटावर येतील तेवढी माणसे हवीच होती. एकोणिसाव्या शतकात इंग्रजांना 'निर्वीरमुर्वीतलम्' वाटावे अशी दशा त्यांनी प्राप्त करून घेतली होती. इंग्रजांच्या राज्यात सर्व धर्मांना व्यवहारस्वातंत्र्य, प्रजेचे संरक्षण, राजकारण सोडल्यास निःपक्षपात न्यायदान, शक्य तेवढे निर्विघ्न लोकजीवन इत्यादी मानवी व्यवहाराला अपरिहार्य वाटणाऱ्या सुखसोयी बिनदिक्कत उपलब्ध होत असल्याने येथील वस्ती वाढावी यात नवल काय? वस्ती वाढली की संसाराच्या वस्तू जशा महागतात तसाच पाण्याचाही प्रकार आहे. पाऊस हा सर्वथैव पाणीपुरवठ्याचा आधार. एखाद्या वर्षी त्याने ओढून धरले की सर्व प्राणिमात्राला जो त्रास भोगावा लागतो, त्यात माणसाचे अधिक हाल होतात. नैसर्गिक घटना मनुष्य, पशुपक्षी वगैरे भेद ओळखीत नाही, यामुळे त्या घटनांचा इष्टानिष्ट प्रभाव सर्वांना सारखाच भोगावा लागतो. इंग्रज कंपनीच्या राज्याची पहिली जवळ जवळ दोनशे वर्षे पाण्याच्या विवंचनेवाचून गेली. वस्ती जोवर थोडी होती तोवर विहिरी, तळी, तलाव वगैरे साधनांवर भागले. विहिरी, तळी आटल्यास ती अधिक खणून त्यांची खोली वाढविणे, त्यातील पाणी अनाठायी वापरले जाणार नाही याचा बंदोबस्त करणे, अशा जुजबी उपायांवर त्या त्या वर्षी पाण्याची टंचाई निभावून नेण्याची रीत यापुढे उपयोगी पडणार नाही, अशी खात्री पटली तेव्हा राज्यकर्ते नव्या स्वतंत्र उपायाकडे वळले. १८५६ च्या

अवर्षणाने मुंबईचे इंग्रज सरकार पाणी-पुरवठ्याच्या योजनेचा पोटतिडकेने विचार करू लागले.

१८५६ साली झालेल्या पाण्याच्या टंचाईचे स्वरूप किती भीषण होते याची कल्पना गो० ना० माडगावकरांच्या 'मुंबईचे वर्णन' या पुस्तकातील पुढील उताऱ्यावरून वाचकांना येईल. हे पुस्तक १८६३ साली छापलेले असल्याने त्यात वर्णिलेल्या पाण्याच्या टंचाईचा अनुभव हा लेखकाचाच होता, असे येथे गृहीत धरायला हरकत नाही. "पावसाचे ऐनबहराचे महिने सुके गेले. विहिरी तळीं बहुधा कोरडीं पडलीं; तेव्हां पुढचें वर्ष कसें पार पडेल" या चिंतेच्या उग्रतेने लोक हैराण होऊन गेले. संकटावर हिंदुसमाजाचे होमहवन, अभिषेक, किंवा एखाद्या देवास कोंडून त्यालाच संकटात टाकणे, वगैरे तोडगे वाया गेल्याचे पाहून त्यांनी रामायणातील शृंगऋषीच्या कथेचा नव्याने प्रयोग एक आठवडाभर चालविला. हिंदूंनी दोनतीन गाड्या चिकणमाती आणून त्याचा जिनगराकरवी पुरुषभर उंचीचा पुतळा भुलेश्वरच्या तळ्याकाठी प्राण-प्रतिष्ठापूर्वक उभा केला व त्यासंबंधी ब्राह्मणांनी अनुष्ठान आरंभिले. "ह्या शृंगऋषीची प्रतिदिवशी पूजा, अर्चा, नैवेद्य होत असे." त्याचे दर्शनास आबालवृद्ध स्त्रीपुरुष जात असत. दर्शनेच्छू मंडळी "त्या मूर्तीपुढें पैसे, तांदूळ, सुपाऱ्या, नारळ, केळीं व अनेक फळें टाकीत व ह्याशिवाय जपास जे ब्राह्मण बसले होते त्यांसही दक्षिणा देत. या ऋषींवर पांचदहा रुपयांचीं तर फुलेंच पडत. इतकेंही केलें तरी पाऊस ज्यावेळीं पडायचा त्याच वेळी, जितका पडायचा तितकाच पडला.'

"ह्या वर्षी माघ महिन्यापासून ज्येष्ठ अखेरपर्यंत पाण्याची अतिशय तंगी पडली. आणि गरीबगुरीब लोकांत पाण्यासाठीं मोठा हाहाकार पडला. कित्येक लोक डोईवर हंडे घेऊन रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं पाणी पाणी करीत फिरत. मुंबईतील गाईम्हशी व दुसरीं ढोरें माहिमास नेऊन ठेवावीं असा सरकारांतून हुकूम झाला होता. कित्येक गरीब लोकांच्या बायका कांपाच्या मैदानांत मध्यरात्रीपर्यंत बसून मोठ्या आयासानें एक दुसरा हंडा पाणी भरून घरीं घेऊन जात. कित्येक बावींत (विहिरींत) उतरून वाटयांनीं पाणी जमवीत. त्यावेळीं कित्येक पारशी व एकदोन वाणी गृहस्थांनीं व सरकारनें लोकांस पाण्याच्या दुष्काळामुळे जे दुःख झालें होतें तें दूर करावें म्हणून कांपाच्या मैदानांत व दुसऱ्या एकदोन ठिकाणीं विहिरी खणविल्या. ह्या विहिरी खणीत असतांना जें गढूळ पाणी निघे तें देखील नेण्यास शेकडों लोकांची गर्दी होऊन जाई. ह्याशिवाय सरकारने बाहेरगांवांतून आगीचे गाडीवरून हजारों पाण्याची पिंपें आणवून डोंगरी, चिंचबंदर, बोरीबंदर या ठिकाणच्या विहिरींत ओतविलीं. असे अनेक प्रयत्न करून इंग्रज सरकारनें रयतेस त्या अरिष्टांतून मुक्त केलें." (माडगावकरकृत मुंबईचें वर्णन, आवृत्ती दुसरी, पृष्ठे २७४–७६) याच संदर्भात नाखुदा महंमद रोगे या मुसलमान धनिक गृहस्थाने कापांवरील मारुतीच्या देवळासमोर हजारो रुपये खर्चून एक प्रशस्त व आरामशीर

दगडी तलाव बांधल्याची माहिती नमूद करणे अवश्य आहे. या तलावाचा विशेष म्हणजे तो अष्टकोनी आकाराचा असून त्याच्या प्रत्येक कोनावर एक दगडी सोपा बांधला होता हा होय.

नाखुदाच्या पुष्कळ वर्षे आधी (१८२३ पूर्वी) डंकन रोडवर पाण्याचा पुरवठा करण्यासाठी दोन तलाव बांधण्यात आले होते व तेथे कावसजी पटेल तळ्यातून पाणी पुरविले जात असे. डंकन रोडचे तलाव बांधणारा कोणी हुलसाजी सुभानजी नावाचा मुसलमानच होता. त्या गृहस्थाने सरकारात काही रक्कम ठेविली. तिचा काही अंश या तलावापोटी खर्ची पडला. तेथे कावसजी पटेल तळ्याचे पाणी नेऊन सोडणारा कालवा आणि इतर आनुषंगिक कामाचा खर्च सरकारने भागविला असावा. हे तलाव सुरुवातीपासून निर्भेळ लोकोपयोगासाठीच निर्माण करण्यात आले होते.

उन्हाळ्यात पटेल तलावाच्या पाण्याची उसनवारी पुरेना तेव्हा फ्रामजी कावसजी बनाजी या नावाचे त्या काळातले एक परोपकारी धनाढ्य पारशी गृहस्थ पुढे सरसावले. त्यांनी मुगभाट वाडीत तीन मोठाल्या विहिरी खणल्या. त्यांतील पाणी वर ओढण्यासाठी एक वाफेचे इंजन व चार रहाट अशी योजना अंमलात आणून त्या विहिरींचे पाणी आधी तयार असलेल्या कालव्याच्या साह्याने डंकन रोडवरील तलावात सोडण्यात येऊ लागले. बनाजींनी विहिरींकरिता तीस हजार रुपये खर्च केले तरी इतर व्यवस्थेसाठी दरमहा दोनशे रुपयांची जबाबदारी बनाजीसेठच वाहत होते. या उपकाराच्या मोबदल्यात त्यांनी मागणी केली म्हणून मुगभाट वाडीत तेव्हा उभ्या असलेल्या आणि पुढे लावल्या जाणाऱ्या नारळांच्या झाडावरील कर घेण्याचे सरकारने सोडले. फ्रामजी कावसजी बनाजी हे १८५१ साली वारले, पण मुगभाटातील विहिरीतील पाणी पुढे कित्येक वर्षे डंकन रोडवरील तळ्यांना पुरविले जात होते.

याप्रमाणे धनिकांचे औदार्य व सरकारची आस्था यांच्या मेळाने पाण्याचे दुर्भिक्ष त्या त्या वेळेपुरते हटविण्याची खटपट चालू असता हे नेहमीचे संकट दीर्घ काळ उपस्थित होऊ नये या दृष्टीने सरकारातही पाणीपुरवठ्याच्या भिन्नभिन्न योजनांचे मंथन चालू होते. त्या मंथनातून प्रसिद्ध विहार सरोवराची निष्पत्ती झाली. जेथले पाणी प्रत्यही जनतेच्या पोटात जायचे ते सर्वथैव निरोगी आणि चवदार असायला पाहिजे याकडे आधी बारीक लक्ष पुरविल्याशिवाय त्याच्या संचयाचा विचार करता येत नाही. विहारच्या पाण्याची अशी परीक्षा होऊन मग त्याच्या धरणाचा प्रारंभ झाला. कंपनीच्या कामांना तीन चाळण्यांतून पार पडण्याशिवाय गत्यंतर नसे. प्रादेशिक, सार्वभौम या दोन स्थानिक सरकारांवर शेवटी कंपनीचे संचालक मंडळ (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स), या त्या तीन चाळण्या होत. पहिली चाळणी घरची खरी पण तिची कसोटी कठीण असे. कारण केल्या कामाच्या भलेबुरेपणाला तिलाच तोंड द्यावे लागे. पाण्याची धरणे व कालवे यांचे ज्ञान भारतीयांना प्राचीन काळापासून आहे. संचित पाणी लोखंडी अगर शिसाच्या नळांनी घराघरांतून खेळविणे हा व्यवहार हिंदुस्थानामध्ये बराच

अपरिचित होता, यामुळे यासंबंधीची सारी खलबते इंग्रज कामदारांतच घोटली जावी हे स्वाभाविक होते. याप्रमाणे सर्व प्रकारे विचारविनिमय होऊन विहारचे पाणी मुंबईकरांना विनायास घरबसल्या मिळू लागले. त्यापूर्वी नळ लोखंडाचे असावे याविषयी वाद उद्भवला म्हणून ते शिसाचे वापरले. टिनचे अस्तर त्या नळांना आतून जोडण्यात आले.

विहारच्या पाण्याची याप्रमाणे व्यवस्था लावल्यावर वाढत्या वस्तीकडे लक्ष देऊन विहारच्या तळ्याजवळ तुळसी नावाचे धरण उभे केले व त्यातील पाण्याची विहारला जोड दिली. नंतर पवईच्या पाण्याची विहारच्या पाण्यात आणखी भर पडेल अशी तजवीज अमलात आणली. ही सारी कामे मुंबई नगरपालिकेने पार पाडली. पण त्यासाठी काढलेले कर्ज फिटण्यापूर्वीच नवे तान्साचे प्रचंड धरण उभारून मुंबईस पाणीपुरवठा केला पाहिजे यासंबंधाची पालिकेच्या कारभारात वाटाघाट सुरू झाली. विहार, तुळसी हे जलाशय स्थानिक दृष्ट्या मुंबई शहराच्या हाकेतले म्हणता येतील. तान्सा हे ठिकाण मुंबईच्या हद्दीबाहेरचे आणि डोंगरखोऱ्याचे, आगगाडीच्या रस्त्यापासून काहीसे दूर. एकटे शहरातले नागरिक व पशूच तेवढे पाणी खपवितात असा प्रकार नसून मोठ्या शहराच्या वस्तीतील आगी, रस्त्यातील रहदारीने उडणारी धूळ, नव्या घरांची आणि कारखान्याची बांधकामे वगैरे पाण्याच्या खर्चाची आणखी कितीतरी कलमे सांगता येतील. १८५० नंतर आगगाड्या, कापडाच्या गिरण्या भराभर निघू लागल्या त्यांचेही पाण्यावाचून पान हालत नाही. कारखाने म्हणजे माणसांच्या वस्तीची वाढ हे ठरलेलेच आहे. अशा अनेकविध वृद्धीकडे लक्ष देऊन व एखाद्या वर्षी पाऊस न पडल्यास त्या वर्षी शहरवस्तीला पाण्याची विशेष ओढाताण सोसावी लागणार नाही अशा हिशोबाने तान्साचे धरण बांधण्यात आले. एकंदर अडथळ्यांचा विचार केल्यास ते उभे करण्यास कालावधीही फार लागला नाही. अडथळे म्हटले ते कर्जासंबंधाचे आणि सरकार व महापालिका यांच्या दरम्यान चाललेल्या विचारविनिमयाचे होते. दीड कोटी रुपये विल्हेस लागून १८९२ सालच्या मार्च ३१ रोजी तेव्हाचे व्हाइसराय लॉर्ड लान्सडौन यांच्या हस्ते या धरणाचे पाणी मुंबईकडे वाहू लागले.

तान्साच्या पाण्याने मुंबईतील पाण्याची फिकीर काही वर्षे तरी गेली होती. मात्र पुढे पाणीपुरवठ्यात काटछाट सुरू झाली. विहारचे पाणी आरंभी दिवसभर मिळत होते तर त्यात हळूहळू कपात होत जाऊन आता लोकांना पाणी मिळण्याचे प्रमाण दिवसातून अवघ्या एक वेळा तीन तासांवर आले आहे. काही वर्षांमागे ठरल्या तासांना पण सकाळ-संध्याकाळ याप्रमाणे दोन वेळा पाणी मिळत असे. अलीकडे मुंबईच्या कित्येक भागांत सकाळी, तर काही ठिकाणी ऐन दुपारी, तर बऱ्याच वस्तीत संध्याकाळी याप्रमाणे पाण्याचे वाटप चालते. जेथे पाण्याचा खर्च जास्त असेल तेथील मंडळी पाण्याचा साठा करून त्यांची सर्व कामे कशीबशी उरकतात. सध्या तान्सासारखेच वैतरणाचे पाणी मुंबईस मिळते. तरी वाटपकाळाची मर्यादा पूर्वीचीच कायम आहे.

काही वर्षांमागे रस्त्यावरील धूळ वाहनांच्या रहदारीने उडून रस्त्याकडेच्या घरांतून राहणाऱ्या वस्तीला त्रास पोचत असे, तो कमी होण्यासाठी बैलगाडीतून मागच्या बाजूस जोडलेल्या झारेवजा नळाने रस्ते भिजवून काढीत. पण त्याने त्रास कमी होत नाही, म्हणून हल्ली मुंबई शहरात बहुतेक रस्ते डांबराने सारवून काढतात. यामुळे धूळ बहुत काळ दबून राहते व उडत नाही. तरी रस्त्यावरील घाण धुऊन काढण्यासाठी महिन्याच्या अवकाशात एकदा सडकांवर पाणी सोडीत असत. सांप्रत ती प्रथा मोडली आहे.

प्रचंड जलाशय एखाद्या ठिकाणी निर्माण करून त्यातले पाणी बोगद्यासारख्या टोलेजंग नळाच्या साह्याने मुंबईच्या वस्तीला पुरविल्याने सरकारची व नगरपालिकेची जबाबदारी संपत नाही. योग्य स्थळी पाणी साठवून त्याचे वाटप सुकर व समाधानकारक होईल, याची तरतूद करणे ही या कामाची प्राथमिक अवस्था आहे. पाणी घरोघर पोचविताना ते शुद्ध व निरोगी करावे लागते. यासाठी मुंबई महापालिकेने मलबार टेकडी व भंडारवाडा या दोन जागी पाणी गाळले जाण्यासाठी दोन तलाव बांधले आहेत. प्रथम पाणी या तलावात भरून ते शास्त्रीय रीत्या शुद्ध करण्यात आल्यावर मग ते घरोघर सोडले जाते. मूळच्या जलसंचयात आसपासच्या किंवा त्यातच उगवणाऱ्या वनस्पतींचे अंश मिसळून ते पाणी बिघडण्याचा संभव असतो, म्हणून ते गाळण्याची योजना मलबार टेकडी व भंडारवाडा येथे केली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र.
ग्रंथ शाखा

प्रकरण सातवे

दळणवळण आणि वाहने

१६६१ मध्ये इंग्रज राजाला पोर्तुगीज राजाने बहिणीच्या लग्नात मुंबई बेट आंदण दिले तेव्हापासून सुमारे चाळीस वर्षे या बेटाची जी भौगोलिक स्थिती मागे चितारली आहे ती स्मरणात असणाऱ्या वाचकांना तेव्हा येथील वस्तीचे दळणवळण व त्याची साधने कोणती होती याची कल्पना करणे शक्य आहे. बेटावर जिकडेतिकडे भोवतालच्या समुद्राचे आक्रमण रुजत चाललेले, जेथे आक्रमण नसेल त्या जागी नारळ व तत्सम वृक्ष-वनस्पतींच्या दाट वाड्या आणि दलदल अशा स्थितीत माणसांचे हिंडणेफिरणे साधारणतः ज्याच्या त्याच्या पायांनीच होत असावे हे सहज कळणारे आहे. निसर्गाने शरीररचनेत गतीचे साधन पाय हे ठेवलेले असल्यामुळे जन्मापासून त्याचाच उपयोग सगळे प्राणी करीत असतात हे सांगणे म्हणजे द्विरुक्तीसारखे वाटेल. कुणाला पाखराकडे लक्ष जाऊन प्रस्तुत विधानाच्या यथार्थतेविषयी संशय उत्पन्न होईल; परंतु सदर विधानातील 'जन्मापासून' हा शब्द न विसरल्यास संशयाचे निरसन होण्याला उशीर लागणार नाही. पंख हे आकाशातल्या संचारासाठी आहेत. भूतलावर पाय हेच गतीचे एकमेव साधन होय हा मुद्दा कबूल करावा लागतो.

१५३४ पासून मुंबईवर पोर्तुगीजांचे राज्य चालू झाले व ते १६६५ पर्यंत म्हणजे इंग्रजाने या बेटाचा कबजा घेईपर्यंत सुमारे १३० वर्षांहून थोडा अधिक काळ टिकले. पोर्तुगीज राजकन्येच्या लग्ानिमित्त इंग्रज राजाशी तह जरी १६६१ मध्ये झाला तरी गोव्याच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी १६६५ पावेतो इंग्रजाचा पाय मुंबई बेटास लागू दिला नाही हा पूर्वकथित वृत्तान्त कालगणनेचा घोटाळा दूर करील. पोर्तुगीजांनी पूर्वोक्त १३० वर्षांच्या आमदानीत आपली प्रार्थनामंदिरे बांधणे आणि येथील लोक बाटवून ख्रिस्त्यांची संख्या वाढविणे याखेरीज दुसरे महत्त्वाचे काम काही केले नाही. इंग्रजांचे या बेटावर प्रभुत्व स्थापन झाल्यावेळी येथे अस्सल पोर्तुगीजांची अवघी बारा कुटुंबे होती. बाकीचे शेकडो लोक कोळी, भंडारी वगैरे निरनिराळ्या बेटवजा कोरड्या जमिनीच्या तुकड्यांवर पिढ्यान्पिढ्या मच्छीमारी, किंवा लहानशा प्रमाणात शेती, व्यापार करून दिवस काढीत होते. पोर्तुगीज या बेटाचे मालक असल्याने ह्या अधिकाराचा सर्व प्रकारच्या सुखाच्या दृष्टीने जेवढा फायदा घेता

येईल तेवढा ते घेत होते. मुंबईच्या स्वामित्वकाळी पोर्तुगीजांचे पूर्वकालीन धैर्य-साहसादी बरेच स्पृहणीय गुण ऱ्हास पावले होते. अर्थात त्यांनी दळणवळणाच्या साधनांत नवी अशी भर कसलीच टाकली नाही. त्यातल्या त्यात एक जण मात्र आजतागायत मुंबईच्या संदर्भात प्रसिद्ध आहे. तो वैद्यकाचा अभ्यासी होता व त्यानिमित्त त्याने मुंबईच्या किल्ल्यात एक औषधी झाडाझुडपांची बाग तयार केली आणि आपल्या माहितीचे संवादरूप पुस्तक लिहिले. इंग्रज मालक या नात्याने मुंबईवर वावरू लागले त्या दिवसांत पूर्वोक्त बागेचा मागमूसही राहिलेला नव्हता. मुंबईच्या हकीकतीत त्याच्या ग्रंथाचे नाव मात्र उच्चारले जाते. या बागेचा धनी व ग्रंथाचा लेखक गारसिआ डा ओर्टा (Garcia da Orta) आणि त्याच्या ग्रंथाचे नाव 'संवाद' (cologulss...) असे अतिसंक्षेपाने सांगता येईल. भारतीय औषधी वनस्पती व त्यांचे गुणधर्म हा त्यांच्या ग्रंथाचा विषय पूर्वी सुचविला आहेच. मुद्रण-संस्काराने ओर्टाचे हे लिखित प्रथम गोव्यात १५६० साली प्रसिद्ध झाले. गोव्यास पोर्तुगीजांनी मुद्रणकला १५५६ मध्ये आणली, ही घटना पोर्तुगीज गौरवाची आहे. आपले प्रतिपाद्य येथे 'वाहन' आहे. त्याला धरून बोलावयाचे तर पोर्तुगीजांच्या काळातही मुंबईच्या संदर्भात याविषयी चकारदेखील आढळत नाही. इंग्रजांनी मुंबईच्या वास्तव्यकाळात 'पालखी' (शिबिका) या वाहनाचा सर्रास उपयोग चालविला होता. विशेष प्रसंगी बैलगाडीला ते मान देत असत. सुरतेस इंग्रजांचा मुक्काम असताना तेथेसुद्धा बैलगाडीचाच ते आदर करीत असत. मात्र उत्तम जातीचे व चपळ चालीचे देखणे बैल गाडीस जोडण्याचा त्यांचा रिवाज होता. मुंबईस गेल्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत पालखीचा वापर व पालखीचे प्रेम इंग्रजांच्या कारभारात टिकून होते. मोठ्या योग्यतेच्या पाहुण्यांना मुंबईच्या आसपास प्रेक्षणीय स्थळे पाहावयाची असतील तर तेथे जाण्यासाठी पालखी हे वाहन त्यांना सादर केले जात असे. पालखीवर इंग्रजांची एवढी का भक्ती होती याचा विचार करू लागल्यास भरपूर कोरड्या जागेचा अभाव यामुळे चाकांच्या वाहनांची चाल अशक्य हे कारण ध्यानात येण्याला हरकत नाही.

मुंबईवरील इंग्रजी सत्तेची पहिली चाळीस वर्षे लोटल्यावर—साधारणपणे १७१०-नंतर—रोग, परचक्रे इत्यादी संकटांचे भय बरेचसे ओसरले. बळ आणि आत्मविश्वास हे गुण वाढले तेव्हा काहीशा निर्भयपणाने इंग्रज प्रगतीचा मार्ग आक्रमू लागला. भूमीवर होगाऱ्या समुद्राच्या चढाईला लगाम घालून ती थोपविण्याचे साधल्यावर शहर वाढू लागले, त्यातून रस्ते निघू लागले आणि पालखी हे वाहन पुष्कळच वाढले. हे वाहन माणसांच्या पायांवर अवलंबून असल्याने आणि माणसांना बुद्धीची देणगी असल्याने पालखी वाहणारांना मार्गदर्शन दुसऱ्या माणसाने करण्याची गरज नव्हती. वाटेवर चिखल असो, पाणी असो, सपाटी किंवा चढउतार असो, दगडांचा अगर झाडाझुडपांचा अडथळा वाटेवर असो, पालखीवाहक ह्यातून पुढे जाण्याला, पालखीच्या भाडेकरूला आरामशीरपणे नेण्याला समर्थ असत. वाहनाच्या पशूला

आवरायला आणि इष्ट मार्गाने नेण्याला वेगळ्या माणसाची गरज असते, हे मुद्दाम सांगण्याची गरज नाही. ज्या काळातले हे वर्णन आहे, त्या काळात (सतरावे-अठरावे शतक) वाहन या दृष्टीने पालख्यांचा देशभर संचार चालत होता हे मात्र येथे नमूद करणे अवश्य आहे. पेशवाईमध्ये सरकारी बहुमानात 'पालखीपदस्थ' होणे हे एक मानाचे लक्षण होते, याचे स्मरण पुष्कळ वाचकांना आपोआपच होईल. पूर्वोक्त कालखंडात मुंबईचे जे भाग पाण्यातून बाहेर पडले नव्हते तेथील दळणवळणाला होड्या, नावा, वगैरे जलचर वाहनांचा उपयोग केला जात असे, याचेही इंग्रजांच्या ऐतिहासिक कागदांत दाखले आहेत. जमिनीवरील पाण्यातून इष्टस्थळी मुंबईकर होड्या-तरींच्या आधाराने आपले काम निभावून नेत, परंतु या बेटाच्या कडेस पसरलेल्या समुद्रातून कोकण किंवा गुजरात या प्रदेशांतील गावांना जावयाचे झाले तर मोठ्या—यांना आपण सरसकट जहाज म्हणू या—नौकांची कास धरावी लागे. इंग्रजांच्या फेऱ्या नेहमी व्यापारानिमित्त ईराणपर्यंत चालू असत. इंग्लंडहून येथवर हजारो मैलांचे, आफ्रिकेला वळसा घालून, समुद्रपर्यटन करण्यात सरावलेल्या लोकांना ईराण हे घरामागच्या परसासारखे वाटत असल्यास आश्चर्य वाटायला नको. येथे लक्षात ठेवायचे ते हे की मुंबई शहराच्या काही भागांत गेल्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत लोकांचे एक वाहन होडी हे होते. घोडे-गाड्यांचे अनेक प्रकार अस्तित्वात येऊन त्यांचा व्यवहार सुरू झाला तोही मागील शतकाच्या प्रारंभापासूनच; त्यापूर्वी बैलगाडी होती आणि ओझेवाल्याची हातगाडी असावी. घर आणि उद्योगव्यवसायाचे ठिकाण यांतील अंतर जसजसे वाढत गेले तसतशी वाहनांची गरज आणि विविधता वाढत जाणे साहजिकच आहे. दळणवळणात गतीचा वेग वाढविणे हादेखील एक उद्देश असतो. वेगाबरोबर सुख वाढविण्याचीही काळजी बाळगली जाते.

१९व्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंडात आगगाड्या निघाल्या व त्यांचा थोड्याच अवकाशात आपल्या देशात प्रवेश झाला. १८४३ पासून या वाहनासाठी लोखंडी रुळांचा रस्ता ठाण्यापर्यंत २१ मैल बांधण्याच्या कामाचा वैचारिक आणि व्यावहारिक खटाटोप सुरू होऊन ते काम १८५३ च्या एप्रिलपर्यंत पूर्ण झाले आणि त्या मार्गावरून भायखळा स्टेशनावरून पहिली गाडी मोठ्या समारंभाने संध्याकाळी पाच वाजता सुटली व आठच्या सुमारास परत आली. आगगाडीने देशातल्या प्रवासाचे नवे युग सुरू झाले म्हणून पहिली गाडी सोडताना समारंभ अवश्य होता हे कोणीही कबूल करील. समारंभाखातर त्या दिवशी रजा ठेवली होती. सेनापतीने लष्करी वाद्यवृंद रेल्वे कंपनीच्या सेवेस दिला होता, यामुळे ह्या वाद्यांनी गाडी सुटेतोवर त्यातील उतारूंची करमणूक चालविली होती. गाडीने स्टेशन सोडले, त्या क्षणी तोफांचे बारही सलामी-दाखल काढण्यात आले. या गाडीच्या धावण्याचा मुहूर्त साधण्यासाठी हजारो लोक स्टेशनास्टेशनावर गर्दीने उभे होते. तिच्या वेगामुळे आश्चर्याने भारावून हा ठिक-ठिकाणचा जमाव टाळ्यांच्या गजराने दिशा दणाणून सोडीत असे. या जनतेमध्ये

वरीच वर्षे स्वदेशास जाण्याची सवड न मिळाल्यामुळे सदर नवे वाहन ज्यांनी पाहिले नव्हते असे इंग्रजही उपस्थित होते.

गो० ना० माडगावकरांच्या 'मुंबईचे वर्णन' या मुंबईसंबंधाच्या आद्य (१८६३) मराठी ग्रंथातील पुढील उतारा या गाडीबाबत काही अधिक प्रकाश टाकणरा आहे :

"या गाडीमध्ये मुंबईचे गव्हर्नर आदिकरून मोठमोठाले हुद्देदार व सरकारी कामदार इंग्रज व दुसरे शेट सावकार मिळोन चारशे गृहस्थ बसले होते. गाडीस तीन वाफेचीं यंत्रें (इंजिने) लाविलीं होतीं, व वीस मोठे रथ (डबे) जुंपिले होते." (पान २३१, आ० दु०) तेव्हा आगगाडीच्या मराठी वाङ्मयात इंजन, डबा हे शब्द रूढ झाले नव्हते. ही गाडी बोरीबंदरावरून सुटली अशी माडगावकरांची माहिती आहे. ती भायखळ्याहून निघाली असा वृत्तांत तेव्हाच्या गव्हर्नराच्या (लॉर्ड फॉकलंड यांच्या) पत्नीने लिहिलेल्या 'चौ–चौ' नामक पुस्तकात आहे. जेथून गाडी चालू झाली त्या स्थळाचे नाव तिथे भायखळा हे दिलेले आहे. (खंड २, पान ४५)

ही गाडी चालू करणाऱ्या कंपनीचे नाव 'ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे' असे होते. या लांबलचक नावाचा संक्षेप 'जी० आय० पी०' हा पुढे रूढ झाला. हा पहिला लोखंडी रस्ता चालू होणार, हा विषय लोकांत चर्चिला जाऊ लागला तेव्हा सामान्य जनता नानाविध दुरारोप करीत होती. ही नव्या गाडीची युक्ती येथील संपत्ती लुटण्याच्या हेतूने इंग्रजांनी स्वीकारली असून या गाडीत जातीचे अभिमानी बसणार नाहीत, या कल्पनेचे तात्पर्य असे या कामी खर्च होणारे द्रव्य वाया जाईल आणि हा सारा खटाटोप मोडून कंपनीचे दिवाळे वाजणार. यापेक्षा भयंकर आरोप नरबळी दिले जाणार अशा स्वरूपाचा होता. यामुळे लोकांत काही काळ दहशत बसली होती, तथापि लोखंडी रस्त्याचे काम विनधोक चालू राहिलेच. दहापंधरा वर्षांत या रस्त्याचे जाळे देशभर पसरले. जी० आय० पी०चा हा पहिला रस्ता ठाणे, कल्याण, कर्जत या मार्गाने सह्याद्रीची भिंत ओलांडून पुण्यास पोचला. सह्याद्रीच्या ज्या भागातून लोखंडी रस्ता नेला आहे त्या भागाचे नाव 'भोरघाट' हे सर्वांच्या परिचयाचे आहे. १८ व्या शतकाच्या शेवटच्या पंचविशीत इंग्रज-मराठ्यांच्या लढाया याच घाटात झडल्या होत्या. घाटातली लोखंडी सडकेची चढण १८३१ फूट उंचीची आणि १५ मैल लांबीची आहे. घाटातली सडक १८६३ झाली पुरी होऊन ती गाडीच्या धावांना मोकळी झाली. या चढणीच्या शेवटच्या टप्प्यावर एक 'रिव्हर्सिंग' (गाडी मागे फिरविणारे) नावाचे स्टेशन होते. तेथे उतारूंची चढ-उतर होत नसे. तरी गाडी थांबायची. मागले इंजन पुढे जोडायचे, मग गाडी खंडाळा स्टेशनकडे किंवा मुंबईच्या दिशेने चालू लागायची व एवढ्यासाठीच गाडीचा मुक्काम तेथे व्हायचा. घाटात मोठाले कडे फोडून जे बोगदे काढले आहेत, त्यांची संख्या २६ आहे. रिव्हर्सिंग येथे ज्या ठिकाणी गाडी उभी राहत असे त्या ठिकाणाखाली एक मोठा पूल होता. तो अद्यापि उभा आहे व तीच काय ती एक रिव्हर्सिंगची साक्ष आज आहे. १९२६

मध्ये खंडाळा स्टेशनाजवळ एक नवा बोगदा बांधून रिव्हर्सिंगची गरज जी० आय० पी० कंपनीने कमी केली. मुंबईकडून पुण्यास जाताना गाडीला घाटानिमित्त मागेपुढे याप्रमाणे दोन इंजने मात्र जोडण्यात येतात.

येथील विवेचनाने वाचकांनी संभ्रमात पडू नये म्हणून जी० आय० पी० रेल्वेचा आणखी एक सह्याद्रीतला विक्रम सांगितला पाहिजे. ठाण्याहून गाडी कल्याणला सरकली आणि तेथून नासिकच्या दिशेकडे वळून तिने आसनगाव गाठले. मग या बांधकामाच्या मुख्य इंजिनियराची नजर थळ घाटावर गुंतली. त्याने तत्काल थळ घाटाला पालाणून खानदेशात घुसण्याची योजना लिहून काढली व रेल्वे कंपनीच्या वरिष्ठांसमोर ठेवली. ती योजना संमत होताच त्या कामास त्याने हात घातला. भोरघाटातील योजना त्याने नंतर आपल्या वरिष्ठांच्या नजरेस आणली. भोरघाटाचे तिकडे काम चालू असतानाच इकडे थळघाटात लोखंडी रस्ता बांधला जात होता आणि त्या रस्त्याची मजल कसाऱ्यास १८६१ सालच्या जानेवारी पहिल्या तारखेस पोचली. खरा थळघाट कसाऱ्यापुढे आहे. भोरघाटातली रस्ताबांधणी १८६३ मध्ये पुरी झाली तर थळघाटाच्या कामाची समाप्ती मात्र १८६५ पर्यंत लांबली. भोरघाटाप्रमाणे थळघाटालादेखील लोहमार्गानिमित्त विवरे पाडली आहेत. थळघाटाची उंची भोरघाटाच्या उंचीच्या मानाने जवळजवळ निम्मी आहे म्हणजे १७२ फूट आहे. या दोन्ही कंपन्यांची कार्यालये व कारखाने मुंबईतच आहेत. बी० बी० सी० आय०चा एक कारखाना माळवा आणि गुजरात या दोन प्रदेशांच्या हद्दीवर दोहद येथे आहे. सांप्रत भारतीय स्वराज्यात जी०आय०पी०ला मध्य रेल्वे आणि बी०बी०सी०आय०ला पश्चिम रेल्वे याप्रमाणे संज्ञा आहेत. मुंबईच्या विस्तारात सामावलेल्या शाखा अगर उपनगरांतील उतारूंसाठी लोकल (स्थानिक) या नावाने कितीतरी गाड्यांची मुंबईस दिवसभर येजा चालू असते. समुद्रकाठी बंदर भागांत परदेशातून येणाऱ्या मालाची चढउतर सुकर होण्यासाठी पोर्टट्रस्टची रेल्वे निराळी आहे. तिची जी० आय० पी०ची हद्द दक्षिणेस रायचूर, पूर्वेस नागपूर आणि उत्तरेस जबलपूर याप्रमाणे होती. मध्य व पश्चिम लोखंडी सडकांच्या ब्रॉड (रुंद) व मीटर (अरुंद) अशा दोन तऱ्हा आहेत. रुंद रस्त्याच्या दोन रुळांतले अंतर साडेपाच फूट तर मीटर (अरुंद) मापाच्या सडकेच्या रुळांतील अंतर जेमतेम चार फुटांचे हे ठरलेले आहे. मीटरहून अरुंद असलेले रस्तेही क्वचित बांधलेले दृष्टीस पडतात.

आगगाड्यांनी मुंबईचा देशांतल्या दूरदूरच्या शहरांशी संबंध जोडला आणि लोकल गाड्यांनी शहरातल्या बऱ्याच उपनगराची रहदारी सुखाची व सुगम केली हे खरे असले तरी शहरातल्या शहरात इतर वाहनांची वाढ चालू होती. सतराव्या-अठराव्या शतकातल्या पालख्यांच्या आणि बैलगाड्यांच्या जोडीने घोडेगाड्यांचे बग्गी, फैटन वगैरेसारखे भिन्नभिन्न प्रकार अवतरून तेही खासगी व सार्वजनिक गरजूंच्या वाहतुकीला साह्य करीत होते. त्यांतले व्हिक्टोरिया या नावाचे एक वाहन चालू

शतकातही पुष्कळ वर्षे जीव धरून होते. आजच्या मोटारी मुंबईच्या रस्त्यावर वाढत्या संख्येने धावू लागल्या तेव्हापासून व्हिक्टोरिया हे वाहन लोपत चालले आणि अलीकडे तर ते फारसे दृष्टीसही पडेनासे झाले आहे.

जी० आय० पी०चा लोखंडी रस्ता यशस्वी होताना पाहून इंग्लंडच्या धनिकांना हिंदुस्थानात असे रस्ते बांधून आपली व हिंदी जनतेची सोय करण्याची हौस उत्पन्न झाली. जी० आय० पी०च्या मागोमाग बॉंबे बरोडा सेंट्रल इंडिया रेल्वे ही कंपनी विलायतेस अस्तित्वात येऊन तिचे लोखंडी रस्ताबांधणीचे काम गुजरातमध्ये सुरू झाले. हा रस्ता एका मोठ्या ठिकाणाहून दुसऱ्या मोठ्या ठिकाणापर्यंत सरळ बांधीत नेलेला नाही. हा तुकड्यातुकड्यांनी दक्षिणोत्तर तयार करीत करीत शेवटी मुंबईस आणून भिडविला. १८५५ साली बी० बी० सी० आय० कंपनीला पार्लमेंटाने मंजुरी दिली व ताबडतोब हिंदुस्थानातील कंपनी सरकारशी करारमदार उरकून १८५६ मध्ये कामाची मुहूर्तमेढ रोविली. गुजरातच्या अमरोळी ते अंकलेश्वर हा पहिला पावणे-एकोणतीस मैलांचा रस्ता सिद्ध होऊन १८६१ च्या जानेवारीमध्ये त्यावर आगगाड्यांची रहदारी चालू झाली. हा पहिला रस्ता तयार होत असता बडोद्याच्या दक्षिणेस स्वतंत्रपणे लोखंडी सडक बांधली जात होती. आणि ते वर्ष उलटण्यापूर्वी बलसार ते बडोदा (अंतर १२३ मैल) यांमध्ये दळणवळण सुरू झाले. अशा रीतीने १८६४-पर्यंत दक्षिणेत मुंबई व उत्तरेस अहमदाबाद ही दोन शहरे एकमेकास जोडली गेली. सख्ख्या भावंडांप्रमाणे एकामागोमाग जन्मास आलेल्या या दोन आगगाड्या ज्या दोन प्रदेशांतून जातात त्यातील भेद सहज लक्षात येण्याला हरकत नाही. जी० आय० पी०च्या दोन्ही घाटमार्गांवर सह्याद्री हा पर्वत उभा आहे तर बी० बी० सी० आय०ला गुजरातमधल्या काही थोड्या नद्या, वसईची खाडी वगैरे जलप्रवाह ओलांडावे लागतात. घाटाच्या डोंगरात जसे बोगदे पाडावे लागले तसे नर्मदा, तापी वगैरे मोठ्या नद्यांवर मोठ्या लांबीचे पूल बांधावे लागले. नर्मदेचा पूल तर उण्यापुऱ्या एक मैल लांबीचा आहे.

दळणवळणाची याप्रमाणे सोय करूनही मुंबईतल्या रहदारीस ती पुरी पडेना तेव्हा ट्रॅमगाड्यांची कल्पना निघाली व तिच्याबद्दल म्युनिसिपालटी, सरकार व तिच्याकरिता द्रव्य वेचू इच्छिणारे भांडवलदार यांच्यात विचारविनिमय सुमारे दहा वर्षे सुरू होता. तो संपून १८७४ मध्ये येथे ट्रॅमगाड्यांची वाहतूक मोठ्या रस्त्यांवरच नव्हे तर गल्लीबोळांतूनदेखील चालू झाली. ही गाडी गरिबांचे वाहन मानली जात होती. गाडीच्या धावण्याचा पल्ला कितीही मोठा असला तरी अर्ध्या-दोन आण्यांत उतारूंचे काम भागे. इतर सर्व वाहने—एक बैलाचा रेकला किंवा धमनी सोडून—ट्रॅमच्या मानाने पुष्कळच महाग दराची होती. ट्रॅम हे वाहनसुद्धा लोखंडी रस्त्याचेच भावंड. पण ते ओढण्यासाठी घोडे जुंपावे लागत हा ट्रॅमगाडी व आगगाडी यांत मोठा फरक होता. प्रस्तुत गाड्यांच्या रहदारीची वेळ सकाळी साडेसहापासून रात्री

साडेअकरापर्यंतची ठरलेली होती. प्रारंभी एक घोड्याची व मागून दोन घोड्यांच्या ट्रॅम अस्तित्वात आल्या. उतारूंच्या बाजू उघड्या असत; नंतर त्या बंद केल्या गेल्या. घोड्यांच्या ट्रॅमगाड्या १९०७ पर्यंत आपले काम बजावीत होत्या व त्यासाठी जवळ-जवळ ९०० घोडे दोन तबेल्यांत विभागून ठेवलेले असत. एक तबेला राणीच्या (आताचे जिजामाता उद्यान) बागेसमोर भायखळा भागात होता तर दुसरा तबेला कुलाब्यास व तेथेच कंपनीच्या कारभाराचे केंद्र होते. ट्रॅमगाड्यांना जन्म देणाऱ्या कंपनीला प्रारंभी भांडवल मिळविण्याच्या संबंधात वानवा उत्पन्न झाल्यामुळे तिने न्यूयॉर्कहून (अमेरिकेतून) भांडवल संपादन केले. १९०७ च्या मे महिन्यात विजेच्या शक्तीने ट्रॅमगाड्या चालू करण्यात आल्या. घोड्यांऐवजी एक दांडी गाडीच्या छपरास लावलेली असून ती वरील विजेच्या तारेस जोडलेली असे आणि तिच्याद्वारे गाडीला विजेचा पुरवठा होत असे. विजेच्या ट्रॅमगाड्या कुठे थांबाव्या यासाठी निश्चित जागा होत्या व तेथे तशा पाट्या लावलेल्या असत. घोड्यांच्या ट्रॅमगाड्यांना अशी सोय नसल्याने उतारूंनी आपला हात उभारून 'सबूर' म्हणावे आणि आपल्या मर्जीस येईल तेथे ट्रॅम थांबवावी, असा प्रकार घोड्यांच्या काळात असल्याचे काही वर्षांपूर्वी वृद्ध मुखांतून ऐकायला सापडत होते.

पत्रव्यवहार हे मानवी दळणवळणाचे प्राचीन साधन आहे, हे मुद्दाम सांगायला नको. त्याचे तुरळक उल्लेख प्राचीन संस्कृत ग्रंथांतून दृष्टीस पडतात. शाकुंतल नाटकात शकुंतला दुष्यंताला पत्र लिहिते, असा प्रसंग दाखविला आहे. भागवतपुराणात रुक्मिणी श्रीकृष्णाला पत्र पाठविते अशी लोकविख्यात कथा आहे. आणखी अशी पुष्कळ उदाहरणे दाखविता येतील. पत्रांच्या एकमेकांतील देवाणघेवाणीच्या व्यवस्थेला सांप्रत टपाल, डाक, पोस्ट, वगैरे नावांनी ओळखतात. ऐतिहासिक काळात टपाल सरकारी पातळीवर साऱ्या देशात चालू होते. त्या पातळीच्या आश्रयाने खासगी पत्रांची थोडीफार नेआण होत असे. ही नेआण करण्याचे काम करणाऱ्या माणसांना जासूद, हरकारा, कासीद, वगैरे नावे होती. इंग्रजांची मुंबई बेटावर हुकूमत स्थापन झाल्यावर त्यांनीही टपालाकडे लक्ष पुरविले आणि गेल्या (एकोणिसाव्या) शतकात सर्व जनतेच्या पदरात टपालाचा फायदा पडेल अशा तरतुदी अमलात आणल्या. याला बहुतांशी आगगाडी हे कारण आहे. या वाहनाने टपालाची नेआण सुरक्षित, सुकर व जलद होऊ लागली. डाकेच्या नेआणीची जबाबदारी सरकारने पतकरल्यावर पत्रांची लांबीरुंदी आणि वजन यासंबंधाचे नियम जारी करून डाक जेथे जावयाची तेथील अंतराप्रमाणे त्यांच्या खर्चाचे कोष्टक बसविले. इंग्रज हिंदुस्थानात कितीही उलाढाली करीत असला तरी त्याचे लक्ष आपल्या घराकडे (इंग्लंडकडे) वळलेले असे; कारण तेथून त्याच्या येथील कारभाराची सूत्रे हलविली जात होती. यामुळे इंग्लंडला अग्रस्थान देऊन तो दळणवळणाची नवीनवी साधने योजीत होता. पहिले साधन शिडाची जहाजे होती व आफ्रिका खंडाला फेरा घालून हिंदुस्थान गाठणे त्याला

प्रात असल्याने प्रवास चारसहा महिन्यांइतक्या दीर्घ अवधीचा असे. नंतर गेल्या शतकात शिडे मागे पडत जाऊन त्यांच्याऐवजी जहाजे वाफेच्या शक्तीने समुद्र पार करू लागली. आफ्रिका खंडाचा फेरा चुकवून आशिया खंडातून युरोप-इंग्लंडला पोचण्याचा मार्ग निश्चित करण्यात आला. हिंदुस्थानातून एडन, सुएझ, 'तांबडा समुद्र', इजिप्त, युरोप व शेवटी इंग्लंड याप्रमाणे नवा खुष्कीचा मार्ग आखून त्यावरून हिंदी टपाल विलायतेस आणि इकडे जाऊयेऊ लागले. समुद्र सोडून इजिप्तवरून टपाल जाऊ लागले. समुद्र-जमीन हा थारेपालट करण्यात काही वेळ मोडून इंग्लंड गाठायला जो विलंब लागे तो सहन करणे इंग्रजांना अपरिहार्य होते. काही मजल पाण्याची तर काही जमिनीची, अशी चढउतर १८६९ मध्ये सुएझचा कालवा उघडल्यापासून कायम बंद झाली व इतर आनुषंगिक चिंताही विराम पावल्या. मार्गात टपाल गहाळ होण्याचे भय असल्यामुळे त्यातील प्रत्येक कागदाच्या मजकुराची नक्कल तयार करून ती निराळी पाठवावी, अशी योजना एकेवेळी अमलात होती. सुएझ कालव्यामुळे इंग्लंडची डाक दर पंधरवड्याला मुंबईस वाफेच्या शक्तीने पोचू लागली. पी० अँड ओ० कंपनीच्या आगबोटीने टपालाची नेआण स्वराज्यप्राप्तीपर्यंत अव्याहत चालू होती. ही टपालाच्या वाहतुकीची हकीकत झाली. उतारूंसाठी अगर मालासाठी इंग्लंडखेरीज इतर देशांच्या आगबोटी पुष्कळ होत्या. इतर देशांत जपाननेही मानाची जागा मिळविली होती.

वारा, पाणी, वाफ (अग्नी) या सृष्टीतील शक्ती मनुष्याने याप्रमाणे वेठीस धरल्या तरी वीज ही शक्ती माणसाच्या सेवेबाहेर राहिली होती. गेल्या शतकात झालेल्या विज्ञानाच्या विस्ताराने ती शक्तीही काबूत आणून तिच्याकडून घेतल्या जाणाऱ्या कामांत एक काम वातमीदाराचे आहे. ह्या कामगिरीला सामान्य भाषेत तारायंत्र असे म्हणतात. आगगाडीच्या बरोबर तारायंत्रही सुरू झाले व त्याचा पसारा वाढत जाऊन आता विजेच्या सामर्थ्याला संपूर्ण पृथ्वी पुरेनाशी झाली आहे. मुंबईहून एखाद्याने मनात आणल्यास तो तारायंत्राच्या साह्याने आपले हृद्गत अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया इत्यादी पूर्व, पश्चिम दिशांच्या देशांतील स्वकीयांना पाच मिनिटांत किंवा त्याहूनही कमी वेळात कळवू शकतो. हा दूर-लेखन (टेलिग्राम-ग्राफ) चा चमत्कार झाला.

याच्याच जोडीचा दुसरा चमत्कार 'दूरध्वनी'चा असून त्यानेदेखील सारा इहलोक व्यापला आहे. त्याला टेलीफोन असे इंग्रजीत नाव असून दूरध्वनी हा त्याचा शब्दशः अनुवाद आहे. मुंबई शहरात प्रस्तुत यंत्राचा उपयोग १८८० पासून होऊ लागला. त्या घटनेची आता शताब्दी अवघ्या दोन वर्षांवर आली आहे. या अवधीत दूरध्वनीची प्रगती किती झाली आहे, याची कल्पना पृथ्वीतल आणि अंतराळ ही दोन्ही ठिकाणे दूरध्वनीने सारखीच वेढली आहेत, या एका वाक्याने येऊ शकेल. अलीकडे विमानाने चंद्रलोक पादाक्रांत करण्याचा जो प्रयोग अमेरिकेने केला त्यात दूरध्वनीला अंतराळाची मर्यादा नाही याची प्रचीती आली. लाखो मैल अंतरावर चंद्रलोकी पोचलेले वैमानिक तेथून आपली हालहवाल इहलोकी अमेरिकेत पाठवीत होते, याचा नव्याने

वाचकांना परिचय करून द्यायला नको. अमेरिकेने चंद्रलोकाला पाय लावला तसाच प्रयोग इतर लहान ग्रहांवर जाण्याचा रशिया हा देशही करीत आहे. चंद्रलोकापर्यंत दळणवळण चालू करावे, असा आत्मविश्वास मानवात उत्पन्न झाला याचे बीज गेल्या शतकात ज्याचे गुणधर्म उघडकीस आले असा एक तेलासारखा खनिज पदार्थ होय.

हा पदार्थ फार प्राचीन काळापासून माणसाला माहीत असून माणूस त्याचा थोडा उपयोगही करीत होता. हल्ली तो पदार्थ पेट्रोलियम या नावाने सर्व जगात प्रसिद्ध आहे. पेट्रोल हा पेट्रोलिअमचा संक्षेप. याने स्थलचरवाहनांत विलक्षण फेरफार घडवून आणले. मुंबईच्या वाहनांत 'मोटर' या नव्या वाहनाची नोंद या (विसाव्या) शतकाच्या अगदी सुरुवातीला (१९०१) सापडते. पेट्रोल हे मोटरीचे बळ आहे. मोटरने जनावरांच्या वाहनांची रहदारी इतिहासजमा केली आहे. पेट्रोलने सुरवातीस मोटरगाडी या भूचर वाहनाची दौड इहलोकी आरंभली. त्यामागून पंधरावीस वर्षांच्या आत आकाशातून विमानांची उड्डाने दिसू लागली. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या वेळी (१९१४-१९१८) जर्मनीने विमाने इंग्लंडवर हल्ला करण्यासाठी पाठविली. झेपलिन हे तत्कालीन जर्मन विमान आजही पुष्कळांना आठवेल. ते युद्ध १९१८ च्या शेवटी झाले; पण विमानांचा संचार थांबला नाही; उलट विमानविद्या विकसित होत जाऊन १९१८ नंतर वीस वर्षांच्या आतबाहेर जर्मनीने दुसरे जागतिक महायुद्ध पेटविले तेव्हा त्या युद्धातील प्रमुख संहारक साधन विमानच ठरले. त्यासाठी सर्व लढाऊ देशांतून लढाऊ विमानांचे कल्पनातीत उत्पादन होऊ लागले. लढाईतील शेवटची गोळी उडाली की तिच्यासाठी तयार केलेले सर्व सामान कवडीमोलाने विकले जाते. हा गेल्या दोन्ही महायुद्धांचा अनुभव आहे.

पहिले जागतिक महायुद्ध १९१८मध्ये विराम पावले आणि १९१९ साली मुंबईत पहिले विमान आले. त्याचा मुक्काम विलेपार्ले व जुहू यादरम्यानच्या मोकळ्या जागी होता. ते पाहण्यासाठी व जमल्यास त्यात बसून विमानाच्या भरारीचा जातीने अनुभव घेण्यासाठी मुंबई शहरांतून दुपारच्या वेळी शेकडो आबालवृद्ध स्त्रीपुरुष त्या ठिकाणी जात होते. प्रत्येक उतारूकडून तीन रुपये भाड्यादाखल घेऊन अर्धा तास विमानातून फिरवून आणीत. दोनतीन महिन्यांनी हा विमानांचा बाजार हटला. योगायोग असा की पुढे विमानतळ बांधण्यात आला तो विलेपार्ले येथेच बांधला गेला. याप्रमाणे मुंबईच्या दळणवळणात आणखी एका वाहनाची भर पडली.

विजेचा मानवी दळणवळणाला गेल्या शतकापासून कसा उपयोग होत आहे, याची काही ठळक उदाहरणे मागे निवेदन केली. विजेने संदेश पाठविण्याचा प्रयोग यशस्वी रीत्या गेल्या शतकाच्या मध्यात सुरू झाला, त्या मागून सुमारे पंचवीस वर्षांनी १८८० साली टेलीफोनची कामगिरी मुंबई शहरात अस्तित्वात आली. ही कामगिरी सरकारच्या विद्यमाने होण्याऐवजी खासगी कंपनीमार्फत चालू झाली.

माणसाला टेलीफोनच्या आधाराने घरबसल्या केवळ शहरातल्या शहरात दूरदूरच्या आप्तेष्टांशी संभाषण करता येते. आपल्या व्यवहाराची विचारपूस करण्याची सवड टेलीफोनच्या साधनाने झाली आहे. टेलीफोनचे फायदे मुद्दाम तपशीलवार ग्रथित करावे इतके हे साधन जनतेला अपरिचित राहिलेले नाही. ज्यांच्या घरांत टेलीफोनचे यंत्र आहे, त्यांच्या घरांतील बायकामुले, नोकरचाकर अशा सर्व लहानथोरांना त्याच्या उपयोगाची माहिती असते. त्याच्या उपयोगाला स्थळकाळाचे बंधन नाही.

हातगाडी हा माणसांनी चालविण्याचा दळणवळणाचा एक प्रकार आहे. थोडेफार ओझे थोड्या अंतरावर पोचवायचे असेल तेव्हा हे साधन उपयोगी पडते. मुंबईत शेकडो स्त्रीपुरुष आपल्या कार्यालयात ठरल्यावेळेस पोचण्यासाठी सकाळी घरून थोडेसे खाऊनपिऊन निघतात. त्यांचे दुपारचे भरपेट जेवण हमालमंडळी मागून मध्यान्हीच्या सुमारास नियमाने त्यांच्या कार्यालयात पोचवितात. त्यासाठी हमालांना दरमहा वेतन दिले जाते. हे दुपारच्या अन्नाचे भरलेले डबे ज्याच्या त्याच्या वरून ठरल्या वेळी हमाल लोक उचलून नेतात. हे ठिकठिकाणाहून गोळा केलेले अन्नाचे डबे हातगाडीवर व्यवस्थित लादून ज्याच्या त्याच्या कामाच्या जागी सुरक्षित पोचवितात. नंतर डबे मोकळे झाल्यावर ते डबे जेथून आणले तेथे नेऊन टाकतात. ही अन्नाच्या डब्यांची उठाठेव मुंबईतच नव्हे तर उपनगरांतूनदेखील चालू असते. सांप्रत कार्यालयांतूनसुद्धा दुपारी जेवायला मिळण्याची सोय करण्यात आलेली आहे.

मुंबईत गेल्या शतकात ज्याचे त्याने आपल्या पायांचे बळ वापरून चालवावे असे 'ब्रायसिकल' नावाचे एक सुटसुटीत आटपशीर वाहन बरेच लोकप्रिय होते. आता ते शहरात फारच क्वचित पाहायला सापडते. अनेक तऱ्हांची रहदारी वाढल्यामुळे रस्त्यावरील हे लहानसे वाहन चालवायला कूस सापडू नये अशी सध्या दाटीची रहदारी आहे. या वाहनाला 'दुचाकी', 'पायगाडी' अशी काही देशी नावे आहेत. खेड्यातूनदेखील या वाहनाचा संचार चालताना दृष्टीस पडतो. या दुचाक्या पेट्रोलने चालण्याची योजना अमलात आल्यापासून तिच्याकडे ऐपतदारांचे लक्ष अधिक आहे.

प्रकरण आठवे

लोकांचे सण, उत्सव

मनुष्य स्वभावतः उत्सवप्रिय आहे, हे कालिदासाचे सुभाषित पृथ्वीवरील यच्चयावत मानवसमाजास लागू पडणारे व त्रिकालाबाधित आहे. ज्यांना रानटी म्हणतात त्या शेकडो वर्षे रानात वृक्षपशूंबरोबर वाढणाऱ्या मानवसमूहांतसुद्धा जर सण किंवा उत्साह साजरे होत असतात, तर ज्यांना काही धर्म आहे, दीर्घकालीन पूर्वपरंपरा आहे, त्यांच्यात सणउत्सवादी प्रसंग पाळले जावे हे स्वाभाविक आहे. मुंबई शहरात अनेक धर्म, अनेक भाषा एकवटल्या आहेत, त्या सर्वांचे सणही त्यांच्याबरोबर या देशात येऊन स्थायी झाले आहेत आणि ज्याचा सण तो समाज आपल्या परंपरागत रिवाजाप्रमाणे संभाळीत असतो. भरतखंडात प्रमुख समाज दोन आहेत : हिंदू व मुसलमान. ही दोन्ही नावे जगजाहीर आहेत. स्वराज्य येण्यापूर्वी येथे हिंदु-मुसलमानांमधील दुजाभाव विकोपास गेल्यामुळे, ज्या प्रदेशांत मुसलमानांची संख्या हिंदूंच्या तुलनेने अधिक होती ते हिंदुस्थानातून वेगळे करून त्यांचे पश्चिम (पंजाबचा काही भाग तसाच बंगालचा काही भाग) व पूर्व बंगाल हे एकत्र करून त्यांचे 'पाकिस्तान' हे नवे राज्य निर्माण झाले. या प्रदेशांची आपसात बरीच धुसफूस चालता चालता त्यांच्यात भयंकर लढाई माजून बंगालच्या मुसलमानांनी विजय मिळाल्यावर जे राज्य स्थापिले त्याला 'बांगला देश' हे नाव दिले. सारांश, मुसलमानांच्या सणांची चर्चा येथे नको असे कोणी म्हणतील, तर त्याला उत्तर असे आहे की पाकिस्तानात येथील पुष्कळ मुसलमान गेले असले तरी हिंदुस्थानातील त्यांची संख्या उपेक्षणीय नाही. यामुळे त्यांच्या सणांचा विचार टाळणे अन्यायाचे ठरेल.

प्रत्येक धर्माच्या परंपरेत ज्या काही चिरस्मरणीय घडामोडी होऊन जातात त्यांचे निष्ठामूलक परिपालन या प्रकारला स्थूलपणे 'सण पाळणे' असे म्हणता येईल. प्रत्येक सणाला काही कर्तव्ये आचरावी लागतात. प्रत्येक समाजातील सणाचा अंतिम हेतू नेहमीपेक्षा निराळ्या खाद्यपेयांचे सेवन करणे हाच प्राधान्याने दिसून येतो. मुसलमानांत 'रमजान' या नावाच्या महिन्यात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपोषण करावे लागते असा नियम आहे. या उपोषणाचे ज्या दिवशी पारणे असेल त्या दिवसाला 'रमजान ईद' हे नाव असून तो दिवस आनंदात घालविण्याचाही

मुसलमानांचा आचार आहे. अशीच तऱ्हा एकट्या इस्लामियांमध्येच नसून जगातील सर्व धर्मांच्या अनुयायांत पाहायला सापडते. त्याला प्राचीन बुद्धधर्मसुद्धा अपवाद नव्हता. हिंदू धर्मात सणांची रेलचेल असून हिंदूंची संख्या इतर समाजांहून येथे अधिक आहे, म्हणून त्यांच्या सणांची माहिती प्रथम सादर करून मग इतर प्रमुख समाजांच्या सणांकडे वळणे बरे.

हिंदू सणांकरिता त्यांचे पंचांग सहज चालू लागल्यास ज्यात सण नाही असा एकदेखील महिना सापडणार नाही. चैत्र हा पहिला महिना. त्याचा पहिला दिवसच 'पाडवा' या नावाचा सण आहे. वर्षारंभाचा दिवस प्रायः सर्व धर्मांनी मंगल मानला आहे. ख्रिस्ती धर्मात वर्षारंभाचा दिवस १ जानेवारी हा सणासारखा मानला जातो. यामुळे शालिवाहन शकारंभाचा चैत्री प्रतिपदा हा दिवस सण गणला जावा याचे आश्चर्य वाटायला नको. चैत्रातच रामनवमी व हनुमानजयंती (पौर्णिमा) याप्रमाणे आणखी दोन सण आहेत. वैशाखात अक्षय्य तृतीया, ज्येष्ठात वटपौर्णिमा—हा प्रामुख्याने बायकांचा—सण आहे; आषाढात गुरुपौर्णिमा-व्यासपूजा, श्रावणात कृष्णाष्टमी आणि नारळी अथवा राखी पौर्णिमा, भाद्रपदात गणेशचतुर्थी, अनंतचतुर्दशी. चतुर्थीला गणेशाची घरोघरी स्थापना होऊन चतुर्दशीला त्या मूर्तींचे समुद्रात विसर्जन केले जाते. गणपतीच्या मागून घरात येणाऱ्या गौरी गणपतीच्या समागमेच विसर्जन पावतात. आश्विनात शुक्ल दशमी हा विजयादशमीचा अर्थात दसऱ्याच्या सणाचा दिवस. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, सुवर्णवितरण या आचारांचे माहात्म्य आहे. नंतर त्याच महिन्याच्या पौर्णिमेला कोजागिरी म्हणतात आणि तो रात्री साजरा करावयाचा असतो. इष्टमित्रांना घरी बोलावून गच्ची किंवा अंगण असल्यास तेथे सर्वांनी चांदण्यात बसून दूध प्यावयाचे, सवड असली तर पत्ते, बुद्धिबळे, सोंगट्या वगैरे खेळांत वेळ घालवायचा हा त्या सणाचा एक विशेष आहे. अश्विनअखेरीस दिवाळीच्या सणाला प्रारंभ होतो. आणि कार्तिक शु० २ भाऊबिजेला तो सण संपतो. या सणाची सुरुवात आश्विन कृष्ण १४ नरकचतुर्दशीला बरोबरी अभ्यंगस्नानाने होत असते. अमावास्येला लक्ष्मीपूजन व्हावयाचे म्हणून त्या दिवशी संध्याकाळी दुकानदार, व्यापारी नवीन कीर्दखतावण्यांची पूजाअर्चा करतात. पुढील दिवस कार्तिकाच्या प्रतिपदेचा. येथून संवत कालगणनेचा वर्षारंभ होतो. कार्तिक शु० २ म्हणजे भाऊबीज. भावाने बहिणीकडे जावयाचे, बहिणीने त्याला खाऊपिऊ घातल्यावर ओवाळायचे आणि त्या वेळी भावाने तिला काही द्रव्याची ओवाळणी द्यावयाची, असे भाऊबिजेचे विधी आहेत. कार्तिक १५ हा त्रिपुरी पौर्णिमा नावाचा सण आहे. मार्गशीर्षात पौर्णिमेच्या रात्री दत्तजन्मोत्सवाचा उत्सव दत्तभक्त पार पाडतात. पौषात मकरसंक्रांत हा सण असून तो जानेवारीच्या १४ तारखेस साजरा केला जातो. यानंतर माघ महिन्यात कृष्णचतुर्दशी हा दिवस महाशिवरात्रीचा. हा उपोषणाचा सण आहे. फाल्गुनातील पौर्णिमा हा दिवाळीसारखा होळीशिमगा नावाचा चारपाच

दिवस चालणारा सण असून यामध्ये पूर्वी रस्त्यातून जाणाऱ्यायेणाऱ्यावर चिखलफेक व त्यांच्याबद्दल अभद्र शिवीगाळ आणि बोंबाबोंब केली जात असे ती आता मुंबई शहरात जवळजवळ बंद पडल्यासारखी झाली आहे. चिखलफेकीच्या प्रसंगाला 'धूलिवंदन' असा प्रौढ, संभावित शब्द पंचांगातून दृष्टीस पडतो. चिखलफेक याने त्याचे खरे स्वरूप उघड होत नाही. त्यात सर्व अश्लील, बीभत्स व जुगुप्साकारी गोष्टींचा समावेश असे. पूर्वी एकदा या सणात 'वरघोडा' नावाचा खेळ चालत असे. लग्नातल्या वरघोड्याचे ते विडंबनच होते. एकाने खऱ्याखुऱ्या नवरदेवाप्रमाणे गाढवावर बसायचे, तोंड मात्र शेपटीकडे करायचे. म्हणजे मिरवणुकीऐवजी धिंडच ती. या धिंगाण्यानंतर रंगपंचमीच्या दिवशी शहरात रंगाचे पाणी स्नेह्यासोबत्यांच्या अंगावर फेकण्याचा समारंभ व्हावयाचा. पेशवाईच्या इतिहासात रंगपंचमीचा सण विशेष उत्साहाने साजरा झाल्याची उदाहरणे सापडतात. विद्यमान काळात शहरात निरनिराळ्या रंगांनी ओलावलेल्या कपड्यांत हिंडणारी माणसे बरीच दृष्टीस पडतात. त्यात कामगारवर्गाचे प्रौढ लोक आणि विद्यार्थ्यांत मोडणारे यांचा भरणा मोठा असतो.

हिंदूंच्या खालोखाल मुसलमानांची संख्या असल्याने त्यांच्या सणाकडे लक्ष देणे अवश्य आहे. सफर महिन्यात छेलाबुध, शेवटचा बुधवार किंवा आश्चरचर शंबा हा पहिला सण. ईद-इ-विलादत पैगंबरांचा जन्मदिवस. रवी उल अव्वल बारावा दिवस. शब-ई मेराज. रजब २६. शाबान १४ शबे बरात. शव्वाल १ रमजान ईद. यामागून येणाऱ्या दिवशी 'बास' शिळी या नावाने या सणांची पुरवणी साजरी केली जाते. मोहर्रम हा ताबूत मिरवण्याचा सण. याचा प्रारंभ सदर महिन्याच्या पाचव्या रात्री सुरू होऊन दहाव्या दिवशी ताबूतांची मिरवणूक आणि त्यांचे समुद्रात विसर्जन हे विधी आटोपले की या सणाची धामधूम संपते. जिल्हाज १० बक्र ईद हा सण इंग्रजांच्या राजवटीत हिंदूंना आणि सरकारला देशभर चिंतेचा प्रसंग असे. कारण त्यानिमित्त बळी म्हणून केली जाणारी गोहत्या. आणि ते कृत्य हिंदूंच्या भावना क्षुब्ध करणारे होते. यामुळे उभयपक्षी केव्हा केव्हा क्वचित रक्तपाताची पाळी ओढवून तो रक्तपात आठदहा दिवस चालायचा.

महंमद पैगंबरांच्या अनुषंगाने मुसलमानांतील धर्मप्रेम उत्पन्न व्हावे, हे स्वाभाविक आहे. पूर्वोक्त दुसरा सण पैगंबरसाहेबांच्या जन्मदिवसाचा आहे, यामुळे त्याला अनन्यसाधारण महत्त्व असणे क्रमप्राप्तच आहे. चौथ्या सणाच्या नावात आणि शिवरात्र या नावात काहीसे उच्चारसादृश्य असल्याने त्याविषयी संदेह उत्पन्न होतो आणि तसा संदेह कित्येक विद्वानांच्या विचारात आढळतो. रमजान ईद हा आधीच्या दिवसात चाललेल्या उपोषणांच्या पारण्याचा आहे. मोहर्रम व बक्रे इद हे दोन सण मात्र जेथे व्हावयाचे असतील तेथील साऱ्या वस्तीचे भान वेधून घेणारे ठरतात. त्यांपैकी दुसऱ्याच्या भानवेधी कारणाचा निर्देश वर आलेला आहे. गोहत्या हे त्या दिवसातील हिंदूंच्या चित्तक्षोभाचे बीज आहे, पण त्या सणाची जी कथा प्रचलित

आहे तिच्यात या सणातील गाईंच्या बलिदानाचा मुळीच संबंध नाही. एका प्रेषिताकडे त्याच्या भक्तीचा कस पाहण्यासाठी त्याच्या पुत्राचा देवाने बळी मागितला. देवाची मागणी म्हणून त्याने मुलाच्या मानेवर सुरी फिरविण्याची तत्परता व्यक्त केली. हिंदूंतील श्रियाळाच्या कथेसारखीच ही कथा आहे. दोन्ही कथांचे पर्यवसान एकच आहे. देवाची प्रसन्नता व बळी जिवंत राहणे, हे फळ दोन्ही गोष्टींत समान आहे. हिंदूंत फक्त कथाच आहे, सण नाही. मुसलमानांत सण आहे. गाईचे बलिदान मुसलमानांच्या राज्यकाळी या देशात सुरू झाले असावे, असा इतिहासज्ञांचा तर्क आहे. गोवधाला आधार त्या सणाच्या नावातील 'बक्र' शब्दाचा आहे. त्या शब्दाचा अरबी भाषेत गाय असा अर्थ आहे. हिंदुस्थानाबाहेरच्या बहुतेक सर्व मुसलमान देशांत बकरे, मेंढे, उंट यांचा बळी दिला जातो.

मोहर्रम हा सण इस्लामच्या इतिहासात घडलेल्या एका शोचनीय प्रसंगाचे स्मारक या नात्याने मुसलमान पाळतात. पैगंबरांच्या पश्चात मुसलमानांत दोन तट पडले. त्यांच्यामध्ये 'खलीफा' या नावाची एक धार्मिक शासनसंस्था असून तिच्यावरून 'खिलाफत' हा शब्द उत्पन्न झाला आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीनंतर तुर्कस्तानचा प्रदेश आणि अधिकार यांवर गदा येतेसे पाहून एकट्या हिंदुस्थानातील मुसलमान उद्विग्न झाले व खलीफा आणि त्याचा अधिकार हे सुरक्षित राहावेत अशा उद्देशाने त्यांनी खिलाफतीची चळवळ आरंभली. त्या चळवळीचे केंद्र मुंबई शहरच होते. शौकत अली व महंमद अली हे दोघे बंधू या चळवळीचे पुढारी होते. महात्मा गांधींनी या चळवळीत भाग घेण्याला सुरुवात केल्यामुळे ती चळवळ काँग्रेसशी जोडली गेली. खलीफा व खिलाफत यांचा हिंदी इतिहासात प्रत्यक्ष संबंध कधीच आलेला नाही. आलाच असेल तर तो केवळ नाममात्र आढळतो.

पैगंबरांच्या मागे जे पहिले चार खलीफा झाले ते महंमदसाहेबांचे मित्र आणि विश्वासू सहकारी होते. नंतर अली या नावाचा एक पुरुष पैगंबरसाहेबांचा जावई खलीफाच्या आसनावर चढला व मुसलमानांमध्ये 'शिया' नावाची शाखा उगवली. या धामधुमीत जे आपसात रण माजले त्यात ईराणातील 'करबला' नावाच्या ठिकाणी अलीचे मुलगे हसन व हुसेन हे धारातीर्थी बुडाले. त्यांचे स्मरण हा सण लोकांना करून देतो. ताजिये किंवा ताबूत या त्यांच्या थडग्यांच्या प्रतिमा होत. यावरून सहज समजून येईल की हा सण आनंदमंगलाचा नसून शोकप्रदर्शनाचा आहे. त्याप्रमाणे शियापंथाचे लोक सणात शोकाची भावना जागृत ठेवतात. सुन्नी पंथाने या सणाला विकृत रूप आणले आहे. सुन्नी पंथाचे संख्याबळ शियाहून जास्त व भांडखोरपणाची खुमखुमीही तशीच, यामुळे मोहर्रमच्या दंग्यांचे मूळ सुन्नींच्या शिरजोरीच्या बागणुकीत सापडते. मुंबईच्या पोलिसखात्याचे अहवाल अभ्यासिल्यास सुन्नींच्या आडमुठ्या वर्तनाबद्दल शंका राहत नाही. हे अत्याचारी लोक पोलिसांच्या उपायांना दाद देणार नाहीत व दंगा आणि रक्तपात होणार अशी

पोलिसवरिष्ठांची खात्री पटल्यावर पोलिसांच्या मदतीसाठी बोलावून आणून तयार ठेवलेल्या लष्कराने गोळीबार करायचा आणि दंगेखोरांची गर्दी मोडायची व दंगा थांबायचा, ही पोलिसांची रीत मुंबईच्या परिचयाची आहे. रहदारी अडवायची, दुकाने लुटायची व त्यांस आगी लावायच्या, पादचाऱ्यांना लाठ्याकाठ्यांनी झोडपायचे, असे साधारणपणे दंग्याचे स्वरूपही प्रसिद्ध आहे. दंगेखोरांची मोठी शस्त्रे म्हणजे दगडविटांचे तुकडे, सोडालेमन या पेयांच्या बाटल्या आणि लाठ्या-काठ्या. कधी कधी धारेची सुरी-सुऱ्यांसारखी हत्यारेसुद्धा वापरली गेली आहेत. या शस्त्रांपैकी दगडविटा वगैरे रस्त्याच्या कडेला आयतीच हाती लागतात. रस्तादुरुस्ती, घरबांधणी ही कामे शहरभर कुठे ना कुठे चाललेली असतात. आधीपासून कट करून मारामारीची गुप्तपणे तयारी चालू असेल तर लाठ्याकाठ्या गोळा केल्या जातात. वर बाटल्या सांगितल्या, त्या दंग्याच्या वेळी खाद्यपेयांच्या दुकानांत घुसून हस्तगत करता येतात. अशा दुकानांना मुंबईत तोटा नाही. मोहर्रमच्या सणात या शतकाच्या आरंभी १९०४ व १९०८ या वर्षी दंगे झाले. १९११ मध्ये फौजी गोळीबारात वीस माणसे ठार व कित्येक घायाळ होऊन पडली. मयतांत सात हिंदू निघाले.

लष्करी गोळीबारात काही हिंदू प्राणास मुकले, याबद्दल त्या प्रकरणाच्या आपल्या अहवालात पोलिसखात्याने रीतसर खेद प्रदर्शित केला आहे. पण मयत झालेली माणसे अगदी निरपराध असतीलच असे मत तेथे प्रदर्शित केलेले नाही. कारण धर्मभेदाची क्षिती न बाळगता हिंदू ताबूताच्या इस्लामी सणात उत्साहाने व मोठ्या संख्येने भाग घेतात हे पोलिसांना चांगले ठाऊक असले पाहिजे. पेशवाईच्या काळात या हसन-हुसेनच्या कागदी थडग्यांची नानाप्रकारे श्रद्धेने सेवा करणारे हिंदू पुष्कळ होते. पेशवाई निमाल्यावर येथे जेव्हा लोकमताचे प्रदर्शन करणाऱ्या वृत्तपत्रप्रकाशनाचा व्यवहार हिंदूंनी सुरू केला तेव्हा त्यातून हिंदूंमधील ताबूतभक्तीचा निषेध होऊ लागला. १८९३ साली ऑगस्टच्या ११ तारखेपासून मुंबईमध्ये जो हिंदु-मुसलमानांचा भयंकर दंगा उद्भवला तेव्हापासून ताबुतावरील हिंदूंचे प्रेम ओसरू लागले. ताबुताची जागा महाराष्ट्रातील हिंदूंनी भाद्रपद शु० ४ पासून अनंतचतुर्दशीपर्यंत धामधुमीने चालणाऱ्या गणेशोत्सवाने भरून काढली. गणेशोत्सव हा सण १८९३ सालापर्यंत प्राचीन काळापासून महाराष्ट्रात लोकांच्या घरोघरी खासगी रीतीने जो चालत होता तो १८९३ नंतर शहरोशहरी घराबाहेर बाजारपेठांतून साजरा होऊ लागला. सुरुवातीला भजन, कीर्तन, प्रवचने, व्याख्याने अशा गंभीर स्वरूपाचे कार्यक्रम प्रत्येक सार्वजनिक गणपतीपुढे चालत. शहरातल्या ठिकठिकाणच्या उत्सवांमध्ये जे मेळे लष्करी थाटाने सामुदायिक रीत्या पदे गात फिरत त्या योगाने उत्सवाचे गांभीर्य ऱ्हास पावत चालले. त्याच्याऐवजी कार्यक्रमातून चटोर-चारगटपणा व राजकीय किंवा सामाजिक प्रतिपक्षातील मान्यवरांच्या शिमगा-पद्धतीच्या अनन्वित निंदेला प्राधान्य दिले जाऊ लागले. नाटके, तमाशे होऊ लागले. या विपरीत प्रकारांचा अतिरेक दिसू लागल्यावर

शासनाने त्यावर नियंत्रणे लादली, आणि ज्यांची निंदा केली जात असे त्यांनी कायद्याला शरण जाऊन निंदकांना माफी मागायला लावली. गणेशोत्सवाचे विकृत रूप विस्ताराने येथे वर्णन करण्याची जरूर काय होती, या पृच्छेचे समाधान वर जे ताबुताच्या सणासंबंधाचे विवेचन केले आहे ते ध्यानात असणारांना वेगळे सांगायला नको.

मोहरमच्या सणात वाघाच्या सोंगाचे खेळ होतात त्यांतही हिंदू भागीदार असतात कित्येक हिंदू आपल्या मुलांना फकिरी करायला लावतात—म्हणजे फकिराच्या सोंगाने भिक्षा मागायला लावतात. ताबुतांना नवसही करणारे हिंदू आढळतात. ताबुताच्या खर्चासाठी दुकानदारांकडून—खास हिंदूंकडून—धाकदपटशाच्या सक्तीने वर्गणी उपटायची या उपद्रवाच्या तक्रारी पोलिसांत मोहरमच्या दिवसांमध्ये हटकून नोंदल्या जायच्या, असेही पोलिसअहवालात दृष्टीस पडते. ताबुताच्या सणाचे दिवस दहा. त्यांतल्या नवव्या दिवसाच्या रात्रीला 'कतल की रात' हे नाव आहे. त्या रात्रीच्या धुमाकुळीत कित्येक जण जाया होतात, कित्येक जण प्राणासही मुकतात. ताबुताचा सण ज्या उपचारांनी हिंदुस्थानात साजरा केला जातो, ती पद्धत बाहेरच्या मुसलमान देशांतून कुठेच दिसत नाही, अशी मते वाचायला सापडतात. १९११ नंतर आपल्या मुंबई शहारात ताबुताच्या मिरवणुकी बंद झाल्याने एक चिंतेचा विषय मुंबापुरस्थ नागरिकांच्या जीवनातून गेला एवढे मात्र खरे.

मागे हिंदू सणांची महिनेवार नावे व किंचित तपशील सादर केला. आता आवश्यक तेवढी अधिक माहिती नमूद करावयाची आहे. चैत्रातला शुक्ल प्रतिपदा हा दिवस (शालिवाहन शकाचा नववर्षारंभ) 'पाडवा' या नावाने ओळखतात. या दिवशी सकाळी शुचिर्भूत होऊन आपल्या सुखस्थितीचे बराबाहेरच्या लोकांना दर्शन व्हावे या हेतूने एका काठीला जरीची वस्त्रे बांधून व त्या काठीच्या टोकावर एखादे चांदीचे भांडे अडकवून ती काठी बाहेर दिसेल अशा रीतीने खिडकीशी संध्याकाळपर्यंत उभी करतात. या दिवशी सकाळी कडूलिंबाची पाने कुटून त्याचा लगदा खावा असा एक विधी आहे. रामनवमीला (चैत्र शुक्ल नवमी) रामजन्मविषयक कीर्तने दिवसाचे बारा वाजेपर्यंत राममंदिरात चालतात. तो दिवस उपवासाचा आहे. चैत्री पौर्णिमेला रामभक्त हनुमंताचा पहाटे जन्म झाला, यासाठी त्यासंबंधीची कीर्तने पहाटेच्या वेळी साजरी होतात. गूळखोबरे हा कीर्तनाचा प्रसाद साधारणपणे ठरलेला आहे.

वैशाखातली शुक्ल तृतीया ही अक्षय्य तृतीया. या दिवसाची योग्यता फार मोठी मानली जाते. पण आचारविचाराचे सोपस्कार विशेष नाहीत. ज्येष्ठाची पौर्णिमा ही वटपौर्णिमा. महाभारतामध्ये जे सावित्रीचे आख्यान आहे, त्याच्याशी या दिवसाचा संबंध आहे, यामुळे 'सावित्री पौर्णिमा' असेही दुसरे नाव या दिवसाचे ऐकू येते. दुपारी जवळपासच्या वडाच्या पारावर जमावाने बायका जाऊन त्या वृक्षाची पूजा

करतात. पूजा सांगायला भटजी असतो. हा सण नाही तर व्रत आहे. सावित्रीच्या पतीचे यमाने हिरावलेले प्राण, त्याचा पिच्छा पुरवून सावित्रीने परत मिळविले म्हणजे आपले सौभाग्य राखले, हे सावित्री-आख्यानाचे सारसर्वस्व आपल्या जीवनातही खरे ठरावे हा उद्देश हे व्रत करणाऱ्या हिंदू स्त्रियांचा असतो. यानंतरची पौर्णिमा ती व्यासपूजेची. या दिवशी पुष्कळ ठिकाणी व्यायामशाळेच्या देवतेची, गुरूची, आयुधांची वगैरे पूजा करण्याची पद्धत आहे. त्यानंतर श्रावण महिना सुरू होतो. त्या महिन्याची पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा. हा सण समुद्र-काठचा अर्थात मुंबईचा विशेष सण आहे. या दिवशी लक्षावधी लोक समुद्राला नारळ अर्पण करतात. या सुमारास समुद्राचा पावसाळी क्षोभ थांबून समुद्रातील वाहने संचाराला मोकळी होतात. या पौर्णिमेला दुसरे नाव 'राखी पौर्णिमा' आहे. राखी हे एक प्रकारचे रेशमी कंकण आहे. हे कंकण स्नेहीसोबती एकमेकांच्या मनगटांना बांधून परस्परमैत्रीला दृढता आणतात. राखी बांधण्याचा प्रयोग साऱ्या देशात चालतो.

श्रावणाच्या कृष्णपक्षात अष्टमीच्या रात्री कृष्णजन्माचा सोहळा गाजतो व दुसऱ्या दिवशी 'दहीहंडी' फोडण्याचे कार्य शहरात अनेक ठिकाणी समारंभाने लोक पार पाडतात. दहीहंडी ही कृष्णाच्या बालचरित्रातील एका विशेष लोकप्रिय अंशाची प्रतिकृती आहे. कृष्ण लहानपणी गोकुळातील शिक्क्यावरून ठेवलेला गोरस चोरीत असे त्याची नक्कल वठविणारे खेळाडू टोळ्याटोळ्यांनी 'गोविंदा आला रे आला' हे शब्द तालावर उच्चारीत मिरवणुकीने फिरतात. त्यांच्या हातांत रंगीत काठ्या व लष्करी धर्तीचा सर्वांचा एकाच रंगाढंगाचा पोशाख असतो. ते खेळाडू दहीहंडी रस्त्याच्या मध्यभागी शक्य तेवढ्या उंचीवर टांगलेली असते, तिच्यापर्यंत हात पोचण्यासाठी एकमेकांच्या खांद्यांवर चढून मनोरा उभा करतात, शेवटी कृतार्थतेने हंडी फोडतात. कधी कधी हे टोळीवाले आपसातील हेव्यादाव्याने मारामाऱ्याही करतात.

श्रावणातल्या पौर्णिमेला सकाळी पुष्कळ ब्राह्मण श्रावण्या जमावाने करतात. पूर्वी-देखील पुष्कळजण आपल्या राहत्या जागी सोय नसल्याने श्रावणीकरिता ओळखी-देखीच्या घरी जात असत. हल्ली ब्राह्मणांच्या सार्वजनिक संस्था आपापल्या इमारतीतून श्रावणीची व्यवस्था करतात. कधी कधी समुद्रकाठी वाळवंटातही श्रावणीचे समारंभ उरकले जातात.

श्रावणातल्या अमावास्येला 'पिठोरी' हे नाव आहे. दुसरे नाव 'पोळा' आहे. पोळ्याला जनावरे शृंगारून त्यांना वाजतगाजत मिरवितात, पण हल्ली मुंबई शहराच्या चिक्कार गर्दीत जनावरांच्या मिरवणुकीला सवड मिळत नाही. पिठोरीशी मातेच्या महतीचा संबंध असल्यामुळे 'मातृदिन' या नावाने म्युनिसिपालटीच्या शाळांना रजा असे. याच अमावास्येला मुंबईत देवाच्या संदर्भात आणखी एक प्रसंग घडत असे. त्याची माहिती विषयक्रम सोडून सांगावीशी वाटते. ही माहिती सणाची नाही तर वाळकेश्वराच्या यात्रेची आहे. ही यात्रा वस्तुतः हिंदू देवळाची, पण

तिच्यात वडेजाव जुगार खेळणाऱ्या पारशी लोकांचा. त्यांच्याबरोबर गर्दीचा अनाचाराने फायदा घेऊन दंगा माजविणारे पारशी व इतर बरेच असत. जुगाराच्या ओढीने ठाणे, पनवेल, अलीबाग वगैरे दूरच्या गावांहून पुष्कळ माणसे येत असत. बायकाही यात्रेसाठी येत. त्यांना वरील यात्रेशी संबंध नसलेल्या या अवांतर लोकांचा त्रास होत असे. तेव्हा देवळाच्या आवारातच जुगाराचे अड्डे पडलेले असायचे व आठवडाभरदेखील यात्रा चालायची. डोंगरावर यात्रा व तिला निश्चित मुदत नाही; यामुळे राहण्यासाठी देवळाच्या भोवती पारशी मंडळी तंबू, राहुट्या उभारीत. शेवटी त्यांचा यात्रेस होणारा उपद्रव सह्यतेच्या पलीकडे गेल्यावर सरकार मध्ये पडले. त्यांनी देवळासभोवार उंच भिंत उभारून कोणाही अलबत्यागलबत्याला देऊळ बंद केले, तेव्हा यात्रेची गर्दी ओसरली. यात्रेच्या देवळाजवळ अन्यधर्मी पारशी लोकांची गर्दी व तीसुद्धा सत्कार्यासाठी नव्हे तर 'जुगारा'सारख्या दुर्व्यसनाची हौस भागविण्यासाठी, आणि त्या गर्दीला हिंदूंनी तिचा उपद्रव असह्य होईपर्यंत हरकत घेऊ नये हा यात्रेतला एक चमत्कारच समजला पाहिजे. वाळकेश्वरच्या यात्रा दोन. दुसरी कार्तिकी पौर्णिमेला भरते.

श्रावणामागून भाद्रपदात जो धामधुमीचा सण येतो तो सार्वजनिक गणेशोत्सवाचा. याच्याविषयी मोहर्रमाबरोबर थोडेसे पूर्वी लिहिलेले आहे. शुद्ध चतुर्थीच्या दिवशी घरोघर गणेशमूर्ती खरेदी करून त्याची प्राणप्रतिष्ठा यथासांग उरकतात. स्थापना झाल्यावर त्या दिवशी दुसरे काम नाही. सार्वजनिक गणपती दहाव्या—अनंत चतुर्दशीच्या—दिवशी विसर्जन केले जातात व त्या दिवशी दुपारी तीन वाजल्यापासून रात्रीचे एकदोन वाजेपर्यंत गर्दी, वाद्ये वगैरेंचा आवाज शहरभर घुमत असतो. खासगी गणेशोत्सवाला चतुर्दशीचा विसर्जन-निर्बंध नाही.

पूर्वी—गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत—गणेशचतुर्थीच्या दिवशी चंद्रदर्शन अशुभ मानले जाई. व त्याचा दोष घालविण्यासाठी लोकांकडून शिव्या मिळाव्या, हा एक उपाय लोकांत रूढ होता. लोकांना सुखासुखी शिव्या का द्याव्या, म्हणून कित्येक माणसे लोकांच्या घरावर दगडफेक करीत. मग चंद्रदर्शन झाले असो किंवा नसो. बहुधा या दगडफेकीचा उपद्रव देण्याचा हेतूच प्रबळ असायचा. शेवटी सरकारने हा प्रकार बंद केला.

आश्विनातल्या सणात दसरा हा एक मोठा सण व दुसरा दिवाळी. त्या दिवशी संध्याकाळी लोक गावाच्या शिवेवर जाऊन शमीच्या झाडाची पूजा करतात व आप्तेष्टांच्या घरी जाऊन शुभचिंतनपूर्वक त्यांना सोने वाटण्याचा विधी करतात. सोने म्हणजे, आपटे नावाची एक वनस्पती आहे. तिची पाने बाजारात विकावयास येतात. ती खरेदी करून सोने या नावाने आप्तपरिवारांत वाटायची. विराटाच्या घरी अज्ञातवासाचा काळ कंठण्यासाठी पांडव द्रौपदीसह वनवास सोडून निघाले, तेव्हा त्यांनी विराट नगरीच्या सीमेवरील एका शमीवृक्षावर आपली शस्त्रास्त्रे लपवून ठेविली

अशी महाभारतात जी कथा आहे, तिच्याशी सीमोल्लंघन, शमीपूजन या विधींचा संबंध लौकिकात जोडला जातो. ऐतिहासिक काळात सीमोल्लंघनाचे नाते मुलुखगिरीवर जाण्याच्या कामगिरीशी लावले जात असे. पेशवे किंवा त्यांचे सरदार दसऱ्याला फाजफाटा आपल्या वस्तीच्या हद्दीबाहेर घेऊन जात असल्याचे दाखले आहेत. यावरून सीमोल्लंघन, शमीपूजन या विधींचा काही बोध होतो.

दिवाळीच्या सणातील लक्ष्मीपूजनाचा व कार्तिक शुक्ल प्रतिपदेच्या रात्रींचा बाजारपेठेतला दीपोत्साह विशेष बहारीचा असतो. आयुष्यात एकदा तरी हा प्रसंग नजरेखाली घालावा, अशी त्याविषयीची आख्या आहे आणि ती अन्यथा नाही. हल्लीची उजेडाची साधने उपलब्ध नव्हती त्या काळातही मुंबईची दिवाळी या लोकोत्तर दीपोत्साहाने सर्वत्र गाजत होती. वळणावळणाच्या लांबच लांब बाजारपेठेत जे नाना आकारांच्या व नाना रंगांच्या दिव्यांनी फुललेले नाही, असे एकही ठिकाण (दुकान, घर वगैरे) दिसावयाचे नाही. वाहनांतून आमूलाग्र सगळी पेठ पाहणे शक्य होत नाही. त्या प्रेक्षकांच्या बेसुमार गर्दीतून पायी जाणारेच दीपावली पाहण्याच्या अंगाने भाग्यशाली ठरतात. या संदर्भात कै० श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा लेख 'साहित्य बत्तिशी' नामक पुस्तकात "मुंबईचा दीपोत्सव" या मथळ्याखाली छापलेला आहे व वाचनीय आहे.

यापुढे सांगण्यासारखा हिंदू सण एक संक्रांतीचा—मकरसंक्रमणाचा—आहे. याचा संबंध सूर्याच्या उत्तरायणाशी आहे. या दिवशी हिंदू आपल्या इष्टमित्रांना तिळगूळ वाटतात व तोंडाने 'तिळगूळ घ्या, आणि गोड बोला' असे विनंतिवजा शब्द उच्चारतात. हा सण पौषातला. यानंतरच्या माघ-फाल्गुन या शेवटच्या दोन महिन्यांचे सण पूर्वी निवेदन केले. याउपर ज्यांचे सणवार सांगावयाचे राहिले ते आहेत पारशी, ख्रिस्ती, शीख इत्यादी. त्यांतले शीख हे पंजाबचे. पाकिस्तान होताना तेथे झालेल्या कत्तलीपायी हिंदुस्थानात जेथे मिळेल त्या जागी ते येऊन राहिले. जेथे राहिले तेथे त्यांनी आपले 'गुरुद्वारा' बांधले व ते आपले सणही साजरे करतात.

येथवर वर्णिलेले हिंदु-मुसलमानांचे सण धार्मिक स्वरूपाचे आहेत. या दोन प्रमुख समाजांशिवाय शीख, ख्रिस्ती, युहुदी, पारशी वगैरे संख्येने लहान पण धर्माने पृथक असे दुसरे अनेक समाज भरतखंडात आहेत. तेही आपले धर्मप्रणीत सण पाळतात. पण त्यांचा व्याप लहान असल्यामुळे मुंबई शहरात ते सण लोकांच्या डोळ्यांवर फारसे येत नाहीत. स्वराज्यात जैन-बौद्धांचे सण सुट्ट्या देण्याच्या योग्यतेचे ठरले आहेत. पूर्वी शास्त्रानुसार अंत्यज, व्यवहारात अस्पृश्य किंवा हरिजन म्हटले जाणारे लोक, महात्मा गांधींच्या कृपेने, डॉ० आंबेडकरांच्या दीक्षेने बौद्ध झाल्यावर त्या समाजाची उपेक्षणीयता गेली. बौद्ध धर्म जो लोकव्यवहारात नव्हता त्याचे त्या व्यवहारात पुनरुज्जीवन झाले आणि अस्पृश्य, हरिजन, महार, मांग हे शब्द मागासले. सुंभ जळला तरी त्याचा पीळ राखेच्या रूपात कायम असतो म्हणतात, त्याप्रमाणे हे शब्द

मागासले तरी ह्यांच्याद्वारे प्रकट होणारा पूर्वीचा तिरस्काराचा पीळ पूर्णतया हिंदूंच्या वर्तनात शिथिल झालेला नाही. बौद्धांचा वैशाखी पौर्णिमा हा सण आहे व जैनांचे महावीरजयंती व भाद्रपदात संवत्सरी या नावाचे दोन सण आहेत.

सांप्रत स्वराज्यकाळात राजकीय सण जे अखिल भारतीय पातळीवर पाळले जातात त्यांची येथे नोंद न केली तर गुन्हा होईल. १९३० च्या २६ जानेवारीला तेव्हाचे काँग्रेसचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आदेशानुसार स्वराज्य-प्राप्तीची सर्व राष्ट्राने शपथपूर्वक प्रतिज्ञा उच्चारली आणि स्वराज्य मिळेपर्यंत तो दिवस दरसाल लोकांनी पाळला म्हणून 'प्रजासजाक दिन' या नावाने तो सणाच्या महत्त्वास चढणे स्वाभाविक आहे. १५ ऑगस्ट हा तर साक्षात स्वराज्यप्राप्तीचा दिवस; यामुळे त्याचा गौरव करावा तेवढा थोडाच ठरेल. तारीख १ मे हा 'महाराष्ट्र-राज्य-दिन' या नात्याने महाराष्ट्र प्रदेशापुरता पाळला जातो. महाराष्ट्र राज्य ही घटना अनेक दुर्धर अडचणींतून उद्भवलेली आहे. त्यासाठी महाराष्ट्राला पुष्कळ प्राणहानी भोगावी लागली. महाराष्ट्र राज्य हे केवळ पश्चिम महाराष्ट्राचे नसून त्यात (पूर्वकालीन गोवळकोंडा) निजामशाहीतला मराठवाडा व वऱ्हाड-नागपूर हा प्रदेशही समाविष्ट आहे. महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य निर्माण होताच गुजरातची मिठी सुटून तेथेही स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. मुंबई शहरासाठी—हे शहर महाराष्ट्र राज्यातच पाहिजे या हट्टासाठी—महाराष्ट्राचे रक्त मुंबईच्या भूमीवर सांडले. स्वतंत्र महाराष्ट्रा-प्रमाणे गुजरातचीदेखील स्वतंत्र राज्यासाठी 'महागुजरात' या नावाने निकराची चळवळ चालली होती.

इंग्रजांच्या हिंदुस्थानातील कारकिर्दीचे एकोणिसावे शतक हे सर्वांगीण लोकजागृतीचे म्हणजे ध्येयवादाच्या चळवळीचे असल्यामुळे त्या चळवळींतून काही नवे सण उद्भवले, काही नव्या व्यक्तींचे माहात्म्य वाढले. या देशात समाज जसे भिन्न तसे त्यांचे सणवारदेखील भिन्न व अनेक असून त्यांत फेरबदल (सरकारी कारभाराने) बहुत वेळा झालेले आहेत आणि स्वराज्यसरकारच्या धोरणानुसार पुढे होत राहतील असा संभव आहे.

१९४७ मध्ये देश स्वराज्यसंपन्न झाला तेव्हा जे जुने हिंदू सण शासनाच्या संमतीने (रजेच्या रूपाने) मंजूर झाले त्यांतले आज कितीतरी बाद झाले आहेत. त्यावर एक तोडगा 'वैकल्पिक' या नावाचा आहे. जो सण सरकारी सुट्ट्यांच्या हक्कांच्या यादीतून हाकलला असेल तो त्या त्या लोकांना हक्काने भोगता यावा म्हणून रजांच्या यादीत त्याला वैकल्पिक म्हटलेले असते. ह्या हक्कासाठी वरिष्ठाला आगाऊ अर्ज करावा लागतो. त्याने अर्ज मंजूर केला तर त्या रजेचा कर्मचाऱ्याला उपभोग घेता येतो. १९७८ च्या शासकीय दैनंदिनीत हक्काच्या रजा १८ असून वैकल्पिक रजा ३१ आहेत. त्यांतल्या एकूण ४ सुट्ट्या कर्मचारी वर्षात मिळवू शकतो. हक्काच्या १८ रजांमध्ये नवबौद्धांखातर वैशाखी पौर्णिमा आहे तर जैनांची संख्या अल्प असली

तरी त्यांच्या संतोषार्थ महावीरजयंती हा दिवस हक्काच्या रजेत दाखल आहे. स्वराज्याच्या आरंभी पंजाबातले शीख सगळ्या देशात सर्वत्र पसरले, त्याप्रमाणे महाराष्ट्रातही भरले. ते राजी राहावे या हेतूने महाराष्ट्र शासनाने नानकजयंतीला स्वतंत्र स्थान दिले आहे. यामुळे मुसलमान, खिस्ती, पारशी व हिंदूंच्या रजांवर साहजिकच तारतम्याने कात्री फिरावी यात नवल नाही.

लोकमान्य टिळकांनी श्रीशिवछत्रपतींच्या स्मरणोत्सवाला राष्ट्रीय स्वरूप देण्याचा उद्योग आरंभल्यापासून महाराष्ट्रात काही काळ स्वराज्यामुळे इतका जोरावला की गावोगाव त्या पुण्यपुरुषाचे अर्धपुतळे जिकडेतिकडे दिसू लागले. मुंबई शहरातही महाराजांचे पुतळे, स्मारक स्थळे, इमारती वगैरे स्मारके कितीतरी दाखविता येतील. सणांच्या संदर्भात हा विषय उपस्थित करण्याचे कारण एवढेच की, स्वराज्याच्या आरंभकाळी शिवजयंती, महात्मा गांधींची मृत्युतिथी अशा प्रसंगांना धार्मिक सणांचे मोल चढून शासनातर्फे लोकांना रजा मिळत असत. ते त्यांचे महत्त्व आता उरलेले दिसत नाही.

प्रकरण नववे

मुंबईतील न्यायदान

इसवी सतराव्या शतकात विचित्र योगायोगाने १६६९ मध्ये त्याआधी तीन-साडेतीन वर्षे इंग्लंडच्या राजाच्या (दुसरा चार्ल्स) हाती असलेले मुंबई वेट सुरतेस व्यापार-उदीमाची १६१२ साली पेढी स्थापून गुजरातच्या सुरत शहरी राहिलेल्या ईस्ट इंडिया कंपनीला मिळाले व तिचे येथे राज्य सुरू झाले, हे वृत्त वाचकांना नवे नाही. राजाकडून कंपनीकडे हा फेरफार ज्या करारपत्राने झाला त्यात कंपनीने प्रत्यक्ष राज्याची सर्व अंगे चोखाळावी अशी सूचना असल्यामुळे मुंबईची सूत्रे हाती येताच कंपनीचे कारभारी प्रजेच्या न्यायनिवाड्याच्या कर्तव्याच्या मागे लागले. कंपनी म्हटली तरी एकाच पुरुषाला मुंबईच्या उभारणीसंबंधात श्रेयाचा बहुतांश द्यावा लागतो व तो कोण तर जेराल्ड ऑंजिअर, हे मुंबईचा इतिहास थोडाफार माहीत असणाऱ्याला आपोआप ध्यानात येईल. आपण यापुढे स्वतंत्र राज्यकर्ते आहो, अशा तीव्र जाणिवेने ज्या संस्था अस्तित्वात आणल्या त्यांतल्या कित्येक मागे नमूद केल्या आहेत. त्यांत अदालत इन्साफ न्यायनिवाड्याच्या कामगिरीचा उल्लेख नाही.

न्यायनिवाड्यासाठी प्रथम गुन्हेगार व त्यांना पकडणारे ही जोडी प्रथम असायला पाहिजे. गुन्हेगार हा स्वयंभू माणसांच्या वस्तीत कुठेही सापडतो. त्याला धरणारे मात्र मुद्दाम नेमणुकीने व शिक्षणाने निर्माण करावे लागतात. मुंबई हे ठिकाण ज्या पोर्तुगीज राजाने इंग्लिश राजाला आपल्या बहिणीच्या लग्ननिमित्त आंदणादाखल दिले त्यांचे आधी राज्य होते, तेव्हा गुन्हे व त्यांचे नियंत्रण याविषयी काही यंत्रणा असली पाहिजे अशी स्वाभाविकपणे कल्पना करून त्या यंत्रणेची माहिती पाहू गेल्यास तिच्याबद्दल कसलाच उल्लेख सापडत नाही. कारण तेव्हा न्यायाचे काम वसईस अगर गोव्यास चालत असे. रोजच्या कामकाजात पोर्तुगीज कायद्याचा जो थोडाफार प्रजेशी संबंध येई त्यावरून त्या राज्यातील एकंदर न्यायव्यवस्थेचा काहीच स्पष्ट बोध होत नाही. कंपनीच्या अंकुशाखाली मुंबई वेट आल्यावर मुंबईतील पोर्तुगीज कायदे, भाषा वगैरे गोष्टींना इंग्रजाकडून सक्त मनाई करण्यात आली आणि ऑंजिअरने न्यायदानाची सोय स्वभाषेतून केली. तरी आपल्या मदतीसाठी पोर्तुगीज कायदेपंडितांना आपल्या पदरी ठेवायला कंपनीचे कारभारी कचरत नव्हते व सत्तेच्या दृष्टीने

१. ग्लोरिया चर्च, भायखळा : १९१३

२. सन डायल : बॉम्बे कॅसल येथे पोर्तुगीजांनी बसविलेले एक पुरातन घड्याळ

३. सेंट थॉमस कॅथेड्रल : १७१८





अपोलो स्ट्रीट येथील आइस हाउस (बर्फाची वखार) : १८४३



लव्ह ग्रोव्ह पंपिंग स्टेशन १८८४

जुन्या जमान्यातील एक बंबखाना

मुंबईत १९२० सालापर्यंत आगी विझविण्याची साधने ओढून नेण्यासाठी घोड्याच्या गाड्यांचा वापर करण्यात येत असे.

कारखाने आणि गिरण्या यांनी गजबजलेला गिरणगाव

१. ग्रँट मेडिकल कॉलेज :
१८४५



२. सेंट जॉर्जेस हॉस्पिटल :
१८९२

३. गोकुळदास तेजपाल
हॉस्पिटल : १८७४





१. आर्थर रोड हॉस्पिटल : १८९२

२. सेठ गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज आणि के० ई० एम० हॉस्पिटल, परळ : १९२५

३. जे० जे० हॉस्पिटल : १८४५



१



२

१. शिग्राम

२. पालख्या, रेकले, मेणे, शिग्राम इत्यादी जुन्या जमान्यातील वाहने : १८१२

३. घोड्यांची ट्रॅम : १८७३



३

पालखी, शिग्राम, रेकला इत्यादी जुन्या जमान्यातील वाहने : १८१२

व्हिक्टोरिया

ऑम्नीबस : १९२६

डबल डेकर ट्रॅम गाडी :
१९०७

ट्रेलर ट्रॅम : १९०७



नळ बझार स्ट्रीट :
१८६५

१. जुने कुलाबा रेल्वे स्टेशन, वुडहाउस रोड : १८९६

२. बी० बी० अँड सी० आय० रेल्वेची चर्चगेट येथील मुख्य कचेरी : १८९९



२



२

१. बोरीबंदर येथील जी० आय० पी० रेल्वेची मुख्य कचेरी : १८९२

२. बॅलार्ड पियर येथील रेल्वे स्टेशन : १९१५

फ्लोरा फाउंटन आणि एस्प्लेनेड रोड : १९१०



१. फ्लोरा फाउंटन विभागाचे विहंगम दृश्य

२. बॅलार्ड पियर आणि न्यू कस्टम हाउस : १९१०



१. ग्रेट वेस्टर्न हॉटेल (हॉर्नबी हाउस) : १८००

२. अपोलो स्ट्रीट. बाजूला सेंट अँड्रूज चर्च दिसत आहे



१. जुने सेक्रेटेरियेट, राजाबाई टॉवर, हायकोर्ट आणि ओव्हल मैदान : १८७८

२. वाळकेश्वर रोड : १८१०

३. फ्रीयर रोड



१

२

१. कुलाबा विभागाचा एक जुना देखावा, बॅकबे आणि कुलाबा रेक्लेमेशन होण्यापूर्वीचा : १८३८

२. मलबार हिल्वरून दिसणारी चौपाटी आणि बॅकबे : १८६४

पोर्तुगीजांच्या ठिकाणी सामान्यतः इंग्रजांविषयी स्नेहभावना वसत नसूनही न्याय-दानाच्या व्यवहारानिमित्त इंग्रजाला सल्लामसलत देण्यासाठी पोर्तुगीज कायदेपंडित इंग्रजाची नोकरी पत्करण्याला मागेपुढे पाहत नसत.

मुंबई बेटावर न्यायदानाच्या व्यवस्थेला वस्तीमध्ये स्वतःच्या मालकीचे एक निश्चित स्थान पाहिजे म्हणून ऑंजिअरने इमारतीचे बांधकाम सुरू केले; पण ते चार वर्षांनी पुरे झाले, तोवर ऑंजिअरची हयात संपली होती. किल्ल्याच्या हद्दीत वाढणाऱ्या बाजारवस्तीत एका मापला पोर(ल १) या नावाच्या भागात ही कोर्टाची इमारत पुष्कळ वर्षे आपले अवतारकार्य बजावीत असता सृष्टीच्या नियमानुसार ती इमारत कामातून आपोआप जाऊन उपेक्षेमुळे तिचा विनाश होऊ लागला, तरी तिच्या एका वेळच्या अस्तित्वाच्या खुणा १९०९ सालापर्यंत जिज्ञासूंना पाहायला सापडत होत्या अशी माहिती त्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या गॅझेटियरमध्ये नमूद आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात या कोर्टाच्या दुर्दशेला प्रारंभ झाला, पण दुसऱ्या जागी न्यायदानाचा कारभार चालू होता.

वस्तुतः न्यायदानाची व्यवस्था लोकांच्या कल्याणासाठी असूनसुद्धा सामान्य जनतेला ती व्यवस्था प्रारंभी काही काळ कुचेष्टेचा विषय झाली होती. न्यायदानाची टिंगल करणाऱ्यांत कंपनीची गोरी माणसेही सामील असत. हा प्रकार रस्त्याने जातायेता माणसे काय बोलतात यावर नजर ठेवून थट्टेखोरांना शिक्षा देऊन बंद करावा लागला. यामुळे न्यायदानाबद्दल लोकांत वचक व आदर उत्पन्न झाला व नंतर हे काम सुरळीत चालू झाले, यावरून त्यापूर्वी न्यायदानाची पद्धत मुंबई बेटावर मुळीच अस्तित्वात नव्हती, असे अनुमान केल्यास ते चुकीचे ठरू नये. न्यायाच्या कारभारात भाग घेणाऱ्या हिंदू साक्षीदारांना आपल्या जबानीस प्रारंभ करण्यापूर्वी खरे बोलण्या-विषयी तशा अर्थाची शपथ घ्यावी लागते, यासाठी न्यायदानाच्या जागी एक गाय आणून हजर ठेवीत असत. तिची शेपटी हातात धरून शपथ उच्चारावी या विधीनिमित्त हिंदू प्रजेत नाराजी उत्पन्न झाली होती. तिचा गवगवा विलायतेपर्यंत गेला तेव्हा कंपनीच्या तेथील वरिष्ठांनी शपथेसाठी गाईचे शेपूट हाती घेण्याची अट रद्द केली, आणि हिंदूंच्या मनातील या अटीमुळे उद्भवलेले अस्वास्थ्य शांत केले. जनतेच्या नाराजीकडे लक्ष न देता जो गाईच्या शेपटाचा मान राखून साक्ष देईल, त्याला हिंदूंनी जातिबहिष्काराची शिक्षा ठेवली होती.

इंग्लंडातील कायदेकानूंचा आदर्श पुढे ठेवून त्याप्रमाणे येथील न्यायदान व्हावे, असा इंग्लंडच्या राजाने व कंपनीने येथील न्यायदानापुढे एक दंडक ठेवला होता; परंतु त्याकरिता जी साधने म्हणजे इंग्लिश कायद्याचा व त्यासंबंधाच्या पुस्तकांचा संग्रह केव्हाही शंकिताच्या हाताशी पाहिजे याचीही जाणीव न्यायखाते चालू करताना कंपनीच्या येथील कारभाऱ्यांना नव्हती. त्यांचे विलायतेतील वरिष्ठही याबाबतीत अडाणी किंवा बेपर्वा असावे यात कसले नवल? साधनांच्या अडचणी कमी होत गेल्या

तरी काही कटकटी चालू राहिल्या. त्यांतली एक कटकट इंग्लंडच्या राजाच्या नेमणुकीने येथे येणारे न्यायाधीश व येथील कंपनीचे नोकर यांच्यात सदैव चालणारी धुसफूस ही गेल्या शतकातील हायकोर्टाच्या स्थापनेपर्यंत चालू होती. इंग्लिश राजाच्या पसंतीने येथे येणारा कामदार आणि कंपनीने नेमलेला इसम यांत माहात्म्य अधिक कुणाचे, या प्रश्नात साऱ्या धुसफुशीचे बीज होते, याचा या द्वैताच्या प्रकरणांचा तपशील पाहिल्यास बोध होणे कठीण नाही.

कंपनीने नेमलेले पहिले न्यायाधीश न्यायशास्त्राची अर्थात कायद्यांची ओळख नसलेले असेच बहुधा असत. ते इंग्रज स्वदेशातील कायद्यांच्या अंमलबजावणीची नक्कल येथे वठवीत. न्यायाचे काम मुंबईस कसे चालावे यासाठी हाताने लिहून पाठविलेल्या एका खर्ड्याचा काय तो कोर्टाच्या जवळ एक आधार असे. सुरवातीस केवळ कंपनीच्या कारभारातील गुन्ह्यांची प्रकरणे या कोर्टाकडे निकालाकरिता जात. हिंदी प्रजेचे तंटे या नव्या कोर्टाकडे सुनावणीसाठी जात नसत. ते हिंदी जनतेमध्ये प्राचीन कालापासून मूळ धरून असलेल्या ग्रामपंचायतीने निकालात काढावे अशी कंपनीच्या लोकांची दृष्टी होती. कंपनीचा सुरतेतील कारभारीमंडळाचा अध्यक्ष व त्याचे एकदोन सल्लागार अशा तिघाचौघांनी मिळून खटल्यांची सुनावणी करून त्यांचा निकाल करायचा, अशी प्रारंभी पुष्कळ वर्षे मुंबईत न्यायदानाची रीत होती. आरोपी या नात्याने ज्याला आपल्यासमोर उभा केला असेल तो गुन्हेगार असलाच पाहिजे, असा बलवत्तर ग्रह बहुधा सुनावणीच्या वेळी न्यायदात्यांच्या मनात असायचा व खटल्याचा निकालही तसाच म्हणजे निर्दय शिक्षेच्या रूपाने लागायचा.

इंग्रजांचे सुरवातीचे शिक्षासत्र रानटीपणाला लाजवील अशा स्वरूपाचे क्रूर असल्याने त्याला राक्षसी म्हटल्यास शोभेल. ह्यात गुन्हेगाराला डागणे, हातपाय-नाककान वगैरे अवयव तोडणे, एवढेच नव्हे तर लहर लागल्यास गुन्हेगार ठरविलेल्या व्यक्तीला जिवंत जाळणे, फासावर चढविणे अशा शिक्षांच्या नोंदी अव्वल इंग्रजी न्यायखात्याच्या संशोधकांनी उजेडात आणल्या आहेत. फटक्यांच्या शिक्षेकडे सुरवातीच्या इंग्रज न्यायकर्त्यांची ओढ विशेष दिसते. फटक्यांच्या संख्येला नियम नव्हता, तरी पुष्कळदा एकोणचाळीस या आकड्याचा उल्लेख फटक्यांसंबंधात दिसतो. कधी फटक्यांच्या बिनहिशोबी माराने माणसे जीवास मुकल्याची उदाहरणेही दृष्टीसमोर येतात. या शिक्षांच्या माळेत धिंड काढण्यालाही स्थान होते. जिची धिंड काढायची ती व्यक्ती जर स्त्री असेल तर तिचे डोके भादरणे, तिच्या तोंडास काळे फासणे, तिला गाढवाच्या शेपटाकडे तोंड करून बसविणे, हे विधी न्यायाच्या सेवकांना प्रथम पार पाडावे लागत. धिंड बाजारातून जाऊ लागल्यावर त्या व्यक्तीवर कचरा, शेण, कुजलेल्या फळभाज्यांचा मारा व्हायचा तो निराळाच. गुन्हेगाराचे पाय खोड्यात अडकवून, त्याला मोठ्या रहदारीच्या ठिकाणी दिवसभर उभा करून, त्याच्यावर पूर्वोक्त वस्तू फेकून गुन्हेगाराला आपला जीव नकोसा करून सोडायचा, असाही शिक्षेचा

एक प्रकार तेव्हा रूढ होता. इंग्रज स्वतःला आज सुसंस्कृत समाजांत गणतात, मग त्यांचे पूर्वज माणुसकीला विसरून वरच्याप्रमाणे सतराव्या–अठराव्या शतकात कशा शिक्षा देत, या प्रश्नाचे उत्तर काढायला बुद्धी फार शिणवायला नको. तेव्हा इंग्रजांच्या मुंबई वेटासभोवती चालू असलेल्या मुघल, मराठे वगैरे इतर राज्यांच्या कारभाराकडे वरवर नजर टाकल्यास मागील प्रश्नाचे उत्तर सापडेल. इंग्रज युरोपातून इकडे आलेले, म्हणून तेथील सामान्य लोकस्थितीचा व राज्यकारभाराचा वृत्तांत चाळल्यास तेथेही सर्वत्र येथल्यासारखेच दंडनीतीचे भीषण रूप दृष्टीस पडते. मुंबईतील पूर्वी निवेदन केलेल्या अनन्वित प्रकारांबद्दल लिहिताना इंग्रज इतिहासकारही अशीच त्या काळातील आपल्या आणि इतर देशातील हीन दंडनीतीची उदाहरणे देतात. तेव्हाच्या त्या जगातलाच एक इंग्रज हाही असल्यामुळे त्याला मुंबईतील क्रूर वाटणाऱ्या दंडनीतीबद्दल नावे ठेवायला नकोत. इंग्रजांच्या शिक्षासत्रातील राक्षसी क्रूरपणाच्या स्पष्टीकरणार्थ अगदी अलीकडील पंचवीस-तीस वर्षांमागील जर्मनीतील हिटलरची नाझीशाही किंवा इटलीतील मुसोलिनीची फासिस्टशाही पाहिल्यास मनुष्य स्वार्थसिद्धीसाठी किती क्रूर होऊ शकतो याचे निराळे विवेचन नको. जर्मनी व इटली या दोन देशांतील मानवसंहार तेथील राज्यकर्ते आपापल्या विचारसरणीतील न्यायाच्या कल्पनेतील न्यायाला धरूनच करीत होते, हे या संदर्भात लक्षात ठेवणे बरे.

ऑंजिअरने स्थापन केलेल्या न्यायालयाची समाप्ती १७२६ साली झाली व तेव्हापासून मेयर्स कोर्ट नावाचे न्यायालय मुंबईतील न्यायमनसुब्याचे काम निपटू लागले. शिक्षासत्राच्या क्रूरपणात मात्र अंतर पडले नव्हते. न्यायाधीशाच्या ठिकाणी नीतीची चाडही वेताचीच असे. एखाद्या मयताच्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी न्यायाधीशाकडे असेल तर तो न्यायाधीश त्या मालमत्तेतून आपल्या खिशात काय व किती टाकता येईल याची काळजी बाळगून आपले काम करीत असे. लाचलुचपतीबद्दल विधिनिषेध नव्हता. त्या काळी मुघल बादशाही ऐश्वर्याच्या उतरणीवर असली तरी लाचलुचपतीवर तिचा मुळीच परिणाम झाला नव्हता. उलट असे म्हणता येईल की त्या अधोगतीमुळे लोकांच्या व्यवहारात लाच देण्याघेण्याला जोर चढला होता. इंग्रज त्या प्रकारापासून अलिप्त नव्हता. वस्तुतः हे न्यायालय काय किंवा पूर्वीचे १७२७ पर्यंतचे न्यायालय काय, दोन्ही हिंदी प्रजेच्या आपसातील तंट्याबखेड्यांच्या न्यायासाठी नव्हतीच, ती फक्त इंग्रजांसाठीच होती आणि न्यायालय चालावे इतके इंग्रज इथे होते काय याचा त्यांच्या अनेक ठिकाणच्या पेढ्या किंवा वखारी ध्यानात घेतल्यास निराळा खुलासा नको. हे कोर्ट कोणासाठी यासंबंधात लोकांमध्ये संदेह राहू नये, म्हणून १७५३ मध्ये मेयर्स कोर्टाची नवी पुरवणी सनद काढून हे कोर्ट प्राधान्याने इंग्रजासाठीच आहे हा मुद्दा कंपनी सरकारने स्पष्ट केला.

व्यापारी म्हटला की तो खर्चाच्या बाबतीत मुठीचा घट्ट असतो हा सामान्य समज 'मेयर्स कोर्टा'च्या घटनेतील एका अटीने यथार्थ असल्याचे लक्ख दिसून येते. या

नव्या कोर्टाचा खर्च त्याच्या कामातूनच उभा केला पाहिजे, अशी ती अट होती. ही तर फी-दंड वगैरे गोष्टींत कोर्टात न्याय मिळविण्यासाठी येणाऱ्या कुळांकडून यथेच्छ पैसा उकळावा अशी उघडउघड चिथावणीच होती. आणि या अटीचा जेवढा फायदा घेता येईल तेवढा फायदा कोर्टाने घेतला.

हिंदी माणसांना न्यायाच्या कारभारात भाग घेण्याला सवड नव्हती. फौजदारी खटल्यांत त्यांना ज्यूरर (पंच) होण्याची सवड होती. पण ज्यूरी केवळ ख्रिस्त्यांची असावी, या नियमामुळे ख्रिस्तीतर हिंदी प्रजा ज्यूरीत दाखल होणे अर्थातच अशक्य होते. ही बंदी १७९८ साली मेयर्स कोर्ट मोडून 'रेकॉर्डर्स कोर्ट' या नावाचे नवे न्यायालय जन्मास घालून कंपनी सरकारने निकालात काढली. या न्यायालयाच्या अधिकारी-सरंजामात काझी आणि पंडित यांचा समावेश आहे. अठराव्या शतकात बॅरिस्टर, सॉलिसिटर वगैरे न्यायदानाच्या कामकाजातले आजकाल लोकांच्या परिचयाचे झालेले शब्द रेकॉर्डर्स कोर्टाच्या वर्णनात दृष्टीस पडतात आणि या नव्या कोर्टावर अर्वाचीनत्वाच्या छटा होत्या याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.

मेयर्स कोर्ट ते रेकॉर्डर्स कोर्ट यांच्यात सत्तर वर्षांचे अंतर आहे आणि त्या काळात इंग्रजांच्या पराक्रमाने तत्कालीन भारतीय राजकारणातील आपल्या वर्चस्वाचे क्षेत्र देशाइतके व्यापले होते, असे मानल्यास त्यात विशेष अतिशयोक्ती होणार नाही. प्लासीच्या लढाईतील इंग्रजांच्या विजयाने बंगाल, बिहार, ओरिसा हा विस्तीर्ण प्रदेश इंग्रजाच्या शहात आला. उत्तर भारतात मुघल सत्तेचे काही दुबळे अवशेष जिवंत होते. दक्षिणेत मराठे, हैदर, टिपू हेच काय ते नाव घेण्याजोगे विरोधी होते. पण हे दोघे बाप (१७८२) व लेक (१७९९) अठराव्या शतकातच रसातळाला गेले. उरले एक मराठे. १८०२ च्या अखेरीस दुसऱ्या बाजीरावाने वसई मुक्कामी इंग्रजाला शरण जाऊन त्याच्याशी जो तह केला, त्या तहाने मराठ्यांनादेखील इतिश्रीच्या छायेने घेरले. हा वृत्तांत नमूद करण्याचे कारण उघड आहे. इंग्रजाच्या या देशव्यापी विजयाने त्याच्या प्रजेची संख्याही वाढली; त्याच प्रमाणात न्यायदानाच्या कामाचा विस्तारही झाला. रेकॉर्डर्स कोर्टाच्या कामकरी मंडळीत काझी व शास्त्री ही दोन नावे पाहताच लक्षात येणारे आहे की तेथे हिंदी जनतेचे दावे पूर्वीप्रमाणे वर्ज्य राहिले नाहीत. हिंदी प्रजेचे हिंदू व मुसलमान हे दोन प्रमुख वर्ग असल्यामुळे त्यांच्या कायद्यांतील गुंतागुंत न्यायाधीशाला नीट उकलून समाधानकारक निर्णय करता येण्यासाठी काझी व शास्त्री यांना रेकॉर्डर्स कोर्टात स्थान दिले गेले. हिंदु-मुसलमान कायद्यांची छाननी करण्याची गरज फक्त दिवाणी (वारसा हक्क, मयताच्या मालमत्तेची व्यवस्था वगैरे) प्रकरणांबाबत करावी लागे. घातपाती गुन्ह्यांच्या बंदोबस्ताचा फौजदारी कायदा इंग्रजांचा स्वतंत्र होता व तो सर्वांना सारखाच लागू होता.

रेकॉर्डर्स कोर्टाची अस्तित्वमर्यादा अवघी पंचवीस वर्षांची. १८२४ मध्ये रेकॉर्डर्स कोर्ट जाऊन त्याच्या जागी सुप्रीम कोर्ट आले. या कोर्टाच्या रचनेत भावी हाय-

कोर्टाची (१८६२) अनेक लक्षणे दृष्टीस पडतात. १७२६ पासून १८२४ पर्यंतच्या सुमारे शंभर वर्षांत एकूण तीन कोर्टे आपल्या समोर येऊन गेली. त्यांत काही सुधारणा दिसल्या तरी काही दोष आपला अनिष्ट प्रभाव गाजवीतच होते. इंग्लंडहून तेथील राजाच्या पसंतीने येथे न्यायाधीशाचे काम करावयास येणाऱ्या गृहस्थाचा आणि येथील कंपनीच्या अधिकाऱ्याचा वेबनाव हा दोष मेयर्स कोर्टाच्या कारकिर्दीत जो उद्भवला तो सुप्रीम कोर्टाच्या वेळीही कायम होता. विलायतेहून येणाऱ्या नव्या न्यायाधीशाची भावना असे की, कंपनीच्या कारभारात कुठे अन्याय, जोर-जुलूम होत असल्यास त्यापासून हिंदी प्रजेचे रक्षण करण्यासाठी आपली नेमणूक आहे. कंपनीचे प्रांतिक गव्हर्नर तर सगळ्या राज्याचे सूत्रधार होते; शिवाय गव्हर्नराच्या जागी येण्यापूर्वी कंपनीच्या राजकीय उलाढालीत जातीने भाग घेतलेले मुरब्बी होते; अर्थात त्यांनाही स्वतःच्या कर्तबगारीबद्दल अभिमान असे. यामुळे तेही न्यायाधीशांना भीक घालीत नसत. मागे ज्या स्थितीला वेबनाव म्हटले, त्याचे स्वरूप इथे थोडक्यात सांगितले. दुसरा दोष अधिकाराच्या चढाओढीचा नसून बाहेरील परिस्थितीचा आहे. ही परिस्थिती पुष्कळदा न्यायाच्या कारभारालाच खीळ घाली. असा प्रसंग जंजिऱ्याच्या हबशयाने मुंबई बेटावर आक्रमण केल्यावेळी कंपनीला व तिच्या प्रजेला प्रथम अनुभवास आला. त्यानंतर विलायतेस नव्याने स्थापलेल्या कंपनीचा व जुन्या कंपनीचा झगडा सुरू झाला, त्यात रोगाच्या साथीची भर होती. त्या काळात सुमारे दहा वर्षे कोर्टाचे काम बंद होते. त्यानंतरच्या काळात रोग, परचक्र यासारखे कोणतेही संकट नसताना कोर्टाचे काम बंद असल्याची पुष्कळ उदाहरणे दाखविता येतील. याप्रमाणे कोर्टाच्या कामाला खो बसण्याचा प्रकार सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू होता. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीत रेकॉर्डर दर दीड वर्षाआड मरावा असा एक चमत्कार घडत होता. त्या योगाने न्यायालयाच्या कामाला खंड पडत असे. न्यायाचे स्वरूप पूर्वीइतकेच थोड्याफार प्रमाणात बेशिस्त होते. गुन्ह्यांत एक नवा गुन्हा—माणसाला आपल्या नादी लावणे (फॅसिनेशन) हा—या काळात डोळ्यासमोर येतो. इंग्लंडात, किंबहुना साऱ्या ख्रिस्ती समाजात, याला चेटूक समजून गुन्हेगाराला देहांताची शिक्षा दिली जात असे. आजदेखील ज्याला 'फॅसिनेशन' म्हणता येईल असा हा गुन्हा परमार्थाच्या भपकेदार नावाखाली प्रतिष्ठापूर्वक राजरोस जोरात चालू असतो; परंतु तो हिंदूंच्या परमार्थाशी निगडित असल्यामुळे त्याकडे शासनही डोळेझाक करते. जेव्हा हे 'फॅसिनेशन' आपल्या कारभाराच्या क्षेत्रात खून, घातपात यांसारखी पातके निदर्शनास आणील तेव्हा कायदा जागा होतो, असा अनुभव आहे. आतापर्यंत कोर्टाच्या कामाला बाधणारी विघ्ने सांगून झाली. त्याशिवाय कोर्टाच्या जागेचा प्रश्न होता. 'मापला पोर' हीच काय ती एक जागा कोर्टाच्या स्वतःच्या मालकीची होती. पण त्यानंतर १८७९ मध्ये हायकोर्टाची भव्य व विस्तीर्ण इमारत उभी झाल्यापासून जागेची फिकीर मिटली.

सुप्रीम कोर्ट निर्माण झाल्यावर त्याच्या व्यवहारात पूर्वीच्या न्यायालयातील काही उणिवा गेल्या. या कोर्टांत विलायतचे बॅरिस्टर आपला धंदा करू लागले. प्रत्यक्ष न्यायदानाच्या कामात बरीच सुधारणा दिसू लागल्यामुळे कोर्टाची इभ्रत वाढली. मात्र न्यायाधीश व कंपनीचे अंमलदार यांच्यातली तेढ कायम होती. कंपनीचे अधिकारी रेकॉर्डर-न्यायाधीश यांचा पाणउतारा करीत. विलायतेहून येणाऱ्या न्यायाधीशांत या वेळी व्हिग पंथाचे वारे शिरले होते. दुसऱ्या चार्ल्सच्या मृत्यूनंतर इंग्लंडच्या सिंहासनावर बसू पाहणाऱ्या दुसऱ्या जेम्सला कसून विरोध करणाऱ्या व शेवटी त्याला इंग्लंडातून पळवून लावणाऱ्या इंग्रज राजकारणी लोकांचा व्हिग हा पक्ष होता. कोणत्याही अधिकाऱ्याची फाजील प्रतिष्ठा चालू द्यायची नाही, हा या पक्षाचा बाणा होता. त्याचा प्रभाव साहजिकच न्यायाधीशाच्या कामावर थोडाफार पडल्याशिवाय राहत नसे. परंतु ते उघड उघड अन्याय मात्र करीत नसत. न्यायदानात पुष्कळ वेळा दिसणारा गोंधळ हा कोर्टाच्या स्थापनेच्या सनदांची भाषा संदिग्ध असल्याचा परिणाम होय असे तज्ज्ञांचे मत आहे. या नव्या नव्या कोर्टांनी न्यायदानातला बराच मळ झाडून त्याची चकाकी वाढविली, हे त्यासंबंधाच्या समालोचनात कबूल केले पाहिजे. न्यायाधीश आणि गव्हर्नर यांच्या संघर्षाचा अनिष्ट परिणाम न्यायाधीशांना भोगावा लागे. सर्वसत्ताधारी गव्हर्नर ज्याला काहीशा तुच्छतेने बागवील त्याकडे 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायाने सामान्य जनतेने तशीच दृष्टी ठेवावी हे ओघानेच येते. सामान्य जनता म्हणजे अँग्लो इंडियन समाज, गोरे कामगार व तत्सम, इतर हिंदी लोक नव्हत. या अपमानकारक स्थितीला कंटाळून काही न्यायाधीश नोकरी सोडून स्वदेशी गेल्याची उदाहरणे आहेत. सुप्रीम कोर्ट १८६२ साली हायकोर्टाच्या स्थापनेनंतर लयाला गेले. १८५७मध्ये उत्तर भारतातील हिंदी लष्कराच्या बंडाळीने कंपनीच्या राज्याला खग्रास ग्रहण लागले आणि ब्रिटिश राजवंश व पार्लमेंट यांनी हिंदुस्थानाचा राज्यकारभार आपल्या हाती घेतला. कंपनीचे व इंग्लंडचे अधिकार यांचे हेवेदावेही संपले. येथील इंग्रजांचे राज्य २८२ वर्षे टिकून इतिहासजमा झाले.

मागे जी मुंबईतल्या कोर्टांची माहिती सादर केली ती कोर्टे न्यायदानाचे काम करीत होती. त्यांच्या निर्णयानुसार जे गुन्हेगार ठरले, त्यांनी तुरुंग, फटके, खोडे, किंवहुना देहांत वगैरे शिक्षाही भोगल्या. ऑजियरच्या कोर्टापासून रेकॉर्डरच्या कोर्टापर्यंत एकूण १२० वर्षे या न्यायदानाच्या नाटकाच्या प्रयोगात गेली. सन १८२४ पासून सुप्रीम कोर्ट अस्तित्वात आले, तेव्हा कोर्टाची काही शोभा वाढली. पण प्रत्यक्ष कायद्यांचा अभावच होता. ही उणीव दूर होण्यासाठी येथे कायद्याचे मसुदे तयार करून ईस्ट इंडिया कंपनीच्या वरिष्ठांकडे पसंतीसाठी गेले की तेथील शहाण्यांनी त्यांमध्ये फेरफार करून त्यांचा खरा उद्देश नष्ट करावा. सारांश, त्यांची अंमलबजावणी कधीच होऊ नये. कंपनीच्या सत्तेचा विस्तार झाल्यावर तिच्या

सत्तेखाली येणाऱ्या नव्या प्रदेशात दिवाणी व फौजदारी अदालती या नावांच्या संस्थांमार्फत न्यायदानाचे काम चालू केले. या अदालतींचे लोकांना किती भय वाटत असे याची एक आख्यायिका श्री० वी० पी० वाच्छा यांनी लिहिलेल्या 'ब्रिटिश राज्यातील न्यायदानाचा इतिहास' या नावाच्या इंग्रजी पुस्तकात पाहायला सापडते. एकदा एका खेड्यातले लोक ते खेडे सोडून पळताना डोळ्यासमोर आले तेव्हा कोणा चौकसाने 'लॉर्ड लेकच्या (हा ब्रिटिशांचा सेनापती होता) स्वारीमुळे ही पळापळ चालली आहे की काय?' असा त्या धूम ठोकणाऱ्या खेडुतांना प्रश्न केला. तेव्हा त्या चौकसाला उत्तर मिळाले की, लेकच्या भयाने आम्ही खेडे सोडून दुसरीकडे जात नसून 'अदालत' येणार आहे म्हणून आम्ही घरादारांना रामराम ठोकून निर्भय जागी जाणार आहो! या उत्तरात लेकच्या मोहिमा आणि अदालतींचा कारभार या दोन्हीवर टीका आहे असे विचार केल्यास दिसून येईल. अदालतीच्या 'इन्साफा'त जर काही दोष असेल तर त्या इन्साफांची दाद लावण्यासाठी पुढे 'सदर' नावाची एक वरिष्ठ अदालत (सदर दिवाणी अदालत) आणि तशीच सदर फौजदारी अदालत (फौजदारीच्या ऐवजी निझामत हा पर्याय आढळतो) अस्तित्वात होती. या दोन्ही न्यायदानाच्या संस्था १८६२ मध्ये अवतरलेल्या हायकोर्टाने आपल्या कारभारात जिरविल्या.

न्यायदानाचे बारीक भेद पुष्कळच आहेत. त्या सर्वांचे तपशीलवार वर्णन करणे येथे शक्य नाही, तसेच आवश्यकही नाही. उदाहरणार्थ, स्मॉल कॉजेस कोर्ट, प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटांची कोर्टे ही मुळातल्या पोलीस कोर्टाच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या होत. पोलिसांच्या उल्लेखामुळे त्यांच्या अंदाधुंदीची थोडी ओळख करून देण्याला हरकत नाही. १९ वे शतक उगवण्यापूर्वी मॅकिंटॉश नावाचा एक नामांकित इतिहासलेखक रेकॉर्डर्स कोर्टात न्यायाधीश नेमला गेला. १८११ साली त्याने रेकॉर्डरची नोकरी सोडली व तसे करताना पोलिसांच्या व्यवहारासंबंधी एक अहवाल लिहिला. त्यात त्याने पोलिसांच्या बेबंदशाहीबद्दल म्हटले आहे की, पोलीस लोक गुन्हेगार म्हणून ज्यांना पकडतात, त्यांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करून रीतसर न्याय मिळविण्याऐवजी आपणच न्याय करतात व मनास येईल ती शिक्षाही अमलात आणतात. त्याच्या अहवालाने पोलीसखात्याच्या कामाची पाहणी करण्यासाठी कंपनी सरकारने एक कमिशन नेमले. नंतर पोलिसांच्या वरील सुलतानशाहीला पायबंद बसला. परंतु गुन्हेगारांचा धिंगाणा १८५५ पर्यंत चालूच होता. तेव्हा पुन्हा एकदा पोलीसखात्याच्या कामाची कंपनी सरकारने कसून झडती घेतली. त्या वेळी १८५७ च्या उत्तर भारतातील इंग्रजविरोधी लष्करी उठावाची हवा मुंबई शहरापर्यंत पोचल्याची खबर काढून त्या हवेच्या दुष्परिणामातून मुंबई शहराला वाचविणारा अतिशय हुशार, तडफदार आणि धाडशी फोर्जेट नावाचा मुंबईच्या पोलीसखात्याचा प्रमुख होता, यामुळे पोलिसांच्या कामाच्या चौकशीचा निर्णय बराच समाधानकारक लागला. लाचलुचपतीच्या बाजारात

गोरे व काळे पोलीस सारखाच धुडगूस घालीत असल्याचे निदर्शनास आले. इतरही अनेक दोष उघडकीस येऊन पोलीसखात्याचा कारभार काही अंशी सुधारल्याचा अनुभव येऊन लोकांच्या पोलिसांसंबंधीच्या तक्रारी पुष्कळच कमी झाल्या. तथापि पोलीस शंभर टक्के चोखाळला असा मात्र या विधानांचा अर्थ नव्हे. शहरातले गुन्हे चालूच होते. घरफोडीच्या गुन्ह्याला कुलाबा, सोनापूर, गिरगाव, काळबादेवी या भागांत ऊत चढला होता. १८५५ पर्यंत मुंबईतील गुन्हेगार काही नव्या कलृप्त्यांचे गुन्हे करू लागले होते. तसे गुन्हे करणारी एक टोळी 'बंदर गँग' या नावाने पुष्कळ वर्षे भाड्याने घेतलेली जहाजे जाळून अगर बुडवून विमा कंपन्यांकडून पैसा उकळीत होती. एखादी बोट भाड्याने घ्यायची, तिच्यात कचरेवजा जिन्नस भरायचे, मग सोने, रुपे, जवाहीर वगैरे जिनसा असल्याचा विमा उतरायचा व ती बोट दूरदेशी रवाना करून सोयीच्या ठिकाणी बुडवायची किंवा भस्मसात करायची आणि याप्रमाणे कृतकृत्य झाल्यावर विम्याचे पैसे मिळवून गबर व्हायचे, असा ह्या टोळीचा धंदा होता. या टोळीत भाड्याने घेतलेल्या बोटीचे कामदारही सामील असत. अपूर्व गुन्हेगारीचा हा एक नमुना म्हणून त्याचा येथे उल्लेख केला. ह० ना० आपट्यांच्या एका सामाजिक कादंबरीत असल्या गुन्हेगारांच्या कारस्थानाची एक गोष्ट चितारली आहे. 'सोनेरी टोळी' या किंवा या आशयाच्या नावाने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठीच नव्हे तर भारतीय वाङ्मयात यांची फुलोरा दिसत होता.

हायकोर्ट अस्तित्वात आल्यावर न्यायदानाच्या कार्याला बरीच शिस्त लागली. त्याचा दर्जाही वाढला. सुप्रीम कोर्टाच्या कामकाजात विलायतचे बॅरिस्टर भाग घेऊ लागले होते. हायकोर्टात त्यांचाच भरणा अधिक होता. पण ही स्थिती फार दिवस टिकली नाही. १८७० सालापासून विलायतेस जाऊन बॅरिस्टर होऊन इंग्रज बॅरिस्टरांशी यशस्वी स्पर्धा करणारे हिंदी बॅरिस्टरही मुंबईस दिसू लागले. बद्रुद्दीन तय्यबजी, फिरोजशहा मेथा हे पहिल्या बॅरिस्टरांपैकीच होत. हायकोर्टात सुरुवातीस देशी भाषेतून काम चालविणारा एक भाग होता. हायकोर्टाच्या आधी कोर्टातून देशी भाषेतून जो थोडाफार व्यवहार चाले, त्याला इंग्रजी भाषेच्या नव्या व्यवहाराने एकदम खो बसू नये व त्यावर कमाई करणारे आणखी काही काळ तगावे, हा त्या हिंदी विभागाचा हेतू होता. पण तो विभाग अल्पावधीतच निकालात निघाला. हायकोर्टाच्या शाही सनदेत सात कायम न्यायमूर्ती असावे असा दंडक होता व त्याचा अंमल इंग्रजी राज्यात चालू होता. इंग्रजाबरोबर हिंदी न्यायमूर्तीही हायकोर्टात नेमले जाऊ लागले.

प्रकरण दहावे

शिक्षणाचा प्रारंभ व प्रसार

एकोणिसाव्या शतकाच्या उदयकाळी ईस्ट इंडिया कंपनीचा शुद्ध व्यापारी पेशा संपला आणि केवळ राज्यकर्तृत्वाची जबाबदारी कंपनीकडे राहिली. तेव्हा हिंदी जनतेला शिक्षणाने शहाणे करून सोडावे, या आकांक्षेला सफळ करण्याचा उद्योग कंपनीच्या सूत्रधारांनी हाती घेतला. आजचे भारतीय स्वराज्य वा स्वातंत्र्य हा त्या विद्यादानाचा अपेक्षित परिणाम आहे. मुंबई बेटात शिक्षणकार्याची मुहूर्तमेढ रोवली तेव्हा माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा मुंबई इलाख्याचा गव्हर्नर (आजच्या भाषेत राज्यपाल) होता. एल्फिन्स्टन हा पायापुरता पाहणारा पुरुष नव्हता. कंपनीच्या नोकरीत त्याने जवळजवळ सारा देश पालथा घातलाच, पण देशाबाहेर काबुल-सारख्या अफगाण राजधानीतही कंपनीचा प्रतिनिधी या नात्याने त्याला काही वर्षे काढावी लागली. कंपनीत नोकरी लागून तो हिंदुस्थानामध्ये आला तेव्हा पोर-वयाचा होता. शिक्षणही फारसे झाले नव्हते. त्याने नोकरीनिमित्त आशियातील पर्शियन (फारसी) सारख्या भाषांचे ज्ञान संपादन केले आणि त्यातील वाङ्मयाच्या व्यासंगामुळे त्याची विद्वानांत गणना होऊ लागली. हिंदी जनतेला युरोपातील शास्त्रे शिकवावी अशी तीव्र इच्छा एल्फिन्स्टनलाही असल्यामुळे मुंबई बेटाचाच नव्हे तर पेशवाईच्या अस्ताने साऱ्या मुंबई इलाख्याचा राज्याधिकार प्राप्त होताच तो शिक्षणाच्या कामाकडे वळला.

परंतु सरकारची शिक्षणसंबंधात हालचाल सुरू होण्यापूर्वी ख्रिस्ती मिशनरी या देशात शिक्षणाचे पीक काढण्याच्या उद्योगास लागले होते. मिशनरी म्हणजे ख्रिस्ती धर्मप्रसारक. त्यांच्या विद्यमाने होणाऱ्या धर्मप्रसाराने, न जाणो, हिंदुस्थाना-तील प्रजा बिथरून इंग्रजी राज्याच्या द्रोहाकडे झुकेल असा संशय इंग्रज राज्यकर्त्यांना सदैव भेडसावीत असल्याने इंग्रज मिशनऱ्यांना हिंदुस्थानात उतरूही देत नसत. उतरल्यास त्यांना हद्दपार करीत. १९ व्या शतकाच्या अगदी प्रारंभी आलेले मिशनरी हिंदुस्थानात उतरू देत नाहीत म्हणून बंगालमधील श्रीरामपूर गावी जाऊन राहिले. हा गाव युरोपातील हॉलंडच्या मालकीचा होता, म्हणून तेथे हे मिशनरी सुरक्षित वस्ती करू शकले. १८११ साली अमेरिकेतून जे तीन मिशनरी आले त्यांत एक स्त्री

होती. त्यांना येथे आल्यावर दोन वर्षांनी वास्तव्य करण्याची सरकारातून परवानगी मिळाली. हे अमेरिकन येथे आले त्याआधी नुकतेच त्यांचे तेथील स्वातंत्र्ययुद्ध संपले होते. त्याची कडवी आठवण ताजी असताना पूर्वोक्त मिशनरी येथे येण्याला निर्भयपणे धजावतात व त्यांना इंग्रजांचे कंपनी सरकार येथे आपले स्वधर्मप्रसाराचे काम करण्याला पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचे वैर विसरून परवानगी देते, हा एक लहानसा चमत्कारच वाटतो. येथे स्थिर होताच या मिशनऱ्यांनी मराठी भाषेच्या प्रदेशात आपले काम सुरू केले, कारण त्याच संकल्पाने ते इकडे येण्यास निघाले होते. त्याचे केंद्र हल्ली अहमदनगर येथे असून त्याचे कामही जोरात चालू आहे. ह्या मिशनमार्फत मुंबईत मुलांच्या मागून मुलींच्या शाळा उदयास आल्या. १८४२ साली 'ज्ञानोदय' या नावाचे एक वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. लोकशिक्षणाचा विषय मिशनऱ्यांना आधीच्या शतकात अपरिचित नव्हता. मिशनरी हे एका अर्थी धर्मगुरूच मानले तर इंग्रजांपूर्वी पोर्तुगीजांच्या काळात मिशनरी हे ख्रिस्ती धर्माच्या अनुषंगाने लोकशिक्षणाचेच कार्य करीत होते असे म्हणता येईल. हिंदुस्थानात इंग्रजांनी चालविलेले विद्यादान धर्मनिरपेक्ष होते.

मिशनऱ्यांच्या मागून लवकरच सरकारी पातळीवर मुंबईत शिक्षणक्षेत्र उघडले गेले. त्यापूर्वीचे शिक्षणकार्य प्राधान्याने गोऱ्या-काळ्या ख्रिस्ती मुलांकरिता चालू होते. १८१५ मध्ये जन्मास आलेल्या 'बॉंबे एज्युकेशन सोसायटी'ने मात्र केवळ युरोपियन मुलांना शिक्षण देण्याची दिशा सोडून हिंदी मुलांना आपल्या शाळांतून दाखल होण्याची मोकळीक ठेवली; तसेच आपले कार्यक्षेत्र मुंबईएवढेच मर्यादित न ठेवता मुंबईच्या बाहेरही नेले. मुंबईत या सोसायटीने हिंदी विद्यार्थ्यांसाठी १८२०-पर्यंत चार शाळा निर्माण केल्या होत्या. १८२२ मध्ये बॉंबे एज्युकेशन सोसायटीनेच 'एल्फिन्स्टन नेटिव एज्युकेशन इन्स्टिट्यूशन' या नावाची दुसरी संस्था काढली व युरोपियन आणि युरेशियन मुलांना शिकविण्याचा पहिला उद्देश अंमलात ठेवला. नव्या संस्थेने हिंदी मुलांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. यामुळे संस्थेने आपले पहिले नाव बदलून 'धी बॉंबे नेटिव स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' अशा नव्या नावाने ही संस्था आपल्या कामास लागली. इंग्रजी भाषेच्या वर्गावर इंग्रज शिक्षक नेमण्यात आला. १८२५ मध्ये शिक्षणकार्याचे ज्ञान संपादन केलेले एकूण चोवीस जण गुजरात, कोकण व वाटावरील महाराष्ट्र या प्रदेशांत स्थापन झालेल्या व होणाऱ्या शाळांतून शिकविण्यासाठी पाठविण्यात आले. याच वर्षी सोसायटीने स्थापत्यशास्त्राचा (इंजिनियरिंग) वर्ग काढला. देशी भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. त्या वर्गात गणित व भौतिकशास्त्रे यांचे ज्ञान हे सामान्य शाळांतल्या वर्गांहून जास्त शिकविले जात असे. त्यात यांत्रिक विद्येचाही समावेश होता. स्थापत्यशास्त्राचा वर्ग काढण्याची कल्पना सोसायटीचे चिटणीस कॅप्टन जर्व्हिस यांची व ती उचलून धरणारे होते गव्हर्नर एल्फिन्स्टन. यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात ती यशस्वी ठरली.

समाजसुधारणेतील अत्यंत प्रक्षोभक विषय जो स्त्रीशिक्षण, त्याचेदेखील मंगलाचरण मिशनऱ्यांनीच केले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. सर्वप्रथम आलेल्या अमेरिकन मिशनऱ्यांनी १८१५ मध्ये हिंदू मुलांकरिता शाळा सुरू केली; १८२४ साली मुलींची शाळा स्थापिली आणि पुढे दोनच वर्षांत त्यांची संख्या नऊ झाल्याचे आपल्या कामाच्या अहवालात जाहीर केले. शिकणाऱ्या मुलामुलींची संख्या मिशनऱ्यांची निराशा करणारी नव्हती. अमेरिकनांमागून चर्च मिशनरी सोसायटीचे लोक पुढे आले. त्यांनी नीतिबोधपर पुस्तके १८२० साली मुलांना शिकविण्याच्या उद्देशाने छापली व मुलांकरिता शाळाही काढली. १८२६ मध्ये मुलींचीही शाळा चालू केली. याच सोसायटीच्या विद्यमाने इंग्रजी व देशी अशा दोन्ही भाषा एकत्र शिकविणारी एक शाळा १८३५ साली उदयास आणली. तिचे नाव 'रॉबर्ट कॉटन मनी' असे ठेवण्यात आले, कारण ज्या गृहस्थाचे स्मारक या नात्याने त्या शाळेचा जन्म झाला होता ते रॉबर्ट कॉटन मनी हे सरकारी शाळाखात्याचे सेक्रेटरी होते. प्रस्तुत शाळेसाठी त्यांच्या चहात्यांनी एक फंड उभारला होता. त्या फंडाच्या रकमेतून १८५७ साली शाळेची इमारत उभारली गेली. १८४० मध्ये या शाळेचे दोन विद्यार्थी ख्रिस्ती झाल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या एकदम घटली; पण विद्यार्थ्यांची संख्या खालावण्याचा हा प्रकार फार दिवस चालला नाही. ख्रिस्ती धर्मदीक्षेने उठलेले वादळ लवकरच शमले व पुन्हा विद्यार्थ्यांचा शाळेत भरणा होऊ लागला. ती शाळा आजवर जिवंत आहे.

वरील सर्वांमागून स्कॉटिश मिशनरी सोसायटीचे मिशनरी डॉ० जॉन विल्सन हे सहकुटुंब मुंबईत आले. आणि विविध स्वरूपाची कामगिरी बजावून चिरप्रसिद्धी पावले. त्यांच्यासंबंधीची मुंबईकरांची कृतज्ञता 'विल्सन हायस्कूल'ची खेतवाडीतील इमारत व विल्सन कॉलेजची चौपाटीस लागून उभी असलेली इमारत या रूपाने मूर्तिमंत दृश्यमान आहे. विल्सन यांनी आरंभिलेल्या शिक्षणकार्यात त्यांची पत्नीही सहभागी होती. तिने १८२९–३० सालात मुलींच्या सहा शाळा काढल्या. १८३२ मध्ये डॉ० विल्सन यांनी लोकाश्रयाने मुलांची शाळा जन्मास घातली. या शाळेचे वैशिष्ट्य हे की तेथे इंग्रजीप्रमाणे देशी भाषाही एकाच वेळी शिकविली जात असे. १८३८पासून तिला 'फ्री जनरल असेंब्लीची शाळा' असे नाव देण्यात आले.

आतापर्यंत आपण मुलींच्या किती शाळा व त्या कोणी स्थापन केल्या याची माहिती पाहिली. तसे करीत असताना कुठेही या शाळांना सक्रिय विरोध झाल्याचे उदाहरण पुढे न आल्याचे आश्चर्य वाटेल. याचा अर्थ स्त्रीशिक्षणाला तेव्हा विरोध नव्हता असा नसून तो क्रियेत उतण्याइतका उग्र नव्हता असा समजावा लागतो. तो वाचाळ होता यात मात्र संशय नाही. ही वाचाळता लेखांतून, व्याख्यानांतून तर कधी पद्यरचनेतून प्रगट व्हायची. यापुढे क्वचित मजल गेलीच तर ज्ञातिबहिष्कारापर्यंतच हा विरोध थांबायचा. पण मुंबईस डॉ० भाऊ दाजी लाड व श्री० नाना शंकरशेट यांना बहिष्काराची धग कधीच लागली नाही.

इंग्रजांनी व काहीसे त्यापूर्वी परदेशी मिशनऱ्यांनी हिंदी मुलामुलींच्या शाळा भराभर अस्तित्वात आणून जे महत्त्वाचे कार्य उत्साहाने व चिकाटीने सुरू केले त्याची हकीकत वाचताना वाचकांच्या मनात प्रश्न येईल की, इंग्रज राज्यकर्ते व ख्रिस्तभक्त मिशनरी यांच्या शिक्षणकार्यापूर्वी मुंबईतील जनतेला शाळा, शिक्षण यांची मुळीच ओळख नव्हती काय? हिंदुस्थानाचा इतिहास ठाऊक असणारांना हा प्रश्न अगदी अनाठायी वाटेल. मुंबईच्या जनतेला शाळाविषयक ज्ञान, इंग्रजांच्या हाती मुंबई वेट येण्यापूर्वी तेथे पोर्तुगीजांच्या शाळा असल्याने होते. मुंबईनजीकच्या वांद्रे या वेटात तर पोर्तुगीजांनी विश्वविद्यालय समजावे अशा वैभवाचे एक महाविद्यालय उभारले होते; पण ते केवळ ख्रिस्तीधर्माचे शिक्षण देण्यासाठी होते. इंग्रजांच्या शाळा सर्व प्रकारच्या व्यवहारोपयोगी विषयांचे ज्ञान नव्या पिढीला देण्यासाठी होत्या. हा दोन्हीतला भेद विसरता येण्याइतका क्षुद्र नाही. इंग्रजांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. मिशनऱ्यांनासुद्धा धर्मसंबंधात आपली ख्रिस्तभक्ती शिकणारांची मने बिथरणार नाहीत अशा कटाक्षाने शिकवावी लागे. शाळेत शिकविण्यासाठी जी पाठ्यपुस्तके नेमली जात, त्यांत धर्मचर्चा टाळलेली असे. ख्रिस्ती धर्माला मूर्तिपूजा अमान्य आहे, तशीच ती मुसलमानांच्याही तिरस्काराचा विषय आहे, इकडे लक्ष देऊन जी क्रमिक पाठ्यपुस्तके नव्याने तयार करण्यात आली त्यांतील गद्यपद्यांत कुठेही चुकूनसुद्धा मूर्तीचा गंध येणार नाही अशी खबरदारी घेतली जात असे. पाचवीनंतरच्या वरील वर्गांसाठी मात्र जुन्या वाङ्मयातील भाषेच्या दृष्टीने मनोवेधक उतारे प्रकाशित करीत असत. दशावतार किंवा इतर हिंदुदेवतांचे स्तोम क्रमिक पुस्तकांतील मजकुरात येऊ द्यायचे नाही, अशा दक्षतेने ती पुस्तके रचली जात.

इंग्रजांनी नवी शिक्षणपद्धती अमलात आणली तेव्हा काही काळ व त्यापूर्वी सदैव हिंदुस्थानातील मुले निरक्षर राहत होती अशी कल्पना करून घेण्याचे कारण नाही. ब्राह्मणांप्रमाणे अब्राह्मणदेखील गरजेप्रमाणे (कामापुरते) शिकत असत. पहाटे स्तोत्रे, भूपाळ्या वगैरे तोंडपाठ म्हणायची; संध्याकाळी देवापुढे मुलांनी परवचा म्हणायचा म्हणजे बाराखड्या, पाढे वगैरे मिळविलेल्या ज्ञानाची उजळणी करायची, घरातल्या सविद्य वृद्धांनी देवावतारांच्या कथा सांगायच्या, वगैरे शिक्षणाचा प्रघात इंग्रजी पद्धतीच्या शाळा उघडल्या जाण्यापूर्वी थोड्याफार प्रमाणात साऱ्या देशात सर्वत्र चालू होता. अव्वल इंग्रजीतदेखील तशा शाळा मुंबईत चालू होत्या. एखाद्या स्वयंप्रेरित शिक्षकाने, पंतोजीने किंवा मेथाजीने एखाद्या मोठ्या घराच्या मोकळ्या ओसरीवर त्या व आजूबाजूच्या घरांतील शिकाऊ मुले गोळा करायची व त्या एकट्या शिक्षकाने साऱ्या मुलांना शिकवायचे. फी दर महिन्याला गुरुजीला द्यायची नाही. पाडवा, दसरा, दिवाळी वगैरे सणांत गुरुजीला वस्त्रे, पात्रे, रोकड, धान्य, मिठाई इत्यादी वस्तूंच्या रूपाने जे प्रत्येक विद्यार्थ्याकडून मिळेल ती गुरुजीची मिळकत. चूक करणाऱ्या विद्यार्थ्याला क्रूर म्हणता

येण्यासारखा शरीरदंड सोसावा लागे. शिक्षांमध्ये छडीचा मार हा अगदी सामान्य असे; त्यावरूनच 'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' ही म्हण रूढ झाली आहे. तशा अर्थाच्या म्हणी जगातल्या सर्व भाषांतून सापडतात. ओसरीवरल्या (देवळातल्या, मठातल्या) शाळांतून वाके, खुर्च्या नसत; मुलांनी फाटकी पोती बैठकीकरिता वापरायची. छापखान्याच्या अभावी पाठ्यपुस्तकेही नव्हती. ज्ञानाचे विषय व त्यांची इयत्तावार वाटणी, निरनिराळे विषय शिकविण्यासाठी पृथक पृथक शिक्षक, शाळांतून विषयवारीने शिकविण्याच्या वेळा ठरविलेल्या, परीक्षा, इत्यादी प्रकार इंग्रजांनी सुरू केले. अलिकडे अनेक वर्षांपासून शिक्षांचे सत्र अजिबात बंद नसले तरी त्याचे प्रमाण व प्रकार अतिशय कमी झाले आहेत. त्या शिक्षांचे नाव आणि स्वरूप एका जुन्या पुस्तकातून वाचकांच्या माहितीसाठी पुढे उतरून घेतले आहेत :

१ वेताच्या बारीक छड्या मारणे. २ उठाबशा करविणे. ३ आंगठे धरविणे. ४ मानेवर गुंज अथवा खडा ठेवणे : मानेवरून गुंज अथवा खडा पडला तर मार पुन्हा मिळत असे, सबब मुले चिकट पदार्थ मानेस लावीत असत. ५ बोडीवर चढविणे. ६ पाणमुत्री मारणे. पाणमुत्री म्हणजे झाऱ्यासारख्या आकृतीची लाकडाची मध्ये भोके पाडलेली वस्तू बनवीत असत. ती गुरुराज विद्यार्थ्यांच्या हाताची बोटे जरा वाकवून तळहातावर आठदहा वेळा किंवा रागाच्या प्रमाणात मारीत असत. ७ कोलदांडा घालणे. कोलदांडा म्हणजे दोन्ही हात बांधून हातांत गुडघे आणायचे आणि हात व गुडघे यांच्यामधील पोकळीत आडवी काठी घालून ठेवायची. नंतर त्याला त्या स्थितीत उताणा ठेवायचा. या सर्व शिक्षांचा अनुभव लेखकाने घेतला आहे.

या वेळी मुलांना अभ्यासाची पुस्तके आपल्या खर्चाने विकत घ्यावी लागत नसत. सरकारातून एक किंवा दोन प्रती शाळेकरिता येत असत. त्या पंतोजी वाचीत असे; कधीकधी मुलांस वाचण्यास देई आणि त्या मुलाने वाचायचे व इतर मुलांनी ऐकायचे, असा अभ्यास चाले. दरम्यान इतर मुले अभ्यास बरोबर करीत आहेत किंवा नाहीत हे पाहून गडबड करीत असतील तर एक वार 'हुस्य' म्हणून पंतोजीने तोंडाने वाजवायचे. इकडे पंतोजीने पुढे घेतलेल्या मुलाचे वाचन किंवा हिशेब चाललेले असतच. इतक्यात कधीकधी जसे चित्र्याचे टिपण अचूक सावजावर जाऊन पडते, त्याप्रमाणे जो मुलगा शेजारच्या मुलाशी बोलत असेल अगर खाली लिहीत नसेल त्यावर पंतोजी तेथे एकदम जाऊन पडत; मग त्याजवर छड्या पाचचार पडायच्या. इकडे वाचन चाललेच आहे. कधीकधी पहिल्या वर्गातील मुलास इतर मुले चूप राखण्याकरिता शाळेचे मध्यभागी उभे करीत असत. प्रत्येक खर्ड्यावर बसलेल्या मुलापुढे एक-एक धुळाक्षराचा मुलगा असायचा; त्याने दररोज एकीकडे कित्ता वळविणे, शिवाय दररोज ठरली असतील तितकी खर्डी लिहिणे व एकीकडे त्या मुलाची उजळणी घेणे, त्यास धड्याची वाचणी देणे, असा विद्याभ्यास चालत असे.

शाळेत जी पुस्तके चालत त्यांत लघुहितोपदेश, सरकारी कायदे, लिपिधारा, रेशीम

पिकविण्याचे बुक, महाराष्ट्र वखर, शाळापद्धती, बालमित्र, नीतिकथा, संक्षेप वखर, मुलासाठी लहान धडे, सारसंग्रह, कर्तव्य भूमिती, पंचोपाख्यान, उपयोगी ज्ञान, इसापनीती, महाराष्ट्र भाषेचा कोश, बालव्याकरण, भूगोल, पूर्णांक अपूर्णांक, इतकी पुस्तके सन १८४६ साली वसई येथील शाळेत होती.

वरची माहिती ग्रथित केली आहे ती वसईचे गोविंद बाबाजी जोशी नावाच्या एका सद्वृत्त गृहस्थाच्या डायरीतून घेतलेली आहे. त्याने १८४६ मध्ये वसई सोडून तो आपल्या इष्टकार्यासाठी प्रवासार्थ निघाला. शेवटी बडोद्यास त्याने आपली भ्रमंती १८९६ मध्ये थांबविली. कलकत्त्यात लोकांची गाऱ्हाणी सरकारास कळविणारी एक संस्था निघाल्याची आणि तिच्या कामाची हकीकत ऐकल्यानंतर तशा संस्था किंवा सभा आपल्या प्रदेशात स्थापन कराव्या या कर्तव्याचा ध्यास त्याच्या मनाने घेतला आणि त्याने गावोगाव हिंडून सभा भरविण्याचे काम अविश्रांतपणे आरंभले. १८४६ ते १८९६ पर्यंत पन्नास वर्षे हे काम करताना ठिकठिकाणी जे भलेबुरे अनुभव आले, त्यांची शक्य तो सविस्तर नोंद त्याच्या या पुस्तकात आढळते. पुस्तकाचे समग्र नाव 'गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अथवा माझे प्रवासाची हकीकत (रोजनिशी) गोविंद बाबाजी जोशी, सरकारी भाषण करणारे, निसबत श्रीमंत गायकवाड सरकार सन १८९६' असे पुस्तकाच्या पहिल्या पानावर छापले आहे. लेखकाचा मूळ हेतू यशस्वी झाला नसावा असे हे पुस्तक वाचल्यावर वाटते. पण ते वाचताना गावोगावची इतर पुष्कळ उपयुक्त व मनोरंजक माहिती सापडते, म्हणून या पुस्तकाचा शाळांतील निर्दय शिक्षा व शाळांतील शिक्षणाची तऱ्हा एवढ्यापुरता आधार घेतला आहे. मुंबईच्या इतिहासात वसईच्या गृहस्थाचा आधार असंबद्ध वाटण्याचा संभव आहे. त्याच्या परिहारार्थ सुचविणे अवश्य आहे की, मुंबई वेटाच्या गॅझेटियरमध्ये काव्राजी नामक एका पार्शी लेखकाच्या पन्नास वर्षांपूर्वीच्या म्हणून १९०१ साली ज्या आठवणी टाइम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिद्ध झाल्या त्यांतला एक उतारा छापला आहे. त्यात शाळेत शिकत असताना ज्या शिक्षा भोगाव्या लागत त्यांतली एक नमुन्यादाखल म्हणून मुलाला पायाचे आंगठे धरून उभे करण्याच्या शिक्षेचा उल्लेख आहे. तेव्हा त्या शिक्षेच्या संदर्भाने गो० बा० जोशी यांच्या पूर्वोल्लेखित पुस्तकातील शिक्षांची यादी दिल्यास, १८४६ पूर्वीच्या शाळांतील शिक्षांचा विषय स्पष्ट होईल हे उघड आहे. शिवाय, वसई आणि मुंबई ही स्थळे एकमेकांच्या अगदी जवळजवळ आहेत हेदेखील या प्रकरणी ध्यानात ठेवणे बरे.

एकीकडे शाळा एकामागून एक उदयास येत होत्या, त्यात मुलांची भरती चालू होती, शाळेत शिकविण्यासाठी नेमलेल्या विषयांची पुस्तके मराठी भाषेत तयार करून ती भराभर छापली जात होती. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, मागे जी पुस्तकांची यादी दिली आहे, ती सर्व व त्याशिवायची पुस्तके १८४० पर्यंतच्या काळात प्रकाशित झाली होती. मात्र ही पुस्तके इंग्रजी पुस्तकांची मराठी भाषांतरे

होती. मुलांच्या बुद्धीची झेप लक्षात घेऊन तिच्या आटोक्यात येतील अशा योग्यतेची इंग्रजी पुस्तके भाषांतरासाठी निवडण्याची जबाबदारी शाळाखात्याच्या इंग्रजी अधिकाऱ्यांवर होती. या अधिकाऱ्यांचे कौतुक हे की, ते बहुतेक सारे जण मराठी भाषेत निपुण होते. त्यांच्या हाताखाली निवडक शास्त्रीमंडळी नेमलेली असल्याने, भाषेच्या दृष्टीने या ग्रंथरचनेत न्यून राहत नसे. अर्थात त्या वेळी जी भाषा रूढ होती तिच्यात आजचे सौंदर्य व समृद्धत्व दिसणार नाही, याचे नवल वाटावयास नको. तेव्हाच्या शालोपयोगी पुस्तकांनी जगातील अनेक प्रगतिकारक ज्ञानक्षेत्रांची सर्व देशी भाषिक विद्यार्थ्यांना ओळख करून दिली आणि देशातील सर्व ठिकाणच्या जनतेचा ज्ञानमार्ग खुला करून दिला, हे कबूल करण्यास हरकत नसावी. शिक्षणाच्या प्रारंभकाळी त्यात भाग घेणारे इंग्रज व हिंदी (महाराष्ट्रीय) हे दोघेही विद्यार्थ्यांसंबंधात अतिशय आस्था बाळगणारे होते. त्यांच्या कामात कधीकधी जाति-भेदाची ठेच लागत असे. ब्राह्मण हा ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवायला कांकू करी, कारण ती भाषा देवाची. ब्राह्मणेतर ती भाषा शिकून तिला भ्रष्ट करतील हे भय. सन १८२६च्या सुमारास शूद्र विद्यार्थ्यांच्या एल्फिन्स्टन शाळेतील शिकण्यावर एकाएकी बंदी घालण्यात आली. संस्कृत भाषा भ्रष्ट होईल हे भय या बंदीमागे नव्हते. खालच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या जातींचे शिक्षण उच्चवर्णीयांच्या पोटावर पाय आणील अशी धास्ती शाळेच्या व्यवस्थापक मंडळींतील एका वजनदार सभासदाने घेतली व त्याने इतर जोडीदारांचे कान फुंकून ही बंदी कृतीत उतरवली. शूद्र मुलांना शाळेतून काढले. त्या वेळी या प्रकरणाचा गवगवा होऊन हे प्रकरण थांबले. ही माहिती मराठीचे पहिले व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांच्या, अ० का० प्रियोळकर-संपादित, आत्मचरित्रातून दिलेली आहे. तेथे 'शूद्रा'चे स्पष्टीकरण 'मराठे, कोळी, कुळंबी, भंडारी' या जातींची मुले असे केलेले आहे. या वेळी स्पृश्यास्पृश्य-विचाराचा उपद्रव शाळांतून उपस्थित झालेला नव्हता. पुढे लवकरच शाळा-खात्याच्या अधिकाऱ्यांमध्ये त्याचा खल होऊ लागला, याची साक्ष विद्याखात्याच्या काही वार्षिक रिपोर्टांतून दृष्टीस पडते.

शाळांतील जातवारीच्या प्रश्नाची तीव्रता काहीशी मावळत असता पुण्याच्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाने सामाजिक समतेच्या व्यापक तत्त्वाचे खतपाणी पुरवून तिला जास्त मूलग्राही रूप दिले, हे येथे नमूद केल्यास ते अनाठायी ठरणार नाही. महात्मा फुल्यांनी सनातन्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पुणे शहरात सर्वसामान्य जनतेच्या विरोधास पात्र ठरलेल्या मुलींचे शिक्षण व अस्पृश्यांचे शिक्षण या दोन्ही गोष्टी सुरू केल्या हे त्यांच्या कर्तृत्वाचे वैशिष्ट्य शिक्षणाच्या संदर्भात विसरून चालणार नाही. तथापि त्याबरोबर हेसुद्धा लक्षात ठेवणे अवश्य आहे की, मुंबई शहरात मुलींचे शिक्षण ही मिशनऱ्यांच्या विद्यादानाची एक महत्त्वाची शाखा होती. मिशनरी शाळांतून जातवारीच्या कृत्रिम भेदाचा आदर होत

नसे. मुंबईत मुलींच्या शाळा-शिक्षणाचा व्यवसाय सरकारी पातळीवर सुरू झाल्या दिवसापासून सर्व लोकांच्या पुढे होता. नंतर उच्च शिक्षण संपादून सरकारी नोकरी किंवा डॉक्टर, वकील वगैरे व्यवसायांच्या जोरावर लोकांत मान्यतेस चढलेल्या अनेक व्यक्तींनी स्त्रीशिक्षणाचा उघड सक्रिय पुरस्कार आरंभल्यामुळे विरोधाची धार बोथटत चालली. सांप्रत स्त्रीशिक्षणाचा विरोध हा आपल्या शंभर वर्षांमागील पूर्वजांचा असमंजसपणाचा हास्यास्पद विषय झालेला आहे.

मुंबईत प्रसंगाप्रसंगाने जी महाविद्यालये उदयास आली, त्यांत १८४५ साली स्थापन झालेल्या ग्रँट मेडिकल कॉलेजला विशेष महत्त्व आहे. ज्याच्या नावाने हे महाविद्यालय निघाले, तो ग्रँटसाहेब मुंबईचा गव्हर्नर (राज्यपाल) होता. त्याला वैद्यकाची नागरिकहिताच्या दृष्टीने फार तळमळ असल्याबद्दल लौकिक होता. परंतु तो एकाएकी वारल्यामुळे त्याची तळमळ सार्थकी लावण्यासाठी लोकांनी द्रव्य गोळा करून हे कॉलेज उभारले. आगगाडीच्या वेळी जशी मूर्खपणाने लोक भाकिते वर्तवीत होते, तशीच भाकिते याही वेळी वर्तविण्यात आली होती. ब्राह्मणादी वरच्या वर्गातील मुले या विद्यालयात जाणार नाहीत, कारण काय तर तेथे शरीराच्या ज्ञानाप्रीत्यर्थ प्रेतांची करावी लागणारी चिरफाड हे होय. हे कारण पारशी समाजाला भेवडावीत होते. चिरफाडीने वाटणारा अपवित्रपणा धुऊन निघण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता एका उदारात्म्याने कॉलेजात स्नानगृहाची व्यवस्था केली व ही अपवित्र होण्याची भीती गेली. मुंबई इलाख्यात मुंबईखेरीज इतर शहरांतून दुसऱ्या अनेक लोकोपयोगी विषयांची महाविद्यालये स्थापन झाल्यामुळे मुंबईच्या विद्यापीठाला कोणत्याही ज्ञानक्षेत्राची उणीव राहिली नाही.

वैद्यक महाविद्यालयात देशी भाषेतून (मराठी, गुजराती) शिक्षण देण्याच्या हेतूने एक एक वर्ग काढण्यात आला होता. थोड्याच अवधीत हे वर्ग बंद करण्यात आले. भारतात शिक्षणाचे कार्य चालू असता लंडनला कंपनी सरकारला येथे कारभाराची नवी सनद देण्याचा संकेत ठरवला जात होता. त्याचा परिपाक १८५४-मध्ये येथे पोचला व तदनुसार इकडे कार्यवाही अमलात येऊ लागली. १८५७ साली शिपाईगर्दी उसळली होती तरी इंग्रजांनी कलकत्ता, मद्रास, मुंबई या तीन शहरांत विद्यापीठे (युनिव्हर्सिटी) उभारली आणि उच्च शिक्षणाचा मार्ग बांधला. विद्यापीठ हा खऱ्या विद्वत्तेचा आखाडा मानल्यास चूक होणार नाही. विद्यापीठाने आपल्या परीक्षांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्या देण्याचा प्रघात पाडला. त्या पदव्यांचा लोकांत व सरकारात आदर वाळगला जात असे. विद्यापीठातून शिकणाऱ्यांना उत्तेजन म्हणून उदार धनिकांनी विद्यापीठात पैसा भरून छात्रवृत्ती, देणग्या, पदके, रोकड बक्षिसे वगैरे ठेवली व ती योग्य विद्यार्थ्यांना दरसाल वाटली जाऊ लागली. जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप या मॅट्रिकच्या परीक्षेमध्ये संस्कृत भाषाविषयात पहिल्या-दुसऱ्या क्रमांकाने यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या छात्रवृत्तींचा उल्लेख

येथे केवळ उदाहरणादाखल केला आहे. अशा शाबासकीवजा देणग्या हे विद्यार्थ्यांना विलोभन होते. कॉलेजातील साऱ्या विषयांचे शिक्षण एका इंग्रजी भाषेत होत असल्याने युनिव्हर्सिटीत शाळाशिक्षणाची अंतिम मर्यादा मॅट्रिक्युलेशन परीक्षा ठेवली होती, तिच्यातले यश हे विद्यापीठाचे प्रवेशद्वार. येथून पुढे वैद्यक, स्थापत्य यांतला जो विषय घ्यावासा वाटेल तो घ्यावा. शिकण्याच्या प्रत्येक विषयाच्या पदव्यांची नावे भिन्न होती. वैद्यक–जी० जी० एम्० सी० एल्० एम्० अँड एस्० आता एम० बी० बी० एस्०. स्थापत्य–एल्० सी० ई०–आता बी० ई०. कायदा–एल्एल्० बी०. या परीक्षेच्या आधी विद्यार्थी बी० ए० ची परीक्षा पास झालेला असला पाहिजे अशी अट होती.

विद्यापीठाच्या पदव्यांसाठी विद्येच्या ज्या निरनिराळ्या शाखा महाविद्यालयांतून शिकविल्या जात, त्यांची सामान्य जनतेमध्ये योग्यता वाढली. शालान्त परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यापेक्षा विद्यापीठाचा पदवीधर ज्ञानाने श्रेष्ठ असा वाजवी समज लोकांत रूढ झाला. परंतु गेल्या शतकाच्या अखेरीअखेरीस देशामध्ये इंग्रज राज्यकारभाराविषयी असंतोष वाढत जाऊन शेवटी त्याला उघड राजद्रोहाचे रूप आल्याने त्याचे मूळ इंग्लंडच्या इतिहासाच्या शिक्षणात असल्याचा शोध इंग्रज राज्यकर्त्यांनी काढला व त्याचे शिक्षण महाविद्यालयातून बंद करण्यापर्यंत राज्यकर्त्यांनी आपल्या दडपशाही विचारांची मजल नेली. परंतु त्या मजलेने कसलाच लाभ राज्यकर्त्यांच्या पदरात पडला नाही. उलट, कोंबडा झाकून ठेवल्याने सूर्योदय होणार नाही, या गावढळ समजुतीप्रमाणे इतिहासशिक्षणाची बंदी हास्यास्पद ठरली. एल्फिन्स्टनने शिक्षणपद्धती अस्तित्वात आणतेवेळी आपल्या एका राज्यसहकाऱ्याशी बोलताना शिक्षणाचे अंतिम फळ इंग्रजी राज्याचा अस्त हा असून ज्या दिवशी हे फळ दृष्टीस पडेल तो दिवस आपल्या देशाच्या इतिहासात अत्यंत गौरवाचा ठरेल असे भविष्य उच्चारले. मागे जो राज्यद्रोह वर्णिला तो या भविष्याचे प्रसादचिन्ह समजायला हरकत नाही. इंग्रजांच्या शिक्षणाने सारा हिंदुस्थान ख्रिस्ती धर्म स्वीकारील असे मेकॉलेसाहेबाचे भाकीत त्याच्या चरित्रात उपलब्ध आहे. ते खरे ठरवायचे तर जुने परंपरागत धार्मिक आचारविचार झपाट्याने हिंदू समाजातून लुप्तप्राय होत आहेत, एवढेच मेकॉलेच्या भविष्याविषयी बोलता येईल.

इंग्रजांच्या विद्यादानाच्या परिणामी हिंदूंच्या आचारविचारांत किंवा आहार-विहारांत जे स्थित्यंतर झालेले दिसते त्याचे बीज धर्मांतर नसून हिंदूंनी परंपरागत कर्मकांडातील धर्माच्या नावावर लादलेली अनेक कर्तव्ये सोडली या स्थितीत आहे. हे परिवर्तन परिस्थितीच्या दाबाने हिंदूंच्या हातून घडविले आहे. आगगाडी, आगबोटी यांतील गर्दीच्या आणि जलदीच्या प्रवासात विटाळ-चंडाळ हा भेद विचारात घेण्याला अवकाशच नसतो. यासंबंधाचे सारे प्रतिपादन पुढे येणार आहे.

मिशनरी, इंग्रज आणि जनतेतील सुबुद्ध, उदार माणसे यांनी इंग्रजी राज्याच्या विद्यमाने मिळणाऱ्या, जीवनव्यवहाराला उपयोगी पडणाऱ्या नानाविध ज्ञानाचा प्रसार होण्यासाठी जो सर्वांगीण उद्योग आरंभला होता त्याचा परिणाम हिंदूंच्या हजारो वर्षांच्या रूढ धार्मिकतेविरुद्ध झाला व हा परिणाम मूर्तरूप धारण करू लागला. हिंदूंतील जातिभेद हा शाळांतून शिकणाऱ्या प्रौढवयाच्या विद्यार्थी मंडळींच्या डोळ्यांवर आला व त्याचे उच्चाटन करण्याच्या इराद्याने समानशील तरुणांनी एक संघटना निर्माण केली. या संघटनेचे नाव 'परमहंस सभा' असे होते. परमहंस ही संज्ञा अत्युच्च कोटीतील संन्याशाची आहे, असा संस्कृत कोशात त्या शब्दाचा खुलासा आढळतो. हा अर्थ लक्षात घेऊनच या संज्ञेचा प्रस्तुत सभेच्या पुढाऱ्यांनी आपल्या संस्थेच्या नामकरणार्थ आदर केला असावा असा तर्क करता येतो. हजारो वर्षे हिंदू समाजावर अंमल गाजविणारी सारी बंधने तोडून टाकण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या तरुणांनी आपल्या समुदायाला हे नाव दिले. या सभेच्या स्थापन-वर्षाबद्दल वाद असला तरी १८५० च्या किंचित आगेमागे ही सभा उदयास आली असावी असे मानायला आधार असून त्यातल्या एका आधाराचा उपयोग मागे केला आहे. त्रिलोकपंडित रामकृष्ण गोपाळ भांडारकरांनी, आपणसुद्धा विद्यार्थि-दशेत परमहंस सभेचे भागीदार असल्याचे वृत्त एका प्रसंगी सांगितले आहे. प्रत्यक्ष जात मोडण्याचा प्रयोग करताना म्हणजे पाव खाण्याच्या वेळी त्यांच्या अंगी संचरलेल्या भीतीच्या अनुभवाचा निर्देश बाबा पदमनजींप्रमाणे त्यांनीही आपल्या भाषणात केलेला आहे. हिंदूंतील जातिभेद हा इतका रोमरोमात भिनलेला आहे की धर्मांतरानेही तो त्यांना सोडीत नाही. हिंदूंच्या लौकिक व्यवहारात तर प्रत्येक पावलाला तो पूर्वी नडत असे. हल्ली त्याचा पीळ पुष्कळच ढिलावला आहे. याचे कारण इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावातून उद्भवलेल्या ब्राह्म, प्रार्थनासमाजादी संस्था होत. मुंबईपुरते बोलायचे तर येथील सामाजिक सुधारणेचे श्रेय प्रार्थनासमाजालाच द्यावे लागेल.

परमहंस सभेचा उद्योग अतिगुप्तपणे प्रारंभी चालू होता. तिचे हजारो सभासद गावोगाव होते ही अतिशयोक्त किंवदंती सोडली तरी सर्व जातींचे मिळून पुष्कळ

सभासद होते असे समजायला हरकत नाही. या सभेची गुप्तता मोडून तिचे नाव आणि तिच्या उद्योगाचे स्वरूप सर्वतोमुखी झाल्यावर तिच्या आद्य प्रवर्तकाचे नावही प्रकट झाले. राम बाळकृष्ण जयकर या आडनावावरून हे पाठारे-पाताणे प्रभूंपैकी होत हे निराळे सांगायला नको. या संस्थेच्या गुप्त कारभाराचा स्फोट झाल्यावर तिचे सभासददेखील नामशेष झाले. कालांतराने परमहंस सभेचा सामाजिक सुधारणेच्या संदर्भात उल्लेख होऊ लागला तेव्हा लोकांना तिचे नाव समजले. सभेशी प्रत्यक्ष संबंध आलेल्यांनी आपल्या जुन्या काळातील आठवणींतून मराठीचे व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खड यांचाही प्रस्तुत संस्थेशी संबंध असल्याचे निदर्शनास आणलेले आहे. परमहंस सभा मोडली. तिचे सभासदही अज्ञातवासात गडप झाले. तरी ही संस्था ज्या देशकार्यासाठी उद्भवली होती, ते देशकार्य अनेक सभासदांनी आपल्या हृदयात जतन करून ठेवले होते. आणि योग्य वेळ येताच 'प्रार्थनासमाजा'च्या रूपाने १८६७ साली मुंबईत अवतरले.

परमहंस सभा काय किंवा ब्राह्म समाज वा प्रार्थनासमाज काय त्यांचे पुष्कळसे सभासद इंग्रजी शिक्षण घेतलेले अगर घेणारे होते, याचे भान बाळगल्यास असे दिसून येईल की, जातवारीचा तिटकारा मुंबईतल्या तत्कालीन प्रत्येक जातीतल्या विचारवंत व्यक्तीमध्ये सळसळत होता. जातीची धर्माने उत्पन्न केलेली कैद फोडावी व तिच्यातून मुक्त व्हावे, या कांक्षेची बलवत्तर आवेड पसरायला जसे इंग्रजाचे शिक्षण कारणीभूत म्हणता येईल तसा मिशनऱ्यांचा उपदेशही म्हणता येईल. ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारी शाळांतून कोणत्याही धर्माबद्दल भलीबुरी चर्चा होत नसली तरी त्यांच्या शाळांतील स्पर्शास्पर्श-विचार व ब्राह्मण शास्त्री-पंडितांनी अब्राह्मण विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा शिकवायची नाही ही आडकाठी अब्राह्मणांच्या चित्ताला पीडा देत असेलच. जातीप्रमाणे एकमेकांचा स्पर्श टळेल असे एकमेकांपासून विद्यार्थ्यांनी दूर अंतरावर बसायचे हा नियम बुद्धिमान ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांच्या मनात मुळीच किल्मिष उत्पन्न करीत नसेल असे कल्पवत नाही. या सर्व उच्चनीचत्वाच्या वेदनांवर हिंदुधर्माने एक तोडगा योजलेला आहे. तो म्हणजे पूर्वजन्म-पुनर्जन्माचा आहे. पूर्वजन्मी माणसाच्या हातून घडलेल्या पातकांचा परिणाम पुनर्जन्मी भोगावा लागतो, ही ती कल्पना होय. या जन्मीची दुर्दशा पूर्वजन्मातील पातकावर लादून काहीशा समाधानाने चालू आयुष्य संपवायचे. हा दंडक शेकडो वर्षांपासून या हीन ठरविलेल्या जातीच्या उन्नतीला अडवीत आहे.) देवाच्या मूर्तीची पूजादेखील इंग्रजी शिक्षणाने उद्भवलेल्या नव्या धर्मविचाराच्या आंदोलनाने निषिद्ध गणली होती. याप्रमाणे धर्मभावनेच्या चंचलतेतही ज्या कल्पना निश्चित स्थिर रूपाने दिसल्या त्यांचा संग्रह प्रार्थनासमाजाच्या मूलतत्त्वांत आहे.) प्रार्थनासमाज हा सगुणोपासक आहे. त्यांच्या सगुणात अवताराला मात्र यत्किंचितही स्थान नाही. मूळच्या सगुण शब्दाच्या व्याप्तीत अवतारांचा समावेश आहे.

"१. परमेश्वराने हे सर्व ब्रह्मांड निर्माण केले. तोच एक खरा देव. तो नित्य

ज्ञानस्वरूप, अनंत, कल्याणनिधान, आनंदमय, निरवयव, निराकार, एकच, अद्वितीय, सर्वांचा नियंता, सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्ती, कृपानिधी, परमपवित्र व पतितपावन असा आहे. २. केवळ त्याच्याच उपासनेच्या योगे इहलोकी व परलोकी शुभ प्राप्त होते. ३. त्याच्या ठायी पूज्यत्वबुद्धी आणि अनन्यभाव ठेवून तत्पूर्वक त्याचे मानसिक भजनपूजन करणे व त्यास प्रिय अशी कृत्ये करणे हीच त्याची खरी उपासना. ४. प्रतिमा आणि इतर सृष्ट पदार्थ यांची पूजाअर्चा किंवा आराधना करणे हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नव्हे. ५. परमेश्वर सावयवरूपाने अवतार घेत नाही. आणि कोणताही एक ग्रंथ साक्षात ईश्वरप्रणीत नाही. ६. सर्व मनुष्ये एका परमेश्वराची लेकरे आहेत, म्हणून भेद न राखता परस्पराशी बंधुभावाने वागावे हे ईश्वरास प्रिय आहे. आणि हे मनुष्याचे कर्तव्य आहे. ज्या धर्माची मूलतत्त्वे वर लिहिली आहेत त्या धर्माची प्रवृत्ती होऊन प्रपंचातील सर्व कृत्ये त्यास अनुसरून घडावी हा या समाजाचा उद्देश आहे.'' प्रार्थनासमाजात प्रवेश करू इच्छिणाराला वरील तत्त्वांनुसार आपण आपले घरातले, बाहेरचे व्यवहार करू अशी प्रतिज्ञा उचारावी लागते.

प्रार्थनासमाज १८६७ मध्ये उदयास आला. आज त्याला शंभर वर्षांहून जास्त काळ लोटला. या काळात त्याने मुंबई शहरात व अन्यत्र जी कामगिरी बजावली आहे, ती गुणाच्या व परिणामाच्या दृष्टीने फार मोठी आहे. प्रार्थनासमाजाचा सविस्तर साधार इतिहास समाजाचे अनेक वर्षे चिटणीस असलेले कै० द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनी लिहिलेला उपलब्ध आहे. तो जिज्ञासूंनी नजरेखाली घातल्यास त्यांना दिसून येईल की, एक राजकारण सोडल्यास सामान्य समाजहिताची अनेकविध उपयुक्त कामे प्रार्थनासमाजाने केलेली आहेत. ज्यांना दिवसा शाळेत जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही त्यांच्यासाठी शहराच्या निरनिराळ्या विभागांत रात्रीच्या शाळा प्रार्थनासमाजाने काढल्या. या शाळांच्या कामगिरीत ज्यांना अस्पृश्य म्हणतात त्या जनविभागाची प्रार्थनासमाजाने उपेक्षा केली नाही. त्यासाठीही शाळा काढल्या. (मुंबईतले राममोहन इंग्लिश स्कूल आणि चंदावरकर प्राथमिक शाळा या संस्था समाजाच्या शिक्षणविषयक आस्थेची उदाहरणे आहेत. पंढरपुरातील बालहत्या प्रतिबंधक गृह व अनाथ बालकाश्रम या दोन संस्था विशेष उल्लेखनीय आहेत. (याप्रमाणे मुंबईत इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पहिल्या पिढीच्या तरुणांनी केलेल्या धार्मिक जीर्णोद्धाराच्या कामगिरीचा अतिसंक्षिप्त इतिहास निवेदन केला) 'सुबोधपत्रिका' या नावाचे एक साप्ताहिकही या समाजाने पुष्कळ वर्षे चालविले होते. या समाजानंतर अनेक देशी-विदेशी देवाधर्माचे कालानुसार माणसांच्या विचारांना चालना देण्यासाठी काही संस्था या शहरात जन्मास येऊन कार्यपरत्वे किंवा प्रसंगपरत्वे दिगंतरी गाजल्या व आपल्या काही खुणा मागे ठेवून कर्तृत्वाच्या दृष्टीने क्षीणावल्या आहेत. त्यांच्याकडे दृष्टिक्षेप करणे अनुचित होणार नाही.

प्रार्थनासमाजाची स्थापना व त्या समाजाची मुंबईतील व महाराष्ट्रातील कामगिरी आणि समाजाची तत्त्वे यांची माहिती सांगून झाली, परंतु तिच्या कार्यालयाच्या वास्तूचा वृत्तांत आता निवेदन करायचा आहे. संस्था जन्मास येऊन आपल्या उद्दिष्टाच्या दिशेने काम करू लागतात तेव्हा त्या कामासाठी स्वतःच्या मालकीची जागा असतेच असा नियम नाही. इतर संस्थांची उपासना, उपदेश वगैरे कामे दुसऱ्यांकडील जागेत चालत असत. तशाच रीतीने हा समाजदेखील आपली कामे प्रारंभी तीनचार वर्षे करीत होता. त्या काळात आपली स्वतःची इमारत असावी ही भावना वळावत जाऊन शेवटी १८७४ मध्ये तिच्या साफल्याची धन्यता समाजाच्या वाट्यास कायमची आली. गिरगावात ज्या जागेवर प्रार्थनासमाजाची इमारत उभी आहे त्या जागेचा इतिहासही मनोरंजक आहे. प्रार्थनासमाजाची इमारत बांधली जाण्यापूर्वी तेथे बर्फाची गिरणी होती. इमारतीचा संकल्प समाजाच्या सभासदांनी एका सभेत १८६८ साली सोडला व त्याची वाच्यता करताना बहुतेक सभासदांनी आपआपली एकेक महिन्याची प्राप्ती वर्गणीच्या रूपाने इमारतीसाठी देण्याचे कबूल केले. १८७० पासून पुढे समाजाच्या उपासना गिरगाव बॅकरोडवर एका गृहस्थाच्या घरी होत असत. नंतर जी बर्फाची गिरणी सांगितली ती मोडली तेव्हा तेथे गिरणीसाठी बांधलेले लोखंडी पत्र्याचे घर होते तेथे उपासना वगैरे होऊ लागल्या. ही जागा एका बँकेच्या ताब्यात होती. पुढे या बँकेचे बारा वाजले तेव्हा ती बँकेचे लिक्विडेटर्सच्या कबजात गेली. त्यांच्या फुकट परवानगीने समाज आपली कामे तेथे करू लागला. पुढे ही जागा विकावयास काढल्यामुळे, समोर एका पारशाची जागा होती ती भाड्याने घेऊन समाज आपले कामकाज त्या जागी उरकू लागला. याप्रमाणे स्थलांतरे चालू असता शेवटी बर्फाच्या गिरणीची जागा समाजाने विकत घेतली व तेथे आपले मंदिर १८७४ मध्ये उभे करून त्यात २६ एप्रिल १८७४ रोजी प्रातःकाळी मोठ्या समारंभाने प्रवेश केला. मंदिराचे बांधकाम सुंदर आहे. मंडळींना बसण्यासाठी बाके व खुर्च्या आहेत. आत पूर्व, पश्चिम, दक्षिण या बाजूंस गॅलऱ्या आहेत. उत्तरेच्या शेवटास सिंहासन किंवा उपदेशस्थान केले. मंदिरात प्रारंभी उपस्थित असलेल्या लोकांपुढे मंदिरात काय व्हावे आणि काय होऊ नये याचा पाढा वाचण्यात आला. त्याचा सारांश : ईश्वराची उपासना व्हावी. परधर्माची निंदा होता नये. कोणताही ग्रंथ साक्षात ईश्वरप्रणीत नाही हे ध्यानात ठेवून वक्तव्य करावे. मंदिरात जेवणखाण, सुरापान, हिंसा यांना प्रतिबंध आहे. मंदिरात कसलीही मूर्ती नाही. प्रार्थनासमाजाच्या इतिहासात वरील मंदिरासाठी देणगी देणारांची जी यादी आहे, तिच्यात समाजाबाहेरचेच दूरदूरचे लोक पुष्कळ असल्याचे पाहून लोकमानसात चाललेल्या धर्मविषयक क्रांतीबद्दल अटकळ बांधता येते.

। प्रार्थनासमाजामागून १८७५ मध्ये दोन नव्या संस्था मुंबई शहरात जन्मास आल्या. एक स्वामी दयानंद यांचा आर्यसमाज ही आणि दुसरी थिऑसफिकल

सोसायटी ही होय. पहिलीचे जनक स्वामी काठियावाडातील मोरवीचे व दुसरीची जननी मादाम ब्लॅव्हाट्स्की. ही बाई देशाने रशियन, पण सृष्टीची गूढे उकलण्याचा प्रयत्न करणारी, अनेक देशांत फिरलेली. शेवटी तिने आपले ज्ञान जगाला पटविण्यासाठी 'थिऑसफी' या संज्ञेची संस्था काढली. ती जगभर पसरली. या संस्थेचे चालक जे आहेत, त्यांचे वास्तव्य हिमालयात आहे. तेथून ते पृथ्वीवरील अनुयायांची मूळ कामे पार पाडतात. अनुयायांची मंडळे आहेत, त्यांतही अंतर्वर्तुळ (इनर सर्कल), बाह्यवर्तुळ (आउटर सर्कल) असे विभाग आहेत. भुते, प्रेते वगैरे समजुतींवर थिऑसफिस्टांचा सुशिक्षित विश्वास दृष्टीस पडतो. थिऑसफीचे सामान्य सभासद कुणालाही होता येते. ब्लॅव्हाट्स्कीबाई हिंदुस्थानातही फेरी टाकून गेल्या होत्या. त्या प्रवासाच्या हकीकतीत मुंबईच्या वर्णनाला जागा मिळाली आहे. एका काळी नास्तिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲनी बेझंटबाई यांनी थिऑसफीची दीक्षा घेतल्यावर त्या हिंदुस्थानात आल्या. येथे त्या प्रारंभी काशीस राहत होत्या. तेथून त्यांनी मुक्काम हालवून मद्रासनजीक 'अड्यार' येथे वस्ती केली. हिंदुधर्म हाच आपला धर्म अशी बेझंटबाईंची अखेरपर्यंत ठाम भावना होती. हिंदूप्रमाणे मरणोत्तर त्यांचे शव जाळण्यात आले. १९१६ मध्ये त्यांनी 'होमरूल लीग' निर्माण करून या संस्थेनिमित्त जो कामाचा धडाका आरंभला त्या योगाने हिंदुस्थानातील राजकीय पुढाऱ्यांत त्यांना अग्रगण्यत्व प्राप्त झाले. १९१७ साली त्यांना इंग्रज सरकारने स्थानबद्ध केले होते. त्यातून थोड्याच अवधीत सुटका झाल्यामुळे त्यांनी काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले आणि गाजविले. तेव्हा म० गांधीदेखील येथील राजकारणात भाग घेऊन लोकांपुढे येत होते. त्यांच्याशी विरोध चालविल्यामुळे बेझंटबाई लोकप्रियतेच्या उंचीवरून खाली घसरल्या. तथापि त्यांची कामगिरी चिरस्मरणीय आहे.

आर्यसमाजाच्या स्वामी दयानंदांचा वृत्तांत थोडासा निराळ्या स्वरूपाचा आहे. त्यांचा जन्म १८२४ साली काठियावाडातल्या मोरवी गावात झाल्यानंतर चौदाव्या वर्षी त्यांनी आपले घर सोडले. पण त्या वेळचे पलायन सिद्धीस गेले नाही. शेवटी एकविसाव्या वर्षी केलेला गृहत्याग सफळ झाला. प्रथम घर सोडले तेव्हा शिवरात्रीला शंकराच्या मूर्तीजवळ जागत बसले असताना त्या मूर्तीवर एक उंदीर खेळताना दयानंदांच्या नजरेस आला व मूर्तीत देव नसतो याबद्दल त्यांची खात्री पटून त्यांनी देवाजवळचे जागरण सोडले. त्या उंदराने मूर्तिपूजेप्रमाणे हिंदुधर्मातल्या अनेक आचारांचे थोतांड दयानंदांच्या बुद्धीत रुजविले. त्यांना वेदात मुळीच आधार नाही, अशी खात्री पटल्यावर आपले विचार लोकांस पटविण्यासाठी त्यांनी 'आर्यसमाज' ही संस्था स्थापन केली. आर्य म्हणजे हिंदूच, पण हिंदू हा शब्द परदेशस्थ विजेत्यांनी 'दास' या अर्थाने भारतीय प्रजेसाठी वापरला, म्हणून त्याला बहिष्कारून दयानंदांनी आपल्या संस्थेला 'आर्य' हे नाव दिले. त्यांच्या समाजाला मुंबईमध्ये कधीच उठाव मिळाला नाही. तथापि हा समाज मुंबईत स्थापन झाला असल्याची खूण येथील काकडवाडीत दिसते.

१८८५ मध्ये मुंबईसच आणखी एक अतिशय महत्त्वाची पण राजकीय अखिल भारतीय दर्जाची संस्था निघाली. तिचे नाव 'इंडियन नॅशनल काँग्रेस' हे होते. या संस्थेच्या बैठकी दरसाल डिसेंबर महिन्यात एखाद्या प्रांतातील मोठ्या शहरी भरत असत. या संस्थेचे सुरुवातीचे ध्येय राज्यनिष्ठापूर्वक ब्रिटिश राज्यातील प्रजेला जाचणारे दोष चव्हाट्यावर मांडून ते घालविण्याचा प्रयत्न करणे हे होते. परंतु स्थापनेनंतर थोड्याच अवकाशात ब्रिटिश राज्यकर्त्यांची काँग्रेसबद्दलची उपेक्षावृत्ती बदलली आणि सक्रिय विरोधाची पावले ते टाकू लागले. त्यामुळे काँग्रेसच्या गोटातील राज्यनिष्ठेचा क्षय होऊ लागला. १९०५ साली बंगालच्या प्रचंड विरोधाला तुडवून तेव्हाचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी अंमलात आणली आणि दडपशाहीचा पाया घातला. दडपशाहीमुळे बंगालमध्ये उघड विरोधाऐवजी गुप्त कट-कारस्थाने व अधिकाऱ्यांचे खून यांचे युग सुरू झाले. हे ब्रिटिशांच्या दडपशाहीला एकप्रकारे प्रति-आव्हानच होते. १९०८ साली या प्रत्याव्हानाचा पहिला बाँबगोळा उडाला व तेव्हा-पासून १९३६ पर्यंत खून-दरवड्यांचे उत्पात सारखे सुरू होते. काँग्रेसचे प्रारंभीचे पुढारी पारशी समाजातील फिरोजशहा मेथा हे होते. त्यांचा पुढारीपणा १९०७ साली सुरतेच्या अधिवेशनात दृष्टाळला. बंगभंगानंतर हिंदी लोकमतामध्ये जहाल व मवाळ या नावांचे दोन परस्परविरोधी तट पडले, व त्याच्या परिणामी सुरतेस काँग्रेसची बैठक मोडली. फिरोजशहांच्या महत्त्वाला तेव्हापासून उतरती कळा लागली. तरी १९१५ पर्यंत काँग्रेसचे सूत्रचालक मेथाच होते. १९१५ साली त्यांच्या निधनानंतर-देखील त्यांनी घालून दिलेल्या नियमानुसारच काँग्रेसच्या हालचाली चालू होत्या. १९१५ मध्ये महात्मा गांधीजी हिंदी राजकारणात आले व १९२० मध्ये त्यांनी काँग्रेस जिंकली. आणि पुढे सत्तावीस वर्षे ब्रिटिश राज्यकर्त्यांशी अखंड स्वराज्यप्रीत्यर्थ लढा चालवून १९४७ मध्ये ते ध्येय सिद्ध केले.

१९४७ साली स्वराज्य हाती येईपर्यंत म० गांधींचे नेतृत्व काँग्रेसमध्ये चालू होते. १९४८ च्या जानेवारी ३० रोजी त्यांचा वध घडल्याने त्यांचे नेतृत्व साहजिकच लयास गेले. आता त्याचे कारणपरत्वे स्मरण मात्र केले जाते. ज्या संस्थेने इंग्रज राज्यकर्त्यांशी सतत अविश्रांत झगडून देशाला स्वराज्य व स्वातंत्र्य मिळवून दिले, तिचे सूतउवाच मुंबईस व्हावे हे या शहराचे विशेष भाग्य आहे. काँग्रेसची पहिली बैठक गोकुळदास तेजपाळ यांच्या गवळी तळ्यानजीक असलेल्या संस्कृत पाठशाळेच्या दिवाणखान्यात भरली होती. १८८५ पर्यंतं शिक्षण आणि जागृती या दोन्ही गोष्टी देशाच्या सर्व भागांत वाढल्याने, प्रांतोप्रांती राजकारणाचा विचार करणारी माणसे पुष्कळच दिसू लागली होती. ती सारी एका अखिल भारतीय व्यासपीठावर येऊन त्यानी आपली गाऱ्हाणी मांडावी या हेतूने या संस्थेची उभारणी होऊन तिच्या पुढाऱ्यांच्या उद्योगाने सालोसाल तिचे प्रतिनिधी वाढत गेले. शेवटी स्वराज्य पदरात पडले. काँग्रेसची पहिली बैठक पुण्यास व्हायची होती, पण तेथे कॉलरा सुरू झाल्यामुळे ती मुंबईस भरविण्यात आली.

काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी १८५२ मध्ये मुंबईस 'बॉंबे असोसिएशन' या नावाची एक राजकीय संस्था निघाली होती. ती फार वर्षे जगली नाही. आपल्या अल्पकालीन आयुष्यात चिरकाल डोळ्यात भरून राहण्याजोगी कामगिरीही तिने बजावली नाही. तिच्या मागून १८८५ मध्ये 'बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन' ही संस्था सर फेरोजशहा मेथा या नव्या दमाच्या देशभक्त पारशी बॅरिस्टराने काढली. याखेरीज दादाभाई नौरोजी यांची 'ईस्ट इंडिया असोशिएशन' ही एक संस्था होतीच. दादाभाईंनी याच नावाची संस्था इंग्लंडात असताना आधी चालविली होती. मुंबईस आल्यावर त्यांनी येथे विलायतच्या संस्थेची शाखा स्थापन केली.

मागे ज्या धर्म सुधारण्याच्या संस्था सांगितल्या त्यांतील साम्यवैषम्याच्या दृष्टीने विचार केल्यास एका गोष्टीबद्दल साम्य आढळते. जातिभेद नष्ट व्हावा याविषयी प्रार्थनासमाजाचे आणि आर्यसमाजाचे जसे संपूर्ण मतैक्य आहे तसेच मूर्तिपूजेच्या निषेधासंबंधातही आहे. आर्यसमाज वेदांना ईश्वरप्रणीत मानतो, प्रार्थनासमाज कोणताही ग्रंथ ईश्वरप्रणीत नाही असे समजतो. दयानंदस्वामींच्या आचारसंहितेत होमहवनाला जागा आहे. मुंबई व महाराष्ट्र येथे आर्यसमाज मागासलेला दिसला तरी गुजरातच्या उत्तरेस राजस्थान, पंजाब आणि उत्तर प्रदेश येथे त्याचे माहात्म्य पुष्कळच आहे. आर्यसमाजाने पूर्वोक्त प्रदेशांत अनेक शिक्षणसंस्था काढल्या असून त्यांमध्ये कालमानाप्रमाणे स्त्रीपुरुष हा भेद या बाबतीत पाळला जात नाही. स्वामी दयानंदांनी 'सत्यार्थप्रकाश' हा आपल्या मतांचा संग्रहग्रंथ आपल्या अनुयायांच्या मार्गदर्शनार्थ छापून प्रसिद्ध केला असून त्याची भाषा हिंदी आहे. सुरुवातीस दयानंद-स्वामी संस्कृत भाषेतच बोलण्याचा व्यवहार करीत असत. लोकांना उपदेश करण्या-साठी त्यांनी हिंदी भाषा आपलीशी केली. त्यांनी वेदांचा अर्थ लावण्यासाठी नवे निरुक्त तयार केले असे म्हणावयास हरकत नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी सर जेम्स मॅकिन्टॉश या नावाचे एक इंग्लंडचे विख्यात इतिहासलेखक मुंबईत रेकॉर्डर (सरन्यायाधीश) या नात्याने आल्याचा निर्देश पूर्वी केल्याचे वाचकांच्या लक्षात असेलच. त्या वेळी मुंबईत जे कंपनीचे इंग्रज नोकर होते, त्यांत विद्वान असे फारसे कोणीच नसल्याने मॅकिन्टॉश यांना चुकल्याचुकल्यासारखे वाटायला लागावे हे स्वाभाविक होते. यावर उपाय म्हणून मॅकिन्टॉशने लिटररी सोसायटी—वाङ्मयमंडळ—या नावाची संस्था काढली. प्रारंभी तिचे अवघे १९ सभासद होते. ते पुढे ३० झाले. या मंडळाच्या बैठकीतून कोणत्या विषयांवर चर्चा चाले याची तपशीलवार माहिती निदान प्रस्तुत लेखकाला उपलब्ध झाली नाही. या मंडळाचा ग्रंथसंग्रह बराच मोठा होता व पुढे वाढत जाणारा होता. त्याची कुठेतरी स्वतंत्र सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करावी, असे मनात आल्यामुळे त्यानेच टाऊन हॉल बांधण्याची कल्पना मनात आणली. या कामाला पैसा व सोईची भरपूर जागा पाहिजे तर पैसा उभारण्यासाठी मॅकिन्टॉशने लॉटरी काढण्याची योजना सुचविली. पहिली

लॉटरी यशस्वी झाली, तरी पैसा कमी पडू लागला. तेव्हा दुसरी लॉटरी पुकारली, पण ती फिसकटल्याने पुन्हा पैसा गोळा होण्याकरिता आणखी खटपट करणे मंडळाच्या चाहत्यांना भाग पडले. शेवटी कंपनी सरकारने मदतीचा हात देऊन टाऊन हॉल बांधून पुरा केला. त्याच्या एका भागात प्रचंड ग्रंथसंग्रह ठेवलेला आहे. याला स्वराज्यपूर्व काळात रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे ग्रंथसंग्रहालय या नावाने ओळखीत असत. आता स्वराज्यात 'रॉयल' ही राजवाचक उपाधी हाकलली जाऊन पुढचे शब्द कायम आहेत. हिंदी माणसाला या संस्थेचे सभासद पूर्वी होता येत नसे. १८४० नंतर हिंदी व्यक्तींना वर्गणीदार होता येऊ लागले. या इमारतीत संशोधनप्रचुर व्याख्याने केव्हा केव्हा होत असतात.

लिटररी सोसायटी जन्मास आली तेव्हा मुंबईच्या नागरिकांना इंग्रजी विद्यांचे शिक्षण देण्याची कामगिरी कंपनी सरकारने आपल्या अंगावर घेतली नव्हती. ईस्ट इंडिया कंपनीच्या १८१३ च्या नव्या सनदेमध्ये शिक्षणासाठी दहा हजार पौंडांची रक्कम खर्चावी, हे कलम घातले गेले. कंपनीच्या कारभाराची सनद दर वीस वर्षांनी बदलत असे हे येथे ध्यानात ठेवावे आणि कंपनीने आपल्या प्रजेला शिक्षण दिले पाहिजे असा आग्रह धरून त्या अर्थाचे कलम कंपनीच्या नव्या सनदेत घालायला लावणारे सर जेम्स मॅकिन्टॉशच होत. या संस्थेच्या बैठकी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या सोमवारी भराव्या असा नियम होता. बैठकीत सभासदांनी मधल्या काळात जे नवे ज्ञान मिळविले असेल ते मांडावे. या ज्ञानाचा फायदा पश्चिमेच्या अर्थात युरोपियन लोकांच्या पदरात पडावा. याप्रमाणे सदर संस्थेच्या कामगिरीचा संकेत होता. संस्थेसमोर पश्चिम दिशेचे केवळ युरोपातले लोक असावे याचे आज वैषम्य वाटेल. पण जवळजवळ पावणेदोनशे वर्षांमागे येथील जनतेची अर्वाचीन ज्ञानदृष्ट्या किती अवकळा होती, याची जाणीव ठेवल्यास पूर्वोक्त वैषम्याला वूडच राहत नाही. त्या काळी पोटधंद्याच्या माहितीपेक्षा जास्त कसलीच माहिती नव्हती, असे म्हटल्यास ती बिलकूल अतिशयोक्ती ठरणार नाही.

लिटररी सोसायटी मॅकिन्टॉशसाहेबांनी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी नव्याने स्थापण्यापूर्वीच्या शतकाच्या शेवटी (१७८१) मुंबईत होती असाही सुगावा लागतो. पण ती कायदेपंडितांची होती. वैद्यकाची एक संस्था केवळ डॉक्टर वर्गासाठीच होती. तिच्या अस्तित्वकाळाची व कामाची माहिती उपलब्ध नाही. नव्या उगवलेल्या शतकाची त्या पूर्वीच्या शतकाशी तुलना केल्यास जे मोठे अंतर दिसून येते ते हे की, इंग्रज एकोणिसाव्या शतकात सार्वभौम सत्ताधारी झाले होते. अद्यापि पेशवाई नावाला शिल्लक होती. तिचे अवयव उत्तरेस शिंदे, होळकर, भोसले (नागपूरकर) आणि दक्षिणेस अलिबाग (आंग्रे), सावंतवाडी, कोल्हापूर वगैरे पराक्रमाच्या दृष्टीने दुर्बळ झालेले होते, याचा अर्थ इंग्रजांचा वरचष्मा महाराष्ट्रात सर्वत्र बसला होता व त्याला दक्षिणेत परचक्राचे भय उरले नव्हते. तरी परचक्राची बीजे सर्वत्र होती. त्या

बीजांच्या उपद्रवांचा संभव मनात वागवून इंग्रज सगळीकडे सावधपणाने आपला कारभार करीत होता व हाच सावधपणा बाळगून १८१७ मध्ये पेशव्यांचा उठाव हां हां म्हणता दाबून त्याने पेशवाई इतिहासाच्या कोठारात लोटली. पेशवाईमागून नागपूरकर भोसल्यांची तशीच वाट लागली. इंग्रजी राज्याची येथील बाह्य निर्वैर स्थिती संक्षेपाने सांगितली. युरोपात मात्र ते नेपोलियन बोनापार्टशी युद्ध करीत होते. १८१५ मध्ये वॉटर्लू येथे त्याचा पराभव साधून व त्याला कैदेत टाकून तिकडचे हे मोठे विघ्न गाडले. अशा संकटांना टक्कर देत इंग्रज आपल्या देशात ज्ञानाची प्रगती करीत होते आणि त्या वातावरणात वाढलेली माणसे हिंदुस्थानात येऊ लागल्यामुळे येथे आपली ज्ञानतृष्णा शमविण्यासाठी मागे सांगितलेल्या संस्था त्यांच्या प्रेरणेने एकामागून एक उदयास येऊ लागल्या. त्यांतल्या एका संस्थेचा वृत्तांत नमूद केला. तिच्या मागून १८३१ मध्ये 'बॉंबे जॉग्रफिकल सोसायटी' स्थापन झाली. या भूगोलविषयक संस्थेचे पुरस्कर्ते इंग्रज नौकाधिकारी होते. त्यांचा प्रवास अरबी समुद्र, तांबडा समुद्र, इराणचे व बंगालचे आखात या भागांत नेहमी चालत असे व या पर्यटनात ते संशोधनही करीत असत. या संशोधनाची वाच्यता व्हावी यासाठी ही संस्था जन्मास आली. नंतर सुमारे दहा वर्षांनी यंत्रविषयक ज्ञानाची देवाणघेवाण करण्याच्या हेतूने 'मेकॅनिकल इंस्टिट्यूट' ही संस्था उदयास आली. या संस्थेतर्फे महत्त्वाच्या विषयावर तज्ज्ञांची व्याख्याने होऊ लागल्याने तिच्या उपयुक्ततेत भर पडली. ही संस्था अद्यापि अस्तित्वात आहे. 'ससून मेकॅनिकल इंस्टिट्यूट' या नावाने ती ओळखली जाते. डेव्हिड ससून या नावाचा भाग्यवान यहुदी (ज्यू) बगदादहून १८३२ साली मुंबईस येऊन राहिला. त्याने व्यापारात सपाटून संपत्ती मिळविली. डेव्हिडचा थोरला मुलगा अल्बर्ट याने 'मेकॅनिक्स इंस्टिटयूट'च्या इमारतीकरिता साठ हजार रुपयांची देणगी दिल्यामुळे या संस्थेला ससूनचे नाव दिले गेले. या संस्थेच्या इमारतीचे काम देखणे आहे. ही संस्था १८४१ मध्ये स्थापन झाली. हिचे संस्थापक टाकसाळ आणि गोदी येथील यंत्रांवर काम करणारे लोक होते. शेतीबागायतीच्या सुधारणेचा विचार करणारी (ॲग्रिकल्चरल ॲंड हॉर्टिकल्चरल) एक संस्था १८३० मध्ये निघाली होती. १८४८ साली 'स्टूडन्ट्स लिटररी ॲंड साएंटिफिक सोसायटी' ही संस्था अस्तित्वात आली. या संस्थेने स्त्रीशिक्षणाचे कार्य प्रारंभी पुष्कळच केले. आजही या संस्थेची मुलींची एक चांगली शाळा ठाकुरद्वार भागात आपले काम करीत आहे.

नवयुगाची पहाट म्हटली तिचा अवधी १८५० पर्यंत धरून त्या अवधीतील मुंबईत जागृत होऊ लागलेल्या नवजीवनाची संस्थारूपाने प्रकट होत गेलेली प्रसाद-चिन्हे येथवर वाचकांच्या निदर्शनास आणली. हा काळ संपता संपता जी एक नवी महत्त्वाची संस्था उदयास आली ती चित्रकला शिकविणारी शाळा ही होय.। १८५१ या वर्षी लंडन शहरी क्रिस्टल वाड्यात जागतिक कलाकौशल्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यामुळे इंग्लंडात कलाकौशल्याच्या शाळा काढण्याची लाट उसळली. त्या

लाटेचा धक्का हिंदुस्थानास लागून मुंबईत कलाकौशल्याच्या शाळेबद्दल चर्चा सुरू झाली. आज जे आर्ट स्कूल येथे कार्य करीत आहे त्याचे 'जे० जे० स्कूल ऑफ आर्ट' हे संपूर्ण नाव आहे. याच्या आधी 'जे० जे० हॉस्पिटल' चालू झालेले होते. त्यांतील 'जे० जे०' अक्षरांचा जो खुलासा त्याचे स्मरण असणाऱ्यांना मुंबईतील दानशूर जमशेटजी जीजीभाई यांच्या औदार्याची साक्ष ती अक्षरे पटवितात हे सांगायला नको. या शेटजींनी या होऊ घातलेल्या कलाकौशल्याच्या शाळेसाठी एकरकमी एक लाख रुपयांची देणगी देऊन द्रव्यचिंता हलकी केली. हल्ली ही शाळा आपले काम चांगल्या रीतीने बजावीत आहे.

। या नानाविध संस्थांचा व्याप पाहिल्यास एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लोकशिक्षण किती प्रकारे वाढले होते, याचा अंदाज करता येतो.। या संस्थांचे सभासद संस्था ज्या विषयाच्या विचारासाठी जन्मास आली त्या विषयाच्या प्रगतीची दिशा आणि साधने ठरविण्याच्या योग्यतेचे होते, असे समजावे लागते.। एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीत मिशनऱ्यांनी आधी व नंतर कंपनी सरकारने विद्यादानाला सुरुवात केली. या लहानशा अवधीत आपल्या सामाजिक व राजकीय उद्धाराचा, संस्था स्थापून सामुदायिक रीत्या विचार करण्याइतके सज्ञानत्व देशात दिसू लागावे, हे जसे राज्यकर्त्यांना भूषणावह तसेच हिंदी जनतेला अभिमानास्पद आहे.।

प्रकरण बारावे

आस्मानी-सुलतानी

मुंबई बेटावर 'आस्मानी' अर्थात दैवी संकटे त्याच्या उत्पत्तीपासून येथे इंग्रजी राज्य स्थापन होईपर्यंत किती कोसळली असतील याची गणती करणे शक्य नाही. पण इंग्रजी राज्यकाळाच्या जेमतेम तीनशे वर्षांतील आस्मानी संकटांवरून त्यासंबंधी काही तर्क करता येतो. आस्मानी संकटे म्हणजे मनुष्याच्या आटोक्याबाहेरची निसर्गाची संकटे. वादळे, भूकंप, अग्निप्रलय, नद्यांचे महापूर, अतिवृष्टी, अवर्षण या आपत्ती आस्मानी आहेत. तर लढाया, कत्तली, लुटालूट, जाळपोळ वगैरे विपत्तींची गणना सुलतानीत केली जाते. या प्रकरणात वरील दोन्ही प्रकारच्या आपत्तींचा वृत्तांत द्यायचा आहे. आस्मानीपेक्षा सुलतानी प्रकरणे सांगायला काहीशी सोपी म्हणून त्यांच्याकडे प्रथम दृष्टिक्षेप करणे बरे.

मुंबईस विनमालकीच्या कुत्र्यांचा सुळसुळाट पूर्वी फार होता. आताही आहे; पण पूर्वीच्या मानाने तो पुष्कळच कमी आहे. कुत्री फार याचा रस्त्याच्या रहदारीला अडथळा व्हावा हा एक त्रास असला तरी त्याची क्षिती बाळगावी इतका तो भयप्रद नव्हता. कुत्र्यांचे पिसाळणे हा एक त्याचा घातक रोग आहे. हा रोग ज्याला जडेल त्या एकट्याचा घात करणारा असता तर त्याचे भय सदैव बाळगण्याचे कारण नव्हते. पण पिसाळलेली कुत्री दुसऱ्या कुत्र्यांना किंवा माणसांनादेखील चावतात. आणि वेळी औषधोपचार न केल्यास त्या चाव्याची प्राणहानीपर्यंत मजल जाते, हे सर्वांना माहीत आहे. शिवाय पिसाळलेले कुत्रे कोणते व निरोगी कोणते हे सकृद्दर्शनी ओळखणे कठीण असल्याने अशा बेवारशी कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचा उपाय म्हणून कंपनी सरकारने कुत्री मारून टाकावी व मारलेली कुत्री पोलिसचौकीत दाखवावी आणि कुत्री मारल्या-दाखल ठरविलेले बक्षीस घेऊन जावे, असा हुकूम जारी केला. पारसी आणि जीवदया-वाले हिंदू हे सदर हुकमाच्या अंमलबजावणीने अस्वस्थ होऊन शेवटी त्यांनी आपल्या हाती कायदा घेतला. १८३२ साली कुत्री मारण्याने दुखावणाऱ्या लोकांच्या वस्तीत कुत्र्यांचा पाठलाग करणाऱ्या शिपायांना मारहाण करण्यात आली. एवढ्यावरच ही गडबड थांबली असती तर हा प्रकार प्रसिद्ध झाला नसता. पण ज्यांनी हा दंगा आरंभला त्यांनी कोटातल्या गोऱ्या वस्तीच्या खाण्यापिण्याला अडथळा चालविला. गोऱ्यांमध्ये

कारकून, सावकार यांसारखे लोक नव्हते, तरी गोऱ्या शिपायांच्या काही तुकड्याही होत्या. त्यांची पाव, मांस वगैरे खाद्ये शहरातून जायची. या जिनसा वाटेवर लुटून दंगेखोरांनी कोटाच्या खंदकात किंवा जमिनीवर फेकून दिल्या. सरकारी अंमलदार कामाच्या जागी जात असता त्यांची वाहने अडवून त्यांच्यावर धूळ, कचरा वगैरे घाण फेकली. हा अनर्थ पाहून एके दिवशी दंगेखोरांवर जरूर पडल्यास गोळ्या झाडण्याच्या हुकमासह काही लष्करी शिपाई पाठविले. तेव्हा जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे दंगा थांबला. दंगेखोरांच्या टोळ्या फुटून पांगल्या. नंतर ज्यांना पकडले होते त्यांना वर्षा-दोन वर्षांइतक्या कैदेची शिक्षा ठोठावली. यानंतर दंगा थांबला. पण १८५१च्या ऑक्टोबरात मुसलमान विरुद्ध पारशी असा दंगा झाला. त्या महिन्याच्या १७व्या तारखेस सकाळी दहा-अकराच्या सुमारास जामामशिदीतून मुसलमान जे बाहेर पडले तेच मुळी मारामारी करण्याच्या तयारीने. त्यांचा रोष पारशी समाजावर होता. कारण काय, तर 'चित्रदर्पण' या नावाच्या पारशी संपादकाच्या गुजराती पत्रात छापलेले पैगंबराचे चित्र व चरित्र. हे चित्र व चरित्र एका इंग्रजी पुस्तकातून घेतलेले होते. छापण्याच्या अव्यवस्थितपणामुळे मुसलमान बिथरले. पैगंबराच्या चित्रात अवयव शुद्ध व सुंदर नव्हते. शिवाय छापताना डोक्याच्या भागास शाई जास्त लागून पैगंबर-साहेब आंधळे दिसत होते. चरित्राच्या मजकुरातही पैगंबरांना अपमानकारक मजकूर होता अशी मुसलमानांची समजूत होऊन त्यांचे पित्त खवळले. ता० १७ ऑक्टोबर हा शुक्रवार अर्थात मुसलमानांचा सामुदायिक प्रार्थनेचा दिवस. 'चित्रदर्पणा'चा तो अंक कोणीतरी त्या मशिदीवर चिकटवून आगीत तेल ओतले. यामुळे मशिदी-बाहेर पडणारा प्रत्येक मुसलमान मशिदीबाहेर कुठे पारशी दिसला की, त्याला ठोकीत सुटायचा. त्यात पारश्यांबरोबर इतर जातींच्या लोकांनाही मुस्लिम लाठ्यांचा प्रसाद खावा लागला. आपल्या वृत्तपत्राने उपस्थित केलेला हा अनर्थ पाहून 'चित्रदर्पणा'च्या संपादकाने मुसलमान समाजाची सपशेल माफी मागितली. पण तेवढ्याने तो समाज शांत झाला नाही. शेवटी दोन्ही समाजांतील वैषम्य घालवून सख्य जमविण्याची कामगिरी दोन्ही पक्षांतील वजनदार लोक, मोठ्या हुद्द्याचे सरकारी अधिकारी यांच्या खटपटीने पार पडली. वैर मोडले, सलोखा झाला. हे तमाम लोकांना जाहीर होण्यासाठी हिंदु-मुसलमानांतील नामांकित माणसे प्रत्येक गाडीत दोन-दोन व एक इंग्रज अंमलदार याप्रमाणे बसून एकदोन बाजारच्या रस्त्यांवरून फिरून आले. या वैराच्या ठिणग्या जवळजवळ वर्षभर उडत होत्या.

१८५१च्या मुसलमान-पारशी दंग्यानंतर मुंबईतील जातवारीचे वातावरण १८७४-पर्यंत गुण्यागोविंदाचे होते. त्या वर्षी फिरून मुसलमानांनी पारश्यांवर आक्रमण सुरू केले. या वेळी पोलिसांची कामगिरी दंग्याला उत्तेजक होती, असे दंग्याच्या हकीकती-वरून दिसते. देवी टोचणाऱ्या एका पारशी गृहस्थाने झोऱ्यास्टर, मोझेस, ख्रिस्त आणि मुहमद या चौघांच्या चरित्रांचे पुस्तक लिहिले आणि त्याची जाहिरात दिली.

जाहिरात पाहून मुसलमानांची डोकी तापली. १८५१ सालच्या प्रसंगाने महंमद पैगंबरावर पारशी लिहिणार म्हणजे तो पैगंबराची टवाळी करणार हे निश्चित असल्याचा ग्रह मुसलमानांनी मनात घट्ट धरून ठेवला होता. मग त्यासाठी तो ग्रंथ वाचण्याची तसदी मुसलमानांनी का घ्यावी? त्यांनी एकदम लाठ्या घेऊन सरळ पारशी वस्तीवर हल्ले चालू केले. तेव्हाचा पोलीस कमिशनर इस्से भी ज्यादा प्रकृतीचा होता. त्याने त्या पारशी लेखकाकडून जणू काही आक्षेपार्ह मजकूर न कळत लिहिला गेला असल्यास पुढे सव्यापसव्य नको या हेतूने आगाऊ माफी लिहून घेतली होती. दंगा उसळल्यावर पराकाष्ठेचे अकर्मण्यव्रत कमिशनर व त्याचा पाठीराखा गव्हर्नर या दोघांनी धारण केले होते. ता० १३ फेब्रुवारी रोजी मुसलमानांची चढाई सुरू झाली. या चढाईचे स्वरूप 'चक्षुर्वैसत्यं' करून घ्यावे या इराद्याने दोनतीन मित्र सोबतीस घेऊन त्या वेळी नुकतेच प्रसिद्धीच्या आघाडीवर येऊ लागलेले स्वाभिमानी फेरोजशहा मेथा हे बाजारभागात काही तास हिंडून आले. तेव्हा त्यांच्यावर दोनतीन ठिकाणी दंगेखोरांनी दगडविटांचा मारा केला. एका ठिकाणी स्वतःच्या बचावासाठी बरोबर नेलेली हत्यारे त्यांनी बाहेर काढली. त्याच क्षणी दंगेखोर पळू लागले. काही वेळाने पुन्हा गोळा होऊन हल्ला करू लागले. या वेळी त्यांना एकही पोलीस अगर पोलीस अधिकारी भेटला नाही. फेरोजशहांनी आपल्या या अनुभवाची उजळणी 'बॉंबे गॅझेट' या इंग्रजी दैनिकात लिहिली आहे. नंतर लष्कर जेव्हा दंग्याच्या जागी आले, तेव्हा दंग्याला उतार लागला.

दंग्यात मुसलमानांनी पारश्यांच्या अग्याऱ्यांची करवेल तेवढी नासधूस केली. घरात शिरून पारश्यांना झोडपून काढले. थोडीफार बरादारांची लूट व मोडतोडही केली. मुसलमानांनादेखील थोडेफार त्याच स्वरूपाचे प्रायश्चित मिळाले. पण हा दंगा जास्त काळ चालला नसला तरी पारशी समाजाने संघटित रीत्या या दंग्याचा गवगवा मात्र सडकून केला. या दंग्याची हकीकत पारशी जनतेने भारतमंत्र्यास पाठविली तेव्हा तिच्याबरोबर दंग्यात झालेल्या नुकसानीचे फोटो पाठविले होते. या सर्व खटाटोपाची फलनिष्पत्ती मात्र शून्य ठरली.

निरभ्र आकाशातून ध्यानीमनी नसता जमिनीवर वीज कोसळावी, अशा अर्थाचा एक वाक्प्रचार इंग्रजी भाषेत आहे. त्यासारख्या अनर्थाचा दुष्ट अनुभव १८९३ साली ११ ऑगस्ट रोजी मध्यान्हापासून मुंबईतील हिंदू समाजाच्या वाटणीस आला. काठेवाडातील जुनागड या मुसलमान वर्चस्वाच्या संस्थानातील प्रभासपट्टण या तीर्थस्थळानजीक हिंदु-मुसलमानांमध्ये मारामारी झाली. तेथील वैराचे लोण नंतर मुंबईस पोचले. ११ ऑगस्टच्या आधी काही काळ मुसलमानांमध्ये हिंदूंविरुद्ध उठावाची कल्पना धुमसत होती व या कल्पनेचा स्फोट केव्हातरी झाल्याशिवाय राहणार नाही याची थोडीशी अटकळ पोलीस अधिकाऱ्यांना होती. तिला अनुसरून काळबादेवीच्या हनुमान गल्लीतल्या हनुमानमंदिराच्या संरक्षणाची व्यवस्था पोलीसकमिशनराने केली

होती. त्यामुळे मुसलमानांची दंगल थोडी लांबणीवर पडली. सकाळी दंगल सुरू व्हायची ती दोन प्रहरी सुरू झाली. मुसलमानांचे समुदाय 'धर्म, धर्म—दीन दीन' या शब्दांच्या गर्जना करीत दिसेल त्या हिंदूला झोडपीत निघाले. ट्रॅम व इतर वहाने अडवून त्यांतील हिंदूंना बडवायचे असा सपाटा मुसलमानांनी लावला. हिंदूंनी शुक्रवारी आपल्या असावधपणामुळे रात्र पडेपर्यंत मार खाल्ला. रात्री मात्र त्यांनी मुसलमानांना इंगा दाखविण्याची तयारी केली. शनिवार उगवला तोच हिंदूंनी आधल्या दिवसाचा बदला घेण्याला सुरुवात केली. मग मुसलमानांनी चढाईच्या मर्यादा सोडल्या. परिणामी परळ, कामाठीपुरा वगैरे काही भागांत केवळ दंगलीचे राज्य चालले होते. ही दंडादंडी आवरायला पोलीसदल असमर्थ आहे अशी खात्री झाल्यावर पोलीसकमिशनराने लष्कराची कुमक बोलावली. तुकड्यातुकड्यांनी जमणाऱ्या लष्कराचा आकडा तीन हजारांवर गेला. त्यांत तोफाही होत्या. पोलिसकमिशनरांनी ते लष्कर घोक्याच्या नाक्यानाक्यावर उभे केले. हिंदु-मुसलमानांतली दंगल खरी, पण ती दंगल मोडायला पोलीस अगर लष्कर आले की दोन्ही पक्षांनी जुटून त्यावर तुटून पडायचे असाही प्रकार काही ठिकाणी घडत होता. यामुळे पुष्कळदा गोळी-बारही करावा लागला. ता० ११-१२ चा दंग्याचा आवेश शनिवार ता० १२ च्या संध्याकाळपासून ओसरत चालला. पण तो साफ दबला नसल्यामुळे रविवारी किरकोळ हुल्लड इतस्ततः सुरू होती. तिने क्वचित माणसाचा जीवही गेल्याची नोंद आढळते. दंगा दहा दिवसांनी निःशेष थांबला. या मुदतीत जवळजवळ पन्नास हजार बायकामुले शहराला रामराम ठोकून अन्यत्र गेली होती. ही दंगल पुढे सुमारे पन्नास वर्षांनी देशाची जी चिरफाड झाली तिची नांदी समजणे उचित होईल.

रोजच्या सर्वसामान्य व्यवहाराला दहा दिवस खीळ पडल्यावर लोकांची किती प्रकारे व किती हानी होत असेल याची मोजदाद करणे अतिशय कठीण आहे. वित्तहानी, प्राणहानी याप्रमाणे पाहावे ती हानीच दिसते. दंगा शमला तरी त्याचा कडवटपणा पुष्कळ वर्षे शिल्लक राहतो. स्वराज्य मिळाल्यापासून वारंवार दंगे होत नसले, तरी त्यांची संख्या पुष्कळ घटली आहे एवढेच काय ते दुबळे समाधान हिंदी जनतेला आहे. दंगे अजिबात बंद झालेले नाहीत हे लक्षात घेणे अवश्य आहे.

१९२९ मध्ये फेब्रुवारी-मार्च महिन्यात झालेला हिंदु-मुसलमानांचा दंगा १८९३-पेक्षा जास्त भयंकर होता. पठाण मुले पळवितात या हुलीने हिंदु-मुसलमान या दोन्ही समाजांचे दंगेखोर हे पठाणांना मारीत सुटले. दोन दिवसांनी त्या प्रकाराला हिंदु-मुसलमानांच्या दंग्याचे रूप आले. तेव्हा खिलाफत चळवळीतले शौकतअली नावाचे एक मुसलमान पुढारी मुंबईत होते. पठाणांचा पिच्छा न सोडल्यास पठाण राहतील बाजूला आणि हिंदु-मुसलमानांचा दंगा माजेल अशी धमकी त्यांनी उच्चारली होती व तीच खरी ठरली. या दंग्यातले मुसलमानांचे अत्याचार 'फ्री प्रेस' दैनिकाचे मालक कै० सदानंद यांनी उघडकीस आणले. यामागून स्वराज्य मिळेपर्यंत या दंग्यांची साथ

देशभर पसरत चालली होती. हिंदुस्थानची शकले करून पाकिस्तान-हिंदुस्थान (भारत) यांना ब्रिटिशांनी स्वराज्य दिल्यावर दोन्ही देशांत कित्येक महिने उभयपक्षी कत्तल चालू होती. त्यानंतर हिंदुस्थान-पाकिस्तानच्या दोन खऱ्याखुऱ्या लढायाही झाल्या.

हिंदु-मुसलमान या शब्दांनी दोन एकमेकांना सकृद्दर्शनी पाण्यात पाहणारे अहि-नकुलवत समाज असा बोध होतो. त्यांच्या आपसातील मारपिटीबद्दल आश्चर्य वाटू नये, पण या दंग्याचा काही तपशील या दोन समाजांतील दंगे म्हणजे थोतांडे होत असे वाटायला लावतो. मुसलमान आपल्या वस्तीतील हिंदूंचा जीव राखतात आणि हिंदू उलट आपल्या वस्तीतील मुसलमान कुटुंबाचे संरक्षण करतात, अशी उदाहरणे साधारणपणे प्रत्येक दंग्याच्या हकीकतीत प्रसिद्ध झालेली आहेत. ज्यांना दंग्यानिमित्त पकडून एकत्र ठेवले असे दोन्ही बाजूंचे दंगेखोर अटकेच्या जागी हसत खेळत जानी दोस्ताप्रमाणे पत्त्यांचा डाव खेळताना दिसले की तासा-दोन तासांपूर्वी एकमेकांचा जीव घेण्यासाठी टपलेले हिंदु-मुसलमान आपले धर्मवैर विसरून एकदम सलगीने कसे वागू लागतात, याचे पाहणाराला कोडे पडल्याशिवाय राहत नाही. दंग्यात अशा एका प्रसंगी अटकेल्या एकदोघांनी खुलासा केला की ही जागा सरकारी पाहुणाचाराची आहे. येथे हिंदू हिंदू राहत नाही व मुसलमान मुसलमान राहत नाही. येथे दोघेही सरकारचे पाहुणे असतात. एकदा प्रस्तुत लेखक पुण्याहून मुंबईला दुपारच्या एक्स्प्रेसने आला. गाडी जवळजवळ दोन-अडीच तास उशिरा सुमारे १० वाजता बोरीबंदरला पोचली. वस्तुतः वेळापत्रकाप्रमाणे ती गाडी बोरीबंदरला संध्याकाळी ७॥ वाजता पोचायला हवी होती. भोरघाटात विजेचा काही बिघाड झाल्यामुळे हा उशीर झाला होता. मुंबईत दंगा म्हणून थेट बोरीबंदरचे उतारू गाडीत थोडेच होते. यामुळे स्टेशनावर गर्दी नावालाच होती. उतारूंना आपापल्या वस्तीत पोचविण्याच्या सेवेखातर आलेले उभय धर्मांचे काही स्वयंसेवक होते. त्यांनी आपापल्या धर्माचे उतारू नेले. लेखक आपल्याला कोणी सोबती भेटतो का हा प्रश्न सुटण्यासाठी स्टेशनात थांबला होता. शेवटी अकरा वाजण्याच्या थोडे आधी त्याने स्टेशन सोडले. वाहनाची आशाच नव्हती, तेव्हा त्याने शहराचा रस्ता जीव मुठीत घेऊन धरला व अतिशय सावध-पणाने मागेपुढे पाहत तो धोबीतलावाजवळ पोचतो, तो तेथे त्याला एक चमत्कार वाटावा असा देखावा दिसला यासाठी किंचित थांबला. एकदोन हिंदू व तेवढेच मुसलमान फाणसाच्या प्रकाशात पत्त्यांचा डाव खेळत होते, हाच तो देखावा. अटकेबाहेरदेखील हिंदु-मुसलमान मैत्रीने खेळू शकतात यावरून केलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना, संचार-बंदीचा इषारा होता त्याबद्दल पत्ते खेळणाऱ्यांनी खुलासा केला की धोबीतलाव ते क्रॉफर्ड मार्केटपर्यंतचा रस्ता व त्यापलिकडचे शहर येथे कर्फ्यू (संचारबंदी) लागू आहे. मैदानाला तो हुकूम लागू नाही, म्हणून येथे तो कायदा लागू नाही! इतक्यात खेळाडू उठून घाईने बोरीबंदरच्या दिशेने चालू लागले. एकदम खेळण्याचे टाकल्या-

बद्दल त्यांनी कारण दिले की शहर भागातून दोनतीन पोलीस येत असल्याचे दृष्टीस पडले होते. यामुळे डब्याचा पहिला उतारू पोलिसांनी अडविला व त्याला पोलिसी थाटाचे प्रश्न विचारले आणि त्याची उत्तरे समाधानकारक वाटल्यामुळे त्यांनी उतारूस सोडले. या कथांचा रोख कोणत्या मुद्द्यावर आहे हे प्रारंभी सुचविले आहे. दंगे होणे, माणसे दगावणे हे जितके खरे आहे तितकेच येथे वर्णिलेले प्रकारही खरे आहेत. दंग्याचे मूळ कधीच समजू नये हेदेखील या प्रकरणातले एक गूढ आहे.

मुंबई शहराने मागील दीडदोन शतकांत भोगलेली सुल्तानी संकटे सांगून झाली. आस्मानी म्हणजे दैवी संकटांची कथा सुल्तानीपेक्षा साहजिकच निराळी व अधिक घाताची आहे. सुल्तानीबद्दल आगाऊ सुगावा लागू शकतो यामुळे त्याच्या प्रतिबंधाची पुष्कळदा तरतूद करण्याला सवड सापडते. अकस्मातपणे उद्‌भवेल ते दैवी. आता गेल्या शतकाच्या प्रारंभी (१८०३, फेब्रुवारी १७) मुंबईच्या कोटात लागलेली आग अशीच आस्मानी स्वरूपाची होती. आग कशी लागली हे कधीच कळले नाही. ही आग दिवसा लागली. दिवस होता म्हणून आग विझविण्याची धडपड सारखी सुरू ठेवूनही वाऱ्याच्या वेगामुळे आग मंदावण्याऐवजी तिचा भडका वाढतच गेला. दुसऱ्या दिवशीही आगीला उतार पडला नाही. उलट वारा आगीला दारूच्या कोठाराकडे नत असल्याचे पाहून अधिकच भय उत्पन्न झाले. त्या दिवसांत कोटातली घरे लाकडी असल्याने त्यांची आगीला मदतच झाली. दारूचे कोठार कितीही काळजी घेऊन पक्के बांधले असले तरी कुठे बारीकशी भेग असल्यास तिच्यातून आगीची सूक्ष्म ठिणगी कोठारात पडणार नाही असा विश्वास बाळगणे शक्य नव्हते. आग विझवण्याच्या धडाडीत मुंबईचा गव्हर्नर डंकन हा आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांसह आगीच्या जागी उपस्थित राहून श्रम करीत होता. त्याला एकदा त्याच्या नोकरवर्गाने तेथून दुसरीकडे निघून जावे, मग जीवाला धोका नाही, असे आग्रहाने सांगितले. पण तो पडला इंग्रज ! जहाज बुडू लागल्यावर प्रथम सारे उतारू वाचवावयाचे आणि सर्वांमागून आपण जहाज सोडायचे या परंपरेत तो वाढलेला होता. त्यामुळे त्याने आपली त्या वेळची कर्मभूमी सोडण्याचे नाकारले. दुसऱ्या दिवशी आरमारावरील खलाशी आग विझविण्याची सर्व आयुधे घेऊन किनाऱ्यावर आले व त्यांनी आगीशी झगडा चालविला. त्यांच्या प्रयत्नाला सुदैवाने वाऱ्याची अनुकूलता लाभली आणि आग विझण्याच्या पंथाला लागली. या अग्निप्रलयात लोकांच्या कल्पनेइतकी लोकांची हानी झाली नाही, असा मजकूर अग्निविषयक सरकारी अहवालात आहे. आग दिवसा लागलेली, यामुळे ज्यांना शक्य झाले त्या सर्वांनी आपापल्या घरातली हालविण्यासारखी मालमत्ता दुसरीकडे सुरक्षित नेऊन ठेवली. वरच्या मजल्यावरील माणसांना शिड्या लावून आरमारी नाविकांनी उतरवून वाचविले. स्थावर मिळकतीचे नुकसान फार झाले. त्यात जमशेटजी जीजीभाई यांचेही नुकसान पुष्कळ झाले. पण त्यांचे नशीब शिकंदर, यामुळे व्यापारात त्यांना 'नवकोटनारायण'

म्हणावे अशी संपत्ती पदरात पडली. आणि तिचा विनियोग सढळ हाताने लोकोपकारात केल्याने त्यांची कीर्ती आजतागायत गाइली जात असते. या आगीत ४७१ घरे, ६ पूजास्थाने (देवळे, मशिदी, चर्चे वगैरे) ५ लष्करी बराकी ही भस्मसात झाली, अशी नोंद सरकारी दप्तरात आहे.

मुंबईच्या वस्तीला वादळाचे जबर तडाखे दहावीस वर्षांच्या अंतराने बसतात, याची कल्पना येथील नागरिकांना आहे याबद्दल शंका नको. या शतकात या वादळांनी 'तुकाराम', 'रामदास' या दोन आगबोटींना जलसमाधी मिळाली. व त्या योगाने शेकडो उतारू प्राणास मुकले, याची आठवण अजून पुष्कळांना असेल. त्या आठवणींना मागील शतकात होऊन गेलेल्या एकदोन प्रचंड वादळांचा वृत्तांत दिल्याने या विपरीत प्रसंगांना उजाळा मिळेल. माडगावकरांच्या 'मुंबईवर्णन' या पुस्तकात १८३७ च्या वादळाचा उल्लेख असून १८५४ च्या झंझावाताची हकीकत पुष्कळांच्या लेखनात दृष्टीस पडते.

१८३७ चे वादळ पावसाळ्याच्या आरंभी जून महिन्याच्या १५ व्या तारखेस घडले. त्या दिवशी शहरातील सरकारी कचेऱ्या आणि व्यापारी कारखाने वगैरे सगळा मानवी कारभार बंद पडला होता. पावसाची संतत धार व सोसाट्याचा अखंड वारा या जोडीने कित्येक घरे जमीनदोस्त केली. शेकडो झाडे उलथून पडली. जहाजे, नावा, होड्या किती बुडाल्या यांची गणती नाही. लाखो रुपयांचा माल आखाताच्या पाण्यात पसरला होता. पुष्कळ तारवे मुंबईचा किनारा सोडून इतर बंदरांत जाऊन पडली होती. कोटात व इतरत्र जिकडे तिकडे हातहात इतके खोल पाणी भरले होते. मुंबई शहरात काही रया दिसत नव्हती. लोकही पुष्कळ दगावले. या वादळात तीस लाखांइतके नुकसान झाल्याची लोकांत बोलवा होती.

यामागून १७ वर्षांनी—१८५४ मध्ये—नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेला वादळ उद्भवले. आणि रात्र उलटण्यापूर्वी थंडावले. काय घडले ही जिज्ञासा तृप्त करण्यासाठी दुसऱ्या दिवशी घराबाहेर पडलेल्यांना पावलोपावली सर्व प्रकारच्या विध्वंसाचा प्रत्यय येत होता. स्थावरजंगमातली एकही वस्तू आपल्या मूळच्या ठिकाणी व धड स्थितीत नव्हती. रस्त्यावर झाडे कोसळलेली. त्यांच्या पाने, फांद्या, साली यांचे ढिगारे जिकडेतिकडे पसरून पडलेले. कित्येक घरांवरील छपरे प्रभंजनाच्या वेगाने घरावरून गायब झालेली. काठावरील खडकांवर आपटून शतशः फुटलेल्या होड्या, जहाजें वगैरेंच्या लहानमोठ्या ठिकऱ्यांनी समुद्राचे पाणी झाकलेले. पूर्वोक्त जलयानांपैकी जी बुडाली त्यांच्या डोलकाठ्यांची वरील टोके तेवढी दिसत होती. हजारो माडांचा सडा पडलेला. वादळ संपले तरी झालेल्या वादळाचा हाहाकार पुष्कळ दिवस चालू होता. संकट नाहीसे झाले की त्याचा हाहाकारसुद्धा माणसाच्या मनोरंजनाचा विषय बनतो ही माणसाच्या स्वभावाची एक खुबी आहे.

१९४४ एप्रिल १४ हा दिवस मुंबईच्या नागरिकांना ऐतिहासिक वाटण्यासारखा

आहे. १९३९ सालच्या सप्टेंबरात जर्मन राष्ट्राचा दैत्यप्राय स्वयंनेता हिटलर याने पेटविलेले दुसरे जागतिक महायुद्ध त्या वेळी अतिशय निकरावर आले होते. पण सरशीचे पारडे दोस्त राष्ट्रांच्या दिशेने अधिकाधिक झुकत असल्याने लढाईच्या काळजीचा ताण काही प्रमाणात सैलावला होता. १४ एप्रिल हा दिवस नेहमीच्या इतर दिवसांप्रमाणे रोजच्या व्यवहारात जात होता. दुपार उलटली, घड्याळाचे काटे सूर्यास्त नजीक असल्याचे सुचवू लागले होते, तोच कानाचे पडदे फाटावे अशा दणक्याचा आवाज होऊन त्याबरोबर धुळीसारखे लोट आकाशात पसरले. या प्रसंगाला पंधरा मिनिटे लोटतात न लोटतात तोच त्याच मासल्याचा दुसरा स्फोट झाला. दिवस लढाईचे व तो आवाज गरनाळा तोफ सुटावी त्यासारखा. मग रिकाम्या जिभांना आवरावे कोणी व कसे? कोणी म्हणावे, जपानी पाणबुडीचा हा खेळ आहे. कोणी तर्कावे, ही लीला जर्मन विमानाची आहे. हे तर्कवितर्काचे जाळे विणण्याचे काम थोड्याच वेळात आटोपले. बंदरातल्या एका आगबोटीत काही दारूगोळा भरलेला होता. ती बोट बंदरात आली तेव्हाच तिला आगीचा धोका असल्याचे ध्यानात आल्यामुळे अग्निशामक खात्याचे सर्व कामगार दिवसभर ती आग कह्यात आणून अनर्थ टाळण्याकरिता सारखे झटत होते. शेवटी त्या आगीने दारूगोळा उडविलाच. बंदरातला अपघात असल्यामुळे बंदरभागातील शेकडो माणसे घाबरून आपल्या राहण्याच्या जागा सोडून सामानसुमानाची बोचकी घेऊन शहरात जिकडेतिकडे बोळगल्ल्यांच्या आश्रयाला गेली. आगगाड्यांची बोरीबंदरची ये-जा अजिबात बंद पडली होती ती दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता सुरू झाली. त्या वेळी पुण्याला जाणारी गाडी सुटली. प्रस्तुत लेखक पुण्याला भायखळा स्टेशनवरून त्या गाडीने गेला तो कर्जतच्या पुढे घाटात रेलरस्त्याच्या कडेला असलेली पायवाट डोंगर चढणाऱ्या माणसांनी व्यापलेली. घाटात कुठे गाडी थांबण्याचा अवकाश की, पायवाटेवरले मुसाफीर डब्यात घुसण्याचा सक्त प्रयत्न करायचे. डब्यांत दाटीची भर पडायची. खिडक्या, दरवाजे, संडास या जागा माणसांनी व त्यांच्या बोचक्यांनी भरून गेलेल्या. गाडीला वेगही बेताचा. शेवटी गाडीने घाटमाथा (खंडाळा) गाठला तेव्हा गर्दी ओसरू लागली.

स्फोट झाल्यानंतर बंदरानजीकच्या काही इमारती पेटल्या. कोटातल्या अनेक दुकानांतल्या शोकेसेसची जाड भिंगे फुटली. घरे हादरली हे सांगावयास नकोच. बंदरातील पडझड व घालमेल सुधारण्याकरिता जी माणसे कामाला आली त्यांत बरेच इटालियन युद्धकैदी असल्याची बातमी तेव्हा प्रसिद्ध झाली होती. बाहेरगावी या अपघाताची हकीकत पदरची मीठमिरची लावून सांगणाऱ्यांना व लोकांत बभ्राट माजविणाऱ्यांना पकडून कैदेत टाकल्याने गप्पीदासांच्या बेजबाबदार बकव्याला खीळ पडली.

लक्ष्मी चंचल असते. ती एखाद्याच्या हाती आल्यास ती त्याच्याकडे किती दिवस राहील याचा भरवसा नसतो. आज तुम्ही वैभवाच्या शिखरावर स्वर्गसुख भोगीत

असला तर उद्या तुम्ही अकिंचन होऊन कोणत्या असह्य यातनांत रखडण्याची पाळी तुमच्यावर येईल हे सांगता येणार नाही. ही भाषा व हा अनुभव ही आपल्या परिचयाची आहेत. तरी माणसे संपत्तीच्या सदैव पाठलागावर असतात आणि खाड्यात पडून मपत्ती, प्रतिष्ठा वगैरे सर्व गमावून बसतात. राजसूय यज्ञानंतर पांडवांची जुगारापायी जी दीनावस्था झाली ती धनलोभ्यांच्या वाट्यास येते. मुंबई शहरात दारिद्र्य व श्रीमंती यांचा पाठशिवणीचा खेळ प्रत्यही प्रतिक्षणी चाललेला असतो, परंतु गेल्या शतकाच्या दोन वर्षांत (१८६४–६५) लक्ष्मीच्या चंचलतेचा असा जबर फटका बसला की तो मुंबईच्या इतिहासात नमूद करणे भाग आहे. १८६१ साली अमेरिकेच्या दक्षिणोत्तर संस्थानांत यादवी माजून अमेरिकेचा इंग्लंडला जाणारा कापूस तिकडे जाईना त्या योगाने इंग्लंडातील कापडांच्या गिरण्या बेकार होऊन बसण्याचे भय उत्पन्न झाल्यामुळे हिंदी कापसाची मागणी विलायतेस वाढली. हिंदी कापूस एकदम महागल्याने मुंबईच्या व्यापाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले. कापसाचे द्रव्य करण्यासाठी लोकांनी आपल्या घरातील गाद्या, गिर्द्या, तक्के, लोड, उश्या म्हणजे जेथे कापूस मिळेल ते सारे जिन्नस इंग्लंडच्या मागणीत घातले. अमेरिकेची लढाई किती काळ चालेल हे निश्चित नसले तरी ती थांबली पाहिजे याविषयी सर्वांनाच खात्री होती. तरी ती यादवी १८६५ मध्ये एकदम बंद पडेल आणि हिंदी कापसाचा व्यापार गडगडेल असा मात्र अंदाज व्यापारी वर्गाच्या मनाला शिवूनही गेला नव्हता. १८६१ च्या मध्यात तो अंदाज प्रत्यक्ष अनुभवास आला. १८६४ या वर्षी पैशाच्या उलाढालींना सुमार नव्हता. ही उलाढाल एकाची टोपी दुसऱ्याच्या डोक्यावर चढविण्यासारखी होती. करोडो रुपयांचा व्यापार फक्त कागदावर आणि बोलण्यात दिसायचा. या धामधुमीला त्या काळात 'शेअरमेनिआ' म्हणत व आजही ह्या प्रसंगाचा उल्लेख त्याच संज्ञेने होत असतो. शंभर रुपये भांडवलावर जवळ दुसरी काही माया नसता दहा-पाच हजारांचा व्यापार करणारा परिणामी भिकेस लागतो त्यातलाच हा एक सट्टा होता. याने हजारो माणसे नागवली. जिकडेतिकडे हाहाकार माजला. युरोपांत 'साऊथ सी बबल'—'दक्षिण सागराचा बुडबुडा' या नावाचा प्रसंग आहे त्याचे स्मरण हा प्रसंग पाहत असता होते. या प्रसंगाचा पुढारी प्रेमचंद रायचंद या नावाचा एक जैन व्यापारी होता. त्याची सविस्तर माहिती 'मुंबईचे मानकरी' या प्रकरणात दिलेली आहे.

गेल्या शतकाच्या अखेरीस मुंबईच्या नागरिकांना एका भयानक रोगाने पछाडले. या रोगाचा 'प्लेग' हे नाव असून त्याने नंतर सारा देश भरडला. हा रोग हिंदुस्थानच्या इतिहासाला १८९६ च्या हिवाळ्यात तो मुंबईत उसळण्यापूर्वी अपरिचित नव्हता. त्याचे उल्लेख इतिहासात पुष्कळदा येतात. ज्या काळातले ते उल्लेख आहेत, त्या काळात देशात लोकवस्तीची दाटी हल्लीसारखी नव्हती. हा या शहरी उद्भवल्यानंतर इतक्या झपाट्याने पसरला की एका रोग्याच्या प्रेताला स्मशानात दहन किंवा

दफन करून घरी परत यावे तो दुसऱ्या प्रेताच्या स्मशानयात्रेच्या तयारीस लागावे. अशी स्थिती लोकांना भोगण्याची पाळी आल्यामुळे शहराबाहेर जाणे हा उपाय लोकांनी स्वीकारला. मुंबईच्या उपनगरांची वाढ तेव्हापासून सुरू झाली असे म्हटल्यास ते अन्यथा होणार नाही. जेथे प्लेगचा प्रादुर्भाव होईल, ती जागा रोगनाशक औषधाच्या पाण्याने धुऊन काढायची, तेथील माणसांना इस्पितळांतून पोचवायचे, घरांची तपासणी व माणसांना घरातून काढणे हे प्रकार स्त्रियांच्या बाबतीत पडदा पाळणाऱ्या मुसलमान समाजाला रुचणारे नसल्यामुळे या शहरात पहिल्या एकदोन वर्षात लहानलहान दंगेही झाले. हिवाळ्याच्या आरंभी सुरुवात आणि उन्हाळ्याच्या आरंभी शेवट याप्रमाणे प्लेगच्या अमलाचे ठोकळ वेळापत्रक होते. त्यावर औषधी उपाय काढण्यासाठी चाललेल्या प्रयत्नात हाफकिन नावाचा एक ज्यू डॉक्टर यशस्वी झाला. त्याने एक लस तयार केली. ती माणसाच्या अंगात टोचल्याने रोग होत नाही व झाल्यास माणूस सहसा दगावत नाही, अशी त्या लसीच्या गुणकारित्वाबद्दल लोकांची खात्री पटल्यामुळे सांप्रत त्या लसीवर लोकांची श्रद्धा आहे. हा रोग फैलावण्यापूर्वी उंदीर मरू लागतात. त्या उंदरांवरील पिसवा चावल्या म्हणजे माणसाला प्लेग होतो. साथीचा रोग म्हणून प्लेगला दैवी आपत्ती मानली तरी या साथीला जन्म देणारी बीजे माणसाच्या अस्वच्छ व्यवहारातच दिसतील. प्लेगची साथ संपुष्टात येते न येते तोच १९१८ साली 'इन्फ्लुएन्झा' नावाच्या रोगाने साऱ्या देशावर आक्रमण करून लाखो लोकांना महिना दीड महिन्याच्या अवधीत इहलोकातून उठविले, इतकी त्याची संहारशक्ती प्रचंड होती. तेव्हा पहिले जागतिक युद्ध नुकतेच संपत होते. इन्फ्लुएन्झाच्या मदतीला काही दिवस कॉलऱ्याचाही धिंगाणा चालला होता. मुंबईच्या स्मशानातून सरणाच्या लाकडांचा पुरवठा कमी पडू लागला. स्मशानात जाळण्याला जागा एखाद्या दिवशी न मिळाल्यास तेथे येणाऱ्या प्रेतांच्या ताट्यांना नंबर लावून ठेवीत. त्या दिवसांमध्ये रोजची मृत्यूची संख्या काही दैनिकांतून प्रसिद्ध होत असे. ती कोणी पाहिल्यास एखाद्या दिवशी हजारावर ती संख्या गेल्याचे जिज्ञासूंच्या दृष्टीस पडेल. इन्फ्लुएन्झाची दरसाल प्लेगप्रमाणे फेरी नसे. इन्फ्लुएन्झाच्या तडाख्यात हिंदुस्थान एकटाच त्या काळी सापडला असला तरी जगातल्या इतर अनेक देशांना तेव्हा इन्फ्लुएन्झाच्या छायेतून जावे लागले होते.



प्रकरण तेरावे

करमणूक—मनोरंजन

माणसाला निर्वाहाच्या उद्योगात दिवसाचे कित्येक तास रावत असूनही त्याव्यतिरिक्त काही कामे स्वतःमागे लावून घेण्याची आवश्यकता असते, हा त्याचा स्वभाव जगभर दिसून येतो. अशी कामे त्याच्या बुद्धीचा विकास करणारी कामे असतात, तर कित्येकदा ती बुद्धी भ्रष्ट करून त्याच्या माणुसकीचा नाश साधणारी असतात. अशा घातक कामांना अनिवार्यतेने चिकटून राहणाऱ्यांना व्यसन हे निंदाव्यंजक नाव आहे, तर ज्या कामाची आसक्ती माणसाच्या गुण समजल्या जाणाऱ्या विशेषांची हानी करीत नाही, त्यांना नाद, षौक अशा गौरवपर शब्दांनी ओळखण्याचा प्रघात आहे. पण त्याच्या अतिरेकाला 'व्यसन' हा शब्द योजला जातो. तंबाखूचे धूम्रपान हे एका अर्थी व्यसन असूनही ते मद्यपानासारखे तिरस्करणीय गणले जात नाही. विड्याच्या पानात तंबाखू घालून ती चघळणे हे व्यसनच खरे, पण त्याविषयी समाज तिटकारा व्यक्त करीत नाही. तिटकारा दाखविला जातो तो चघळलेली तंबाखू थुंकण्याच्या पद्धतीबद्दल. तंबाखू या पदार्थाचा इतिहास युरोप व इतर देश यांच्या बाबतीत सुमारे पाचशे वर्षांइतकाच जुना ठरतो. हा पदार्थ अमेरिकेच्या शोधात सापडला आणि मग तो सर्वत्र पसरला. मुंबईत तो पोर्तुगीजांनी आणला असे मानावयास हरकत नाही. हिंदुस्थानात तंबाखूचा षौक ती आपट्याच्या पानात गुंडाळून, ती गुंडाळी पेटवून, मग त्या गुंडाळीचा धूर तोंडात ओढायचा व तो फुंकून बाहेर सोडायचा. त्या गुंडाळीला विडी हे नाव आहे. तंबाखूच्या उपभोगाची ही एक तऱ्हा झाली. पण तंबाखूची वस्त्रगाळ पूड चिमटीत धरून ती हुंगणे ही दुसरी तऱ्हा आहे: या पुडीला 'तपकीर' म्हणतात. दुसरा कोणताही पदार्थ जोडीस न घेता केवळ तंबाखूचा चुराच हातावर चोळून तोंडात टाकायचा किंवा कधी त्याला तोंडात टाकण्यापूर्वी ओला चुना चोळायचा. तंबाखूचा आस्वाद घेण्याची साधनेही अनेक आहेत. विडीला सिगारेट ही सवत मागे टाकीत आहे. सिगार किंवा चिरूट या प्रकाराला अद्यापि कोणी दावेदार हिंदी बाजारात उठलेला नाही. हिंदुस्थानातील चिलीम म्हणजे इंग्रजी 'पाइप'. गुडगुडीशी स्पर्धा करणारे परदेशी साधन मात्र अजून आपल्या देशात आलेले दिसत नाही. गुडगुडीचा

उपयोग करणारे उत्तर भारतीय जास्त. गुडगुडी हा श्रीमंतांचा विलास आहे.

मद्य हा पदार्थ तंबाखूसारखा नवा नाही. तो हजारो वर्षांइतका जुना असून त्याचा निषेधही तितकाच प्राचीन आहे. हिंदुस्थानचे लोक त्याचे कधीच सेवन करीत नव्हते, हा दारूबंदीवाल्यांचा दावाही खरा नाही. भगवद्गीतेचा उद्गाता व पांडवांचा कैवारी श्रीकृष्ण ज्या जमातीत जन्मास आला ते यादव मद्यपी होते, व त्या सर्वांचा क्षय दारूपायी झाला, अशी पुराणांची साक्ष आहे. क्रिस्ती धर्मात मद्याचा कडक निषेध नसला तरी प्रोत्साहनही नाही. कायद्याने दारूबंदी करणाऱ्या अमेरिकेची जनता धर्माने क्रिस्ती आहे. कित्येक वर्षे अमेरिकेने दारूबंदीचा प्रयोग चालू ठेवला होता. शेवटी अपयश पदरी घेऊन तो सोडून देणे अमेरिकेला भाग पडले. १९१४ ते १९१८ या अवधीतील पहिल्या युरोपियन महायुद्धाच्या वेळी रशियाने दारूबंदी अमलात आणण्याचा डाव टाकून पाहिला, पण तोही वाया गेला. ही माहिती येथे नमूद करण्याचे कारण मुंबईतील नागरिकांच्या जीवनाची ओळख करून द्यावी हे आहे. मुंबई शहर मद्याच्या व्यसनाला अपवाद नाही. परंतु स्वराज्यपूर्वकाळातली दारूची राजरोस दुकानदारी मात्र बंद पडली असून हातभट्टीची दारू चोरून खपते. ती पुष्कळदा पिणाऱ्याचा बळीही घेते अशा बातम्या वृत्तपत्रातून वारंवार प्रसिद्ध होत असतात. इस्लाम धर्मात मात्र, मद्याचा निषेध आहे.

येथे मुंबईतील दोन व्यसनांची माहिती दिली. तारतम्याने विचार केल्यास तंबाखू-पेक्षा दारू जास्त घातकी असे दिसून येईल. या दोन्हीस मागे टाकणाऱ्या चंडोलखाने नावाच्या काही जागा मुंबईत आहेत. तेथे अफूचा धूर तंबाखूच्या धुराप्रमाणे तोंडाने ओढण्याचा बाजार असतो. अफूच्या गोळ्यांना 'चंडोल' हे नाव आहे. ही गोळी चिलमीच्या तोंडावर ठेवायची व तिला तुपात भिजविलेला काकडा पेटवून त्याची आग लावून आडवे पडून झुरके मारायचे अशी या कैफाची प्रक्रिया आहे. चंडोलखान्याचे वर्णन माडगावकरांच्या 'मुंबईचे वर्णन' (१८६३) या पुस्तकात आहे. तेव्हा चंडोल-खाने १८६३ पूर्वीपासून अस्तित्वात असले पाहिजेत असे धरून चालावयास हरकत नाही. अफू हा कैफ मुसलमानी राज्यातही चालू असल्याची उदाहरणे इतिहासात पुष्कळ आहेत. आता माडगावकरांनी केलेले चंडोलखान्याचे वर्णन पाहा :

"या स्थळातील अधिकारी चिनी लोक जे अफीण खाण्यात प्रवीण व मोठेमोठे कैफ करून पचविण्यास समर्थ तेच असतात. चंडोल पितेवेळी आडवे पडावे लागते म्हणून या जगात जिकडेतिकडे ओबडधोबड बाक, खाटा, चौपाया घातलेल्या असतात. आणि जाड्याभरड्या हातऱ्या घालून त्यावर मुसलमान, ब्राह्मण, परभू, शेणवी, सोनार, भाटये असे अठरापगड जातीचे चंडोलउपासक हातपाय ताणून पडलेले असतात. कोणी डोळे वटारिलेले असतात, कोणी ओकतात, कोणाच्या तोंडावर माशा बसलेल्या असतात, कोणी खोकतात, कोणी तोंड वेडेवाकडे करितात, कोणी उसाची गंडेरी चोखितात, कोणी सीताफळाच्या बिया तोंडात घालितात, कोणी केळी खातात, कोणी

घेरी येऊन पडलेले आहेत, असे दृष्टीस पडते. या जाग्यात जिकडे तिकडे केर व कचरा पडलेला असून सर्व गोष्टींनी हा मळीण असतो. आणि जे लोक ह्या कैफाच्या स्वाधीन झालेले असतात ते निस्तेज व भयंकर दिसतात. पंधरासोळा वर्षांच्या वयाचा भरज्वानीत आलेला मुलगा वर्ष-सहा महिने चंडोल ओढावयास लागला म्हणजे त्याची अवस्था जरत्कारूसारखी होते. बहुधा त्याची मुद्रा मृत्यूच्या चित्रासारखी असते" (मुंबईचें वर्णन, प्र० १०)

एस्० एम्० एडवर्ड्स या मुंबईच्या पोलिस कमिशनराच्या 'वाय वेज ऑफ बॉम्बे' (१९१२) या नावाच्या पुस्तकात 'सायंछाया' या मथळ्याचा लेख असून त्यात चंडोलखान्याची सचित्र माहिती दिलेली आहे. तिचा माडगावकरांच्या पूर्वोक्त माहितीशी उत्तम मेळ बसतो.

रावाला रंक व रंकाला राव बनविणारा घोडदौडीच्या शर्यतीचा एक खेळ आहे. या शर्यतीच्या घोड्यांच्या राजांच्याप्रमाणे वंशावळी छापलेल्या असतात. ज्या दिवशी शर्यती असतील त्या दिवशी शर्यतीच्या मैदानाकडे हजारो लोक जमतात व कोणता घोडा जिंकेल या प्रश्नावर प्रेक्षक पैजा लावतात आणि त्या योगाने दारिद्र्य-श्रीमंतीची घोडदौड पैजा लावणाऱ्या लोकात चालू राहते. हा खेळ मुंबईतील इंग्रजांच्या ऐतिहासिक कागदपत्रामध्ये १८ व्या शतकात आढळतो. स्वराज्यात तो बंद करून टाकावा अशी मसलत घाटत होती. ती अमलात आली नाही. पूर्वीप्रमाणे या शर्यती देशातल्या अनेक शहरी चालू आहेत. पण सांप्रत इंग्रज राजवटीतल्याइतके या शर्यतींना महत्त्व नाही. शर्यतीचे वेड लोकांत कसे असते याचा अनुभव आगगाडीत येतो. उद्या जर पुण्याला शर्यती असतील तर आज रात्रीच्या गाडीने पुण्याचा प्रवास करावा, म्हणजे शर्यतीतील घोड्यांच्या वंशावळींचा पूर्ण एकाग्रतेने अभ्यास करणारे व त्यावरून डब्यातील समानशीलांशी चर्चा करण्यात मशगूल झालेले कितीतरी प्रवासी दृष्टीस पडतात. शर्यतीमधील घोड्यांच्या वंशावळीची पुस्तके शर्यतीच्या दिवसांत छापलेली मिळतात.

आता मुंबईकरांच्या इतर खेळाकडे थोडे लक्ष देऊ. इंग्रज जेथे जाईल तेथे आपले आवडते खेळ बरोबर घेऊन जातो, अशी त्याची खोड आहे. मुंबईस त्याच्या राज्याचा जम बसल्यानंतर त्याचे फूटबॉल, टेनीस, क्रिकेट व टेनिसच्या जातीचा बॅडमिंटन वगैरे खेळ मुंबईकरांनी आपलेसे केले. बैठ्या खेळांत इंग्रजांचे पत्ते घुसले. पूर्वी गंजिफा हा खेळ होता. तो आता नामशेष झाला आहे. क्रिकेटची आवड तर इतकी बोकाळली आहे की सुटीच्या दिवशी व एरवीसुद्धा शाळकरी मुले गल्ल्यावोळांतून क्रिकेटचा धुडगूस घालीत असल्याचे पाहायला सापडते. खेळाडू मुले आपल्या परीने जपून खेळत असली तरी एखाद्या वेळी चेंडू उडतो व आजूबाजूच्या घरांच्या खिडक्यांच्या काचा फोडतो. मुंबईत जेथे माणसांना राहायला जागा नाही, तेथे मुलांसाठी खेळांच्या मैदानांचा विचार हवा कशाला?

इंग्रजांकडून मुंबईस परिचित झालेले खेळ पुढील होत : क्रिकेट, फूटबॉल, टेनीस, हॉकी वगैरे. येथे नमूद केलेले सारे खेळ मैदानी आहेत. त्यांच्यासाठी घराबाहेर निराळी लहान मोठी स्वतंत्र मोकळी जागा लागते. या खेळांची साधनेही खेळाडूना परावलंबनाखेरीज प्राप्त होऊ शकत नाहीत. ती साधने पुष्कळ व मोलाची असतात, हे आजच्या मुंबईकरांना माहीत आहे. क्रिकेट, फूटबॉल, हॉकी या खेळांना तर मोठी मैदाने लागतात. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांमध्ये क्रिकेटची भक्ती फार आढळते. फूटबॉल, हॉकीची क्रिकेटच्या तुलनेने भक्ती फार कमी असे म्हटल्यास चूक होणार नाही. मुंबईमध्ये समुद्रकाठी हिंदू, मुसलमान, पारशी या जमातींची क्रीडास्थाने आहेत. तेथे प्रामुख्याने टेनीस आणि क्रिकेट या खेळांचा मान जास्त दिसतो. या खेळांचे साहित्य महाग असल्यामुळे पूर्वोक्त क्रीडास्थानांचे वर्गणीदार होऊन पुष्कळजण आपली खेळाची तहान भागवितात. या क्रीडास्थानासाठी 'जिमखाना' हे इंग्रजी नाव आहे. इंग्रजी खेळातली हारजीत उभयपक्षी दोनदा खेळल्याखेरीज ठरत नाही. फूटबॉल, हॉकी या खेळांत उभयपक्षांपैकी ज्यांचे 'गोल' जास्त तो पक्ष विजयी. गोल म्हणजे सामान्य अर्थाने ध्येय किंवा अंतिम साध्य. त्यासाठी खेळाच्या मैदानाच्या शेवटी एक जागा तयार केलेली असते. त्या जागी जे चेंडू जास्त वेळा घालवितील, त्यांची टोळी विजयी मानली जाते. गोलचे तंत्र फूटबॉल, हॉकी या दोन खेळांसाठी आहे. क्रिकेटचा निर्णय प्रतिस्पर्ध्यांपैकी ज्या गटाने सामनेवाल्यापेक्षा जास्त 'रन्स' (धावा) काढल्या असतील तो विजयी. हा निर्णय ठरलेला आहे. सांप्रत मराठीत क्रिकेटचे वर्तमान लिहिले जाऊ लागल्यामुळे त्या भाषेत इंग्रजी परिभाषेला तोडीस तोड असे प्रतिशब्द निर्माण झाले आहेत. प्रत्येक इंग्रजी शब्दावर मराठी शब्दाची तोड निघाली असा मात्र याचा अर्थ नव्हे.

खेड्यापाड्यातील देशी मैदानी खेळांची माहिती सादर करून या विषयाला रजा देणे बरे. देशी खेळात पहिला खेळ विटी-दांडू हा होय. यालाच 'गिल्लीदंडा' हे दुसरे नाव आहे. गोट्या, कबड्डी, आट्यापाट्या, खोखो हे इतर खेळ सर्वांच्या परिचयाचे आहेत. सर दिनशा वाच्छा यांनी मुंबईसंबंधात लिहिलेल्या आठवणींमध्ये १८५० च्या आगेमागे इंग्रजी शाळांतून शिकणारी मुले विटीदांडू खेळत असत असे नमूद केलेले आहे. या खेळाचे साहित्य त्याच्या नावातच आहे. विटी म्हणजे दोनअडीच इंच लांबीचा व दोन्ही टोके निमुळती असलेला लाकडाचा तुकडा व दांडू हा शब्दच त्याच्या स्वरूपाचा बोध करून देणारा आहे. याखेरीज एक छोटीशी खळी असावी लागते. त्या खळीवर विटी आडवी ठेवून दांडूने उडवायची हा खेळाचा प्रारंभ. खळीत विटीमागे दांडू ठेवून विटी उडवायची व नंतर विटीच्या निमुळत्या टोकावर दांडू मारून ती उडवायची व जमिनीवर पडण्यापूर्वी तिला दांडूने पुन्हा लांब उडवून लावायचे. यावर या खेळाच्या हारजितीचा निर्णय केला जातो. या खेळाची साधने पैशाखेरीज मिळविता येतात. तशीच तऱ्हा हुतूतू, खोखो वगैरे इतर देशी खेळांची

आहे. सांप्रत यातले कुस्तीसकट काही खेळ बॅकवेच्या वाळवंटात खेळले जातात. कुस्तीबद्दल मुद्दाम सांगायला पाहिजे की, मुंबईस कित्येक परदेशी कुस्तीगीर सामन्यासाठी येऊन गेल्यामुळे कुस्तीचे सामने तिकिटे लावून जाहीरपणे झाले. पण त्या सामन्यांची अद्यापि अत्रुटित परंपरा सुरू झालेली नाही. इंग्रजांत 'बॉक्सिंग' म्हणजे मुष्टियुद्ध या नावाचा एक खेळ आहे. त्याचाही नाद मुंबईकरांना नाही. एका क्रिकेटचा मात्र नाद अतिशय आहे. जेव्हा परदेशचे क्रिकेट खेळाडूंचे संघ येथे येतात तेव्हा मुंबईचे नागरिक वेडावून जातात. त्याबरोबर हे खेळ पाहण्याच्या तिकिटांच्या काळाबाजारासारख्या गुन्हेगारीचेही फावते. हल्ली क्रिकेटच्या खेळासाठी दोन मैदाने ब्रॅबर्न स्टेडियम व वानखेडे स्टेडियम या नावाने ओळखली जातात ती चर्चगेट स्टेशनच्या नजीक आहेत. ही मैदाने प्रेक्षकांच्या बैठकीच्या सोयीसकट बांधून काढली आहेत. ही बांधली जाण्यापूर्वी सर्कशीच्या तंबूत ज्याप्रमाणे प्रेक्षकांच्या बैठकीची सोय करतात तशी आजाद मैदानावर करीत असत. हल्ली असे सामने 'दूरदर्शन' (टेलीव्हिजन) या साधनाच्या योगाने घरबसल्या पाहण्यास मिळण्याची सोय झाली आहे. यामुळे मैदानावरील गडबडगोंगाट घरात आला.

करमणूक आणि व्यायाम या दोन्ही गोष्टींचे लाभ पदरात टाकणारा एक प्रकार पोहण्याच्या खेळाचा आहे. मुंबई हे बेट असल्यामुळे पोहण्यासाठी पाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. पण नागरिकांची पोहण्याची सोय व्हावी म्हणून दोन कृत्रिम तलाव बांधण्यात आले आहेत. एक सेठ मफतलाल यांच्या नावाने गिरगाव चौपाटी येथे आहे व दुसरा दादर चौपाटी येथे महात्मा गांधी यांच्या नावाने महानगरपालिकेने बांधला आहे. या ठिकाणी ठराविक शुल्क द्यावे लागते. यामुळे यांच्याकाठी पोहण्यानिमित्त लागणाऱ्या इतर सोयी उपलब्ध होतात.

इंग्रजांच्या कारकिर्दीत मुंबापुरस्थांना ज्या नव्या सवयी लागल्या त्यातली सकाळी किंवा संध्याकाळी अथवा दोन्ही वेळी मनुष्याच्या गर्दीबाहेर मोकळ्या जागी पायपीट करणे (सहल करणे किंवा फिरणे) किंवा बसून राहणे ही एक आहे. ही सवय १९व्या शतकातली आहे. याप्रमाणे समुद्रकाठी माणसे जमायची ती मोठ्या प्रमाणात पारशी असायची. त्यांतल्या कित्येकांनी फिर्दोसी कवीच्या 'शहानामा' महाकाव्यातील स्फूर्तिदायक कथा गायच्या, कित्येक जण घरून आणलेल्या खेळाचे पट मांडून खेळ खेळायचे, हवा खाताना तोंडी लावण्यादाखल उसाच्या गंडेऱ्या चावीत चघळत बसायचे. समुद्रकाठच्या या हवाखोरांत पारशी लोकांखेरीज बहुधा हिंदू, मुसलमान वगैरे दुसऱ्या जमातीचा कोणीही दिसायचा नाही. या कामी जेथे पुरुषाची वानवा तेथे बायकांचे तर नावच घ्यायला नको. पारशी बायकाही गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत, मुसलमानांइतक्या कडक रीतीने नसल्या तरी पडदपोशीचा निर्बंध पाळीत असत. गेल्या शतकाच्या मध्यानंतर अपूर्व आकर्षक समारंभ पाहण्याच्या ओढीने पारशी बायका पडदा टाकून गर्दीत हिंडूफिरू लागल्या. समुद्रकाठी हवा खाणारांत पारशी बायका नसल्या तरी मुलांना

बंदी नव्हती. यामुळे त्यांच्या समाधानासाठी गंडेऱ्या विकणाऱ्यांप्रमाणे लाकडाच्या देशी व रबराच्या परदेशी बाहुल्या विकणारे लोकही तेथे असायचे. परदेशी बाहुल्यांत हालचाली करणाऱ्या आणि बोलक्या बाहुल्यांची ओढ जास्त. या बाहुल्यांची किंमतही थोडी जास्त असे. तोंडाने वाजविण्याचे बाजे हा एक मुलांचा खेळ नमूद करायला पाहिजे. सागरतीरी जमणाऱ्यांत एखादा गोष्टीवेल्हाळ वृद्ध असल्यास त्याच्या तोंडून जुन्या जमान्यातील सुरस गोष्टी ऐकण्याकरिता मुलांची गर्दी त्याभोवती जमायची. सूर्य अस्तास जातेवेळी प्रौढवयाचे धर्मनिष्ठ पारशी उभे राहून प्रार्थनेत मग्न व्हायचे. शहरातील देवदेवतांच्या यात्रेसारखाच समुद्रकाठी हवा खाणाऱ्या गर्दीचा प्रकार असे. यात्रेची गर्दी बहुजिनसी तर समुद्रकाठची गर्दी केवळ पारश्यांची असे एवढाच काय तो या दोन प्रसंगांतला भेद सहज लक्षात येणारा आहे.

गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत एखाद्या समारंभानिमित्त मुंबईतील सर्व जातींच्या नागरिकांत कलावंतिणींचे नाचगाणे करण्याची रीत रूढ होती. ही रीत रस्त्यावरील मिरवणुकीतूनही अमलात असे. नाचगाणी करविणे हा एक अनैतिक प्रकार आहे अशी भावना शिक्षणप्रसाराबरोबर वाढत जाऊन नाचगाणी व्यवहारातून गेली. आता या दोन्ही कलांच्या उत्कर्षाचे दिवस आले आहेत. मागील शतकात गाणे वा नाचणे या दोन्ही कलांचा पोटासाठी धंदा झाला होता. आणि त्याचा फायदा हिंदू व जास्त प्रमाणात मुसलमान स्त्रिया घेत असत. हल्ली गाणे-नाचणे या दोन्ही कलांचा आदर कुलीन व संपन्न कुटुंबातील नव्या पिढीमध्ये होऊ लागल्यामुळे या दोन्ही कलांसंबंधाचा तिरस्कार बराच ऱ्हास पावला आहे. गाण्याच्या मैफलीचा मक्ता कलावंत पुरुषाकडेच होता. अलीकडे स्त्रियाही त्यात भागीदार होऊ लागल्या आहेत. समारंभाच्या मिरवणुकीतील कलावंतिणींचे नाच मात्र जे बंद पडले ते बहुधा कायमचेच.

मुंबई शहरात पंचवीसतीस वर्षांमागे करमणुकीचे रस्तोरस्ती चालणारे काही प्रकार सांगणे अवश्य आहे. त्या करमणुकीचे घटक माकडाचे जोडपे व एक बकरी, कुस्तीचे अस्वल, डोंबाऱ्याचे कसरती कुटुंब, जादूगार, टोपल्यांतून साप व मुंगूस घेऊन फिरणारे गारूडी वगैरे होते. यांत नंदीबैलालाही धरायला पाहिजे. यातले काही खेळ 'सर्कस' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या खेळाट्टंच्या संस्थाही करून दाखवितात. सर्कशीत जनावरांची विपुलता आणि विविधता असल्याने सर्कशीचे आकर्षण मोठे असावे यात नवल नाही. वाघसिंह हे हिंस्र पशू किंवा समुद्रातील काही मासेदेखील माणसाच्या इशाऱ्यावर शिकविलेले खेळ करून दाखवितात. डोंबाऱ्याचा खेळ ही-देखील अल्पप्रमाणात सर्कसच म्हणावी. आता वर ज्यांचा निर्देश केला ती माणसे व त्यांचे खेळ लोकव्यवहारात साफ लोपले आहेत. सर्कशींनादेखील चालू जीवनात फारशी जागा नाही. महागाई व राहण्याच्या जागेचा अभाव ही त्याची कारणे उघड दिसतात. हल्ली समुद्राच्या वाळवंटात हिंदू स्त्री-पुरुषांची गर्दी जास्त असते. पारशी, मुसलमान हे कमीच दृष्टीस पडतात.

गेल्या शतकाच्या मध्यात नाटक हे मनोविनोदाचे साधन दक्षिण महाराष्ट्रातून मुंबईस येऊन ह्या कलेच्या सन्मानाचे दिवस दिसू लागले. वस्तुतः नाट्यकला आपल्या देशात प्राचीन काळी प्रसिद्ध होती. तेव्हा भरत नावाच्या आचार्याने या विषयाचे शास्त्रही लिहून ठेवले. मधली कित्येक शतके या कलेकडे तुच्छतेने पाहावे, या स्थितीस ही कला पोचली होती. त्या कलेचा चेहरा उजळण्याचे श्रेय अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या पदरात टाकावे लागते. १८८० साली नाटकातील गद्य संवादाला संगीताची जोड देऊन किर्लोस्करांनी या नव्या रूपात नाटक रंगभूमीवर आणले. त्या दिवसांपासूनच संगीत नाटकांची गोडी समाजातील रसिकांना लागली. पुढे ती कुशल गुणी नटांनी वाढविली. किर्लोस्करांना सुरुवातीसच दोनतीन अभिनय, रूप व गायन या तिन्ही गुणांमध्ये पहिल्या पट्टीस गणले जावे, अशा योग्यतेचे नट लाभल्यामुळे त्यांच्या कंपनीची लोकप्रियता बरीच वर्षे टिकून राहिली. मागील शतक उलटताना नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांनी काही काळ ती लोकप्रियता उच्च स्थानीच राखली. १९११ मध्ये बालगंधर्वांनी आपल्या मालकीची गंधर्व नाटक मंडळी उभी केली. आद्यापेक्षा खर्चाचे प्रमाण भलतीकडे जास्त अशा व्यवहारामुळे दिवाळे वाजले तरी बालगंधर्वांना त्यांच्या अंगच्या कलागुणानिमित्त कर्जबाजारीपणातही गुणज्ञांनी संभाळून घेतल्यामुळे आणखी थोडा काळ बालगंधर्वांनी बऱ्या स्थितीत काढला. शेवटी त्या मंडळींची इतिश्री झाली. गद्य नाटकांच्या प्रयोगात महाराष्ट्र नाटक मंडळीचा हात धरणारी एकही नाटक मंडळी १९११ नंतर जिवंत राहिली नाही. ठोकळ हिशोबाने १८८० ते १९१० हा तीस वर्षांचा काळ इंग्रजी मनूतील मराठी रंगभूमीचा वैभवकाळ म्हणता येईल.

शाहूनगरवासी या नावाची गद्य नाटके करणारी एक नाटक मंडळी किर्लोस्कर मंडळीबरोबरच आपली नाट्यसेवा करीत होती. या मंडळीचे चालक गणपतराव जोशी यांच्याजवळ जणू काय उपजतच नाट्यगुणांची देणगी निसर्गाने ठेवली होती. यामुळे गणपतराव जोशी अथवा किर्लोस्कर कंपनीच्या प्रारंभकाळातील भाऊराव कोल्हटकर यांसारख्या प्रख्यात नटांच्या कामगिरीविषयी त्यांच्या गुणांना अधिक उजळणाऱ्या दंतकथा उत्पन्न झाल्या आहेत. एखाद्याच्या गुणाविषयी दंतकथा जन्मास येणे हा त्याच्या गुणाचा एक विजय मानला जातो.

शाहूनगरवासीमागून १९०४ पासून महाराष्ट्र नाटक मंडळी नाव काढू लागली. या मंडळीतले बरेच नट महाडचे राहणारे व थोडेफार कॉलेजपर्यंतचे शिक्षण घेतलेले होते. या मंडळीत सुरुवातीस दाखल झालेल्यांपैकी अनेकजण पोट भरण्याचा एक धंदा या दृष्टीने नाटकाकडे पाहणारे नव्हते. नाटक ही एक कला आहे, तिचे प्रयोग लोकांना दाखवून एकप्रकारे देशसेवा करायची अशा विशाल ध्येयाने प्रेरित झालेल्या तरुणांचा महाराष्ट्र नाटक मंडळी हा संघ ठरावा अशी त्याची सुरुवातीस स्थिती होती. जसा मंडळीमध्ये ध्येयवाद होता तशी मंडळीच्या द्वारे राष्ट्रकल्याण जनतेला

शिकविणारी नाटके लिहिणारी कै० कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांसारखी सिद्धहस्त व्यक्ती नाटके लिहून देण्याला मिळाली. मराठी वाङ्मयातील विनोदाची उणीव भरून काढणारे वऱ्हाडातील श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे नाट्यलेखन किर्लोस्कर, गंधर्व या नाटक मंडळ्यांना मिळाले. यात राम गणेश गडकरी यांच्या नाटकांची भर पडल्यावर मराठी नाटकाची कमान खूपच उंचावली. सवाई माधवरावांचा मृत्यू हे खाडिलकरांचे पहिले नाटक. त्यामागून बायकांचे बंड, कीचकवध, सत्त्वपरीक्षा, भाऊबंदकी वगैरे अनेक गद्य तशीच मानापमान, स्वयंवर इत्यादि संगीत नाटके खाडिलकरांनी लिहिली. गद्यापैकी कीचकवध, भाऊबंदकी या दोन नाटकांनी व संगीता-पैकी मानापमान, स्वयंवर या दोन नाटकांनी सर्वाधिक लोकप्रियता मिळविली. गडकऱ्यांची सर्व नाटके सारखीच लोकप्रिय आहेत. गडकऱ्यांचे पहिले नाटक 'प्रेमसंन्यास' हे असून १९१२ साली त्याचा पहिला प्रयोग महाराष्ट्र नाटक मंडळीने रंगभूमीवर आणल्यापासून त्यांची सर्व नाटके लोकांना आवडत गेली. गडकऱ्यांनी १९१९ मध्ये इहलोक सोडला. नाटक लिहिणारा, नाटकांतील भूमिका वठविणारा नट, नाटकाचा आस्वाद घेणारा रसिक या तिघांचा समन्वय उत्पन्न करील ते नाटक यशस्वी अशी त्याच्या लोकप्रियतेची व्याख्या करणे शक्य आहे. कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी यांच्या काही अंशी मागून मामा वरेरकर यांचे नाव घेता येईल.

शाहूनगरवासी मंडळी ही शेक्स्पीयरची भाषांतरित नाटके त्राटिका, हॅम्लेट, पानिपतचा मुकाबला, संत तुकाराम अशी काही जुन्या पठडीतील नाटके करीत असे. त्यातले हॅम्लेट हे विशेष लोकप्रिय होते. किर्लोस्कर मंडळी किर्लोस्करलिखित कालिदासाचे शाकुंतल नाटकाचा प्रयोग करीत असे. नंतर सौभद्र करू लागली. हे नाटक अद्यापि लोकप्रिय आहे. कालांतराने कोल्हटकरांच्या विनोदप्रचुर नाटकांचे प्रयोग किर्लोस्करांनी सुरू केले. पुढे नव्या दृष्टीचे व नव्या तंत्राचे खाडिलकर, गडकरी, वरेरकर हे नाटके लिहिणारे सरसावले.

मुंबईतील खेळ-करमणुकीचे विवेचन करताना 'तमाशा' हा नाटकाचाच एक प्रकार विसरून चालणार नाही. मुंबईस तमाशा दर दिवशी याप्रमाणे बारमास चालू असतो. पट्टे बाबूराव या नावाचा एक गृहस्थ तमाशाच्या क्षेत्रात नाव गाजवून गेला हे या करमणुकीच्या संदर्भात सहज आठवणारे आहे. तमाशातदेखील बुद्धिमत्ता व तदनुसार काही शिकवण असते, हे ध्यानात ठेवणे चांगले.

या शतकाच्या प्रारंभापासून आधिभौतिक शास्त्रांच्या संशोधनाने जनतेला चलच्चित्रपट हे एक मनोरंजनाचे नवे साधन पुरविले आहे. त्यासाठी चाललेल्या शास्त्रज्ञांचे प्रयत्न यशस्वी होऊन १८९५ मध्ये चलच्चित्रपट म्हणजे सिनेमा जगातील मानवांचे रंजन करू लागले. मुंबईत १९०८ सालापासून सिनेमाची ओळख आहे. सर्कशीप्रमाणे सिनेमाची यंत्रे घेऊन मोठाल्या शहरी सिनेमातील चित्रे दाखवून द्रव्य गाठीस मारावे आणि स्वदेशी जावे, अशा रीतीने सिनेमा कंपन्या प्रारंभी आपले काम करीत

होत्या. चलचित्रपट निर्माण करण्याचे काम मोठ्या खर्चाचे आहे, तरी हिंदुस्थानात चित्रपट तयार होऊ लागले व आता देशभर सर्वत्र सिनेमाचा व्यवसाय पसरला आहे. सुरुवातीस सिनेमात दाखवली जाणारी चित्रे बोलत नसत. म्हणून संवादाचा इत्यर्थ लिहून चित्रपटाच्या ओघात दाखवीत. १९२९ मध्ये बोलके सिनेमा तयार होऊ लागल्यामुळे सिनेमासंबंधातली एक मोठी उणीव नाहीशी झाली. आता तर रंगीत चित्रपट तयार होऊ लागल्यामुळे रंगासुद्धा मुळावरहुकूम सर्व देखावे प्रेक्षक पाहू शकतो. सिनेमाला पृथ्वी, अंतरिक्ष, समुद्र यांतल्या कोणत्याही क्षेत्राची अटक नाही. जी कथा दाखवायची तिला हवे असलेले दृश्य सिनेमा उभे करू शकतो. नाटके मागे पडण्याचे हे एक कारण आहे. नाटकांची रंगभूमी सिनेमांशी यशस्वी टक्कर देण्याला असमर्थ ठरते. महाराष्ट्राने सिनेमाच्या धंद्यातही नाटकांप्रमाणेच नाव कमावले आहे. सिनेमा महाराष्ट्राच्या पलीकडचा नाही, असा ठाम आत्म-विश्वास महाराष्ट्रात उत्पन्न करणारे दादासाहेब फाळके हे होत. त्यानंतर कोल्हापुरास चित्रपटाचा धंदा करणारी मंडळी स्थापन झाली. तिने संत, योद्धे, ऐतिहासिक प्रसंग यांचे चित्रपट रूपेरी पडद्यावर दाखविले. सांप्रत मुंबई शहरात एकाच वेळी कितीतरी ठिकाणी लोक सिनेमांचे निरनिराळे चित्रपट पाहून आपले मनोरंजन करून घेतात. महाराष्ट्रात श्री० व्ही० शांताराम, आचार्य प्र० के० अत्रे हे सिनेमाच्या क्षेत्रात प्रसिद्ध आहेत. सिनेमातील नट-नट्यांचे गुणदोष हा विद्यार्थ्यांच्या नित्य चर्चेचा विषय झालेला आहे.

प्रकरण चौदावे

वृत्तपत्रे

मुंबईत नव्या पाश्चात्त्य देशांतील पद्धतीचे शिक्षण इंग्रजकंपनीमार्फत देण्याचे काम सुरू झाल्यानंतर वीस वर्षांच्या आतबाहेर देशी भाषेत वृत्तपत्र प्रसिद्ध होऊ लागावे हे भारतीय होतकरूपणाचे एक विशेष लक्षण मुद्दाम ध्यानात ठेवण्यासारखे आहे. त्यात पुनः पहिले वृत्तपत्र काढणारा पारशी समाजातला एक हिंमती तरुण असावा हे मुंबईतील वृत्तपत्रांच्या इतिहासातले एक कौतुक ठरेल यातही संशय नाही. मुंबईत प्रथम महत्त्वाकांक्षी इंग्रजांनी वृत्तपत्रे चालू केली. युरोपात वृत्तपत्रे व्यापारांतूनच उगवली. व्यापाराला निरनिराळ्या घडामोडींचे ज्ञान असावे लागते व ते शक्य तेवढे लवकर मिळावे लागते, यासाठी युरोपात सर्व वेगवेगळ्या देशांतून व्यापारी वर्गाचे विश्वासू व जिज्ञासू बुद्धिमान हस्तक ठेवलेले असत. ते आपण जेथे आहो त्या देशात व्यापारावर इष्टानिष्ट परिणाम करणारे जे काही घडेल ते इत्थंभूत आपल्या देशाला कळविण्याला तत्पर व दक्ष असत. सरकारी राजदूताच्या विद्यमाने देशोदेशी बातम्यांची जी रीतसर देवाणघेवाण होत असे, त्याहून व्यापारी वर्गाच्या बातम्या एकमेकांना पुरविण्याचा व्यवहार अधिक त्वरेचा असे. हिंदुस्थानातही बातम्यांसंबंधात अशीच व्यवस्था होती. मराठेशाहीच्या काळात व्यापाऱ्याला सावकार म्हणत असत. यामुळे व्यापारी वर्गाचा जो आपसात पत्रव्यवहार चाले त्याला 'सावकारी' हा शब्द लावून इतिहासकालीन लोक आपले काम भागवीत. हा विस्तार येथे व्यर्थ केलेला नाही. वृत्तपत्रांशी त्याचा निकट संबंध आहे. पानिपतची लढाई होऊन गेल्यावर तिची समग्र इत्थंभूत हकीकत महाराष्ट्रात प्रथम लोकांना कळली ती सावकारी पत्रांच्या द्वारे. पत्राची भाषा सांकेतिक आहे. हिरे, मोहरा, मोती, खुर्दा वगैरे शब्दांनी पत्रलेखकाने लढाईतील हानीचा तपशील सुचविला आहे. दोन हिरे गळाले ह्या शब्दप्रयोगाने लढाईत विश्वासराव व सदाशिवराव (बाळाजी बाजीराव पेशव्याचा मुलगा व भाऊ) हे दोन खासे लढाईत पडले, असा हुशार वाचकांना बोध व्हावा. उदाहरणादाखल पानिपतविषयक एका प्रसिद्ध पत्राचा निर्देश केला. हिंदुस्थानात मुघलकाली अखबारात हा शब्द मोठ्या प्रमाणात आढळतो. त्याचा अर्थ बातमीपत्रे असाच आहे. युरोपातील व्यापारी

बातमीपत्रांतून नमूद केलेल्या घटनेच्या अनुरोधाने ज्याला ते पत्र लिहिले असेल त्याने पुढील धोरण कसे ठेवावे याबद्दल सूचना असत. या व्यवहारातूनच छापखाने निघाल्यावर वृत्तपत्रे सुरू झाली. इंग्लंडात पहिले वृत्तपत्र १५६६ या वर्षी निघाले.

येथे विलायतेहून छापखान्याचे यंत्र ईस्ट इंडिया कंपनीमार्फत मुंबईस आणणारा भीमजी पारख या नावाचा एक व्यापारी होता. प्रथम छापखान्याबरोबर जो इसम विलायतेहून आला त्याला अक्षरांचे ठसे (टाइप) पाडण्याचे ज्ञान नव्हते. म्हणून ठसे पाडण्याचे ज्ञान असलेला दुसरा इसम बोलावला. भीमजी पारखच्या छापखान्याचा एवढाच तपशील इतिहासात सापडतो. त्या छापखान्याचे पुढे काय झाले याची माहिती उपलब्ध नाही. पण आपल्या मालकीचा छापखाना मुंबईस आणविणारा म्हणून भीमजी पारख हा पुरुष धन्यवादास सदैव पात्र आहे.

पहिले गुजराती वृत्तपत्र 'मुंबई-समाचार' हे होय. ते मंचरजी मर्झबान या नावाच्या पारशी तरुणाने १ जुलै १८२२ रोजी सुरू केले. त्यापूर्वी इंग्रजानी जी वृत्तपत्रे आधी काढली, त्यांचा थोडा उल्लेख करून मग शुद्ध देशी—त्यातल्या त्यात मराठी—वृत्तपत्रे सादर करण्याचा विचार आहे. वृत्तपत्रापुढे लोकहिताचे काही निश्चित स्पष्ट ध्येय असावे लागते. वृत्तपत्रकाराजवळ पैशाचे पुरेसे बळ पाहिजे, मग ते स्वतःच्या कमाईचे असो किंवा विश्वासू इष्टमित्रांच्या आश्रयाचे असो. वृत्तपत्रकार जाज्वल्य पण डोळस चौकसवृत्तीचा असल्याशिवाय त्याला आपले पत्र लोकप्रिय करता येणार नाही. लोकप्रियता हेच वृत्तपत्राचे आयुष्य समजावे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी इंग्रजी राज्याचा कारभार हा प्रतिकूल टीकेचा एकच एक मुख्य विषय होता. आता स्वराज्यातही इंग्रजी राजवटीतील टीकेची दृष्टी तीच आहे. अठराव्या शतकाच्या इंग्रजांनी जन्मास घातलेली काही वृत्तपत्रे देशी भाषेतील पत्रांच्या प्रतिकूल टीकेचा कित्ता गिरवीत होती. युरोपात वृत्तपत्रे होती. प्रारंभी त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असले तरी अनियंत्रित स्वातंत्र्याचे दुष्परिणाम दिसू लागल्यावर राज्यकर्त्यांनी वृत्तपत्रावर नियंत्रणे घालायला सुरुवात केली व हळूहळू या स्वातंत्र्याच्या मर्यादा पक्क्या केल्या. इंग्रजांनी काढलेल्या वृत्तपत्रांना फारशी बंधने नव्हती, तरी एखाद्या वेळी बेसुमार स्पष्टोक्तीनिमित्त एखाद्या इंग्रज लेखकाला हद्दपारीची शिक्षा भोगावी लागल्याचे उदाहरण आहे. १८२२ साली एका राज्यविरोधी मुंबापुरस्थ इंग्रजाला—फेअर याला—हिंदुस्थान सोडून विलायतेस जावे लागले. हद्दपारी म्हटली ती हीच. याच वेळी अशाच गुन्ह्याखाली कलकत्त्याहून बकिंगहॅम या नावाच्या इंग्रजाला शिक्षा म्हणून हिंदुस्थान देशाला रामराम ठोकणे भाग पडले होते. मुंबईतील वृत्तपत्राचा काळ एकूण सुमारे दोनशे वर्षांचा धरल्यास मुंबईत गोऱ्या वृत्तपत्रलेखकाबाबत शिक्षेदाखल हद्दपारी असे, पूर्वोक्त ही दोनच उदाहरणे १९१९ पर्यंत सांगायला होती. तिसरे उदाहरण १९१९ या वर्षी एप्रिलात 'बॉम्बे क्रॉनिकल' या दैनिकाचे संपादक बेंजामिन गाय हॉर्निमन यांची पूर्वीच्या लेखकासारखीच इंग्लंडला रवानगी झाली. त्यांना विलायतेस योगक्षेम चालविण्यासाठी





१. गिरगाव बॅक रोड

२. भुलेश्वर

१

२



१. पायधुणी जंक्शन : १८७४

२. निशाणपाडा

मेमण वाडा



जे० जे० हॉस्पिटलच्या
आजूबाजूचा परिसर

नळबाजार : १८६५



लालबाग नाका



परळ पोयबावडी नाका

१. वरळी विभाग

२. हॉर्नबी व्हेलार्ड : १७८४





१



२



३

१. धोबी तलाव : १८३१

२. गवालिया टॅक

३. बाबुला तलाव : १८४९

तुळशी तलाव : १८७९

तानसा तलाव : १८८३



विहार तलाव : १८६०



१. माहीम बंदर. बाजूला इ० स० १५३४ मध्ये पोर्तुगीजांनी बांधलेले सेंट मायकेल चर्च

२. शिवडी बंदर

३. माझगाव बंदर : १७७२



२

१. अपोलो बंदर : १८१९

२. अपोलो बंदर

३. कुलाब्याची दांडी : १८७४







२

१. मॅलेट बंदर

२. प्रिन्सेस डॉक



बॉम्बे जिमखाना



हिंदू जिमखाना



पार्शी जिमखाना

२

२

१. कॅथलिक जिमखाना

२. विलिंग्डन क्लब



रेसकोर्स, महालक्ष्मी



इस्लाम जिमखाना

भायखळा क्लब

१. पूर्वीचे सिडनहॅम कॉलेज; आताचे सर जे० जे० उपयोजित कला महाविद्यालय

२. विल्सन कॉलेज : १८८९





१. युनिव्हर्सिटी लायब्ररी : १८७४

२. कॉन्व्होकेशन हॉल : १८७४

३. राजाबाई टॉवर : १८७४



अंजुमान इस्लाम
हायस्कूल : १८९०





सेंट झेवियर्स कॉलेज : १८७३

दरसाल हिंदुस्थानातून त्या इंग्रजाचे भक्त भरपूर द्रव्य गोळा करून पाठवीत असत. १९२६ मध्ये हॉर्निमन साहेबांची स्वारी परत आली, परंतु पूर्वीच्या लोकप्रियतेस तेव्हा ते मुकलेले होते. यामुळे पूर्वीसारखा त्यांचा बोलबाला पुन्हा कधीच ऐकू आला नाही. हॉर्निमन यांनी येथे आपल्या सत्तेचे 'इंडियन नॅशनल हेरल्ड' या नावाचे नवे दैनिक काढून पाहिले, पण ते यशस्वी झाले नाही.

मुंबईत पहिली वृत्तपत्रे इंग्रजांनी काढावी हे स्वाभाविक होते. वृत्तपत्रांचे व छापखान्याचे जनक तेच असल्यामुळे त्यांतल्या कोणी कोणी अठराव्या शतकाच्या अखेरीअखेरीस मुंबईत वृत्तपत्रांना जन्म दिला. 'उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः' याच न्यायाचा अंमल अनेकांच्या बाबतीत अनुभवास आला. तेव्हाच्या 'बॉम्बे कूरियर' या एका वृत्तपत्राचे नाव मात्र पुष्कळदा संदर्भादाखल घ्यावे लागते. 'बॉम्बे कूरियर'ने सरकारची तरफदारी करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे त्याला १७९२ पासून सर्व सरकारी जाहिराती मिळू लागल्या. १८३० मध्ये सरकारच आपले 'बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेट' प्रसिद्ध करू लागल्यामुळे 'बॉम्बे कूरियर'चा तो आधार गेला. १८१९ मध्ये कॅप्टन स्टॉकेलर या नावाचा एक लष्करी अधिकारी येथे आला. काही दिवस त्याने लष्करी नोकरी केली. नंतर नोकरी सोडून तो वृत्तपत्रांच्या उलाढालीत शिरला. 'अर्गस' या नावाचे एक वृत्तपत्र त्याने विकत घेतले. त्याचे 'बॉम्बे क्रॉनिकल' या नावाने प्रकाशन सुरू केले. (१९१३ मध्ये फेरोझशहा मेथा यांच्या पुढाकाराने काढण्यात आलेले इंग्रजी दैनिक 'बॉम्बे क्रॉनिकल' हे पहिलेच त्या नावाचे वृत्तपत्र नव्हे, याचा वाचकांना बोध होईल). १८२२ मध्ये स्टॉकेलर याने स्वदेशी प्रयाण केल्यामुळे त्याचे वृत्तपत्र बंद पडले. १८२७ मध्ये या स्वारीने या देशात पुनरागमन केले व 'आयरिस' नावाचे वृत्तपत्र काढले. त्याच्या सुदैवाने त्या सुमारास पारशी समाजात पंचांगासंबंधाचा वाद भडकून 'आयरिस'ला चांगले दिवस पाहायला सापडले. वाद हे लोकांचे कायमचे आकर्षण कधीच होऊ शकत नाही हा अनुभव आहे. यामुळे स्टॉकेलरने 'आयरिस' बुडवून 'कूरियर'चे संपादकत्व पत्करले व बॉम्बे गॅझेटवर हल्ले चढविले. त्याचे पर्यवसान स्टॉकेलर व बॉम्बे गॅझेटचा संपादक यांचे प्रत्यक्ष द्वंद्वयुद्ध हे होय. १८३० मध्ये हे मशारनिल्हे कॅप्टनसाहेब येथे एक वाचनालय स्थापून कलकत्त्याच्या 'हरकारू' नावाच्या वृत्तपत्राचे संपादकत्व पत्करून कलकत्त्यास गेले. मुंबई सोडण्यापूर्वी स्टॉकेलरच्या टीकेचा विषय लष्कराच्या पगारभत्त्याच्या सुधारणेचा होता. ही सुधारणा करण्याची गव्हर्नर माल्कम यांची योजना होती. प्रस्तुत योजनेविषयी टीका विधायक स्वरूपाची असल्याने तत्कालीन मुंबईच्या लष्कराच्या लोकांनी खूष होऊन स्टॉकेलर याला मैदानी खेळासंबंधाचे वृत्तपत्र काढण्याच्या कामी मदत केली.

१८३८ मध्ये 'बॉम्बे टाइम्स' निघाले. ते आजवर चांगले भरभराटीत चालू आहे. जन्मास आल्यापासून त्याचा सारखा थारेपालट चालू होता. १९०३ साली

तो थांबून आज बोरीबंदर स्टेशनसमोरच्या ज्या इमारतीत या वृत्तपत्राचा कारखाना आहे तेथे ते दैनिक वाढत्या संसारात स्थिरावले आहे. मात्र आज त्याला बॉम्बे टाइम्स असे नाव नाही. 'टाइम्स ऑफ इंडिया' या नावाने लोक त्याला ओळखतात. पहिले नाव १८६१ मध्ये बदलले. सुरुवातीस बॉम्बे टाइम्स हे दैनिक नव्हते. आठवड्यातून बुधवार, शनिवार याप्रमाणे दोन दिवशी ते प्रसिद्ध होत असे. १८५० मध्ये ते दैनिक झाले. त्याचे मालकंही वारंवार बदलत गेले. मालकांत प्रारंभी इंग्रज व्यापारी बहुसंख्य होते. सर जमशेटजी जीजीभाई हे एकच नाव त्यांत हिंदी होते. पुढे ते नाव गळले.

'बॉम्बे गॅझेट' हे वृत्तपत्र १७९० साली निघून या शतकाची काही वर्षे त्याने पाहिली व नंतर त्याचा आयुर्दाय संपला. याखेरीज दुसरी वृत्तपत्रे 'आला आला वापुडा व्यर्थ आला' या कोटीतली पुष्कळ होऊन गेली.

देशी-गुजराती भाषेतील पहिले वृत्तपत्र 'मुंबई समाचार' हे होय. वृत्तपत्र काढण्यापूर्वी त्या नावाचा छापखाना स्थापण्यात आला. त्याने प्रथम पंचांग छापले. अशा रीतीने काही किरकोळ कामे करताकरता १८२२ मध्ये जुलईत 'मुंबई समाचार' हे वृत्तपत्र काढण्यात आले. तेव्हापासून आजतागायत (१९७९) ते उत्कर्षपूर्वक चालू आहे. या वृत्तपत्राचा संस्थापक व संपादक फर्दुनजी मंचरजी मर्झबान (जन्म १७८७ मध्ये सुरतेस) या नावाचा बुद्धिमान व कल्पक पारशी तरुण होता. बालपणापासूनच फर्दुनजीला पुस्तकी विद्या व कारागिरी ही संपादन करण्याची तीव्र आकांक्षा असल्यामुळे काही गुरू तसेच नाना उद्योग करावे लागले. देशी (गुजराती) भाषेत वृत्तपत्र काढण्याची कल्पना बळावून १८२२ साली 'मुंबई समाचार' या वृत्तपत्राच्या रूपाने ती सफल झाली. फर्दुनजीला हे साफल्य मिळण्यापूर्वी पुष्कळ अडचणींशी टक्कर देण्याचे कष्ट सोसावे लागले. गुजराती टाइपांचा अभाव ही मुख्य अडचण होती. गुजराती टाइपांचा अभाव म्हणजे त्या टाइपांची 'मुंबई समाचार' हे वार्तापत्र निघण्यापूर्वी, गुजराती समाजाला ओळखही नव्हती असा अर्थ स्वीकारणे चुकीचे ठरेल. १७९० मध्ये सुरू झालेल्या 'बॉम्बे कूरियर' या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये कधी कधी गुजराती भाषेतल्या जाहिराती प्रसिद्ध होत असत. त्यासाठी त्या भाषेचे टाइप तयार करणारा एक इसम कूरियरच्या छापखान्यात नोकरीला होता व तो पारशीच होता. त्याचे नाव जीजीभाई छापगर. त्याच्या पित्याची सगळी हयात छापखान्यातच गेल्यामुळे त्याला लोक 'छापगर' म्हणू लागले. अर्थात त्या घराण्याचे ते आडनावच होऊन बसले. पूर्वोक्त छापगर जीजीभाई व फर्दुनजी यांचे नाते असल्यामुळे फर्दुनजी या छापगराला भेटायला त्याच्याकडे वारंवार जात असे. या गाठीभेटीत फर्दुनजी छापखाना आणि वृत्तपत्र यासंबंधी पुष्कळ ज्ञान संपादन करून ठेवीत असला पाहिजे असा तर्क करावा लागतो. याप्रमाणे पूर्वतयारी साधून त्याने १ जुलईपासून आपले वृत्तपत्र सुरू होणार असल्याची जाहिरात प्रसिद्ध केली. प्रथम ते साप्ताहिक होते,

म्हणून दर सोमवारी प्रसिद्ध होत असे. त्या वेळी सहा पाने छापली जात असत. १८३२ च्या जानेवारीत ते दैनिक झाले. एकाच वर्षात दैनिकाचा अवतार संपला व १८३३ मध्ये रविवार व बुधवार या दिवशी ते प्रसिद्ध होऊ लागले. दैनिक एकाच पानाचे होते. १८५५ मध्ये पुन्हा त्याला दैनिकाचे रूप आले. मानवी जीवनाच्या सर्व अंतर्बाह्य व्यवहारांविषयी निराग्रहवृत्तीने आपले विचार व्यक्त करणे असे या पत्राचे धोरण आहे, असे ठोकळ विधान करता येईल. १८३० मध्ये फर्दुनजीचा व 'मुंबई समाचार'चा संबंध सुटला व मुंबईचे वास्तव्यही संपले. १८४७ च्या मार्चमध्ये त्याचे निधन दमण या पोर्तुगीज सत्तेच्या शहरी घडले. मुंबई सुटल्यापासून त्याचे वास्तव्य दमणला होते. सुरुवातीच्या काळामध्ये दोन महाराष्ट्रीय संपादक मुंबई समाचारमध्ये होऊन गेले. विनायक वासुदेव व जनार्दन वासुदेव ही त्यांची नावे होती.

मराठी भाषेतले पहिले वृत्तपत्र 'दर्पण' होय ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. त्याचा प्रारंभ १८३२ मध्ये झाला. या पत्राला बाळ गंगाधरशास्त्री या प्रखर बुद्धिमत्तेच्या पुरुषाचे संपादकत्व लाभले होते. दादोबा पांडुरंगाच्या आत्मचरित्रात पुढील मजकूर आहे. "एक दोन पैकेवाले नेटिव गृहस्थ मिळून दर्पण या नावांचें मराठींत व इंग्रजींत वर्तमानपत्र काढण्याचें योजिलें आणि त्याचे बाळशास्त्री यांस एडिटर नेमिलें."

अमेरिकन मिशनरी मंडळीने १८४२ मध्ये 'ज्ञानोदय' नावाचे वृत्तपत्र चालू केले. सुरुवातीस ते अहमदनगरास निघत असे. नंतर त्याचे प्रकाशनस्थळ मुंबई हे झाले. 'ज्ञानोदय' मिशनरी मंडळींचे असे म्हणताच त्याचा उद्देश ख्रिस्ती धर्मप्रसाराचा हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. तथापि त्यात इतर उपयुक्त माहिती प्रसिद्ध होत असे. १८५५ च्या फेब्रुवारी १ आणि ऑगस्ट १ अशा दोन अंकांत ज्ञानोदयाने मुंबईतील मराठी वृत्तपत्रांची यादी छापली होती. ती ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे (१८४२–१९४१) या नावाचे १९४२ मध्ये जे पुस्तक (संपादक-रेव्ह० भा० पां० हिवाळे) प्रसिद्ध झाले त्यातून पुढे ग्रथित केली आहे. यादीत वृत्तपत्रांची जन्मवर्षे नाहीत, ही उणीव आहे. या यादीतील मुंबईखेरीज इतर ठिकाणी निघणारी वृत्तपत्रे येथे नमूद केलेली नाहीत.

ज्ञानसागर : हें पत्र एक तावी सांच्यांचे शिळाछापावर आठवड्यांत तीन वेळा निघते. याची किंमत आगाऊ दिल्यास वार्षिक रु० १० व महिन्यास रु० १. छापणारा रघुनाथ त्र्यंबक जोशी मु० मुंबई.

प्रभाकर : एक तावी सांचाचें शिळाछापावर आठवड्यास निघतें. याची वार्षिक किंमत रु० १२. छापणारा गोविंद पांडुरंग जोशी ठिकाण मुंबई.

वर्तमानदीपिका : राइल (रॉयल) फोलिओ म्हणजे मोठ्या तावाच्या सांचाचे. कधीमधी पुरवणीसहित शिळाछापावर आठवड्यास छापिले जाते. याची वार्षिक किंमत आगाऊ दिल्यास रु० ५, मागून दिल्यास रु० ६, महिन्यास ८ आणे. छापणारा कान्होबा गणपत, ठि० मुंबई.

धूमकेतू : मोठ्या तावी सांचाचे. शिळाछापावर आठवड्यास निघते. याची वार्षिक किंमत रु० ४. छापणारा गोविंद पांडुरंग जोशी, ठिकाण मुंबई.

ज्ञानोदय : सोळा पेजी अष्टपत्री सांचाचें. इंग्लिश व मराठी मिश्रित असे ठसे छापावर महिन्यात दोन वेळा निघते. मालक अमेरिकन मिशन मंडळी, छापणारा टामस ग्राम. ठिकाण मुंबई. यांची वार्षिक किंमत एतद्देशीय नेटीव लोकांस रु० १॥ व साहेब लोकांस ४ रुपये आहे. व या पत्राचे वार्षिक पुस्तक एकत्र चांगले बांधीव घेतल्यास किंमत २॥ रुपये आहे.

ज्ञानप्रसारक : हें पुस्तक अष्टपत्री सांचा ३२ पृष्ठांचे ठसे छापावर दर महिन्यास एल्फिनस्तन शाळेंतील ज्ञानप्रसारक मंडळीकडून छापिलें जातें. दर अंकास किंमत ४ आणे. ठिकाण मुंबई.

चंद्रिका : हे पुस्तक अष्टपत्री सांचा ३२ पृष्ठांचे शिळाछापावर दर महिन्याला निघतें. नियमित घेणाऱ्यास दर प्रतीची किंमत ४ आणे व फुटकळ घेणाऱ्यांस ६ आणे आहे. छापविणारी सन्मार्गदर्शक मंडळी, ठिकाण मुंबई.

ज्ञानदर्शन : हे पुस्तक अष्टपत्री सांचाचें. १०० पृष्ठांचे ठसे छापावर तीन महिन्यांनीं निघतें. याची वार्षिक किंमत आगाऊ दिल्यास रु. ४. छापणारा गणपत कृष्णाजी, ठिकाण मुंबई.

ज्ञानवर्धक. हे पत्र फुलिसकेप कागद अष्टपत्री सांचाचे सन १८५५ फेब्रुवारीच्या १ तारखेपासून आठवड्यास निघणार असे जाहीर झाले आहे. याची किंमत वार्षिक रुपये ६ ठरविली आहे.

या यादीवर 'मराठी वर्तमानपत्रे व नेमाने निघणारी पुस्तके सन १८५५ पावेतों आहेत.' असा मथळा असून १ ऑगस्ट १८५५च्या अंकातील यादीला 'नवीन मराठी वर्तमानपत्रे' असे शीर्षक आहे. ती यादी—

नित्यसारसंग्रहनामे एक मराठी पत्र दररोज निघत असतें. हे पाहून आम्हांस आनंद वाटतो. पूर्वी या पत्राचे नाव ज्ञानसागर होते. तेच नांव बदलून नित्यसारसंग्रह व ज्ञानसागर हें नांव दिलें.....या पत्राची किंमत आगाऊ दिल्यास दहा रुपये व वर्षाच्या अखेरीस दिल्यास बारा रुपये द्यावे लागतील.

हिंदुहितेच्छु. या नावाचे एक लहानसे पत्र दर आठवड्यास निघत असते.... या पत्राची किंमत आगाऊ तीन रुपये व मागाहून दिल्यास साडेतीन रुपये आहे.

शेवटी 'मुंबई परहेजगार' या नव्याने निघू लागलेल्या एका गुजराती साप्ताहिकाचे नाव आहे. या पत्राबद्दल ज्ञानोदयकाराचे मत : या पत्राचे लिहिणें व लिपी फार चांगली आहे. या पत्राचा मुख्य उद्देश हा आहे कीं या देशांतील लोकांनीं कोणताहि मादक पदार्थ सेवन करूं नये...या पत्राची किंमत आगाऊ पावणेतीन रुपये व अखेरीस तीन रुपये.

प्रस्तुत यादीतील बहुतेक सारी वृत्तपत्रे—एक 'प्रभाकर' वगळता आजच्या पिढीला

पूर्णपणे अज्ञातच आहेत. वरीलपैकी 'प्रभाकरा'खेरीज 'धूमकेतू', 'ज्ञानदर्शन' शंभर पानी त्रैमासिक ही कालिके भाऊ महाजन यांनीच काढली व चालविली. 'ज्ञानदर्शन' यात शास्त्रविषयांची माहिती असे. महाजन व जांभेकर यांच्या जोडसंपादकत्वाने 'दिग्दर्शन' हे मासिक निघत असे. यात शास्त्रे, कला वगैरेंचे विवरण असे. भाऊ हे सडेतोड स्वाभिमानी स्वभावाचे होते. ते १८९० मध्ये नागपूर येथे मरण पावले. त्यांचा जन्म पेण येथे १८१५ साली झाला. मूळ आडनाव कुंटे. पत्रांची माहिती देताना तेव्हांच्या ज्ञानोदयकाराने वर्गणी ऐवजी किंमत हा शब्द वापरलेला आहे हे वाचकांच्या ध्यानांत येईलच. नव्या उद्योगाची भाषा एकदम सिद्ध होत नाही. ती हळूहळू तयार होत जाते याचे हे एक उदाहरण आहे. क्रिस्ती धर्माचा विरोध हे वरच्या यादीतील काही वृत्तपत्रांचे ध्येय होते, असेही दिसून येईल. प्रभाकरात प्रचलित विषयावरील लेख प्रसिद्ध होत असत. धूमकेतूमध्ये नावाप्रमाणेच पुष्कळदा उच्छृंखलाचा उपद्रव आढळून येई. प्रभाकरात लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) यांचे लेख प्रसिद्ध होत असत आणि सांप्रत त्यांच्या विचारांना मोल चढले असल्याने त्या पत्राचे स्मरण उजळले आहे.

'इंदुप्रकाश' हे नवे वृत्तपत्र १८६२ मध्ये निघाले. हे विष्णुशास्त्री पंडित या पुरुषाने काढले. त्याच्या ठिकाणी सामाजिक सुधारणेची—विशेषतः विधवा-विवाहाची—तळमळ अधिक होती. वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन असल्याच्या गाढ जाणिवेने पंडितांनी आपले कार्य आरंभिले आणि १८६४ पासून १८७० पर्यंतच्या काळात सारा महाराष्ट्र खळबळून सोडला. विधवा-विवाह शास्त्रोक्त की अशास्त्रोक्त याचा निर्णय लावण्याकरिता पुण्यास १८७० साली जी सभा भरली होती ती अर्वाचीन महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक घटना म्हणावी लागते. तेव्हा 'इंदुप्रकाश' साप्ताहिकाने मोठी कामगिरी बजावली. गेल्या शतकातील महाराष्ट्रातील वृत्तपत्रे बहुधा इंग्रजी-मराठी अशी मिश्र मजकुराची द्विभाषिक असत. वृत्तपत्राचे नावदेखील दोन भाषांत प्रसिद्ध करण्याचा प्रघात होता. आपले विचार राज्यकर्त्यांना समजावे हा इंग्रजी मजकुराचे लोढणे मराठीबरोबर बाळगण्याचा मराठी वृत्तपत्रकारांचा उद्देश उघड होता. १८८१ साली महाराष्ट्राला प्रखर स्वाभिमानाचे बाळकडू पाजण्याचे कंकण बांधून काढण्यात आलेल्या 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांनी आंग्ल-मराठी हा जरासंधी प्रकार मोडला. केसरी हे मराठी व मराठा हे इंग्रजी अशी दोन भाषांतील स्वतंत्र वृत्तपत्रे १८८१ पासून पुण्यास निघू लागली. कालांतराने इंदुप्रकाशातही इंग्रजीचा लोप झाला. या पत्राचे संस्थापक विष्णुशास्त्री पंडित १८७६ साली दिवंगत झाले व त्याला खऱ्या आस्थेचा मालक न राहिल्यामुळे मुंबईचे ग्रंथसंपादक आणि ग्रंथप्रकाशक मंडळीचे मालक दामोदर सावळाराम यंदे यांनी इंदुप्रकाशचा कारभार १९२४ पर्यंत चालविला. त्या वर्षी त्याचा अस्त झाला. या पत्राला प्रारंभी महादेव गोविंद रानडे, काशीनाथ त्रिंबक तेलंग, नारायण गणेश

चंदावरकर यांसारखे विद्वान वजनदार लेखक मिळाल्यामुळे याच्या वाट्यास कित्येक वर्षे चांगला लौकिक होता. छापखाना या नात्यानेही इंदुप्रकाशला चांगला मान होता. विष्णुशास्त्री पंडित आणि शंकर पांडुरंग पंडित या पंडितद्वयाने संशोधनपूर्वक तयार केलेला श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगांचा गाथा इंदुप्रकाश छापखान्यात छापला गेला व तो आजपर्यंत सर्वमान्य आहे. 'सरकारी' या संज्ञेने तो ओळखला जातो.

इंदुप्रकाशनंतर दोन वर्षांनी रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे 'नेटिव ओपिनियन' (हिंदी लोकमत) हे साप्ताहिक निघू लागले. याची सुरुवातीला एकच इंग्रजी भाषा होती. तिसऱ्या वर्षापासून त्याला मराठी भाषेची जोड देण्यात आली. निवळ मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांना या पत्राचा उपयोग होत नाही ही वारंवार ऐकू येणारी वाजवी तक्रार मिटविण्याकरिता मराठी-इंग्रजी असा द्विभाषिक व्यवहार नेटिव ओपिनियनला स्वीकारणे भाग पडले. प्रथम १५ रुपये वर्गणी होती, ती खप वाढावा या हेतूने १८७२ पासून १२ रुपये केली. १८७१ साली रावसाहेब मंडलिक संपादकीय कामातून निवृत्त झाले.

इंदुप्रकाश व नेटिव ओपिनियन यांच्या मागून (१८७३) नाव घेण्यासारखे वृत्तपत्र जगापुढे आले ते प्रार्थना समाजाचे 'सुबोधपत्रिका' हे असून त्याने धर्मसंबंधी आणि सामाजिक विचारजागृतीस पुष्कळच हातभार लावला आहे. यामध्ये सर डॉ० रा० गो० भांडारकर, मामा परमानंद यांच्यासारख्या तीव्र आस्थेच्या विचारवंत व विद्वान व्यक्ती लिहीत असल्यामुळे या साप्ताहिकाला चांगले वजन होते. पुण्यास 'केसरी'चा जन्म झाला तेव्हा त्याच्या प्रवर्तकांनी या पत्राचा आकार 'सुबोध-पत्रिके'चा असेल असे जाहिरातीत लिहिले होते. सुबोधपत्रिकेचा एक विशेष गुण म्हणजे प्रार्थनासमाजाचे कार्य जनतेला समजावून देणे हे होते. पण त्यासाठी त्या पत्रात कधीही, कोणा व्यक्तीचे अवास्तव माहात्म्य गाईले गेले नाही. याचे एक ठळक उदाहरण रानड्यांवरील टीकेचे आहे. पंचहौदमिशनमधील चहाप्रकरणाचे प्रसंगी १८९२ साली रानडे यांनी प्रायश्चित्त घेतले. याकरिता सुबोधपत्रिकेने त्यांच्यावर कडक टीकालेख प्रसिद्ध केला होता. तेलंग हे पत्रिकेच्या आदराचे गृहस्थ असूनही त्यांनी आपल्या मुलीचे लग्न 'अष्टवर्षा भवेत्कन्या' या शास्त्रवचनाला धरून केले, हे समाजसुधारणेच्या पुरस्कर्त्याला शोभणारे नाही, अशा धोरणाने सुबोधपत्रिकेने तेलंगांचीदेखील खडसावून हजेरी घेतली होती. सुबोधपत्रिकेतही तेव्हाच्या परंपरे-प्रमाणे इंग्रजी मजकूर येत असे. यानंतर जी वाचनीय लोकप्रिय वृत्तपत्रे पुण्यास निघाली, (केसरी, सुधारक, काळ, करमणूक वगैरे) त्यांमुळे वृत्तपत्रांची आवड लोकांत इतकी फैलावली की, मुंबई इलाख्यातील सर्व जिल्ह्यांच्या शहरी, तसेच कित्येक तालुक्याच्या गावीसुद्धा नवराबायकोच्या काडीमोडीच्या जाहिरातीच्या उत्पन्नावर जगणारी लहान लहान वृत्तपत्रे उगवली.

१८५७ ची शिपाईगर्दी जमीनदोस्त करण्याच्या पराक्रमाने इंग्रज राज्यकर्त्यांमध्ये

साम्राज्यशाहीचे वारे शिरावे आणि हिंदी समाजाशी त्यांनी वेमुर्वतीने वागू लागावे हे स्वाभाविक होते. कायद्याने चालावे या इंग्रजांच्या स्वभावधर्मास जागून इंग्रज जुलुमासाठी देखील कायदे करीत असत. हिंदुस्थानात वृत्तपत्रे जन्मास येऊ लागली तेव्हा त्यांच्या नियंत्रणाचा कायदा नव्हता. कायद्याच्या पुस्तकाचा मसुदा सरकार-दप्तरी लिहून पडलेला होता. तो १८६२ साली पसार होऊन अमलात आला. 'इंडियन पीनल कोड' हे फौजदारी कायद्याच्या पुस्तकाचे नाव असून आज त्याच कायद्याचा अंमल चालू आहे.

१८५७ नंतर त्या शतकात दुष्काळ, रोग, लढाई इत्यादी नैसर्गिक वा कृत्रिम आपत्तींनी हिंदी जनतेला भंडावून सोडले असता राज्यकर्त्यांनी लक्षावधी रुपयांची उधळपट्टी साम्राज्यशाहीचे चोचले पुरवून घेण्यासाठी चालविली होती. राज्यकर्त्यां-विषयीचे प्रेम मागील शतकाच्या उत्तरार्धात हळूहळू ऱ्हास पावत होते. पुण्यात १८९७ मध्ये प्लेगच्या बंदोबस्तानिमित्त नेमलेल्या एका इंग्रजाचा मारेकऱ्याच्या शस्त्राने बळी घेतला हे राज्यकर्त्याविषयीच्या अप्रेमाचे लक्षण होते. विसाव्या शतकात हे लक्षण अधिक विस्तृत व खोल झाले. परिणामी प्रजेतील या भावनेची प्रतिक्रिया राज्यकर्त्यांच्या वाढत्या दडपशाहीने हिंदी जनतेला भोगण्याची पाळी आली. हिंदी स्वातंत्र्यासाठी १८८५ पासून झटत असलेल्या काँग्रेसमध्ये फूट पडली. १९०७ साली सुरतेच्या अधिवेशनप्रसंगी ही फूट विकोपास जाऊन काँग्रेसची बैठक स्थगित झाली. नेमस्त (मवाळ), राष्ट्रीय (जहाल) असे दोन पक्ष उदयास येऊन या दोन्ही पक्षांची वृत्तपत्रे निघू लागली. पण जहाल पक्षाचे वजनदार दैनिक 'राष्ट्रमत' हे १९०८ साली निवाले. ते १९१० च्या फेब्रुवारीपर्यंत चालले होते. त्या महिन्यात 'प्रेस ॲक्ट' (छापखान्यांच्या नियंत्रणाचा कायदा) राज्यकर्त्यांनी अमलात आणला असल्याने राष्ट्रमत हे दैनिक चालू ठेवणे त्याला जन्म देणाऱ्या मंडळीला अशक्य वाटले. यानंतर १९१५ पर्यंत नाव घ्यावे असे नवे मराठी वृत्तपत्र मुंबईस निघत नव्हते. नागपूरचे अच्युत बळवंत कोल्हटकर हे मुंबईस येऊन राहिल्यावर त्यानी 'संदेश' या नावाचे दैनिक सुरू केले. ते लवकरच बंद पडले. तेव्हा 'संजय' हे वृत्तपत्र कोल्हटकरांनी चालू केले. कोल्हटकर हे वृत्तपत्राला सर्व प्रकारे योग्य होते, याची प्रचीती त्यांनी 'संदेश'च्या हयातीत पटवून दिली. नंतर त्यांची प्रतिष्ठा गेली ती कधी सावरलीच नाही. सर फेरोजशहा मेथा यांच्या पुढाकाराने १९१३ साली 'क्रॉनिकल' या नावाचे इंग्रजी दैनिक मुंबईत निघू लागले होते. यावर संपादक या नात्याने हार्निमन यांची नेमणूक झाली होती. १९१९ मध्ये पंजाबातील लष्करी कायद्याच्या दिवसांत हार्निमन यांस हद्दपारीची म्हणजे विलायतेस पाठविण्याची शिक्षा झाली. याचा निर्देश मागे केला आहे.

१९२० मध्ये ऑगस्टच्या पहिल्या तारखेला रात्री लो० बाळ गंगाधर टिळक हे मुंबईत दिवंगत झाले व १९१५ पासून दक्षिण आफ्रिकेतून स्वदेशी परतून येथे चळवळ

करीत असलेले म० गांधी १९२० मध्ये हिंदी राजकारणाच्या अद्वितीय नेतेपदी चढले. १९२२ मध्ये म० गांधींना तुरुंगात टाकले. टिळक वारल्यावर लोकमान्यांचे अनुयायी पक्षांतर करतील या भीतीने टिळक पक्षाच्या एका गटाने टिळकांच्या पश्चात एक वर्षाने 'लोकमान्य' नावाचे दैनिक काढले, व कृ० प्र० खाडिलकर यांस संपादक नेमले. गांधीजी १९२२ साली कैदेत पडल्यावर पुनः कॉंग्रेसमधील फुटीने डोके वर काढले. तेव्हा 'लोकमान्य' काढणाऱ्यांच्या नियंत्रणाखाली लोकमान्याचे संपादकत्व नको, यासाठी खाडिलकरांनी स्वतःच्या मालकीचे 'नवाकाळ' हे नवे दैनिक १९२३ मार्चमध्ये काढले, नंतर थोड्याच अवकाशात लोकमान्य दैनिकाने राम म्हटले. नवाकाळ अजून चालू आहे. 'नवाकाळ'चे एक कौतुक आहे. नाट्याचार्य खाडिलकरांनी १९२३ मध्ये ह्या दैनिकाला जन्म दिला. ते १९२९ मध्ये तुरुंगात जातेवेळी त्यांचे चिरंजीव यशवंत कृष्ण खाडिलकर हे नवाकाळचे संपादक झाले. हल्ली त्यांचे नातू नवाकाळची धुरा कर्तेपणाने वाहत आहेत. एका कुटुंबाच्या तीन पिढ्या एकाच व्यवसायांत दिसाव्या हेच वर म्हटले ते कौतुक होय.

स्वराज्यपूर्व काळात वृत्तपत्रे स्वार्थत्यागाच्या ध्येयवादाने काढली व चालविली जात असत. स्वराज्य मिळण्याचा काळ नजीक आल्याचे दिसू लागताच या व्यवसायाला भांडवलशाही वळण लागले व देशातली बहुतेक वृत्तपत्रे भांडवलवलिष्ठ सेठसावकार काढीत असतात. तथापि स्वराज्यपूर्व काळातील काही वृत्तपत्रे उल्लेखनीय आहेत. नवशक्ती, लोकसत्ता वगैरे दैनिकांना इंग्रजी भाषेची भावंडे आहेत. इंग्रजी 'टाइम्स ऑफ इंडिया' दैनिकाला हिंदी व मराठी अशी दोन सहोदर भावंडे आहेत. 'फ्री प्रेस जर्नल' हा मुळात फ्री प्रेस ही बातम्या पुरवणारी संस्था होती. त्या स्वरूपातली संस्था यशस्वी होण्याची आशा नाही म्हणून तिचे दैनिकात रूपांतर कै० सदानंद यानी घडविले. सदानंद यांनीच नवशक्ती हे मराठी दैनिक अस्तित्वात आणलेले आहे. म० गांधींची विचारसरणी व साम्यवाद याचे मिश्रण बुद्धीत असणारा संपादक पाहिजे या आग्रहामुळे सदानंद यांनी मुंबई इलाख्याचे पहिले पंतप्रधान बाळ गंगाधर खेर यांच्या संमतीने कै० शंकरराव जावडेकर यांची नवशक्तीचे संपादक या नात्याने नेमणूक केली.

प्रकरण पंधरावे

खानावळी, हॉटेले

गेल्या शतकाच्या मध्यात मुंबईत हॉटेले निघून, येथील वस्तीकरांची आणि एक सोय झाली. पैसे घेऊन माणसांना सकाळ संध्याकाळ पोटभर जेवायला घालणाऱ्याला खानावळवाला म्हणतात. मुंबईत जितक्या जाती तितक्या खाणावळी अशी कल्पना केल्यास ती बहुधा चूक होणार नाही. सुरतेस इंग्रजांचे मुख्य ठाणे असताना त्यांच्या वस्तीची, पोटापाण्याची वगैरे व्यवस्था ईस्ट इंडिया कंपनी मार्फत होत असे. अर्थात तेथे इंग्रजाला स्वतःसाठी काही करावे लागत नसे. सूर्योदयी नोकरीचे काम जे सुरू व्हावयाचे ते मध्यान्हीला बंद व्हावयाचे, त्यानंतर सर्व कामदारांचे एका वेळी जेवण. अन्न शिजविणारी निराळी माणसे असत. मुंबईस कंपनीचे राज्य सुरू झाल्यावर गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास एका पारशी गृहस्थाने हाटेल काढले. ते यशस्वी झाल्याचे पाहून, दुसरे हाटेल निघाले. तिचा जनक पारशीच होता. मुंबईत खानावळीचा धंदा जरी पारश्यानी काढला त्या सर्वावर जमशेटजी टाटांच्या 'ताजमहाल' हॉटेलने ताण केली आहे. टाटा हे सुद्धा पारशीच. याच्या पूर्वी मागील शतकात वाटसन या इंग्रजाने एक नाव घेण्यासारखे कोटात मोठे हॉटेल काढले होते.

वाटसन हा एक हरहुन्नरी गृहस्थ होता. १८५० नंतर मुंबईमध्ये पोट भरण्यासाठी नाटकासारखे खेळ करणारे समुदाय एकामागून एक येऊ लागले आणि हॉटेलांची गरज साहजिकच वाढली. वाटसन या व्यवहारचतुर इसमाने या दिवसापर्यंत आपल्या बहुरंगी दुकानदारीने बराच पैसा गाठीस मारला होता; त्याच्या जोरावर त्याने कोटात चांगली जागा पाहून तेथे हॉटेल उभे केले. मागे शेअरमेनिया या नावाच्या एका संकटाचे वर्णन केले आहे. त्याचे डोहाळे मुंबईच्या नागरिकात सुरू झाल्याचा तो काळ होता. यामुळे परदेशी गुणी माणसे पोट भरण्याच्या उमेदीने येथे येत असत. अशा लोकाना येथे राहण्या जेवणाची सोय पाहिजे हे ओळखून वाटसनने हॉटेल उभे केले. परदेशी म्हणजे सामान्यपणे युरोपियन लोक समजले जातात. ते राजी राहातील अशी व्यवस्था वाटसनने आपल्या नव्या हॉटेलात ठेवली असल्यामुळे त्याचा बोलबाला सुरवातीस होऊ लागला. वाटसन कामापुरती सुतारकाम,

लोहारकाम वगैरे कामे स्वतःच करीत असे. हॉटेलचे बांधकाम धंदेवाईक इंजिनिअराप्रमाणे स्वतः त्यानेच यशस्वीरित्या शेवटास नेले. वाटसनने हॉटेल बांधण्याला पैसा कुठून आणला याचे उत्तर त्याच्या हरहुन्नरीपणात सापडते. त्याने हॉटेलसाठी खरेदी केलेली जमीन, पाडलेल्या कोटाची भिंत आणि तिच्या सभोवतीचा बुजविलेला खंदक यातून निघालेल्या जमिनीपैकी होती. शंभर रुपये प्रत्येक चौरस वाराला याप्रमाणे वाटसनने जमीन खरेदीकरिता द्रव्य वेचले. त्याने हॉटेल बांधण्याचा निश्चय केला ते दिवस शेअरमेनियाचे होते. तेव्हा मुंबई पैशाच्या धुराने व्यापलेली होती. हा धूर संपल्यावर हॉटेलची इमारत पुरी उभी राहिली. १८६९–७० मध्ये व्हिक्टोरिया राणीचा दुसरा मुलगा डयूक ऑफ एडिंबरो हा हिंदुस्थानाच्या सहलीस आला होता. मुंबईतील कार्यक्रमांत त्याच्या मनोरंजनासाठी बॅकबेवर आतषबाजीचा कार्यक्रम ठेवला होता. तो पहाण्याला या नव्या हॉटेलाच्या गच्चीवर माणशी वीस रुपये ठेवले होते. हॉटेलाच्या रीतसर उत्पन्नाच्या गल्ल्यांत अशी प्रासंगिक भर पडत असे ती वेगळीच. वाटसन हा स्वतः युरोपियन असल्याने त्या लोकांच्या गरजांची त्याला जन्मापासून उत्तम माहिती होती. यामुळे युरोपातील उतारूंना त्याचे हॉटेल अधिक पसंत असल्याचे नवल वाटायला नको.

गेल्या शतकाचा उत्तरार्ध उलटताना वाटसनचे हॉटेल उदयास आले, पण त्यापूर्वी या शहरी येणाऱ्या प्रवाश्यांना उतरण्याची सोय मुळीच नव्हती, असे समजू नये. मुंबईमध्ये सर्व प्रकारच्या मानवी व्यवहारात आघाडीवर असलेला नागरिक समाज जो पारशी त्यातल्या दोघा तिघानी हॉटेल ही संस्था काढली आणि वाहेरगावाहून थकून भागून येणाऱ्या मुसाफिरांना अडचणीखेरीज येथे आपले कामाचे दिवस निर्वेध काढता येतील अशी सोय लावली. ही हॉटेले निघण्यापूर्वी केवळ कनिष्ठ स्थितीतील लोकांचे पाय जिकडे वळावे अशी खाणेपिणे पुरविणारी बरीच ठिकाणे या शहरी होती, यावरून त्यांचा दर्जा काय असेल हे वाचक अंदाजू शकतील. दीनशा वाच्छा यांनी आपल्या १८६०-१८७५ या वर्षातील आठवणींच्या पुस्तकात या पहिल्या खानावळींना 'ग्रॉग'ची दुकाने या शब्दानी संभावना केली आहे. 'ग्रॉग' म्हणजे एक प्रकारची हलकी दारू. या दुकानांचे गिऱ्हाईकही शिपाई, प्यादे, सोजर, गोरे खलाशी, मजूर वगैरेपैकी लोक होते.

वाच्छांच्या आठवणीत १८४५ पर्यंत हॉटेल ही अभिधा बहुतांशी सार्थ ठरेल अशी संस्था मुंबईत निघालेली नव्हती. त्या वर्षी 'होपहॉल' (आशा स्थान) हे हॉटेल स्थापन झाले. भायखळा व माझगाव येथील वस्ती उपनगरे समजली जाण्यासारखी विरळ होती. होपहॉल यशस्वीरीतीने चाललेले पाहून १८५९ यावर्षी 'अडेल्फी' या नावाचे हॉटेल निघाले. ही दोन्ही सार्वजनिक भोजनालये माझगावलाच असून दोघानाही लोकाश्रय चांगला होता. होपहॉल सरदारी थाटाने चालविले जात होते. कालांतराने तेथे नवी इमारत बांधून ती पुरुष-बायको-मुले वगैरे कुटुंबभोजनाकडे लावली.

ही व्यवस्था सर्वसामान्य भोजनविभागापेक्षा अधिक लोकप्रिय ठरली. 'अडेल्फी'चा संस्थापक हा पालनजी या नावाचा पारशी होता. आधी एक भरभराटणारे हॉटेल असताना त्याच वस्तीत दुसरे हॉटेल काढून ते उत्कर्षास आणावयाचे या आकांक्षेमुळे पालनजीला आपल्या अंगचे व्यापारोपयोगी सारे गुण पणास लावावे लागले. थोड्याच अवधीत पालनजीचे नाव घरोघर निघू लागले. आणि वाढत्या गिऱ्हाईकांची सोय लावण्यासाठी पालनजीने आपले हॉटेल क्लेर रस्त्यावर नव्या मोठ्या विस्तृत जागी नेले. गिऱ्हाइकात कोणी उधारीचे निघाले तर त्याला संभाळून वागवायचे. या पालनजीच्या गुणाची वाच्छानी विशेष प्रशंसा केली आहे. उधारीचे सारेच गिऱ्हाईक पैसे बुडविणारे नसते. उधारी ठेवणाराचा एकंदर व्यवहार पारखून उधारीकडे सदयतेने पाहावयाचे या धोरणामुळे पालनजीला उधारीचे नुकसान धंद्याला खीळ पडेल असे कधीच आले नाही. उधारीचे उपकार प्रसंगविशेषी फेडू शकणारे एखादे गिऱ्हाईक निघते, याचीही जाणीव पालनजीला होती. अशा अनेक गुणांमुळे 'अडेल्फी' हा शब्द जिकडेतिकडे निघू लागला. अडेल्फीने पालनजीला पैसा पुष्कळ दिला व पालनजीने घर, वाड्या वगैरे स्थावरे खरीदण्यात तो खर्च केला. दिवाणीतले कारकून आणि लष्करातले सार्जंट-लेफ्टनंट यासारखी खालच्या श्रेणीतली माणसे खिशात सदैव भरपूर नाणी खुळखुळविणारी नसतात. याची त्याला योग्य जाण होती.

अडेल्फीच्या मागून वाटसनचे हॉटेल निघाले. त्याची थोडीशी माहिती मागे दिली आहेच. त्या शतकात परदेशी उतारूंना सर्व प्रकारच्या सुखसोयी साधारणपणे माफक दराने पुरविणारे जमशेटजी टाटा या अद्वितीय पारशी धनाढ्य उद्योगपतीने 'ताजमहाल' या सार्थ नावाचे प्रचंड बादशाही हॉटेल अपोलो बंदरावर अगदी समुद्रकाठी उभे केले आणि परदेशी उतारूंना समाधानाने राहाता येईल असे हॉटेल नाही ही मुंबईबद्दलची तक्रार नाहीशी केली. आता त्याला अनेक मजली दुसरी इमारत जोडली आहे. सांप्रत मुंबईत हॉटेलांची व्यापारी (अन्नछत्रांची) कमतरता नाही तथापि हिंमती महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी प्राप्त काळाला शोभणारी अशी चालविलेली दोन सार्वजनिक भोजनागारे येथे नोंदणे अवश्य आहे. वाचकांना 'सरदारगृह' आणि 'माधवाश्रम' ही त्यांची नावे सुचलो असतीलच. त्यांतल्या पहिल्याची पंचाहत्तरी नुकतीच साजरी झाली. या कालावधीला हल्ली 'अमृत' हा शब्द लावतात. व त्यासाठी केल्या जाणाऱ्या समारंभाला 'अमृत महोत्सव' हा शब्द निर्माण झालेला आहे. इंग्रजी व्यवहारात पंचवीस, पन्नास, साठ, शंभर असे कालविभाग रूढ आहेत. व सिल्व्हर = रूपे, रौप्य; गोल्ड = सुवर्ण; डायमंड = हिरा, हीरक; सेंटिनरी = शंभर, शताब्दी असे त्यांचे पर्याय आहेत. पंचाहत्तरला त्यात जागा नाही.

सरदारगृह ही संस्था मुंबईत १८९८ साली आली. त्यापूर्वी तिचे अस्तित्व पुणे शहरी होते. हल्ली जेथे किर्लोस्कर थिएटर आहे, त्यानजीक प्रथम तिचा आरंभ झाला, तेथून सरदारगृह ढमढेऱ्याच्या बोळात गेले व तिथून त्याचे प्रयाण मुंबईला

झाले. मुंबईस सुरवातीला त्याचे काम गिरगावात टोपीवाला चाळीजवळ सुरू झाले. तेथील जागा अपुरी पडू लागली म्हणून सरदारगृह बोरीबंदर स्टेशनाजवळ असलेल्या सीताराम बिल्डिंगमध्ये नेले. (१९०२) ही जागाही पुरेनाशी झाल्याने क्रॉफर्ड मार्केट-जवळच असलेली वखळवजा मोकळी जागा विकत घेऊन तेथे स्वतःच्या मालकीच्या इमारतीत आजवर ते उत्कर्षाने चालले आहे.

सरदारगृहाचे जनक विश्वनाथ केशव साळवेकर हे बाईचे ब्राह्मण होते, परंतु लोकांच्या तोंडी तात्यासाहेब साळवेकर हे नाव बसलेले होते. त्यांच्या पराकाष्ठेच्या सौजन्याची छाप तेथे जाणाऱ्या उतारूवर सकृद्दर्शनीच कायमची बसायची. तेथे कुणीही जावे वा कितीही जावोत, सरदारगृहात त्यांचे आकर्षक स्वागत बिनचूक व्हायचेच. उतारूला कसलीही उणीव भासावयाची नाही. तेथे जाणारा एखादा कोणी आजारी पडलाच तर घरच्या नातेवाईकांच्या ममत्वाने सेवा-शुश्रूषा झाल्याशिवाय रहावयाची नाही. अशा प्रसंगी सरदारगृहाचे मालक आपल्यास पडणाऱ्या खर्चाकडे मुळीच लक्ष द्यावयाचे नाहीत, असा अनुभव दोन प्रसंगात आलेला आहे. एक महाडचे प्रसिद्ध ज्योतिषी नवाथे यांचे आजारपण व मृत्यू .या वेळचा व १९२० सालच्या लोकमान्यांच्या निधनाचा. हा प्रसंग कसोटीचा होता. टिळकांचे हे निर्वाणीचे दुखणे असल्याची जाणीव जसजसी बळावत गेली तसतसी त्यांच्या समाचारास येणाऱ्या लोकांची गर्दी वाढत गेली. टिळकांचे दर्शन घेऊन तत्काळ परत जाणारांप्रमाणे सरदार-गृहात मुक्काम ठोकणारेही बरेच लोक होते. त्यांची कंटाळा न करता त्या गृहाच्या व्यवस्थापकांनी तत्परतेने यथोचित सोय लावली. शेवटी ३१ जुलैच्या मध्यरात्री १२-४० वा. लोकमान्यांचे देहावसान घडले. सावळेकरांनी, टिळकांचे जेथे वास्तव्य असे, तेथेच त्यांचे निधन झाल्यामुळे त्या जागी टिळकांचे स्मारक केले आहे. हे एक प्रस्तुत भोजन-निवास स्थळाचे कौतुक आहे.

संस्थापक साळवेकर १९२७ साली संन्यास घेऊन ब्रह्मीभूत झाले त्यांच्या मागून १९४८ पर्यंत त्यांच्या चिरंजीवानी सरदारगृहाचा कारभार आपल्या वडिलांच्याच सौजन्याने चालविला. १९४७ पासून सरदारगृहाच्या मालकीला प्रायव्हेट कंपनी लिमिटेडचे रूप देण्यात आले. सांप्रत या भोजन–निवासगृहाची सूत्रे श्री. ग. प. उपाध्ये नामक गृहस्थांच्या हाती असून त्यांनी कालोचित अनेक सुधारणा केल्या आहेत. लोकांची मंगलकार्येदेखील सरदारगृहात साजरी होतात.

मुंबईतील खणावळी व हॉटेले यांचे समालोचन करताना गिरगावातील 'माधवा-श्रम' या संस्थेला विसरून चालणार नाही. ही संस्था काढणारे कै. श्री. परशुराम पांडुरंग महाजन हे कोकणातील आपला आरे-गुहागर हा गाव सोडून अल्पवयात मुंबईस आले. मुंबईस त्यांचे मामा कै. श्री. धोंडो विष्णू सावले हे राहात होते. प्रथम मामा-भाच्यानी बरेच उद्योग केले, पण शेवटी भाच्याने मोहन बिल्डिंगमध्ये लहान प्रमाणावर खाणावळीचा धंदा सुरू केला. त्यात लवकरच सावलेमामादेखील

हातभार देण्यास मिळाले. ही खाणावळ लोकप्रिय झाल्यासुळे १९०८ मध्ये तिचे 'माधवाश्रम' या नावाने रूपांतर तेथेच झाले. हल्लीच्या जागी ते १९१८ मध्ये आले. माधवाश्रमाचे संस्थापक व चालक कै. श्री. परशुराम पांडुरंग महाजन यांचे माधवाश्रमाच्या कार्यातले अवश्य उल्लेखनीय सहकारी त्यांचे मामा, त्यांचे बंधू यशवंत पांडुरंग ऊर्फ बाबूराव आणि मामांचे मेहुणे श्री सदाशिव गणेश शेवडे हे होत. मामा वारल्यावर हे बंधू शिक्षण सोडून माधवाश्रमाच्या कामात मदत करू लागले.

कोणताही धंदा यशस्वी होण्याला नेकी, चिकाटी, सचोटी, सौजन्य, गोड वाणी व अखंड नम्रता तशीच उपकारतत्परता इत्यादि गुण अपरिहार्यतेने असावयास पाहिजेत. सरदारगृहाचे साळवेकर आणि माधवाश्रमाचे महाजन या दोघांच्या कार्यक्षमतेमध्ये वरील गुण भरपूर होते. या दोघांचा उद्योग चालू असतानाच मुंबईत श्री. बा. वि. ऊर्फ काकासाहेब तांबे उदयास आले. प्रथम यांनी ताक विकण्याचा धंदा आरंभला व तो चांगला लोकप्रिय झाल्यानंतर उपाहारगृह काढले. त्यांनी भोजननिवासाचा (हॉटेलाचा) धंदा जो डोळ्याआड केला तो कायमचाच. वर लिहिलेले गुण काकासाहेबांच्याही प्रकृतीत असल्याचा अनुभव त्यांच्या परिचितांना यथेच्छ आहे. काकासाहेब तांबे हे आहाराचा शास्त्रीय दृष्टीने विचार करणारे हा त्यांचा विशेष नमूद करणे अवश्य आहे.

मुंबईच्या सार्वजनिक भोजनगृहांच्या इतिहासात खाणावळी काढणाऱ्या बायकांचा निर्देश केलाच पाहिजे. माधवाश्रमाचे संस्थापक जे परशुरामपंत महाजन यांची व त्यांचे मामा सावले यांची नशीब काढण्याची धडपड चालू होती त्या काळात एकदा खाणावळीचा उद्योग सुचविला असता महाजनांनी ती सूचना 'हा विधवा बायकांचा धंदा' अशा अर्थाचा उद्गार उच्चारून फेटाळल्याचे वृत्त पूर्वोक्त काकासाहेब तांबे यांच्या 'आहार' मासिकात प्रसिद्ध केलेल्या महाजनांच्या चरित्रात प्रसिद्ध झालेले आहे. हा उल्लेख एका काळी खाणावळीविषयींच्या लोकमताची कल्पना येण्यासाठी केलेला आहे.

प्रबोधनकार कै. केशव सीताराम ठाकरे यांचा पूर्वोक्त 'आहार' मासिकात 'सखूबाईची खाणावळ' या मथळ्याचा लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यात प्रथम त्या बाईच्या सडेतोड स्वभावाचे वर्णन असून पुढे तिच्या स्वभावाचे इतर पैलू रेखाटले आहेत. या बाईने सोवळ्याओवळ्याचा विधिनिषेध मोडला. ब्राह्मण अब्राह्मण हा जातिभेदही आपल्या खाणावळीपुरता मोडीत टाकला. सखूबाईची खाणावळ गिरगावच्या भटवाडीत होती. सखूबाईचा कित्ता पाहून ठाकुरद्वारच्या झाबवा वाडीत भीमाबाईने आणि मुगभाटात चंद्रभागाबाईने याप्रमाणे आणखी दोन बायकांच्या खाणावळींची नोंद ठाकऱ्यांच्या लेखात आहे. रोज नेहमीचे जेवण आणि रविवारी व सणाच्या दिवशी गोडधोडाचा बेत गिऱ्हाईकांच्या संमतीने पार पडायचा. खाणावळीचे दर प्रतिमासी रुपये सात व साडेसात असे होते. साडेसातवाल्यांना मागल्या भातावर

दूध दही व इतरांना ताक एवढाच काय तो जेवणात फरक असे. गव्हाच्या सरसकट चपात्या १९२० सालापूर्वी खाणावळीच्या व्यवसायात शिरल्या नव्हत्या. पोळी व भाकरी या दोन्हीचा व्यवहार साठवर्षांपूर्वी भोजनगृहातून प्रचलित होता. भाकऱ्या बहुधा जोंधळ्याच्या असत. १९१४-१९१८ चे जागतिक महायुद्ध समाप्त झाल्यावर आस्ट्रेलियाचा गहू हिंदुस्थानास मिळू लागला तेव्हा सार्वजनिक भोजनगृहातून भाकऱ्या गेल्या व गव्हाच्या पोळ्या-चपात्यांना भोजन पदार्थात अव्वल दर्जा लाभला. त्यापूर्वी एक काळ असा होता की, जेव्हा पोळी म्हणजे पुरण पोळी असाच बोध व्हावयाचा. हल्ली पोळीला चपाती हे दुसरे नाव असल्यामुळेच पोळी या शब्दात 'पुरण' राहिलेले नाही. आता पुरणाचा मान खासगीरीतीने घरातून तेवढा सणावारी राखला जातो.

सन १६६१ मध्ये मुंबई बेट इंग्रजांच्या कब्जात आल्यानंतर सुमारे दीडशे वर्षात इंग्रजाना हॉटेलाची गरज कधी वाटली नाही आणि एकोणिसाव्या शतकात ती वाटावी याचे कारण उघड आहे. १६६१ पासून १७०८ पर्यंत त्यांच्या सत्तेवर अंतर्बाह्य संकटे वारंवार कोसळत होती. तरी सत्ता त्यांनी हातातून जाऊ दिली नाही व अठराव्या शतकात तर इंग्रजांचे धोरण बकासुरी सत्तावाढीचे होते. नंतर एकोणिसाव्या शतकारंभी कंपनीच्याप्रमाणे इंग्लंडातील कंपनीबाहेरच्या व्यापारी वर्गाला इंग्रजानी जिंकलेल्या भारतीय भागात स्वतंत्रपणे व्यापार चालविण्याची परवानगी मिळाल्यामुळे चोहोकडे इंग्रजाची वस्ती वाढली. अर्थात त्याना आपल्या पोटापाण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. प्रत्येकाला स्वयंपाकी व इतर घरकामाचे नोकर बाळगणे शक्य नसल्याने, त्यांच्यासाठीं हॉटेले, क्लबसारख्या संस्था निघणे अपरिहार्य होते. पारशी लोक इंग्रजांची घरातूनसुद्धा चाकरी करणारे असल्यामुळे त्यानी हॉटेले काढणे हे सरळच ठरते. शिवाय त्याकाळी निर्वाहाकरता इकडे येणारे इंग्रज बहुधा एकटेच येत असत. येथे आल्यावर घर, नोकरचाकर ठेवायचे आणि मग बायको व इतर लहान मोठे नातेवाईक आणावयाचे, अशी त्याकाळी प्रथा होती. इंग्रजात नवराबायको व मुले एवढाच कुटुंब परिवार असतो.

इंग्रजांच्या राज्यात पावबिस्किटाचे भटारखाने काढण्याचा पहिला मान जसा भंडारी समाजाकडे जातो. तशीच चहा पाजणारी दुकाने प्रथम त्यांनीच काढली असे सांगतात. त्यांच्या भटारखान्यातील पावबिस्किटांच्या लज्जतीवर गोरे गिऱ्हाईकही फार खूष असत, हे वृत्त वृद्धांच्या मुखातून या शतकाच्या पहिल्या पंचविशीपर्यंत ऐकायला सापडत असे. सांप्रत ही खाद्ये कारखानदारीने तयार होऊ लागल्यामुळे त्यासंबंधाने जातिविशेषाचा मुद्दाम उल्लेख करण्याची गरज नाही. भंडाऱ्यांच्या खाणावळीतून खाणापिण्याच्या इतर पदार्थांप्रमाणे मद्यमांसाचाही समावेश असल्याने त्यांना लोकाश्रयाची काळजी करावी लागली नाही. आजदेखील भंडाऱ्यांची ही दुकाने या शहरी तुरळक तुरळक कोटात आणि माझगाव परळ भागात चालू आहेत.

दक्षिणी ब्राह्मगात जातिभेदाचे म्हणजे सोवळेओवळे, विटाळ, चांडाळ या भावनांचे प्राबल्य विशेष असल्यामुळे चहाकॉफी व त्याबरोबर काही खाद्ये पुरविणारी दुकाने एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काढण्याला सुरुवात केली. हे मागील हकीकतीवरून वाचकांच्या ध्यानात आलेच असेल. त्याप्रमाणे खाणावळीची व हॉटेलाची थोडी माहिती मागे दिली तिच्यात उपाहारगृहे आलेली नाहीत. उप+आहार म्हणजे आहारच, पण भरपेट जेवण नव्हे. काही किरकोळ खाद्यांचा आहार म्हणून उपाहार. चहाकॉफीबरोबर पावबिस्किटे वगैरे. ही खाद्ये जशी युरोपियन लोकात रूढ आहेत. तशी येथील समाज सदर पेयांना पुरी (कोरडी) भाजी किंवा उसळ, भजी, चिवडा यासारख्या खाद्यांची साथ देतो. असे उपहारगृह १८९४ साली वेलणकर नावाच्या ब्राह्मणाने 'वेलणकर हिंदु उपाहारगृह' या नावाने गिरगावात चालू केले. हल्ली त्याचे नाव बदलले आहे. 'वीरकर आहार भवन' या नावाने ते त्याच जागी चालू आहे. त्यामध्ये जेवणाचीही सोय आहे. मात्र खाणावळीसारखा पाट-ताट हा प्रकार नसतो. 'राइस प्लेट' या नावाने जी प्रथा निघाली ती जेवणाची दर्शक आहे. दादर भागांत मामा काणे यांचे स्वच्छ आहाराची व्यवस्था असलेले एक उल्लेखनीय भोजनगृह आहे.

आता थोडे गुजराती समाजात सार्वजनिक भोजनालयासंबंधात काय घडले याची थोडी विचारपूस केली पाहिजे. गुजराती लोक मोठमोठ्या व्यापारी उलाढालीत गुंतलेले म्हणून त्यांनी खाणावळी हॉटेले या व्यवहाराकडे कमी लक्ष दिले असावे, असे क्षणभर मानले, तरी मध्यान्हीची सोय करण्याची आवश्यकता त्यानाही आहेच, म्हणून 'अंबिका-विजय' नावाची खाणावळ काळबादेवी भागात निघाली. तिच्यामागून १९१० मध्ये 'साबरकांटा' या नावाने दुसरी फार मोठी खाणावळ मुंबादेवीजवळ जन्मास आली क्रॉफर्ड मार्केट (म्हणजे हल्लीचे ज्योतिबा फुले मार्केट) जवळ एक पारशी गृहस्थाने १९१५ साली 'नृसिंह लॉज' नावाचे हॉटेल काढले. त्याचे नाव बदलू नये, या अटीवर ते हॉटेल कृपाशंकर भट यांस विकले. अद्यापि ते हॉटेल बोरीबंदरजवळ त्याच नावाने आपला कारभार चालवीत आहे.

या विवेचनावरून मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येची भूक येथे वर्णिलेल्या काही हिंदू संस्था शांत करू शकतात असा वाचकांनी आपला गैरसमज करून घेऊ नये.

प्रकरण सोळावे

नगरपर्यटन

कोणीही मनुष्य एखाद्या नव्या गावी गेला म्हणजे तेथील वस्तीतले नवे जुने पाहण्याविषयी तो उत्सुक असतो. हा मनुष्यस्वभाव आहे. त्यास अनुसरून आता आपण मुंबई शहरात फिरून काय दिसते ते पाहू. त्यासाठी प्रथम हे लक्षात ठेवणे अवश्य आहे की या शहराचे आयुष्य अवघे तीनशे सव्वातीनशे वर्षांचे आहे. स्थूल मानाने इंग्रजांच्या ताब्यात आल्यानंतर या बेटाच्या विकासाला प्रारंभ झाला. त्यापूर्वी सुमारे शंभर सव्वाशे वर्षे हे बेट पोर्तुगीजांची राजवट होती. त्यांनी जर काही केले असेल तर या बेटावरील पुष्कळांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. पोर्तुगीजांचे लक्ष ख्रिस्ती-धर्माच्या प्रसारावर फार मोठ्या प्रमाणात होते. व त्या योगाने त्यांचे राज्य सगळीकडेच खालावले. सगळीकडेच म्हणण्याचे कारण त्यांच्या सत्तेचा भूतकालीन विस्तार हे होय. इंग्रजांनीदेखील आपले हातपाय असेच पसरून 'त्यांच्या राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही' अशी एक लोकोक्ती उत्पन्न केली. जेथे राज्य करावयाचे तेथील जनतेलाही उन्नतीस चढवायचे असेही त्यांच्या राज्यामागे धोरण होते. त्यानी १९ व्या शतकाच्या सुरवातीस प्रजेच्या सर्वांगीण विकासाची कामे हाती घेतली. व आजचा हिंदुस्थान देश उभा केला. हे शतक इंग्रजांच्या भरभराटीचे असल्यामुळे मुंबई शहरात जे जे काही पाहण्यासारखे आहे ते सारे त्या शतकातले आहे, हे ओघानेच आले. हिंदु-मुसलमानांची पुष्कळ पवित्र स्थानेही त्याच शतकातली आहेत. ख्रिस्ती मंदिरे बहुतेक पोर्तुगीजांच्या वेळची आहेत. भुलेश्वर, वाळकेश्वर, मुंबादेवी, ही स्थळे नावावरून इंग्रजांच्या कारकिर्दीपूर्वीची मानता येतील, पण आजची त्यांची उपस्थिती मात्र इंग्रजी राज्यातील आहे. वाळकेश्वर हे पोर्तुगीज, इंग्रज यांच्यापूर्वी अस्तित्वात होते, पण मुसलमान व पोर्तुगीज यांनी आपापल्या धर्मास जागून त्यांच्या विध्वंसाला हातभार लावला. पूर्वी ते देवस्थान आज ज्या परिसरात गव्हर्नर (राज्यपाल) राहतो तेथे होते पण ते आज मलबार टेकडीवर आहे. आजचे देऊळ रामजी कामत नावाच्या एका सारस्वत धनिकाने अठराव्या शतकाच्या प्रारंभी बांधले असा इतिहास आहे. रामजी कामत हा मुंबईतील एक मोठा प्रतिष्ठित नागरिक होता, तरी मत्सरी लोकांच्या कारस्थानाने त्याच्यावर फितुरीचा आरोप येऊन तेव्हाच्या न्यायाप्रमाणे त्याला कैदेची

शिक्षा ठोठावण्यात आली व या दुर्दैवी पुरुषाचा अंत १७२० मध्ये कैदखान्यातच झाला. इंग्रजांच्या कारभारात न्यायाला थारा होता. म्हणून रामजी याच्या मृत्यूनंतर त्यावर अन्याय झाल्याचे इंग्रजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी रामजीच्या मुलाला नुकसानभरपाईदाखल कित्येक हजार रुपये पोचविले. परंतु जप्त केलेल्या मालमत्तेपैकी एक सुतळीचा तुकडाही परत केला नाही. त्याची एखादी जागा आपल्या कामासाठी घेताना त्याच्या पूर्वीच्या स्वामित्वाचा उल्लेख इतिहासात येतो. एवढे खरे की इंग्रजी न्यायाच्या इतिहासातील रामजीचा खटला हा पहिला गाजलेला खटला आहे. या खटल्यात पुरावा उभा करण्यासाठी इंग्रजांनी साक्षीदारावर अनन्वित जोरजुलूमही केला असे या खटल्याच्या हकीकतीत नमूद आहे. वाळकेश्वराच्या संदर्भात रामजी कामताचे नाव निघाले व त्यामुळे त्याच्या दुर्दैवाची कथा सांगावी लागली. पुष्कळ इंग्रजांनी कामताऐवजी कामाठी असा शब्द उपयोगात आणल्याने हा कामाठी समाजातला कोणी असावा, अशी लोकांची समजूत होऊन बसली होती.

वाळकेश्वराच्या टेकडीचे स्वरूप इंग्रजाच्या हाती मुंबई आल्यावेळी खरोखरीच अगदी रानटी होते. तेथे त्या काळी माणसाऐवजी मनुष्येतर प्राण्यांचा राबता प्राधान्याने होता. कोल्हे, ससे, वानरे यांसारखी साधारणपणे निरुपद्रवी जनावरे वस्ती करून असली तरी कधीकधी वाघचित्त्यासारखे मोठाले हिंस्र पशूदेखील या टेकडीवर आपल्या पायाचे ठसे उमटवून जात असत. कोकण हा सर्पांचा प्रदेश या विषयाची चर्चा पूर्वी येऊन गेलेली आहे. या टेकडीवर माणसे झुंडीने दिसायची ती फक्त यात्रेच्या प्रसंगी; एरवी वाळकेश्वराचे नित्याचे कायम सेवक आणि वैरागी, संन्यासी, जपी, तपी वगैरे येऊनजाऊन असतील तेवढेच. या टेकडीवर गवत उगवायचे व इंग्रजांनी त्याची विक्री करून जे द्रव्य मिळेल ते आपल्या तिजोरीत भरायचे. गिरगावाकडून दिसणाऱ्या टेकडीच्या भागामागील बाजू स्वराज्यपूर्वकाली मुंबई प्रांतातील राजेरजवाडे आणि धनाढ्य व्यापारी यांच्या वाडे-बंगल्यांनी व्यापलेली होती. ती स्थळे आता स्वराज्याच्या कारभाऱ्यांनी व्यापली आहेत. टेकडीच्या माथ्यावर आज दोन बागा आहेत. जुनी बाग 'सर फेरोजशहा मेथा' यांच्या नावे ओळखली जाते. तिच्या समोरच दुसरी बाग 'कमला नेहरू पार्क' या नावाची आहे. कमला नेहरू हे नाव स्वराज्याचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नीचे होते, हे वाचकाला सांगायला नको. याच टेकडीवर खंडोबाचे एक देऊळ आहे. तेथेच मुंबईचा पाणीपुरवठा गाळून निर्दोष केल्यावर शहरात ठराविक तास पुरविला जातो. पाणी स्वच्छ करणारे, मलबार टेकडी हें मुंबईत एकच ठिकाण नाही. याच टेकडीवर पारशी समाजाचे स्मशान आहे, त्याला 'दोख्मा' म्हणतात. मुसलमान, ख्रिस्ती हे प्रेते जमिनीत पुरतात. हिंदू मयताला जाळून टाकतात. पारशी विहिरीसारख्या खोल कोरड्या खाड्यात मृताला नेऊन ठेवतात. नंतर गिधाडे, घारी, कावळे वगैरे मांसभक्षक पक्षी त्याचा निकाल लावतात. टेकडीवरील ज्या भागात पूर्वोक्त पक्षी दिसतील तेथे खाली 'दोख्मा' आहे असे समजावे.

वाळकेश्वर देवस्थानचा उल्लेख पूर्वी आला आहे. जेथे हल्ली गव्हर्नराचे वास्तव्य असते, त्या जागी हे देवालय होते असे ऐतिहासिक वृत्तही निवेदन केले आहे. १७२० मध्ये रामजी कामत याने मलब्रार टेकडीवर ते बांधले हेदेखील वाचकांना सांगून झाले आहे. पण प्रत्यक्ष देवळाबद्दल मात्र काहीच तपशील सादर केलेला नाही. तो असा की ते दगडाचे आहे. देवळालगत एक मोठा जलाशय आहे, त्याला बाणगंगा म्हणतात. ही गंगा उत्पन्न करण्याचे श्रेय परशुराम किंवा राम या दोन्ही अवतारांना दिले जाते. राम सीतेच्या शोधार्थ भटकत असता या टेकडीवर आला. रे. ा शिवाची पूजा करण्याचे त्याचे व्रत होते. त्याप्रमाणे ते व्रत सिद्धीस जाण्यासाठी रामाने वाळूची शिवपिंडी बनविली आणि आपले व्रत पार पाडले. त्याच सुमारास तहान लागली, तेव्हा रामाने बाण मारला तो भूमीतून पाताळात पोचला, तेथून वर आलेल्या पाण्याचे जे तळे बनले त्यालाच वाळकेश्वर देवळातली बाणगंगा म्हणतात. बाणाने जन्मास आली म्हणून बाणगंगा आणि वाळूची शिवप्रतिमा पूजेसाठी निर्माण करण्यात आली एतदर्थ देवाचे नाव वालुकेश्वर. वाळकेश्वर टेकडीला 'श्रीगुंडी' नावाच्या एका खडकामुळे एकदा महत्त्व होते. या दगडाला मध्यभागी एक चिंचोळे भगदाड होते. त्यातून सरपटत जो कोणी सुरक्षित पलीकडे जाईल त्याची पापे नष्ट होतील असे त्या श्रीगुंडीचे माहात्म्य असल्यामुळे, मुंबईस इंग्रजाचे वर्चस्व होण्यापूर्वी.छत्रपती शिवाजी व पुण्याला रामराम ठोकून मुंबईच्या आश्रयास आलेला नामधारी पेशवा राघोबा, या दोघांनी 'श्रीगुंडी'तून पार पडण्याचा प्रयोग केल्याची आख्यायिका आहे. अफझुलखानाच्या वधानिमित्त शिवाजी महाराजांनी व नारायणराव पेशव्याचा खून केला म्हणून राघोबाने श्रीगुंडीचा अनुभव घेतला असे प्रस्तुत आख्यायिकेचे स्पष्टीकरण आहे. आज या पापविनाशक खडकाचा ठावठिकाणाही उरलेला नाही. फक्त नाव व कथा मात्र शिल्लक आहे.

टेकडी उतरू लागल्यावर दुसरे देऊळ आहे ते बाबुलनाथाचे. या देवळाचा परिसर स्वच्छ आणि मोकळा म्हणजे विनगर्दीचा असून शिवाय शहराला जवळ, यामुळे या देवळाकडे लोकांची ओढ जास्त असणे स्वाभाविक आहे. या देवळाचा इतिहास १७८० पासून पुढचा आहे. यात स्थापिलेले शिवलिंग वरळीस सापडले अशी आख्यायिका आहे. देवळातील पूजाअर्चा गुजराती ब्राह्मणाकडे आहे. तोच आतला नंदादीप अखंड तेवत ठेवतो. हल्लीचे देऊळ १९०० साली नव्याने बांधलेले आहे. लिंगावर नागाच्या पाच फणा उभारल्या आहेत. त्या फणावर सोन्याचांदीचे काम आहे. सोमवार व श्रावण महिना आणि पिठोरी अमावास्या (श्रावण) हे दिवस शंकराच्या माहात्म्याचे असून श्रावणात बाबुलनाथाची पूजा तुपाने केली जाते.

येथून आपण गिरगाव व त्यापुढच्या इमारतींकडे नजर टाकीत अपोलो बंदरापर्यंत फेरी टाकून परळ, माझगावाकडे जाऊन नगरप्रदक्षिणा संपवू. प्रथम भुलेश्वराचे दर्शन घेऊ. ज्या नावाचे शेवटी 'ईश्वर' असेल, ते ठिकाण शंकराचे असे बेधडक समजावे.

भुलेश्वराचे देऊळ शहराच्या व्यापारउदिमाने गजबजलेल्या भागात बांधलेले आहे. भोलानाथ नावाच्या कोणा उत्तरभारतीयाने हे देऊळ बांधले, म्हणून भुलेश्वर, अशी या नावाची उपपत्ती आहे. एका वाण्याच्या विधवेने घरासाठी जमीन खणणाऱ्या मजुरांना सापडलेल्या लिंगाची देऊळ उभारून महती वाढविली अशी आणखी एक दंतकथा आहे. दंतकथांना मर्यादा कोणी घालावी? यामुळे एका दंतकथेने देवळाच्या हक्कदारांत शेणवी व सुताराचा संबंध जोडला आहे. हे मंदिर अडीचशे वर्षांइतकेच जुने आहे. १८३० साली जुन्या देवळाचा जीर्णोद्धार करण्यात आला. खर्च चाळीस हजार झाला. ही रक्कम वर्गणीने उभी केली होती. देवळाला सभामंडप १८८९ साली लाभला. हे काम कोणा सारस्वताचे आहे. कीर्तन, पुराणासाठी निराळा (दुसरा) मंडप आहे. हा सुताराने बांधला आहे. या मंडपापुढे एक दगडी बांधणीचे सुंदर तळे आहे. पूजेचे लिंग स्वयंभू असून ते जेथे उद्भवले, त्याच जागी आजही ते आहे. महादेवासमोर नंदी पाहिजेच, तसा तो भुलेश्वराच्या देवळातही आहे. सीतला देवीला महादेवासन्निध स्थान आहे, हा या देवळाचा विशेष. ही देवी, देवीच्या रोगासाठी आहे. मुख्य देवाची पूजा त्रिकाळ केली जाते. संध्याकाळच्या पूजेनंतर आरती गाइली जाऊन देवाची त्या दिवसाची सेवा समाप्त होते. देवाच्या सामुदायिक सेवेत जातिभेद एरवी नसतोच, पण श्रावणातल्या सोमवारी व महाशिवरात्रीला तर देवळात जमणाऱ्यांना जातिभेदाचे भान मुळीच असत नाही. कोजागिरी (आश्विन पौर्णिमा) आणि त्रिपुरी पौर्णिमा (कार्तिक) या दोन दिवसांत देवाची पालखी निघते. त्रिपुरी पौर्णिमेची पालखी खास करून शेणवी वस्तीत फिरते असा उल्लेख सापडतो.

वरळी समुद्राच्या काठी असलेल्या एका उंचवट्याच्या उतारावर महालक्ष्मीचे देऊळ आहे. व त्याचा मुंबईच्या हिंदू नागरिकांत मानही पुष्कळ आहे. महालक्ष्मी, महाकाली व महासरस्वती या तिन्ही देवता दुर्गेच्या प्रतिनिधी समजल्या जातात व या प्रतिनिधींचे हे देऊळ असून देवळाला नाव मात्र महालक्ष्मीचे आहे. ही देवी वाघ व महिषासुर या दोन्हींवर स्वार झालेली दाखविली आहे. मूर्तीचे अलंकार नवसास पावलेल्या भक्तांनी दिलेले आहेत. देवळाच्या परिसरात एक तळे असून ते बांधणारा तुळसीदास गोपाळदास नावाचा एक जण होता व त्याने सन १८२४ मध्ये ते बांधले. तळ्याच्या बाजूस शंकर व रणछोडजी (कृष्ण) यांची देवळे आहेत. मुख्य देवळाच्या अवतीभोवती आणखी बरीच देवळे आहेत. त्यांत एक धाकलेश्वराचे आहे. ते धाकजी दादाजी नावाच्या प्रख्यात नागरिकाने उभारले म्हणून त्याचे नाव धाकलेश्वर ठेवले. याची कारागिरी उंची असून ते समुद्रात २५ मैलांपर्यंत दिसते असे म्हणतात. धाकजी दादाजीने यासाठी ८० हजार रुपये खर्चिले. पूर्वोक्त तिन्ही मूर्ती इंग्रजाच्या हाती मुंबई बेट पडेपर्यंत मुसलमान व पोर्तुगीज या मूर्तिभंजकांच्या कारकिर्दीत वरळीच्या समुद्रात दडून राहिल्या होत्या. इंग्रजांनी तेथे समुद्र हटविण्याचे काम आरंभले, पण ते तडीस जाईना. तेव्हा रामजी शिवजी नावाच्या एका प्रभू कंत्राटदाराला दृष्टांत झाला की,

या तीन देवीच्या मूर्ती जलसमाधीतून वर काढल्यास समुद्र निर्विघ्नपणे हटेल. रामजी शिवजीने त्या मूर्तींना वर काढले. हार्नबी हा त्या दिवसांत मुंबईचा गव्हर्नर होता. (१७७१-८४.) इतिहासज्ञांचा तर्क आहे की ही देवता मुळात कोळी व आग्री यांची असावी. काही काळ गेल्यावर तिच्याकडे हिंदूंतील प्रभू व वाणी यांचे लक्ष जाऊन तिचा महिमा वाढला. देवळाची जागा मुंबई सरकाराच्या देणगीची आहे. या हकीकतीवरून महालक्ष्मीचा उदय अवघ्या दोनशे वर्षांचा आहे, याचा बोध होईल.

जिच्यावरून या शहाराला मुंबई हे नाव मिळाले ती एकप्रकारे नगरदेवता मानावी अशा योग्यतेची जी मुंबादेवी तिच्या मंदिराकडे दृष्टिक्षेप करू. ही देवता सुरवातीस मच्छीमार कोळ्यांची. हिचे पहिले देऊळ बोरीबंदर स्टेशनाने व्यापलेल्या जागेत होते. गुन्हेगारांना फाशी देण्याची ती जागा, म्हणून तेथे असलेल्या एका तळ्याला फाशीतळे हे नाव होते. मुंबा हे नाव भूमातेचे वाचक आहे. या नावाचा द्रविडांशी संबंध पोचतो. भारताच्या दक्षिणेस जशी एकजात द्रविडांची वस्ती आहे तशी ती काही प्रमाणात पश्चिम भारतातही होती. ते भूमातेला निरनिराळ्या नावांनी पुजतात म्हणून त्यांच्या श्रद्धेचा धागा मुंबा या नावाशी जुळतो. बोरीबंदरजवळचे मुंबादेवीचे देऊळ १७३७ मध्ये इंग्रजांनी हालविले व आजचे देऊळ पांडू सोनार नावाच्या धनिक व्यापाऱ्याने सरकारच्या हुकुमावरून आजच्या जागी उभे केले.

मुंबादेवीची मूर्ती देवळाच्या गाभाऱ्यात रुप्याच्या पत्र्याने मढविलेल्या लाकडी मखरामध्ये बसविलेली आहे. देवीचे वाहन जो वाघ, त्याची पितळेची प्रतिमा १८९० साली एका धनिक व्यापाऱ्याने देवीला अर्पण केली. त्याचीही पूजा देवीबरोबरच रोज होत असते. मुंबादेवीच्या डाव्या बाजूला अन्नपूर्णा देवीची दगडी मूर्ती आहे. आश्विनात शुक्ल प्रतिपदेपासून दसऱ्यापर्यंत नऊ दिवस व मार्गशीर्षात पाच दिवस उत्सव चालतो. पहिल्या उत्सवात प्रतिपदेला पेरलेल्या धान्याचे अंकुर उपटून दसऱ्याला ते देवीला वाहतात. सप्तमीला यज्ञकुंड मांडतात. अष्टमीला धान्य, तूप व नारळ यांच्या आहुतीने होम केला जातो. दसऱ्याला जे अंकुर देवीला अर्पण करतात तेच प्रसाद या नात्याने देवळात येणारांना वाटतात. ग्राहक भक्त ते आपल्या डोक्यावरील टोपी, फेटा वगैरे वस्त्रांत खोवतात. होमाच्या राखेत उजव्या हाताचे मधले बोट बुडवून त्या राखेचा टिळा भुवयांमध्ये कपाळी लावण्याची एक प्रथा आहे. देवीच्या नावाने नारळ फोडला म्हणजे त्यातील पाणी-खोबरे वगैरे ऐवज वाघाला देऊन मग अर्धा नारळ पुजाऱ्याच्या हाती ठेवतात. त्याच्याकडून देवीचा प्रसाद या नात्याने फूल, थोडी मिठाई, यांसह परत मिळतो. मुंबईतील कित्येक जण लग्न झाल्यावर त्याच दिवशी किंवा त्यानंतर देवीच्या दर्शनाला जातात. देवळालगतचे मोठे तळे नागरदास नवलाख्या नावाच्या कपोल वाण्याने बांधलेले असून त्यावर व मुंबादेवीजवळच्या सर्व देवळांवर त्या वाण्याच्या कुटुंबाचा हक्क आहे. हल्ली हे तळे बुजविलेले असून त्यावर इमारती उभारल्या आहेत.

वेदाने स्तविलेल्या, पण पुराणांनी (एका सौर पुराणाखेरीज) अव्हरलेल्या सूर्यनारायण या देवाचे एक मंदिर मुंबई शहरात आहे. हा शहराचा विशेष मुद्दाम नमूद करायला पाहिजे. ब्रह्मदेवाचीदेखील अशीच अवस्था आहे. त्याचीही देवळे क्वचित आढळतात. सूर्याच्या देवळाला धार्मिक अडचणी फार. यामुळे त्याचे देऊळ बांधायला एक हरजीवनजी वसनजी मणियार हा कपोल जातीचा व्यापारी धजला. पण देवळाचा पाया पूर्ण होण्यापूर्वीच तो मरण पावला. (१८९५.) परंतु त्याची बायको राधाबाई ही धीराची. यामुळे तिच्या हातून १८९९ मध्ये ते देऊळ बांधून पुरे झाले. देवळाच्या प्रवेशद्वारावर जयविजय या द्वारपालांच्या प्रतिमा असून कीर्तनपुराणासाठी आत एक प्रशस्त मंडप आहे. चौकात खांबावर सप्तर्षींच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. आतला गाभारा संगमरवरी फरशीचा असून तेथे मारुती, गणेश व अप्सरांच्या प्रतिमा उभ्या असून तेथेच मुकुटधारी सूर्याची मूर्ती, ज्याला एकच सप्तमुखी घोडा जोडलेला आहे व ज्याला खाली एकच चाक आहे अशा रथात, पांगळा सारथी अरुण यासह दृष्टीस पडते. सूर्याच्या शेजारी प्रभा व छाया या त्याच्या दोन्ही बायका उभ्या असल्याचे दाखविले आहे. देवळामागे वाडी व धर्मशाळा धार्मिक कर्मासाठी राखून ठेवलेल्या आहेत. मुलेश्वराच्या भागात पांजरापोळ बोळात सूरजवाडी येथे हे देऊळ उभे आहे.

गिरगावातून जे दोन समांतर रस्ते कोटाकडे जातात, त्यांतल्या पहिल्या रस्त्यावर गेल्या शतकात ठाकुरद्वारापुढे मुंबईचे प्रख्यात हिंदू पुढारी जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट यांचा काही वर्षांमागे मोठा वाडा होता. मागे तशीच मोकळी जागा होती. तिच्या टोकाला एका कोपऱ्यात घोड्याचा तबेला होता व वाड्याच्या मागल्या बाजूस इंदुप्रकाश छापखाना होता. तेथेच कृ० प्र० खाडिलकर यांचा 'नवाकाळ' निघाला. आता ते दैनिक कांदेवाडीच्या टोकाला स्वतःच्या जागेत व्यवस्थित चालू आहे. पण सडकेवर गिरगाववरील नाना शंकरशेटजींचे मात्र काहीच उरलेले नाही. ठाकुरद्वारला एक लहानसेच टुमदार श्रीरामचंद्राचे देऊळ तेवढेच एक प्रेक्षणीय स्थान उरले आहे. तेथे जवळच काळ्या रामाचे म्हणून दुसरे तसेच देऊळ आहे.

गिरगाव रस्त्याला स्वराज्यात जगन्नाथ शंकरशेटजींचे नाव दिले गेल्याने त्या कर्तृत्वशाली पुरुषाचे नाव, वाडा-वाडी वगैरे स्थावर गेले तरी, पुढच्या पिढ्यांमध्ये निघत राहण्याची सोय झाली आहे. हा रस्ता धोबीतलावापर्यंत जातो व तेथून पुढे अपोलो बंदरावर संपतो. धोबीतलावाचे आता नावच फक्त उरले आहे. तलावाचा मात्र मागमूसही उरलेला नाही.

धोबीतलावाच्या डाव्या बाजूस जाणाऱ्या सडकेच्या दुतर्फावर काही डोळे वेधून घेणाऱ्या वास्तू आहेत. त्यांत पिकेटचे मारुतिमंदिर व गोकुळदास तेजपाल हॉस्पिटल असून ही दोन्ही स्थळे प्रेक्षणीय आहेत. रस्त्याच्या टोकाशी क्रॉफर्ड (आता फुले) मार्केट असून त्याच्या अलीकडे उजव्या बाजूला पोलिसांच्या मुख्य ठाण्याची मोठी इमारत

वाळकेश्वर देवस्थानचा उल्लेख पूर्वी आला आहे. जेथे हल्ली गव्हर्नराचे वास्तव्य असते, त्या जागी हे देवालय होते असे ऐतिहासिक वृत्तही निवेदन केले आहे. १७२० मध्ये रामजी कामत याने मलबार टेकडीवर ते बांधले हेदेखील वाचकांना सांगून झाले आहे. पण प्रत्यक्ष देवळाबद्दल मात्र काहीच तपशील सादर केलेला नाही. तो असा की ते दगडाचे आहे. देवळालगत एक मोठा जलाशय आहे, त्याला बाणगंगा म्हणतात. ही गंगा उत्पन्न करण्याचे श्रेय परशुराम किंवा राम या दोन्ही अवतारांना दिले जाते. राम सीतेच्या शोधार्थ भटकत असता या टेकडीवर आला. रोज शिवाची पूजा करण्याचे त्याचे व्रत होते. त्याप्रमाणे ते व्रत सिद्धीस जाण्यासाठी रामाने वाळूची शिवपिंडी बनविली आणि आपले व्रत पार पाडले. त्याच सुमारास तहान लागली, तेव्हा रामाने बाण मारला तो भूमीतून पाताळात पोचला, तेथून वर आलेल्या पाण्याचे जे तळे बनले त्यालाच वाळकेश्वर देवळातली बाणगंगा म्हणतात. बाणाने जन्मास आली म्हणून बाणगंगा आणि वाळूची शिवप्रतिमा पूजेसाठी निर्माण करण्यात आली एतदर्थ देवाचे नाव वाळुकेश्वर. वाळकेश्वर टेकडीला 'श्रीगुंडी' नावाच्या एका खडकामुळे एकदा महत्त्व होते. या दगडाला मध्यभागी एक चिंचोळे भगदाड होते. त्यातून सरपटत जो कोणी सुरक्षित पलीकडे जाईल त्याची पापे नष्ट होतील असे त्या श्रीगुंडीचे माहात्म्य असल्यामुळे, मुंबईस इंग्रजाचे वर्चस्व होण्यापूर्वी.छत्रपती शिवाजी व पुण्याला रामराम ठोकून मुंबईच्या आश्रयास आलेला नामधारी पेशवा राघोबा, या दोघांनी 'श्रीगुंडी'तून पार पडण्याचा प्रयोग केल्याची आख्यायिका आहे. अफझुलखानाच्या वधानिमित्त शिवाजी महाराजांनी व नारायणराव पेशव्याचा खून केला म्हणून राघोबाने श्रीगुंडीचा अनुभव घेतला असे प्रस्तुत आख्यायिकेचे स्पष्टीकरण आहे. आज या पापविनाशक खडकाचा ठावठिकाणाही उरलेला नाही. फक्त नाव व कथा मात्र शिल्लक आहे.

टेकडी उतरू लागल्यावर दुसरे देऊळ आहे ते बाबुलनाथाचे. या देवळाचा परिसर स्वच्छ आणि मोकळा म्हणजे बिनगर्दीचा असून शिवाय शहराला जवळ, यामुळे या देवळाकडे लोकांची ओढ जास्त असणे स्वाभाविक आहे. या देवळाचा इतिहास १७८० पासून पुढचा आहे. यात स्थापिलेले शिवलिंग वरळीस सापडले अशी आख्यायिका आहे. देवळातील पूजाअर्चा गुजराती ब्राह्मणाकडे आहे. तोच आतला नंदादीप अखंड तेवत ठेवतो. हल्लीचे देऊळ १९०० साली नव्याने बांधलेले आहे. लिंगावर नागाच्या पाच फणा उभारल्या आहेत. त्या फणावर सोन्याचांदीचे काम आहे. सोमवार व श्रावण महिना आणि पिठोरी अमावास्या (श्रावण) हे दिवस शंकराच्या माहात्म्याचे असून श्रावणात बाबुलनाथाची पूजा तुपाने केली जाते.

येथून आपण गिरगाव व त्यापुढच्या इमारतींकडे नजर टाकीत अपोलो बंदरापर्यंत फेरी टाकून परळ, माझगावाकडे जाऊन नगरप्रदक्षिणा संपवू. प्रथम भुलेश्वराचे दर्शन घेऊ. ज्या नावाचे शेवटी 'ईश्वर' असेल, ते ठिकाण शंकराचे असे बेधडक समजावे.

भुलेश्वराचे देऊळ शहराच्या व्यापारउदिमाने गजबजलेल्या भागात बांधलेले आहे. भोलानाथ नावाच्या कोणा उत्तरभारतीयाने हे देऊळ बांधले, म्हणून भुलेश्वर, अशी या नावाची उपपत्ती आहे. एका वाण्याच्या विधवेने घरासाठी जमीन खणणाऱ्या मजुरांना सापडलेल्या लिंगाची देऊळ उभारून महती वाढविली अशी आणखी एक दंतकथा आहे. दंतकथांना मर्यादा कोणी घालावी? यामुळे एका दंतकथेने देवळाऱ्या हक्कदारांत शेणवी व सुताराचा संबंध जोडला आहे. हे मंदिर अडीचशे वर्षांइतकेच जुने आहे. १८३० साली जुन्या देवळाचा जीर्णोद्धार करण्यात आला. खर्च चाळीस हजार झाला. ही रक्कम वर्गणीने उभी केली होती. देवळाला सभामंडप १८८९ साली लाभला. हे काम कोणा सारस्वताचे आहे. कीर्तन, पुराणासाठी निराळा (दुसरा) मंडप आहे. हा सुताराने बांधला आहे. या मंडपापुढे एक दगडी बांधणीचे सुंदर तळे आहे. पूजेचे लिंग स्वयंभू असून ते जेथे उद्भवले, त्याच जागी आजही ते आहे. महादेवासमोर नंदी पाहिजेच, तसा तो भुलेश्वराच्या देवळातही आहे. सीतला देवीला महादेवासन्निध स्थान आहे, हा या देवळाचा विशेष. ही देवी, देवीच्या रोगासाठी आहे. मुख्य देवाची पूजा त्रिकाळ केली जाते. संध्याकाळच्या पूजेनंतर आरती गाइली जाऊन देवाची त्या दिवसाची सेवा समाप्त होते. देवाच्या सामुदायिक सेवेत जातिभेद एरवी नसतोच, पण श्रावणातल्या सोमवारी व महाशिवरात्रीला तर देवळात जमणाऱ्यांना जातिभेदाचे भान मुळीच असत नाही. कोजागिरी (आश्विन पौर्णिमा) आणि त्रिपुरी पौर्णिमा (कार्तिक) या दोन दिवसांत देवाची पालखी निघते. त्रिपुरी पौर्णिमेची पालखी खास करून शेणवी वस्तीत फिरते असा उल्लेख सापडतो.

वरळी समुद्राच्या काठी असलेल्या एका उंचवट्याच्या उतारावर महालक्ष्मीचे देऊळ आहे. व त्याचा मुंबईच्या हिंदू नागरिकांत मानही पुष्कळ आहे. महालक्ष्मी, महाकाली व महासरस्वती या तिन्ही देवता दुर्गेच्या प्रतिनिधी समजल्या जातात व या प्रतिनिधींचे हे देऊळ असून देवळाला नाव मात्र महालक्ष्मीचे आहे. ही देवी वाघ व महिषासुर या दोन्हींवर स्वार झालेली दाखविली आहे. मूर्तीचे अलंकार नवसास पावलेल्या भक्तांनी दिलेले आहेत. देवळाच्या परिसरात एक तळे असून ते बांधणारा तुळसीदास गोपाळदास नावाचा एक जण होता व त्याने सन १८२४ मध्ये ते बांधले. तळ्याच्या बाजूस शंकर व रणछोडजी (कृष्ण) यांची देवळे आहेत. मुख्य देवळाच्या अवतीभोवती आणखी बरीच देवळे आहेत. त्यांत एक धाकलेश्वराचे आहे. ते धाकजी दादाजी नावाच्या प्रख्यात नागरिकाने उभारले म्हणून त्याचे नाव धाकलेश्वर ठेवले. याची कारागिरी उंची असून ते समुद्रात २५ मैलांपर्यंत दिसते असे म्हणतात. धाकजी दादाजीने यासाठी ८० हजार रुपये खर्चिले. पूर्वोक्त तिन्ही मूर्ती इंग्रजाच्या हाती मुंबई बेट पडेपर्यंत मुसलमान व पोर्तुगीज या मूर्तिभंजकांच्या कारकिर्दीत वरळीच्या समुद्रात दडून राहिल्या होत्या. इंग्रजांनी तेथे समुद्र हटविण्याचे काम आरंभले, पण ते तडीस जाईना. तेव्हा रामजी शिवजी नावाच्या एका प्रभू कंत्राटदाराला दृष्टांत झाला की,

या तीन देवीच्या मूर्ती जलसमाधीतून वर काढल्यास समुद्र निर्विघ्नपणे हटेल. रामजी शिवजीने त्या मूर्तींना वर काढले. हार्नबी हा त्या दिवसांत मुंबईचा गव्हर्नर होता. (१७७१-८४.) इतिहासज्ञांचा तर्क आहे की ही देवता मुळात कोळी व आग्री यांची असावी. काही काळ गेल्यावर तिच्याकडे हिंदूंतील प्रभू व वाणी यांचे लक्ष जाऊन तिचा महिमा वाढला. देवळाची जागा मुंबई सरकाराच्या देणगीची आहे. या हकीकतीवरून महालक्ष्मीचा उदय अवघ्या दोनशे वर्षांचा आहे, याचा बोध होईल.

जिच्यावरून या शहाराला मुंबई हे नाव मिळाले ती एकप्रकारे नगरदेवता मानावी अशा योग्यतेची जी मुंबादेवी तिच्या मंदिराकडे दृष्टिक्षेप करू. ही देवता सुरवातीस मच्छीमार कोळ्यांची. हिचे पहिले देऊळ बोरीबंदर स्टेशनाने व्यापलेल्या जागेत होते. गुन्हेगारांना फाशी देण्याची ती जागा, म्हणून तेथे असलेल्या एका तळ्याला फाशीतळे हे नाव होते. मुंबा हे नाव भूमातेचे वाचक आहे. या नावाचा द्रविडांशी संबंध पोचतो. भारताच्या दक्षिणेस जशी एकजात द्रविडांची वस्ती आहे तशी ती काही प्रमाणात पश्चिम भारतातही होती. ते भूमातेला निरनिराळ्या नावांनी पुजतात म्हणून त्यांच्या श्रद्धेचा धागा मुंबा या नावाशी जुळतो. बोरीबंदरजवळचे मुंबादेवीचे देऊळ १७३७ मध्ये इंग्रजांनी हालविले व आजचे देऊळ पांडू सोनार नावाच्या धनिक व्यापाऱ्याने सरकारच्या हुकुमावरून आजच्या जागी उभे केले.

मुंबादेवीची मूर्ती देवळाच्या गाभाऱ्यात रुप्याच्या पत्र्याने मढविलेल्या लाकडी मखरामध्ये बसविलेली आहे. देवीचे वाहन जो वाघ, त्याची पितळेची प्रतिमा १८९० साली एका धनिक व्यापाऱ्याने देवीला अर्पण केली. त्याचीही पूजा देवीबरोबरच रोज होत असते. मुंबादेवीच्या डाव्या बाजूला अन्नपूर्णा देवीची दगडी मूर्ती आहे. आश्विनात शुक्ल प्रतिपदेपासून दसऱ्यापर्यंत नऊ दिवस व मार्गशीर्षात पाच दिवस उत्सव चालतो. पहिल्या उत्सवात प्रतिपदेला पेरलेल्या धान्याचे अंकुर उपटून दसऱ्याला ते देवीला वाहतात. सप्तमीला यज्ञकुंड मांडतात. अष्टमीला धान्य, तूप व नारळ यांच्या आहुतीने होम केला जातो. दसऱ्याला जे अंकुर देवीला अर्पण करतात तेच प्रसाद या नात्याने देवळात येणारांना वाटतात. ग्राहक भक्त ते आपल्या डोक्यावरील टोपी, फेटा वगैरे वस्त्रांत खोवतात. होमाच्या राखेत उजव्या हाताचे मधले बोट बुडवून त्या राखेचा टिळा भुवयांमध्ये कपाळी लावण्याची एक प्रथा आहे. देवीच्या नावाने नारळ फोडला म्हणजे त्यातील पाणी-खोबरे वगैरे ऐवज वाघाला देऊन मग अर्धा नारळ पुजाऱ्याच्या हाती ठेवतात. त्याच्याकडून देवीचा प्रसाद या नात्याने फूल, थोडी मिठाई, यांसह परत मिळतो. मुंबईतील कित्येक जण लग्न झाल्यावर त्याच दिवशी किंवा त्यानंतर देवीच्या दर्शनाला जातात. देवळालगतचे मोठे तळे नागरदास नवलाख्या नावाच्या कपोल वाण्याने बांधलेले असून त्यावर व मुंबादेवीजवळच्या सर्व देवळांवर त्या वाण्याच्या कुटुंबाचा हक्क आहे. हल्ली हे तळे बुजविलेले असून त्यावर इमारती उभारल्या आहेत.

वेदाने स्तविलेल्या, पण पुराणांनी (एका सौर पुराणाखेरीज) अव्हरलेल्या सूर्यनारायण या देवाचे एक मंदिर मुंबई शहरात आहे. हा शहराचा विशेष मुद्दाम नमूद करायला पाहिजे. ब्रह्मदेवाचीदेखील अशीच अवस्था आहे. त्याचीही देवळे क्वचित आढळतात. सूर्याच्या देवळाला धार्मिक अडचणी फार. यामुळे त्याचे देऊळ बांधायला एक हरजीवनजी वसनजी मणियार हा कपोल जातीचा व्यापारी धजला. पण देवळाचा पाया पूर्ण होण्यापूर्वीच तो मरण पावला. (१८९५.) परंतु त्याची बायको राधाबाई ही धीराची. यामुळे तिच्या हातून १८९९ मध्ये ते देऊळ बांधून पुरे झाले. देवळाच्या प्रवेशद्वारावर जयविजय या द्वारपालांच्या प्रतिमा असून कीर्तनपुराणासाठी आत एक प्रशस्त मंडप आहे. चौकात खांबावर सप्तर्षींच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. आतला गाभारा संगमरवरी फरशीचा असून तेथे मारुती, गणेश व अप्सरांच्या प्रतिमा उभ्या असून तेथेच मुकुटधारी सूर्याची मूर्ती, ज्याला एकच सप्तमुखी घोडा जोडलेला आहे व ज्याला खाली एकच चाक आहे अशा रथात, पांगळा सारथी अरुण यासह दृष्टीस पडते. सूर्याच्या शेजारी प्रभा व छाया या त्याच्या दोन्ही बायका उभ्या असल्याचे दाखविले आहे. देवळामागे वाडी व धर्मशाळा धार्मिक कर्मासाठी राखून ठेवलेल्या आहेत. भुलेश्वराच्या भागात पांजरापोळ बोळात सूरजवाडी येथे हे देऊळ उभे आहे.

गिरगावातून जे दोन समांतर रस्ते कोटाकडे जातात, त्यांतल्या पहिल्या रस्त्यावर गेल्या शतकात ठाकुरद्वारापुढे मुंबईचे प्रख्यात हिंदू पुढारी जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट यांचा काही वर्षांमागे मोठा वाडा होता. मागे तशीच मोकळी जागा होती. तिच्या टोकाला एका कोपऱ्यात घोड्याचा तबेला होता व वाड्याच्या मागल्या बाजूस इंदुप्रकाश छापखाना होता. तेथेच कृ० प्र० खाडिलकर यांचा 'नवाकाळ' निघाला. आता ते दैनिक कांदेवाडीच्या टोकाला स्वतःच्या जागेत व्यवस्थित चालू आहे. पण सडकेवर गिरगाववरील नाना शंकरशेटजींचे मात्र काहीच उरलेले नाही. ठाकुरद्वारला एक लहानसेच टुमदार श्रीरामचंद्राचे देऊळ तेवढेच एक प्रेक्षणीय स्थान उरले आहे. तेथे जवळच काळ्या रामाचे म्हणून दुसरे तसेच देऊळ आहे.

गिरगाव रस्त्याला स्वराज्यात जगन्नाथ शंकरशेटजींचे नाव दिले गेल्याने त्या कर्तृत्वशाली पुरुषाचे नाव, वाडा-वाडी वगैरे स्थावर गेले तरी, पुढच्या पिढ्यांमध्ये निघत राहण्याची सोय झाली आहे. हा रस्ता धोबीतलावापर्यंत जातो व तेथून पुढे अपोलो बंदरावर संपतो. धोबीतलावाचे आता नावच फक्त उरले आहे. तलावाचा मात्र मागमूसही उरलेला नाही.

धोबीतलावाच्या डाव्या बाजूस जाणाऱ्या सडकेच्या दुतर्फावर काही डोळे वेधून घेणाऱ्या वास्तू आहेत. त्यांत पिकेटचे मारुतिमंदिर व गोकुळदास तेजपाल हॉस्पिटल असून ही दोन्ही स्थळे प्रेक्षणीय आहेत. रस्त्याच्या टोकाशी क्रॉफर्ड (आता फुले) मार्केट असून त्याच्या अलीकडे उजव्या बाजूला पोलिसांच्या मुख्य ठाण्याची मोठी इमारत

आहे व डावीकडे दुकानांच्या गर्दीत 'सरदारगृह' आहे. क्रॉफर्ड मार्केटच्या विस्तारात नागरिकांना खाण्याच्या आणि विलासाच्या जिनसा मिळतात. क्रॉफर्ड हा १८६५-७१ या काळात म्युनिसिपल कमिशनर होता. त्याने या शहरात अवश्य त्या अनेक सुधारणा केल्या, पण त्या करताना खर्चाचा ताळ ठेवला नाही. यामुळे गोऱ्या व काळ्या याप्रमाणे दोन्ही नागरिकांत क्रॉफर्डच्या कारभाराविषयी खूप गवगवा माजला व त्याला आपले काम सोडावे लागले. क्रॉफर्ड हा एक हुशार व हिंमती सिव्हिल सर्व्हंट होता. पण त्याला लाच खाण्याच्या आरोपामुळे पुढे नोकरी गमवावी लागली. 'मामलेदार प्रकरण' या नावाने हा खटला महाराष्ट्रात खूप गाजला. क्रॉफर्डने लाच घेऊन नेमलेल्या मामलेदारांना वाचविण्यासाठी लोकमान्य टिळकांनी तेव्हा फार परिश्रम घेतले होते.

क्रॉफर्ड मार्केटवरून उजव्या हाताकडील सडकेने पुढे निघाले की पुष्कळ प्रेक्षणीय इमारती लागतात. पहिल्या जमशेटजी जीजीभाईने स्थापिलेले आर्ट स्कूल (कला शिक्षणाची शाळा), अंजुमन इस्लामचे हायस्कूल, टाइम्स ऑफ इंडियाचा कारखाना, म्युनिसिपालिटीची (महानगरपालिकेची) इमारत—या इमारतीच्या तोंडाशी फेरोजशहा मेथांचा भव्य पुतळा आहे. या सर्व इमारती स्थापत्याच्या कलाकौशल्याने बांधलेल्या असून सौंदर्यविशिष्ट असल्या तरी त्या सर्वांना मागे टाकणारी इमारत बोरीबंदर (व्हिक्टोरिया टर्मिनस) या जी० आय० पी० (आता मध्य रेल्वे) स्टेशनाची-स्थानकाची आहे. ही जशी अवाढव्य तशीच सुंदर आहे. तिला जगात तोड नसल्याची ख्याती आहे.

फुले मार्केटकडील सडकेने बोरीबंदरपर्यंत जाताना सडकेच्या उजव्या बाजूला एकापुढे एक याप्रमाणे म्युनिसिपल कार्यालयापर्यंत असलेल्या इमारती आपण पाहिल्या. आता धोबीतलावाकडून बोरीबंदरापर्यंत जाताना ज्या इमारती लागतात त्यांची विचारपूस करू. या सडकेवर एल्फिन्स्टन विद्यालय, झेवियर महाविद्यालय, स्त्रियांचे कामा इस्पितळ, मुख्य प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचे कोर्ट वगैरे इमारती आहेत. त्या साऱ्याच आपापल्या परीने देखण्या आहेत. या इमारतींच्या समोर 'आजाद' मैदान आहे. त्याचाही आता पुष्कळच संकोच झाला आहे. या मैदानावर इंग्रजांच्या राजवटीत स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्देशाने टोलेजंग सभा भरत होत्या. सभा आजही भरतात, पण त्यांचे पूर्वीचे मोल हल्ली उतरले आहे. या मैदानाची लहानशी जागा वृत्तपत्राच्या व्यावसायिकांनी व्यापलेली आहे. इंग्रजी राज्याच्या सुरुवातीस येथे गाई-म्हशी चरत होत्या. जेथे तंबू उभारून त्यांमध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत अनेक युरोपियन राहावयाचे तेथे सांप्रत मुलांचे खेळ चाललेले असतात. खेळाचे हे एकच मैदान नाही. त्यालगतच व रस्त्यापलीकडे आणखी एक मैदान आहे. तेथेही पुष्कळदा क्रिकेटचे सामने चाललेले दिसतात. या मैदानाच्या धोबीतलावाकडील टोकाशी अग्निशामक दलाचे मधूनमधून शिक्षण चालते. तेथे एकच खिस्त्यांचा क्रॉस आहे.

या भागातील इमारती गव्हर्नर बार्टल फ्रीअरने पाडलेल्या कोटाच्या अर्ध्या भागातील आहेत. याच्यापुढे समांतर असलेला मेयो रोड हा सरकारी इमारतींनी गजबजलेला आहे. हार्नबी गव्हर्नराच्या नावाने बांधलेल्या सडकेच्या दोही बाजूंस युरोपियनांची भव्य कार्यालये अथवा दुकाने होती. हार्नबी रस्त्याला काहीशा समांतर असलेल्या मेयो रोडच्या एका तर्फेला विद्यापीठाच्या इमारती, उच्च न्यायालय (हायकोर्ट) वगैरे इमारती आहेत. हायकोर्टाची पहिली इमारत पुरेना म्हणून तिच्या मागल्या बाजूस दुसरी लहान कामचलाऊ इमारत स्वराज्याच्या प्रारंभी बांधण्यात आली आहे. सदर इमारतीसमोर सडकेपलीकडे एक लांबच लांब मैदान आहे. त्याला 'ओव्हल' हे नाव आहे. या मैदानाच्या टोकास चर्चगेटचे मोठे रेल्वे स्टेशन नवे बांधले आहे. हे बी० बी० सी० आय० (आता पश्चिम) रेल्वेचे मुंबईतले अंतिम स्टेशन आहे. बोरीबंदर हे जसे जी० आय० पी०चे मुंबईतले अंतिम स्टेशन तसेच चर्चगेट हे बी० बी० सी० आय०चे स्टेशन आहे. तेही आकाराने अवाढव्य आहे. पण याखेरीज त्यामध्ये दुसरा काहीच गुण नाही. बोरीबंदरच्या देखाव्याशी सामना करील असे बी० बी० सी० आय०चे 'सेंट्रल' हे स्टेशन आहे. हे शहर भागाला जवळ आहे. पूर्वी कुलाबा नावाचे एक स्टेशन चर्चगेटच्या पलीकडे होते. हा पश्चिम रेल्वेचा मुंबईतला शेवट होता. ते स्टेशन जाऊन त्याची जागा आता 'सेंट्रल'ने घेतली आहे. चर्चगेटवरून स्थानिक (लोकल) गाड्या सुटतात. दूर अंतराच्या गाड्यांच्या जाण्यायेण्याच्या व्यवस्थेचे 'सेंट्रल' स्टेशन होय.

मोठ्या प्रेक्षणीय इमारतींची नोंद करीत आपण बरेच मागे आलो. आता पुन्हा कोटाच्या भागात जाणे अवश्य आहे. चर्चगेट स्टेशनावरून पश्चिम रेल्वेच्या सेंट्रल स्टेशनवर आलो, तेव्हा परत चर्चगेटास गेल्याशिवाय कोटाच्या उरलेल्या भागातील इमारतींचा निर्देश करता येणार नाही. पूर्वी आपण हार्नबी रोडवरील इमारतींना विचारात घेतले. त्या इमारतींतील बहुतेक धिप्पाड आहेत हाच त्यांचा विशेष, पण त्यांत कलाविशिष्ट कारागिरी नाही, हेदेखील सांगितले. याप्रमाणे हार्नबी रस्ता आक्रमण करीत 'फ्लोरा फाउंटन' या कारंजापाशी पोचलो की नव्या दृश्यांना प्रारंभ होतो. 'फ्लोरा'ऐवजी 'फ्लोरल' असा मुळात शब्द असून सर्व-सामान्यांच्या भाषेत त्याचे 'फ्लोरा' हे रूप झालेले आहे. नेपोलियन बोनापार्ट की ज्याने जग जिंकण्याच्या ईर्ष्येने सारे युरोप एका काळी हादरून सोडले होते, त्या पराक्रमी वीराचा वाटर्लूच्या रणात पराभव केला, त्या ड्यूक ऑफ वेलिंग्टनचे स्मारक म्हणून हे कारंजे मुंबईच्या नागरिकांनी उभे केले आहे. ऑर्थर वेलस्ली या नावाने हिंदुस्थानात अठराव्या शतकाच्या शेवटी व एकोणिसाव्या शतकाच्या अगदी आरंभी वेलिंग्टन येथील कंपनी सरकारच्या लष्करात होता. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने १८०२ च्या अखेरीस इंग्रजाशी जो तह केला त्याविरुद्ध लढाईस निघालेल्या शिंदे व नागपूरकर भोसले या दोघांवर अटीतटीची लढाई करून त्याने विजय मिळविला

होता. १८०१ मध्ये त्याचे मुंबईत काही दिवस वास्तव्य होते. मराठ्यांच्या फौजेला जिंकल्यावर त्याला मुंबईच्या नागरिकांनी मानपत्र देण्याचा समारंभ केल्याचे इतिहास सांगतो. त्या काळी मुंबईचे जे नागरिक म्हटले ते सारे युरोपियन समजावे.

कारंज्याच्या डाव्या बाजूला एक मोठा रुंद रस्ता नगरभवनाकडे जातो. त्याच्या मध्यभागी एक लहानशी वाटोळ्या आकाराची बाग आहे. बागेत मार्किस ऑफ वेलस्ली व लॉर्ड कॉर्नवालीस या दोघांच्या दोन प्रतिमा आहेत. त्यांवर भाविक हिंदू फुले, माळा वाहत असत. या बागेला एल्फिन्स्टन सर्कल असे म्हणतात.

या मूर्तींपैकी गव्हर्नर-जनरल कार्नवालीस याच्या मूर्तीची सारीच बडण प्रशंसनीय कामगिरीची आहे, असे मूर्तिशिल्पज्ञांचे मत पाहावयास सापडते. हा पुतळा लोकांच्या पैशाने सन १८२२ साली उभा करण्यात आला. सुरवातीस यावर एक घुमटी होती. या पुतळ्याला विलायती देव या नावाने मुंबईतील मराठे लोक ओळखीत असत. या मूर्तीवर फुले टाकणे, तिच्यापुढे नारळ फोडणे, क्षणभर डोळे मिटून हात जोडून प्रार्थना करणे, इतकेच नव्हे तर या विलायती देवाला नवसही बोलण्यापर्यंत मुंबईतील हिंदू भाविकांची मजल जात होती. हे खूळ माजू नये म्हणून सरकारने बंदी केली तरी ते काही प्रमाणात चालूच राहिले होते. या बागेबाहेर पडून थोडे अंतर चालून गेल्यावर समोरची एक इमारत नेत्र वेधून घेते. या इमारतीच्या लांबच लांब पायऱ्यांची उतरंड प्रथम पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचे आकर्षण ठरते. नदीवरील घाटासारख्या या पायऱ्या आहेत. त्यावरील इमारत हाच मागे वर्णिलेला टाउन हॉल. महत्त्वाच्या सार्वजनिक सभा येथे भरण्याचा प्रघात आहे. हॉल म्हणजे दिवाणखाना हे सर्वांना माहीत आहे. या दिवाण-खान्याच्या सभांचाही लहानसा इतिहास होईल. पण त्याचे हे स्थळ नाही. सदर दिवाणखान्याला चिकटूनच डाव्या बाजूस जी तशीच इमारत आहे ती एशियाटिक सोसायटीच्या प्रचंड ग्रंथसंग्रहाची आहे. मॅकिंटाश नावाच्या न्यायाधीशाने लिटररी (वाङ्मयात्मक) सोसायटी (संस्था) स्थापन केल्याचे वृत्त मागे नमूद केले. एशि-याटिक सोसायटीचे ग्रंथसंग्रहालय हे त्या सोसायटीचेच रूपांतर आहे. त्याच्या तळघरात जुन्या वृत्तपत्रांच्या फायली ठेवलेल्या आहेत. ग्रंथसंग्रहाशी स्पर्धा करील असा संग्रह कदाचित विद्यापीठाचा म्हणता येईल. या इमारतीच्या प्रवेशद्वाराशी मुंबईचे इंग्रजी राजवटीतील आद्य हिंदू पुढारी जगन्नाथ शंकरशेट यांचा एक प्रचंड पुतळा आहे.

नगरभवनाच्या (टाउन हॉलच्या) इमारतीमागे थोड्या अंतरावर एक टाकसाळ व इंग्रजी राज्याच्या प्रारंभकाळातील काळ्या पत्थराचा किल्ला अशी दोन बांधकामे प्रेक्षणीय आहेत. किल्ल्याबाहेरच्या मोकळ्या जागेत जुन्या तोफा, गोळ्यांच्या राशी वगैरे गोष्टी दिसतात. टाकसाळीची इमारत बाहेरून कितीही चांगली दिसली तरी तिच्या आतली यंत्रे व त्यांची कामे हीच मुद्दाम जाऊन पाहण्याजोगी आहेत.

नगरभवनाच्या जवळ रिझर्व बँकेची एक मोठी इमारत आहे व तिचा निर्देश अवश्य आहे.

आता आपण मागे फिरून चर्चगेट रेल्वे स्टेशनवर जाऊ व तेथून क्वीन्स रोडने चौपाटीपर्यंत काय दिसते ते नजरेखाली घालू. या रस्त्यावर उजव्या बाजूला पश्चिम (बी० बी० सी० आय०) रेल्वेच्या कारभाराची मुख्य कचेरी आहे व तिची इमारत, कलाकौशल्य विशेष दिसले नाही तरी, नेत्रवेधक आहे. या इमारतीला बाहेर पटांगण आहे. चर्चगेट स्टेशनचे थोडेसे वर्णन मागे केले आहे. तेथून उपनगरांतल्या गाड्या जातात-येतात. दूर अंतरावरील गाड्यांचे जाण्यायेण्याचे ठिकाण 'मुंबई सेंट्रल' हे होय. याचा निर्देश मागे आला आहे. चर्चगेट स्टेशनबाहेर उतारूंकरिता लहान भुयारी रस्ता आहे. येथून वॅकवे-चौपाटीची वाटचाल आरंभण्यापूर्वी थोडे मागे जाऊन पाहण्यासारख्या काही इमारती आहेत. त्यांतली एक जेथून महाराष्ट्राचा कारभार चालतो त्या 'मंत्रालया'ची अवाढव्य इमारत असून दुसरी 'ब्रेबून स्टेडियम'—क्रिकेट खेळण्याच्या मैदानाची आहे. मात्र हे मैदान उघडे नाही, त्याच्या सभोवती भिंत आहे आणि तिच्यावरच वैठकीच्या वाकांची उतरंड आहे. या मैदानावर बरीच वर्षे क्रिकेटचे सामने होत असत. अलीकडे काही वर्षे या मैदानाचे खेळासंबंधात नावही ऐकू येत नाही. ब्रेबून मैदानाऐवजी 'वानखेडे' या नावाने दुसरे क्रीडांगण उदयास आले आहे व त्यावर क्रिकेटचे सामने होत असतात. सांप्रत हे सामने प्रेक्षकांच्या उच्छृंखलपणाने उधळले जातात. यामुळे यापुढे परदेशांतून क्रिकेटपटूंचे संघ आपले कौशल्य दाखविण्यास इकडे येण्याला धजतील किंवा नाही याविषयी वानवा उत्पन्न होणे स्वाभाविक आहे.

'मंत्रालय' हे राज्यकारभाराच्या इमारतीला नव्याने देण्यात आलेले नाव आहे. ते बांधले तेव्हा 'सचिवालय' म्हणजे 'सेक्रेटरिएट' हीच कल्पना होती. इंग्रजांच्या काळात 'सेक्रेटरिएट' होते. तेथे राज्याच्या वेगवेगळ्या खात्यांचे सर्वोच्च अधिकारी बसून राज्याची सूत्रे हालवीत. त्या वेळी आज ज्यांना मंत्री म्हणतात, त्यांना 'मेंबर' या शब्दाने ओळखीत. ज्याला आज आपण 'गृहमंत्री' हा शब्द योजू त्यालाच इंग्रजांचा 'होममेंबर' हा शब्द होता. मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर सर्व मंत्री बसतात. आणि त्यांचे सचिव व त्यांची कामे तळमजल्यापासून पाचव्या मजल्यापर्यंत पसरलेली आहेत. तळमजल्याच्या एका अंगाला ग्रंथसंग्रहालय आहे. सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्र्यांच्या खोलीत सदैव गारवा राहील अशी व्यवस्था आहे. तशी व्यवस्था सर्व मंत्र्यांच्या बैठकीच्या जागी आढळत नाही. मंत्रालयाच्या समोर रस्त्यापलीकडे ज्या झोपडीवजा इमारतींची ओळ आहे, त्यांत काही मंत्री व उपमंत्री वगैरे मंडळी राहतात. त्यांच्या शेजारी खेळण्याची सोय केलेली आहे. शिवाय, मंत्रालयासमोरच्या रस्त्याच्या टोकाला 'सारंग' बिल्डिंग या नावाची एक भव्य इमारत नव्याने बांधलेली असून त्यात मंत्री, उपमंत्री, लोकआयुक्त वगैरे मंडळी राहतात. सारांश, सर्व प्रकारे

मंत्रालयाचा परिसर शक्य तेवढा संपन्न आहे. येथे समुद्राचे जे टोक आहे, त्याला स्वराज्यसाधनेच्या चळवळीत प्रसिद्धी पावलेल्या 'नरीमन' नावाच्या पारशी देशभक्ताला अनुलक्षून 'नरीमन पॉइंट' असे नाव देण्यात आले आहे. 'आकाशवाणी'-ची (रेडियोची) इमारत याच भागात असून थोड्या अंतरावर 'आमदारनिवास' आहे. नावावरून त्याचे प्रयोजन लक्षात येईल. आज मंत्र्यांतले पुष्कळ जण मलबार टेकडीवरच राहतात.

आपण चर्चगेट स्टेशनाच्या मागील इमारतींचा आढावा घेतला. यानंतर सुरवातीस सुचविल्याप्रमाणे क्वीन्स रोडवरून बॅकबे (चौपाटी) पर्यंत सहल करू. या रस्त्यावर भारतीय शासनाच्या काही कार्यालयांचे वाडे आहेत. त्यांतल्याच एका जागी रेडियोचा कारभार पुष्कळ वर्षे चालू होता. आता आकाशवाणी आपल्या मालकीच्या ठिकाणी आहे. क्वीन्स रोड (आता त्याचे नाव नारायण महादेव परमानंद रोड असे आहे. ज्यांचे नाव या रस्त्याला दिले ते गृहस्थ प्रार्थनासमाजाचे सभासद होते.) अकाउंटंट जनरल (हिशेबी खात्याचे वरिष्ठ), इन्कम टॅक्स (उत्पन्नावरील कर) अशा खात्यांची कार्यालये या रस्त्याची शोभा होत. असेच पुढे गेले म्हणजे एक लहान बाग लागते. ती खिस्ती लोकांच्या दफनभूमीत बांधलेली असून तिला 'स० का० पाटील उद्यान' असे नाव आहे. हे पाटील काँग्रेसच्या चळवळीत नावारूपास चढले होते. बागेत संध्याकाळी मुलामाणसांची गर्दी असते. असेच पुढे गेले म्हणजे आपण चौपाटीवर पोचतो.

येथे समुद्राचे पाणी अर्धचंद्राकार भूभागावर पसरलेले आहे. त्याचा विस्तार चौपाटी–मलबार टेकडीपासून कुलाब्यापर्यंत आहे. टेकडीवरून याचे दृश्य मनोहर वाटते. चौपाटीवर वाळवंटात सकाळी कमी पण संध्याकाळी मात्र हवा खाणाऱ्यांची तुफान गर्दी असते. तेथे खाद्यपेयांच्याही व्यापाराची धामधूम चालते. गिरगावाच्या निरनिराळ्या भागांतली एकमेकांच्या ओळखीची माणसे गटागटाने एकत्र बसलेली असतात. अलीकडे वाळूत अनेक झाडे उगवलेली आढळतात, त्यांचा गारवाही अनायासे मिळतो. शिवाय लगतच्या रस्त्यावर एक नवीन पादचारी पूल बांधला असून त्याला सरकता जिनाही दोन्ही बाजूंस आहे. सरकता याचा अर्थ माणसाने पहिल्या पायरीवर उभे राहावयाचे व तो आपोआप वरती आणि दुसऱ्या बाजूस खाली जातो. त्यासाठी पायऱ्या चढण्या-उतरण्याची तसदी घ्यावयास नको. चौपाटीवर कुस्ती, हुतूतू वगैरे खेळही चालतात. चौपाटीला लागूनच एक बाग असून तिच्या लगत सरकारी छापखाना आहे. पलीकडे म० गांधींची एक स्मारक इमारत आहे. तेथे म० गांधींविषयक देशोदेशीच्या भाषेतील वाङ्मयाचा संग्रह आहे. त्याशेजारी सरकारी छापखान्याला लागूनच चर्नी रोडचे रेल्वे स्टेशन असून त्यातून समुद्रावर जाता यावे म्हणून एक दार आहे.

चौपाटीवर शेठ मनसुखलाल मफतलाल यांच्या नावाने मुलांच्या खेळांची सोय केली असून त्यातच पोहण्यासाठी एक जलसंचय आहे. त्याचा फायदा घेण्यासाठी दिवसभर पोहणारांची जा-ये चालू असते.

चौपाटीवरील समुद्रकाठच्या इमारतींची थोडी अधिक बारकाईने चौकशी करू लागल्यास पुढील कामे तेथे चालू असल्याचे निदर्शनास येईल. राडिओ फ्लोटीला क्लब येथे पोहणे, कनोइंग, मोटार बोटिंग वगैरे खेळांची सोय आहे. महात्मा गांधी स्मारक इमारतीचा उल्लेख मागे केलाच आहे. तिच्या तळमजल्यात देशोदेशीच्या भिन्न भाषांतील ग्रंथांचा संग्रह असल्याचेही वाचकांच्या डोळ्यावर घातले आहे. पण इतर मजले रिकामे नाहीत. दुसऱ्या मजल्यावर आयुर्वेदाच्या औषधोपचाराचे रुग्णालय असून त्याच मजल्यावर आयकराचा (इनकम टॅक्सचा) एक विभाग आहे. त्याखालच्या मजल्यावर पुनर्वसु आयुर्वेद विद्यालय असून तिसरा मजला आयुर्वेद प्रचार संस्थेने व्यापलेला आहे. आयुर्वेदाच्या कार्याला 'श्रीमती कमलादेवी गौरीदत्त मित्तल' हे नाव आहे.

'कैवल्य धाम' ही संस्था नेहमीच्या व्यवहाराबाहेरचे योगसाधनाचे शास्त्र शिकविणारी व शिक्षण देणारी संस्था असल्यामुळे तिचा निराळा स्वतंत्र उल्लेख करणे अवश्य वाटले. या संस्थेचे स्पष्टीकरणात्मक नाव 'ईश्वरदास चुनीलाल योगिक हेल्थ सेंटर' असे आहे.

आणखी एक अशीच संस्था माशांच्या प्रदर्शनाची आहे. तिला आक्वारियम हे इंग्रजी नाव आहे. येथे समुद्रातील विविध माशांचा संग्रह आहे. तारापोर नावाच्या पारशी गृहस्थाने त्याला जन्म दिला, यासाठी त्याचे नाव या मत्स्यालयास जोडलेले आहे. हे प्रदर्शन चौपाटीलगत नसून काहीशा अंतरावर आहे.

महादेवाची प्रदक्षिणा देवळाभोवती एक संपूर्ण फेरी मारल्याने होत नाही. पहिली फेरी अर्धी झाली की मागे फिरावयाचे व पुन्हा प्रदक्षिणेला आरंभ करून ती मात्र पूर्ण करावयाची, म्हणजे देवापासून निघून देवापाशी यावयाचे, असा महादेवाच्या प्रदक्षिणेचा एक नियम आहे. तसाच काहीसा प्रकार नगरपर्यटनातही घडतो. शंकराच्या देवळाची मर्यादा निश्चित असते व ती नगराच्या विस्ताराच्या मानाने अगदी क्षुद्र—खिसगणतीतही धरता येणार नाही इतकी क्षुद्र—असते, पण ती कितीही लहान असली तरी तिला समाज प्रेक्षणीय या नात्याने अग्रस्थान देतो. मग तो हिंदू असो वा मुसलमान, ख्रिस्ती, पारशी वगैरेपैकी कोणत्याही जातीचा अगर धर्माचा असो. आपल्या पर्यटनात प्रथम आपण देवस्थानांची हजेरी घेतली. अजून मुसलमान, पारशी ख्रिस्ती अथवा इस्त्रायल यांच्या पूज्य स्थळांची दखल घेतलेली नाही. उदाहरणार्थ, आपण महालक्ष्मीच्या देवळाची थोडी चर्चा केली, पण त्या देवळाशेजारीच असलेल्या मुसलमानांच्या दरग्याकडे पाहिलेसुद्धा नाही. ही प्रस्तावना बॅकबे चौपाटीवरून मागे फिरावयाचे आहे व पर्यटनाच्या पहिल्या फेरीत विचारात न घेतलेल्या कित्येक इमारती आता नजरेखाली घालावयाच्या आहेत यासाठी आहे.

स्वराज्यपूर्वकाळी ज्या संस्थेला कायदेमंडळ म्हणत तीच आता विधानसभा या नावाने ओळखली जाते. या सभेला स्वतःची इमारत नसल्याने इंग्रजी राज्यातील

खलाशी वाड्यात त्या सभेचे काम स्वराज्यात सालोसाल आजवर चालत आले आहे. खलाशीवाडा म्हणजे इंग्रजी 'सेलर्स होम'. इंग्लंडची आगवोट मुंबईस पोचली की तिच्यावरील खलाशी जमिनीवर उतरून शहरात फिरत व दंगामस्ती करीत. पुष्कळदा वायकांवरही धावून जात. हा उपद्रव थांबण्यासाठी व त्यांना एकाच ठिकाणी व्यवस्थितपणे राहता यावे म्हणून खलाशीवाडा बांधण्यात आला. मात्र हा पहिलाच समजू नये. असे वाडे बांधण्याचे दोनतीन प्रयोग झाल्याची नोंद मुंबईच्या इतिहासात दृष्टीस पडते. हा वाडा भव्य आणि विशाल असून त्याच्या बांधणीत कलाकुसरही आहे.

या इमारतीच्या समोर थोड्या अंतरावर 'प्रिन्स ऑफ वेल्स' म्युझियमची अशीच कलेने नटविलेली इमारत आहे. या म्युझियमचा—वस्तुसंग्रहालयाचा—उद्देश ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. तेथे जाऊन थोडा वेळ तरी तो अवश्य पाहावा. मुंबईस येणाराने हे कर्तव्य चुकवू नये अशी त्याची योग्यता निःसंशय आहे. येथून नगर भवनाच्या दिशेने आणखी थोडी वाटचाल केल्यास वऱ्याच मोठाल्या इमारती बँकांच्या असून नगरभवनालगत जुनी इमारत कस्टम हाउसची आहे. आज तेथे नावाप्रमाणे जकातवसुलीचे काम चालत नाही. त्या इमारतीत बहुजिनसी कामे चालत असतात.

आपण चर्चगेट स्टेशनवरून क्वीन्स रोडने चौपाटीवर जाताना एका महत्त्वाच्या इमारतीकडे पाहिले नाही, कारण ती बोळात आहे. या इमारतीला बांधकामाच्या दृष्टीने विशेष महत्त्व नसले तरी ती इमारत ज्या कामासाठी अवतरली तिचे मुंबईच्या अर्वाचीन इतिहासात अतिशय महत्त्व आहे. त्या कामात गुजराती व महाराष्ट्रीय समाजांचा जसा मिलाफ आहे, तशी उद्देशाच्या अंगाने दोन्ही समाजांची एकवाक्यता आहे. 'श्री नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' या नावाच्या एक अपूर्व संस्थेच्या कार्याची ही इमारत आहे. येथे विद्यापीठाचे महाविद्यालय असून शिवाय सदर विद्यापीठाचे कामकाज येथेच केले जाते. कै० विठ्ठलदास ठाकरसी या नावाचे एक धनिक उद्योगपती (१८७३–१९२२) मुंबईत होऊन गेले. स्त्रियांच्या उन्नतीला उपयोगी पडणाऱ्या अनेक संस्थांना मदत करता करता, त्या ध्येयाला एकरकमी पंधरा लाख रुपयांची देणगी देऊन त्यांनी त्याला अखिल भारतीय मूर्तरूप दिले. १९१८ हे जवळजवळ सबंध वर्ष विठ्ठलदासभाईंनी जगाच्या प्रवासात घालविले. स्त्रियांचे विद्यापीठ जपानात त्यांनी पाहिले, त्याचा सर्व कार्यक्रमही विठ्ठलदासांनी विचारपूर्वक बारकाईने नजरेखाली घातला व त्यातला जो अंश हिंदी स्त्रीजीवनाच्या दृष्टीने अपरिहार्य ठरेल तो जमेस घेऊन आपल्या विद्यापीठाची उभारणी केली. सर्व शिक्षण विद्यार्थिनीच्या गुजराथी/मराठी या जन्मभाषेतच झाले पाहिजे, हा मूळ सिद्धांत मात्र कायम ठेवला. महाराष्ट्रातील स्त्रियांच्या हितासाठी सर्वस्व वाहून ज्यांनी आमरण तपश्चर्या चालविली होती ते दीर्घायुषी धोंडो केशव कर्वे यांची पुण्याई आणि ठाकरसींचे स्त्री-उद्धाराच्या तळमळीचे लोकोत्तर औदार्य यांचे

'नार्थीबाई ठाकरसी विद्यापीठ' हे फळ आहे. ते दिवसानुदिवस अधिकाधिक कार्यक्षमतापूर्वक चिरायू होवो, असे कोणीही चिंतील.

येथून मागे वळून 'राणीचा बाग' या नावाने प्रसिद्ध असलेले एक रम्य स्थळ पाहावयाचे आहे. हे गिरगाव टापूबाहेर बरेच लांब आहे. पण तिकडे जाताना मार्गात जे काही डोळ्यांना चमत्कारिक वाटेल त्याचीही थोडी विचारपूस करणे भाग आहे. त्याप्रमाणे प्रथम क्वीन्स रोडवर एक तटबंदीसारखी बरीच लांब व उंच दगडी भिंत दिसते. क्वीन्स रोडसारख्या रहदारीच्या रस्त्यावर या भिंतीची जरूर काय, हा प्रश्न नव्या प्रेक्षकाच्या मनात उद्भवणे स्वाभाविक आहे. त्या भिंतीआड हिंदुसमाजाचे स्मशान असून तेथे हिंदूंची प्रेते जाळताना दिसणारा देखावा व त्यातून बाहेर पडणारा दुर्गंध यांचा त्रास क्वीन्स रोडवरील रहदारीला होऊ नये, याकरिता ही भिंत १८४७ साली प्रथम व ती मोडल्यामुळे १८७२ साली दुसऱ्यांदा उभारण्यात आली. हल्ली उभी असलेली भिंत १८७२ ची आहे. पहिली भिंत बांधण्याच्या कामी तत्कालीन हिंदूंचे पुढारी जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट यांनी यशस्वी प्रयत्न केला होता. इंग्रजांनी सोनापूरचे स्मशान बंद करून वरळीस न्यावे असा उपाय सुचविला होता. पण भिंत बांधून मुख्य तक्रारीचे बूडच नाहीसे केल्यामुळे हिंदूंवर येऊ पाहणारी आपत्ती टळली व नाना शंकरशेटजींच्या कीर्तीत भर पडली. 'हिंदू स्मशाना'च्या इतिहासात त्या काळी धनिक हिंदू घराच्या बागेत आपल्या लहान मृत मुलांना पुरून टाकीत व मेलेली जनावरेसुद्धा सोनापूरच्या स्मशानात वेलाशक गाडीत, ही विस्मयकारक वस्तुस्थिती दृष्टीस पडते. रस्त्याच्या कडेला दृष्टीस पडणाऱ्या भिंतीच्या चमत्काराचे निरसन झाले. भिंतीआड चालणाऱ्या दहनाची तरतूद तेथेच आहे. जाळणाला लागणाऱ्या लाकडांची वखार, चिता रचणारी माणसे, वगैरे सरंजाम तेथे आयता मिळतो. प्रेताबरोबरच्या माणसांना बसण्यासाठी छाया आणि बाकांची सोय आहे. प्रेत संपूर्ण जळत आले की त्यावर पाण्याचा झोत सोडून ते विझवितात व त्यातूनच मृताच्या अस्थी गोळा केल्या जातात. और्ध्वदेहिक विधीसाठी जवळच एक धर्मशाळा आहे. भटजी काय तो ज्याचा त्याने ठरवून बोलवावा. दहनभूमीतील लाकडे वगैरे सामान ठरल्या दराने विकत घ्यावे लागते. हिंदूंच्या स्मशानभूमीच्या जवळच मुसलमानांचे दफनस्थान आहे. येथेच पूर्वी ख्रिस्त्यांचे स्मशान होते. त्याच स्मशानाला आज पाटील उद्यानाचे रूप आले आहे. वरील स्मशानाच्या मागे चंदनवाडीला लागून विजेने प्रेते दहन करण्यासाठी महापालिकेने अलीकडे 'इलेक्ट्रिक क्रीमटोरियम' बांधले असून तेथे अनेक उपयुक्त सोयी केलेल्या आहेत. शिवाय येथे प्रेतदहनालासुद्धा फारच कमी वेळ लागतो.

राणीच्या बागेशी पोचण्यापूर्वी आपण 'पांजरापोळ' नावाच्या ठिकाणावर दृष्टिक्षेप करून पुढे गेल्यास बरे. पांजरापोळ या शब्दाचा स्थूलार्थ म्हाताऱ्या, अशक्त, रोगी पशुपक्ष्यांचे आश्रयस्थान. याची स्थापना मोतीचंद अमीचंद नावाच्या धनसंपन्न जैन

व्यापाऱ्याने १८३४ साली केली. ज्यांना पूर्वोक्त लक्षणाची गुरे-पाखरे नकोशी झाली असतील, त्यांनी ती वाऱ्यावर सोडण्या किंवा कसायास विकण्याऐवजी या जागी आणून सोडावी. म्हणजे तेथे त्यांची दाणापाण्याची व्यवस्था ठेवून ती सुरक्षित जगविण्याकडे लक्ष दिले जाते. पुष्कळदा येथे कसाईखान्यातून सोडविलेली जनावरेही आणून सोडण्याचा प्रघात आहे. येथील जनावर कुणाला खरेदी करावयाचे असल्यास खरेदी करणाराने आपण हे जनावर दुसऱ्या कुणाला विकणार नाही अशी लेखी हमी पांजरापोळाच्या व्यवस्थापकांना द्यावी लागते. येथे गुरेपाखरे कोणती व किती ठेवायची याविषयी प्रपंच नाही. मात्र गुरांच्या जातीप्रमाणे त्यांना ठेवण्याच्या जागा वेगवेगळ्या आहेत. हिंदूतील जीवदयेचे हे प्रात्यक्षिक समजण्यास हरकत नाही. ज्याची ही मूळ कल्पना व स्थापना, त्याने आपल्या हयातीत या ठिकाणचा खर्च चालण्यासाठी द्रव्य पुष्कळ ठेवले असले तरी त्याला पुरवठा होत असल्याखेरीज भागणार नाही, हे जाणून मुंबईतील व्यापारीवर्ग मधूनमधून देणगीच्या रूपाने पांजरापोळाच्या कारभाराला मदत करीत असतो. त्यामुळे त्याला पैशाची कधी कमी पडत नाही. येथे प्रायः घरगुती पशुपक्ष्यांचा भरणा मोठा आहे. रानांतली हिंस्र किंवा वनस्पतीवर जगणारी धडधाकट जनावरे-पाखरे पाहावयाची असतील तर मात्र राणीच्या बागेतच हिंडले पाहिजे.

या शहरी हा बाग निर्माण करण्याची कल्पना येथील वजनदार व लोकप्रिय नागरिकांमध्ये इ० स० १८५८ साली उद्भवली, व त्यांनी सभेच्या रूपाने एकत्र येऊन संघशक्तीची जोड दिली. या कल्पनेचे मूळ १८५७ साली उसळलेल्या शिपाईगर्दीचा मोड, ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची इतिश्री व व्हिक्टोरिया राणीच्या राज्याचा प्रारंभ या स्थितीत होते. कंपनीचे राज्य जाणे व राणीचे राज्य सुरू होणे, हा सर्व प्रकार सांगण्यापुरताच क्रांतीचा होता. प्रत्यक्ष असा सामान्य जनतेला काहीच अनुभव आला नव्हता. शिपायांच्या गर्दीने देशात माजलेली अस्वस्थता संपल्याचे समाधान हा मात्र लोकांचा खरा लाभ्यांश होता. खरे पाहिल्यास मुंबईच्या नागरिकांना शिपाईगर्दीचा लहानमोठा तडाखा अजिबात बसला नव्हता. तसा तडाखा बसण्याचा संभवसुद्धा तेव्हाच्या पोलिसप्रमुखाच्या अखंड सावधानपणामुळे बीजावस्थेतच ठेचला गेला. त्या संभवाची ओळख बंडाच्या दोघा आरोपी शिपायांना आझाद मैदानावर हजारो लोकांदेखत तोफेच्या तोंडी दिले तेव्हा काय झाली असेल तेवढीच.

इंग्लंडच्या राणीबद्दल निष्ठा दाखविणे झाली तर तिच्या पतीला विसरून कसे चालेल, यासाठी तिच्या पतीचे नाव जोडण्यात आले. त्याचे नाव 'अलबर्ट'. बाग व पदार्थसंग्रह अशी जोडकामे असल्याने तसाच प्रश्न निघाला असता तर त्या कामाच्या विभागणीला अडचण नव्हती. वर ज्या सभेचा उल्लेख केला आहे, ती सभा नगरभवनात १८१८ च्या डिसेंबरात १५ तारखेला भरून सभेच्या उद्देशाविषयी चर्चा झाली. सभेचे अध्यक्ष ना० जगन्नाथ शंकरशेट होते. डॉक्टर वर्डवुड (हे एक हिंदी प्रजेचे

कैवारी गृहस्थ होते) व डॉक्टर भाऊ दाजी लाड हे दोघे कार्यवाह नेमले जाऊन कामाचे सूतोवाच झाले. कामाला पैसा पाहिजे म्हणून नाना शंकरशेटजींनी आपली वर्गणी पाच हजार रुपये जाहीर करताच सभेतच सुमारे लाखाचे आकडे पडले. सरकारकडून एक लाखाची रक्कम मिळाली. याप्रमाणे द्रव्याची चिंता गेली व प्रत्यक्ष कामाला १८६२ च्या नोव्हेंबरात मुंबईच्या गव्हर्नराने पदार्थसंग्रहाच्या इमारतीच्या पायाचा दगड बसवून एकप्रकारे सुरुवात केली. त्या वेळी झालेल्या समारंभाची माहिती 'मुंबईचे वर्णन' या पुस्तकात गो० ना० माडगावकरांनी पुढीलप्रमाणे दिली आहे :

"इमारत तयार होत आहे तीसमोर विजयध्वज उभारून अरास केली होती आणि शिंदीच्या ओल्या झावळ्यांचा शुभसूचक असा मोठा सुशोभित दरवाजा केला होता. त्यातून लोक आत जात. आत सुमारे हजार दीड हजार खुर्च्या मांडून त्या उघड्या स्थळात जितकी शोभा आणवेल तितकी आणली होती. पाच वाजल्यावर गव्हर्नर व त्यांची पत्नी ही दोघेजण येऊन त्या स्थळी दाखल झाली. त्यासाठी निराळीच दोन सुंदर मखमल बशिवलेली आसने तयार केली होती. नंतर नामदार जगन्नाथ शंकरशेट, ह्या मंडळीचे अध्यक्ष, यांनी सुंदर भाषण केले व ते संपल्यावर गव्हर्नर साहेबांनी त्याला उत्तर दिले व एतद्देशीय गृहस्थांच्या ह्या स्तुत्य निष्ठेविषयी मोठी स्तुती केली. मग सर्व मंडळी जाऊन जो विधी करावयाचा तो केला. या प्रसंगी येथे लोकांचा समाज फारच जमला होता व स्टुडंट्स लिटररी आणि सायंटिफिक सोसायटीच्या शाळेतील सर्व मुलींस शृंगारून एथे नेल्या होत्या. हा समारंभ पाहावयास वडे लोकांपैकी निमंत्रित शेटसावकार मिळून एक हजार गृहस्थ होते. याशिवाय साधारण प्रतीचे अनामंत्रित हजार दोन हजारावर जमले होते. गाड्या व रथांची तर बेसुमार गर्दी होऊन गेली होती. गृहस्थ मंडळींची मने रंजविण्यासाठी क्षणोक्षणी इंग्रजी बाजा सुंदर स्वरांवर वाजवीत. ह्याच दिवशी लेडी फ्रियर, गव्हर्नर साहेबांच्या पत्नी, इजकडून व्हिक्टोरिया गार्डन याचा मुहूर्त करविला. शिवरीस ॲग्रिहाटिकल्चरल सोसायटीचा सरकारी बाग होता तोही यासच मिळविला आहे. त्याखाली जो दगड ह्या इमारतीच्या मुख्य दरवाज्यात गव्हर्नर-साहेबांच्या हस्ते बसविला आहे, त्याखाली एक मजबूत तांब्याची पेटी घातली आहे. तीत त्या दिवसाच्या प्रत्येक वर्तमानपत्राची प्रत, मुंबईतील चालू नाणे, हे संग्रहालय उपस्थित करण्याचा बेत झाला होता त्यासंबंधी सर्व कागदपत्रे व ज्यांनी यास मदत दिली त्यांची नावे लिहून घातली आहेत." [पाने २६९–७०]

ही बाग तिची रचना पूर्ण होऊन लोकांना पाहण्यासाठी १८७२ मध्ये मोकळी झाली. बागेचे प्रवेशद्वार तीन कमानींचे असून त्यावरील घड्याळ ससूनच्या देणगीचे आहे. अल्बर्ट पदार्थसंग्रहालयामध्ये मुंबईच्या भौगोलिक रचनेची आणि विकासाची चित्रे त्याचप्रमाणे विविध स्वरूपाची धान्ये ठेवलेली आहेत. त्याशेजारच्या विस्तीर्ण

बागेत देशोदेशीची पाखरे व जनावरे आहेत. बागेचे क्षेत्रफळ ४८ एकरांचे आहे, हे लक्षात ठेवल्यास तिच्या विस्ताराची कल्पना येईल. हे पशुपक्षी पिंजऱ्यातून ठेवलेले आहेत. प्रत्येक पशूला त्याच्या नैसर्गिक वातावरणात असल्यासारखे वाटावे याकरिता पिंजऱ्यातच डोंगराचे आडवेतिडवे चढउतार, गुहा वगैरे कृत्रिम देखावे केलेले आहेत. अर्थात या पिंजऱ्यांचा विस्तारही तसाच मोठा आहे. या बागेने मुंबईकरांच्या मनोरंजनाची फार चांगली सोय झाली आहे यात संशय नाही. स्वराज्यात त्या बागेला 'श्रीजिजामाता भोसले उद्यान' असे नाव देण्यात आले आहे.

गिरगाव व कोट विभाग दूर सोडून आपण एवीतेवी लांब आलोच आहो, तेव्हा आणखी थोड्या अंतरावर पुढे सरकून आपण दादर बंबखान्यामागे कोहिनूर गिरणीशेजारी महाराष्ट्रीयांना विशेष अभिमानाच्या असलेल्या एका संस्थेचे दर्शन घेणे अवश्य आहे. ही संस्था म्हणजे 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' ही होय. या संस्थेचा जन्म १८९८ साली नारळी पौर्णिमेच्या मुहूर्तावर झाला. हिच्या स्थापनेमागे आणि उत्कर्षामागे स्वभाषाभक्त, ध्येयनिष्ठ, अकरा जणांच्या निःस्वार्थ श्रमाचे पुण्य आहे. असे निव्वळ मराठी भाषेतील पुस्तकांचे संग्रहालय ठाण्याचे ख्यातनाम इतिहास-संशोधक विनायक लक्ष्मण भावे यांनी १८९३ साली ठाण्यास स्थापन करून महाराष्ट्र साक्षर जनतेला एक भाषासेवेची नवी दिशा दाखविली. त्या दिशेने मुंबईने पहिले पाऊल टाकले. ते पाऊल कसे धोक्याचे हे, त्या काळातील आजच्या मानाने कितीतरी मागासलेली स्थिती होती याचे भान राखल्यास, सहज लक्षात येईल. ठाण्याच्या संस्थेच्या पाठीशी पूर्वोक्त भावे हे एक सधन गृहस्थ होते, तर मुंबईतल्या संस्थेच्या कार्यकर्त्यांची एकजूट निरलस श्रमशीलता हेच एक मोठे खात्रीचे भांडवल होते.

संग्रहालयाचा प्रारंभ एका खासगी लहानशा खोलीत झाला. त्याचा चरितार्थ वर्गणी व मधूनमधून नाटकसर्कसवाल्यांकडून मिळणारी देणगी यांच्या आधारे काही काळ चालता चालता पहिली नजरेत भरण्यासारखी सहा हजार रुपयांची देणगी बडोद्याचे प्रगतिप्रिय महाराज कै० सयाजीराव गायकवाड यांनी दिली. तिच्यात संचिताची भर घालून संग्रहालयाची पहिली छोटीशी इमारत 'भाई जीवनजी गल्ली'च्या टोकावर उभी राहिली. तिच्यात संग्रहालयाचे काम कसेतरी दाटीवाटीने चालू असता स्वराज्याचे दिवस उगवले आणि त्याबरोबरच इतर अनेकांप्रमाणे ग्रंथसंग्रहालयाचे नशीबही उघडले. या काळात दुर्दम्य उत्साहाचे चिटणीस श्री० वा० वि० भट यांच्या अविश्रांत उद्योगामुळे दादर बंबखान्यामागे आताची इमारत अवतरली आहे. इमारतीबरोबरच संग्रहालयाच्या कारभारालाही अनेक शाखा फुटल्या आहेत. त्यांत मराठी संशोधन मंडळ व इतिहास संशोधन मंडळ यांचा निर्देश मुद्दाम करावयास पाहिजे. त्यांतले पहिले बरेच जुने असून दुसरे त्यामानाने बरेच अलीकडचे आहे. दोन्ही मंडळे आपापल्या उद्दिष्टानुसार यथाशक्ती कामे करीत आहेत. इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ग्रंथालयाचे काम चालते. दुसऱ्या मजल्यावर एक सभागृह असून त्यालाच जोडून मागल्या बाजूस





१. सर जे० जे० स्कूल ऑफ आर्ट : १८७९

२. एलफिन्स्टन कॉलेज : १८८८



१. एलफिन्स्टन हायस्कूल : १८७२

२. व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट : १८८७



२

१. कावसजी जहांगीर हॉल आणि
रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स : १९२०

२. हाफकिन इन्स्टिट्यूट : १८६९

१



२

१. टाउन हॉल : १९२१

२. सरदार हाउस, अपोलो बंदर

१. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम : १९२२

२. व्हिक्टोरिया आणि प्रिन्स अल्बर्ट म्युझियम : १८७२



१



२



१. जुने गव्हर्नमेंट हाऊस, परळ : १७२०–१८८३

२. आजचे राजभवन : १८८५

१. सेलर्स होम (सध्याची काउन्सिल हॉलची इमारत) : १८७६

२. जुने सचिवालय : १८६५



१. पोलीस कमिशनरांचे मुख्य कार्यालय : १९०१

२. चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचे कोर्ट : १८८९



१. मुंबईचे हायकोर्ट : १८७८

२. सार्वजनिक बांधकाम खात्याची इमारत (पी० डब्ल्यू० डी०) : १८७२





१. जनरल पोस्ट ऑफिस : १९११

२. सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस : १८७४

१. क्रॉफर्ड मार्केट

२. टाकसाळ





१. प्रार्थनासमाज : १८७४

२ नाना शंकरशेट यांचा वाडा, ठाकुरद्वार



१. सरदारगृह : १९११

२. मणी भवन

बॉम्बे ग्रीन : १८११



कॅपिटॉल सिनेमा : १८७९

रॉयल ऑपेरा हाउस



एक्सेलसियर थिएटर



१. डेव्हिड ससून लायब्ररी : १८७०

२. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, भाई जीवनजी लेन

ज्या खोल्या आहेत तेथे पूर्वोक्त मंडळाची कामे चालतात. संग्रहालयाच्या बाहेर एक नाट्यगृह आहे. तेथे नाटकांचे प्रयोग होत असतात. तेथे होणारी बाहेरची म्हणजे धंदेवाइकांची नाटके हे संग्रहालयाच्या उत्पन्नाचे एक कलम आहे, हे या संबंधात ध्यानी ठेवणे बरे. अलिकडे त्या नाट्यगृहाला सिनेमागृहाचे रूप आले आहे.

या इमारतीला मागे टाकून पुन्हा आपण गिरगावात फेरी मारल्यास तेथे केळेवाडीच्या (डॉ० भालेराव मार्ग) आत जी खिस्त्यांची एक शाळा आहे तिच्याच शेजारी 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाच्या संस्थेची एक पाच मजली इमारत आहे. सदर इमारतीचा तळमजला एका नाट्यगृहाने व्यापला आहे. त्याचे नाव 'भालेराव नाट्यगृह'. या संस्थेला जन्म देणारे अमृत नारायण भालेराव हे एक प्रचंड आत्मविश्वासाचे, अदम्य उत्साहाचे आणि नवनवोन्मेषशाली प्रतिभेचे, निरलस व कष्टमय कार्यक्षमतेचे पुरुष होते. त्यांचा जन्म १९०२ साली मुंबईत झाला. लोकोपयोगी कार्य करतेवेळी आणखी काही गुण लागतात. माणसांच्या स्वभावाची अचूक ओळख, कर्ती व निष्ठेची माणसे जोडण्याची हातोटी अर्थात योजकता हे ह्यांतले प्रमुख गुण होत. शालेय शिक्षणानंतर त्यांनी वैद्यकीचे शिक्षण घेऊन नंतर त्याचा व्यवसाय आरंभला व त्यातही यश संपादन केले. विद्यार्थिदशेत त्यांना क्रिकेटची विशेष आवड होती. त्यांना वाङ्मयाचेही प्रेम होते, त्याची साक्ष त्यांनी सुरू केलेल्या 'अरविंद' नावाच्या मासिकाची आहे. घरची आर्थिक स्थितीदेखील केवळ सुखवस्तूपेक्षा काहीशी वरच्या दर्जाची होती असे म्हटल्यास चालेल. प्रकृतीही तशीच निकोप व धष्टपुष्ट. प्रौढ वयात त्यांनी जे इष्टमित्र जोडले तेसुद्धा आपापल्या व्यवसायातले नामवंत पुरुष होते. डॉक्टरांचे घर म्हणजे आतिथ्याचे माहेर. त्यांच्या घरी लहानमोठ्या ख्यातीच्या मंडळीचा आखाडा पडलेला दिसायचा. १९३२ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय मुंबईहून पुण्यास गेल्यावर महाराष्ट्रातल्या राजधानी मुंबई शहरात मराठी भाषेला अधिष्ठान नाही याची खंत वाळगून डॉ० भालेरावांनी १९३५ साली 'मुंबई मराठी साहित्य संघ' ही संस्था अस्तित्वात आणली व तिच्या साफल्यार्थ आपले आयुष्य व कर्तृत्व पणास लावले. त्यांच्याकडे येणाऱ्या व पूर्वी आपल्या नाट्यगुणांनी रंगभूमी गाजविलेल्या नटांनी, महाराष्ट्रातल्या नटांना आज जगात कुठेही थारा नाही हे करुण गाऱ्हाणे भालेरावांपुढे गावे. भालेरावांना सारे वाङ्मय प्रिय असले तरी नाटक या विषयाची गोडी अधिक होती. यामुळे संघाच्या टोलेजंग इमारतीच्या पोटी त्यांनी रंगभूमीच्या उभारणीला अवकाश ठेवला व नटांच्या गाऱ्हाण्याची दाद घेतली. १९३५ पासून संघाच्या उत्कर्षासाठी पुढाकाराने अहोरात्र, अपरिमित परिश्रम घेऊन जे कार्य पार पडले त्याचा आढावा निवेदन करावयाचे म्हटले तरी लहानसा ग्रंथ होईल. दिल्लीस अखिल भारतीय नाट्यस्पर्धेत संघाने बसविलेल्या कै० कृ० प्र० खाडिलकरकृत 'भाऊबंदकी'च्या प्रयोगाला पहिले पारितोषिक मिळाले.

हा मजकूर व्यक्तिप्रशंसेसारखा वाटेल. पण व्यक्तीने बजावलेल्या कामगिरीचे हे स्तवन आहे, हे विचारवंताच्या गळी उतरेल. गिरगावातच 'दक्षिणी (महाराष्ट्रीय) ब्राह्मण सभा' या नावाच्या संस्थेची एक इमारत आहे. त्या संस्थेच्या विद्यमाने काही सांस्कृतिक कार्यही होत असते. उदाहरणार्थ, संस्कृत नाटकांचे (मूळ संस्कृत भाषेतूनच) प्रयोग, विद्यार्थ्यांना आर्थिक साह्य, वगैरे. एक वाचनालयसुद्धा चालविले जात आहे. या संस्थेचा गणेशोत्सव अतिशय व्यवस्थितपणाने चालतो. विवक्षित वयोमान व शालेय शिक्षणाची इयत्ता ठरवून तशा विद्यार्थी गटांकरवी गीतापाठाच्या स्पर्धा, हेदेखील संस्कृतिसंगोपनाचे कार्यच आहे. परंतु ज्यांना प्राधान्य आहे, ती कार्ये म्हणजे ब्राह्मणसमाजातील मंगलकार्ये होत. या संस्थेची इमारत दोन मजल्यांची असून तिचा दिवाणखाना बहुधा व्याख्याने किंवा मंगलकार्याकडे गुंतलेला असतो. 'ब्राह्मण भगिनी समाज' या नावाची स्त्रियांसाठी एक वेगळी शाखा आहे. शिवाय ब्राह्मण स्त्रियांसाठी एक प्रसूतिगृह आहे. ते स्थापन करण्याचे श्रेय परोपकारी डॉ० म्हसकरांचे आहे.

गिरगावातच कन्हैयालाल मुनशी या नावाच्या एका राजकारणी पण विद्याव्यासंगी गृहस्थाने 'भारतीय विद्या भवन' या नावाची एक मोठी इमारत उभी केली असून तिच्या कामाचा विस्तारदेखील मोठा आहे. संस्थेचा मुख्य उद्देश संस्कृत-प्राकृतादी प्राचीन भाषांचे संशोधन, संगोपन आणि मुद्रण असा त्रिविध असून त्याला नाट्यमंदिर, एक महाविद्यालय यांची जोड दिलेली आहे. भारतीय दृष्टीने लिहिलेल्या इतिहासाचे एकूण (त्याचे विभाग जमेस धरून) अकरा खंड प्रसिद्ध झाले असून त्यांतील निरनिराळी प्रकरणे वेगवेगळ्या तज्ज्ञ लेखकांकडून लिहवून घेतली आहेत. इंग्लंडच्या केंब्रिज विद्यापीठाने भारतीय इतिहास ज्याप्रमाणे सहा खंडांत लिहवून छापला, तसा हा भारतीय भवनाचा प्रयत्न आहे. या इतिहासात राष्ट्राच्या राजकीय घडामोडींबरोबरच संस्कृतीचाही विस्तृत परामर्श घेतलेला असल्याने तोच या इतिहासाचा विशेष गणला पाहिजे. इंग्रजांच्या कारकिर्दीत प्रसिद्ध झालेले भारतीय इतिहास पूर्वग्रहदूषित असतात अशी एक भावना अलिकडे पन्नास वर्षे तरी हिंदी सुविद्य समाजातदेखील बळावलेली आहे. यासाठी भारतीयांच्या दृष्टिकोनातून समग्र इतिहास लिहिला जावा ही कल्पना पूर्वोक्त भावनेचेच जुळे भावंड आहे. त्या कल्पनेस अनुसरून पूर्वी एकदोन भारतीय इतिहासपरिषदांकडून अर्धवट प्रयत्न झाले, पण द्रव्यबळाच्या अभावी ते वाया गेले. कन्हैयालाल मुन्शींनी त्या कल्पनेला संपूर्ण मूर्तरूप दिले हे प्रांजळपणे कबूल करणे व त्यासाठी कै० मुनशी यांना धन्यवाद देणे आवश्यक वाटते. पुण्यास जशी भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था आहे, त्याच नमुन्याची 'भारतीय विद्या भवन' ही एक पण द्रव्यदृष्ट्या अधिक संपन्न संस्था आहे.

प्रकरण सतरावे

टपाल, तारायंत्र

आपल्या सुखदुःखांची माहिती हितचिंतकांना वारंवार समजत जावी, तसेच त्यांच्या भल्याबुऱ्याचे ज्ञान आपणांस निरंतन होत राहावे, यासाठी जी योजना प्राचीन काळापासून अंमलात होती, तिलाच अर्वाचीन काळी टपाल, डाक, पोस्ट वगैरे शब्दांनी ओळखतात. पूर्वी टपालाची ने-आण करण्याकरिता जासूद, कासीद, हरकारा या नावाने माणसे पाठविली जात. टपालाची ने-आण करणाऱ्या माणसांना द्रव्य द्यावे लागे. पुण्याहून दिल्लीला पत्र पाठविले तर ज्या माणसामार्फत ते हाती पडेल त्या माणसाच्या पदरी त्याच्या कामगिरीदाखल मेहनताऱ्याची रक्कम टाकावी लागे व तशी सूचना त्याने आणलेल्या पत्रातच असे. ही माहिती पेशवाईतल्या काही पत्रांवरून दिलेली आहे. पण ही माहिती सरसकट तेव्हाच्या साऱ्या पत्रव्यवहाराला लागू होणार नाही. येथे पेशवाईतल्या पत्रव्यवहाराचा निर्देश त्या काळी टपालाची व्यवस्था होती याचा बोध होण्यासाठी केलेला आहे. पेशवाई अवघ्या तीनशे वर्षांमागील काळातील आहे. पेशवाईचे काहीसे समकालीन मोगलांचे साम्राज्य होते, पण त्यातदेखील टपालाची व्यवस्था होती. याप्रमाणे कितीही मागे गेलो तरी जेथे राज्य तेथे टपाल, असा एक अलिखित नियम सापडतो. उंट, सांडणी (उंटाची मादी), घोडा अथवा मनुष्य यांपैकी कोणतेही साधन असो. टपालाचा पाण्याशी प्रसंग असेल तर नौकांचा उपयोग भारतीय करीत होते. इंग्रज हा व्यापारी या नात्याने येथे येऊन त्याने हिंदुस्थानात अनेक जागी आपल्या वखारी स्थापिल्या होत्या. यामुळे त्याच्या व्यवहाराची खबर केंद्राला आणि त्या ठिकठिकाणच्या वखारवाल्यांना वारंवार पोचणे अवश्य होते. मुंबईच्या अनुरोधाने जे लिहिले तेच साऱ्या देशात पसरलेल्या इंग्रजांच्या बाबतीत खरे आहे.

इंग्रजांनी या देशात डाकेची सार्वजनिक व्यवस्था गव्हर्नर जनरल डलहौसीच्या कारकिर्दीत (१८४८-१८५६) सुरू केली. त्याप्रमाणेच इतर अनेक सुधारणांचा जनक तोच असल्यामुळे त्याला अर्वाचीन भारताचा निर्माता असे कित्येक ज्ञाते म्हणू लागले आहेत. त्याने आगगाडी व तारा देशात सुरू केल्या. आगगाडी व तार यांचे साहचर्य हल्ली आगगाडीच्या जोडीने दिसणारे तारांचे खांब सिद्ध करतात. हल्ली हे खांब

लोखंडाचे असतात, परंतु प्रथम तारायत्र चालू करताना ते खांब लाकडी होते. पण वाळवीच्या प्रभावामुळे तारांच्या खांबाला लाकूड हे सर्वथैव निरुपयोगी ठरले व त्याची जागा लोखंडाने कायमची घेतली. खांब व तारा यांच्या देखाव्याने विस्मित झालेल्या पाखरा-जनावरांपासून तारायंत्रावर प्रथम काही अनिष्ट परिणाम घडल्याचा वृत्तांत गव्हर्नर जनरल डलहौसीच्या चरित्रात पाहायला सापडतो, कारण त्याच्या कारकिर्दीत आगगाड्या व टपाल-तारांचा व्यवहार या देशात उदयास आला आणि मुंबईत पोस्टाच्या कामाला अधिकृतरीत्या प्रारंभ झाला. कोणतेही नवे काम सुरवातीस दिसण्याला क्षुद्र असावे यात नवल नाही.

तसे पाहिल्यास इंग्रजांचे पाय मुंबईस लागल्यापासून मुंबई बेटावर टपालाचे काम सुरू झाले असे म्हटल्यास फारसे चुकीचे ठरणार नाही. इंग्रजांचे राज्य आणि व्यापार यांची सूत्रे इंग्लंडात असल्यामुळे त्यांना टपालाची गरज देशातल्या प्रजाजनांपेक्षा अधिक होती. यामुळे देशातली टपालव्यवस्था देशातले दंगेधोपे थांबल्यावर एकोणिसाव्या शतकात त्याने सार्वजनिक रीत्या हाती घेतली. आगगाडी आणि तारायंत्र उदयास आल्यावर टपालाच्या व्यवस्थेची कार्यक्षमता झपाट्याने वाढत जाऊन त्या शतकाच्या शेवटास आजचे स्वरूप प्राप्त झाले. गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत टपाल-खात्याची स्वतंत्र इमारत नव्हती. टपालवाटपाचे काम निरक्षर हमालांमार्फत पार पडायचे. लोकांचे शिक्षण अगदी नावालाच झाले असल्याने लोकांचा आपसातील पत्रव्यवहारही अगदी वेताचाच असे. शिवाय पत्रे दुसऱ्याकडून लिहवून घ्यावी लागत, यामुळे ते काम करणारी माणसे पोस्टाच्या आवारातच गरजूला भेटत. अर्थात त्यांना पत्र लिहिण्याच्या कामगिरीबद्दल मेहनताना द्यावा लागे, हे सांगण्याची गरज नाही. लोकांची शिक्षणाने अक्षरओळख वाढली तरी सुवाच्य लिहिणारे कमीच असल्याने पत्रावरील पत्ता विनचूक समजण्याचा विश्वास बाळगणे पुष्कळदा धोक्याचे ठरे. पत्रे लिहिण्याची सामग्री इंग्रजांनीच तयार केलेली नसे. त्या काळात फ्रेंच बनावटीचा अतिशय पातळ कागद बाजारात असे. त्याच्या तुकड्यावर पत्र खरडले जायचे, त्याची घडी करण्याऐवजी सुरळी करावयाची व तिच्यावरील कोऱ्या जागी पत्ता लिहावयाचा. तो सापडण्यासाठी इतका तपशील असायचा की त्यामुळे तो दुर्बोध होऊन टपाल वाटणाऱ्याला संशोधन करण्याची पाळी यायची.

त्या दिवसांत हल्लीप्रमाणे टपालाच्या पेट्या रस्तोरस्ती थोड्या थोड्या अंतरावर नव्हत्याच, पण पोस्ट-कचेरीबाहेर तशी पेटीची सोय नसावी असे वाटते. कारण टपाल जातीने पाहून व पाठविणाऱ्याची नोंद केली जाऊन मग ते जिकडच्या तिकडे रवाना व्हायचे अशीही पद्धत असल्याचे क्वचित पाहता येते. त्या दिवसांत तिकिटे अस्तित्वात नव्हती. तिकिटाचा वापर १८५४ पासून सुरू झाला. त्यापूर्वी अंतर आणि वजन यांवर ठरविण्यात आलेली भाड्याची रक्कम रोकडीने टपालकचेरीत भरावी लागे व टपालावर पावतीवजा कागद चिकटविला की टपालाच्या प्रवासाला मोकळीक होत असे.

टपालापेक्षाही विजेच्या तारांचे काम अधिक अवघड होते. टपालास देशातील सर्व भाषांची मोकळीक होती. तारायंत्राला इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक असल्याने ती भाषा कामापुरती जाणणाऱ्या कामकऱ्यांचा तुटवडा भासावा हे क्रमप्राप्तच होते. परंतु शाळेच्या वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना हाती धरून तारायंत्राचे काम इंग्रजांनी चालू केले. तारेच्या मजकुराच्या शब्दांची संख्या ठरलेली होती. प्रत्येक शब्दाला द्रव्य मोजावे लागते, तथापि इंग्रजी भाषेच्या पुरेशा ज्ञानाच्या अभावी सुरवातीस पुष्कळच घोटाळे होत असल्याच्या कथा त्या संबंधाच्या वाङ्मयात दृष्टीस पडतात.

टपाल सुरू झाले तेव्हा टपालाचे काम पूर्णपणे विभागले गेले नव्हते. यामुळे टपालघर, टपालमास्तर, टपालवाटप, वगैरे व्यवस्था दृष्टीस पडत नसे म्हणून त्याचा कारभार कंत्राटाने चालत असे. म्हणजे आलेले टपाल एखाद्याने सरकारच्या परवानगीने आपल्या ताब्यात घ्यायचे व आपल्या भाडोत्री हस्तकांमार्फत त्याचे गावात वाटप करायचे. टपालाची याप्रमाणे जबाबदारी मुंबईत ज्याने स्वीकारली तो एक पारशी गृहस्थ होता आणि या कामगिरीमुळे त्याला पोस्टवाला याच नावाने लोक ओळखू लागले. पोस्टवाल्याकडे टपाल आले की प्रथम तो आपले टपाल पाहायचा व नंतर त्याची गावात वाटणी व्हायची. त्या दिवसांत टपाल-घाई (पोस्ट हेस्ट) हा शब्दच जणू अस्तित्वात नव्हता. १८५४ नंतर टपालाची नेआण आगगाडीने होऊ लागली. टपाल वाटण्यासाठी स्वतंत्र माणसे नेमण्याचा शिरस्ता अंमलात आला.

टपालाची व्यवस्था सुरक्षित आणि खात्रीची झाल्यावर कामात आस्ते आस्ते वाढ होत गेली. मनीऑर्डर, व्ही० पी० रजिस्टर वगैरे प्रकार या वाढीचेच आहेत. येथे पोस्टात पैसे भरावे म्हणजे ती रक्कम पोस्टामार्फत हवी तेथे पोचते, या तजविजीला मनीऑर्डर म्हणतात. पुस्तकांची किंमत परगावच्या गिऱ्हाइकाकडून वसूल करण्याच्या उपायाला व्ही० पी० (व्हॅल्यू पेएबल) हे नाव आहे. आपले पत्र किंवा इतर जिन्नस टपालाने निश्चितपणे ज्याच्या त्याच्या हाती पडावे या व्यवस्थेला रजिस्टर किंवा इन्शुरन्स करणे ही रीत आहे. मात्र अशा सर्व गोष्टींना टपालात वेगळे द्रव्य वेचावे लागते. टपालाच्या कारभारात बँकेचादेखील समावेश आहे. टपालकचेरी एकदा हिवतापावरील औषधाच्या पुड्याही लोकांना पुरवीत असे. कोयनेलच्या पुड्यांचा प्रस्तुत लेखकाचा पाउणशे वर्षांमागचा राजस्थानातील अनुभव आहे.

टपाल सुरू झाले, तेव्हा त्याचे वाहन मनुष्यच होते. आगगाडी व टपाल ही दोन्ही कामे साधारणपणे समकालीन असली तरी जेव्हा सर्वत्र सडका नव्हत्या तेव्हा टपाल नेण्याचे काम माणसालाच करावे लागे. आगगाडी मोठाल्या गावांवरून जायची व शहरांच्या टपालाबरोबर खेड्यांचे टपालही तिनेच न्यायचे आणि ते खेड्यातून पोचवायचे काम माणसांनी उरकायचे. यामुळे खेड्याची डाक चारआठ दिवसांनी नेमलेल्या दिवशी लोकांच्या हाती पडावयाची. खेड्याचा पत्रव्यवहार थोडा व उतावळीचा नसतो याकडे लक्ष देऊन अशा तऱ्हेची योजना इंग्रजाने अंमलात आणली

व तीच आज स्वराज्यातही थोड्याअधिक फेरबदलाने चालू आहे. या माहितीचा वस्तुतः साक्षात मुंबई शहराशी संबंध नाही, पण टपाल या विषयाची पूर्तता होण्यासाठी वरील माहिती जोडली आहे.

मुंबई शहराच्या अवाढव्य विस्तारामुळे रस्त्यावर जिकडेतिकडे थोड्या थोड्या अंतरावर पोस्टाच्या पेट्या दृष्टीस पडतात. जवळपासच्या लोकांनी कार्डे, पाकिटे या पेट्यांत टाकली की ती तेथून शहराच्या मोठ्या कचेरीत पोस्टाचे कामगार ठरल्या वेळी काढून पोचवितात. पेट्यांतील डाक केव्हा काढायची त्याच्या वेळा ठरलेल्या आहेत. त्याप्रमाणे पेट्यांतील टपाल मुख्य कचेरीत नेण्यासाठी एक मोटारगाडी शहरात सारख्या चकरा मारीत असते. या गाडीचा रंग लाल असतो. इंग्रजांनी लाल हा रंग सरकारचा ठरविला. शहरातील टपालगाडीचा जो रंग तोच आगगाडीच्या ज्या डब्यातून डाक नेतात त्या डब्याचाही रंग लालच असतो. टपाल नेणाऱ्या आगगाडीला 'मेल' म्हणजे टपाल किंवा डाक गाडी म्हणतात. तिचा वेग इतर गाड्यांपेक्षा जास्त असतो, तसाच भाड्याचा दरही अधिक असतो. तशा जास्त वेगाच्या काही गाड्यांना 'एक्स्प्रेस' असेही नाव असते. पण प्रत्येक 'एक्स्प्रेस'मधून टपाल जातेच असा नियम नाही. टपालाच्या डब्यात टपालाचे कामगारही असतात. शहरातली डाक पोती भरून स्टेशनावर जाते व ती आगगाडीत भरल्यावर तेथे पुन्हा डाकेची निवड केली जाते व ती निरनिराळ्या स्टेशनांवर देण्याचे व तेथील डाक गाडीत घेण्याचे काम गाडी आपल्या अखेरच्या मुक्कामास पोचेपर्यंत चालते. असा हा टपालाचा व्यवहार आहे. तारायंत्र हे टपालाचेच भावंड असल्यामुळे त्यालाही चोवीस तासांत उसंत नसते. शहरांतील टपाल सहसा रात्री वाटले जात नाही. तारांच्या वाटपाला रात्रीचाही अटकाव नाही. मात्र त्यासाठी थोडे जास्त पैसे सरकारात भरावे लागतात. ही सवलत साध्या कार्ड-पाकिटांच्या टपालासही काही काळ लागू होती. इंग्रजांच्या अंमलात रविवारीसुद्धा टपालाला रजा नव्हती. स्वराज्यात रविवारी टपालवाटप साफ बंद असते.

अठरा

जनावरे, वाहने, उपद्रव

१६६८ मध्ये इंग्रज कंपनीकडे मुंबईची सात बेटे आली तेव्हा फक्त कोळ्यांचीच काय ती मोठी वस्ती होती. तीही सगळ्या बेटावर सारखी वाढलेली नव्हती. कुठे जास्त तर कुठे अगदी कमी असा प्रकार होता. यामुळे उथळ समुद्राची दलदल आणि राने यांच्या वाढीला अवकाश होता. अर्थात त्यामध्ये पाण्यातल्या आणि रानातल्या प्राण्यांची विपुलता असावी हे क्रमप्राप्तच आहे. आजच्या मुंबईत घरांतून पाल फारशी दिसत नाही, मग सरडे, घोरपडी यांचा अभाव मुद्दाम सांगायला नको. मुंबई ही कोकणात मोडते आणि कोकणात जर सामान्य लोकांच्या चर्चेचे विषय कोणते असतील तर ते साप व भुते हे होत. पण आज मुंबईत साप नाहीत, त्याप्रमाणे भुताखेतांचा विषयही मागासलेला आढळतो. चारपाच वर्षांनी केव्हातरी मलबार टेकडीवर व तशाच दुसऱ्या जागी साप निघाला, तो मारला किंवा त्याच्या दंशाने एखादा माणूस दगावला, अशी बातमी वृत्तपत्रांत पाहायला सापडते. भूतचेष्टांचा उपद्रव केव्हा केव्हा ऐकू येतो, पण एका काळी म्हणजे शंभर वर्षांपूर्वी मुंबईत सापही होते व भुतेही होती. जमिनीवर संचारणाऱ्या सापांप्रमाणे समुद्रातही मोठाले साप होते. इंग्रजांनी जलसर्पांच्या चार जाती वर्णिल्या आहेत. एका जातीचे साप शिडाची जहाजे एक-दीड दिवसात मुंबईला पोचण्याइतक्या अंतरावर आली की समुद्राच्या पाण्यावर पसरलेले जहाजांवरील लोकांना दिसू लागत. यांचा रंग तांब्यासारखा असे. जहाजे अंगाशी भिडतील असे वाटले की हे मोठाले साप आपली जागा सोडून दुसरीकडे जात, अशी त्यांची हकिगत ग्रथित केलेली आहे. जेव्हा वाफेने चालणाऱ्या प्रचंड आगबोटी निर्माण झाल्या तेव्हा हे साप दिसेनासे झाले. जमिनीवरील सापांनी इंग्रजांचा प्राण घेतल्याची उदाहरणे ज्या अर्थी शंभर वर्षांमागील वृत्तपत्रांतून दृष्टीस पडतात, त्या अर्थी हिंदी माणसे सर्पदंशाने मरत असली पाहिजेत हे सहज कळणारे आहे. वृत्तपत्रांतून ज्यांच्या संबंधातील अपघातांची नोंद व्हावी अशी इंग्रजांच्या प्राणांची तेव्हा महती होती.

मुंबईतल्या भुतांचा वृत्तांत सापांसारखाच आहे. क्वीन्स रोडवरील गिरगाव-लगतच्या भागात ताडामाडांच्या विस्तीर्ण वाड्या होत्या आणि त्यांतल्या काही वाड्यांतून

लहानसहान भुतेच काय पण वेताळही असल्याची माहिती शंभर वर्षांमागील मुंबईविषयक पुस्तकांतून आढळते. ही भुते केवळ भारतीयांचीच होती असे नव्हे तर अँग्लोइंडियनांचीही होती. ह्यांचे अनुभव डग्लस ह्या ग्रंथकाराने 'अँग्लोइंडियन घोस्ट्स' या प्रकरणात दिलेले आहेत. भारतीय भुताखेतांची प्रसन्नता राखण्यासाठी कोणत्या वेळी कोणते उपाय योजले जात असत याचीही माहिती कित्येकांनी लिहून ठेवलेली आहे.

भुते व साप सोडून आणखी कोणत्या मनुष्येतरांची या बेटावर वस्ती होती, याची चौकशी करू लागल्यास प्रथम मलबार टेकडीवर लक्ष जाते. ही टेकडी आज विभागली जाऊन निरनिराळ्या भागांना निरनिराळी नावे मिळाली आहेत. परंतु आजच्या सडका डोळ्यांआड करून या टेकडीचे विस्तृत स्वरूप पाहण्याचा प्रयत्न केल्यास ते मोठे दिसेल. या टेकडीवर दाट रान होते. एक वाळकेश्वराचे देऊळ व त्याभोवती धर्मशाळा, टेकडीच्या गिरगावकडील उतारावर इंग्रजांचे चार बंगले, टेकडीच्या समुद्रातील टोकावर एक लहानसे घर, अशा स्थितीत टेकडीवरील जंगलामध्ये वाघ, चित्ते, कोल्हे, तरस, थोडे ससे, असे रानटी प्राणी राहावे हे सरळच आहे. माणसांची वस्ती वाढली, मग श्वापदांची शिकार वाढली, तेव्हा ही जनावरे नाहीशी झाली. इंग्रजांत कोल्ह्याची शिकार हा एक खेळ आहे. स्वतः घोड्यावर बसून व कोल्ह्यामागे कुत्री सोडून त्याचा पाठलाग करायचा, या पद्धतीस अनुसरून इंग्लंडहून शिकारी कुत्री आणायला सुरुवात झाली. ही कुत्री येथील हवेत जगत नसत. म्हणून दरसाल कुत्र्यांचे कळप आणविण्याचा प्रघात पडला. या शिकारीचे वेळापत्रक व दिवस ठरवून शिकार केली जात असे. न्याहारी, दुपारचे व संध्याकाळचे जेवण यांच्या जागा आधी निश्चित करून त्याप्रमाणे कार्यक्रम पार पाडायचा. या शिकारीपायी मलबार टेकडीच्या जंगलातील कोल्हे संपल्यावर त्यांची पुण्याकडून आयात चालू झाली. शेवटी कोल्ह्यांच्या शिकारीचा नाद इंग्रजांनी कायमचा सोडला. वाघ-चित्त्यांच्या शिकारीला ठाण्याचे रान होतेच; पण इंग्रजांचा डोळा रुचकर मांसाच्या विविध पक्ष्यांवर अधिक होता. हे पक्षी शेते पिकल्यानंतरच्या काळात मारायला सापडत. वाघांनी मलबार टेकडीच्या भागातून पाय काढला तरी माहीम, कुर्ला, भायखळा (हा भाग गेल्या शतकाच्या साठी-सत्तरीपर्यंत पुष्कळसा ओसाड होता.) इत्यादी भागांतून वाघ, तरस अशी श्वापदे केव्हा केव्हा भेटत. तत्कालीन वृत्तपत्रांतून डग्लस याने जमविलेल्या नोंदींत १८५० मध्ये डाकेच्या गाडीवर भांडूप येथे एका वाघाने झडप टाकली; १८५८ साली पी० अँड ओ० कंपनीच्या बोटीतील लोकांनी एक वाघ माझगावकडे पोहत आल्याचे पाहिले, नंतर त्याने मच्चव्यावर चढण्याचा यत्न केला, अखेरीस त्याला बंदुकांनी ठार करण्यात आले; त्याच वर्षी माहीमला एका वाघाची शिकार झाली; १८५९ साली पोलिस कमिशनर फॉर्जेट याने सोनापूर व एस्प्लेनेड मैदान यांपासून जवळच एक वाघ मारला; १८६३ मध्ये माहीम स्टेशना-

पाशी एक वाघ मारला, त्याने दोन माणसे गट्ट केली होती—अशी माहिती पाहिली म्हणजे वाघांचे भय मुंबईस किती वर्षे होते याची कल्पना करता येईल. डग्लसच्या नोंदींत वाघांप्रमाणे तरस, कोल्हे, साप यांच्याही नोंदी आहेत.

आता मुंबईचे इतर दैवी मानवी उपद्रव सांगण्याला हरकत नाही. १८०३ साली मुंबईच्या कोटातील वस्तीला आग लागून फार नुकसान झाले. जवळजवळ दोन-तृतीयांश घरे जळली. या घरांच्या जागी नव्या टोलेजंग इमारती बांधल्या गेल्या हा या आगीपासून फायदा झाला असे समजायला पाहिजे. त्या काळी आगीच्या बंबाची नीटशी व्यवस्था नव्हती. मुंबईच्या किल्ल्याची तटबंदी १८६० नंतर सर बार्टल फ्रीअर या गव्हर्नरने पाडली, आणि तिच्या बाहेरचा खंदक बुजवून टाकला. ही तटबंदी फार रुंद होती आणि पुष्कळदा हवाशीर जागा म्हणून या तटबंदीवर मंडप उभारून व ते रंगीत दिवाबत्तीने सजवून श्रीमंत लोकांच्या घरची लग्नकार्ये होत असत. तटबंदी-खालून त्या समारंभाची मौज इतरांना पाहायला सापडे. तटबंदी पडल्यावर ही मौज पुन्हा दिसणार नाही याबद्दल पुष्कळांना हळहळ वाटली.

१८०३ साली पावसाच्या अभावी दुष्काळाची आपत्ती कोसळली होती. या वेळी आपली प्रजा मरू द्यायची नाही अशी खबरदारी इंग्रजांनी दाखविली. जेथून धान्य मिळाले तेथून ते आणले आणि ते लोकांना पुरवले. १९४२ मध्ये देशभर जी माणसागणिक धान्यवाटपाची व्यवस्था करण्यात आली तिची बीजे १८०३ च्या दुष्काळविषयक दप्तरात पाहता येतात. १८०३ चा दुष्काळ देशव्यापी नव्हता आणि असता तरी तेव्हा सर्वत्र इंग्रजांचे राज्य झालेले नव्हते. त्या वेळी पेशवाई जिवंत होती. पुण्याकडे दुष्काळाने माणसे मरू नयेत म्हणून इंग्रजांनी पुण्यास पाठविलेले धान्य सरदार आणि व्यापारी यांनी दडपून, आज ज्याला 'काळा बाजार' म्हणतात त्या प्रकाराचा अवलंब केला होता. या लोकांच्या स्वजनद्रोहाबद्दल पुण्याकडील इंग्रजांनी खेद व आश्चर्यही व्यक्त केले आहे. तिकडे धान्य पाठविणे म्हणजे पुण्याचे अधिकारी व व्यापारी यांचे उखळ पांढरे करण्यासारखे आहे याची खात्री पटल्यावर मुंबईच्या इंग्रजांनी आपले औदार्य आवरले. १८०३ नंतर सुमारे २० वर्षांनी मुंबईत पाण्याची टंचाई उद्भवली. सरकारने नव्या विहिरी खणल्या आणि जुन्या विहिरींची खोली वाढवली. परंतु पाण्याची हाकाटी मिटली नाही. तेव्हा रस्त्याच्या कडेला उघडी गटारे होती. त्यांतील बाण पाणी विहिरींत जाऊन रोगराईला आवाहन मिळाले. त्या काळी पवईचे तळे एका पारश्याच्या मालकीचे होते. त्याने तेथील पाणी कालव्याने मुंबईस पुरवण्याचा सल्ला सरकारास दिला आणि काही अंशी स्वतः अंमलात आणला. तुलसी, विहार, तान्सा येथून नळाने मुंबईस पाणी पुरवण्याची कल्पना पवईच्या कालव्यात दिसून येईल.

रोगराई, दुष्काळ, आग यांसारखी संकटे दैवी व केव्हातरी बाधणारी, परंतु मुंबई शहर आणखी एका प्राणघातकी उपद्रवासाठी प्रसिद्ध आहे. तो उपद्रव म्हणजे दंगे.

१८३२ मध्ये काही कुत्री पिसाळली यासाठी शहरातील वेवारशी कुत्री मारून टाकण्याचा सरकारने हुकूम काढला. मारलेल्या प्रत्येक कुत्र्यानिमित्त शिपायांना आठ आण्यांचे बक्षीस ठेवले होते. अशी कुत्री मारण्यासाठी दोन गोरे शिपाई हिंदू व पारशी यांच्या संमिश्र वस्तीत शिरले. त्यांना पाहताच हिंदू व पारशी या दोन्ही समाजांतील भूतदया एकदम उसळून त्या समाजांच्या काही लोकांनी त्या शिपायांवर हात टाकला. ते शिपाई कसेबसे बचावून ठाण्यावर पोचले. नंतर गुंडांनी दुकाने बंद पाडली. कोटातील फौजेसाठी जाणारे धान्यपाणी लुटले. त्यांनी शहराच्या साऱ्या हालचाली अडवून धरल्या. शेवटी कोटातून लष्करी शिपाई गुंडांच्या बंदोबस्तास आले तेव्हा गुंड वेपत्ता होऊन शहराचा व्यवहार सुरळीत चालू झाला. १८५१ आणि १८७४ या दोन वर्षी पारशी व मुसलमान यांचे दंगे झाले. वृत्तपत्रांत पैगंबर व त्याचा धर्म यांविषयी काही उपमर्दकारक मजकूर प्रसिद्ध झाल्याच्या निमित्ताने मुसलमान बिथरले आणि पारश्यांची घरे, मंदिरे, दुकाने यांवर जशी त्यांची धाड पडली तशीच पारश्यांच्या प्राणांवरही पडली. १८७४ च्या दंग्यात सरकारने तडकाफडकी लष्कर न बोलावल्यामुळे एकप्रकारे मुसलमानांना फूस मिळाली होती. १८९३ साली हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. मुसलमान हे सामान्यतः इतर धर्मांच्या विरुद्ध एकजूट दाखवीत असले तरी त्यांच्यात जी शिया व सुनी ही फूट आहे तिच्या योगाने मोहरमच्या सणात या दोन पंथांची आपापसात मारामारी जुंपून अशांतता माजल्याचे प्रकार गेल्या शतकात बरेच घडले. मोहरमचा सण जवळ आला की, तो कसा शेवटास जातो याची काळजी पोलिसखात्याला तर वाटेच, पण लोकांवरही या काळजीची छाया पसरे. चालू शतकात सुनी-शियांचे दंगे बंद आहेत.

शहर वसवायचे तर नागरिकांच्या जीवाचे व मालमत्तेचे संरक्षण झाले पाहिजे, यासाठी आंजीअर गव्हर्नराने भंडारी लोकांचे संरक्षकदल उभे केले. हे भंडारी शिपाई व ह्यांच्या मदतीस पुढे नेमलेले बरेच रामोशी ह्यांच्या हातून नागरिकांचे संरक्षण नीट होत नव्हते. कोर्टाबाहेर खून, दरोडे, घरफोडी, असले गुन्हे रोज घडत असत. भंडारी हे ताडीमाडीचा धंदा करणारे असल्याने पुष्कळदा ताडामाडावर चढून लपून राहत आणि कित्येकदा ह्यांना गुन्हेगारांची झाडाखाली चालणारी कारस्थाने पाहायला सापडत आणि अशा रीतीने ते गुन्हेगारांना कधी कधी पकडत असत. पण गुन्हेगारीच्या प्रतिबंधाला भंडाऱ्यांचा असा प्रयत्न पुरा पडत नसे. रात्र पडली की लोकांनी घरे बंद करावी आणि रात्र पार पाडावी. रात्री लोकांची रहदारीच नसे. शहराच्या रस्त्यावर गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत दिवे नव्हते. गुन्हेगार मात्र मशाली व हत्यारे घेऊन जमावाने रस्त्यावरून हिंडताना दिसत. सरकारी शिपाई, रामोशी, भंडारी हे गुन्हेगारांना सामील असल्याच्या व पोलीस अधिकारी लाच खातात अशा स्वरूपाच्या नागरिकांनी तक्रारी केल्याचे दाखले ऐतिहासिक साधनांतून आढळतात. सरकारचा बंदोबस्त अतिशय कंजुषीचा होता, हे एक शिपायांनी लाच खाण्याचे व आपले काम

कुचराईने करण्याचे कारण होते. गेल्या शतकाच्या पहिल्या पंचवटीत 'वंदरगँग' या नावाची एक गुन्हेगारांची टोळी होती. तिच्यामागून संभावितपणाने लोकांना फसवून त्यांचे द्रव्य हिरावणारी 'सोनेरी' (गोल्डन) या भपकेदार नावाची गुन्हेगार टोळी उदयास आली. शहराची व गुन्हेगारीची वाढ एकदम चालू होती. १८५० नंतर फॉर्जेट नावाच्या पोलीस अंमलदाराने पोलीसखात्याची व्यवस्था सुधारली. त्यानेच गुन्हेगारांच्या टोळ्या उधळून लावल्या. फोर्जेट हा हिंदुस्थानात जन्मास आलेला, मुंबईतील सर्व भाषांत प्रवीण, वेषांतराच्या संबंधात अतिशय कुशल व धाडसी अशा गुणांचा अधिकारी होता. त्याच्या भीतीने गुन्हेगारीला पुष्कळ आळा बसला. त्याने मुंबईतील हिंदी लष्करात १८५७ साली चाललेला कट उघडकीस आणल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याच्यामागून मुंबईचे पोलीसखाते कार्यक्षम होत गेले.

मुंबईतील वाहनांकडे थोडे लक्ष दिले पाहिजे. जेव्हा वेटे व दलदली होत्या, तेव्हा पाय व नावा हीच वाहने प्रामुख्याने असली पाहिजेत, याबद्दल संशय बाळगण्याचे कारण नाही. त्यामागून घोडे आले. परंतु पालखी, मेणे ही वाहनेही उपयोगात होती. पालखी-मेण्यांतून लांबचा प्रवास करायचा तर दर मैली एक रुपयाचा खर्च करावा लागे. पुणे–मुंबई यांच्या दरम्यान बैलगाडी जाऊ शकेल असा रस्ता बोरघाटात १८३० च्या पुढे तयार झाला आणि त्यावरून गाडी जाताना पाहून माल्कम गव्हर्नरने नवयुगाचा प्रारंभ केल्याचे धन्योद्‌गार काढले. या सडकेपूर्वी वेल्स्ली (ड्यूक ऑफ वेलिंग्टन) या सेनापतीने बोरघाटातून तोफा नेता येण्यासाठी कच्ची सडक बांधली होती. मुंबई सुधारून तेथे रस्ते काढल्यावर घोड्यांच्या निरनिराळ्या गाड्या वापरात आल्या. पण गरिबांना वाहन धमनी हे होते. धमनी एका बैलाची किंवा दोन बैलांची असे. भाड्याचा दर आणा-दोन आणे असला तरी लोक पैशा-दोन पैशांवर काम भागवीत. धमन्यांमागून घोड्यांच्या गाड्या भाड्याने मिळू लागल्या. या गाड्या गैरसोयीच्या अशी तक्रार युरोपियन लेखकांनी केल्याची उदाहरणे आहेत. १८६४ मध्ये घोड्याच्या ट्रॅमगाड्यांची कल्पना निघाली, परंतु ती १८७४ मध्ये अंमलात आली. घोड्यांची ट्रॅम १९०७ पर्यंत राहिली. पुढे घोड्यांची जागा विजेने घेतली. मालाची ने-आण बैलांच्या लमाणाने केली जात असे. उंट व हत्ती यांचा उपयोग मुंबईबाहेर स्वारीला आणि मालाच्या वाहतुकीला करण्याचा प्रघात होता. १८५३ नंतर आगगाड्यांनी या वाहनांची गरज नाहीशी केली आहे. सैन्यातील घोडदळ गेले आणि चालू स्वराज्यात हत्तीचे महत्त्व उरलेले नाही. शेतकीची ट्रॅक्टरने, त्याचप्रमाणे मोटार-लॉऱ्यांनी बैलांची कामे होऊ लागली असून, आणखी काही कालाने बैल, घोडे, हत्ती, उंट ही जनावरे कदाचित कोशग्रंथांतील चित्रांतून पाहण्याचा प्रसंग येईल, असे वाटते. घोडा व हत्ती हे एकदा भारतीय संस्कृतीमध्ये गणले जात होते. इतिहासकालीन मुंबईच्या जनावरांत गाढव आणि खेचर ही सापडत नाहीत हे थोडे आश्चर्यकारक वाटते.

एकोणीस

खाद्यपेये, पोषाख वगैरे

हल्ली जरासा उकाडा वाढला की इराण्याच्या दुकानातून बर्फ आणवून व तो पाण्यात टाकून गार पाणी पिण्याचा शौक बेसुमार वाढला आहे. या बर्फाचा परिचय मुंबईकरांना प्रथम १८३५ मध्ये झाला. अमेरिकेच्या जहाजांतून बर्फ इकडे येऊ लागला, आणि आरंभी त्याचा वापर श्रीमंत पारशी लोकांनी आरंभला. हा बर्फ साठविण्यासाठी व सुरक्षित राहण्यासाठी घुमटाच्या आकाराचे कोठार बांधले होते. त्या कोठाराच्या वरील टोकाला तोंड ठेवले होते. त्याला लोखंडाची शिडी लावून माणसांनी आत उतरावे आणि गिऱ्हाइकाला बर्फ द्यावा अशी तेव्हा पद्धत होती. बर्फाचा दर चार आणे पौंड असा होता. पुढे बर्फाची आयात वाढली, खपही वाढला आणि दराचे मान २ आणे पौंडावर आले. सुमारे २५ वर्षे अमेरिका बर्फ पुरवीत असता तिकडून बर्फ येण्याचे थांबले तेव्हा मुंबईतील थोरामोठ्यांचे एक शिष्टमंडळ सरकारकडे गेले आणि त्याने "बर्फाची व्यवस्था सरकारने करावी" अशी मागणी केली. बर्फाची आवड किती वाढली होती याची कल्पना सदर मागणीवरून होईल. सरकारने या मागणीचा विचार कसा केला, याची माहिती सापडत नाही. परंतु पुढे येथे बर्फाचे कारखाने निघून परदेशाकडे पाहण्याची गरज उरली नाही, असे दिसते. पण पहिला बर्फाचा कारखाना कोणी, केव्हा काढला, याचे निश्चित वृत्त सांगता येत नाही. बर्फामागून सोडा-लेमन ही पेये आली. त्या पेयांचे प्रकार हल्ली पुष्कळच वाढलेले आहेत. मात्र बर्फाबरोबर आइस्क्रीमचा उल्लेख सापडतो.

बर्फाची आवड मोगल बादशहांमध्ये होती. बाबर हा थंड प्रदेशातून भारतामध्ये आला होता आणि तो काश्मिरातून बर्फ आणत असे; परंतु आणताना वाटेत तो कोणत्या उपायांनी टिकवीत असे, त्या उपायांची हकिगत तत्कालीन कागदपत्रांतून दिसत नाही. बर्फ येथे पोचल्यावर महालाच्या तळघरात ठेवण्याची रीत मोगलकालात होती. हे बर्फ साहजिकच बादशाही समारंभापुरते असे. बादशहाच्या मानकऱ्यांनादेखील ते मिळण्याचा संभव नसल्याने सामान्य जनतेपर्यंत त्याची अर्थातच पोच झालेली नव्हती. आता कारखान्यांतून रोजच्या रोज तयार होणारे बर्फ समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत अशा रीतीने जाऊन पोचले आहे की,

त्याच्या अभावी विशेष प्रसंगी अडचण वाटते. बर्फाच्या कारखान्यांनी सांप्रत सारी मोठी शहरे व्यापली आहेत. धार्मिक व्यवहारातसुद्धा बर्फाला मनाई उरलेली नाही. यामुळे धार्मिक शुद्धतेचा टेंभा मिरवणारांची वटवट बंद करण्याला बर्फ उपयोगी पडल्याचे एक उदाहरण सांगायला हरकत नाही. १८९० सालानंतर पुण्याच्या पंचहौद मिशनमध्ये चहा प्याल्याच्या समजुतीने जेव्हा सनातनी ब्राह्मणांनी ग्रामण्य माजविले तेव्हा त्यांना आगरकरांनी एका लेखात "तुम्ही बर्फाचा वापर करताना, कुणाच्या हातून ते तयार केले जाते याचा कधी विचार करता का?" असा प्रश्न टाकला आहे. नळाच्या पाण्याची अशीच स्थिती आहे. घरोघरी विहिरी होत्या तेव्हा पाण्याचे पावित्र्य सांभाळण्याला अवकाश होता. आता पाण्याच्या नळांनी तो अवकाश नाहीसा केला असून ह्या पाण्याच्या शुचित्वाकडे कुणाचेही लक्ष जात नाही.

चहा ही वस्तू हिंदुस्थानची असूनही ते पेय मुंबईत पर्यायाने महाराष्ट्रात फार उशिरा लोकप्रिय झाले. त्याचा तांबडा रंग रक्तासारखा, एवढ्याचकरिता त्याबद्दल लोक साशंक होते. मुंबईस गेल्या शतकाच्या अखेरीअखेरीस अनेकांच्या घरांत चहाचा शिरकाव झाला. तोवर कॉफी पिणे हे सुखवस्तू सभ्यपणाचे एक लक्षण समजले जात असे. संध्याकाळी कचेरीतून घरी आल्यावर मित्रांसह किंवा एकट्याने कॉफी प्यावी, असे उल्लेख पाहायला सापडतात. अजूनही चहा टाळून कटाक्षाने कॉफी पिणारी माणसे भेटतात, परंतु त्यांची संख्या दिवसानुदिवस घटत आहे. मुंबईत चहाच्या फैलावाचे आणखी एक कारण म्हणजे कारखान्यांची अर्थात प्रामुख्याने गिरण्यांची वाढ. खेड्यांतून कारखान्यात राबण्याकरिता जेव्हा बायकामुलांना खेड्यांत ठेवून पुरुषवर्ग मुंबई शहरात आला, तेव्हा त्यांच्याकरिता खाणावळी निघाल्या आणि खाणावळींप्रमाणेच चहाकॉफीची दुकाने निघाली. खाणावळींची शिफारस वृत्तपत्रांतून केली गेल्याची उदाहरणे आहेत. सार्वजनिक भोजनगृहे, सार्वजनिक अन्नपूर्णागृहे, अशी नावे या शिफारशींच्या लेखांवरून आढळतात. चाळ नावाचा जो खुराडेवजा घरे बांधण्याचा प्रकार आहे, त्याचे बीज मुंबईच्या कारखानदारीतच दिसेल. एकदा ब्राह्मणांच्या खाणावळी निराळ्या होत्या आणि त्यांत सोवळ्याने जेवायला बसणारे ब्राह्मणही तीस-पस्तीस वर्षांमागे तुरळक भेटत असत. आता सोवळेओवळे, ब्राह्मण-अब्राह्मण इत्यादी विधिनिषेध मुळीच शिल्लक नाहीत. खाणावळींत दोनदा जेवण आणि मधला आहार चहाकॉफीच्या दुकानात, हा क्रम एकप्रकारे अटळच समजावा लागतो. एकदा असे सांगतात की, हिंदूंच्या हौदात, विहिरीत किंवा तळ्यामध्ये पावाचा तुकडा टाकून हिंदूंना बाटवीत होते. आता चहाच्या दुकानात पाव, बिस्किटे, टोस्ट या पदार्थांचे सेवन धर्मांतराचे भय न वाटता मोठ्या रुचीने केले जाते. पाव-बिस्किटे यांचा मान सांप्रत दुकानातच होत नसून घरोघर चालू आहे; किंबहुना, पोळी-भाकरीपेक्षा पाव पचायला हलका म्हणून रोग्यांनासुद्धा त्याच्या बाबतीत परवानगी मिळाली आहे.

टोमॅटो हा दिसायला रक्तासारखा तांबडा व इंग्रजांच्या लागवडीतला, यासाठी त्याला आपल्या घरात बिलकूल थारा न देणारी कुटुंबे पन्नास वर्षांमागे मुंबईत पुष्कळच होती. टोमॅटोचा हा अनुभव केवळ ब्राह्मणांपुरताच मर्यादित आहे. टोमॅटो हे बिलायती वांगे इंग्रजांनी किंवा तत्सम लोकांनी खावे, हिंदूंनी खाऊ नये, ब्राह्मणांनी तर त्याचे दर्शनही पाप समजावे—ही भावना अतिशयोक्तीची वाटेल, पण ज्यांना ५५–६० वर्षांपूर्वीची आठवण असेल ते या भावनेची वस्तुस्थिती मान्य करतील. येथे अज्ञान कसे सुखावह असते याची थोडी परिस्फुटता करायला हरकत नाही. टोमॅटो हा गेल्या शतकात लहानशा प्रमाणात पिकविला जाणारा पदार्थ होता. बटाटा हा टोमॅटोसारखाच युरोपियनांनी हिंदुस्थानात आणलेला पदार्थ आहे. पण तो इंग्रजांपूर्वी आलेला व कोणी आणला याचे ज्ञान नाही, म्हणून याचा बडेजाव एकादशी-शिवरात्रीसारख्या पवित्र दिवसांच्या आहारातसुद्धा आपण पाहतो. टोमॅटोने बटाट्याची महती अजून संपादन केलेली नाही, परंतु युरोपियन आयुर्वेदाने त्या फळामध्ये आरोग्याला उपकारक अशी जीवनसत्त्वे असल्याबद्दल शिफारसपत्र देऊन ठेवल्यामुळे उपासाखेरीजच्या दिवसांत टोमॅटोचा निषेध नष्ट झालेला आहे. टोमॅटोसारखीच आजारात रसांची फळे खाण्याचा वृत्तांत इंग्रजी राजवटीतला आहे.

इंग्रजी राज्याच्या प्रारंभी इंग्रजी शिकलेल्या भारतीयांनी आपला पोषाख सोडला नव्हता. अव्वल इंग्रजीशाहीत पागोटे व अंगरखेवजा कोट कायम होता. पागोट्याचा संक्षेप पगडी व पगडीचा संक्षेप टोपी हे स्थित्यंतर होऊ लागले. तेव्हा या स्थित्यंतराच्या पर्यवसनाविषयी वृत्तपत्रांनी चिंतादर्शक लेख लिहिले होते. परंतु हे स्थित्यंतर थांबले नाही. आज आपल्या पोषाखाची स्थिती काय आहे हे प्रत्येकाला ठाऊक असल्याने त्याचे मुद्दाम स्पष्टीकरण करण्याची गरज नाही. सुमारे पाऊणशे वर्षांमागे जेव्हा टोपीचा आदर लोकांनी आरंभला तेव्हाच्या टोप्या परदेशी होत्या. ज्यांना कुठेही शिवण नाही अशा वाटोळ्या किंवा घडी करता येईल अशा लांबट टोप्या लोक वापरीत होते. येथे हे सांगायला पाहिजे की शंभर वर्षांपूर्वीच्या हायस्कूलांत व कॉलेजांत विद्यार्थी पागोटी घालून जात असत. त्या काळातील विद्यार्थ्यांचे जे फोटो उपलब्ध आहेत त्यांवरून विद्यार्थ्यांच्या पागोट्याची साक्ष पटते. तेव्हा विद्यार्थी पागोटे डोक्यावर ठेवून हायस्कूल-कॉलेजांतून जात होते, याचे आज आश्चर्य वाटेल. नंतर काही वर्षांनी पागोटे अथवा पगडी ही एक लग्नसमारंभात शिल्लक होती. आता तो समारंभ युरोपियन किंवा गांधीयुगातील पोषाखाने साजरा होत असतो. नोंदणी-पद्धतीच्या विवाहाने या समारंभातील साऱ्या सोहळ्यांना काट मिळालेला आहे.

पोषाखामागोमाग पुरुषांच्या शेंडीची हकालपट्टी व्हावी हे सरळच आहे. हिंदू धर्मात मिश्या काढणे म्हणजे आई किंवा बाप यांच्या मृत्यूचे लक्षण. अर्थात ही तेव्हा अशुभ समजली जात असे आणि मिश्या नसणारांना तसा प्रश्नही पन्नास वर्षांमागे विचारला जात असे. ही स्थिती पालटून, आज मिश्या असणारांनी समाजाला लाजावे असे

दिवस आले आहेत. हे स्थित्यंतर या शतकातले आहे म्हणून त्याचा अधिक विचार न करणे बरे. या स्थित्यंतराचे सूत्र मागील शतकामध्ये इंग्रजी विद्येने सुरू केलेल्या आचारविचाराच्या क्रांतीपर्यंत पोचते.

क्रिकेट या खेळाला पारशी समाजाने प्रथम १८४० च्या सुमारास प्रथम आत्मसात केले. त्यांच्यापासून कित्येक वर्षांनी क्रिकेटचा खेळ हिंदूंनी स्वीकारला. हिंदूंच्या नंतर काही कालावधी लोटल्यावर मुसलमान या खेळात शिरले. मग दुरंगी, तिरंगी वगैरे खेळाचे सामने अस्तित्वात आले. क्रिकेटच्या मागून टेनिस, फुटबॉल, हॉकी, वगैरे खेळांचा प्रचार सुरू झाला. बैठ्या खेळांत गंजिफा, बुद्धिबळे, सोंगट्या हे खेळ मागे पडून पत्त्यांनी त्यांची जागा पटकावली आहे. आणखी एक प्रकार घोड्याच्या शर्यतीचा आहे. हा प्रकार १८ व्या शतकाच्या शेवटी अंमलात आला. हल्ली जेथे सेंट्रल स्टेशन आहे, ह्या भागात शर्यतीचे मैदान होते. आताचे ठिकाण सर्वांच्या परिचयाचे आहे.

वीस

छापखाने, वृत्तपत्रे, ग्रंथ

इंग्रजांचा मुंबई इलाका अवतरल्यावर मुंबई शहराला राजधानीचा मान मिळावा हे क्रमप्राप्तच होते. यामुळे मुंबईला सर्व प्रकारच्या हितसंबंधांची माणसे चोहोकडून गोळा व्हावी याबद्दल आश्चर्य वाटायला नको. मुंबईत जे शिक्षण इंग्रजी राज्यकर्त्यांच्या प्रेरणेने सुरू झाले, त्यात जुनी शास्त्रे पढविण्याचा उद्देश नव्हता. पुण्यात एकदा ब्राह्मणांचे राज्य व पर्यायाने ब्राह्मणांचे वर्चस्व असल्याने पेशवाई जिंकल्यावर इंग्रजांनी पुण्यास ब्राह्मणांना संतुष्ट राखण्याचा जसा प्रयत्न केला तसा प्रयत्न करण्याची त्यांना गरज नव्हती. यामुळे युरोपातील निरनिराळ्या शास्त्रांच्या प्रगतीची ओळख मुंबईतील विद्यार्थ्यांना प्रथम व्हावी व ओळखीच्या परिणामी आपल्या उद्धाराचे विचार त्यांच्या अंतरंगात उद्भवावे हे सरळच म्हणावे लागते. शिक्षणासाठी जी पाठ्यपुस्तके तयार झाली ती आधी मुंबईत झाली. ही पुस्तके इंग्रज तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पण शास्त्री पंडितांच्या मदतीने तयार केली जात होती याचाही बोध पुष्कळांना असेल. सामान्य वाचनाच्या पुस्तकांचे विषय जुन्या संस्कृत ग्रंथांतलेच होते. बालमित्र, इसापनीती यांसारखी काही पुस्तके युरोपियन वाङ्मयातून निवडली होती. शाळांतील इतिहास, भूगोल इत्यादी विषयांची पुस्तके इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे असत, हे सहज लक्षात येणारे आहे. स्थूलमानाने इंग्रजांची विद्या मुंबईतील रहिवासी १८२० पासून शिकू लागले, असे ठरवून पुढे वीस वर्षांची पाहणी केल्यास १८४० पर्यंत भाषांतरे, क्वचित रूपांतरे, असे साहित्यनिर्मितीचे रूप दिसते. त्यानंतर २० वर्षांत इंग्रजीच्या थोड्याशा आधाराने हिंदी वाचकांना आपलेसे वाटण्याजोगे साहित्य जन्मास आल्याचे आपण पाहू शकतो. १८४० च्या पुढे डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी व दक्षिणा प्राइझ कमिटी या दोन संस्थांच्या—त्यातल्या त्यात दुसऱ्या संस्थेच्या—प्रेरणेने महाराष्ट्रात नव्या साहित्याची बरीच भर पडली. पहिल्या संस्थेची काही पुस्तके—उदाहरणार्थ, आगगाड्या आणि तारायंत्र यांसंबंधीची पुस्तके—ही इंग्रजांनी नव्याने आरंभलेल्या उद्योगाची उपयुक्तता लोकांस पटवून देण्याकरिता प्रसिद्ध केली होती. तिसरे पुस्तक 'आकाशसौंदर्य' हे मात्र खगोलशास्त्राचे अर्थात ज्याचा ज्ञानदानाखेरीज अन्य हेतू नाही असे आहे. पहिल्या दोन विषयांच्या पुस्तकांची भाषा

मराठी भाषेच्या इतिहासाला उपकारक आहे. रेल्वेसंबंधाचे पहिले पुस्तक लिहिले गेले तेव्हा 'आगगाडी' हा शब्द प्रचारात आलेला नाही. आता इंजिन, प्लॅटफॉर्म (फलाट), (गाडीचा) डबा, रूळ, सिग्नल, गार्ड वगैरे किती तरी शब्द थोड्याशा उच्चारभेदाने लोक जणू काय ते शब्द मुळात आपलेच आहेत अशा झोकात सहज दरदिवशी वापरतात. जेव्हा ते पुस्तक लिहिले गेले तेव्हा या सर्वांचा अर्थ लेखकाला स्पष्ट करावा लागला आहे. त्याने योजिलेले किंवा सुचविलेले बहुतेक शब्द आज नाहीसे झाले आहेत. आणि जी अवस्था रेल्वेच्या पुस्तकाची तीच तारायंत्राच्या पुस्तकाची असल्याने ग्रंथाची व लोकांच्या यासंबंधातील व्यवहारांच्या भाषेची तुलना करून भाषेच्या विकासाबद्दल काही ठोकताळे खचित सापडतील. म्हणून 'भाषेच्या इतिहासाला उपकारक' असे मागे म्हटले आहे.

१८६० नंतरच्या काळाला स्वाभिमानदर्शक लोकजागृतीचा काळ समजणे योग्य आहे. १८६० या वर्षापासून पुढे सतत आठ वर्षे 'सर्वसंग्रह' या नावाचे जे मासिक चालू झाले त्याने सारी जुनी मराठी कविता महाराष्ट्रापुढे ठेवली. या मासिकाच्या चालकाचे नाव कदाचित चौकस मुंबईकरांच्या ध्यानात येईल. माधव चंद्रोबा डुकले या गृहस्थांनी सर्वसंग्रहाचा भार अंगावर घेतला होता. माधव चंद्रोबांचे सर्वांगपूर्ण चरित्र उपलब्ध नाही, पण सर्वसंग्रहाच्या कामगिरीने डुकल्यांना या स्वस्ताईच्या काळातही चांगलीच झीज सोसायला लावली असेल याबद्दल संशय नको. इंग्रजपूर्व इतिहासकाळातील मराठी वाङ्मय, त्याचे स्वरूप आणि प्रमाण स्वाभिमानी जनतेच्या निदर्शनास आणून देण्याचे श्रेय निश्चितपणे सर्वसंग्रह मासिकाला म्हणजेच डुकले यांना आहे. या मासिकात एकदा मुंबईच्या तत्कालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब रेखाटणारी एक गद्य कथा छापण्याचा उपक्रम झाला, परंतु तो शेवटास जाऊ शकला नाही. पण उपलब्ध भागावरून ती कथा शेवटास जाती तर मराठीला तिचे भूषण वाटले असते, असा वाचकांचा अभिप्राय होऊ शकतो.

दुसरे मासिक 'विविधज्ञानविस्तार' हे होय. संदर्भसाहित्य या नात्याने ज्याच्याकडे वारंवार दृष्टिक्षेप करावा लागेल त्या मासिकाची योग्यता श्रेष्ठ, हा नियम या मासिका-संबंधात फार मोठ्या प्रमाणात अजूनही खरा ठरणारा आहे. १८६७ साली त्याचा जन्म झाला. महाराष्ट्रात साहित्याची निपज पुष्कळ झाली तरी त्याची परीक्षा करून त्याविषयी सामान्य वाङ्मयप्रेमी जनतेला मार्गदर्शन करणारे साधन १८६७ पर्यंत नव्हते. विविधज्ञानविस्ताराने ही उणीव भरून काढली. महाराष्ट्रातील अर्वाचीन टीकाशास्त्रा-संबंधीचा इतिहास अभ्यासू इच्छिणाराला वि० ज्ञा० विस्ताराचे आलोचन केल्याशिवाय गत्यंतर नाही. वास्तविक या मासिकामागे पैशाचे बळ नव्हते. ज्या महिन्याचा अंक त्या महिन्याला लोकांच्या हाती पडेल अशीही वि० ज्ञा० विस्ताराबद्दल खात्री नव्हती. इंग्रजीच्या शिक्षणाने वाढीस लागलेल्या वाङ्मयाचे हितचिंतन करणाऱ्या थोड्याशा लेखनकुशल विद्वानांची हौस व जूट एवढ्याच भांडवलावर हे मासिक निघाले.

विद्वान पांगले व जूट ढिलावली तरी ज्यांच्या हाती या मासिकाची मुख्य सूत्रे होती त्यांनी आपल्या संग्राहक सौजन्याने नवे विद्वान जोडले आणि मासिकाच्या योग्यतेला धक्का न लागू देता ते ६० वर्षे चालवले. वि० ज्ञा० विस्ताराचे वर्गणीदार अगदी बेताचे असूनही ह्या मासिकात आपला लेख प्रसिद्ध व्हावा म्हणून नव्या लेखकांची खटपट चाले, याची पुष्कळ उदाहरणे सांगता येतील. पुण्यास 'निबंधमाला' काढताना सुरुवातीस विष्णुशास्त्री चिपळूणकरांना वि० ज्ञा० विस्ताराचे नाव द्यावे लागले हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. मासिकांकडून वृत्तपत्रांकडे नजर वळविल्यास 'दर्पण' हे वृत्तपत्र व त्याच्या अनुषंगाने बाळशास्त्री जांभेकर हे नाव पुढे येते. दर्पण व जांभेकर हे रूढ साहचर्य कितपत खरे अथवा खोटे याची बारीक चर्चा करण्याची आज आवश्यकता नाही. दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्रात "दोघा पैकेवाल्यांनी दर्पण काढण्याचे मनात आणले व जांभेकरांना संपादक नेमले" अशा अर्थाचा जो मजकूर आहे तो यासंबंधात विचारात घेण्याजोगा आहे. बाळशास्त्री जांभेकर हे मुंबईमध्ये इंग्रजशाहीच्या अव्वल जमान्यात एक प्रसिद्ध पुरुष होते. त्यांच्या नावाशी अभेद्यतेने जोडलेल्या दर्पणावरून पुढे सरकले की, 'प्रभाकर' हे वृत्तपत्र सहज आकर्षण करून घेणारे आढळते. या वृत्तपत्रातच लोकहितवादींनी आपली 'शतपत्रे' प्रसिद्ध केली. वस्तुतः त्यांचा ज्याच्या स्थापनेमध्ये हात होता त्या (१८४९ मध्ये निवालेल्या) पुण्याच्या 'ज्ञानप्रकाशा'त त्यांनी ही पत्रे छापू नयेत हेसुद्धा लक्षात ठेवण्याजोगे आहे. प्रभाकरात इंग्रजी शिक्षणाने होऊ घातलेल्या सामाजिक क्रांतीचा मर्यादित पुरस्कार असला तरी इंग्रजांच्या कारभाराचे या साप्ताहिकाने जे वाभाडे काढले आहेत ते इंग्रज राज्यकर्त्यांना खपले कसे हा प्रश्न मनात येतो. १८४१ मध्ये व नंतर बरीच वर्षे वृत्तपत्रांच्या लेखनाचे नियंत्रण करणारे कायदे अस्तित्वात नव्हते. शिवाय इंग्रजांना एखाद्या वृत्तपत्राच्या जहाल लेखाचे भयसुद्धा त्या काळी वाटत नसावे. खऱ्याखऱ्या स्वाभिमानी राष्ट्रीय वृत्तीचे लेखन प्रभाकराने लोकांपुढे ठेवले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

केवळ सामाजिक सुधारणेची आत्यंतिक तळमळीने चर्चा करणारे 'इंदुप्रकाश' हे साप्ताहिक १८६२ मध्ये विष्णुशास्त्री पंडितांनी काढले. विष्णुशास्त्री पंडितांपुढे 'विधवाविवाह' हा विषय प्रामुख्याने होता. ज्या इर्ष्येने त्यांनी या विषयाची तरफदारी चालवली होती, तिचाच एक परिणाम या नात्याने विधवांचे विवाह व्हावे यासाठी झटणारे एक मंडळ मुंबईत स्थापन झाले आणि १८६९ मध्ये एका विधवेचा विवाहसुद्धा अतिशय थाटाने पार पाडण्यात आला. या विवाहातील 'वरघोड्या'चे जे वर्णन कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी शालापत्रकातून प्रसिद्ध केले ते ललित साहित्याचा एक सुंदर नमुना म्हणून लोकांच्या निरंतर स्मरणात राहील, अशी त्या वर्णनाची स्तुतीदेखील क्वचित जुन्या वाङ्मयात पाहायला सापडते. पंडितांच्या विधवाविवाहविषयक चळवळीला जेव्हा प्रत्यक्ष एका विवा-

हाचे फळ आले तेव्हा महाराष्ट्रातील परंपराप्रेमी जनतेमध्ये खळबळ माजून त्या खळबळीने शंकराचार्यांना या विषयात लक्ष घालण्याची पाळी आली. मराठेशाहीत या आचार्यांना कधी धर्मव्यवहारांमध्ये सर्वोच्च न्यायासनावर चढविल्याचे दाखले नाहीत. पण स्वराज्य गेल्यावर धर्माची प्रकरणे केव्हा केव्हा शंकराचार्यांकडे पाठवण्याची प्रथा पडली. १८७० मध्ये पुणे शहरी विधवाविवाहाबद्दल जी धर्मचर्चा झाली ती या प्रथेपैकीच ठरते. इंदुप्रकाश पत्राने या वेळी पुष्कळच कामगिरी बजावली आहे. या पत्राच्या लेखकांत म० गो० रानडे, का० त्रिं० तेलंग यांसारखे विद्वान होते. १८७० नंतर विष्णुशास्त्री पंडित फार वर्षे वाचले नाहीत. विधवाविवाहविषयक वादानंतर सामाजिक सुधारणेबद्दल विशेष निकराचा प्रश्नही उद्भवला नाही.

सामाजिक प्रगतिसंबंधातील इंदुप्रकाश पत्राची तीव्रता वि० ना० मंडलिकांच्या मनोरचनेस सोसणारी नसल्यामुळे त्यांनी संयमित सुधारणांचे विवेचन करण्यासाठी 'नेटिव ओपीनिअन' हे पत्र १८६४ मध्ये काढले. मंडलिकांनी त्याच्याकरिता चांगल्या प्रतिष्ठेचे समकालीन लेखक मिळवल्यामुळे नेटिव ओपीनिअनची प्रतिष्ठा वाढायला उशीर लागला नाही. प्रस्तुत साप्ताहिकाने त्या काळच्या कित्येक ग्रंथांबद्दल उत्कृष्ट समालोचनपर लेख कधी इंग्रजीतून तर कधी मराठीतून प्रसिद्ध केले होते. मागील शतकामध्ये निघणारी वृत्तपत्रे इंग्रजी व मराठी या दोन भाषांमधून प्रसिद्ध होत असत. इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, नेटिव ओपीनिअन वगैरे वृत्तपत्रे दोन भाषांतून लेख छापीत असत. इंग्रज राज्यकर्त्यांना जनतेचे हृद्गत प्रयासावाचून समजावे, असा इंग्रजी लेखांचा हेतू असे. वृत्तपत्रांची नावे पहिल्या पानावरील मराठी नावाच्या खाली इंग्रजीमध्ये छापली जात असल्याचे जुनी वृत्तपत्रे चाळण्याची सवय असणारांना सहज आठवेल. आणखी एका वृत्तपत्राचा नामनिर्देश करून मराठी वृत्तपत्रांचा विषय येथेच सोडण्याशिवाय गत्यंतर नाही. ते वृत्तपत्र म्हणजे प्रार्थनासमाजाचे 'सुबोधपत्रिका' हे होय.

मुंबईतील मुद्रणसंस्थांमध्ये गणपत कृष्णाजींचा उल्लेख प्रथम करावा लागतो. गणपत कृष्णाजींच्या छापखान्याने ज्ञानेश्वरीसारखे किती मराठी ग्रंथ शास्त्रीमंडळीच्या साह्याने संशोधनपूर्वक प्रकाशात आणले, त्यांची यादी सादर करण्याची तूर्त गरज नाही. परंतु मराठीप्रमाणे संस्कृत ग्रंथही त्यांनी छापले. त्याचे एक ठळक व सर्वमान्य उदाहरण महाभारताचे सांगितले म्हणजे पुरे. मुंबई सरकारची संस्कृत पुस्तकमाला उशिरा सुरू झाली. तोवर विद्यार्थ्यांना हातांनी ग्रंथ लिहून काढावे लागत होते. यासंबंधी लो० टिळकांची एक आख्यायिका कै० पांगारकरांनी लिहिलेली आहे. मुंबई सरकारच्या मालेत संस्कृत ललितसाहित्याचा भरणा अधिक दृष्टीस पडतो. त्या मालेला महाभारतासारखा प्रचंड ग्रंथ छापण्याचे साहस करवले नाही. गणपत कृष्णाजींनी ते साहस केले. त्यांचे महाभारत पोथीच्या आकाराचे असून त्याला प्रमाण मानण्याचा प्रघात लोकविश्रुत आहे. या ग्रंथावरून गणपत कृष्णाजींच्या

कामगिरीची कल्पना करता येईल. हल्ली हे महाभारत अतिशय दुर्मिळ झाले आहे आणि त्याच्या आवृत्ती इतरांनी काढल्या आहेत. जगदीश्वर या मुद्रणालयाचा येथे निर्देश करणे अवश्य आहे.

निर्णयसागर या मुद्रणसंस्थेच्या कामाला जोड सापडणार नाही. जावजी दादाजी चौधरी यांनी ही संस्था जन्मास घातली. प्रथम सुंदर टाईप तयार करण्याकडे त्यांनी लक्ष देऊन टाइपांचा कारखाना चालवला आणि नंतर ग्रंथप्रकाशन स्वीकारले. थोड्या किंमतीत प्रसिद्ध संस्कृत काव्ये, नाटके लोकांना मिळण्याची निर्णयसागरने तर सोय केलीच, पण १८८९ मध्ये बंद झालेल्या 'काव्येतिहाससंग्रह' मासिकातील मराठी काव्यसंग्रह या छापखान्याने लोकांस दिला. उरलेल्या इतिहाससंग्रहाची पूर्तता १९०७ मध्ये कै० पारसनिसांनी केली. निर्णयसागरच्या काव्यमालेतून जी संस्कृत काव्ये बाहेर पडली ती या छापखान्याच्या अभावी नामशेष म्हणण्याच्या अवस्थेतही उरली नसती. ती काव्ये उजेडात आणून निर्णयसागरने फार मोठा उपकार करून ठेवला.

विभाग दुसरा

मुंबईचे मानकरी



एक

पार्श्वभूमी

'मुंबई महाराष्ट्राची, स्वतंत्र, की गुजरातची?' हा प्रश्न महाराष्ट्र राज्यात मुंबई शहराचा समावेश करण्यात आल्याने निकालात निघाला असे म्हणायला हरकत नाही. मुंबई महाराष्ट्राच्या भूभागात आहे असे एकदा मुख्य प्रधान पं० नेहरू यांनी म्हटले होते. मुंबई केवळ भूगोलदृष्ट्या महाराष्ट्रात आहे, परंतु ह्या शहराच्या आज दिसणाऱ्या उत्कर्षाशी एकट्या महाराष्ट्राचा संबंध आहे ही कल्पना चुकीची, अशी पं० नेहरूंच्या विधानात गोम होती. इतिहासाकडे पाहता मुंबईशी केवळ महाराष्ट्र देशाचाच संबंध नसून, मराठी भाषिकांचाही म्हणजे महाराष्ट्रीय जनतेचाही संबंध असल्याचे दिसून येते. देवगिरीच्या यादवांचे राज्य मुसलमानी आक्रमणाने नष्ट केल्यावर या भागावर इस्लामचे वर्चस्व काही काळ गाजले. त्यांच्या मागून पोर्तुगिजांनी हा भाग ठाणे, वसई, दमण या ठिकाणांसह आपल्या हुकमतीखाली घेतला आणि इस्लाम व हिंदू धर्म या दोन्हींचे उच्चाटन आरंभले. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडचा दुसरा चार्ल्स आणि पोर्तुगालची राजकन्या यांच्या विवाहात पोर्तुगीज राजाने मुंबईचा टापू इंग्लंडला आंदण दिला. हा ऐतिहासिक दृष्ट्या विलक्षण योगायोग ठरला. येथील पोर्तुगीज राज्यकर्त्यांना आपल्या राजाचे हे औदार्य रुचले नाही. आंदणाच्या देवघेवीचे पहिले वर्ष १६६१ हे असले तरी येथील पोर्तुगीज इंग्रजांच्या हाती हा टापू पडू नये म्हणून वारंवार अडथळे उत्पन्न करीत होते. एकदा येथील पोर्तुगीजांनी, चार्ल्स राजाच्या द्रव्यलोभाकडे लक्ष देऊन, हा टापू इंग्लंडकडून विकत घ्यावा, असाही डाव टाकून पाहिला. तथापि हा डाव यशस्वी न होता ही आंदणाची भूमी इंग्रजांच्या ताब्यात गेलीच. मग इंग्रजांनी समुद्राने व्यापलेल्या या लहानशा भागाला भव्य, वैभवशाली रूप आणले. एकदा मुंबई ही इंग्रजी इलाख्याची राजधानी होती. आज ती स्वराज्यातील महाराष्ट्राची राजधानी झालेली आहे.

पण इतिहासामध्ये दृष्टिक्षेप केल्यास प्रत्यक्ष आजच्या मुंबईला राजधानीचा मान नसला तरी माहीम, घारापुरी ही ठिकाणे राजधानीचे वैभव भोगणारी होती असे आढळून येते. इतिहासपूर्वकाळी मुंबईच्या भूमीत ज्वालामुखीने उलथापालथ केल्याची प्रमाणे इतिहासज्ञांना बंदराचे धक्के बांधण्याच्या वेळी जमीन खणताना दृष्टीस पडली.

या बंदराच्या जागी एकदा रान होते; कारण खणलेल्या जमिनीत उभी व आडवी झाडे निवाली. केव्हातरी भूकंपाने हे रान जमिनीमध्ये गडप झाले व त्यावर समुद्र पसरला. ही उलथापालथ डोळ्यांआड करून उपलब्ध इतिहासाची कास धरल्यास जुन्यांतला जुना उल्लेख इ० स० पूर्व ३०० वर्षांइतका मागचा आढळतो. अशोकाच्या शिलालेखांत हा उल्लेख आहे. प्राचीन काळी कोकणच्या उत्तर भागाला 'अपरांत' ही संज्ञा होती. एकदा वसईपलिकडील सुपारा हे गाव राजधानीच्या पदावर असल्याच्या खुणा इतिहासात आहेत. आज 'मुंबई' नावाने जो वीस चौरस मैलांचा प्रदेश ओळखला जातो, त्याचे खिस्ती सनापूर्वी व नंतर सात भाग होते. 'सात बेटांचा टापू' या नावाने त्याची नोंद टॉलेमीच्या भूगोलात इ० स० १५० व्या वर्षी झालेली होती. माहीम, माजगाव, कुलाबा, वरळी इत्यादी गावांची ही बेटे इंग्रजांनी आपल्या कारभारात एकत्र केली. या भागांना वेगळेपणा आणणाऱ्या खाड्या खोल नव्हत्या, म्हणून त्या क्रमाक्रमाने इंग्रजांनी आपल्या गरजेप्रमाणे बुजविल्या आणि सगळ्या बेटांचा एक स्वतंत्र भाग निर्माण केला. प्राचीन काळी चालुक्य, शिलाहार, यादव यांचे राज्य या प्रदेशावर होते. शिलाहारांनी पुष्कळ देवळे बांधली. यादवांनी या देवस्थानांत भर टाकली. आजच्या मुंबईचा विचार करताना यादवांच्या राज्याचे अधिक महत्त्व समजावे लागते.

अल्लाउद्दीन खिलजीने यादवांचे देवगिरी येथील राज्य इ० स० १२९४ मध्ये पादाक्रांत केल्यावर तेथील राजा रामदेवराव याचा मुलगा भीमदेव पुष्कळसा लवाजमा घेऊन मुंबई प्रदेशात आला व त्याने आपले राज्य स्थापन केले. यालाच 'भिल्लम' किंवा 'बिंब' अशी आणखी नावे आहेत. या भीमाबरोबर सोमवंशी, सूर्यवंशी, शेषवंशी, पांचाळ कुणबी, किंवा आगरी, दसलाड, वीसलाड इत्यादी काही वर्ग मुंबई भागात येऊन वसले. आजच्या मुंबईचा इतिहास भीमदेवापासून सुरू होतो. भीमदेवाने माहीमला राजधानी करून ह्या स्थानाला 'महिकावती' असे नाव दिले. पाठारे प्रभू, माध्यंदिन, शुक्ल यजुर्वेदी (पळशीकर) ब्राह्मण, भंडारी, वडवाळ, माळी, पाचकळशी या जातींचे लोक भीमदेवाबरोबर येऊन त्यांनी मुंबईचे अर्थात सात बेटांचे स्वरूप पालटून टाकले. त्यापूर्वी या भागात कोळ्यांची तुरळक वस्ती होती. याची साक्ष आजच्या मुंबईतील ठिकठिकाणचे कोळीवाडे देत आहेत. 'कुलाबा' हा शब्दसुद्धा कोळ्यांच्या वस्तीचा दर्शक आहे.

यादवांचे राज्य १३४८ मध्ये संपले व मुसलमानी सत्तेचे निशाण या भागावर फडकले. मुसलमानांची सत्ता प्रत्यक्ष कितपत गाजली हे सांगणे कठीण आहे. फार तर त्यांची एखादी टोळी आपल्या सत्तेची खूण म्हणून या भागात राहत असेल आणि राज्यकारभार मात्र इतरांच्या हाती असेल, हा प्रकार जास्त संभवतो. पण मुसलमानांनी देवळांच्या विध्वंसाने आपल्या धाडीची जाणीव लोकांना करून दिली यात संशय नाही. त्यांच्या मागून सुमारे उण्यापुऱ्या दोनशे वर्षांनी पोर्तुगिजांचा अंमल

आला, त्यांनी देवाधर्मांचा विध्वंस हाच आपल्या पराक्रमाचा दाखला येथील जनतेच्या निदर्शनास आणला. पोर्तुगिजांकडून ही सात वेटांची जागा इंग्रजांकडे कशी व केव्हा गेली याची माहिती सुरुवातीस आलेलीच आहे. इंग्रजांनी मुंबईचा विकास आरंभला. परंतु कोळी, भोई, आगरी ही जातिवाचक आणि फणसवाडी, वडाळा, वरळी, चिंच-पोकळी ही वृक्षवाचक नावे इंग्रजांपूर्वीची आहेत. 'मुंबई' या नावाची व्युत्पत्ती 'उत्तम बंदर' अशा अर्थाच्या पोर्तुगीज शब्दावरून लावली जात होती. पण मुंबईचा संबंध मुंबादेवीच्या नावाशी आहे, याविषयी आता फारसा वाद उरला नाही. 'महा-अंबाआई' अशी एक व्युत्पत्ती असून 'मुंग' नावाच्या इसमाची देवी (मुंगाई–मुंबई) अशीही व्युत्पत्ती लावली जाते. जास्त पुराव्याच्या अभावी या व्युत्पत्तींवरच समाधान मानणे भाग आहे.

इंग्रजांची पहिली वखार १६१२–१३ मध्ये सुरतेस स्थापन झाल्याचा वृत्तांत प्रसिद्ध आहे. व्यापार हे ह्यांचे ध्येय होते. मुंबईची वेटे ताब्यात घेताना त्यांना तसदी पडली. शेवटी ही वेटे पूर्णपणे कबजात आल्यावर त्यांनी धार्मिक छळाचे धोरण बाळगले नसल्याने ठाणे, वसई ह्या भागांतील पुष्कळ लोक मुंबईस आले व मुंबईची वस्ती झपाट्याने वाढत गेली. आपले मुख्य ठाणे सुरतेहून उठवून इंग्रजांनी मुंबईस आणले. त्यांच्या गव्हर्नरांपैकी ज्याने मुंबईच्या विकासाचा पाया घातला त्याचे नाव जेराल्ड आंजिअर. तो मुंबईस राहिला. त्याने येथे समुद्रावर किल्ला बांधला. समुद्र हटवून लोकांच्या वस्तीसाठी जमीन मिळविण्याच्या योजना तयार केल्या व माळी, भंडारी यांना उत्तेजन देऊन धान्याचे, फळांचे पीक वाढविले. मुंबईच्या भरभराटीचा पाया याने घातला. तरी इंग्रजांना मोगल, सिद्दी, डच, फ्रेंच, पोर्तुगीज आणि मराठे यांच्याशी झगडावे लागले. जंजिऱ्याच्या सिद्द्यांनी दोनदा इंग्रजांना झपाटले. एका वेळी ते वर्षभर माजगावास तळ देऊन बसले होते; पण इंग्रजांना जिंकू शकले नाहीत. सतराव्या शतकाच्या शेवटी औरंगजेब महाराष्ट्रात आल्यावेळी आंजियरनंतरच्या चाइल्ड नावाच्या गव्हर्नराला आपल्या गैरवर्तनाबद्दल हात बांधून बादशहासमोर लोटांगण घालून माफी मिळवावी लागली; तरी बादशहाने चाइल्डच्या हकालपट्टीची अट फर्मानात घातलीच. शिवाजीमहाराजांचे आरमार एकदा चौपाटीच्या समुद्रात फेरी मारून गेल्याचा निर्देश पाहायला सापडतो. फ्रेंचांचा जोर पूर्वेकडे मद्रासच्या बाजूस अधिक होता. डच लोकांची मात्रा पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांनी चालू दिली नाही. पोर्तुगिजांना खिळखिळे करण्याचे काम मराठ्यांनी चालविले होते. यामुळे त्यांच्या कटकटींना इंग्रजांनी फारशी भीक घातली नाही. सिद्दीसुद्धा मराठ्यांकडून घेरला जात होता. इंग्रज लोक डच, फ्रेंच, मराठे, सिद्दी या सर्वांनाच 'चाचे' म्हणतात. या प्रदेशाच्या मूळ वस्तीला, मराठ्यांच्या आरमारालादेखील इंग्रज लोकांनी 'चाचे' म्हणावे याचे आश्चर्य वाटते, किंबहुना चीडही येते. शिवाजी महाराज, कान्होजी आंग्रे यांची यथेच्छ निंदा गेल्या शतकातील मुंबईच्या काही इंग्रज इतिहासलेखकांनी केलेली आहे.

१७३९ मध्ये मराठ्यांनी वसईचा प्रदेश काबीज केल्यावर पोर्तुगिजांची इंग्रजांना किंमत वाटेनाशी झाली. सिद्दी त्यापूर्वीच खिळखिळा झाला होता. इंग्रजांनी ज्यांचा वचक बाळगावा असे काय ते मराठेच उरले होते. कान्होजी आंग्र्याच्या मागून त्याच्या मुलांत भाऊबंदकी माजून तुळाजी आंग्रे जेव्हा विशेष बळावला तेव्हा इंग्रजांची मदत घेऊन त्याचे पेशव्यांनी पारिपत्य केले. पण ही मदत फार महाग ठरली. इंग्रजांनी कोकणपट्टीची काही गावे पेशव्यांकडून मागून घेतली. राघोबादादाच्या भाऊबंदकीमुळे इंग्रजांचे चांगलेच फावले. त्यांनी १७४४ पासून मुंबईलगतचा व गुजरातकडील मुलूख मागायला सुरुवात केली. १८०३ मध्ये दुसरा बाजीराव इंग्रजांना अंकित झाला. हे अंकितत्व पुढे पंधरा वर्षांनी कायमचे संपले आणि इंग्रजांचे साम्राज्य अस्तित्वात आले.

अठराव्या शतकात इंग्रजांचा जसा जगभर—एक अमेरिका सोडून—उत्कर्ष होत गेला तसाच तो मुंबईच्या भागातही झाला. मुंबईची वस्ती पेशवाई समाप्त होण्याच्या वेळी दोन लाखांच्या घरात गेली होती. समुद्र हटवून नव्या जमिनी व बंदरे उदयास आणण्याचे काम चालले होते. मुंबईस जाणारा मनुष्य अल्पायुषी ठरतो हा सुरुवातीचा अनुभव इंग्रजांनी या शतकात पुष्कळच आवरला होता. पाण्याचा पुरवठा, रात्रीची दिवाबत्ती, आरोग्याची साधने वगैरे नागरिकांच्या हिताची कामे चालू होती. पण ती खऱ्या अर्थाने यशस्वी झाली एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात. पेशवाई जिंकणारा एल्फिन्स्टन हा मुंबईचा गव्हर्नर होताच त्याने लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था अंमलात आणली. शिक्षणाने लोक शहाणे झाले की ते आपले वर्चस्व झुगारून देतील हे भविष्य एल्फिन्स्टनला माहीत होते. पण ज्या दिवशी सज्ञान हिंदी जनता आपल्या हातून राज्य हिसकावून घेईल तो दिवस इंग्लंडच्या इतिहासात अत्यंत गौरवाचा समजला जाईल, असेही त्याने शिक्षण सुरू करताना आपल्या हाताखालच्या एका अधिकाऱ्याला स्पष्ट बोलून दाखविल्याची माहिती त्याच्या चरित्रात आहे. अठराव्या शतकातील इंग्रजांच्या न्यायपद्धतीने सामान्य जनतेमध्ये माणुसकीच्या काही हक्कांची जाणीव उद्भवली होती. तिलाच पुढे शिक्षणाने बळ पुरविले. इंग्रजी न्यायपद्धती कार्यक्षम होण्यासाठी इंग्लंडाहून राजातर्फेचे न्यायाधीश इकडे येत असत. आपल्या न्यायनिवाड्यांच्या द्वारे त्यांनी जोरजुलूम कह्यात ठेवला. वस्तुतः अठराव्या शतकात अधिकार गाजविणारा इंग्रज बहुतांशी जुन्या जुलमी वळणाचा, रानटीच होता. पण त्या शतकात इंग्लंडमध्ये जी ज्ञानाची प्रगती चालू होती, तिच्या सरकाराचे न्यायाधीश येथील न्यायाचा कारभार सुधारीत होते. एकोणिसाव्या शतकात इंग्रजांची व्यापारी मंडळी राज्यकर्तृत्वाची सूत्रधार बनली. मुंबईचे खरे नागरिक जीवन या शतकात उदयास आले व त्या जीवनात अग्रेसरत्वाने चमकणाऱ्या व्यक्तींची कामगिरी 'मुंबईचे मानकरी' या नात्याने सांगायची आहे.

इंग्रजांनी येथील मूळच्या कोळी, भंडारी, पाचकळशी, पाठारे प्रभू या वर्गांना

आरंभी उत्तेजन देऊन आपला कारभार चालविला. भंडारी हे पिण्याची दारू तयार करणारे म्हणून प्रसिद्ध असले तरी ते शूर होते. इंग्रजांनी त्यांना आपल्या सैन्यात दाखल करून घेतले होते व एकदा शिद्द्याचा त्यांनी पराभव केल्यामुळे त्यांना काही सवलती इंग्रजांनी दिल्याचा दाखला सापडतो. पाचकळशी हे सुतारकामात निपुण अशी त्यांची ख्याती होती. 'पाचकळशी अन् कोण म्हणेल आळशी' अशी त्यांच्या निरलस उद्योगप्रियतेवरून म्हण पडली होती. पाठारे प्रभूंनी कारकुनी पेशा स्वीकारला होता. स्थानिक समाजात इंग्रजांनी सुरतेचे हिंदू व्यापारी सेठ आणि पारशी माणसे नव्याने आणली. इंग्रजांनी मुंबईचा ताबा घेतला तेव्हा एकच पारशी येथे होता. परंतु ज्याची कामगिरी सांगण्याजोगी ठरते असा लवजी वाडिया नावाचा पारशी इंग्रजांनी सुरतेहून बोलावला. व्यापारी व लढाऊ जहाजे बांधण्यात त्याचा हातखंडा होता. ईस्ट इंडिया कंपनीची आरमारी जहाजे त्याने बांधली. या जहाजांची कार्यक्षमता इंग्लंडातही वाखाणली गेली. वाडिया घराण्याच्या तीन पिढ्या जहाजे बांधण्याचे काम करीत होत्या. लवजीच्या कुशलतेने इंग्रज संतोषून त्यांनी परळच्या भागात पुष्कळशी जमीन त्याला बक्षीस दिली. आंजिअरने जी टाकसाळ सुरू केली तिच्या व्यवहारात एकदोन हिंदू सोनार पुढारले. प्रख्यात नाना शंकरशेट यांचा पूर्वज इंग्रजांच्या आश्रयाने मुंबईत आला होता. आंजियर गव्हर्नरापासून एल्फिन्स्टन-पर्यंत या सवाशे वर्षांत मुंबईमध्ये झालेल्या घडामोडींचा हा त्रोटक वृत्तांत आहे.

एल्फिन्स्टन गव्हर्नराने सार्वत्रिक शिक्षणाला प्रारंभ केला, पण तो फार सावधपणाने केला. त्याच्या शिक्षणयोजनेत धर्मशिक्षणाला स्थान नव्हते. पाठ्यपुस्तकांत शंकर, गणेश, भवानी, विष्णू या देवतांची स्तवने न देता निराकार देवाच्या कवितांना त्याने मान दिला. कोणत्याही धर्माच्या किंवा पंथाच्या विद्यार्थ्याला रुचणार नाहीत अशा कवितांचा संग्रह मुद्दाम तयार करविला. ख्रिस्ती धर्माला प्राधान्य देऊन शिक्षण देणाऱ्या शाळा ख्रिस्ती मिशनरी चालवीत होते. मिशनऱ्यांच्या शाळांमध्ये वाटेल त्या जातीचे विद्यार्थी दाखल करीत असत. त्यांनी मुलींच्याही शाळा स्थापन केल्या होत्या. एल्फिन्स्टनने पेशवाईमध्ये श्रावण महिन्यात देशातील शास्त्रीवर्गांना देणग्या देण्याचा जो प्रघात होता त्याकडे लक्ष देऊन प्रथम पुणे शहरात जुन्या पद्धतीने शास्त्रे शिकविणारी संस्कृत शाळा स्थापन केली व श्रावणातल्या दक्षिणेला नवे रूप दिले. पुढे काही वर्षांनी ह्या शाळेला इंग्रजी शिकण्याचे वर्ग जोडले. कालांतराने संस्कृत शाळा लोपली व तिची जागा हायस्कूल व डेक्कन कॉलेज या संस्थांनी घेतली. डेक्कन कॉलेज हे खऱ्या अर्थाने दक्षिणा कॉलेज होते. पुण्यास विशेष प्रसंगी ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची पद्धत पेशवाई गेल्यावर चारपाच वर्षे चालू होती. सरकारी शाळांतून ब्राह्मण, मराठे या स्पृश्य वर्गांनाच दाखल करून घ्यावे, अस्पृश्य मानलेल्या समाजाला ब्राह्मण-

मराठ्यांना दुखवून शिक्षण देण्याचा आग्रह न धरणे श्रेयस्कर, असे सरकारचे धोरण होते. ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांसाठी शाळा काढण्याचे धाडस केले. सरकारने ह्याचे कौतुकही केले; परंतु अस्पृश्यांसंबंधातील आपले धोरण बदलले नाही. तेव्हा इंग्रजी भाषा शिकणे हे एक दिव्य होते. ती भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्याला शाळेतून परतल्यावर घराच्या दाराबाहेर स्नान केल्याखेरीज घरात प्रवेश मिळत नव्हता. विद्यार्थ्याला इंग्रजी शब्दांचा अभ्यास घरातल्या माणसांना चुकवून करावा लागे अशीही उदाहरणे आहेत. इंग्रजांच्या अंगावरून आपल्या अंगावर वारे येऊ नये अशीही खबरदारी शास्त्रीवर्ग घेत होता, असा वृत्तांत क्वचित वाचायला सापडतो. परंतु इंग्रजी शिकल्यानेच कल्याण होईल, असे कृष्णशास्त्री चिपळूणकरांना त्यांच्या गुरूने सांगितल्याची हकिगत पुष्कळांना माहीत असेल.

मुलांच्या शिक्षणाची जर मागे उल्लेखिल्याप्रमाणे दशा होती, तर मुलींच्या शिक्षणाबद्दल बोलायलाच नको. मुलांच्या शिक्षणाला जनतेचा विरोध होता, पण सौम्य होता. मुलींचे शिक्षण म्हणजे समाजावर ओढवणारे भयंकर गंडांतर अशा समजुतीने त्या शिक्षणाला पोक्त वयाची जनता विरोध करीत होती. हा विरोध मुंबईला मुलींच्या शाळा निघाल्या तेव्हाच चालू होता असे नव्हे; तर पुढेही तीन पिढ्या चालू होता. मुलींना शाळेत नेणे व घरी आणून पोचविणे ही कामे शिक्षकांना करावी लागत. ही कामे करताना त्यांना ऐकू जातील अशा दुरुक्ती उच्चारण्यावरच विरोधकांचे समाधान होत नसे; तर त्यांवर लपूनछपून खडेमारही करण्यापर्यंत विरोधकांची मजल जात असे. १८८०-१८९० च्या दरम्यान मुंबईला व पुण्याला शिकणाऱ्या मुलींना जो त्रास सोसावा लागला त्याची साक्ष डॉ० आनंदीबाई जोशी यांच्या चरित्रात व पुण्यातील हुजूरपागा शाळेच्या इतिहासात जिज्ञासूंना पाहायला सापडेल. परंतु या विरोधाने मुलींच्या शाळा निघण्याचा क्रम बंद पडला नाही, किंवा शिकणाऱ्या मुलींची संख्याही ओहोटली नाही.

एल्फिन्स्टन हा ज्ञानाचा भक्त होता, पण वृत्तपत्रांचा शत्रू होता. वृत्तपत्रे न निघणे उत्तम व निघाल्यास त्यांवर कडक नियंत्रण असावे, शक्य तोवर वृत्तपत्रे काढण्यालाच परवानगी नसावी, असा त्याचा ठाम अभिप्राय होता. १८२७ मध्ये एल्फिन्स्टन स्वदेशी गेल्यावर त्याच्या स्मरणार्थ लोकांनी दोन-अडीच लाख रुपयांची रक्कम उभी करून त्याच्या नावाने शिक्षणसंस्था अस्तित्वात आणली. प्रथम एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट एवढेच तिला नाव होते. पुढे एल्फिन्स्टन कॉलेज व एल्फिन्स्टन हायस्कूल अशा दोन संस्था निघाल्या. शाळाखात्याला सुरुवातीस 'बोर्ड' म्हणत; पण पुढे त्याला पढतशीर खात्याचे स्वरूप आले. १८५५ मध्ये विद्यापीठ अस्तित्वात आले. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट विद्यार्थ्यांनी एक ज्ञानप्रसारक सभा काढून तेथे नव्या नव्या विषयांवर निबंध वाचण्याचा पायंडा घातला. ज्ञानप्रसारकाच्या गुजराती व मराठी अशा दोन शाखा होत्या. या सभेत भाग घेणारे बहुतेक जण कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात पुढे प्रसिद्धी पावलेले आहेत. स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीची व पुढे या सोसायटीने चालू

केलेल्या मुलींच्या शाळेची ज्ञानप्रसारक सभा ही एका प्रकारे पूर्वपीठिका म्हणता येईल.

लोकांच्या विरोधाला न जुमानता ज्याप्रमाणे मुलींच्या शाळा निघाल्या त्याचप्रमाणे सरकारी विरोधाची क्षिती न बाळगता देशी वृत्तपत्रेही जन्मास आली. इंग्रजी भाषेत इंग्रजांनी चालविलेल्या वृत्तपत्रांचा इतिहास १७८९ पासून सुरू होतो. इंग्रजांची वृत्तपत्रे पुष्कळच होती. मराठीचे पहिले वृत्तपत्र 'दर्पण' हे बाळशास्त्री जांभेकरांचे, ही गोष्ट सर्वांच्या माहितीची आहे. दर्पण पत्र इंग्रजी, मराठी अशा दोन भाषांमध्ये निघत होते. इंग्रजी, मराठी अशा दोन भाषांचा प्रयोग दर्पणनंतरच्या काही वृत्तपत्रांनी पुष्कळ वर्षांपर्यंत चालविला होता. शिक्षणाने होऊ घातलेल्या विचारक्रांतीसाठी वृत्तपत्राची आवश्यकता आमच्या लोकांना वाटली यात नवल नाही. दर्पणाहून अधिक ज्ञानदायक 'दिग्दर्शन' हे वृत्तपत्र होते. त्यात आधिभौतिक शास्त्रांचे विषय सुबोध रीतीने वाचकांना समजावून देण्याचा प्रयत्न केला जात होता. तसेच 'ज्ञानसंग्रह' नावाचे मासिक होते. परंतु ज्याचे मुद्दाम नाव घ्यावे असे वृत्तपत्र भाऊ महाजनांचे 'प्रभाकर' हे असून त्यात सर्व सामाजिक व राजकीय विषयांची चर्चा अतिशय सडेतोडपणाने केली जात असे. इंग्रजांची वक्रदृष्टी त्यांच्यासंबंधीच्या कडक टीकेकडे कशी वळली नाही, याचे आश्चर्य वाटते. प्रभाकराचा जन्म १८२१ चा; ते पुढे पुष्कळ वर्षे चालले होते. १८४८ मध्ये लोकहितवादींची शतपत्रे प्रभाकरात प्रसिद्ध होऊ लागली. इंग्रजी शिक्षणापायी तरुण पिढी विचाराने भ्रष्ट होत असल्याची साधकबाधक चर्चा या वृत्तपत्रात विशेष उत्कटपणाने चालली होती. दुसरे पत्र मिशनऱ्यांचे 'ज्ञानोदय'. १८४० नंतरची महाराष्ट्रातील लोकस्थिती समजावून घेण्याला त्याचा उपयोग आज होऊ शकतो.

नवा भूगोल, नवा इतिहास, पदार्थविज्ञान आणि रसायन ही शास्त्रे शिकणाऱ्या तरुणवर्गात विकारक्रांती उद्भवली. या क्रांतीला मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराची मदत घडत होती. पुराणांतील भूगोल नवशिक्षितांना खोटा वाटावा हे सरळच आहे. धर्मपरंपरेला घट्ट धरून आपण युरोपियन जगाच्या मागे पडलो आहो, याची तीव्र जाणीव शिकलेल्या तरुणांत उद्भवली, तर जुनी परंपराच कल्याणकारक आहे असे सिद्ध करण्याचा आवेश शास्त्रीवर्गात बळावला. तेही ठाकुरद्वार येथे आपल्या परंपरेची चिरकालीन इष्टता लोकांच्या गळी उतरविण्यासाठी झटत होते. पण जुने स्पर्शास्पर्शाचे विचार ढासळावे अशी नवी स्थिती वाढत होती. इंग्रजांनी १८४३ मध्ये आगगाडीचा कारखाना सुरू केला. १८५४ साली कापडाची गिरणी निघाली. कारखान्यात राबणारा कामगार खेड्यातून मुंबईस आला. त्याच्यासाठी चाळी, खाणावळी उदयास आल्या. आगगाडीने तर जातिजातींतल्या स्पर्शास्पर्शविचाराच्या मुळावरच घाव घातला. तिसऱ्या वर्गात ब्राह्मणशेजारी महार-मांग बसले तरी हरकत घेण्याची सोय उरली नाही. म्हणूनच "आगगाडी हा मोठा सुधारक" असा एका थोर जुन्या पुढाऱ्याने अभिप्राय लिहून ठेवला आहे.

जातिभेद नष्ट व्हावा, असे नवीन शिकलेल्यांच्या मनात येऊन त्यांतल्या अनेकांनी एक 'परमहंस' नावांची संस्था काढली. दर आठवड्यास रविवारी एकत्र जमावे,

पावाचे तुकडे खावे आणि पाणी प्यावे. ते एकमेकांचे उष्टे खात होते, असा प्रकार नव्हता. 'परमहंस' हा शब्द योजण्यात संस्थापकांनी मार्मिकपणा दाखविलेला होता. सर्व धार्मिक विधिनिषेधांच्या पलिकडे गेलेला तो 'परमहंस'. संस्थापकांना विधिनिषेध मोडायचे होते, परंतु आपला व्यवहार उघडपणे चालविण्याचे धैर्य ह्यांच्यात नव्हते. काही दिवसांनी हा गुप्तपणा संपला व एका शिमग्याच्या सणात शिमग्यातील एका कवीने ह्या गौप्याचा स्फोट केल्यामुळे 'परमहंस सभे'चे सभासद गावोगाव पळून गेले. हे सभासद चटोर वृत्तीचे बेजबाबदार तरुण नव्हते. यांतल्या कित्येकांनी १८६७-मध्ये प्रार्थनासमाजाला जन्म दिला. त्यांची नावे पाहिल्यास त्यांची समाजातील प्रतिष्ठा समजून येईल. परंतु परमहंस सभेच्या काळात ते अल्पवयस्क होते. यामुळे साहजिकच त्यांच्या ठिकाणी समाजाच्या विरोधाला टक्कर देण्याचे धैर्य व सामर्थ्य नव्हते. परमहंस सभेला तिलांजली देऊन स्वस्थ राहण्याचा उपाय त्यांनी पत्करला.

शाळेतील केवळ वाङ्मयात्मक शिक्षणाच्या जोडीला शिल्प, स्थापत्य, वैद्यक इत्यादी उपयुक्त विषय ठेवणे अवश्य वाटून इंग्रजांनी त्या विषयांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. विद्यार्थ्यांना द्रव्याची म्हणजे केवळ छात्रवृत्तीचीच नव्हे, तर राहण्याची, खाण्यापिण्याची (व तीही जातिभेद सांभाळून) तरतूद करून विद्यार्थी जमविले. हे विषय एकदा मराठी भाषेतूनच शिकविले जात होते. ही प्रथा चालू राहती तर आज शास्त्रीय विषयाची देशी परिभाषा नसल्याची जी अडचण वाटते ती राहिली नसती. बाहेरगावाहून मुंबईला शिकायला जायचे म्हणजे खाडी ओलांडणे भाग व खाडी ओलांडणे म्हणजे समुद्रपर्यटनाचे पाप, यामुळे शिल्पस्थापत्यादी विषयांकरिता पुण्याहून जे विद्यार्थी निवडले जात त्यांत ब्राह्मणांचे नाव दिसत नाही. कारण समुद्रप्रवासापायी एका शास्त्र्याला त्या काळी खडतर प्रायश्चित्त घ्यावे लागल्याचे उदाहरण आहे.

आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रे, वृत्तपत्रे, शाळेतील विविध शिक्षण यांमुळे सामाजिक संक्रमणाचे बीजारोपण झाले. सामाजिक दुराचार बंद करणाऱ्या सरकारी कायद्यामुळेही समाजाच्या परंपरागत वहिवाटी व त्यांवर आधारलेले आचार-विचार आपोआप पालटत चालले. सती जाण्याला बंदी करणारा कायदा प्रसिद्ध असल्याने त्याचा निर्देश केल्याने काम भागेल. कायदा ब्राह्मण-शूद्र हा भेद न ओळखता गुन्हेगार ब्राह्मण असला तरी त्याला शिक्षा भोगायला लावतो, ब्राह्मण खुनाचा गुन्हेगार असेल तर 'ब्राह्मण अवध्य' या स्मृतिप्रणीत कायद्याने सुटका होण्याऐवजी त्याला फाशी जावे लागते, वगैरे व्यवहार सामाजिक संक्रमणाच्या विचारसरणीला पोषीत होता. १८५६ मध्ये विधवांना पुनर्विवाहाची कायद्याने परवानगी मिळाली. सरकारी कायदे, सरकारी न्याय, शिक्षण, ख्रिस्ती मिशनऱ्यांचा धर्म-प्रसाराचा उद्योग, यांच्या परिणामी समाजाची जुनी घडी मोडून नवी घडी बसत होती. येथे निवेदन केलेला त्रोटक वृत्तांत १८२० ते १८६० या चाळीस वर्षांतील आहे. या नव्या घडीला अनुसरून आपली कर्तव्ये कोणती याचा विचार करून त्या

कर्तव्यांच्या सिद्धयर्थ नवी साधने ज्यांनी हाती घेतली त्यांना 'मुंबईचे मानकरी' हे नाव शोभते व त्यांची कामगिरी पुढे सांगायची आहे.

आता सामान्य शिक्षणाबाहेरील एका संस्थेचे थोडक्यात इतिवृत्त सांगून ही समाजजागृतीची माहिती आवरती घेणे बरे. ही संस्था मॅकिंटाश नावाच्या इंग्रज सर-न्यायाधीशाने १८०४ मध्ये फक्त युरोपियनांसाठी काढली. वाङ्मय, इतिहास, संशोधन या कामांसाठी ही संस्था काम करीत होती. तिच्यामध्ये भारतीयांचा प्रवेश १८४० च्या सुमारास झाला. हीच संस्था रॉयल एशिआटिक सोसायटीची मुंबईतील शाखा या नावाने ओळखली जाते. या संस्थेच्या विद्यमाने मुंबईच्या कित्येक भारतीय मानकऱ्यांनी मोठी संशोधनाची कामगिरी बजावली आहे. मुंबईच्या इतिहासात या संस्थेचे फार महत्त्व आहे.

दोन

पाहिले मानकरी

मुंबई शहराच्या उपयुक्ततेला व शोभेला हातभार लावल्यामुळे 'मानकरी' हा शब्द यथार्थतेने लागू पडण्याजोगी पहिली व्यक्ती रामजी कामत या नावाची सतराव्या शतकाच्या अखेरीस व अठराव्याच्या आरंभी होऊन गेली. इंग्रजी कागदांतून 'कामाठी' असा शब्द येत असल्यामुळे हा पुरुष कामाठ्यांपैकी कोणी तरी असावा ही समजूत काही काळ रूढ झाली असल्यास नवल वाटायला नको. 'राम कामाठी', 'रामजी कामाटी' असे त्याचे उल्लेख आढळतात. परंतु संशोधनाने हा पुरुष सारस्वत ब्राह्मणांपैकी होता हे आता निश्चित झाले आहे. हा उदयास आला तो काळ इंग्रजांनी मुंबई बेटाच्या विकासाला नुकताच प्रारंभ केला तेव्हाचा होता. इंग्रजांना तेव्हा जी संकटे भोवत होती, त्यांत कान्होजी आंग्रे यांचे आरमार हे एक फार मोठे संकट होते. थोड्याशा उत्युक्तीने बोलायचे झाल्यास असे म्हणता येईल की अष्टौप्रहर जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी इंग्रज अंमलदारांना कान्होजी आंग्रे दिसत असे. कान्होजीच्या भीतीने इंग्रज मुंबईच्या वतनदार रहिवाशांकडे फितुरीच्या संशयाने पाहत असत. मुंबईच्या वस्तीकरांना पोर्तुगीज-इंग्रजांपेक्षा कान्होजीसारखे स्वकीय अधिक प्रिय वाटत असतील आणि ते आतून कान्होजींशी काही कारस्थाने करीत असतील, या संशयाने इंग्रजांना ग्रासले होते. आणखी एक कारण म्हणजे इंग्रजांच्या नोकरीतील काळ्या-गोऱ्या फौजेचा असंतोष हे होय. या फौजांच्या कटकटी पुष्कळदा उत्पन्न झाल्या होत्या व एकदा तर गोऱ्या फौजेने कंपनीच्या अधिकाऱ्यांना बंदीत टाकून इंग्लंडच्या राजाच्या नावे मुंबई बेटाचा अधिकार आपल्या हाती घेतल्याचा अनुभव येऊन गेला होता. आपली फौज असंतुष्ट व प्रजेत कान्होजीसारख्या शत्रूविषयी सहानुभूती दाखविणारे लोक, ही स्थिती धोक्याची म्हणून इंग्रज अधिकारी आपल्या प्रजेपैकी प्रतिष्ठेच्या लोकांबद्दल साशंक असत. या साशंकतेने रामजी कामत या पुरुषाला पछाडून त्याचा बळी घेतला.

रामजी कामत याच्या जन्मवर्षाची नोंद सापडत नाही. तो १७२८ मध्ये तुरुंगात मरण पावला तेव्हा त्याचे वय किती होते हे सांगता येत नाही. हा हिंदू धर्माचा अभिमानी होता. या धर्माच्या रूढ परिपाठाशी विसंगत असे वर्तन कोणी करू लाग-

ना० जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट

विश्वनाथ नारायण मंडलीक

लक्ष्मणराव हरिश्चंद्र अजिंक्य ऊर्फ भाऊ रसूल

विष्णुबुवा ब्रह्मचारी

करसनदास मुळजी

डॉ० भाऊ दाजी लाड

काशिनाथ त्र्यंबक तेलंग



लॉर्ड एल्फिन्स्टन

चार्ल्स फोर्जेट : पोलीस कमिशनर

सर चार्टल फ्रीयर

जमशेटजी जीजीभाई वाटलीवाला

कावसजी जहांगीर रेडिमनी

बद्रुद्दीन तैयबजी

फेरोजशहा मेथा

डॉ० जॉन विल्सन

त्यास त्याला पेशवाईमार्फत तंबी मिळावी, अशी खटपट त्याने केल्याचे एक उदाहरण मराठी ऐतिहासिक साधनांत आहे. इ० स० १६९३ साली त्याने पेशव्यांच्या कोकणातील अधिकाऱ्याकडे एक तक्रारीचे पत्र पाठविले असून त्यात एका जमातीमध्ये एकदोन गुंड वाटेल त्यांना आपल्या जमातीमध्ये प्रवेश करू देतात व त्या योगाने ती सारी जमात भ्रष्ट होईल अशी तक्रार केली असून सदर पत्रात त्याने 'मऱ्हाट धर्म' हा शब्द वापरला आहे. मऱ्हाठ(ट) धर्म—हल्लीचे रूढ रूप 'महाराष्ट्र धर्म'—याचा विचार करणाराला रामजीच्या पत्रातील शब्द उपयोगी पडणारा आहे. थोडेसे विषयांतर पत्करून सांगावेसे वाटते की, जुन्या ऐतिहासिक साधनांतून सर्वत्र 'मऱ्हाठ(ट) धर्म' असा शब्द पाहायला सापडतो. अर्वाचीन काळी त्याला 'महाराष्ट्र धर्म' असे संस्कृत रूप देण्यात आले व त्यावरून नानाविध तर्कांना जागा झाली आहे. मूळचा शब्द मराठ्यांचा अर्थात मराठे म्हणविणाऱ्या हिंदूंचा धर्म एवढाच अर्थ सुचविणारा आहे.

रामजी कामताचा मराठशाहीच्या अधिकाऱ्यांशी पत्रद्वारे संबंध होता, याचे ज्ञान इंग्रजांना असावे. या ज्ञानात रामजी हा कान्होजीकडे इंग्रजांविरुद्ध पत्रे पाठवितो या माहितीची भर टाकण्याची संधी रामजीच्या शत्रूंनी घेतली. इंग्रज गव्हर्नराच्या हाती रामजीने कान्होजीस पाठविलेली दोन पत्रे आली. पत्रांचे अक्षर व त्यांवरील शिक्कामोर्तब रामजीचे असल्याबद्दल इंग्रजाला संशय न येण्याइतका हा पत्रांचा प्रकार हुबेहूब होता. या पत्रांच्या अनुरोधाने आणखी माहिती मिळण्यासाठी गोविंदजी नावाच्या रामजीच्या नोकराला इंग्रजांनी पकडले. त्याच्याकडून माहिती काढण्यासाठी त्याचा अमानुषपणे जो छळ केला तो इंग्रजांच्या तत्कालीन न्यायपद्धतीला मान्य नसल्याने एका गोऱ्या अंमलदाराने रामजीच्या खटल्यात भाग घेण्याचे नाकारले. गोविंदजीकडून जुल्मजबरदस्तीने काढलेली माहिती व ती पत्रे हाच काय तो इंग्रज न्यायदात्यांचा मुख्य आधार होता. फिर्यादी व न्यायाधीश ही माणसे एकच होती. रामजीला हा घोटाळा व त्या योगाने ओढवणारा विपरीत प्रसंग दिसत होता; परंतु त्याने शांतचित्ताने आपली कैफियत तयार केली. फिर्याद चालू होताच "गोविंदजीची साक्ष विश्वसनीय नाही, कारण ती जबरदस्तीची आहे," असे रामजीने म्हटल्यामुळे न्यायाधीश चपापले व त्यांना खरी हकिगत सांगताना गव्हर्नराने छळाचे उपाय योजल्याची सांगून टाकली. पत्रांच्या हस्ताक्षराबद्दलही संशय निघाला होता. तथापि निकालावर या कबुलीजबाबाचा व हस्ताक्षराच्या संशयाचा परिणाम झाला नाही. ती दोन सहीशिक्क्याची पत्रे जमेस धरून न्यायाधीशांनी रामजीस जन्मठेप कैदेची शिक्षा ठोठावली. १७२० मध्ये खटला सुरू झाला व १७२८ मध्ये रामजीचा तुरुंगच नव्हे तर मृत्युलोकही सुटला. कालांतराने अर्थात रामजीच्या नंतर ती पत्रे साफ बनावट असल्याचे सिद्ध झाले. इंग्रज लेखक या खटल्याचा वृत्तांत देताना त्या वेळच्या गव्हर्नराची निंदाव्यंजक शब्दांनी संभावना करताना दिसतात. खटला खोटा होता

असे ठरल्यावर रामजीची खटल्यानिमित्त जप्त केलेली मालमत्ता रामजीच्या वारसाला परत करण्याचे औदार्य इंग्रज राज्यकर्त्यांनी दाखविले नाही. फक्त ६००० रुपये त्याच्या मुलाला दिले. रामजीबरोबर दुलबा भंडारी नावाच्या इसमावर राज्यकर्त्यांच्या रोषाची संक्रांत वळली, पण रामजीच्या एवढी विपत्ती त्यावर ओढवली नाही. रामजी कामत हा मुंबईचा मानकरी कसा, या प्रश्नाचे उत्तर त्याने अनेक देवळे बांधली, त्यातल्या त्यात आधी मुसलमान व मागून पोर्तुगीज यांनी उद्ध्वस्त केलेल्या वाळकेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार केला, ही रामजीची धर्मकृत्ये पाहिल्यास मिळते. हे देऊळ त्याच्या मानकरीपणाची साक्ष निरंतर देत राहील. त्याचा खटला म्हणजे इंग्रजी राज्यावरील कलंक हेसुद्धा लोक या देवळाच्या साक्षीने विसरणार नाहीत.

यापुढचे दोन मानकरी अर्वाचीन म्हणजे गेल्या शतकातील आहेत. एक लक्ष्मण हरिश्चंद्रजी अजिंक्य व दुसरा विष्णुबुवा ब्रह्मचारी. पहिल्याला 'भाऊ रसूल' या नावाने ओळखतात. हा समुद्रावर बंदरे बांधण्याचे काम करणारा एक कंत्राटदार होता. याचेही जन्मवर्ष सापडले नाही. हा १८५९ मध्ये वारला असावा, असे त्याच्या मुलाने सरकारात केलेल्या अर्जावरून म्हणावे लागते. भाऊकडे ठाणे जिल्ह्यातली काही गस्ते वहिवाटीला होती. त्यासंबंधाच्या एका अर्जात भाऊने आपण कोणती मोठाली बंदरे बांधली याचा निर्देश केलेला आहे. ही कामे लक्षावधी रुपयांची होती. त्या योगाने भाऊला विपुल द्रव्य मिळाले. विपुल द्रव्य मिळविताना जे धोके उद्भवतात त्या धोक्यांच्या कटकटीत भाऊ सापडला. त्याच्या बरोबर रसेल नावाचा एक युरोपियनदेखील कायद्याच्या जाळ्यात सापडला होता. त्याला नोकरीतून बडतर्फ व्हावे लागले. भाऊदेखील कायद्याच्या कचाट्यातून सुटला. परंतु सुटकेच्या उद्योगात द्रव्यहानी घडली व द्रव्यदृष्ट्या भाऊचे डोके पुन्हा वर निघाले नाही. आज भाऊ हा 'भाऊचा धक्का' या नावाने लोकांच्या स्मरणात राहिला आहे. या स्मरणासाठीच त्याची मानकऱ्यांत गणना केली आहे. भाऊचा कारभारातील जोडीदार 'रसेल' याचा अपभ्रंश 'रसूल' आहे. परंतु 'भाऊ रसूल' हा शब्दप्रयोग रूढ असल्याने रसूल हे भाऊचे आडनाव असावे असा समज उत्पन्न होतो.

विष्णुबुवा ब्रह्मचारी याची मोठी कामगिरी मिशनऱ्यांशी वाद ही आहे. हा १८७१ मध्ये मुंबईतच वारला. हा जकातवसुलीचा लहानसा कारकून होता. त्याचे आडनाव गोखले. शिक्षण फारसे झालेले नव्हते. ऐन तारुण्यात विरक्ती उत्पन्न होऊन त्याने देवाची कृपा संपादिली, असे त्याने आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे. हिंदुधर्मावरील मिशनऱ्यांचा हल्ला त्यांच्यावर उलटविणे हेच त्याने आपल्या आयुष्याचे इतिकर्तव्य ठरविले होते. हा अतिशय चतुर व हजरजबावी होता. हिंदुधर्मावरील ख्रिस्ती धर्माचे संकट नाहीसे व्हावे म्हणून त्याने आपल्या ज्ञानानुसार 'वेदोक्त धर्मप्रकाश' या नावाने पुस्तक लिहिलेले आहे. एकदा ते लोकप्रिय होते. भगवद्गीतेवरही विष्णुबुवाची एक मराठी टीका आहे. आश्चर्य वाटावे असा त्याचा 'राज्यप्रकरणी

निबंध' आहे. त्यात मार्क्सवादाच्या छटा असल्यामुळे आश्चर्य वाटते. १८६९ मध्ये मार्क्सची विचारसरणी युरोपातसुद्धा विशेष परिचित नव्हती. मग हिंदुस्थानबद्दल बोलायलाच नको. त्या काळातील विष्णुबुवांच्या मार्क्सवादी कल्पनांचा चमत्कार वाटणे स्वाभाविक आहे. हा निबंध अर्जाच्या स्वरूपाचा आहे. विष्णुबुवांविषयी 'बुवाशी संवाद (Talks With Bawa)' आणि 'बुवाचा कावा' अशी पुस्तके प्रसिद्ध झाली होती. मुंबई शहरात बुवाला पुष्कळ शिष्य होते. हा उत्तम वक्ता होता. १८५७ मध्ये याच्या वक्तृत्वाला सरकारने बंदी केली होती. त्याच्या कामगिरीकडे पाहताना विष्णुबुवा हा दयानंद सरस्वतीचा पूर्वावतार वाटतो. स्वधर्मावरील संकट टाळण्याची खटपट मुंबईतील शास्त्रीमंडळी करीत होती, पण ती कधी मिशनऱ्यांनी जमविलेल्या गर्दीत शिरून मिशनऱ्यांशी सामना करायला धजत नव्हती. विष्णुबुवांनी तसे धाडस आचरून मिशनऱ्यांना थोडा धाक उत्पन्न केला, यात संशय नाही. विष्णुबुवांची ही कामगिरी मोलाची असल्याने त्यांना मुंबईच्या मानकऱ्यांत गणणे भाग आहे.

तीन

जगन्नाथ शंकरशेट

विद्यापीठात शालान्त परीक्षेनंतर प्रवेश करणाऱ्या व संस्कृत विषयात पहिल्या क्रमांकाने पास होणाऱ्या विद्यार्थ्याकरिता छात्रवृत्ती मिळण्याची व्यवस्था करून विद्याक्षेत्रात अजरामर ठरलेले जगन्नाथ शंकरशेट हे इंग्रजांच्या अव्वल कारकिर्दीतील मुंबईचे पहिले महाराष्ट्रीय मानकरी ठरतात. १८२० ते १८६० या कालखंडात मुंबई शहरा-मध्ये आणि तत्कालीन मुंबई राज्यात इंग्रजांनी उन्नतीच्या दृष्टीने जे नानाविध उद्योग चालविले होते, त्या सर्वांशी जगन्नाथ शंकरशेटजींचा संबंध आलेला पाहिला म्हणजे त्यांच्या लोकसेवेविषयी कौतुकादर वाटल्याशिवाय राहत नाही. जगन्नाथजींचा जन्म १८०३ मध्ये झाला व त्यांचे देहावसान १८६५ साली घडले. १८२२ पासून वडील वारल्यामुळे संसाराचा आणि द्रव्यार्जनाच्या व्यवहाराचा भार जगन्नाथ ऊर्फ नाना यांच्यावर पडला. सार्वजनिक जीवनामध्ये ते याच सुमारास म्हणजे १९-२० व्या वर्षी ओढले गेले. इतक्या अल्पवयात गर्भश्रीमंताकडे सार्वजनिक कार्याची जबाबदारी आली असता ती सावधान, परिपक्व वृत्तीने पार पाडण्याची हातोटी अनुभवास यावी हिचे कौतुक का वाटणार नाही? या सावधानतेचा प्रत्यय जेव्हा १८६४–६५ मध्ये अमेरिकेतील यादवीने मुंबईच्या कापसाचा भाव चढून श्रीमंतीचा महापूर आला आणि तो एकदम यादवी थांबून अचानक ओसरला, तेव्हा नानांच्या बाबतीत आला. त्यांना ही कापसाच्या व्यापाराची अल्पकालीन श्रीमंती जशी बाधली नाही तशीच पुढच्या दिवाळखोरीचीही झळ सोसावी लागली नाही.

इंग्रजांनी सुरू केलेले मुलामुलींचे शिक्षण हा विषय नानांपुढे प्रथम आला. वस्तुतः पिढीजात श्रीमंती आणि प्रगती यांचा सहसा मेळ बसत नाही. नाना हे परं-परागत आचारविचारांचा मान राखणारे असले तरी लोकोद्धाराच्या नव्या साधनांकडे तिरस्काराने पाहणारे नव्हते. यामुळे शिक्षणाखेरीज जनतेला इंग्रजी राजवटीत तरणो-पाय नाही हे त्यांनी ओळखले व शिक्षणसंस्थांना यथाशक्ती द्रव्यसाह्य पुरवू लागले. मुलांच्या शिक्षणाविषयी लोकांचा विरोध असला तरी तितकासा तीव्र नव्हता. पण मुलींच्या शिक्षणाला लोकांची मुळीच अनुकूलता नव्हती. नानांनी स्वतःच्या जागेत मुलींची शाळा चालविण्याला परवानगी व तीसुद्धा डॉ० विल्सनसारख्या मिशनऱ्याला

देऊन जे पुढाकाराचे धैर्य दाखविले ते एक प्रकारे सवाशे वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेता अपूर्व समजावे लागते. मुलींची शाळा चालविणे या कामगिरीवरोबरच लोकांची प्रतिकूलता मोडून काढणे हे कामदेखील नानांना करावे लागत होते. मुलींची शाळा चालविण्यापेक्षा शंकेखोर विरोधकांचे समाधान करण्याची कामगिरी जास्त जिकिरीची असली पाहिजे, हे सहज समजण्यासारखे आहे. परंतु या कामगिरीला नाना कंटाळले नाहीत. उलट त्यांच्या पुढाकाराने उदयास येऊन त्यांच्या नावाने चालणारी मुलींची आजपर्यंत तग धरून आहे.

पुस्तकी ज्ञानाची तरतूद सरकार व मिशनरी या दोघांनी केली. पण मुंबईस त्या काळी शहराच्या आरोग्याची जशी व्यवस्था नव्हती तशीच रोग्यांना औषधोपचार मिळण्याची व्यवस्थाही नव्हती. इंग्रजी डॉक्टर अतिशय महाग व देशी वैद्य प्रायः अडाणी, म्हणून रोग्यांनी नशीब असेल तर जगावे नाही तर मरावे, अशी तेव्हाची स्थिती होती. इंग्रजांच्या औषधात दारू असते या व कदाचित औषध पाजून ते बाटवितील असल्या भ्रमाने लोक इंग्रजांच्या वैद्यकीला प्रतिकूल होते. १८४५ मध्ये सुमारे १५ वर्षांच्या वाटाघाटींनंतर जेव्हा ग्रँट मेडिकल कॉलेज निघाले तेव्हा तिथे शिकायला विद्यार्थी मिळतीलच असा विश्वास नव्हता. तथापि हाताच्या बोटांवर मोजण्याइतके विद्यार्थी मिळाले. हे विद्यार्थी पुढे लोकांच्या उपयोगी पडावे, अशी तळमळ नानांच्या ठिकाणी वसत होती. तरी या युरोपियन आयुर्वेदाच्या पंडितांना गिऱ्हाईक लाभेल अशी खात्री नव्हती, म्हणून जिल्ह्यांच्या शहरी दवाखाने उघडून तेथे कित्येक विद्यार्थ्यांच्या परीक्षा उतरल्यावर डॉक्टर या नात्याने नेमणुका करण्यात आल्या. यानंतर हळूहळू इस्पितळे काढण्यात आली. एका इस्पितळाच्या जागेची अडचण नानांनी स्वतःच्या जमिनीची देणगी देऊन नाहीशी केली, यावरून जनतेच्या आरोग्याची त्यांना किती आस्था होती याची कल्पना करता येईल. ग्रँट मेडिकल कॉलेजाला मराठीतून वैद्यक शिकण्याचा वर्ग जोडण्यात आला होता. तो वर्ग चालू राहून जर वैद्यकीय शिक्षणाचा विकास झाला असता तर कदाचित वैद्यक कोणत्या भाषेत शिकवावे हा प्रश्न आजच्यासारखा बिकट बनला नसता. बडोद्यास सयाजी-महाराजांनी देशी भाषेतून वैद्यक शिकविण्याचा प्रयोग करून पाहिला व त्या प्रयोगानुसार जे डॉक्टर बाहेर पडले ते इंग्रजी भाषेतून ही विद्या शिकलेल्यांच्या मागे नव्हते असा त्या प्रयोगाचा अनुभव होता. पण बडोद्याचा प्रयोग जसा बंद पडला तसाच मुंबईचा वर्गही बंद पडला. नानांना त्या वर्गाविषयी जास्त आपुलकी वाटत होती. त्या वर्गाचे डॉक्टर रोग्यांकडून मनसोक्त द्रव्य उकळणार नाहीत अशी जगन्नाथ शेटजींची भावना होती. वैद्यकासारखीच इंग्रजांचा कायदा शिकविण्याची सोय अंमलात आली. त्या सोयीचा फायदा घेणारांची किंमत अस्सल इंग्रज कायदेपंडितांच्या मानाने कमी, असा प्रघात सरकारी रीत्या अस्तित्वात आला. कायद्याच्या ज्ञानासंबंधातील काळा-गोरा हा भेद चीड उत्पन्न करणारा होता. नानांनी हा भेद गाडून टाकण्याकरिता प्रयत्न

केला, आणि सुदैवाने हा भेद नाहीसा झाला. अशी नानांची कामे सांगू लागल्यास कितीतरी सांगता येतील. सगळ्यांचा पाढा वाचणे शक्य नसले तरी काही ठळक कामे सांगणे अवश्य आहे. नानांनी बाटलेल्या हिंदूंना पुन्हा स्वधर्मात घेण्याचा जो उद्योग केला तो विसरण्यासारखा नाही. त्या प्रकरणात बाळशास्त्री जांभेकरांचे नाव प्रामुख्याने उच्चारले जाते, पण नाना त्यांच्या पाठीशीच नव्हे तर खांद्याला खांदा भिडवून जोडीला उभे होते, याचे स्मरण बाळगले पाहिजे. पतितपरावर्तन हा हिंदू समाजाच्या जिव्हाळ्याचा विषय असून, त्याची महती आणि आवश्यकता आजदेखील रेसभरही कमी झालेली नाही.

१८५३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे पुनरुज्जीवन व्हायचे असल्याने इंग्रजांच्या विद्यादानाने जागृत झालेल्या हिंदी जनतेने कंपनीच्या कारभारातील अहित-कारक दोष पार्लमेंटला कळविण्यासाठी संस्थांच्या द्वारे लोकमत संघटित केले व पार्लमेंटकडे आपली कैफियत पाठविली. मुंबईला बॉंबे असोसिएशन १८५२ मध्ये स्थापन झाली. तिचा पुढाकार नाना शंकरशेट यांच्याकडे होता. डॉ० भाऊ दाजी हे वर्षभर या संस्थेचे चिटणीस होते. या संस्थेतर्फे गेलेली कैफियत फार खणखणीत भाषेत लिहिलेली होती. सुरुवातीस इंग्रजांच्या पुढाकाराची वृत्तपत्रे या संस्थेचे कौतुक करीत होती. परंतु सरकारवरील निर्भीड टीकेने थोड्या अवकाशात ही वृत्तपत्रे बिथरून त्यांनी विरोधी टीका आरंभली. नानांनी या टीकेला भीक न घालता आपला पुढाकार शेवटपर्यंत चालू ठेवला. इंग्रजी वृत्तपत्रांच्या टीकेला न भिणे हे एक त्या काळातले दिव्य होते. टीकेमुळे घाबरून काही जणांनी बॉंबे असोसिएशनचा संबंध सोडला, परंतु नाना डगमगले नाहीत. यामुळे किंवा इतर हेव्यादाव्यामुळे १८५७ साली नानांना उत्तरेकडील शिपायांच्या उठावात गुंतवून त्यांचा काटा काढण्याची खटपट काही हितशत्रूंनी केली. त्या खटपटीत बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली; परंतु कारस्थानी मंडळींच्या दुर्दैवाने त्या वेळचा पोलीस अधिकारी फोर्जेट व गव्हर्नर एल्फि-न्स्टन हे दोघेही शांत डोक्याचे व सूक्ष्म दृष्टीचे होते. पोलीस अधिकाऱ्याने कसून बारीक चौकशी केली व नानांसंबंधाचा संशय निराधार असल्याचे वरिष्ठांना पटविले. याप्रमाणे नानांचे गंडांतर टळले. नानांचा संबंध नसला तरी मुंबईत लष्करी शिपायांनी कट केला होता, तो फोर्जेटच्या हुशारीने उघडकीस येऊन दोघा शिपायांवर तोफेच्या तोंडी मरण्याची पाळी आली हा वृत्तांत प्रसिद्ध आहे. सोनापुरास हिंदूंची स्मशानभूमी कायम राहण्याचे श्रेय नानांचे आहे. तेथून स्मशान काढून टाकण्याची सरकारी कारवाई समजताच नाना दीड-दोन हजार हिंदूंचा मोर्चा घेऊन परळला गव्हर्नरांच्या भेटीस गेले. या मोर्चाच्या आग्रभागी नाना घोड्यावर बसून चाललेले होते. गव्हर्नराने त्यांची भेट घेऊन स्मशान आहे तेथेच राहू देण्याचे कबूल केले. समुद्राकाठाने सहलीला जाणाऱ्या युरोपियन बायकांना प्रेताचे दहन पाहवत नसे. शिवाय जळणाऱ्या प्रेतांची घाण हवेत पसरून असह्य वाटते,

अशी युरोपियन समाजाची तक्रार होती. ती तक्रार उंच भिंत बांधून नाहीशी करण्यात आली. काही वर्षांपूर्वी 'संदेश'कार अच्युतराव कोल्हटकरांनी नानांच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी एक मार्मिक सुभाषित योजून नानांची योग्यता निदर्शनास आणली होती. "राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठिति स बांधवः।"—जो राजाच्या दरबारी तसाच स्मशानात उपयोगी पडतो तोच खरा बांधव समजावा, असा या सुभाषिताचा अर्थ आहे. नानांनी लोकहिताच्या कार्यात राजदरबार आणि स्मशान असा भेद बाळगला नाही, असे या सुभाषिताने कोल्हटकरांनी सिद्ध केले व नानांच्या थोरवीला उजाळा दिला.

१८४० ते १८६० या कालावधीत म्युनिसिपालिटीच्या कामाला नवीन वळण लागले आणि १८६२ मध्ये कायदेमंडळ हे लोकमताच्या वाच्यतेचे स्थान इंग्रजांनी जन्मास घातले. या दोन्ही संस्थांशी नानांचा संबंध आला होता. तेथील कामांचा नीट अभ्यास करून आपला अभिप्राय राज्यकर्त्यांच्या खुषीनाखुषीची दिक्कत न बाळगता नाना सदैव व्यक्त करीत होते. १८६५ मध्ये नानांचे निधन झाल्याचे प्रारंभी सांगितले आहेच. १८२२ ते १८६५ या आयुर्मानात नानांनी केलेल्या लोकसेवेचा हा अगदी त्रोटक वृत्तांत आहे. परंतु मुंबईत चालू झालेली आगगाडी, समुद्रकिनाऱ्यावर वाहतूक करणाऱ्या आगबोटी, मुंबईतील बागा, प्रदर्शने, शाळा-कॉलेजे, ग्रंथप्रकाशन—सारांश, मुंबईच्या वैभवाचे कोणतेही अंग तपासू लागल्यास त्याच्याशी नाना आस्थापूर्वक संलग्न असल्याचे पाहायला सापडते, हे या वृत्तांताच्या अनुषंगाने ध्यानात ठेवणे बरे. नानांचे कॉलेजात शिक्षण झाले नसताही आपल्या प्रखर जिज्ञासेच्या जोरावर त्यांनी विविध विषयांचे ज्ञान संपादन केले होते. त्यातल्या त्यात संस्कृत भाषेवर त्यांचे विशेष प्रेम असल्याने विद्यापीठात छात्रवृत्ती मिळविण्याची योजना करून जो उपकार साधला त्याचा निर्देश आरंभी केलेला आहे. नानांवर रूपासंबंधात निसर्गाची कृपा होती. यामुळे त्यांचे स्वभावगुण अधिक शोभतात. मुंबईकरांप्रमाणेच साऱ्या महाराष्ट्रीयांनी त्यांचे स्मरण निरंतर बाळगावे, अशी त्यांची कामगिरी आहे.

चार

विश्वनाथ नारायण मंडलीक

जगन्नाथ शंकरशेटजींच्या मागून ज्यांचे मानकरी म्हणून नाव घ्यावे असे विश्वनाथ नारायण मंडलीक हे होत. यांचा जन्म १८३३ चा व निधन घडले १८८९ साली. कोकणात मुरूड येथे त्यांचा जन्म झाला. या गावचा सांस्कृतिक इतिहास काही महिन्यांमागे श्री० गानू यांनी सविस्तर लिहून काढलेला आहे. गावागणिक संशोधनपूर्वक इतिहास लिहिले गेल्यास ते संपूर्ण देशाच्या इतिहासाला संपन्नता आणतात, असा या क्षेत्रातला अनुभव आहे. मंडलीक हे या गावचे, यामुळे या गावाला महत्त्व आले आहे. मंडलिकांचे पहिले शिक्षण रत्नागिरीच्या शाळेत पार पडले व पुढील शिक्षणासाठी ते मुंबईस आले. घरची साधारणपणे सुस्थिती असल्यामुळे त्यांचे शिक्षण निर्वेध शेवटास गेले. मुंबईच्या विद्यार्जनकाळात त्यांची बुद्धिमत्ता अध्यापकांच्या नजरेत भरली. त्यांच्यासाठी जे विषय नियोजित होते, त्या साऱ्या विषयांच्या परीक्षेत वि० ना० मंडलीक हे अग्रगण्यत्वाने उतरले. शिक्षण संपल्यावर १८५१ साली म्हणजे अठराव्या-एकोणिसाव्या वर्षी त्यांना गुजरातच्या उत्तर टोकास कच्छभुज येथे नोकरी मिळाली. मंडलिकांची जिज्ञासा प्रखर असल्याने त्यांनी या प्रदेशाचा व पुढे सिंधमध्ये बदली झाली तेव्हा त्या प्रदेशाचा इतिहास खडान्‌खडा अवगत करून घेतला. इतिहासच नव्हे, तर सिंधी भाषाही त्यांनी आत्मसात केली. यामुळे सिंधी भाषेच्या सरकारी परीक्षांतून परीक्षक या नात्याने मंडलिकांची नेमणूक पुष्कळ वर्षे चालू होती. सिंध-संबंधी बारीकसारीक माहितीमुळे 'सिंध प्रदेशाचा ज्ञानकोश' अशी संज्ञा त्यांना कित्येकांनी दिली होती. कच्छभुज, सिंध हे भाग दूरचे, तेथे महाराष्ट्रीयाच्या दृष्टीने राहण्याच्या सोयी कमी. तथापि, मंडलीक आपले काम विनतक्रार व चोखपणे करीत होते. वरिष्ठ इंग्रज अधिकारी त्यांच्या कामाने खूष होते. काही जण तर त्यांचे कायमचे मित्र बनले होते व त्यांच्याशी पत्रद्वारे मंडलिकांचा निस्संकोचपणे विचारविनिमय चालत असे. तथापि, या दूरच्या राहणीचा कंटाळा येऊन पुढे लवकरच मुंबईच्या शाळाखात्यामध्ये त्यांनी प्रवेश केला.

मुंबईलगतच्या जिल्ह्यांमध्ये ठिकठिकाणी हिंडून शाळा स्थापन करण्याची कामगिरी सरकारने मंडलिकांवर सोपविली होती. शाळेचा निम्मा खर्च गावकऱ्यांचा व निम्मा

खर्च सरकारचा अशा अटीवर शाळा निर्माण करण्याचे काम जिकिरीचे होते. गावात गेल्यावर गावातील वजनदार व ऐपतदार लोकांना एकत्र बोलवायचे, त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून द्यायचे आणि शाळा स्थापण्याविषयी उद्युक्त करायचे, हा प्रकार काहीसा तापदायक असूनही लोक सज्ञान व्हावे या आस्थेने मंडलीक आपले कर्तव्य बजावीत होते. पहिल्या उत्साहात लोकांनी वर्गण्या देण्याचे कबूल करावे, शाळा चालू व्हावी, आणि लवकरच हा उत्साह मावळून लोकांनी वर्गण्या देण्याचा टाळाटाळ आरंभावी, असा अनुभव वारंवार मंडलिकांना येत असे. तरी त्यांनी आपली चिकाटी सोडली नाही. परंतु या शाळाखात्याच्या कारभारातच सरकारी नोकरीतून बाहेर पडण्याचा मंडलिकांचा निश्चय बळावत गेला. त्या निश्चयाला कित्येक अधिकाऱ्यांची वर्तणूकही उपयोगी पडली. मंडलिकांच्या कामाबद्दल प्रसन्नता असली तरी काही अंमलदारांना मंडलिकांचा निःस्पृहपणा पसंत नव्हता. त्यांच्या काहीशा अरेरावीच्या वर्तनाने नोकरीतील मानहानीचे प्रसंग वाट्यास येऊ न देणारा उद्योग स्वीकारण्याकडे मंडलिकांची प्रवृत्ती वाढत चालली. हा उद्योग वकिलीचा होता. त्यांनी वकील व्हावे असे आग्रहाने सुचविणारे कित्येक इंग्रज अधिकारीही त्यांस भेटले. शेवटी एकदा रजा मागितल्यावरून वरिष्ठांचा व मंडलिकांचा खटका उडून मंडलिकांनी नोकरीचा राजीनामा दिला. १८६३ साली त्यांनी सरकारी नोकरीला रामराम ठोकला आणि वकिलीच्या परीक्षेत पास होऊन ते वकिलीचा व्यवसाय करू लागले. कित्येकांनी या वेळी "तुम्ही हायकोर्टाचे न्यायाधीश व्हाल" असा आशीर्वाद दिला. परंतु तो योग मंडलिकांना लाभला नाही. वकिलीच्या व्यवसायात मात्र त्यांचा जम लवकर बसून लक्ष्मीची कृपा त्यांच्याकडे वळली. लक्ष्मीच्या कृपेनिमित्त मंडलिकांनी वकिलीच्या व्यवहाराला अवश्य असणारी नीती सोडली नाही, हे मुद्दाम लक्षात ठेवले पाहिजे. ज्या खटल्यामध्ये तथ्य नसेल त्या खटल्याचे काम पत्करायचे नाही, असे त्यांचे अढळ धोरण होते.

मुंबई प्रांतामध्ये शाळास्थापनेसाठी फिरतीचे काम करीत असता कुठेही कुणाच्या आदरातिथ्याची ओशाळगत नको म्हणून तंबूत राहण्याचा प्रघात मंडलिकांनी ठेवला होता. आपले स्वातंत्र्य टिकवून हव्या त्या योग्य ठिकाणी राहण्याची व्यवस्था केली आहे असा दुहेरी फायदा या प्रघाताने साधत होता. कुणाचाही वगवशिला चालू द्यायचा नाही व जे योग्य न्यायाला धरून असेल तेच अंमलात आणायचे, हा बाणा मंडलिकांनी जसा सरकारी नोकरीत सांभाळला, तसाच तो पुढे वकिलीच्या व्यवसायातही सांभाळला. त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व इंग्रजांच्याही कौतुकाचा विषय झालेले होते. संस्कृत, पर्शियन या भाषांचेही त्यांना ज्ञान होते. नोकरीच्या आणि वकिलीच्या या दोन्ही काळांत त्यांनी विद्याव्यासंग व लेखनाभ्यास चालू ठेवला हा त्यांच्या चरित्राचा विशेष सांगायला पाहिजे. मुंबईच्या एल्फिन्स्टन शाळेच्या गुजराती व मराठी जन्मभाषेच्या प्रौढ विद्यार्थ्यांनी ज्ञानप्रसारक नावाच्या संस्था

अस्तित्वात आणून त्यांच्या सभासदांना आपल्या ज्ञानाचे फळ व्याख्यानाच्या द्वारे चाखावयास द्यायचे, अशी एक परंपरा जन्मास घातली. व्याख्यान देणारालाच सभासद राहता येईल, अशी एक आणखी अट होती. अर्थात जो व्याख्यान चुकवील त्याचे सभासदत्व रद्द समजले जात असे. ही व्याख्याने छापली गेली आहेत व त्यांमध्ये मंडलिकांची व्याख्याने पाहायला सापडतात. आपल्या इतिहासाच्या आवडीस धरून मंडलिकांनी मध्ययुगीन भारतीय स्थितीवर एक मोठा निबंध ज्ञान-प्रसारक सभेत वाचला. स्वतःच्या वागणुकीला त्यांनी कसे वळण लावले असेल, याची कल्पना आणून देणारा त्यांचा 'सवय आणि अभ्यास' या नावाचा एक निबंध आहे. याशिवाय मंडलिकांनी एल्फिन्स्टनच्या इतिहासाचे मराठी भाषांतर केलेले आहे. अर्थशास्त्राच्या एका इंग्रजी पुस्तकाचे 'लक्ष्मीशास्त्र' या नावाचे एक भाषांतर असून ते त्यांचे एकट्याचे नाही. दुसऱ्या एकाचे नाव मंडलिकांच्या जोडीने त्या पुस्तकावर आढळते. अर्थशास्त्र हा शब्द रूढ होण्यापूर्वी 'लक्ष्मी' हाच शब्द 'अर्थ'ऐवजी स्वीकारला गेल्याचे दुसरे उदाहरण लोकहितवादींचे आहे. त्यांनी 'लक्ष्मीज्ञान' या नावाने अर्थशास्त्राचे एक पुस्तक लिहिले होते. मंडलिकांनी हिंदू धर्मशास्त्राचे स्मृति-मयूखादी ग्रंथ संपादिले आहेत. हिंदू समाजातील काही चाली किंवा सण, त्याचप्रमाणे नव्याने हाती आलेली ताम्रपत्रे, शिलालेख यांवरही त्यांचे लेखन आहे. वकिलीत लोकांच्या डोळ्यांत भरण्याजोगा पैसा मिळू लागल्यावर 'श्री'च्या मोहाने 'सरस्वती'ची मंडलिकांनी उपेक्षा केली नाही, उलट सरस्वतीच्या सेवेमध्ये काही अंशी श्री राबविली, असा एक स्पृहणीय विशेष त्यांच्या चरित्रात दृष्टीस पडतो.

अभिवचन पाळण्याची दक्षता आणि ठरलेली वेळ उलटू न देण्याची खबरदारी हे मंडलिकांचे दोन गुण त्यांचे चरित्र पाहताना सहज गळी उतरणारे आहेत. पूर्वोक्त दुसऱ्या गुणाला वक्तशीरपणा असे सुटसुटीत नाव आहे. या गुणाच्या कडक शिस्ती-मुळे ठरलेली वेळ सांभाळण्याच्या सवयीला 'मंडलिकी बेत' अशा म्हणीने ओळख-णारे वृद्ध वीस वर्षांपूर्वी भेटत असत. जे ठरले ते अंमलात आलेच पाहिजे, अशी पेशवाईत नाना फडणिसांची ख्याती होती. आणि फडणीस ज्यांच्या आश्रयाने वाढला त्या माधवराव पेशव्यांबद्दल अशा कडक शिस्तीच्या अनेक आख्यायिका आहेत. इंग्रजी अमदानीत अशा तऱ्हेचा लौकिक मंडलिकांनी मिळविला. या लौकिकाच्या पुष्टीचा एक प्रसंग प्रसिद्ध आहे. दुपारच्या गाडीने पुण्याला जायचे असता मंडलिकांना स्टेशनवर पोचायला एकदोन मिनिटे उशीर झाला व गाडी आपल्या वेळी सुटली. मंडलिकांनी तत्काळ रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करून स्वतःसाठी स्वतंत्र गाडी (स्पेशल) काढली. ही मोठ्या खर्चाची बाब होती आणि चूक मंडलिकांची असल्या-मुळे या खर्चाचा भार ज्या अशिलाच्या कामासाठी ह्यांना पुण्यास जायचे होते, त्या अशिलावर टाकणे योग्य नव्हते. तथापि खर्चाची पर्वा न करता मंडलिकांनी ठरलेल्या संध्याकाळी पुणे गाठले. एक आख्यायिका वेळेपूर्वी गाडी किंवा बोट (आख्यायिकेत

दोन्ही वाहने विकल्पाने उचारली जातात) सोडली म्हणून मंडलिकांनी नुकसान-भरपाई करून घेतली, अशा धोरणाची आहे. कदाचित स्वतंत्र गाडी काढावी लाग-ल्याच्या प्रसंगाचा वचपा म्हणूनसुद्धा ही आख्यायिका उत्पन्न झाली असेल.

वकिलीच्या व्यवसायात काठेवाडातील व दक्षिण महाराष्ट्रातील काही संस्थानिकांची व जहागिरदारांचीच कामे मंडलिकांकडे येऊ लागल्याने द्रव्यदृष्ट्या साहस करायची योग्यता त्यांच्या वाट्यास निस्संशय आलेली होती. यांतले व्यापाराचे साहस त्यांच्या-वर उलटले असे एक उदाहरण आहे. व्यापार व महाराष्ट्र यांचे द्वंद्व प्रसिद्ध आहे व त्याकडे पाहून सदर उदाहरणाची संगती लावता येईल. संस्थानिक हे जुन्या राज्य-व्यवस्थेचे अवशेष म्हणून त्यांविषयी मंडलिकांच्या हृदयात प्रेमादर वसत होता. त्यातल्या त्यात सातारकर आणि कोल्हापूरकर छत्रपतींविषयी त्यांना उत्कट प्रेम असल्याचे दाखले त्यांच्या वकिलीच्या इतिहासात आहेत.

उत्तम वकिली, विद्याव्यासंग, विद्वत्ताप्रचुर लेखन, दिलेला शब्द पाळण्याची दक्षता, वक्तशीरपणा इत्यादी गोष्टींसाठी मंडलिकांना मुंबईचे मानकरी मानलेले नाही. अशा गोष्टी पुष्काळांच्या चरित्रांत सापडण्याचा संभव आहे. मंडलिकांचे सडेतोड राजकारण हा त्यांच्या मानकरीपणाचा खरा पाया आहे. महाराष्ट्राच्या इंग्रजी राजवटीतील इति-हासाकडे पाहिल्यास १८६० पासून पुढे या प्रदेशात स्वाभिमान जागृत झाल्याच्या खुणा सापडतात. मंडलिकांच्या काळात इंग्रजी राज्यकारभारातले दोष निर्भीडपणे दाखविले जात असले तरी त्या दाखविण्याला मर्यादा होती. १९२० सालानंतरच्या सडेतोड-पणाशी तुलना केल्यास मंडलिकांची स्पष्टोक्ती मिळमिळीत वाटल्यास नवल नाही. पण ती स्पष्टोक्ती होती हे कबूल करावे लागेल. इंग्रज अंमलदारांना त्या वेळी हांजी हांजी ऐकण्याची सवय होती. असा तोंडपुजेपणा साफ डावलून स्पष्ट बोलण्याचा पंथ मंडलिकांनी निर्माण केला. त्या योगाने ते अधिकारीवर्गात फारसे प्रिय नव्हते. त्यांच्या लोकप्रियतेमुळे त्यांची उपेक्षा सरकार करू शकले नाही. म्युनिसिपालिटी, विद्यापीठ, कायदेमंडळ (प्रादेशिक व सार्वभौम) यांच्या व्यवहारांत मंडलिकांचा समावेश सरकारने करून घेतला आणि या प्रत्येक कार्यक्षेत्रात मंडलिकांचे व्यक्तिमत्त्व उठून दिसते. प्रत्येक कार्यक्षेत्रातील त्या त्या वेळची कामे नीट अभ्यासून आणि विवेचून आपले मत स्पष्ट शब्दांनी सांगायचे हा त्यांचा गुण सर्वत्र आपला प्रभाव गाजवीत असे. वकिलीच्या व्यवसायातील सरकाराशी झालेले त्यांचे दोन संघर्ष प्रसिद्ध आहेत. एक खोतांच्या हक्कांचा व दुसरा मोहाच्या फुलांसंबंधाचा. मोहाच्या फुलांपासून दारू बनविता येते या सबबीवर त्या फुलांच्या आधाराने आपली उपजीविका चालविणाऱ्या समाजाचा हक्क बुडविण्याचा घाट सरकारने घातला असता त्या समाजाची तरफदारी मंडलिकांनी चालविली. या दोन्ही प्रकरणांत मंडलीक अत्यंत ईर्षेने सरकाराशी सामना करीत होते. दोन्ही संघर्षांची माहिती मंडलिकांच्या लेखसंग्रहात पाहायला सापडते. इंग्रज सरकाराशी झगडा म्हणजे अंतिम यशाची आशा कमी, असा अनुभव

असूनही मंडलिकांनी त्यात माघार घेतली नाही. इंग्रजाला कायद्याबद्दल श्रद्धा दाखविण्याची सवय असल्याने जेथे कायद्याने अडवणूक होईल तेथे इंग्रज थोडे दबत असत. कायदा व त्यावर आधारलेला विनतोड युक्तिवाद ही दोन साधने योजून खोतांच्या हक्कांचा काही बचाव मंडलिकांना करता आला. मोहांच्या फुलांचा झगडा अशाच रीतीने शेवटास गेला. मागे एकदा मंडलीक हे स्वाभिमानजागृतीच्या काळातले पुरुष असे म्हटले आहे. स्वाभिमानाचा जो कणखरपणा राज्यकर्त्यांशी वागताना मंडलिकांनी दाखविला, तो पुढे वाढत गेला. त्या स्वाभिमानामागे महाराष्ट्रीयत्व होते याचा अर्थ, उत्तर भारतामध्ये अधिकाऱ्यांचा वचक बाळगण्याची व त्यांच्या पुढे लांगूलचालन करण्याची जी पद्धत मुसलमानांच्या राजवटीत रुजून इंग्रजी अंमलात कायम राहिली, तिच्यापासून महाराष्ट्र अलिप्त राहिला. यामुळे उत्तर भारतातून महाराष्ट्रात येणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना महाराष्ट्रातील जनता उद्धट वर्तनाची वाटत असल्याची उदाहरणे दाखविता येतील. हांजीहांजीखोरपणाचा अभाव म्हणजे उद्धटपणा अशी त्या अधिकाऱ्यांनी आपली समजूत करून घेतली होती. रोखठोकपणा हा उपमर्दकारक वाटला तरी त्याच्यामागे मुद्दाम प्रतिपक्षाची अवहेलना करावी असा हेतू नसल्याचे कबूल करावे लागेल. रोखठोकपणा हा महाराष्ट्राचा स्वभाव मांडलिकांच्या स्वभावात व्यक्त होत असे. त्या स्वभावाचा श्रेयस्करपणा मुद्दाम विस्तारून मांडण्याची गरज नाही.

मंडलिकांना समाजसुधारणेची राजकारणाइतकी आवड नव्हती. समाजसुधारणेची काही कलमे त्यांना मान्य होती व त्या कलमांच्या उद्योगाला त्यांचे प्रोत्साहन मिळे. तथापि समाजसुधारणेला प्राधान्य देण्याची त्यांची प्रवृत्ती नसल्याने त्यांनी 'नेटिव ओपिनियन' या नावाचे इंग्रजी-मराठी असे द्विभाषिक साप्ताहिक काढले. त्यामध्ये त्यांचे फारसे लेख नसले तरी प्रसिद्ध होणारे लेख हे त्यांच्या मताच्या प्रतिबिंबासारखे समजले जात असत. यासाठी त्यांतील मजकुराला दुय्यम प्रतीचे महत्त्व आहे. विद्याव्यासंगानिमित्त त्यांनी बहुमोल ग्रंथ जमविले व अशा ग्रंथांची संख्याही मोठी होती. हा त्यांचा ग्रंथसंग्रह सुमारे १७-१८ वर्षांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजकडे गेला. मंडलिकांची मानकरी या नात्याची महती त्यांच्या चारित्र्यात व राजकीय कामगिरीत असल्याचे पूर्वी दर्शविले आहे. मुंबईत कोकणातील ब्राह्मणवर्ग पुण्याचे राजधानीपद नष्ट झाल्यावर येऊ लागला. त्या वर्गाला मंडलिकांची कामगिरी एक प्रकारे मार्गदर्शक झाली. कोकणातून मुंबईस शिक्षणासाठी जाण्याचे काम मंडलिकांच्या वेळी फार कठीण होते. त्याकडे लक्ष देऊन डॉ० रा० गो० भांडारकरांनी मंडलिकांना एका भाषणात अग्रेसरत्वाच्या स्थानी बसविले आहे व ते अग्रेसरत्व केवळ मुंबईच्या प्रवासापुरते नसून थोर कर्तबगारीचेदेखील आहे हे त्यांचे चरित्र पाहिल्याने गळी उतरेल.

पाच

भाऊ दाजी लाड

मागल्या शतकात मुंबई शहराच्या नागरिक जीवनाला आपल्या उदार, स्वाभिमानी आणि विविध स्वरुपाच्या कामगिरीने नटलेल्या चारित्र्याने ज्यांनी संपन्न केले, त्यांत डॉ० भाऊ दाजी यांचे स्थान फार मोठे आहे. त्यांच्या चरित्रात कित्येक विलक्षण योगायोग आहेत. १८२२ मध्ये गोव्याच्या हद्दीत मांजरे गावी जन्मास आलेला मुलगा आपल्या पित्याबरोबर वयाच्या दहाव्या वर्षी मुंबईस आला. पित्याचा व्यवसाय मातीची चित्रे करून विकण्याचा होता. त्या व्यवसायाला हा मुलगा थोडीफार मदत करीत असे. मुंबई हे भरभराटणारे शहर म्हणून तेथे आपला व्यवसाय अधिक चांगल्या रीतीने चालेल या समजुतीने भाऊचे वडील विठ्ठलराव मुंबईस आले. भाऊच्या अंगी आणखी एक विशेष गुण इतक्या लहान वयातसुद्धा चांगल्या प्रगल्भावस्थेस पोचलेला होता. तो म्हणजे बुद्धिबळातील खेळाचे प्रावीण्य. मुंबईस तेव्हा क्लेअर नावाचा जो गव्हर्नर होता त्याला बुद्धिबळाच्या खेळाची फार आवड होती. त्या काळी गव्हर्नरापर्यंत वशिला पोचण्याला त्यानंतरच्या काळासारख्या अडचणी नव्हत्या. त्याप्रमाणे काही जणांच्या प्रयत्नाने भाऊ गव्हर्नरापर्यंत पोचला. गव्हर्नरला भाऊच्या हुशारीचे कौतुक वाटले व त्याने "भाऊला नव्याने सुरू झालेले शिक्षण द्यावे" अशी शिफारस केल्यावरून हा मुलगा प्रथम मराठी शाळेत व नंतर एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये शिकून प्रख्यातीस चढला. ज्याला योगायोग म्हटले त्याचे स्पष्टीकरण वरील हकिगतीने होईल. पुस्तकी शिक्षणातही भाऊच्या बुद्धीची एकाग्रता आणि अभ्यासाची श्रमशीलता हे दोन्ही गुण शिक्षकांच्या प्रत्ययास येत होते. पुढे याला शिक्षकाची नोकरी मिळाली. १८४५ मध्ये इंग्रजी वैद्यकाचे ग्रँट मेडिकल कॉलेज सुरू झाले तेव्हा भाऊ त्या कॉलेजात दाखल होऊन तेथेही त्याच्या गुणांची छाप तेथील अध्यापकवर्गावर पडली—इतकी की त्यांनी भाऊला विद्यार्थिदशेतच सदर कॉलेजातील व्यवस्थेची काही कामे दिली. येथून पुढे 'भाऊ' हा शब्द बहुमानाने वापरणे योग्य होईल. १८५१ मध्ये भाऊंचे डॉक्टरीचे शिक्षण संपले. भाऊंनी वैद्यकी भूतदयेच्या प्रेरणेने स्वीकारली असा त्यांच्या एका युरोपियन मित्राचा खुलासा आहे. नव्या हिंदी डॉक्टरांचा धंदा न चालल्यास त्यांना निर्वाहाची चिंता राहू नये म्हणून त्यांना

नोकऱ्या देण्याची सोय सरकारने केली होती. त्या नोकरीपायी भाऊंना आपल्या कॉलेजात शिक्षकाचे काम करावे लागत होते. तथापि खाजगी रीतीने ते वैद्यकीचा धंदा करीत होतेच. ही नोकरी भाऊंनी लवकरच सोडली आणि स्वतंत्र धंदा चालू केला. भाऊंच्या मागून एका वर्षाने त्यांचे बंधू नारायण दाजी हे डॉक्टरी परीक्षा पास होऊन बाहेर पडले. हे दोघेही अत्यंत यशस्वी डॉक्टर होते. त्यातल्या त्यात भाऊंचा धंदा वरचढ होता. भाऊंनी या व्यवसायात पुष्कळ द्रव्य मिळविले, परंतु द्रव्याचा लोभ नसल्यामुळे त्यांचा खर्चही अवाढव्य होता. द्रव्यलोभ नसल्याची भाऊंच्या विद्यार्थिदशेतील एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. वैद्यक विद्यालयात असता फॅरिश नावाच्या एका इंग्रज इसमाच्या नावे छात्रवृत्तीची परीक्षा ठेवण्यात आली होती. भाऊंना या परीक्षेला बसण्याची संधी लाभून त्यांनी ती परीक्षा जिंकली. अर्थात छात्रवृत्ती त्यांच्या वाट्यास आली. भाऊंनी ताबडतोब सरकारास कळविले की आपल्याला नोकरीचा पगार मिळत असल्याने ही छात्रवृत्ती आपल्यास नको. वैद्यक विद्यालयात दाखल होण्यापूर्वीच, राजस्थान-काठियावाड वगैरे भागांत जो मुलींना जन्मताक्षणी मारून टाकण्याचा दुराचार रासरोस चालू होता, त्याबद्दल उत्तम निबंध लिहील त्याला ६०० रुपयांचे बक्षीस ठेवले होते, भाऊंनी ते बक्षीस पटकावले होते.

भाऊंनी आपल्या व्यवसायात, जेथे आपण ही विद्या संपादन केली तेथील रोग्यांना व गोवा ही जन्मभूमी म्हणून तेथील रुग्णाइतांना फुकट औषधोपचार करण्याचा प्रघात ठेवला होता. कित्येकदा औषधावरोवर पथ्यपाण्यासाठी गोरगरिबांना आपल्या गाठचे द्रव्य देण्यासही ते मागेपुढे पाहत नसत, अशा अभिप्रायाच्या पुष्कळ आख्यायिका आहेत. लोहार चाळीतील मुलींची शाळा भाऊंनी सर्वस्वी आपल्या द्रव्यदानाने चालविली होती. दक्षिण महाराष्ट्रात आठपंधरा दिवसांची फेरी मारली की सहज पाचसहा हजारांची प्राप्ती त्यांना होत असे. गुजरातमधील संस्थानिकांचीही त्यांना बोलावणी येत असत. शिवाय मुंबईच्या धनिक वर्गापैकी पुष्कळसे त्यांचे गिऱ्हाईक होते. पण त्यांना जी दोन व्यसने होती, त्यापायी त्यांचे द्रव्य मोठ्या प्रमाणात खर्ची पडत असे. 'व्यसन' हा शब्द 'अनावर आवड' या अर्थाने वापरला आहे. औषधी वनस्पतींचे आणि आपल्या प्राचीन इतिहासाचे संशोधन हीच ती व्यसने होत. पाश्चात्य आयुर्वेदाचे अध्ययन केले, तथापि भारतीय आयुर्वेदाचा त्यांना विसर पडला नव्हता. स्वकीय आयुर्वेदातील वनस्पती जमवाव्या व त्यांचे गुणधर्म तपासावे हा एक त्यांचा कायमचा उद्योग होता. यासाठी हिंदुस्थानात त्यांचे जे मित्र होते त्यांच्या मागे वनस्पतीसंबंधात त्यांचा लकडा असे. आज जेथे भाई जीवनजीचा बोळ आहे त्या भागात भाऊंची वनस्पतींची बाग व प्रयोगशाळा होती, असे मुंबईच्या जुन्या माहितगारांकडून कळले. त्या बागेची व प्रयोगशाळेची नेमकी जागा कोणती व तिचे क्षेत्रफळ किती हे सांगणे कठीण आहे.

इतिहाससंशोधन हा त्यांचा दुसरा उद्योग होता. यासाठी प्रसंगपरत्वे साऱ्या

भारताचा भाऊंनी प्रवास केला होता, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. इतिहासाचे संशोधन हा अखंड चालणारा विषय आहे. नव्या ज्ञानाने जुन्या सिद्धांतामध्ये बदल करावा लागतो. तथापि भाऊंच्या संशोधनाला आघाडीचे वाटाड्ये या दृष्टीने महत्त्व आहे. इसवी सनपूर्व काळापासून इसवी सनाच्या बाराव्या शतकापर्यंतचा वृत्तांत त्यांनी महाराष्ट्रातील लेणी, लेण्यांतील शिलालेख, ताम्रपट, नाणी, इत्यादिकांच्या साह्याने एका लेखात संकलित रीतीने ग्रथित केलेला आहे. लेण्यांच्या डोंगरकड्यांवरील लेखांच्या नकला करणे हे अवघड काम पार पाडण्यासाठी त्यांनी विश्वसनीय माणसे—अर्थात चांगला पगार देऊन—ठेवलेली होती. त्या नकला मुंबईस आल्यावर भाऊंनी वाचायच्या व जेथे संशय येईल किंवा दुर्बोध वाटेल ती अक्षरे पुन्हा बारकाईने तपासण्याचा नेमलेल्या माणसांना आदेश पाठवायचा, अशी त्यांची तऱ्हा होती. ही झाली शिलालेख-ताम्रपत्रांची कथा. याखेरीज जुन्या ग्रंथांची हस्तलिखिते गोळा करण्याचाही त्यांचा परिपाठ होता. त्यासाठी द्रव्य वेचणे भागच होते. भाऊंचे लक्ष केवळ हिंदू समाजाच्या इतिहासाकडे नव्हते. बौद्ध व जैन यांच्याही इतिहासावर संशोधनाचा प्रकाश टाकून तो स्पष्ट करावा असाही त्यांचा प्रयत्न होता. त्याप्रमाणे सुसंस्कृत अर्थात सुधारलेल्या समाजाबरोबर, ज्यांना आज आदिवासी म्हणतात त्या वन्य जातींच्या इतिहासालादेखील त्यांच्या संशोधनात स्थान होते. या जातींच्या भाषा, त्यांच्यातील म्हणी त्यांनी जमविल्या होत्या. म्हणी या त्या त्या समाजाच्या स्वभावाच्या दर्शक असतात हे मुद्दाम निराळे सांगायला नको.

एका वेळच्या संशोधनाचे निर्णय नव्या संशोधनाने बदलावे लागतात असे म्हटले, व ते बहुतांशी खरे असले, तरी काही निर्णय अढळ राहतात. वराहमिहिर या ग्रंथकाराचा अंतकाळ इ० स० ५८७, हा भाऊंचा निर्णय सर्वमान्य झालेला आहे. दुसरा एक भाऊंच्या बहुमोल कामगिरीचा भाग म्हणजे त्यांनी नाण्यांवरील किंवा जुन्या शिलाताम्रादी लेखांतील एक विशिष्ट चिन्ह हे संख्येचे वाचक असल्याविषयी काढलेला निष्कर्ष उजेडात येईपर्यंत जुन्या राजपुरुषांच्या काळाची अंतरे समजत नव्हती व त्यासंबंधी घोटाळा वाटत असे. भाऊंच्या या निष्कर्षालाही सर्वमान्यता लाभलेली आहे. भाऊंचे संशोधनविषयक लेख व टिपणे ही आज ढळढळीतपणे लोकांसमोर नसली तरी एकदा डॉ० भांडारकरांनी म्हटल्याप्रमाणे प्राचीन काळाचे संशोधन करू इच्छिणाराला त्यांकडे दृष्टिक्षेप करायला पाहिजे, त्यांची उपेक्षा करणे योग्य नव्हे, एवढा तथ्यांश त्यांमध्ये खास आहे. मरेपर्यंत त्यांची संशोधनाची गोडी टिकून होती. शेवटी दीडदोन वर्षे ते अर्धांगवायूने अंथरुणास खिळलेले होते. तरी संशोधनाचा विषय भेटणारांपैकी एखाद्याजवळ निघाल्यास ते अशा उत्साहाने बोलू लागत की ते आजारी असल्याचे त्यांना भान राहत नसे. टिकठिकाणच्या कारागिरीच्या वस्तूचा संग्रह हे संशोधनाचे अंग आहे. भाऊंच्या घरी अशा वस्तूंचा फार मोठा संग्रह होता. एकदा त्यांनी चार हजार रुपये खर्चून ताजमहालची संगमरवरी

प्रतिकृती आणली होती व तिच्या कारागिरीची ती प्रतिकृती इष्टमित्रांना दाखवून त्यांनी वर्णन केल्याची आख्यायिका आहे.

भाऊ दाजींचा वैद्यकशास्त्रातील ज्याला अद्वितीय म्हणता येईल असा शोध महारोगावरील औषधाचा होता. त्यांनी आपल्या औषधाने अनेक रोगी बरे केले, तथापि त्यांचे त्यासंबंधाचे संशोधन चालूच होते. ते वारल्यानंतर त्या औषधाची माहिती त्यांनी गुप्त ठेवल्यामुळे ती त्यांच्याबरोबरच नष्ट झाली, असा प्रवाद कित्येकांनी उत्पन्न केला. त्याला एका युरोपियन अधिकाऱ्यानेच उत्तर दिले आहे. भाऊ रोग्याला उघडपणे औषध देत असत, यामुळे गुप्तपणाला जागाच नव्हती. दोष असलाच तर भाऊंना त्या औषधाबद्दल माहिती न विचारणारांचा आहे. भाऊ आहेत, औषध आहे, त्या योगाने रोगी बरे होत आहेत, मग त्या औषधाची चौकशी करा कशाला ? अशा अनास्थेमुळे त्याची माहिती भाऊंपाशीच राहून गेली असा त्या युरोपियनाच्या उत्तराचा आशय आहे. एवढे खरे की भाऊंच्या हयातीमध्ये त्यांच्या इतर वैद्यकीय ज्ञानाप्रमाणे हे महारोगावरील औषधही गाजत होते. भाऊ शस्त्रक्रियेतही कुशल होते. अडलेले बाळंतपण सोडविण्यात भाऊंचा हातखंडा असल्याबद्दलही त्यांचा विशेष लौकिक होता.

भाऊंनी एका गरीब शिंप्याला झालेला अन्याय दूर करण्यासाठी जो उद्योग केला, त्याची हकिगत सांगण्याजोगी आहे. एक युरोपियन अंमलदार आपल्या घरचे शिवणकाम एका शिंप्याला देत असे. कालांतराने या शिंप्याचे देणे बुडवावे असे मनात येऊन, शिंप्याने पैशासाठी तगादा केला असता त्याला त्याने मारहाण केली. कदाचित आपल्या पैशाची वसुली करण्यासाठी तो शिंपी न्यायालयाकडे धाव घेईल म्हणून त्या युरोपियनाने पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांना शिंप्याविरुद्ध काही तक्रारी कळविल्या. ते अधिकारी युरोपियनच होते. त्यांनी शिंप्याला पकडून तीन आठवड्यांची सक्त-मजुरीच्या कैदेची शिक्षा ठोठावली. शिंप्याने शिक्षा भोगली व कोल्हापुरास प्रयाण केले. भाऊंना शिंप्याची माहिती समजली व त्याविरुद्ध पैसे बुडविणाराने केलेल्या खोट्या तक्रारीचा पुरावा मिळाला. शिंप्याने भाऊंच्या साह्याने हायकोर्टात फिर्याद गुदरली. त्याच्या वतीने दोन युरोपियन बॅरिस्टर काम चालवीत होते. शिंप्याला पैसे बुडविणाऱ्याकडून हायकोर्टाने नुकसानभरपाई देवविली. या कामी सुमारे दहा हजार रुपयांचा खर्च भाऊंनी सोसला. या खटल्याच्या निकालाने युरोपियन समाज भाऊंवर रागावला. त्या समाजाने भाऊंच्या व्यवसायावर बहिष्कार टाकला. परंतु भाऊंनी त्याची पर्वा केली नाही.

भाऊंच्या कर्तबगारीचा काळ १८५१ ते १८७४ याप्रमाणे एकूण सुमारे चोवीस वर्षांचा आहे. या अवधीत त्यांचा मुंबईतील सर्व लोकोद्धारक चळवळींशी आणि संस्थांशी निकट संबंध होता. १८५२ मध्ये स्थापन झालेल्या बॉंबे असोसिएशनचे ते एक वर्ष चिटणीस होते. सदर असोसिएशनच्यामार्फत शिक्षणविकासासंबंधात जो

खलिता पार्लमेंटपुढे गेला, त्याच्या छटा 'शिक्षणाची सनद' समजल्या जणाऱ्या सर चार्ल्स वुड यांनी १८५४ साली येथील सरकारकडे पाठविलेल्या शिक्षणविषयक योजनेमध्ये आढळतात. सन १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठ स्थापन झाले त्या वेळी करण्यात आलेल्या कायद्यात ज्यांची नावे विद्यापीठाचे आधार किंवा नियंते म्हणून दाखल होती त्यांत भाऊंचे नाव पाहिले म्हणजे अल्पवयात भाऊंनी शिक्षणविषयाचे गाढे पंडित या नात्याने निर्माण केलेल्या विश्वासावद्दल खात्री पटते. जुन्या कारागिरीच्या वस्तूंची आणि देशोदेशीच्या नानाविध पशूंची प्रदर्शनालये ही शिक्षणाची अंगे असल्याचे ध्यानात घेऊन, १८५८ मध्ये जेव्हा व्हिक्टोरिया राणीने हिंदी राज्यकारभार हाती घेतला तेव्हा राणीविषयी कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या सभेत मुंबईत राणीच्या बागेचे स्मारक उभारावे अशी कल्पना भाऊंनी मांडली व ती पुढे अंमलात आली.

भाऊंच्या कामगिरीचा असा थोडक्यात इतिहास आहे. त्यांची शेवटची वर्षे आर्थिक संकटात गेली. १८६५ मध्ये कापसाच्या व्यापारात अनेक धनिक रसातळास पोचले. त्या व्यापारातील भूकंपामध्ये भाऊंची सारी मिळकत गडप झाली. नंतर अर्धांगवायूसारख्या रोगाने त्यांना सर्व प्रकारे अगतिक करून सोडले. १८७४ च्या मे ३१ रोजी त्यांनी इहलोक सोडल्यावर त्यांच्या विद्वत्तेचे स्मारक म्हणून विद्यापीठाने भाऊ दाजींच्या नावे बी० ए० च्या परीक्षेत संस्कृत भाषेमध्ये पहिल्या क्रमांकाने पास होणाऱ्या विद्यार्थ्याकरिता बक्षीस ठेवले. या बक्षिसाची रक्कम भाऊंच्या स्नेह्यांनी जमविली होती. अतिशय थोर योग्यतेच्या भाऊंविषयी एकदा माहिती मिळवायची म्हणजे श्रम पडत असत. ते श्रम सोसून कै० श्रीनिवासराव कर्नाटकी यांनी जे चरित्र लिहिले ते जिज्ञासूंची तहान भागवू शकते. भाऊंचे मूळ नाव रामकृष्ण, तसेच वडिलांचे नाव विठ्ठल होते. परंतु रामकृष्णाचे घरगुती 'भाऊ' आणि विठ्ठलाचे 'दाजी' या नावांचा उपयोग निरंतर होत राहिल्याने तीच नावे लोकांच्या परिचयाची आहेत.

सहा

काशीनाथ त्र्यंबक तेलंग

महाराष्ट्रीयांपैकी मुंबईचे चौथे मानकरी म्हणून ज्यांची निवड केली ते काशीनाथ त्र्यंबक तेलंग होत. यांचा जन्म १८५० मध्ये झाला आणि मृत्यू अवघ्या ४३ व्या वर्षी म्हणजे १८९३ मध्ये झाला. मुंबईच्या विद्वज्जीवनात त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेने आणि विशाल ज्ञानाने फार मोठी कामगिरी बजावली असे त्यांच्या कर्तबगारीचा आढावा घेत असता कबूल करावे लागते. त्यांची विलक्षण बुद्धिमत्ता विद्यालयीन जीवनामध्येच त्यांच्या गुरुजनांच्या निदर्शनास आली होती. परंतु ह्या बुद्धिमत्तेचा एक चमत्कार त्यांनी विद्यालयीन जीवन संपण्यापूर्वीच दाखविला असल्याने ह्याची थोडी विस्तृत वाच्यता केल्यास अप्रस्तुत होणार नाही.

आपले इंग्रजी भाषेवर प्रभुत्व पाहिजे म्हणून विद्यार्थिदशा संपण्याच्या सुमारास तेलंगांनी इंग्रजीत 'ब्लँक व्हर्स' म्हणतात—मराठीत 'निर्यमक' म्हणू—त्या पद्धतीने गीतेचे भाषांतर हाती घेऊन पुरे केले. वयाच्या विशी-बाविशीमध्ये असा विषय इंग्रजीच्या प्रभुत्वासाठी स्वीकारणे हीच एक अपूर्व घटना आहे. विषय साध्यासुध्या व्यवहाराचा नसून तत्त्वज्ञानाचा होता हे 'गीता' हे नाव उच्चारताच समजण्याजोगे आहे. तेलंगांनी हे भाषांतर पूर्ण केले, याहून अधिक विस्मयकारक त्या पुस्तकाची प्रस्तावना आहे. हे भाषांतर होत असता लॉरिन्झर नामक युरोपियन पंडिताने गीता ही बायबलची नक्कल असल्याचा दावा मांडला होता. तेलंगांनी हा दावा कितपत खरा याची परीक्षा आरंभली. या परीक्षेनिमित्त तेलंगांनी बायबल अर्थात नवा करार केव्हा तयार झाला आणि त्या ग्रंथाचा परिचय आपल्या देशाला केव्हा झाला हे दोन प्रश्न बारकाईने विचारात घेऊन, ख्रिस्तोत्तरकालीन बायबल व तसाच त्याचा प्रचार या दोन्ही गोष्टी गीतेच्या जन्मानंतरच्या आहेत असे सबळ पुराव्याने आपल्या प्रस्तावनेत सिद्ध केले आहे. ख्रिस्ताचा, त्याच्या धर्माचा व धर्मप्रसाराचा तेलंगांनी आपल्या नजरेखाली घातलेला इतिहास फार मोठा आहे. जेव्हा तेलंग गीतेचे भाषांतर करायला बसले तेव्हा त्यांना एम० ए० च्या परीक्षेचा व कायद्याच्या परीक्षेचा अभ्यास करायचा होता, हे ध्यानात ठेवले तर तो अभ्यास सांभाळून ख्रिस्ती धर्माचा इतिहास वाचण्याच्या तेलंगांच्या बुद्धीच्या बहुविध ग्रहणशक्तीचे आश्चर्य

वाटणे स्वाभाविक आहे. तेलंगांनी आपले गीतेचे भाषांतर त्या खंडनपर प्रास्ताविक लेखासह पुढे लवकरच प्रसिद्ध केले. त्या लेखाविरुद्ध कोणी प्रतिवाद केल्याचे ऐकिवात नाही. त्याचप्रमाणे गीता ही बायबलची नक्कल आहे असे पुन्हा कोणी प्रतिपादन करण्यास धजला नाही. हेच तेलंगांच्या प्रतिपादनाच्या परिणामकारकतेचे लक्षण ठरते. या लेखनकाळात तेलंगांनी युक्लीडच्या पुस्तकांचा अभ्यास विचाराच्या सुसंबद्धतेसाठी चालविला होता.

तेलंग १८७२ मध्ये विद्यार्थिदशेच्या बाहेर पडले. त्यांनी वकिलीचा व्यवसाय पत्करला. परंतु प्राचीन संस्कृत शास्त्रग्रंथांचा व्यासंग आणि विचार त्यांनी सोडला नाही. वकिलीचा धंदा सुरुवातीस उत्साहजनक नव्हता. १८७५ नंतर ते या धंद्यात सरसावले. त्या वर्षी कायद्याच्या बारीक गुंतागुंतीचा एक खटला त्यांनी जिंकला व वकिलीच्या धंद्यात त्यांचे आसन उत्कर्षपूर्वक स्थिरावले. एकीकडे या खटल्याची गुंतागुंत उलगडीत असता दुसरीकडे तेलंग आणखी एका विद्वत्तेच्या क्षेत्रातील सामन्याची तयारी करीत होते. जर्मनीत वेबर नावाच्या संस्कृतज्ञ पंडिताने संस्कृत वाङ्मयाचा इतिहास लिहिला होता. त्याचे इंग्रजी भाषांतर संस्कृत भाषेच्या इतिहासाचा प्रमाणभूत ग्रंथ समजला जात असल्याने भारतीय विद्यापीठांच्या व्यवहारात त्याचा अलिकडील काही वर्षांपर्यंत फार बोलबाला झालेला होता. वेबरने आपल्या इतिहासात रामायण हे काव्य होमरच्या 'ईलिअड' या काव्याचे अनुकरण आहे असा सिद्धांत मांडून संस्कृत अभ्यासाचे वातावरण भारतीयांच्या दृष्टीने बिघडवले होते. वेबरच्या सदर सिद्धांताचा समाचार तेलंगांखेरीज इतर कोणी घेतल्याचे पाहण्यात नाही. तेलंगांनी आपल्या हेतूसाठी ग्रीक वाङ्मयाचा इतिहास—त्यातल्या त्यात इलिअड काव्याचा इतिहास—अभ्यासण्याचे श्रम घेतले. त्याचे फळ पुढे एका दीर्घ प्रबंधाच्या रूपाने लोकांसमोर आले. वेबरने आपल्या पुस्तकाच्या, हा निबंध प्रसिद्ध झाल्यानंतरच्या, आवृत्तीत एका तळटिपेत "माझे मत खोडण्याचा तेलंगांनी खटाटोप केला आहे, पण तो माझे मत बदलावे अशा योग्यतेचा नाही." अशा अर्थाचा अभिप्राय नमूद करून तेलंगांच्या निबंधाची दखल घेतली आहे. पण वेबरचे पुस्तक सांप्रत मागासले असून संस्कृत वाङ्मयाच्या वेबरनंतरच्या इतिहासकारांनी वेबरचे मत उचलून धरलेले नाही. हा परिणाम तेलंगांच्या निबंधाचा समजल्यास चूक होणार नाही. ज्या काळी युरोपियनांचा सर्वच बाबतींत वचक वाटत असे, त्या काळी वेबरसारख्या प्रख्यात पंडिताशी झगडणे हे एक प्रकारचे धाडस होते. तेलंगांनी हे धाडस केले. या धाडसाला राष्ट्रीय दृष्ट्या मोल आहे. आत्मविश्वासाचा अभाव हा राष्ट्राच्या अधःपाताचा एक घटक असून तो राष्ट्राच्या जीवनात कायम असेपर्यंत उद्धाराची आशा सहसा जोरावत नाही. जेव्हा इंग्रजांचे शौर्य, धैर्य, विद्वत्व इत्यादी गुण अद्वितीय असून त्यांच्याशी भारतीयांनी स्पर्धा करणे मूर्खपणाचे, अशा स्पर्धेत भारतीयांना विजय मिळणे अशक्य, अशा स्वरूपाचा ग्रह आपल्या देशात रूढ होता,

तेव्हा इंग्रजांशी दोन हात करून यशस्वी होणारा तेलंगांसारखा पुरुष आत्मविश्वास रुजवतो, आणि आज ना उद्या आपले डोके वर निघेल अशा भावनेला जन्म देतो, एकाच्या विजयाने दुसऱ्यामध्ये उत्साह संचरून ही भावना वाढत जाते.\ आपल्याजवळ ज्ञानाचे भरपूर भांडवल व त्याच्या योग्य उपयोगासाठी प्रतिपक्षाच्या पद्धतीच्या युक्तिवादाचे बळ असेल तर इंग्रजच काय पण कोणत्याही युरोपियन प्रतिपक्षाचा पराभव करता येईल, असा आत्मविश्वास भारतीयांमध्ये तेलंगांनी उत्पन्न केला.\ तेलंग या कामी अग्रेसर होते, असे सुचवायचे नाही. त्यांच्या पूर्वी डॉ० भांडारकरांनी हे काम सुरू केले होते; पण विषयाच्या भव्यतेकडे व महत्त्वाकडे लक्ष देऊन तेलंगांच्या कामगिरीचे येथे किंचित विवेचन केले आहे.

तेलंगांचा हा विद्वत्तेच्या क्षेत्रातील पराक्रम युरोपात पोचला होता. मॅक्समुल्लर यांनी 'प्राच्य देशांतील पवित्र ग्रंथ' (सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट)\ या मालेत गीता, अनुगीता व सनत्सुजातीय या महाभारतामधील तीन तत्त्वज्ञानपर प्रकरणांचे भाषांतर तेलंगांकडे सोपविले व त्यांनी ते विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहून पार पाडले\ या प्रकरणांतील समाजस्थितिविषयक संदर्भ पाहून ती प्रकरणे केव्हा रचली गेली असतील, यासंबंधीची तेलंगांच्या प्रस्तावनेत आढळणारी कित्येक अनुमाने अत्यंत उद्‌बोधक वाटतात. समाजाची स्थित्यंतरे वाङ्मयात कशी उमटतात, याचा अभ्यास करणारांना ती अनुमाने मार्गदर्शक होणारी आहेत. याखेरीज तेलंगांचा शंकराचार्यांच्या चरित्रावर एक निबंध आहे. त्यांच्या संशोधनपर स्फुट लेखामध्ये त्यांनी, "अमुक वर्षांमागे शांकरभाष्य वाचीत असता त्यातील काही विधाने आचार्यकालीन इतिहासाला साह्य करणारी वाटली," असा उल्लेख करून त्या विधानांवरून सुचणारी अनुमाने नमूद केली आहेत. "अमुक वर्षांमागे" (मुळात संख्यावाचक शब्द आहेत) या शब्दांनुसार हिशेब करू लागल्यास तेलंग वयाच्या तेराव्या वर्षी शांकरभाष्य वाचीत होते, असा निष्कर्ष निघतो. तेराव्या वर्षी शांकरभाष्य वाचणे व त्या वेळी संशोधनाची दृष्टी असणे या दोन्ही गोष्टी काहीशा चकित करून सोडणाऱ्या आहेत.\ तेलंगांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व सर्वमान्य होते. पुढे ते त्यांना न्यायाधीश झाल्यावर धर्मशास्त्राची वचने आपल्या सामाजिक प्रगतिपर विचारांशी जुळवून घेताना उपयोगी पडले. त्यांचे वाङ्मय तीनदा संग्रहरूपाने प्रसिद्ध झालेले आहे. प्रथम त्यांच्या कायदेमंडळातील भाषणांचा संग्रह न्या० मू० वेस्ट्रॉप यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यात आला. दुसऱ्या संग्रहात सार्वजनिक चळवळीतील काही ठळक भाषणे आहेत. तिसऱ्या संग्रहात त्यांचे संस्कृत वाङ्मयातील संशोधनाचे लेख आहेत. पहिले दोन काहीसे दुर्मिळ आहेत. तिसरा संग्रह अद्यापि त्या अवस्थेस पोचलेला नाही.

\ ज्याचा व्यवसाय उत्तम चालला आहे आणि जो सामाजिक व राजकीय गरजांचा विचार करतो तो सार्वजनिक चळवळीपासून फार दिवस अलिप्त राहणे शक्य नसल्याने सार्वजनिक कार्यात तेलंग लवकरच पडले. फेरोजशहा मेहता व बद्रुद्दीन तय्यबजी हे

त्यांचे सहकारी होते. या काळी जे जे सामाजिक व राजकीय वाद उपस्थित झाले होते, त्यांमध्ये तेलंगांनी भाग घेतला होता, याची साक्ष दुसऱ्या संग्रहातील भाषणे पटवितात. खुला व्यापार विरुद्ध संरक्षित व्यापार, काळ्या न्यायाधिकाऱ्यांपुढे गोऱ्या गुन्हेगाराची चौकशी व्हावी की न व्हावी, भारतीयांना देशावर परचक्र आल्यास लष्करी स्वयंसेवक या नात्याने त्या परचक्राच्या प्रतिकाराची संधी असावी, अशी कित्येक महत्त्वाची प्रकरणे तेव्हा उपस्थित झाली होती आणि त्यांवर मोठाल्या सभांतून तेलंगांनी भाषणे केली. तेलंगांच्या वक्तृत्वाची नामांकित इंग्रजांनी स्तुती केली आहे. त्यांची भरीव कामगिरी मुंबई म्युनिसिपालिटीच्या कायद्यासंबंधातली आहे. म्युनिसिपालिटीचा कायदा घडवताना मेथा व तेलंग यांनी विशेष हातभार लावला, अशी त्या कायद्याच्या चर्चेत या दोघांची ख्याती ऐकू येते. मुंबई म्युनिसिपालिटीने १९५० मध्ये तेलंगांच्या जन्मशताब्दीनिमित्त स्मारकाची योजना विचारात घेऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली. मुंबई विद्यापीठात तेलंगांनी अभ्यासक्रम ठरविण्यासंबंधात जे प्रयत्न केले ते आज अविस्मरणीय वाटण्याचा योग आला आहे. बी० ए०च्या परीक्षेत एकेक विषय विद्यार्थ्यांनी स्वीकारावा ही कल्पना तेलंगांना मान्य नव्हती. बी० ए०च्या परीक्षेत मानवी व्यवहाराला अवश्य तेवढे विषय असावेत आणि एम० ए०च्या परीक्षेला विद्यार्थ्याने वाटल्यास एखाद्या विशिष्ट विषयाचे ज्ञान संपादावे असे तेलंगांचे मत होते. स्पेशलायझेशन व जनरल नॉलेज यांत जास्त लाभदायक कोणते, असा वाद अलिकडे चालू झाला आहे. बी० ए०ला एकच विषय घेतल्याने कदाचित त्या विषयापुरता विद्यार्थी ज्ञानी होत असला तरी इतर बाबतींत तो अडाणी राहतो. या दोषाच्या परिहारार्थ तेलंगांनी बी० ए०साठी जो अभ्यासक्रम आखला तो १८९०-पासून १९१३ पर्यंत चालू होता. पुढे अभ्यासाचे तंत्र बदलले. या तंत्रापासून फायदा होत नसल्याच्या जाणिवेने आता त्यात फेरफार करण्याचा विचार उद्भवला आहे. सारांश, तेलंगांच्या वळणावर नवा अभ्यासक्रम जाण्याचा संभव तेलंगांच्या शिक्षण-शास्त्रातील थोरवीला उजाळा देणारा आहे.

१८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा तेलंगांनी दोनतीन वर्षे तिच्या कार्यात भाग घेतला. १८८९ मध्ये त्यांची हायकोर्टात न्यायाधीशाच्या जागी नेमणूक होऊन तेलंग राजकीय चळवळीतून बाहेर पडले. राजकारणात सरकारी नोकरांनी भाग घेऊ नये असा संकेत अनुभवास येताच रानड्यांनी सामाजिक परिषद काँग्रेसच्या जोडीने भरविण्याची तोड काढून काँग्रेसशी आपला संबंध तुटू दिला नाही. तथापि तेलंगांनी रानड्यांच्या धोरणाशी समरसता दाखविली नाही. हायकोर्टात शिरल्यावर तेलंग राजकारणाला कायमचे दुरावले असे म्हणावे लागते. १८९१ मध्ये संमतिवयाचा कायदा सरकारने पास करण्यापूर्वीच्या तत्संबंधाच्या वादळात कायद्याचा पक्ष तेलंगांनी उचलून धरला. त्याबद्दल त्यांना कायदाविरोधी पक्षाची टीका सोसावी लागली. मग अशा टीकेचे खुसपट कुठून उठेल याचे नियम पाहण्याची गरज नसते. ऑक्वर्थ आणि

शाळिग्राम या दोघांनी मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे प्रसिद्ध केले. त्यास अनुलक्षून बोलताना तेलंगांनी निबंधमालाकार चिपळूणकरांबद्दल "मि० विष्णु" असे म्हटले, तेवढ्याच निमित्ताने तेव्हाच्या केसरीत एक टीकालेख प्रसिद्ध झाला आहे.

न्यायमूर्ती या नात्याने त्यांनी हिंदू धर्मशास्त्राशी संबंध असलेले जे निकाल दिले त्यांत धर्मशास्त्र सामाजिक प्रगतीच्या धोरणाशी जुळविण्याची त्यांची प्रवृत्ती असे हे पूर्वी सांगितले आहे. हा सामाजिक सुधारणेचा पुरस्कार त्यांना आपल्या मुलीच्या लग्नात संभाळता आला नाही; यामुळे त्यांच्यावर पुष्कळच टीका झाली. टीकेपेक्षा मुलीचे अल्पवयात लग्न हा प्रकार त्यांच्या हृदयाला फार झोंबला. त्या प्रकाराशी त्यांचा संबंध नव्हता. घरातल्या मंडळींनी तो प्रकार घडवून आणला. तसाच एक प्रकार त्यांनी बांधलेल्या नव्या घरी राहावयास जाण्याच्या वेळचा आहे. जुन्या घरातले देव सोवळ्याने नव्या घरी नेण्याची आज्ञा वडिलांनी केल्यामुळे तेलंगांनी ती आज्ञा अक्षरशः पाळल्याची आख्यायिका आहे. तेलंगांना मूळव्याधीचा विकार जडला म्हणून त्यावर शस्त्रक्रिया करावी अशी त्यांच्या देशीविदेशी इष्टमित्रांची इच्छा त्यांच्याजवळ व्यक्त होत असताही, केवळ वडिलांना शस्त्रक्रिया मान्य नाही एवढ्याकरिता तेलंगांनी काही गावठी जालीम औषधोपचार स्वीकारले आणि त्याने रोग वाढून तेलंगांना मृत्युमुखी पडावे लागले, असे कित्येक चरित्रकारांचे मत दृष्टीस पडते. वडिलांची आज्ञा किती मानावी असा आक्षेप काढणारांचे समाधान करणे कठीण आहे. तेलंगांच्या श्रद्धेचा हा विषय होता व त्याचे अनिष्ट परिणाम त्यांनी भोगले. असे आक्षेप तत्कालीन पुढाऱ्यांसंबंधातच नव्हे, तर राम, भीष्म इत्यादी प्राचीन पुरुषांच्या पितृनिष्ठेबद्दल घेणारे महाभाग हल्ली कधी कधी पुढे येतात. परंतु त्या पुरुषांच्या श्रद्धेला मान तुकवून स्तब्ध राहणे हाच या बाबतीत योग्य मार्ग वाटतो.

१८९३ मध्ये तेलंग मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू नेमले गेले परंतु लवकरच ते कालवश झाल्यामुळे त्यांची कामगिरी गाजण्याचा योग आला नाही. उपकुलगुरू हा युरोपियन असला पाहिजे ही वतनदारी तेलंगांच्या योग्यतेने मोडली. तेलंग हे मुंबई विद्यापीठाचे पहिले उपकुलगुरू म्हणून त्यांचा गौरव शिल्लक राहिला. त्यांच्या मागून ते स्थान डॉ० भांडारकरांना देण्यात आले. १८९२ ते १८९५ या वर्षांत बरेच नामांकित पदवीधर लोकसेवक अल्पवयात निधन पावल्यामुळे 'पदवीधर अल्पायुषी का ?' असा प्रश्न रानड्यांनी उपस्थित करून या संकटाचे मूळ शोधण्याचा यत्न केला. हा वाद काही काळ चालून थांबला. त्या वादाचा विस्तार येथे नको. तेलंगांना मुंबईचे मानकरी का मानायचे याची वाच्यता मागे केलेली आहे.

सात

जमशेटजी जीजीभाई बाटलीवाला

जमशेटजींची माहिती देण्यापूर्वी पारशी समाज आपल्या देशाच्या आश्रयाला आल्यापासून त्याने केलेल्या कामगिरीचा थोडा इतिहास सांगणे आवश्यक आहे. सातव्या शतकात इस्लामी अरबांनी इराणवर स्वारी करून तो देश जिंकला आणि तेथील जनतेला इस्लामी धर्माची दीक्षा सक्तीने देण्याचा उद्योग आरंभला. मरावे किंवा बाटावे, यांतला 'बाटावे' हा मार्ग बहुसंख्य इराणी प्रजेने स्वीकारला. तथापि ज्यांना आपला धर्म सोडून जगायचे नव्हते त्यांनी देशत्याग केला. देशत्याग करणारांना हिंदुस्थान हा जवळचा देश असल्याने पुष्कळसे इराणी (त्यांचा निश्चित आकडा उपलब्ध नाही) भारताच्या पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर आले. प्रथम दीव येथे ते उतरले; पण तेथून त्यांना निरनिराळ्या स्वरूपाचा त्रास चुकविण्यासाठी स्थलांतर करणे भाग पडले. शेवटी ते संजाण गावी स्थिरावले. स्थलांतर चालू असता हिंदू समाजाच्या चालीरीतींचा पारशी निर्वासित बारीक अभ्यास करीत होते. संजाणच्या हिंदू राजाला वश करताना त्यांनी "गोमांस खाणार नाही; घर पवित्र करण्यासाठी गोमूत्राचा उपयोग करू; लग्ने रात्रीच्या वेळी केली जातील; गुजराती भाषा व बायकांचा गुजराती पद्धतीचा पेहेराव या दोन्ही गोष्टी स्वीकारू," अशा कित्येक अटी कळविल्या आणि ह्या मान्य झाल्यावर तेथे वस्ती करून त्यांनी शेती, कारागिरी वगैरे भिन्नभिन्न व्यवसाय सुरू केले आणि त्यांत चांगले यश कमावले. ७१६ हे संजाणला आल्याचे वर्ष आहे. परंतु पुढच्या शतकांतून पारश्यांचे निर्देश सिंध, पंजाब वगैरे दूरच्या प्रदेशांच्या इतिहासांत दिसतात. हे पारशी संजाणचे का वायव्य सरहद्दीवरून आलेले याचा नीट उलगडा होत नाही. परंतु एवढे खरे की संजाणचे पारशी हळूहळू नवसारीसारख्या गावांतून वस्तीला गेले.

उत्तरेकडून मुसलमानांच्या स्वाऱ्या दक्षिणभागावर होऊ लागल्यावर पुन्हा एकदा धर्मांतराची आपत्ती पारश्यांवर ओढवली. अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती संजाणचे राज्य जिंकण्यास आल्यावेळी सुमारे पंधराशे पारशी वीर त्याच्याशी लढले. हिंदूंची फौज मोडून हिंदूंचे राज्य गेल्यावर मुसलमान लोक पारश्यांच्या पाठीस लागले. पारश्यांनी जवळच्या डोंगरदऱ्यांचा आश्रय केला. बरीच वर्षे त्यांनी वनवासात घाल-

विली, परंतु आपला धर्म वाचविला. भारतात आल्यावर येथील जनतेच्या संसर्गाने पारशी धर्माचे शुद्ध स्वरूप नाहीसे होऊ लागले होते, म्हणून १५ व्या शतकात एक पारशी इराणात गेला व तेथे ठिकठिकाणी पांगून राहिलेल्या पारश्यांच्या भेटी घेऊन त्याने आपल्या धर्माचे खरे स्वरूप समजावून घेतले आणि पारश्यांचे काही धर्मग्रंथ बरोबर आणले. मुसलमानांमागून पारश्यांचा छळ धर्मानिमित्त पोर्तुगीजांनी आरंभला. ठाण्याच्या पारशी समाजाला ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा पोर्तुगीजांनी निश्चय केला तेव्हा पारश्यांनी त्यांस कळविले की, आमचा धर्म साजरा करण्याची शेवटची संधी मिळावी म्हणून पोर्तुगीजांनी एखादा आठवडा दम धरावा; मग आम्ही सगळे जण ख्रिस्ती धर्म स्वीकारू. ही अट ऐकून पोर्तुगीजांना आनंद झाला. पारश्यांनी शेवटच्या दिवशी सर्व पोर्तुगीजांना टोलेजंग मेजवानी दिली. मेजवानीत दारूचा पुरवठा भरपूर ठेवला होता. पोर्तुगीज दारूने धुंद होताच पारश्यांनी कल्याणकडे पळ काढला. याप्रमाणे त्यांनी आपले धर्मांतर टाळले. धर्माचे शुद्ध स्वरूप राहण्यासाठी एकाने इराणात प्रवास केल्याचा वृत्तांत मागे सांगितला. हा प्रकार तेवढ्यावरच थांबला नाही; पुढेही चालू होता. प्रत्येक वेळी काही नवे धर्मग्रंथ हस्तगत करून येथे आणले जात असत. पारश्यांनी इराणातून आणलेला आपला पवित्र अग्नी संभाळताना पुष्कळ हाल सोसले, स्थलांतर केले. शेवटी तो अग्नी उधवाड्यास पोचल्यापासून सुरक्षित आहे.

पारशी समाजाचा उदयकाल इंग्रजांच्या कारकिर्दीत आला. त्यांच्या गुणांचा उपयोग इंग्रजांनी करून घेतला. लवजी वाडियाच्या जहाजे बांधण्याच्या कौशल्याचा इंग्रजांना कसा फायदा झाला, ही माहिती सुरुवातीच्या विवेचनात आलेली आहे. वाडियाने इंग्रजांच्या चाकरीत नशीब काढले. येथे ज्या व्यक्तीचा परिचय करून द्यायचा आहे, त्या व्यक्तीची थोरवी स्वतंत्र व्यापारी या नात्याने सांगायची आहे.

जमशेटजींचा जन्म १७८३ सालातला. तो मुंबईस झाला की नवसारीस हा वाद मिटला असून मुंबई हेच त्यांचे जन्मस्थान ठरले आहे. वडील जीजीभाई हे विणकराचा धंदा करणारे; पण मुंबईस परवडेना म्हणून जमशेटजी पाच वर्षांचे असता वडिलांनी नवसारीस आपला धंदा चालविला. १७९९ म्हणजे जमशेटजी अवघे सोळा वर्षांचे असताना थोड्या महिन्यांच्या अंतराने प्रथम आई व नंतर वडील ही दोघेही वारली. जमशेटजी अनाथ होऊन मुंबईस जाण्याला निघाले. तेव्हा एका दयाळू बाईने जमशेटजीला प्रवासात उपासमार होऊ नये म्हणून काही शिदोरी दिली. जमशेटजी मुंबईला एका मामाकडे रिकाम्या बाटल्या विकण्याचे काम करू लागले. खांद्यावर बाटल्यांचे गाठोडे घेऊन लोकांच्या घरापुढून बाटल्यांविषयी आरोळी देत हिंडायचे हा व्यवहार जमशेटजींच्या स्वभावाला मानवणारा नव्हता. त्यांचा उत्साह, चौकसपणा हे गुण त्यांच्या ठिकाणी बाटल्यांच्या क्षुद्र व्यापारातून जगाच्या इतर विशाल व्यापारी क्षेत्रात पडण्याची उत्सुकता वाढवीत होते. वर्ष उलटण्याच्या आतच त्यांनी



चीनची पहिली फेरी मारली. ह्यापूर्वी मुंबईस त्यांनी हिशोबाचे ठोकळ ज्ञान व कामापुरते इंग्रजी भाषेचे ज्ञान संपादन केले होते.

१८०० ते १८०८ या आठ वर्षांच्या अवधीत जमशेटजींनी चीनला सहा वेळा भेट दिली आणि दुसऱ्या खेपेस त्यांनी आपले बस्तान असे जमविले की पुन्हा दारिद्र्य त्यांच्या वाऱ्यास उभे राहिले नाही. त्यांची सारखी भरभराटच चालली होती. या भरभराटीला संकटाचे धक्के बसले नाहीत असे नाही. १८०३ मध्ये मुंबईच्या कोटातील वस्तीमध्ये आग लागली. तिने वस्तीच्या फार मोठ्या भागाला भस्मसात केले. त्या आगीत जमशेटजींची निम्म्याहून अधिक मालमत्ता जळाली. परंतु जमशेटजींची हिंमत खचली नाही. चीनच्या प्रवासात एकदा ब्रिटिश आरमार व फ्रेंच आरमार यांची गाठ पडून चांगली लढाई झाली. तो काळ नेपोलियनच्या उत्कर्षाचा अर्थात फ्रेंच व इंग्रज यांच्या वैराचा होता. सदर लढाईत इंग्रजांची सरशी झाल्यामुळे जमशेटजी सुखरूप स्वदेशी आले. आणखी एका प्रवासात जमशेटजींना फ्रेंचांच्या कैदेत पडावे लागले. फ्रेंचांनी जमशेटजींचा माल जप्त केला. सुटका झाल्यावर जवर भाडे भरून जमशेटजी एका बोटीने कलकत्त्यास पोचले व तेथून मुंबईस परतले. ज्या काळी जमशेटजी प्रवास करीत होते त्या काळी आगबोटी नव्हत्या, शिडाच्या बोटी व त्याही फारात फार हजार-पंधराशे टन वजनाच्या असत. एकदा वादळामुळे त्यांची बोट समुद्रकिनाऱ्याच्या खडकावर आदळून फुटली. त्यांच्या नोकराजवळ मोती होते. त्याने आपला जीव धोक्यात घालून मोती वाचविले. जमशेटजी व नोकर हे दोघेही वचावले, परंतु आपल्या नोकर.बद्दल सदर कामगिरीनिमित्त जमशेटजींना अतोनात प्रेम उत्पन्न झाले. प्रवास म्हटला की, हा नोकर सोबतीस नाही असे कधीच झाले नाही. जमशेटजींनी या नोकराचे परोपरीने कल्याण केले. आपल्या इमानी नोकरांना जमशेटजींनी सुखी केल्याची पुष्कळ उदाहरणे आहेत.

व्यापाराची बैठक पक्की होऊन या बैठकीला जमशेटजींनी स्वतःच्या मालकीच्या २०-२५ जहाजांचा आधार निर्माण केला होता. ती बैठक पुन्हा हलणार नाही अशी खात्री पटल्यावर साठणाऱ्या द्रव्यनिधीला जमशेटजींनी दातृत्वाची जोड दिली. व्यापाराची बैठक पक्की करण्याला जमशेटजींचे जे गुण उपयोगी पडले त्यांत सचोटी, ठरल्यावेळी काम उरकणे, आपल्या निष्ठेची प्रामाणिक माणसे नेमणे इत्यादी गुण महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या व त्यांच्या पत्नीच्या दातृत्वाची जी स्मारके मुंबईत आहेत ती त्यांच्या परोपकारबुद्धीची दर्शक आहेत. मुंबईत जेथे राहून औषधोपचार घेता येईल असे रुग्णालय नव्हते. जमशेटजींनी असे रुग्णालय जन्मास घातले. जमशेटजींनी एक लाख रुपये रुग्णालय बांधण्याकरिता सरकारच्या हवाली करण्याचे ठरविले. १८३४-मध्ये सरकारशी तसा पत्रव्यवहार सुरू झाला आणि विलायतेहून ईस्ट इंडिया कंपनीची संमती १८३८ मध्ये आली. त्यानंतर रुग्णालयाकरिता योग्य जागा शोधण्याचा प्रश्न उपस्थित झाला. जी जागा निवडण्यात आली ती २८ हजार रुपये खर्चून जमशेटजींनीच

देणे हे एक पारश्यांच्या रागाचे स्वतंत्र कारण होतेच. जमशेटजींनी आपल्या मुलीला इंग्रजी शिकविले, मुलींच्या शाळांना उत्तेजन दिले, हेसुद्धा पारश्यांना आवडत नव्हते. पारशी समाजाची सुधारणा व्हावी याकरिता जमशेटजींनी पारशी पंचायतीच्या कारभारातील दोष उघडकीस आणणारे एक पुस्तक लिहून पारश्यांचा राग स्वतःवर ओढवून घेतला. पण पारश्यांतील व्यापर व दातृत्व या दोन्ही दृष्टीने जगद्विख्यात पुरुष म्हणून जमशेटजींबद्दल पारश्यांना अभिमानही वाटत असे. १८५९ मध्ये जमशेटजी वारले तेव्हा हा प्रासंगिक स्वरूपाचा राग विसरून पारशी तर वागलेच, पण मुंबईतील सर्व जातींच्या लोकांनी आपला त्यांचेविषयीचा आदर व्यक्त केला. पारशी समाजाने हिंदुस्थानात आश्रय मिळाल्याच्या उपकाराची फेड कशी सुरू केली, याचे जमशेटजींचे सर्वभेदातीत दातृत्व हे उत्तम उदाहरण आहे.

जमशेटजींच्या भरभराटीच्या काळातच उदयास येऊ लागलेली बरीच उल्लेखनीय पारशी कुटुंबे असून, त्यांनी मुंबईच्या वैभवात आपल्या देणग्यांनी भर टाकली आहे. यांतले एक बनाजी नावाचे घराणे हे जमशेटजींचे समकालीन होते. याच्या कामगिरीसाठी एका पुरुषाला पवईचे रान आणि पाणी यांचा मालकीहक्क मिळाला होता. ज्याच्याकडे या स्थळाचे जलतरुपाषाणादिकांचे स्वामित्व होते, त्याने त्या जागी पुष्कळ सुधारणा केल्या. अगोदर रान नाहीसे करून त्या जागी फळबागा व उसाचे मळे उभे केले. भारतीय शेतीची सुधारणा व्हावी यासाठी त्याने प्रयोग चालविले होते. त्याचा उद्योग पाहण्यासाठी एकदा मुंबईचा गव्हर्नर सर जॉन मालकम गेला असता रानाला बागशाहीचे आलेले रूप पाहून त्याला संतोष झाला आणि त्याने जी प्रशंसा केली ती आजतागायत पारशी समाजाच्या इतिहासात पाहायला सापडते. बनाजीने पुष्कळ जातींच्या वनस्पती तेथे वाढविल्या होत्या. तेथे रावणारांच्या सुखाकडेही तो पाहत असे. त्याने मॉरिशस येथील उसाची आपल्या जागेत लागवड करून साखरेचा कारखाना काढला होता. मॉरिशसच्या उसाने येथील उसाची कायमच हकालपट्टी केली व आज देशभर जो ऊस पिकतो तो मॉरिशसचा, असे तज्ज्ञांचे मत आढळते. याखेरीज बनाजीने चालविलेले प्रयोग सध्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपात देशाच्या व्यवहारात मुरलेले आहेत. बनाजीने जी आंबराई उभारली होती तीही प्रसिद्ध होती. आंबा हे फळ प्रामुख्याने भारतीय आहे व त्याच्या रुचीची चटक युरोपियन लोकांना लागल्याचा अनुभव-आंब्याच्या करंड्या परदेशी बरोबर घेऊन प्रवास करणारांना हटकून येतो. परंतु व्हिक्टोरिया राणीला या फळाची चव चाखावयास लावणारा पहिला इसम उपलब्ध इतिहासाप्रमाणे बनाजी हाच ठरतो. जेव्हा बनाजीने आंबा पाठविला, तेव्हा अवघ्या २४ तासांत मुंबईहून लंडनला पोचणारी

विमाने नव्हती आणि बोटींना महिन्याहून जास्त काळाने विलायत गाठता येत असे. परंतु बनाजीचे आंबे व्हिक्टोरिया राणीला पोचले, तिने त्यांचा आस्वाद घेतला व बनाजीचे पत्रद्वारे आभार मानले, अशी हकिगत बनाजीच्या चरित्रकथेत वाचायला सापडते. बनाजी वारला तेव्हा त्याचे स्मारक म्हणून एक संस्था स्थापन करण्यात आली. 'फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूट' या नावाने एकदा ती प्रसिद्ध होती. या संस्थेच्या विद्यमाने आणि जागी गेल्या शतकात पुष्कळ थोर पुरुषांची व्याख्याने झालेली असल्याच्या नोंदी तत्कालीन वृत्तपत्रांतून आलेल्या आहेत.

अठराव्या शतकाच्या मध्यात सुरतेहूनज हाज बांधणारा लवजी वाडिया ज्याप्रमाणे मुंबईस आला, त्याचप्रमाणे आणखी कित्येक पारशी कुटुंबे सुरतेखेरीज नवसारी-सारख्या इतर गावांहून नशीब काढण्यासाठी मुंबईस आली होती. त्यांतलेच एक 'रेडीमनी' हे कुटुंब असून, आज सदर आडनाव उत्कटतेने लोकांपुढे नसले तरी मूळ कावसजी जहांगीर हे नाव प्रसिद्ध आहे. "केव्हाही या घराण्याकडे गेले की मागाल तेवढी रोकड हजर, किंवा मागाल ती देणगी तात्काळ पुढे आलीच म्हणून समजा," अशा अनुभवावरून 'रेडीमनी' हे आडनाव कावसजी जहांगीर या नावाला जोडले जाऊ लागले. बहुतेक पारश्यांची आडनावे स्थळावरून, गुणावरून, व्यवसायावरून अथवा कामाच्या स्वरूपावरून पडलेली आहेत. बाटल्या विकणारे म्हणून बाटलीवाला, तर तारापूरचा, भिवंडीचा, नगरचा, ठाण्याचा रहिवासी म्हणून तारापोरवाला, भिवंडीवाला वगैरे नावे उत्पन्न झाली हे सहज कळणारे आहे. पटेल हे पाटिलकीच्या अधिकाराचे व कामाचे द्योतक असले तर जोशी, पांड्ये ही नावे त्याच सदरात मोडणारी आहेत. मात्र ही पारश्यांच्या संदर्भात किंचित विस्मयजनक आहेत. मुंबईत इंग्रजांच्या राजवटीमध्ये पारश्यांनी चीनशी चाललेल्या व्यापारात पैसा कमावला. परदेशी मद्यांचा व्यापार हा एक त्यांचा मोठा व्यवसाय होता. जे कोणी भरभराटले त्यांनी मालाच्या वाहतुकीसाठी स्वतःच्या मालकीची जहाजे ठेवल्याची काही उदाहरणे आहेत. कावसजी जहांगीर हे अशांपैकीच एक समजावे लागते.

एका युरोपियन व्यापारी कंपनीच्या कोठारांचा रखवालदार हा कावसजी जहांगीरच्या आयुष्याचा प्रारंभ. परंतु साहस आणि व्यापार यशस्वी कसा होईल हे ओळखण्याची अचूक शक्ती यांच्या जोरावर व्यापारात पाऊल टाकल्यानंतर कावसजींना पुढे मागार घ्यावी लागली नाही. द्रव्यार्जन आणि परोपकारात त्याचे विसर्जन यांमध्ये जणू काय कावसजींची चढाओढ चाललेली होती. एल्फिन्स्टन कॉलेजला स्वतःची इमारत बांधून देण्याचे श्रेय या कावसजींचे. पदवीदान समारंभाचा दिवाणखाना (कन्व्होकेशन हॉल) बांधणारे कावसजी जहांगीरच. मुंबईत लाखावर रुपये खर्चून डोळ्यांच्या रोगासाठी स्वतंत्र इस्पितळ कावसजींनीच निर्माण केले. पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजला त्यांनी पन्नास हजारांची देणगी दिली. त्यांच्या

परोपकाराचा व्याप स्वदेशापुरताच नव्हता. इंग्लंड-युरोपातही त्यांच्या दातृत्वाला प्रसंगवशात अवसर मिळाला. यामुळे त्यांचे नाव तिकडेही उच्चारले जाते. आयुष्याची पंचवीस वर्षे त्यांचा दानधर्म अव्याहत चालला होता.

जमशेटजींचे समकालीन उदयोन्मुख घराण्यांतले 'पेटिट' हे घराणे आहे. ज्याने नशीब काढले तो पहिला पुरुष माणेकजी नसरवानजी. हा प्रथम दुभाषी या नात्याने तांदुळाच्या जहाजावरून मस्कत येथे गेला. तेथून परत आल्यावर त्याने एका युरोपियन कंपनीत काही काळ उमेदवारीत घालविला आणि नंतर स्वतःचा व्यापार आरंभला. या व्यापारातून त्याने कापसाच्या गिरण्या काढून त्या कारखानदारीला मुंबईत भव्य रूप आणले. पहिली गिरणी कावसजी दावर याने १८५१ मध्ये उभी करून तिची १८५४ मध्ये वाढ केल्याची हकिगत सुरुवातीच्या विवेचनात आलेली आहे. माणेकजीने या कारखानदारीचे फायदे धनिकांच्या निदर्शनास आणून त्यांच्या द्रव्यनिधीचा ओघ गिरण्यांच्या धंद्यात ओढला. गिरण्या निघाल्या तेव्हा पुरेसे कामगार मिळाले तरी त्यांना गिरणीचे काम शिकवावे लागे. माणेकजीने या सर्व अडचणी निस्तरून आपली गिरणी यशस्वी केली. त्याचे मुलगे कारखानदारीत अधिक निपुण असल्याचा अनुभव पुढे आला. त्यांनी अनेक गिरण्यांची स्थापना केली. यांच्या कर्तृत्वासारखेच दातृत्वही प्रशंसनीय होते. मुंबईतील अनेक लोकोपयोगी संस्था त्यांच्या दातृत्वाने पोसलेल्या आहेत.

मुंबई शहराच्या व्यापार-व्यवहारामध्ये सामान्यतः अशी एकही बाजू सापडणार नाही की ज्या बाजूच्या आघाडीवर पारशी नाहीत. १८३०-४० च्या दरम्यान मुंबईत पहिल्या बँका निघाल्या. त्यात पारश्यांचा हात होताच. पण त्यापूर्वी परदेशी हुंड्यांची देवघेव करणारे व ज्यांचा संबंध ईस्ट इंडिया कंपनीशी होता अशा पारश्यांची नावे जुन्या ऐतिहासिक साहित्यामध्ये दृष्टीस पडतात. आगगाड्यांचे काम निघताच त्यांच्या कंपन्यांचे भागीदार पारशी होते. परंतु बांधकामाचे कंत्राट घेऊन रेल्वेच्या इंजिनियरकडून वाहवा मिळविणाऱ्या एका पारश्याचे चरित्र सांगण्याजोगे आहे. त्याचे नाव जमशेटजी दोराबाजी. काम अगदी नवे; अर्थात त्याचा अनुभव नाही या सबबीवर त्याचे कंत्राट रेल्वेच्या मुख्य इंजिनियराने दोनदा नाकारले. तरी त्याने तिसऱ्या वेळी अधिक अवघड कामाच्या कंत्राटाची मागणी केली. तेव्हा मुख्य इंजिनियरांशी वाटाघाट होऊन, एकंदर खर्चाचे मान उतरविल्यावर जमशेटजीला हे कंत्राट मिळाले. डोंगर, दऱ्या, राने, नदीनाले यांनी व्यापलेल्या प्रदेशातून जमशेटजीला रस्ता बांधायचा होता. कामगारांसाठी अन्न, पाणी, राहण्याची जागा, आरोग्य इत्यादी गरजांची योग्य तरतूद करून, एकाही ऋतूत कामाला अडथळा होऊ न देता ठरल्या मुदतीत जमशेटजीने आपले काम, अधिकाऱ्यांना संतोष होईल

अशा रीतीने, संपविले. साहजिकच जमशेटजींच्या कर्तबगारीविषयी युरोपियन अधिकारीवर्गात आदर वाढून पुढे त्याने रेल्वेच्या बांधकामाचीच नव्हे तर इमारती, बंदरे वगैरे कामांची कंत्राटे घेऊन ती यशस्वी करून दाखविण्यात आपले आयुष्य घालविले. त्याने सुमारे एक कोट रुपयांची कामे केली असावी, असा अंदाज केला जातो. जमशेटजीला शिक्षण मिळाले नव्हते. पण त्याची बुद्धिमत्ता प्रखर होती. विशेषतः तोंडच्या हिशोबांत तो असा प्रवीण होता की कागदावर आकडे मांडून हिशोब करणारांना तो आपल्या झटपट अचूक निष्कर्षाने चकित करून सोडी. मजुरांच्या सुखसोयी पाहण्याकडे व सढळ हाताने त्यांना मजुरी देण्याकडे त्याची प्रवृत्ती असल्याने मजुरांचा त्याला कधी तुटवडा भासला नाही. एका वेळी त्याच्या कामावर १७ हजार मजूर काम करीत होते. त्याने पहिले कंत्राट पुरे केले (१८५५) तेव्हा अधिकारी व मोठाले नागरिक यांना चांगली मेजवानी दिली. त्या वेळी रेल्वेच्या मुख्य इंजिनियराने त्याची मुक्त कंठाने स्तुती गाइली.

आगगाड्यांच्या कामात पडलेल्या एका गृहस्थाची माहिती थोडक्यात सांगून झाली. ती संपविताना जाता जाता हे नमूद करायला हरकत नाही की, शिडाच्या बोटी जाऊन आगबोटीचे युग उगवले त्यातही सुरुवातीस पुष्कळ पारश्यांचा पुढाकार होता.

आणखी एका दानशूर पारश्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मुंबईत बायकांसाठी दवाखाना तर नव्हताच, पण डॉक्टरी शिकलेल्या स्त्रियाही नव्हत्या. त्यांना मुंबईस आणण्याचा उपक्रम सोराबजी शापुरजी बंगाली या पारश्याने केला. पुढे इस्पितळ काढण्याची कल्पना निघाली तेव्हा कामा नावाच्या एका पारशी धनिकाने एक लक्ष साठ हजारांची देणगी दिली. कामा हा जमशेटजी जीजीभाई किंवा पेटिट यांच्या तोडीचा श्रीमंत नव्हता. या इस्पितळाचा वृत्तांत ज्या काळाची पाहणी केली त्यानंतरच्या काळातील आहे. पण कामा घराणे जुने आहे.

आठ

दादाभाई नौरोजी

दादाभाई नौरोजींचे चरित्र म्हणजे हिंदी राजकीय इतिहासातील एका भगीरथाचे चरित्र असून, ते अत्यंत उज्ज्वल शीलाने बहरलेले असल्यामुळे त्यांच्या हयातीमध्ये सहवासी थोर पुरुष त्यांच्यासंबंधाने जे आदराचे उद्‌गार काढीत असत ते आजसुद्धा कोणत्याही कार्यक्षेत्रातील पुढाऱ्यांनी अवश्य मनन करण्याजोगे तर आहेतच, पण शक्य तर अनुकरणीयसुद्धा आहेत. दादाभाईंचा जन्म १८२५ साली मुंबई शहरात गरीब कुटुंबात झाला. मूळचे गरीब कुटुंब, त्यात अगदी बाळपणीच दादाभाईंवर पितृवियोगाचे संकट कोसळले. परंतु त्यांची आई अतिशय धीराची स्त्री होती. शिवाय मामानेही त्यांच्या सांभाळाची जबाबदारी अंगावर घेतल्यामुळे दादाभाईंना एकंदरीत बऱ्या रीतीने आपले बालपण व विद्यार्जन पार पाडता आले. दादाभाई हे जसे कुशाग्र बुद्धीचे तसेच अभ्यासी होते. मद्रासचे प्रकाशक नटेसन यांनी दादाभाईंच्या लेखांचा व भाषणांचा जो संग्रह छापला आहे, त्याच्या शेवटी दादाभाईंनी लिहिलेले आत्मचरित्र छापलेले आहे. त्यात दादाभाईंच्या लहानपणातील आवडीनिवडींचे व काही अनुभवांचे वर्णन पाहायला सापडते. चंद्र उगवला की, कोठेही जा, तो आपल्या सोबतीला असतो, या अनुभवाची दादाभाईंना आयुष्यभर मोठी मौज वाटत असे. पारशी समाजात मद्यपानाला प्रतिबंध नसल्याने दादाभाई एकदा दारूसाठी गुत्त्यावर गेले असता तेथे त्यांना दारूचे अनर्थ पाहायला सापडले, आणि पुन्हा त्या ठिकाणी जायचे नाही आणि दारूला कधी स्पर्श करायचा नाही अशी त्यांनी शपथ घेतली. ही शपथ त्यांनी कधी मोडली नाही. इंग्लंडमध्ये कित्येक वर्षे दादाभाईंनी निर्वाहाच्या व्यापारधंद्याकरिता घालविली. जेथे उठल्यासुटल्या दारूचा वापर करण्यात यावा असा जीवनाचा व्यवहार आहे, तेथे ही शपथ पाळणे हे एक प्रकारे दिव्यच होते; परंतु त्यातून दादाभाई सहीसलामत सुटले.

दादाभाईंनी शिक्षकांची शाबासकी व उत्तम अभ्यासाची बक्षिसे मिळवून आपले विद्यार्जन संपविले. त्यांच्या कुटुंबाचे एक कामा नावाचे स्नेही घराणे होते. त्यांच्याकडून पुस्तके घेऊन दादाभाईंना अभ्यास करावा लागला. या पुस्तकांच्या उसनवारीबद्दल त्यांनी आपल्या आत्मचरित्रात कृतज्ञता व्यक्त केली आहे. याच कामा

घराण्यातल्या एकाने पुढे व्यापारातील भागीदार या नात्याने दादाभाईंना विलायतेस नेले. त्यापूर्वी त्यांच्या बुद्धिमत्तेचे चीज व्हावे या उद्देशाने त्या वेळचे शाळाखात्याचे प्रमुख व हायकोर्टाचे सरन्यायाधीश सर अर्स्किन पेरी यांनी, दादाभाईंनी विलायतेस जावे, तेथील खर्चाच्या अर्ध्या भागाची जबाबदारी आपल्याकडे लागली, अशी हमी घेऊन आग्रह चालविला होता; परंतु विलायतेस जाणारे भारतीय वाटतात अशी भीती दादाभाईंच्या नातेवाइकांनी दर्शवून पेरीसाहेबांचा आग्रह वाया दडवला. येथे मात्र त्यांना गणित व भौतिक शास्त्रे या विषयांच्या प्राध्यापकाची जागा देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. दादाभाई यांची गणितशास्त्रात विशेष गती होती. त्यांनी हा विषय शिकविण्याच्या कौशल्याने चांगलेच नाव कमावले होते. त्यांना लोक 'दादाभाई मास्तर' या नावाने संबोधीत असत आणि हे नाव त्यांना शेवटपर्यंत अतिशय प्रिय होते.

प्राध्यापकाची कामगिरी ही त्यांच्या लोकसेवेचा उत्साह जिरवण्याजोगी मोठी नव्हती. शिवाय विद्यार्जन चालू असता व ते संपल्यावर त्यांच्या मनात एक संकल्प निरंतर घोळत असे. आपल्या विद्यार्जनासाठी सरकारमार्फत खर्च होणारा पैसा हा आपल्या जनतेचा पैसा असून, तो गरिबांच्या सेवेने फेडणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांना वाटत असे. याच कर्तव्याच्या संकल्पाने त्यांनी निरनिराळ्या चळवळी आरंभल्या. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करून त्यांवर निबंध वाचावे, म्हणून त्यांनी 'ज्ञानप्रसारक' या नावाची जी संस्था निघाली तिच्यात पुढाकार घेतला. या संस्थेच्या 'गुजराती' आणि 'मराठी' अशा दोन शाखा होत्या. दादाभाईंचे लक्ष दोन्ही शाखांकडे सारखेच होते. आपल्या समाजाच्या सर्व थरांत गाढ अज्ञान आहे, स्त्रियांमध्ये ते विशेष आहे, यासाठी मुलींच्या शिक्षणाचे कार्य त्यांनी हाती घेतले. या कार्याला प्रारंभी अतोनात अडथळे आले, परंतु दादाभाई व त्यांचे समान विचाराचे तरुण सहकारी यांनी या अडथळ्यांतून मार्ग काढला. लोकांच्या घरांतील ओसऱ्यांवर मुलींना शिकवण्याच्या स्थितीतून त्यांच्या या कार्याने मुलींच्या स्वतंत्र शाळा निघून त्या निर्विघ्न चालाव्या येथवर मजल मारली. या संदर्भात स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीचा उल्लेख टाळता येण्यासारखा नाही.

१८५१ मध्ये मुसलमानांनी पारश्यांविरुद्ध महंमद पैगंबरासंबंधाच्या एका इंग्रजी लेखाच्या गुजराती अनुवादावरून दंगा केला. तो लेख एका गुजराती भाषेच्या पारशी साप्ताहिकामध्ये प्रसिद्ध झाला. या वेळी दादाभाईंनी आपले स्वतंत्र विचार मांडण्याला साधन पाहिजे म्हणून 'रास्त गोफ्तार' (सत्यवादी) हे साप्ताहिक सुरू केले. १८५२-मध्ये निघालेल्या 'बॉंबे असोसिएशन'च्या कार्यातही ते उत्साहाने भाग घेत होते. पुढे १८५५ साली त्यांचे स्नेही कामा यांनी लंडन शहरी राहून व्यापार करण्याचे काम हाती घेतले. त्या वेळी त्यांनी दादाभाईंना त्यांच्या बहुविध गुणांकडे लक्ष देऊन

आपल्याबरोबर लंडनला नेले. दादाभाई लंडनला गेले; त्यांनी व्यापारव्यवसाय पत्करला. द्रव्यार्जनाच्या दृष्टीने त्यांची स्थिती सुधारली. तथापि लोकसेवेचा निदिध्यास त्यांना व्यापारात गुरफटून ठेवण्याला असमर्थ होता. कामांच्या व्यापारव्यवहारांत दारूसारख्या मादक पदार्थांचा समावेश असल्याचे पाहून त्यांनी हरकत काढली तेव्हा "हिंदुस्थानातील सरकारी नोकरीच्या पगारात अशा मादक पदार्थांपासून होणाऱ्या उत्पन्नाचा अंश नव्हता, अशी तुमची खात्री आहे का?" असा कामांकडून त्यांच्यापुढे सवाल टाकण्यात येऊन, "जर तो पैसा तुम्हांला आक्षेपार्ह वाटला नाही, तर व्यापारातल्या पैशाबद्दल दिक्कत का वाटावी?" असे दादाभाईंना विचारले गेले. दादाभाईंनी या प्रश्नाचे उत्तर न देता कामांच्या व्यापारातून आपले अंग काढून घेतले व आपल्या व्यापाराची स्वतंत्र उभारणी केली. एकदा काही कामासाठी टेंडरे मागविली असता एका टेंडरात शेकडा १० टक्के "दादाभाईंचे कमिशन" असे एक कलम त्यांच्या दृष्टीस पडले. हे कमिशन म्हणजे लाच असे ठरवून दादाभाईंनी त्या कलमाचा टेंडरवाल्याला जाब विचारला. असे कमिशन हा व्यापारातील शिरस्ता असल्याचे त्याने उत्तर दिले. प्रत्यक्ष कमिशनचा उल्लेख नसला तर अप्रत्यक्षरीत्या त्याची टेंडरच्या आकड्यांत कुठे ना कुठे तरतूद असते असाही खुलासा त्याने केला. परंतु दादाभाईंना उत्तर व खुलासा ही दोन्ही न पटल्यामुळे त्यांनी ते कलम टेंडरातून खोडायला लावले व मग त्या टेंडरचा विचार केला. पैशासंबंधात इतकी काळजी घेऊनही त्यांचा व्यापार भरभराटला. कालांतराने एका स्नेह्याखातर दादाभाईंचा सारा व्यापार रसातळास जाण्याची पाळी आली. या खडतर प्रसंगी त्यांची सचोटी त्यांच्या उपयोगी पडली. त्यांच्या व्यवहारात लफंगेपणा मुळीच नसल्याची खात्री त्यांच्या धनकोंना होती. यामुळे ते सर्व जण सहानुभूतीने वागले आणि दादाभाईंचा व्यापार सावरला. त्यांच्या व्यापारात पुढे डोळे दिपवणारा उत्कर्ष न आढळला तरी पैशाची टंचाई त्यांना कधीच भासली नाही. स्वतःचा खर्च योग्य प्रकारे सांभाळून इतरांना प्रसंगाविशेषी साहाय्य करण्याइतकी मिळकत त्यांना व्यापारातून होत असे.

विलायतेस दादाभाईंना ब्रिटिश जनतेमध्ये हिंदी जनतेविषयी विलक्षण अज्ञान दिसून आले व आपल्या देशाची स्थिती त्या जनतेच्या गळी उतरवून तिच्याकरवी आपली गाऱ्हाणी नाहीशी करणे अवश्य आहे असे त्यांनी ठरविले. या कामासाठी त्यांनी 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या नावाची संस्था निर्मून तिच्या द्वारे भारतीयांची दुःखे वेशीवर टांगण्याचा उद्योग चालविला. त्या दिवसांत हिंदुस्थानमध्ये नोकरीनिमित्त पुष्कळ वर्षे राहून व अधिकार गाजवून गेलेले अनेक ब्रिटिश अधिकारी दादाभाईंच्या कार्यात भाग घेत होते, हा ह्या काळाचा विशेष होता. या अधिकाऱ्यांच्या सहकाराचा उपयोग अप्रत्यक्षपणे असा झाला की, भारतीय राजेरजवाडे सढळ हाताने या संस्थेला द्रव्यसाह्य करू लागले. वर्गणीदारांची संख्या हजाराच्या घरात जाऊन पोचली. संस्थेमध्ये भारतीय दुःखस्थितीविषयी वाचले जाणारे निबंध प्रसिद्ध करून ते वजनदार

मंडळींत आणि पार्लमेंटच्या सभासदांत वाटावे, असा दादाभाईंचा प्रघात होता! इंग्रज लोक स्वभावतः न्यायप्रिय आहेत; त्यांना भारतीयांची स्थिती समजली की ते खात्रीने भारतीयांवरील अन्याय दूर करतील, अशी दादाभाईंची दृढ श्रद्धा होती. ही श्रद्धा त्यांच्या हयातीत कधीच सफल झाली नाही. तथापि इंग्लंडच्या समंजस जनतेला जागृत करण्याचे काम दादाभाईंनी पार पाडले हा निष्कर्ष संशयातीत आहे.

। इंग्रजी राज्यकारभाराने भारतीयांचे दारिद्र्य सारखे वाढत असून दुष्काळ, रोगराई या संकटांना भारतीय सहज बळी पडतात याचे कारण दारिद्र्यच, असा त्यांचा सिद्धांत होता.| ज्या काळात दादाभाईंनी या दारिद्र्याची मीमांसा सुरू केली त्या काळी सरकारी जमाखर्चाच्या कागदपत्रांची वाण होती. दादाभाईंना कागदपत्रांच्या अभावी दारिद्र्याचा सिद्धांत स्थापायला अतोनात श्रम करावे लागले.(अखेर दर माणशी दर साल अवघे वीस रुपये उत्पन्न असल्याचे त्यांनी सिद्ध केले. म्हणजे महिना सरासरी १ रुपया ५ आण्यांइतक्या कमाईवर हिंदी मनुष्य जगतो, हा प्रकार निदर्शनास आल्यामुळे इंग्लंड व हिंदुस्थान येथील अधिकारीवर्गात फार खळबळ उडाली. तथापि दादाभाईंचे म्हणणे खोडून टाकण्याला कोणीही पुढे आले नाही. उलट, कालांतराने दादाभाईंचे म्हणणेच खरे ठरले. भारताचे वाढते दारिद्र्य या सिद्धांताला धरूनच त्यांनी ब्रिटिश राज्यकारभाराच्या सुधारणांचा विषय आपल्या व्याख्यानांतून व निबंधांतून कंटाळा येण्याइतक्या पुनरुक्तीने घेतलेला आहे. ब्रिटिश राज्यकारभाराची अर्थशास्त्रदृष्ट्या जी चर्चा दादाभाईंनी सर्वांच्या परिचयात आणून सोडली ती चर्चा पुढच्या काळात वाढत गेली; पण त्या कारभाराची दुष्ट आर्थिक बाजू प्रथम लोकांसमोर विनतोड पद्धतीने ठेवण्याचे श्रेय दादाभाईंचे आहे हे न विसरणे चांगले. आज या कामगिरीची थोरवी पटायला कठीण आहे. पण शंभर वर्षांमागील राजकीय ज्ञानाची शोचनीय अवस्था व ते ज्ञान मिळविण्याच्या उद्योगातील अडचणी लक्षात बाळगणाराला दादाभाईंची थोरवी पटू शकेल. ।

दादाभाई पाचसहा वेळा स्वदेशी आले आणि पुन्हा इंग्लंडात गेले. येथे १८६९ साली आले तेव्हा मुंबईच्या जनतेने एखाद्या विजयी वीराचा सन्मान करावा तसा त्यांचा सन्मान केला. येथेही ते स्वस्थ बसत नव्हते. {त्यांनी मुंबईत विलायतच्या संस्थेची शाखा काढून येथे उपयुक्त कार्य केले.} १८७२ नंतर त्यांच्या गळ्यात बडोदे राज्याच्या दिवाणगिरीची घोरपड नव्याने गादीवर आलेल्या मल्हारराव गायकवाडांच्या कारकिर्दीत पडली. ही दिवाणगिरी सुखाची नव्हती, हे सांगायला नको. परंतु ती गळ्यात पडण्यापूर्वी मल्हाररावाला त्यांनी दोन वेळा सल्लामसलत देऊन बडोदे राज्यावर स्वामिमानाच्या दृष्टीने जे संकट ओढवू पाहत होते त्यातून तारले होते. या संकटाचा व दादाभाईंच्या सल्लामसलतीचा वृत्तांत श्री० आर० पी० मसानी यांनी लिहिलेल्या दादाभाईंच्या विस्तीर्ण चरित्रात जिज्ञासूंनी पाहावा. या सल्लामसलतीचा मोबदला म्हणून दादाभाईंना मल्हाररावांनी देऊ केलेल्या पन्नास हजार रुपयांच्या संबंधात ज्या

निरपेक्ष वृत्तीने दादाभाई वागले त्या निरपेक्ष वृत्तीची हकिगत पैशाच्या व्यवहारात आपल्याबद्दल कसलाही संशय उद्भवू नये म्हणून दादाभाई कसे जपत होते याची कल्पना आणून देणारी आहे.[1] शीलाचे पावित्र्य हे त्यांच्या साऱ्या कर्तबगारीचे खरे बळ होते. तीव्र मतभेद असूनही त्यांच्याबद्दल युरोपियन समाज व अधिकारी जो आदर बाळगीत होते त्याचे मूळ त्यांच्या शीलाचे निरपवाद पावित्र्य, त्याशिवाय दुसरे नव्हते.[1] बडोद्याची दिवाणगिरी त्यांना मानवली नाही, हे मागे सुचवलेच आहे. त्यांनी दिवाणगिरी सोडली व मल्हारराव राज्यास मुकले. मल्हाररावांची ही पदच्युती गाजलेली असल्याने तिचा विस्तार न केल्यास चालेल.

पैशाच्या व्यवहारातील दक्षतेसारखीच त्यांच्या चारित्र्यशुद्धतेची आणखी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. दादाभाईंचे लग्न फार लहानपणी झाले होते. पुढे त्यांची बायको कायमची दुखणेकरी असल्याचे आढळून दादाभाईंच्या मागे त्यांच्या आईने दुसरे लग्न करण्याबद्दल तगादा लावला. दादाभाईंनी तो मुळीच मनावर घेतला नाही. या तगाद्यात त्यांचे मामाही सामील होते. शेवटी हा तगादा निकालात काढण्यासाठी दादाभाईंनी उलट प्रश्न तगादेवाल्यांना विचारला की, बायकोऐवजी मी जर दुखणेकरी असतो तर तुम्ही बायकोला दुसरा नवरा करण्याचा सल्ला दिला असता का? या प्रश्नाने तगादा निकालात निघाला. परंतु इंग्लंडमध्ये असताना त्यांनी ज्यांच्याशी स्नेह जोडला व ज्यांच्याकडे त्यांचे जाणेयेणे वारंवार घडत असे, तेथे एकदोन तरुण स्त्रिया होत्या. त्या मोकळेपणाने दादाभाईंशी वागत, यावरून दादाभाईंविषयी कुशंका बोलल्या जाऊ लागल्या. विलायतेसच नव्हे तर हिंदुस्थानात त्यांच्या नातेवाइकांमध्ये त्या कुशंका पोचल्या. दादाभाईंना त्या कुशंकांचा सुगावा लागताच त्यांनी एकदम आगबोटीने हिंदुस्थान गाठले व आपल्या सर्व नातेवाइकांची कुशंका गाडून टाकली. नंतर दादाभाई बायकोमुले घेऊन विलायतेस गेले. बायको दुखणेकरी होती. तथापि दादाभाईंना अपत्यसुख लाभले होते. त्यांना मुलगा एकच होता. १८९३-मध्ये ऐन तारुण्यात तो वारला. दादाभाईंनी हे दुःख धैर्याने सहन करून आपल्या सार्वजनिक सेवेमध्ये खंड पडू दिला नाही. पुत्रवियोगाचे वर्ष हे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील ऐश्वर्याचे वर्ष होते. ते नुकतेच पार्लमेंटचे सभासद झालेले होते. विधात्याला सुखाची अव्यंग समृद्धी पाहवत नाही, या सुभाषिताचा खरेपणा पुत्रवियोगाने एक प्रकारे दादाभाईंच्या जीवनात सिद्ध केला.

दादाभाई मुंबईस आल्यावर त्यांची म्युनिसिपालिटीत निवड होऊन या संस्थेच्या कारभारात त्यांनी लक्ष घातले. जे काम स्वीकारायचे त्यासंबंधाचा मन लावून अभ्यास करावयाचा व दोष दिसल्यास ते उघडकीस आणायचे हा त्यांचा स्वभावच होता. मुंबई म्युनिसिपालिटीने पाणीपुरवठ्याकरिता विहारचा तलाव बांधण्यासाठी सरकारातून जे कर्ज काढले होते ते वसूल करण्याच्या अटींत अन्याय असल्याचे उघडकीस येताच दादाभाईंनी सरकारशी पत्रव्यवहार आरंभला. हा तंटा संपण्या-

पूर्वीच दादाभाईंना विलायतेस जावे लागले व त्यांनी सभासदत्वाचा राजिनामा दिला. एखाद्याने सभासदत्व सोडल्यास विशेष रीतीने त्याचे आभार मानण्याची पद्धत नसतानाही दादाभाईंच्या कामगिरीचे अद्वितीयत्व ओळखून त्यांचे खास रीतीने आभार मानण्यात आले. श्री० मसानी यांनी दादाभाईंच्या चरित्रात म्हटले आहे की, दादाभाईंनी म्युनिसिपालिटीचे काम पाहत असता वेळोवेळी निरनिराळ्या प्रकरणांस अनुसरून जे लेखन केले ते त्यांच्या आस्थेचे व सूक्ष्म अभ्यासाचे द्योतक आहे, इतकेच नव्हे तर आजदेखील ते मार्गदर्शक ठरावे अशा योग्यतेचे आहे. सारांश, हाती घेतलेल्या कामांत कसलाही चुकारपणा करायचा नाही, या गुणाची साक्ष त्या लेखनात आहे.)

(येथे असताना काँग्रेसच्या स्थापनेत त्यांचा भाग होता. १८८६ मध्ये त्यांना प्रथम काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान कलकत्त्यास मिळाले. पुन्हा १८९३ मध्ये तो मान त्यांच्या वाटणीस आला. १९०६ मध्ये आणखी एकवार त्यांनी अध्यक्षाची जबाबदारी पार पडली. या सुमारास बंगभंगाचा क्षोभ देशात माजला होता. काँग्रेसच्या कारभाराबद्दल पुढाऱ्यांमध्ये दोन तट उत्पन्न झाले होते. या दोन्ही तटांना सांभाळून दादाभाईंनी आपले अध्यक्षत्व पार पाडले. या अधिवेशनात त्यांनी 'स्वराज्य' हाच एक हिंदी राजकीय दुःखांचा परिहार करणारा उपाय आहे, असे ठासून सांगितले. या उपायाची वाच्यता ते १९०४ सालापासून करू लागले होते. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेबद्दलचा त्यांचा विश्वास हादरला होता; यामुळे स्वराज्य मिळविण्याचा उपदेश करण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हते. "ब्रिटिशांच्या राज्यकारभाराविषयी पुनःपुन्हा अनुभवास आलेल्या निराशेमुळे, माझ्याऐवजी दुसरा कोणी असता तर सरळ बंड करा असे त्याने म्हटले असते," अशा अर्थाचा खुलासा त्यांच्या भाषणात आहे. दादाभाई हेच स्वराज्याचा मंत्र शिकविणारे हिंदी पुढाऱ्यांतील पहिले पुरुष आहेत, असे म्हटल्याने अतिशयोक्ती होणार नाही. पार्लमेंटात त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेविषयी ठराव करून घेतला, पण त्याची अंमलबजावणी सरकारने केली नाही, हा दादाभाईंनी भोगलेल्या निराशेपैकी एक प्रसंग आहे. राज्यकारभाराच्या खर्चाची चौकशी करण्याकरिता एक कमिशन त्यांनी नेमून घेतले. त्यात अवास्तव फाजील खर्चाची योग्य भरपाई करायला साम्राज्य सरकार तयार नसल्याने कमिशनचे काम वाया गेले, हा दुसरा निराशेचा प्रसंग होता. हे प्रसंग उदाहरणादाखल आहेत.

१९०६ नंतर दादाभाई विलायतेस गेले व लौकरच स्वदेशी परतले. पुढची १९१७-पर्यंतची वर्षे त्यांनी मुंबईनजीक वरसोवा येथील निवासस्थानी काढली. या काळात मुंबई विद्यापीठाने त्यांना एलएल० डी० ची पदवी देऊन आपल्या गौरवात भर टाकली. याच काळात बेझंटबाईंच्या होमरूल लीगचे अध्यक्षस्थान स्वीकारून त्यांनी आपल्या मवाळ सहकाऱ्यांच्या हृदयाला धक्का दिला. दादाभाईंचे चरित्र हे सार्वजनिक सेवेत पडू इच्छिणारांना निरंतर स्फूर्तिदायक व मार्गदर्शक वाटेल असे आहे.

नऊ

जमशेटजी टाटा

जमशेटजी टाटा हे नवसारी येथे १८३९ मध्ये जन्मास आले. इंग्रजांच्या कारकिर्दीत मुंबईस येऊन आपल्या कर्तबगारीने प्रख्यातीस चढलेले अनेक पारशी मूळ नवसारीचे राहणारे होते, ही नजरेत भरण्यासारखी गोष्ट आहे. जमशेटजी टाटा हे तेथलेच. १४ वर्षेपर्यंत त्यांचे शिक्षण नवसारीस झाल्यावर त्यांच्या वडिलांनी त्यांना मुंबईस बोलावून घेतले व एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्ये दाखल केले. त्या वेळी जे चौघे इंग्रज प्राध्यापक हिंदी विद्यार्थ्यांना शिकवीत होते, ते केवळ पाठ्यपुस्तके शिकविणारे नव्हते, तर विद्यार्थ्यांची दृष्टी विकसित होईल, त्यांच्या ठिकाणी कर्तृत्वाची महत्त्वाकांक्षा उत्पन्न होईल, अशी त्यांच्या शिक्षणाची पद्धत होती. जमशेटजींवर त्यांच्या शिक्षणाचा परिणाम घडला हे त्यांच्या कर्तबगारीने पुढे सिद्ध झाले. १८५९ मध्ये सदर संस्थेतील शिक्षणाची मर्यादा संपली तेव्हा विद्यापीठ अस्तित्वात आले होते. पण बी० ए०, एम० ए० या पदव्यांच्या परीक्षांचे सत्र उत्पन्न झालेले नव्हते. पदव्यांपूर्वी शिक्षण संपविणाऱ्या विद्यार्थ्यांना 'ग्रीन स्कॉलर' असे म्हणत. शिक्षण आटोपताच जमशेटजींच्या वडिलांनी त्यांना आपल्या व्यापारात ओढले. वडील नसरवानजी यांनी व्यापाराचे बस्तान बरे जमविले होते. मुंबईतील कोटाच्या भागात तीन मजली घर विकत घेऊन राहण्याइतका त्यांनी व्यापारात पैसा कमविला होता. त्यांच्या व्यापाराचे एक दुकान चीनमध्ये होते. त्याची पाहणी करण्यासाठी नसरवानजींनी आपल्या मुलाला तेथे पाठविले. जमशेटजींची दोन वर्षे चीनमध्ये गेली. त्यांना वडिलांच्या व्यापारामुळे व्यापारी दृष्टी लाभली होती. जमशेटजींनी ती परदेशात वाढविली आणि स्वतंत्रपणे व्यापार थाटावा अशी योजना त्यांनी लहानशा प्रमाणामध्ये अंमलात आणली. चीनमधून परत येताच जमशेटजींची इंग्लंडला रवानगी झाली. तो काळ म्हणजे हिंदी कापसाचे सुवर्णयुग होते. इंग्लंडात कापसाच्या गिरण्यांनी जी प्रगती चालविली होती, तिचा जमशेटजींनी बारीक अभ्यास केला व ते परत आले. कापसाच्या सुवर्णयुगात मुंबईस जी दिवाळी साजरी करण्यात आली, तिच्यासाठी व्यापाऱ्यांनी 'अत्तराचे दिवे जाळणे' ही म्हण प्रत्यक्ष आचरणामध्ये उतरविली होती. परंतु आदल्या वर्षी दिवाळी व पुढच्या वर्षी दिवाळे असे दारुण स्थित्यंतर व्यापाऱ्यांच्या

दैवी होते. या वैभवाच्या दिवाळीत ओव्हल मैदानावर आतषबाजीचा प्रयोग व्हायचा होता आणि व त्यासाठी मुंबईतल्या साऱ्या सरकारी, बिनसरकारी, काळ्या, गोऱ्या प्रतिष्ठित नागरिकांना पाचारण होते. त्याप्रमाणे एक इंग्रज अधिकारी बायकोसह आला असता त्याला रिकामी जागा सापडेना. इतक्यात एका मोठ्या हिंदी व्यापाऱ्याने आपली खुर्ची सोडली. वस्तुतः त्याने या इंग्रजाच्या सोयीकरिता ही खुर्ची सोडलेली नव्हती. परंतु या इंग्रजाने त्या खुर्चीवर बसण्याचा प्रयत्न आरंभला आणि त्याला जमशेटजींनी विरोध केला. इंग्रजाने जमशेटजींशी बाचाबाच करून ते ऐकत नाहीत असे दिसले तेव्हा त्यांना एक रात्र कैदेत ठेवण्याची शिक्षा फर्मावली. हा प्रकार पाहणाऱ्या दुसऱ्या इंग्रजाने खुर्ची बळकावू पाहणाऱ्या इंग्रजाला "या अरेरावीचा परिणाम ठीक होणार नाही," असे बजावताच तो ताळ्यावर आला व त्याने फर्मावलेली शिक्षा रद्द केली; पण जमशेटजी त्याच्या या उदारपणाला मान देईनात. तो रात्रीचा प्रसंग संपल्यावर उभय पक्षांकडील मध्यस्थांच्या खटपटीने त्या अरेराव इंग्रजाने जेव्हा आपल्या वागणुकीबद्दल माफी मागितली तेव्हा जमशेटजींचे समाधान झाले. पण इंग्रजांच्या शिरजोरीविषयी त्यांच्या मनात जी अढी बसली होती ती जाण्याला काही काळ लागला. इंग्लंडातील जनता काळा-गोरा हा भेद न बाळगता भारतीयांशी बरोबरीच्या नात्याने वागते, या अनुभवाने ही अढी घालविली. तथापि, पुढे इंग्लंड व युरोपच्या एकदोन देशांतील आगबोट-कंपन्यांनी जमशेटजींच्या मालाची ने-आण करताना जो पंक्तिप्रपंच दाखविला, त्यामुळे फिरून जमशेटजींना त्रास झाला.

जमशेटजींनी मुंबईत मोडकळीस आलेली एक तेलाची गिरणी खरेदी करून तिला कापडाच्या गिरणीचे रूप दिले. हे त्यांचे पहिले धाडस यशस्वी झाल्यावर त्यांनी मुंबईऐवजी नागपुरास नवी कापडाची गिरणी उभी केली. या गिरणीसाठी नवी सुधारलेली यंत्रे आणली होती. त्या योगाने सदर गिरणीच्या मालामार्फत भागीदारांच्या पदरात खूप नफा पडण्याला सुरुवात झाली. पुढे कुर्ल्याची 'स्वदेशी' नावाची तीन वेळा उठावाचा प्रयत्न होऊनही बंद पडलेली गिरणी जमशेटजींनी विकत घेतली. या अपेशी गिरणीच्या साहसात भाग घेण्याची उत्सुकता कोणीच दाखवीना; परंतु ही गिरणी जेथे बांधली होती तेथे एक जागा फार उपयुक्त असल्याचे आढळल्याने त्या गिरणीचे साहस सोडण्याची जमशेटजींची तयारी नव्हती. भागीदार मिळेनात म्हणून त्या गिरणीच्या खरेदीचा बोजा आपल्या एकट्याच्या शिरावर घेण्याची सिद्धता जमशेटजींनी केली. जमशेटजींच्या अंगी माणसे पारखण्याचा फार मोठा गुण होता. त्यांनी नागपूरच्या गिरणीची व्यवस्था दादाभाई मेथा नावाच्या ज्या सहकाऱ्याकडे सोपविली होती व ज्याच्या कुशल कार्यक्षमतेने ती गिरणी नावारूपास चढली त्याला जमशेटजींनी स्वदेशी गिरणीच्या कामासाठी बोलावून घेतले. तीन वर्षे या गिरणीने जमशेटजींचे सत्त्व पाहिले व नंतर ही गिरणी जमशेटजींच्या कीर्तीत भर टाकण्याला कारणीभूत झाली.

जमशेटजी कामगारांच्या जीवनाची काळजी वाळगणारे होते. त्यांच्याकरिता त्यांनी गिरणीजवळ हवेशीर घरे बांधली. दवाखाना, शाळा, लहान मुलांकरिता खेळण्या-बागडण्याच्या जागा, अशा सोयी टाटांनी प्रथम केल्या. आपल्या कामाची कामगारांत आस्था व निष्ठा उत्पन्न होण्यासाठी जमशेटजींनी याप्रमाणे व्यवस्था अंमलात आणली. कामगार हा कारखान्यांचा मुख्य आधार व त्याचा संतोष हा कारखान्याच्या उत्कर्षाचा पाया, अशी टाटांची विचारसरणी होती. या विचारसरणीस त्यांनी कामगारांचे कारखान्याबाहेरचे जीवन ज्या उपायांनी सुखी होईल ते उपाय स्वीकारले.

कापडाच्या गिरण्यांतून मिळणारा पैसा मुंबई शहराच्या सुधारणेत खर्चावा यासाठी त्यांनी माहीम ते शीवपर्यंतची दलदल बुजवण्याची कल्पना सरकारपुढे ठेवली. तिला सरकारने तर अडथळा केलाच; परंतु या दलदलीतील मासे मारणाऱ्या कोळ्यांनी 'आपला हक्क जातो' या सबबीवर विरोध केला. या विरोधकांना दुसरीकडे चांगली जागा देण्याचे टाटांनी आश्वासन दिले, तरी त्यांनी दलदलीचे प्रेम शाबूद राखले. १८९६ साली प्लेगची साथ उद्भवली तेव्हा मुंबईजवळच्या खेड्यांतून लोक जाऊ लागले. बहुधा ते आगगाडीच्या रस्त्यालगत आपली घरे उभारीत असत. मुंबईच्या उपनगरांचे बीज म्हणजे साथीच्या लोकांचे स्थलांतर हे आहे. पुढे कित्येकांनी पक्की घरे बांधण्याला सुरुवात केली. जमशेटजींची पुष्कळ जमीन वांद्र्यास होती; तेथे स्वस्त भाड्याची घरे बांधून मुंबईतील गर्दी हटवावी असे जमशेटजींनी मनात आणले. पण जो घर बांधील त्याकडून जबर दंड घेण्याचा सरकारी कायदा आडवा आला. जमशेटजींनी या विचित्र कायद्यानिमित्त सरकारशी तंटा आरंभला; परंतु सरकार यासंबंधात समंजसपणा दाखवीत नाही हे पाहून जमशेटजींनी घरबांधणीची योजना सोडून दिली. एकदा जमशेटजींनी समुद्राच्या दलदलीमध्ये जनावरांना पुष्ट करणाऱ्या वनस्पतीची लागवड करण्याची योजना सरकारला कळविली होती, तीही वाया गेली.

जमशेटजी वारंवार परदेशी प्रवास करून, तेथे ज्या नव्या गोष्टी दिसतील त्या हिंदुस्थानात आणाव्या असा उद्योग चालवीत. एकदा जपानात त्यांनी रेशीम व रेशमाचे किडे यांचा अभ्यास केला व बंगलोरास रेशीम तयार करण्याचे काम हाती घेतले. परंतु पुरेसे उत्तेजन मिळत नाही व आपल्या हाती दुसरी कामे आहेत, इकडे लक्ष देऊन जमशेटजींनी रेशमाचे काम दुसऱ्यांच्या हवाली केले. ईजिप्तमध्ये पिकणाऱ्या कापसाचा अभ्यास करून जमशेटजींनी तो कापूस आपल्या देशात पिकविण्याची कामगिरी हाती घेतली. ज्यांना शक्य असेल त्यांनी आपल्या जमिनीच्या एका एकरात आपण सुचविल्याप्रमाणे कापसाची लागवड करावी, हा प्रयोग एकदम यशस्वी होणार नाही, पण कालावधीने यशस्वी होईल आणि त्यासाठी लागणारा खर्च आपण सोसू, अशा अर्थाचे विनंतिपत्रक छापून देशभर वाटले. परंतु यासंबंधातही लोकांच्या टिकाणी उत्साहाचा अभावच जमशेटजींच्या निदर्शनास आला व ईजिप्तच्या कापसाचा विषय निकालात निघाला. लोकांच्या अन्नाचा प्रश्न जमशेटजींच्या पुढे होता. त्याकरिता

त्यांनी मोठ्या प्रमाणात मासे धरण्याच्या उपयोगाची एक नाव आणली. कोळीवर्गाला तिचा फायदा घ्यावासा वाटला नाही. मासे, मांस हे थंड जागी ठेवून कुजू न देण्याच्या प्रयोगाकडे जमशेटजी एकदा वळले. जमशेटजींना हा प्रयोग साधला नाही. हिंदी आंबे पी० अँड ओ० कंपनीच्या बोटीतून थंड जागेच्या बंदोबस्ताने परदेशी पाठविण्याचा त्यांचा उपक्रम इतर उपक्रमांसारखाच अयशस्वी झाला. आपल्या देशात परदेशांतील फळांची निपज करावी म्हणून त्यांनी जी धडपड चालविली होती, तिलाही फळ आले नाही.

हवा, जमीन, खत, पाणी, सरकार अशा निसर्गाच्या व मानवी अडचणी जमशेटजींच्या मार्गात होत्या. पण लोकांमध्ये नव्या गोष्टींचा उत्साह नाही ही अत्यंत निराशाजनक अडचण होती. पी० अँड ओ० कंपनी डोईजड भाडे आकारते म्हणून जमशेटजींनी इंग्लंडात दोन बोटी घेतल्या. माफक भाड्याने या बोटींतून मालाची वाहतूक करण्यात येईल या स्थितीचे ज्यांनी आकर्षण दाखवले व जमशेटजींना मदत करण्याचे आश्वासन दिले, त्या मंडळींनी पुढे जमशेटजींना तोंडघशी पाडले. पी० अँड ओ० कंपनीशी संगनमत करून माल वाहणाऱ्या आणखी दोन कंपन्यांनी आपले भाडे इतके उतरविले की, त्यांच्या बोटींतून माल पाठविण्याचा मोह उत्पन्न झालाच पाहिजे. जमशेटजींना त्या उतरविलेल्या भाड्याशी टक्कर देणे शक्य नव्हते. यामुळे जमशेटजींचे आश्वासनदाते बारगळले. उतरविलेल्या भाड्याचा वचपा युरोपियन कंपन्या जमशेटजींची स्पर्धा संपताच भाडे वाढवून काढतील या सहज कळणाऱ्या गोष्टीकडेही जमशेटजींना दगा देणारांनी कानाडोळा केला. जमशेटजींच्या मदतीला एक जपानी कंपनी सरसावली होती, पण भाडे उतरविण्याच्या चुरशीत तिचा टिकाव लागणार नव्हता. आणखी यासंबंधातील अनुभव विमाकंपन्यांचा आहे. जमशेटजींच्या बोटी जोवर ब्रिटिशांच्या हाती होत्या तोवर त्यांच्यात कसलेही व्यंग विमाकंपन्यांना दिसले नाही. त्या बोटी जमशेटजींकडे जाताच विमाकंपन्यांना त्या पूर्ण नालायक वाटू लागल्या. अशा अनुभवापायी जमशेटजींनी स्वतंत्र बोटींचा नाद सोडला.

आपल्या मुंबई शहरात कसलीही उणीव राहू नये यासाठी जमशेटजींनी 'ताजमहाल' हे हॉटेल बांधून काढले. त्यांना प्रवासात एक युरोपियन मुशाफीर भेटला व एवढ्या मोठ्या मुंबई शहरात परदेशी पाहुण्यांना सुखाने राहता येईल असे एकही हॉटेल नसावे याचे आश्चर्य त्याने व्यक्त केले. जमशेटजींना त्याचे म्हणणे पटले आणि त्यांनी तावडतोब समुद्रकाठी ताजमहाल हॉटेल बांधण्याचे काम आरंभले. सामान्य, मध्यम स्थितीतल्या माणसापासून तो कोट्याधीशापर्यंत सर्वांना हॉटेलचा फायदा मिळावा अशी सोय त्यामध्ये ठेवली. विजेची साधने एका जर्मन तज्ज्ञाच्या साह्याने उपयोगात आणली. आज हे हॉटेल मुंबई शहराचे भूषण मानले जाते. हॉटेलचे काम हे किरकोळ स्वरूपाचे नव्हते. परंतु किरकोळ बाबतीतही आपण आघाडीवर असावे ही जमशेटजींची आकांक्षा एकदोन उदाहरणांनी स्पष्ट होते. आपल्या घोडागाडीच्या चाकांना रबरी धावा लावणारे जमशेटजी हे जसे पहिले गृहस्थ, तसेच

हिंदुस्थानात मोटार आणणारे जमशेटजी हेच पहिले गृहस्थ होत. केव्हा तरी आपल्या पाहुण्यांना मोटारीने सहल करावयास न्यावे, मोटार बिघडावी, मग ती मजुरांनी रेटीत घरी आणावी, असेही प्रसंग घडत असत. भारतीयांनी शक्य तोवर स्वावलंबी असावे, या ध्येयास अनुसरून जमशेटजींनी घोडागाडी चालविणाराला मोटार चालविण्याचे काम शिकविले होते. जमशेटजींनी प्रथम डीझेल इंजिन आणले तेव्हा ते योग्य रीतीने वसवून चालविण्याची कामगिरी त्या यंत्राचा ज्ञाता जर्मनीतून येण्यापूर्वीच जमशेटजींनी पार पाडली होती. त्यांची रबरी धावांची गाडी रस्त्यावरून जाऊ लागली की विनआवाजाच्या चाकांचा चमत्कार पाहण्याकरिता लोक जमत असत, अशी माहिती त्यांच्या एका चरित्रकाराने दिलेली आहे.

बंगलोर येथील सायन्स इन्स्टिटयूट, जमशेटपूर येथील लोखंडाचा प्रचंड कारखाना, मुंबईतील फंडामेंटल रीसर्च इन्स्टिटयूट व समाजशास्त्राचे विद्यालय, मुंबईच्या कारखान्यांना वीज पुरविण्यासाठी महाराष्ट्रातील नद्यांना बांधलेली धरणे, असल्या कामांनी जमशेटजींचे नाव भारतातील औद्योगिक प्रगतीच्या इतिहासात अजरामर करून सोडले आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. त्यांची ही कामे ते वारल्यानंतर त्यांच्या दोघा पुत्रांनी पित्याच्या ईर्षेने, जेवढ्या अडचणी आल्या तेवढ्या सर्व निस्तरून, शेवटास नेली. बंगलोरच्या संस्थेला जमशेटजींनी तीस लाखांची देणगी दिली व मुंबईजवळ ही संस्था काढण्याचा प्रयत्न केला. पण अखेरीस बंगलोर हेच ठिकाण ठरवावे लागले. लोखंडाच्या कारखान्याची महत्त्वाकांक्षा १८८२ सालापासून जमशेटजींनी आपल्या हृदयाशी बट्ट धरून ठेवली होती. प्रथम जुन्या मध्यप्रदेशाच्या चांदा, बरोरा, दुर्ग या जिल्ह्यांतील लोखंडाची पाहणी केली. लोखंडाच्या खाणीनजीक कोळसा व तोही साध्या लोखंडाला पोलादाचे रूप देण्याइतक्या दाहक शक्तीचा हवा, शिवाय पाण्याची विपुलता हवी, याप्रमाणे जेथे लोखंड, कोळसा व पाणी यांचा संगम असेल ते ठिकाण लोखंडाच्या कारखान्याला उत्तम, यामुळे शेवटी जमशेटपूरची जागा निश्चित करण्यात आली. मग भांडवलाचा प्रश्न सोडविण्याकरिता जमशेटर्जांचा थोरला पुत्र दोराब हा विलायतेस गेला, पण त्याची डाळ शिजेना. हा काळ बंगभंगाच्या क्षुब्धतेचा होता. स्वदेशीचे वादळ भारतामध्ये वाहत होते व त्याची ब्रिटिश भांडवलदारांना भीती वाटत होती. पण या स्वदेशीच्या अभिमानानेच भांडवलाची अडचण हां हां म्हणता नाहीशी केली. लोखंडाचा कारखाना, नद्यांची धरणे, बंगलोरची संस्था, वगैरे कामे जमशेटजी टाटांच्या मृत्यूनंतर उदयास आली; पण त्या सर्वांची पूर्वतयारी जमशेटजींच्या हयातीत झालेली होती. मरणकाळी त्यांच्या अंतरंगात हेच समाधान होते.

लोखंडी कारखान्याचे शहर आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, कारखान्यात राबणाऱ्या कामगारांच्या जीविताचे संरक्षण, इत्यादी सर्व प्रकारांनी परिपूर्ण असावे, ही जमशेटजींची इच्छा त्यांच्या दोराब व रतन या पुत्रांनी कृतीत उतरवून जमशेटपूरची मांडणी केली. दवाखाने, शाळा, बागा, वगैरे साधनांप्रमाणे पोलीसदल अवश्य

असते. जमशेटपूरच्या पोलीसदलाचा खर्च आरंभी काही वर्षे टाटांनी सोसला. मग सरकारने तो स्वीकारला. जमशेटपूर हे जवळजवळ लाख लोकवस्तीचे शहर आहे. अर्थात ही वस्ती कामगारांची आहे. सगळ्या कारखान्यांतील कामगारांची संख्या तीन लाखांइतकी भरते.

जमशेटजींनी परदेशात जाऊन बुद्धिमान विद्यार्थ्यांना शिकता यावे यासाठी छात्रवृत्त्या उत्पन्न केल्या. त्या प्रामुख्याने आधिभौतिक शास्त्रांच्या शिक्षणासाठी आहेत. छात्रवृत्तींपैकी काही वेळ पारशी समाजाकरिता राखून ठेवल्या होत्या; परंतु खऱ्या योग्यतेचे पारशी विद्यार्थी नेहमी हमखास मिळतीलच असा भरवसा नसे. 'पारश्यांसाठी राखीव' या कारणाने पारश्यांच्या अभावीही इतर समाजांतील उमेदवारांची कुचंबणा होते, या अनुभवाकडे लक्ष जाऊन जमशेटजींनी पारश्यांचा राखीव हक्क रद्द केला. पारशी समाजाची जमशेटजींना काळजी नाही, या आक्षेपाला जमशेटजींनी जे उत्तर दिले ते माननीय आहे. "अनाथ-अपंगांवर पैसे खर्चण्याच्या प्रकाराला दानधर्म म्हणण्याचा प्रघात पडला आहे. पण ज्यांची बुद्धी व शरीर धड आहे, त्यांच्या गुणांचे सार्थक करण्याच्या खर्चालाही दानधर्मच समजले पाहिजे. अनाथ-अपंगांचा देशाला उपयोग नसतो. पण सुबुद्ध-सशक्तांच्या गुणांचा विकास हा राष्ट्राच्या उन्नतीला उपकारक असतो. यासाठी असा खर्च जास्त महत्त्वाचा गणण्याची समजूत लोकांत वाढणे अवश्य आहे." जमशेटजींच्या छात्रवृत्ती घेऊन किती डॉक्टर, इंजिनियर, सिव्हिल सर्वंट झाले यांची संख्या जमशेटजींच्या चरित्रात आहे. निरनिराळे कारखाने देशात उभारून परदेशांतून विद्यासंपन्न होऊन येणाऱ्यांना नोकऱ्या मिळाव्या अशी जमशेटजींची दृष्टी होती. सांप्रत असे अनेक विद्यासंपन्न लोक आपल्या देशाची सेवा करण्याला भरपूर उत्तेजन नाही म्हणून अमेरिकेमध्ये किंवा अन्य परदेशांत नोकऱ्या करीत आहेत. ही देशाची हानी आहे व या हानीची जबाबदारी शासनसंस्थेवर आहे.

जमशेटजींना जपानबद्दल विशेष प्रेम वाटत असे. टीचभर जपान देशाने प्रगती करून अवघ्या पंचवीस वर्षांत (१८७५–१९००) जर्मनी, इंग्लंड, अमेरिका यांची बरोबरी गाठली आणि नंतरच्या चाळीस वर्षांत इंग्लंड, अमेरिका या देशांना खडे चारण्याइतकी स्वावलंबी बलाढ्यता संपादन केली. जमशेटजी वारले तेव्हा नुकतेच जपानचे रशियाशी युद्ध सुरू झाले होते. त्यात जपानची सरशी होत असल्याचे पाहून जमशेटजींना आनंद वाटत होता. ते जर्मनीमध्ये १९०४ च्या मेमध्ये वारले आणि त्यांची अंत्यक्रिया इंग्लंडमध्ये करण्यात आली. त्यांच्या निधनापूर्वी थोडेच दिवस त्यांची पत्नी वारल्याची तार त्यांच्या हाती पडून एकदोन दिवस त्यांना बुद्धिभ्रंश झाला. त्यातून ते बाहेर पडले. "माझा गतकाळ समाधानाचा असून (मरणोत्तर) भविष्यकाळ आशापूर्ण वाटतो," असे उद्‌गार निधनकाळी त्यांच्या तोंडून बाहेर पडत होते.

दहा

फेरोजशहा मेथा

फेरोजशहा मेथांचा जन्म १८४५ मधला. मुंबईस झाला. त्यांचे घराणे व्यापार करणारे व सुखवस्तू असल्याने त्यांचे बालपण आणि विद्यार्जन चांगल्या स्थितीत पार पडले. बुद्धिमत्ता उत्तम असल्याने त्यांच्या ज्ञानग्राही अभ्यासपटुत्वाची छाप विद्याधिकारी सर अलेक्झांडर ग्रँट यांच्यावर अशी पडली की, त्यांनी फेरोजशहांना विलायतेस पाठविण्याचा आग्रह धरला. दादाभाईंच्या काळात म्हणजे यापूर्वीची सुमारे २० वर्षे विलायतेस मुलांना पाठविण्याच्या कल्पनेने त्यांच्या पालकांना जी भीती वाटत असे, ती फेरोजशहांच्या तारुण्यकाळी उरली नव्हती. म्हणून विशेष हरकतीवाचून त्यांच्या पित्याने त्यांस अनुज्ञा दिली. १८६४ मध्ये बी० ए०ची परीक्षा फेरोजशहा पास झाले. याच सुमारास जमशेटजी जीजीभाईंच्या दुसऱ्या क्रमांकाच्या लेकाने—रुस्तुमजीने —परदेशी विद्याभ्यासाला हिंदी विद्यार्थ्यांना जाता जावे या धोरणाने दीड लाख रुपयांचा एक निधी निर्माण केला. पारशी, हिंदू, पोर्तुगीज अशा तिघा मुंबापुरस्थांना आणि मद्रास-कलकत्त्याच्या हिंदु-मुसलमान अशा दोघांना, एकूण पाच विद्यार्थ्यांना या निधीचा लाभ मिळावा, अशी ही योजना होती. निधीच्या विश्वस्तांनी मुंबईतून जो पारशी निवडला तो फेरोजशहा. दुसऱ्यांच्या साह्याने विद्याभ्यास करणे फेरोजशहांच्या वडिलांना पसंत नव्हते. त्यांचा हा आक्षेप ग्रँटसाहेबांनी दूर करून त्यांचे मन वळविले. फेरोजशहासुद्धा रुस्तुमजींची छात्रवृत्ती घेऊ नये अशा मताचे होते. पण त्यांनाही ग्रँटसाहेबांचा या संबंधातील आग्रह मोडता आला नाही. बी० ए०नंतर अवघ्या सहा महिन्यांत त्यांनी परीक्षेला बसावे अशी त्यांच्याकरिता मुंबई विद्यापीठाने खास सवलत दिली होती. सहा महिन्यांत एम० ए० चा अभ्यास हे काम कठीण होते; परंतु फेरोजशहांनी ते रेटले. फेरोजशहा हे विद्यापीठाची एम० ए० ही पदवी घेणारे पहिले विद्यार्थी. रानडे-भांडारकर हे पहिले बी० ए० खरे, पण त्यांनी एम० ए० ची परीक्षा पुढे काही वर्षांनी दिली. एम० ए० होताच फेरोजशहांनी १८६४ च्या डिसेंबरात विलायतचा रस्ता धरला. जातेवेळी त्यांना सहाध्यायांनी एक मानपत्र दिले. आयुष्याच्या अखेरपर्यंत हे मानपत्र फेरोजशहांनी अभिमानाने जपून ठेवले होते. प्रवासात ग्रँटसाहेब त्यांच्या बरोबर होते.

इंग्लंडात लंडन शहरी त्यांनी सरासरी चार वर्षे घालविली. १८६८ मध्ये ते बॅरिस्टर झाले. लंडनमध्ये त्या वेळी स्थायी झालेले कामा, दादाभाईंसारखे काही पारशी होते. दादाभाईंच्या सहवासात फेरोजशहांना देशभक्तीचे धडे शिकता आले. त्यांच्या प्रेरणेने फेरोजशहांनी मुंबई इलाख्यातील सरकारी शिक्षणपद्धीवर एक निबंध वाचला. त्यातील दूरदृष्टीची विचारसरणी आजसुद्धा बऱ्याच बाबतींत साह्यकारी ठरण्यासारखी आहे. इंग्लंडात फेरोजशहांनी गाठीभेटीच्या योगाने थोरामोठ्यांच्या ओळखी करून घेतल्या. फेरोजशहांचा लंडनमधील वास्तव्याचा काळ अनेक प्रकारे प्रगतिपर विचारांच्या खळबळीचा होता. फेरोजशहांवर त्या खळबळीचा परिणाम घडावा, अशी त्यांची मनोरचना होती. हिंदुस्थानातील राज्यकारभार सदोष असून, तो राज्यकारभार सुधारण्यासाठी हिंदी विचारवंतांनीच नेटाने प्रयत्न करणे अवश्य आहे, हे तत्त्व फेरोजशहांनी आपल्या चित्तात ठसविले. सुदैवाने स्वदेशी परत येताक्षणी त्यांचा विद्यापीठ, म्युनिसिपालिटी या संस्थांशी संबंध येऊन वरील तत्त्व आचरणात आणण्याची फिरोजशहांना संधी मिळाली. येताक्षणीच ग्रँटसाहेबांनी फेरोजशहांना फेलो म्हणून विद्यापीठाच्या कामी जुंपले. लंडन येथील ईस्ट इंडिया असोसिएशनच्या मुंबईतील शाखेने फेरोजशहांच्या गळ्यात चिटणिशीची माळ घालून त्यांना सार्वजनिक कार्याच्या विशाल क्षेत्राचा मार्ग मोकळा करून दिला.

फेरोजशहांना आपली दूरदृष्टीची विचारसरणी, वक्तृत्वाची कुशलता आणि धैर्य इत्यादी गुण दाखविण्याची संधी म्युनिसिपल कमिशनर आर्थर क्रॉफर्ड यांना विरोध करणाऱ्या वर्गाने दिली. या कमिशनरचा कारभार आरोग्यदृष्ट्या नागरिकांच्या हिताचा असला तरी तो उधळपट्टीचा म्हणून गोऱ्या, काळ्या अशा सर्वच नागरिकांना आवडेनासा झाला होता. या कारभाराच्या चर्चेसाठी बोलावलेल्या सभेत "कमिशनरांच्या कारभाराला पायबंद घालू न शकणाऱ्या 'जस्टिसेस ऑफ दि पीस'चा (त्या काळी सरकारनियुक्त जे० पी० यांनी म्युनिसिपालिटीची व्यवस्था पाहावी असा कायदा होता.) मुख्य दोष आहे. जोवर लोकनियुक्त सभासदांच्या हाती हा कारभार दिला जाणार नाही तोवर या कारभाराची सुधारणा होणे शक्य नाही. क्रॉफर्डने उधळपट्टी केली यावर कटाक्ष ठेवण्यापेक्षा त्यांनी केलेल्या शहराच्या सुधारणेची आठवण बाळगणे अवश्य आहे," अशा अर्थाची फेरोजशहांनी क्रॉफर्डची तरफदारी केल्यामुळे सभेत गोंधळ उडाला. फेरोजशहांचे व्याख्यान बंद पाडण्याचा प्रयत्न सभेच्या लोकांनी चालविला आणि अशा अंदाधुंदीत ती सभा संपली. फेरोजशहांनी आपले व्याख्यान लिहून छापून काढले होते. सभेच्या इतिवृत्तात या व्याख्यानाचा निर्देश नसावा. आणखी एक सभा भरवून लोकांनी त्या घोषणेचा ठराव पास केला. फेरोजशहांबद्दल लोकांना किती राग आला होता याचे हे एक गमक आहे. परंतु आश्चर्य असे की, १८७२ मध्ये म्युनिसिपालिटीसंबंधाचा जो एक नवा कायदा सरकारने केला त्यात 'म्युनिसिपालिटीचे बरेच्च सभासद लोकांनी निवडावे' हा

फेरोजशहांचा मुद्दा सरकारने मान्य केला. १८७४ साली १८५१ प्रमाणे आणखी एकदा पारश्यांविरुद्ध मुसलमानांनी दंगा केला. या दंग्याच्या वेळी फेरोजशहांनी दंग्याच्या स्थितीची आपला जीव धोक्यात टाकून पाहणी केली. ती करताना पोलिसांचा दुबळेपणा व सरकारने चालविलेली दंग्याबद्दलची उपेक्षा यांचाही त्यांना अनुभव आला. फेरोजशहांनी आपल्या अनुभवाची वाच्यता वृत्तपत्रात लेख लिहून केली. गव्हर्नराकडे गेलेल्या पारशी शिष्टमंडळाशी बोलताना गव्हर्नराने पारश्यांच्या माथी दंग्याचा दोष लावून "आत्मसंरक्षण स्वावलंबनाने करायला शिका, सरकारच्या मदतीची अपेक्षा धरू नका" असे बजावून त्या शिष्टमंडळाची बोळवण केली. तथापि दंगा वाढतो असे दिसल्यावर लष्कराची मदत बोलावणे गव्हर्नरला भाग पडले. मग दंगा शमला, पण मुंबई सरकारची बेअब्रू व्हायची ती झालीच. पुढे पारशी समाजाने मुंबई सरकारच्या वागणुकीबद्दल भारतमंत्र्यांकडे एक अर्ज पाठविला. पण त्याला वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या.

१८७७ साली युरोपियन समाजाशी फेरोजशहांना झगडावे लागले. त्या वर्षी वायव्य सरहद्दीचे वातावरण तापले होते. लढाईच्या रूपाने स्फोट होण्याची लक्षणे दिसत होती. लढाई पेटल्यास हिंदुस्थानात मनुष्यबळ वाढवावे, या उद्देशाने युरोपियन लोकांनी सभा भरविली. त्या सभेत हिंदी नागरिकांची संख्या युरोपियनांच्या दुप्पटीने असूनही इंग्रज वक्त्यांनी 'गोऱ्यांचे स्वयंसैनिक दल उभारावे' अशा अर्थाचा ठराव मांडला. त्यावर "काळ्यागोऱ्यांच्या मिश्र सभेत फक्त गोऱ्या स्वयंसैनिकांपुरता ठराव केला जावा हे योग्य नव्हे. या ठरावाला संमती देणे म्हणजे हिंदी नागरिकांनी स्वतःच्या अप्रतिष्ठेला मान्यता दिल्यासारखे होईल. काळ्या स्वयंसैनिकांच्या दलाचा अंतर्भाव मुख्य ठरावात व्हायला पाहिजे," असा फेरोजशहांच्या भाषणाचा इत्यर्थ होता. "काळ्या नागरिकांना येथे उपस्थित राहण्याची संधी आम्ही केवळ सौजन्याने दिलेली आहे" असा खुलासा एका इंग्रजाने केला. हा खुलासा आगीत तेल ओतणारा असला तरी फेरोजशहा, दुजोरा देणारे तेलंग व हिंदी श्रोतृवर्गाने आपली शांतता सोडली नाही. अध्यक्षाने —मुंबईचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल—सांगितले की, हिंदी नागरिकाला स्वयंसैनिक होण्याची सवड सरकारी व्यवहारात नाही. तथापि त्यांनी निराळी सभा बोलावून तसा ठराव पास करावा. "हिंदी नागरिकांनी या प्रसंगी खरे सौजन्य दाखविले" असा टाइम्सने अभिप्राय त्या प्रसंगास अनुलक्षून दिला. साधा युरोपियन असो किंवा गव्हर्नरासारख्या इलाख्याचा सर्वश्रेष्ठ युरोपियन असो, न्याय तुडविला जातो असे दृष्टीस पडताच फेरोजशहा कोणाचीही कशी मुर्वत ठेवीत नसत, याची ओळख पटविणारा हा एक प्रसंग नमूद केला आहे. पुढचा प्रसंग सर रिचर्ड टेंपल याच्या स्मारकाच्या चळवळीने उत्पन्न केला. शेरीफमार्फत एक सभा स्मारकाचा विचार करण्यासाठी भरविण्यात आली. या सभेत भाग घेणे धोक्याचे, असे ठरवून विरोधी हिंदी नागरिकांनी सभेला

जाण्याचे टाळले. पण फेरोजशहा सभेस गेले. तेथे त्यांना सांगण्यात आले की ही सभा टेंपलसाहेबांच्या मित्रांची व चाहत्यांची आहे. तेव्हा ते सभेतून बाहेर पडले. त्यांनी टेंपलसाहेबांच्या कारकिर्दीची हजेरी घेणारा एक लेख वृत्तपत्राकडे पाठविला. हा प्रसंगसुद्धा फेरोजशहांच्या बेडरपणाची साक्ष देणारा आहे. हा प्रसंग वाचीत असता १९१८ मध्ये जीना, जमनादास द्वारकादास व हार्निमन यांनी गव्हर्नर वेलिंग्डन याच्या सन्मानाला केलेल्या विरोधाचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. एकदा एका न्यायाधीशाचा वकील मंडळाच्या नावाने युरोपियन बॅरिस्टरांनी सन्मान करण्याचे ठरविले व सन्मानाकरिता जागा अशी ठरविली की जेथे हिंदी माणसाचा रिघाव होऊ शकत नाही. फेरोजशहांनी या प्रसंगी आपल्या विरोधापुढे युरोपियनांना नमविले. म्युनिसिपालिटीच्या सभांतून असे पुष्कळ प्रसंग घडले आणि त्याची नोंद जिज्ञासूंना श्री० मोदी यांनी लिहिलेल्या फेरोजशहांच्या चरित्रात पाहता येईल.

व्हाइसरॉय कर्झन याच्या मनातून मुंबईची घड्याळावरून दाखविली जाणारी वेळ बदलून येथे स्टँडर्ड टाइम सुरू करावयाचा होता. या दोन वेळांत ३९ मिनिटांचा फरक होता. मुंबई टाइमची परंपरा इंग्रजांची, परंतु ती रद्द करण्याचा डाव जेव्हा कर्झनसाहेबाने टाकला तेव्हा फेरोजशहांनी परंपरागत वेळेचा अभिमान धरून कर्झनसाहेबांचा डाव हाणून पाडला. अशा स्वाभिमानाच्या झगड्यात १९०६ मध्ये इंग्लंडचे युवराज (पुढे पाचवे जॉर्ज बादशहा) जेव्हा हिंदुस्थानात आले, तेव्हा त्यांचे पहिले स्वागत मुंबई कॉर्पोरेशनच्या अध्यक्षाने करावे म्हणून पारशी सभासदाची अध्यक्ष होण्याची पाळी नसताना कॉर्पोरेशनच्या अध्यक्षस्थानी सभासदांनी फेरोजशहांना बसविले. (पूर्वी हिंदू, पारशी, मुसलमान व खिस्ती अशा चारी समाजांच्या सभासदांना क्रमाने अध्यक्ष निवडण्याची पद्धत होती.) फेरोजशहांवर नाराज असलेल्या बड्या युरोपियन अधिकाऱ्यांनी स्वागताच्या कार्यक्रमातून कॉर्पोरेशनला वगळले. शहरातर्फे स्वागत करण्याचा मान कॉर्पोरेशनचा आहे आणि त्याच्या मागे इतिहास आहे, याच वेळी जर या मानाला झुगारून द्यायचे असेल तर त्याचे दुष्परिणाम होतील (म्हणजे भव्य कमानी, लतापताकांचा शृंगार हे प्रकार नागरिक टाळतील; त्यांच्यात युवराजांच्या आगमनाचा आनंद-उत्साह दिसणार नाही), अशा अर्थाचे एक पत्र फेरोजशहांच्या पुढाकाराने सरकारकडे पाठविण्यात आले. कमानी उभारण्याची, लतापताकांनी घरे व दुकाने सजविण्याची कामे थांबली. किंबहुना कित्येकांनी कमानी व लतापताका काढण्यालाही सुरुवात केल्याचे दृश्य सरकारी अधिकाऱ्यांना दिसू लागले, तेव्हा सरकारने कॉर्पोरेशनतर्फे युवराजांचे ते प्रथम बंदरावर उतरताच स्वागत होईल, ही गोष्ट नाइलाज वाटून कबूल केली आणि तो स्वागतसमारंभ योग्य प्रकारे पार पडला. मात्र सरकारी अधिकाऱ्यांची फेरोजशहांच्या संबंधाची नाराजी जास्त वाढून १९०७ साली तिघा गोऱ्या अधिकाऱ्यांनी फेरोजशहांना कॉर्पोरेशनमधून उडवून लावण्याचा जो कट केला तो 'कॉकस' या इंग्रजी शब्दाने प्रसिद्ध आहे. अकौंटंट जनरल, पोलीस

कमिशनर वगैरेंसारखी फार मोठी प्रस्थे या कटात होती. फेरोजशहा जे० पीं० च्या तर्फे आपली निवडणूक करून घेत असता जे० पी० हे सरकारच्या मेहरबानीचे मिंधे, यासाठी त्यांवर फेरोजशहांना मत न देण्याबद्दल अधिकाऱ्यांनी दडपण आणले. ते दडपण कटाकटीने यशस्वी झाले. फेरोजशहांचा क्रमांक सभासद निवडायचे त्या संख्येच्या नेमका पुढचा होता. त्यांचा पराभव झाला खरा, पण नशीब शिकंदर. यामुळे निवडलेला एक उमेदवार निवडणुकीचा नियम मोडल्याच्या अपराधामुळे साहजिकच बाद झाला व फेरोजशहा संख्येच्या मर्यादेत सरकले. गोऱ्यांचा डाव फिसकटला. यदृच्छेने हा डाव फिसकटला नसता तर फेरोजशहांना जागा करून देण्यासाठी गिरगावच्या एका विजयी उमेदवाराने आपल्या सभासदत्वाचा राजीनामा कॉर्पोरेशनकडे सादर केला होता. यानंतर स्मॉल कॉज कोर्टात तिघा हिंदी सभासदांनी फिर्याद गुदरली आणि कटवाल्या गोऱ्या अधिकाऱ्यांची बरीच काळीबेरी बाहेर काढली. या साऱ्या गलिच्छ प्रकरणात गव्हर्नरापासून सारे अधिकारी कटाच्या मागे असावे, या शंकेला एक आधार गव्हर्नराने पुरविला. कटवाल्यांविरुद्ध एक शिष्टमंडळ गव्हर्नराच्या भेटीस गेले असता 'अधिकाऱ्यांनी निवडणुकीत ढवळाढवळ करू नये' हा दंडक फक्त कायदेमंडळाच्या निवडणुकींसाठी आहे, तो कॉर्पोरेशनच्या निवडणुकीला लागू नाही, असा गव्हर्नराकडून जबाब मिळाला. या प्रकरणात मुंबई सरकारची नाचक्की झाली आणि पुन्हा फेरोजशहांना विरोध करण्याचा निंद्य मार्ग मुंबई सरकारने स्वीकारला नाही.

१८९३ नंतर प्रांतीय व केंद्रीय कायदेमंडळांत फेरोजशहा जेथे हिंदी जनतेचे सरकारी कारवाईमध्ये अहित दिसेल तेथे सरकारशी कडाडून भांडत असत. एकदा मुंबई कायदेमंडळात एका उर्मट गोऱ्या सिव्हिल सर्व्हंटने कायदेमंडळातील एका हिंदी सभासदाच्या निमित्ताने "हिंदी सभासद खऱ्याखोट्याची चाड न बाळगता सरकारवर मनसोक्त आरोप करतात," असे उद्‌गार काढले. त्या हिंदी सभासदांच्या विधानाचा खरेपणा सिद्ध करणारा एक सरकारी अहवाल ह्या उर्मटाच्या अंगावर फेरोजशहांनी फेकून त्याचे दात त्याच्या घशात रेटले. त्यासरशी तो हमरीतुमरीवर आला व गव्हर्नरांच्या मध्यस्थीने हातघाईचा प्रसंग टळला. केंद्रीय कायदेमंडळातही एकदा असाच प्रसंग उद्‌भवला होता. १९०१ मध्ये मुंबई सरकारने शेतसाऱ्या-संबंधाचे बिल कायदेमंडळापुढे मांडले. त्या वेळी एके दिवशी "आमचे जर तुम्हांला काहीच ऐकायचे नाही, तर आम्ही भारतीयांनी कायदेमंडळात बसण्याचा उपयोग काय?" अशी भावना सरकारी सभासदांच्या कानी घालून फेरोजशहा कायदे-मंडळातून बाहेर पडले. म० गांधींच्या चळवळीच्या काळात कायदेमंडळातील राष्ट्रीय वृत्तीचे सभासद बैठक सोडून बाहेर पडत, अशी पुष्कळ उदाहरणे आहेत. अजूनही अशी 'जा-ये' चालते. परंतु दिशा दाखविण्याचे श्रेय फेरोजशहांचे आहे, हे न विसरणे चांगले.

कॉर्पोरेशन व कायदेमंडळ या संस्थांतील फेरोजशहांच्या कामाचे स्वरूप सांगितले. काँग्रेस व विद्यापीठ यांतील कामाचे त्रोटक वृत्त सांगणे अवश्य आहे. काँग्रेसच्या आरंभापासून त्यांचा काँग्रेसशी संबंध आला होता. पहिली काही वर्षे गेल्यावर काँग्रेसच्या राजकारणाचे ते सूत्रचालक बनले. त्यांचे काँग्रेसमध्ये जे वर्चस्व होते, त्याचा एक मासला नमूद केल्याने काम भागेल. १९१५ मध्ये काँग्रेसची बैठक मुंबईस व्हायची होती. अध्यक्ष म्हणून सर सत्येंद्रप्रसन्न सिंह (पुढे ज्यांना लॉर्ड पदवी देण्यात आली) यांची निवड केली. सत्येंद्रप्रसन्न त्या काळी राजकारणाच्या क्षेत्रात प्रसिद्ध नव्हते तरी त्यांची निवड करून तसे कळविले. तेव्हा त्यांनी आढेवेढे घेण्याला सुरुवात केली. फेरोजशहांनी त्यांना "अध्यक्षस्थानाला नकार देण्याचे धाडस करू नये" अशा अर्थाची तार पाठविली आणि सिंहमहाशयांनी फेरोजशहांच्या विनंतीला मान दिला. १९०७ मध्ये सुरतेस काँग्रेसचे अधिवेशन मोडले, परंतु फेरोजशहांच्या तळावर फार मोठ्या संख्येने या संस्थेचे सभासद राहिले. ज्या लजपतरायांचा अध्यक्ष-पदासाठी 'राष्ट्रीयां'नी पाठपुरावा चालविला होता, तेही फेरोजशहांच्या बाजूस गेले. १९१५ मध्ये मुंबईच्या अधिवेशनात काँग्रेसची दुफळी सांधून या भिजतघोंगड्याचा निकाल कायमचा लावावा अशी फेरोजशहांची इच्छा होती; परंतु काँग्रेस भरण्याच्या पूर्वी नोव्हेंबरात ते कालावश झाले. १९१५ च्या फेब्रुवारीत ना० गोखले वारले, यामुळे फेरोजशहांच्या मनाला मोठा धक्का बसला. अगोदरच खालावलेली त्यांची प्रकृती अधिक खचत गेली आणि त्यांचे निधन घडले.

मुंबई विद्यापीठाचे स्वातंत्र्य सरकारने हिरावून घेण्याचा जेव्हा जेव्हा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा फेरोजशहांनी अटीतटीने सरकारचा विरोध केला. सर रिचर्ड टेंपल यांच्या कारकिर्दीत विद्यापीठावर गदा आली होती. टेंपलची सारीच कारकीर्द प्रतिगामी स्वरूपाची होती व यासाठीच फेरोजशहांना त्यांचा विलायतेस जाण्याच्या वेळचा सन्मान खपला नाही. कर्झनसाहेबाने विद्यापीठांचा नवा कायदा अंमलात आणला, त्यालाही फेरोजशहा व गोखले यांनी सडकून विरोध केला. विद्यापीठाच्या रोजच्या कारभारातही फेरोजशहा उपस्थित असतील तर त्यांचा किती धाक गोऱ्या सभासदांना असे याची उदाहरणे सांगणारे लोक कालपरवापर्यंत हयात होते. वक्त्यांची दृष्टी वक्तव्य करताना फेरोजशहांकडे वेधलेली असायची आणि त्यांच्या मानेचे विरोधदर्शक हेलकावे सुरू झाले व "नॉन्सेन्स, नो, नो," असे शब्द त्यांच्या तोंडातून पुटपुटल्याप्रमाणे निघू लागले की त्या वक्त्याचे वक्तृत्व कोसळायला लागायचे आणि दहापाच मिनिटांतच तो बसायचा, अशा प्रकारची काही उदाहरणे आहेत. त्यांचा आवाज मोठा होता व त्यांची पुटपूट ही गुरगुरण्यासारखी होती. त्यांचा फोटो पाहणारांना त्यांनी आपली चर्या सिंहाशी जुळणारी ठेवल्याचे सहज लक्षात येईल. 'मुंबईचा सिंह' किंवा 'मुंबईचा अनभिषिक्त राजा' या त्यांच्या लोकप्रियतेने त्यांना बहाल केलेल्या पदव्या होत्या. त्यांच्या तोलाचा त्यांच्या काळात अथवा मागून दुसरा कोणीही पुढारी

चोळले असल्यास त्याचे नवल वाटायला नको. आपला बाप, बायको, मुले यांसह डेव्हिड बिनधोक बगदादबाहेर पडला हा लाचलुचपतीसारख्या तर्काचा इत्यर्थ आहे.

डेव्हिडचा जन्म १७९३ मधला व तो मुंबईस आला १८३२ साली. त्याने पहिल्या फेरीत मुंबईची पाहणी केली. दुसऱ्या फेरीच्या वेळी त्याने मुंबईत पाय रोवला. मुंबईस येण्यापूर्वी त्याचा बाप वारला. त्याची पहिली बायको मेल्यामुळे त्याने दुसरी बायको केली होती. पहिल्या बायकोचे दोन मुलगे अबदुल्ला व एलिआझ हे वयात आल्यावर मुंबईस बापाने त्यांना व्यापारात ओढले. मुंबईस वस्ती करून डेव्हिड याने मुंबईच्या मानकऱ्यांत बसण्याइतकी योग्यता संपादल्यामुळे येथून पुढे त्याचा निर्देश बहुमानाने करायचा आहे. मुंबईस आल्यानंतर कोटातल्या एका वोळात डेव्हिड यांनी बिऱ्हाड थाटले व सातआठ वर्षांच्या अल्पावधीत त्यांना धनाढ्य व्यापारी या नात्याने लोक ओळखू लागले. बगदाद सोडून 'बुशायर' या इराणी बंदराच्या शहरात हिंदुस्थानातून माल मागवायचा असा डेव्हिड यांचा क्रम होता. मुंबईत आल्यावर इराण, अरबस्तान वगैरे ठिकाणचा माल आणून विकण्याची त्यांनी प्रथा पाडली. नंतर चीन या मुंबईच्या व्यापाऱ्याचे उखळ पांढरे करून सोडणाऱ्या देशाकडे आपल्या व्यापाराचा ओघ डेव्हिड यांनी वळविला. त्यातही त्याच्या नशिबाने त्यांना चांगला हात दिला. व्यापार भरभराटला, संपत्ती वाढली. अरब देशाशी संबंध तुटला; परंतु डेव्हिड यांनी आपली बगदादची राहणी सोडली नाही. त्याची जी एक जुनी तसबीर आहे ती अरबी पोषाखातली आहे. उंची सहा फूट, अंगकाठी बळकट, त्यावर अरबी पोशाख, यामुळे ते अत्यंत भव्य दिसत. त्यांना संतती पुष्कळ लाभली. मुलगे सर्व कर्ते निघाले. त्यांच्या एका अर्वाचीन चरित्रकाराने ज्यूंच्या संततिबळाचा उपयोग वाखाणला आहे. मुलगे निष्ठावंत असले म्हणजे परक्यांच्या ओंजळीने पाणी प्यावे लागत नाही. डेव्हिड यांच्या मृत्यूपर्यंत त्यांचे एक वगळून बाकीचे सर्व मुलगे पोशाखापुरते बापाचे वळण गिरवीत होते.

संपत्ती आणि व्यवसायाची क्षेत्रे वाढल्यावर त्यांनी आपल्या कारभारात शक्य तेवढे ज्यू इसम नेमावे, यात हरकत घेण्यासारखे काही नाही. बगदादकडील ज्यूंचे डेव्हिड हे एक आश्रयस्थान होते. प्रथम डेव्हिड यांनी धर्मासाठी पैसा वेचला. मुंबईत ज्यूंचे मोठे प्रार्थनामंदिर उभारले. त्यांच्या मुलांसाठी शाळा काढल्या. अरबस्तानातील ज्यूंना असेच साह्य केले. हा दानधर्म करूनही अधिक दानधर्माला पैसा मुबलक आहे, अशी स्थिती आल्यावर त्यांनी मुंबईत सर्व समाजांकरिता 'ससून मेकॅनिक इन्स्टिटयूट' ही संस्था जन्मास घातली. ही संस्था अद्यापि जिवंत आहे. या संस्थेच्या ग्रंथालयात शास्त्रीय ज्ञानाच्या ग्रंथांचा मोठा संग्रह केला. सध्याचे यंत्रयुग आहे व त्याकरिता यांत्रिक प्रगतीचे ज्ञान लोकांना व्हावे असा डेव्हिड यांचा या संस्थेसंबंधात एक उद्देश होता. बालगुन्हेगारांच्या सुधारणेसाठी

डेव्हिड ससून यांनी काढलेली संस्था अशीच समाजोपयोगी आहे. पुण्याला त्यांनी सुमारे तीन लाख रुपये खर्चून काढलेले रुग्णालय हे ससूनच्या नावाने चालू आहे. मुंबईस व पुण्यास महारोग्यांची निराळी वस्ती करावी, हा हेतू त्यांनी सिद्धीस नेला. या दातृत्वाला त्यांनी जातिभेदाचा स्पर्श होऊ दिला नाही. ससूनच्या नावाने ज्या गिरण्या अस्तित्वात आल्या त्यांचा संबंध मुलांच्या कर्तृत्वाशी आहे. मुलगे जसे इंग्लंडशी एकरूप झाले तसे डेव्हिड झालेले नव्हते. परंतु इंग्लंड व इंग्लंडचे राजघराणे यांविषयीची निष्ठा डेव्हिड यांच्या ठिकाणी बलवत्तर होती. ते आशियातील रहिवासी असे मुंबईतील युरोपियन व्यापारी त्यांना मानीत नव्हते. यामुळे ब्रिटिश व्यापारी संघटनेशी त्यांचा संबंध जुळला.

डेव्हिड यांचा मुंबईत प्रवेश झाला व डॉ० विल्सन यांनी त्यांच्याशी परिचय करून घेतला. डेव्हिड हे हिब्रू—ज्या भाषेत ज्यूंचे धर्मग्रंथ आहेत—भाषेचे पंडित होते. विल्सन यांना ती भाषा शिकायची होती. त्यांचा आपसातील संवाद हिब्रू भाषा व धर्मग्रंथ यांबद्दलच होत असे. त्या भाषेचा डेव्हिड यांना अभिमान होता. ज्यू धर्माचे रीतिरिवाज डेव्हिड हे कडक शिस्तीने पाळीत आणि इतर ज्यूंना पाळायला लावीत. रविवार हा खिस्त्यांचा तर शनिवार हा ज्यूंचा विश्रांतिदिन आहे. त्याप्रमाणे डेव्हिड यांच्या कारभारात शनिवारी सुटी असायची. लोकांना या सुटीची मौज वाटायची. डेव्हिड हे १८६४ साली पुण्यास मरण पावले. त्यांच्या पुत्रांनी मुंबईस कापडाच्या नवीन गिरण्या उभ्या केल्या. त्या गिरण्या मुंबईत गाजल्या. ही मुलांची कामगिरी आहे, पण तिचा पाया घालणारा पहिला पुरुष डेव्हिड म्हणून यांचे विशेष महत्त्व आहे. त्यांच्या थोरल्या मुलाचे नाव अबदुल्ला. या नावाला काही दिवस अल्बर्ट शब्द जोडून पुढे ह्यांनी अबदुल्लाला काट दिला व नुसते अल्बर्ट हेच नाव कायम केले.

अबदुल्ला-अल्बर्ट ससून

डेव्हिड ससूनचा थोरला मुलगा अल्बर्ट याचा जन्म १८१८ साली झाला व तो आपल्या बापाबरोबर कुटुंबातल्या इतर मंडळींसमवेत १८३२ मध्ये मुंबईस आला. बापाने आपल्या व्यापाराची बैठक पक्की केल्यावर अल्बर्टला चीनमध्ये आपल्या व्यापाराची शाखा काढण्यासाठी व तिच्यावर देखरेख ठेवण्यासाठी पाठविले. व्यापाराच्या उत्कर्षाला आवश्यक असणारे गुण अल्बर्टच्या ठिकाणी काहीसे उपजत असल्यामुळे त्याचा बापाला फार उपयोग झाला. डेव्हिडने पूर्वेकडे चीन, मध्य आशिया व पश्चिमेकडे लंडन असा अनेक ठिकाणी आपल्या व्यापाराचा फैलाव केला तो मुलाच्या मदतीनेच. अल्बर्टने चीन सोडल्यावर डेव्हिडचा दुसरा मुलगा एलिआस याला डेव्हिडने चीनमध्ये पाठविले. एलिआस हा हुशार व कल्पक होता. बापाने त्याला आपल्या मरणापूर्वी काही वर्षे मुंबईस राहवून घेतले होते. बापाचा मुख्य मदतनीस म्हणून त्याचे व्यापारी क्षेत्रात पुष्कळच वजन वाढले होते, परंतु बाप वारल्यावर डेव्हिडच्या व्यापाराचा व कुटुंबाचा पुढारीपणा अल्बर्टकडे गेला आणि एलिआस हा साहजिकच मागे पडला. महत्त्वाकांक्षी व कर्तबगार असलेल्या एलिआसला ही स्थिती रुचणारी नसल्याने त्याच्या व अल्बर्टच्या आपसात कटकटी वाढल्या. तेव्हा एकमेकांच्या विभक्तपणाने त्या कटकटींचा शेवट होऊन एलिआसने स्वतंत्र मार्ग स्वीकारला. ई० डी० ससून हे नाव असलेल्या कापडगिरण्यांची उभारणी एलिआसने केली. हळूहळू सगळे भाऊ विभक्त होऊन इंग्लंडात गेले व तेथेच कायमचे राहिले. मुंबई शहराचा अभिमान असूनही अल्बर्टने इंग्लंडचे वास्तव्य पत्करले, परंतु इंग्लंडात वस्ती करण्यापूर्वी त्याने मुंबईच्या विकासाला हातभार लावल्याने बापामागून ससून घराण्यापैकी मुंबईच्या मानकऱ्यांत त्याची गणना करावी लागते.

अल्बर्टचे मूळ नाव अबदुल्ला हे वाचकांच्या लक्षात असेल. पुढे त्याने या पहिल्या नावाला अल्बर्ट हे नाव जोडून अबदुल्ला-अल्बर्ट अशा जोडनावाने काही काळ व्यवहार चालविला. आपले घराणे बगदादचे व जन्मही तिथलाच, हा प्रकार विसरल्यास अथवा बुजवून टाकल्यास कसलेही भय नाही, अशा योग्यतेस पोचल्यावर त्याने अबदुल्ला या पहिल्या नावाची हकालपट्टी केली. अल्बर्टची मुंबईतील चिरस्मरणीय

कामगिरी ससून डॉक्स (ससून बंदर) ही आहे. सुएझचा कालवा अस्तित्वात आल्यावर युरोपातून मोठाल्या बोटी मुंबईस येऊ लागल्या. पण या बोटी धक्क्यास लागण्यास बंदर नव्हते, म्हणून त्याने कुलाब्याच्या भागातील अतिशय खडकाळ जागा जबर किंमत देऊन खरेदी केली. या जागी धक्का बांधण्याचे काम सोपे नव्हते, परंतु १८७२ ते १८७५ याप्रमाणे तीन वर्षे आणि अतिशय द्रव्य खर्चून अल्बर्टने हे काम पुरे केले. मोठाल्या आगबोटी जेथे उभ्या राहू शकतील असा खोल पाणी असलेला हाच पहिला धक्का गणला जातो. या धक्क्याने मुंबई सरकारला तसे धक्के बांधण्याला प्रवृत्त केले. कालांतराने हा धक्का सरकारने विकत घेतला व त्याची उपयुक्तता लोकांस पटविली. धक्क्याप्रमाणेच ससून बिल्डिंग्ज (ससूनच्या इमारती) कोटाच्या भागात उभारून मुंबईत एक सुंदर इमारतींचा नमुना लोकांसमोर ठेवला. यात साहजिकच परोपकाराचा भाग नव्हता. परोपकाराचे एक कृत्य म्हणजे पुण्याच्या रुग्णालयाला फक्त युरोपियन समाजासाठी जे नवे रुग्णालय निर्माण केले हे आहे. मुंबईच्या टाउन हॉलमध्ये ठेवण्याकरिता जे एक बहुमोल वाद्य (ऑर्गन) दिले, त्याच्या मागे परोपकाराची भावना असली तरी ते वाद्य युरोपियन समाजाला उपयोगी पडणारे होते, हे ध्यानात ठेवले पाहिजे. बापाने ज्या परोपकारी संस्था जन्मास घातल्या त्यांच्या वाढीसाठी अल्बर्टने वेचलेला पैसा हा सर्वसामान्य जनतेच्या हिताचा म्हणून शुद्ध परोपकाराचा समजावा लागतो. मुंबई विद्यापीठाच्या इमारतीसाठी अल्बर्टने एक लाख रुपये दिले, पण तेवढी रक्कम पुरेशी नाही व हा अपुरेपणा भरून काढण्याकरिता आपल्या तिजोरीत हात घालण्याला सरकार तयार नाही म्हणून अल्बर्टची देणगी काही वर्षे सरकारात पडून होती. आपली देणगी लवकर कारणी लागावी या उद्देशाने "मूळ रकमेचा विनियोग ताबडतोब करणार असाल तर आणखी ५० हजार रुपये देण्याला आपण तयार आहो," असे अल्बर्टने सरकारास कळविले. आणि नंतर अल्बर्टचा उद्देश सफळ झाला. मुंबईत आल्यापासून ससून मंडळी इंग्लंडच्या राजघराण्याविषयी भक्ती बाळगीत असल्याचा उल्लेख पूर्वी आलेला आहे. या भक्तीचे प्रतीक अल्बर्टने सेनाचक्रवर्तीच्या (फील्ड मार्शल) पोषाखात घोड्यावर बसलेल्या इंग्लिश राजपुत्राचा प्रचंड पुतळा घडवून तो टाउनहॉलसमोर उभा करून लोकांच्या निदर्शनास आणले.

इंग्लंडविषयी ससून घराण्याला एवढी ओढ का असावी, हा प्रश्न एका चरित्रकाराने सोडविला आहे. ज्यू समाज हा मूळ पॅलेस्टाइनचा. बगदादला व तेथून मुंबईला या समाजाचे लोक आले तरी त्यांना आपण आशियाचे रहिवासी नसून युरोपियन आहो असेच सदैव वाटे. परंतु मुंबईतील युरोपियन त्यांना युरोपियन लेखीत नसत. ते ससून मंडळीला पंक्तिप्रपंचानेच वागवीत असत. इंग्लंडात ससून मंडळींना असा दुजाभाव न आढळल्याने त्यांना इंग्लंडात जाऊन राहण्याची आतुरता छेडू लागली. १८७५ मध्ये सातवा एडवर्ड हा युवराज या नात्याने हिंदुस्थानात

आला तेव्हा अल्बर्टने त्याला टोलेजंग मेजवानी दिली. एकूण १६०० माणसे पंक्तीला होती व त्यांत बरेचसे संस्थानिकही होते. जेवताना एडवर्ड व अल्बर्ट यांचे मोकळेपणाने बोलणे झाले. इंग्लंडच्या भावी राजाला ज्यूकडील जेवणाबद्दल संकोच वाटला नाही; पण मुंबईतील भायखळा क्लब या अस्सल ब्रिटिशांच्या संस्थेला अल्बर्ट ससून हा परकाच वाटत होता. इंग्लंडात ससून मंडळी गेल्यानंतर रंगमंदिरात राजासाठी नाट्यप्रयोगाच्या वेळी राखून ठेवण्यात येणाऱ्या जागी राजाजवळ बसण्याला ससून मंडळीला परवानगी होती. राजाशी ज्यांची सलगी त्या ससून मंडळीचा इंग्लंडच्या अमीरउमरावांत आणि त्यांच्याहून द्रव्यदृष्ट्या वरचढ असलेल्या कारखानदार-व्यापारीवर्गात किती बोलबाला वाढला असेल याचे विवेचन करायला नको. आपण एशिआटिक नसून युरोपियन आहो असे सिद्ध होण्यासाठी डेव्हिड ससूनचे सारे वंशज भराभर इंग्लंडात गेले व ज्या देशात त्यांना आश्रय मिळाला त्या देशाला विसरले. विलायतेस ससून मंडळीची राहणी बदलली. डेव्हिडचा अरबी पोषाख मरेपर्यंत कायम होता व मुलांनाही त्याच पोषाखाची सवय होती. डेव्हिडच्या मृत्यूनंतर हा पोषाख गेला. विलायतेस त्यांनी आपल्या धर्माचीदेखील शिस्त व आस्था सोडली.

अल्बर्टला ब्रिटिश राजाकडून 'सर' हा किताब मिळाला. येथील सरकारने त्याला काही वर्षे स्थानिक कायदेमंडळामध्ये बसविले होते. त्याच्या मागून ससूनपैकी कित्येकांना सर ही पदवी लाभली. राजनिष्ठेला असे फळ यावे यात नवल नाही. अल्बर्टने नेहमीचा व्यापारधंदा कायम ठेवून मुंबईत कापडगिरणी काढली. एलिआसने या कामात एक प्रकारे आघाडी मारली. गिरणी काढण्याच्या काळात युरोपात जी यांत्रिक प्रगती झाली असेल तिचा आपल्या गिरणीत उपयोग करणे हा ससून यांचा विशेष होता. आता या गिरण्या हिंदी भांडवलदारांनी विकत घेतल्या आहेत. परंतु मुंबईच्या कारखानदारीत ससून मंडळीने वाढ केली, हे नाकारता येण्यासारखे नाही.

मुंबईतील मुसलमानांचे मानकरी शोधावे लागतात. आदमजी पीरभाई, मकब, महंमदअली रोगे, सयानी, हैदरी, करीमभाई, इब्राहिम रहिमतुल्ला, आगाखान अशी नावे शोधू गेल्यास नजरेपुढे येतात. परंतु त्यांनी मुसलमान समाज सोडून इतर समाजासाठी काय केले, हा प्रश्न सोडविताना मनाचा हिरमोड होतो. फक्त बद्रुद्दीन तय्यबजी हे एकच नाव मानकऱ्यांच्या यादीत घालण्यासारखे आहे. रहिमतुल्ला सयानी यांना काँग्रेसने एका अधिवेशनात अध्यक्षस्थानी बसविले होते; परंतु बद्रुद्दीन तय्यबजींनी काँग्रेसचा अभिमान जसा वेळोवेळी व्यक्त करून मुसलमानांच्या काँग्रेसविरोधी प्रयत्नांवर हरताळ फासण्याचे धैर्य दाखविले, तसे सयानींच्या बाबतीत म्हणता येत नाही. अगोदर या समाजाने पाश्चात्यांच्या युगाचे संस्कार फार उशिरा ग्रहण केले. सयानी हे पहिले एम० ए०. ह्यांच्या मागून २० वर्षांनी दुसरे मुसलमान एम० ए० दृष्टीस पडले. मुसलमानांत धनिक व्यापारी होते. मुंबईच्या नागरिक जीवनात त्यांच्या

धनाढ्यतेची प्रतिष्ठा होती. परंतु त्यांच्यात राष्ट्रीय दृष्टी नव्हती. बद्रुद्दीन तय्यबजींमध्ये ही दृष्टी प्रखर व जागरूक असल्याची उदाहरणे दाखविता येतात. तय्यबजींना कॉलेजचे शिक्षण घेता आले नाही, परंतु इंग्लंडात त्यांनी बॅरिस्टर होईपर्यंत बरीच वर्षे घालविल्यामुळे त्यांना इंग्रजांनी मान डोलवावी असे इंग्रजी भाषेचे प्रभुत्व कमावता आले. त्यांचा कायद्याचा अभ्यासही चांगला होता. मुंबईच्या उच्च न्यायालयासमोर इंग्रज बॅरिस्टरांनी व्यापलेल्या क्षेत्रात शिरलेले तय्यबजी हेच पहिले बॅरिस्टर. त्यांचे वडील बंधू कमरुद्दीन हे सॉलिसिटर असल्यामुळे बद्रुद्दीन यांना खटले मिळायला विशेष अडचण पडली नाही व खटला चालविण्याच्या कौशल्यामुळे ते इंग्रजी बॅरिस्टरांमध्ये चमकून दिसण्याला उशीर लागला नाही. पहिली अनेक वर्षे तय्यबजी राजकीय चळवळीविषयी उदासीन होते. परंतु फेरोजशहांच्या संगतीमध्ये त्यांच्यात राजकारणाची गोडी उत्पन्न होऊन निरनिराळे हिंदी हिताचे प्रश्न चोखाळता चोखाळता काँग्रेसच्या स्थापनेमध्ये त्यांनी भाग घेतला. १८८७ साली काँग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. १८९५ मध्ये त्यांची हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाल्यावरही त्यांनी काँग्रेसचे प्रेम सोडले नाही. न्यायाधीश असताना एकदा कोणी त्यांच्यापुढे काँग्रेसविषयी कुत्सित प्रलाप काढताच तय्यबजींनी त्याला त्याच्या दुरुक्तीनिमित्त सडकून चापले. १८९७ साली लो० टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली तेव्हा त्यांना जामीन घेऊन तय्यबजींनी मोकळे केल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. राजकारणात हिंदूंचे हित निराळे व मुसलमानांचे हित निराळे असा प्रकार नसून जो अन्याय हिंदूंना तोच अन्याय मुसलमानांना सोसावा लागतो व त्याचा प्रतिकार दोन्ही समाजांनी एकजुटीने करणे अवश्य आहे, या प्रतिकारात जर मुसलमानांच्या धर्माची हानी घडते असे दिसले तर ती हानी होऊ न देण्यासाठी मुसलमानांनी झटावे, पण अशी हानी सोसण्याची नसती भीती मनात बाळगून राजकारणात हिंदूंपासून मुसलमानांनी फटकून वागण्याची गरज नाही, असे मत त्यांनी पुष्कळदा काँग्रेसच्या विरोधाची चळवळ करणाऱ्या मुसलमान पुढाऱ्यांना कळविल्याचे दाखले त्यांच्या चरित्रात आहेत. एकदा एका खुनाच्या खटल्यात तय्यबजींनी केलेले भाषण अगदी टाकाऊ स्वरूपाचे असल्याची टीका अँग्लो-इंडियन पत्रात आल्याचे पाहून न्यायाधीशांनी सदर पत्रकाराची खरड काढली. आपण हिंदी आहोत असा त्यांना अभिमान होता. अशा स्वभावाचा व कर्तृत्वाचा मुंबईतील हा पहिला (व अखेरचा म्हटल्यासही चालेल) मुसलमान, यासाठी तय्यबजींना मुंबईच्या मानकऱ्यांत आदराने बसविण्याशिवाय गत्यंतर नाही.

तेरा

प्रेमचंद रायचंद

गेल्या शतकातील मुंबईतील व्यापाराच्या उलाढालीचा इतिहास प्रेमचंद रायचंद या व्यक्तीच्या सविस्तर निर्देशाखेरीज समाधानकारक रीतीने पूर्ण व्हायचा नाही असे त्या व्यक्तीचे माहात्म्य आहे. एका गरीब व्यापाऱ्याचा मुलगा, विद्याभ्यास अगदी वेताचा, जन्मभाषा म्हणून गुजराती आणि व्यापारोपयोगी म्हणून कामापुरते इंग्रजी या भांडवलाच्या आधारावर प्रेमचंद यांनी मुंबईस आल्यानंतर पैशाच्या व्यवहारात अशी उंच भरारी मारली की, तिला साऱ्या जगाच्या व्यापारी इतिहासात जोड सापडणे कठीण असल्याचा अभिप्राय प्रेमचंदाचे एक चरित्रकार सर दीनशा वाच्छा यांनी प्रगट केला आहे. प्रेमचंदांच्या भाग्याचा तारा सुमारे दहापंधरा वर्षे अतिशय तेजस्वितेने चमकला. त्यातल्या त्यात १८६१ ते १८६४ या चार वर्षांत त्या भाग्याने मुंबईची सारी जनता दिपवून सोडली होती. १८६५ मध्ये ते भाग्य एकदम जे ओसरले ते कायमचेच. प्रेमचंद १८६५ नंतर १९०६ पर्यंत हयात होते. व्यापारी जगामध्ये वावरत होते. त्यांची पतसुद्धा बऱ्यापैकी होती. पण १८६५ पूर्वीच्या काळातील त्यांचा जयजयकार पुन्हा कधी ऐकू आला नाही.

प्रेमचंदांचा जन्म १८३१ साली सुरतेस झाला. त्यांचे वडील इमारतीच्या लाकडांचे व्यापारी होते. ह्या व्यापारात किफायत होत नव्हती, असे पाहून ते आपल्या मुलाला घेऊन मुंबईस नशीब काढण्यासाठी आले. तेव्हा प्रेमचंदांचे वय नऊदहा वर्षांच्या आतबाहेर होते. या शहरी त्यांनी थोडा गुजरातीचा व तसाच इंग्रजी भाषेचा अभ्यास केला. प्रत्यक्ष अभ्यास थोडा असला तरी प्रेमचंदांनी इंग्रजी भाषेतून आपले विचार बिनचूक व्यक्त होण्याइतके ह्या भाषेचे प्रभुत्व कमावले होते. मुंबईत त्या वेळी लाला या नावाचा एक इंग्रजांच्या व्यापारी कंपनीचा दलाल होता. त्याला इंग्रजी जाणणाऱ्या मदतनिसाची जरुरी होती. प्रेमचंदांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान आणि त्यांचा चळवळ्या चौकस स्वभाव या गुणांकडे लक्ष देऊन लालाने त्यांना आपल्या कारभारात घेतले. प्रेमचंद आणि त्यांचे वडील हे दोघेही लालाच्या दलालीचे काम करू लागले. प्रेमचंदांनी याप्रमाणे दलाली करीत असता मुंबईतील व्यापारी जगाचे पुष्कळच ज्ञान मिळविले. पुढे लवकरच लाला हे कालवश झाल्यामुळे त्यांचा सारा कारभार

प्रेमचंद करू लागले व येथून पुढे त्यांच्या भरभराटीला प्रारंभ झाला. निरलस उद्योग हा त्यांच्या अंगचा मोठा गुण होता. लालांच्या दलालीमागोमाग ते अनेक व्यापारी कंपन्यांचे दलाल बनले आणि केवळ देशी व्यापारीवर्गातच नव्हे तर युरोपियन व्यापारीवर्गातही त्यांची प्रतिष्ठा वाढली. यामुळे त्याच्या साह्याने आपले नशीब उघडावे असे इच्छिणारांचे घोळके त्याच्याभोवती फिरू लागले.

जेव्हा प्रेमचंदांची प्रतिष्ठा अतिशय वाढली तेव्हा ते भायखळ्याकडील लव्हलेन-मध्ये सभोवार सुंदर बाग असलेल्या एका इमारतीमध्ये राहत होते. सूर्योदयापूर्वीच सदर बागेच्या आवारात गरजूंची गर्दी लोटायची. प्रेमचंद पहाटेस उठून स्नान, पूजा, जप वगैरे आन्हिक उरकायचे. ते धर्माने जैन होते. आन्हिक आटपून, दूध पिऊन सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ते गाठीभेटीच्या दिवाणखान्यात येत असत. मग क्रमशः भेटीस येणारांचे म्हणणे ऐकून व जो सल्ला योग्य असेल तो देऊन त्यांची रवानगी करायचे. आठ वाजता ही गर्दी हटवून ते आपल्या कचेरीत जायचे व तेथून ज्या इंग्रज व्यापारी कंपनीने त्यांचे नाव दलाल या नात्याने दाखल केले त्या कंपनीच्या अधिकाऱ्यांची १० वाजता भेट घ्यायचे. असे करण्यात केवळ काम एवढाच हेतू नसे. या भेटीमागे कृतज्ञतेची भावना असे. तेथून ते शेअरबाजाराकडे वळायचे आणि सायंकाळपर्यंत पैशाच्या उलाढाली चालायच्या. प्रेमचंद एका घोड्याची गाडी (शिग्राम) वापरीत असत. कधी वेळेवर शिग्राम नसली तर पायांनी इष्ट स्थळी जाण्याला ते कचरत नसत. जेव्हा त्यांच्यावर पैशाचा पाऊस पडत होता तेव्हा त्यांचे चैनीकडे लक्ष गेले नाही. त्यांचा पोषाख व एकंदर राहणी अगदी साधी होती. शरीर सडसडीत होते, त्यामुळे कित्येक इमारतींबाहेरच्या पायऱ्या ते झपाट्याने चढून जात असत. त्यांची बुद्धिमत्ता कुशाग्र असल्याने पैशाच्या व्यवहारातील खाचाखोचा ओळखून ते वागत व इतरांना तशा सूचना देत असत. कोणत्याही प्रकरणाचा अचूक निर्णय हा त्यांच्या स्वभावाचा आणखी एक गुण होता. दिवसभर त्यांचे काम तोंडानेच चाले. त्यांच्याजवळ वही किंवा टिपणासाठी कागद नसत. रात्री एकांतामध्ये आपल्या घरी एका विश्वासू कारकुनाला बोलावून त्याला दिवसा घडलेल्या कारभाराची नोंद करायला सांगत. प्रेमचंदांची स्मरणशक्ती विलक्षण तीव्र होती.

अशा रीतीने उद्योग करता करता १८६१ साल उगवले. अमेरिकेच्या उत्तरे-कडील संस्थानांची गुलामगिरी बंद करण्याच्या निमित्ताने दक्षिणेकडील संस्थानांशी युद्ध जुंपण्याची लक्षणे दिसू लागली व पुढे लवकरच लढाई सुरू झाली. या लढाई-पायी अमेरिकेतील कापूस इंग्लंडला जाईनासा झाला आणि हिंदुस्थानातल्या कापसाची मागणी वाढली. अर्थात हिंदी कापसाचा भावही चढला. या प्रसंगी प्रेमचंदांच्या भाग्याने पराकाष्ठा गाठली. प्रेमचंदांना लोक "कापसाचा राजा" म्हणू लागले. मुंबईत पैशाच्या प्रवाहाने व्यापारी लोकांना वेडे करून सोडले. प्रेमचंदांच्या मुठीत या सुमाराला एशिआटिक बँक आणि बँक ऑफ बॉबे अशा

दोन द्रव्याच्या खाणी होत्या. एशिआटिक बँक ही त्यांनीच उभी केली होती. दुसऱ्या बँकेच्या भांडवलाची रक्कम वाढविण्यासाठी मुंबई सरकारने त्या कायद्यात फेरफार करताना स्थावर-जंगम तारणाखेरीज केवळ व्यक्तीच्या हमीवर बँकेतून कर्ज घेण्याची सवलत ठेवल्याने प्रेमचंदांनी तिचा फायदा घेतला. १८६४ मध्ये मुंबईतील कापूस-व्यापाऱ्यांची भरभराट शिगेस पोचली. ह्या वर्षीची दिवाळी अजून या शहराचा इतिहास उजळीत असते. पैसा हाती खेळू लागल्याने बॅकवेचा समुद्र हटविण्याच्या संकल्पाच्या कितीतरी कंपन्या निघाल्या. कुलाब्याचे एक व मलबार टेकडीचे दुसरे ही दोन्ही टोके समुद्र भरून काढून जोडायची अशा कल्पना या कंपन्यांमध्ये वावरत होत्या. परंतु लक्ष्मीच्या चंचलतेने या कंपन्यांच्या संकल्पाचे डोलारे धुळीस मिळविले. लढाई आणखी काही वर्षे चालेल या अंदाजाने व्यापाऱ्यांनी साठवून ठेवलेल्या कापसाचे भाव १८६५ मध्ये अमेरिकेतील युद्ध थांबून एकदम गडबडले. त्या योगाने मुंबईतील व्यापारी वर्ग दिवाळखोरीच्या खाड्यात पडला, व या संकटाचे मूळ प्रेमचंद होत अशा समजुतीने, ज्या प्रेमचंदांचा एकदा सर्वत्र जयजयकार चालला होता त्या प्रेमचंदांच्या वाट्याला आता शिव्यांची लाखोली आली. मुंबईच्या व्यापारावरील बाहेरच्या लोकांचा विश्वास उडाला. १८७० नंतर पुन्हा व्यापाराची घडी बसू लागली आणि मग मुंबईच्या व्यापाराबद्दल लोकांचा विश्वास वाढत चालला. १८६५ च्या जुलईची पहिली तारीख हा मुंबईचा 'काळा दिवस' असे म्हणतात. एवढी मोठी आपत्ती व अप्रतिष्ठा अंगावर कोसळूनही प्रेमचंदांच्या वर्तनात फरक पडला नाही. त्यांनी हातपाय गाळले नाहीत किंवा भेटीगाठीच्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर उद्विग्नता अथवा निराशेची छाया कधी कुणाला दिसली नाही.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रेमचंद व्यापारीसृष्टीतच शेवटपर्यंत राहिले. त्यांनी द्रव्यही मिळविले. मात्र १८६५ च्या पूर्वीची कीर्ती पुन्हा त्यांना मिळाली नाही. प्रेमचंदांना संपत्तीचा पिच्छा पुरविण्यामध्ये आपली बुद्धी व कर्तबगारी वेचण्याचा नाद होता. लक्ष्मीच्या पाठलागात त्यांना खरा आनंद वाटत असे. हाती असलेल्या संपत्तीचा लोभ त्यांनी कधी बाळगला नाही. करोडो रुपयांचा व्यवहार केला व लक्षावधी रुपये दानाच्या रूपाने हातचे जाऊ दिले. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथसंग्रहालयाची इमारत व त्यालगतचा शिखरावर घड्याळ असलेला मनोरा (टॉवर) ही दोन्ही प्रेमचंदांच्या दातृत्वाची स्मारके आहेत. राजाबाई हे त्यांच्या आईचे नाव व हा टॉवर तिच्या नावाने बांधण्यात आला. ग्रंथालयाची इमारत प्रेमचंदांच्या दानाने जन्मास आलेली, हे समजण्याचे साधन त्या इमारतीमध्ये नाही. या इमारतीसाठी साडेचार लाख रुपये खर्ची पडले. कलकत्त्याच्या विद्यापीठाला त्यांनी जी अडीचतीन लाखांची देणगी दिली, ती विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती मिळाव्या यासाठी दिली आणि प्रेमचंद हे नाव ह्या छात्रवृत्तीने कायम ठेवले आहे. प्रेमचंदांचे दातृत्व केवळ मुंबई-कलकत्त्यापुरतेच नव्हते. त्यांनी

गुजरात-काठियावाडमध्ये कितीतरी संस्था दातृत्वाने निर्माण केल्या व अस्तित्वात असलेल्या संस्था आपल्या दातृत्वाने टिकविल्या. त्यांनी चाळीस लाखांइतके दान केले, असा त्यांच्या चरित्रकारांनी हिशेब काढला आहे.

प्रेमचंदांच्या व्यापारात कपट, लपंडाव, छक्केपंजे, लफंगेपणा वगैरे दोष नसल्याने कधी त्यांचे धनको कोर्टात गेल्यास प्रेमचंदांच्या वतीने न्यायाधीश धनकोंना धीर धरायला सांगत. जाणूनबुजून प्रेमचंद कुणाचाही पैसा बुडवणार नाहीत, असे युरोपियन न्यायाधीश बोलत असत. एकदा एका न्यायाधीशाचे वरील आशयाचे उद्‌गार ऐकून प्रेमचंदांना आपले अश्रू आवरले नाहीत. प्रेमचंद हे एक साधुवृत्तीचे पुरुष होते. जेव्हा लक्ष्मी त्यांच्यावर प्रसन्न होती तेव्हा ते अहंकाराच्या आहारी गेले नाहीत, लक्ष्मीच्या अवकृपेने ते कधी खचले नाहीत. वामपंथाने त्यांनी लक्ष्मीची प्रसन्नता साधली नाही. कपड्यालत्त्याचा व राहणीचा साधेपणा, नम्रता, मधुर वाणी, गोरगरिबांना मदत करण्याचा उत्साह, इत्यादी गुणांमुळे व्यापारात ठेच लागून पडण्याची पाळी आली तरी त्यांच्याविषयी अनादाराची उपेक्षा लोकांत कधीच उद्‌भवली नाही. मात्र मरणकाळी १८६५ पूर्वीची त्यांच्या गौरवाची अपूर्वता राहिली नव्हती.

चौदा

करसनदास मूळजी

करसनदास मूळजी हे गुजराती समाजातील दुराचारांची हकालपट्टी करू इच्छिणारे पहिले अटीतटीचे सुधारक असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. त्यांचा जन्म १८३२ साली झाला. ते घरचे सधन नव्हते. त्यांच्या लहानपणी बापाने दुसरे लग्न केले व सावत्र आईशी संबंध नको म्हणून त्यांनी घर सोडून एका नातेवाइकाचा आश्रय घेतला. शिक्षणातही त्यांना फारशी प्रगती करता आली नाही. परंतु शाळेबाहेर स्वतःच्या प्रयत्नाने त्यांनी जे ज्ञान संपादन केले, त्याच्या जोरावर त्यांना आपले आयुष्य बऱ्या रीतीने घालविता आले. त्यांची प्रकृती धडधाकट नव्हती, तरी त्यांनी आपल्या ध्येयासाठी हालअपेष्टा सोसल्या. लेखनाचा हव्यास त्यांच्या ठिकाणी अल्प-वयातच उत्पन्न झालेला होता. लेखनाची हौस पुरविण्यासाठी करसनदासांनी दादाभाई नौरोजींच्या 'रास्तगोफ्तार' पत्रामध्ये गुजराती समाजाचे दोष उघडकीला आणणारे लेख लिहिण्यास प्रारंभ केला. हे पत्र पारशी समाजात खपत असे व गुजराती लोकांत त्याचा फारसा प्रवेश नव्हता. असे पाहून करसनदासांनी 'सत्यप्रकाश' या नावाचे साप्ताहिक सुरू करून गुजराती समाजातील दोषांवर ताशेरे झाडण्याचा धडाका लावला. यामुळे गुजराती समाजात त्यांच्याविषयी रोष दिसू लागल्यास नवल वाटायला नको. हिंदू, मग तो गुजराती, महाराष्ट्रीय किंवा बंगाली असो, त्याची समाजरचना सामान्यतः सारखीच असल्याने सर्व विभागांत एकाच स्वरूपाचे दोष असावे, हे लक्षात घेऊन येथे गुजराती समाजातील दोषांचा वेगळा तपशील सांगायला नको. स्त्रियांचा प्रौढविवाह, विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक, स्त्रियांचे शिक्षण अशा विषयांवर करसनदास लेख लिहीत होते. परंतु ज्या योगाने करसनदास ख्यातीस चढले तो विषय हिंदूंच्या इतर विभागांत व्यक्तिपरत्वे किंवा प्रसंगपरत्वे दृष्टीस पडणारा असला तर गुजराती समाजात तो स्थायी स्वरूपाचा होता. तो म्हणजे वल्लभ संप्रदायाचा. हा वैष्णव संप्रदाय असून मुंबईतील व इतर ठिकाणींच्या भाटिया समाजात याचे प्राबल्य फार होते व आजही आहे. या संप्रदायाच्या दुराचारांवर जेव्हा करसनदासांनी हल्ला चढविला तेव्हा मुंबई शहरात अतिशय खळबळ उडाली.

वल्लभ संप्रदायातील गुरू गोकुळनाथ महाराजांना ईश्वराचा अवतार समजून

त्याच्या चरणी लोक द्रव्यार्पण करीत. हा प्रकार तितकासा प्रतिकूल टीका करण्याजोगा कदाचित पुष्कळांना वाटणार नाही. गुरूला तरुण बायकामुली अर्पण करणे व गुरूच्या अशा व्यभिचाराचे भूषण मानणे येथवर त्या काळातील गुरुभक्तांची मजल गेली होती. या प्रकारावर जेव्हा करसनदासांनी आपले लेखणीचे हत्यार उपसले तेव्हा गुरुभक्तांच्या क्रोधाला सीमा उरली नाही. करसनदासांना भरपूर द्रव्य देऊन गप्प बसवावे, ते न जुळल्यास त्यांना मारावे, अशांतला कोणताही उपाय चालत नाही असा अनुभव आल्यास त्यांना कोर्टात खेचावे, असे काही मार्ग खवळलेल्या भाटियांपुढे होते. 'सत्यप्रकाशा'सारखेच तेव्हा एक 'चाबूक' नावाचे वृत्तपत्र होते. त्यातून वल्लभ संप्रदायाच्या दुराचाराचे आविष्करण होऊ लागले. परंतु त्या पत्राच्या संपादकाला लवकरच नाकदुऱ्या काढाव्या लागल्या. असे प्रायश्चित्त मिळाल्यावर त्या संपादकाने करसनदासांची निंदा आरंभली. सांप्रदायिकांना असा विजय मिळताच करसनदासांची खोड मोडण्यासंबंधाची त्यांची हिंमत वाढली. त्यांनी एका ब्राह्मणाला पैसे चारून सर्व संप्रदायविरोधी ब्राह्मणांच्या वतीने त्याने संप्रदायगुरूंची माफी मागितल्याचा देखावा उत्पन्न केला. वस्तुतः त्या ब्राह्मणाला ब्राह्मणांचे प्रतिनिधित्व कुणीही दिलेले नव्हते. त्याच्या माफीमागला डाव उघडकीस येण्याला उशीर लागला नाही. नंतर काही भाटियांनी कट करून करसनदासांना मारहाण केली. करसनदास त्यातून वाचले व त्यांनी सदर भाटियांवर खटला भरला. मारेकरी भाटियांचा गुन्हा कोर्टात शाबीत होऊन त्यांना जबर दंडाच्या शिक्षा झाल्या. दंडाच्या रकमेतून एक हजार रुपये कोर्टाने करसनदासांना नुकसानभरपाईदाखल दिले. शेवटी संप्रदायाचे गुरू जदुनाथ यांनी करसनदासांवर अब्रूनुकसानीचा खटला हायकोर्टात दाखल केला. या खटल्यात डॉ० विल्सन, डॉ० भाऊ दाजी इत्यादिकांसारख्या मुंबईतील अनेक नामवंत नागरिकांच्या साक्षी झाल्या. डॉ० भाऊ दाजी हे जदुनाथमहाराजांचे डॉक्टर होते. महाराजांकडून त्यांना चांगली फी मिळत होती. साक्षीदारांत भाऊ दाजी आहेत असे कळल्यावर "जदुनाथांकडील आर्थिक साह्याला मुकून नुकसान होईल" अशी भाऊ दाजींना धमकी मिळाली. भाऊ दाजींनी त्या धमकीला भीक घातली नाही. हा खटला सव्वीस दिवस चालला होता. शेवटी न्यायाधीशाने जदुनाथजींच्या विरुद्ध निकाल दिला. खटल्याच्या दिवसांत करसनदासांचा जीव सुरक्षित नव्हता; परंतु पोलीसखात्याच्या दक्षतेने त्यांचा बचाव केला. खटल्याच्या साक्षीतून जदुनाथ-महाराजांचे सारे वर्तन उघडेनागडे लोकांसमोर आले. हा खटला सामाजिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा म्हणून तो ग्रंथरूपाने पुढे इत्थंभूत छापला गेला. १८६२-मधील तो ग्रंथ दुर्मिळ झाला असला तरी मुद्दाम मिळवून नजरेखाली घालण्यासारखा आहे. 'महाराजा लाएबल केस' असे त्याचे नाव आहे.

करसनदासांनी समाजातील आंधळ्या श्रद्धेचा घाणेरडा अतिरेक चव्हाट्यावर मांडून व तो खरा असल्याचे कोर्टात सिद्ध करून जो विजय मिळविला, त्याला आता

शंभर वर्षे होत आली. या शतकात अंधश्रद्धेचे सामाजिक दुराचार नष्ट झाले अशी ग्वाही आज कुणीही देऊ शकणार नाही. ज्याला बुवाबाजी म्हणतात त्या प्रकारांमध्ये दुराचारांना पुण्याईच्या चष्म्यातून कौतुकाने पाहणारी व त्यांचे समर्थन करणारी माणसे आजही पुष्कळ भेटतात, याचा अर्थ करसनदासांचा प्रयत्न फुकट गेला असा नाही. किंबहुना, 'महाराजा लाएबल केस' हाच करसनदासांचा कीर्तीचा मुख्य आधारस्तंभ आहे. या कामगिरीनंतर ते इंग्लंडला जाऊन आले. जदुनाथमहाराजांवरील हल्ल्याने आधीच करसनदासांना त्यांच्या समाजाने वाळीत टाकले होते. विलायतेस जाऊन परत आल्यावर त्यांनी प्रायश्चित्त घेण्याचे नाकारल्यामुळे हा बहिष्कार वाढला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या बायकोने ज्ञातीच्या लोकांना शरण जाऊन प्रायश्चित्त घेतले व हा बहिष्कार उठविला.

करसनदास दोन वेळा इंग्लंडला गेले होते. त्यांनी तेथे जे पाहिले त्याविषयी एक पुस्तक लिहिले असून ते वाचनीय असल्याची शिफारस त्यांचे चरित्रकार श्री० मोतीवाला यांनी केलेली आहे. त्यांच्या वृत्तपत्रांतील लेखांबद्दल असा जाणत्यांचा अभिप्राय आहे की, प्रतिपक्षावर टीका करताना त्यांनी कधी सभ्यपणाची मर्यादा सोडली नाही. महाराजांच्या खटल्यानंतर त्यांना राजकोट, लिमडी वगैरे संस्थानांतून चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्याने त्यांचे दारिद्र्य गेले आणि बहिष्कारही जाणवला नाही. १८७१ साली म्हणजे ३९ व्या वर्षी ते वारले.

प्रेमचंद रायचंद आणि करसनदास मूळजी या दोघांच्या कामगिरीत जी अपूर्वाई दिसून येते, ती बाकीच्या गुजराती महाशयांमध्ये आढळणारी नसल्याने त्यांतले आणखी एकदोन स्वतंत्रपणे निवडून त्यांच्या कर्तबगारीचा विस्तार करण्याची आवश्यकता मनाला पटत नाही. यामुळे ठळक ठळक गुजराती व्यक्ती निवडून त्यांचा जो विशेष असेल तो सांगणे जास्त सोईचे आहे. गोकुळदास तेजपाल आणि भगवानलाल इंद्रजी अशी दोन नावे त्यासाठी उचारावी लागतात. भगवानलालजींना विद्वत्तेसाठी—प्रामुख्याने इतिहाससंशोधनाच्या कामानिमित्त—निवडले होते. गुजराती समाजात ताम्रपत्रे, शिलालेख वगैरे ऐतिहासिक साधनांकडे जातीच्या गोडीने लक्ष घालणारी त्याच्या योग्यतेची दुसरी व्यक्ती भगवानलालजींच्या पूर्वी होऊन गेलेली नाही. गुजराती हे वाणिज्यामध्ये प्रवीण व वाणिज्याकडे स्वभावतः त्यांची प्रवृत्ती असल्यामुळे मागील शतकात वाणिज्याबाहेरील ज्ञानार्जनासारख्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रीयांइतके गुजराती न दिसल्यास त्याचे आश्चर्य वाटायला नको. पारशी समाजाशी वाणिज्यापुरती तुलना करू गेल्यास गुजराती व्यापारी पारश्यांच्या तोडीचे नाहीत असाच निष्कर्ष निघतो. वस्तुतः पारश्यांच्या आधी गुजराती लोकांचा इंग्रजांच्या व्यापाराशी संबंध आला.

परंतु मुंबईच्या व्यापारात गुजरात्यांच्या आधी पारशी सरसावले आणि कित्येक वर्षे त्यांचीच सरशी होती. त्यांच्या मागून गुजरात्यांनी डोके वर काढले आणि पारशी काही अंशी नंतर मागे पडले हे कबूल करणे अवश्य आहे.

गोकुळदास तेजपाल, सर मंगळदास नथूभाई, मुळजी जेठा, लक्ष्मीदास खिमजी, दामोदर सुखडवाला, वरजीवनदास माधवदास, मुरारजी गोकुळदास याप्रमाणे मोठ्या व्यापारी गुजरात्यांची सहज २५-३० नावे डोळ्यांपुढे येतात. मुंबईवाहेरून कच्छ-काठीयावाडकडून मुंबईस दारिद्र्यात यावे, आणि आपल्या हुशारीने नशीव काढावे, धनाढ्य व्हावे, काही स्वजातीसाठी व काही सर्वांसाठी दानधर्म करावा, याप्रमाणे बहुतेक सर्व प्रख्यात गुजराती गृहस्थांची हकीकत पाहावयास सापडते. गोकुळदास तेजपाल हे मुंबईतील त्यांच्या नावाच्या रुग्णालयामुळे जास्त प्रसिद्ध आहेत. परंतु मुंबईत व गुजरातमध्ये त्यांनी अनेक स्थळी अनेक संस्था स्थापन केल्या असून त्या आजपर्यंत चालू आहेत. मुंबईतील संस्कृत पाठशाळा व गरीब विद्यार्थ्यांची राहण्या-जेवण्याची व्यवस्था करणारी संस्था या तेजपालांचे कौतुक करावे अशा संस्था आहेत. राहण्या-जेवण्याची ददात मिटल्यामुळे मुंबईत नावारूपास चढलेली बरीच माणसे दाखविता येतील. संस्कृत पाठशाळा आणि गरीब विद्यार्थ्यांचे वसतिगृह एकत्र असून, भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या काँग्रेसचे पहिले अधिवेशन सदर इमारतीत भरले म्हणून या संस्थेच्या इमारतीला आता एक प्रकारे ऐतिहासिक महत्त्व आलेले आहे. तेजपालांनी एक माध्यमिक शाळा मुंबईस काढली. असल्या शिक्षणसंस्थांकरिता तेजपालांनी मुंबईबाहेरही आपल्या द्रव्याचा सद्व्यय केल्याची उदाहरणे आहेत.

सर मंगळदास नथुभाईंनी मुंबई विद्यापीठाला देणगी देऊन छात्रवृत्त्या निर्माण केल्या. मुळजी जेठांनी कापडाच्या दुकानांची पेठ उभी केली. मुंबईत कापडाच्या गिरण्या वाढल्या. त्यांतील सर्व प्रकारचे कापड एकत्र मिळण्याची मुंबईत सोय नव्हती. ही उणीव मुळजी जेठांनी नाहीशी केली. हा शुद्ध निरपेक्ष परोपकाराचा प्रकार नसला तरी गिऱ्हाइकांची सोय होणे याला व्यापारीसृष्टीत महत्त्व आहे. लक्ष्मीदास खिमजी यांची एक आख्यायिका सांगणारी माणसे चाळीस वर्षांमागे मुंबईत व अन्यत्र पुष्कळ भेटत होती. १८९३ मध्ये हिंदु-मुसलमानांचा मुंबईमध्ये पहिला दंगा झाला. या दंग्यात भाग घेणाऱ्या हिंदूंना लक्ष्मीदास खिमजींनी फार मोठी मदत केली. मुसल-मानांना हुडकीत व पाठलाग करीत फिरणाऱ्या हिंदूंच्या खाण्यापिण्याची तरतूद खिमजींनी केली. भुकेसाठी हिंदूंवर मुसलमानांच्या प्रतिकाराचे काम सोडून देण्याची पाळी आली नाही, असा ह्या आख्यायिकेचा मथितार्थ आहे. वरजीवनदास माधव-दास यांनी माधवबाग हे मंदिर बांधून आपल्या नावाला जसे चिरंतनत्व आणले, तसेच विद्यापीठात संस्कृतच्या विद्यार्थ्यांकरिता आपल्या दातृत्वाने छात्रवृत्ती निर्माण करूनही आणलेले आहे. मुरारजी गोकुळदास हे कापडाच्या गिरण्यांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या दातृत्वाचे अंग म्हणजे एका दुष्काळात स्वस्त अथवा माफक दराने

लोकांना धान्य मिळण्याची त्यांनी तजवीज केली होती, हे सांगता येईल.

दामोदरदास सुखडवाला यांच्या चरित्रात इतरांच्या चरित्रांमध्ये न सापडणारे काही विशेष आहेत. गरीब स्थितीत बापाबरोबर मुंबईला येऊन बापाने सुरू केलेला सुखडाचा अर्थात चंदनाचा व्यापार बापाच्या मागून त्यांनी वाढविला. या व्यापारात दामोदरदासांना द्रव्यप्राप्ती उत्तम झाली. परंतु त्यांनी आपल्या पैशाचा व्यय सामाजिक सुधारणेकरिता व ज्ञानवृद्धीकरिता केला. यांची बंगालच्या ब्राह्म समाजाच्या मताविषयी बळकट श्रद्धा होती; म्हणून त्यांनी कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाला एक लाख रुपयांची देणगी दिली. मुंबईच्या प्रार्थना समाजाला भांडारकर वाचनालय आपल्या देणगीने जोडले. सर्वसामान्य जनतेची ज्ञानाभिरुची तृप्त व्यावी म्हणून तीन लाख रुपये खर्चून आपल्या नावाचे मोफत वाचनालय मुंबईत स्थापले. त्यांचा व ज्यांच्या स्मरणार्थ 'कामा इन्स्टिट्यूट' ही संस्था जन्मास आली त्या कामांचा अतिशय स्नेह होता. कामा वारल्यावर त्यांच्या संबंधाचा दुखवटा व्यक्त करण्यासाठी नागरिकांची मोठी सभा भरली तेव्हा दामोदरदास त्या सभेला गेले. कामांच्या मृत्यूने ज्ञानक्षेत्रातील हानी भरून काढण्याकरिता जेव्हा त्यांच्या स्मरणार्थ एक संस्था सार्वजनिक वर्गणीने निधी जमवून उत्पन्न करावी असे वक्तृत्व सभेमध्ये निघाले तेव्हा मूळच्या वक्त्यांमध्ये नाव नसूनही दामोदरदासांनी एकदोन मिनिटे बोलण्याची परवानगी अध्यक्षांकडून मिळविली; आणि खरोखरीच त्यांनी आपले भाषण मागितलेल्या मुदतीच्या आत संपविले. त्यांनी जी दोनतीन वाक्ये उच्चारली त्यांचा आशय एवढाच होता की, आपण कामांच्या स्मरणार्थ होऊ घातलेल्या संस्थेला एक लाख रुपये देणार आहो. त्यांचे हे आश्वासन ऐकून सारी सभा आश्चर्यचकित झाली. पारशी गृहस्थाच्या स्मारकाला गुजरात्यांची एवढी प्रचंड रकमेची देणगी ही खरोखरीच आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट होती. यानंतर संस्थेच्या योजकांनी दामोदरदासांचे चरित्र लिहिले जाण्यासाठी बक्षीस लावले. त्या बक्षिसाचे प्रकाशित चरित्र आज अन्यत्र दुर्मिळ असून त्याची एक प्रत कामा इन्स्टिट्यूटच्या ग्रंथसंग्रहात आहे.

सहज ज्यांची नावे आठवली, त्यांचा त्रोटक वृत्तांत सांगून टाकला. मुंबईच्या मानकऱ्यांमध्ये आदरपूर्वक जमेस धरण्याजोगे आणखी बरेच जण आहेत. परंतु पारशी-गुजराती समाजांच्या मुंबईतील भाग्योदयाचा विचार करताना महाराष्ट्रीयांचे स्थान कोणते, हा प्रश्न उभा राहतो. पारशी-गुजरात्यांच्या आधीचे महाराष्ट्रीय आहेत याबद्दल दुमत होण्याचा संभव नाही. मुंबई महाराष्ट्राची हे सिद्ध होण्यासाठी महाराष्ट्राने मोठ्या प्रमाणात देहदंड तर सोसलाच, पण महाराष्ट्र राज्यात मुंबई शहर राहावे म्हणून खडतर हिरण्य-प्रायश्चित्तही स्वीकारले आहे. याचे कारण द्रव्यार्जनाच्या क्षेत्रात महाराष्ट्रीय मागासलेले याखेरीज दुसरे काहीच नाही. ज्यांचा विदेशी परंपरागत संबंध ते मुंबईतले ब्राह्मण आणि अब्राह्मण हे पारशी-गुजरात्यांप्रमाणे बाहेरूनच आलेले असून ब्राह्मणांनी कारकुनी व अब्राह्मण समाजांनी मजुरी पत्करली. ब्राह्मणांची

जी थोरवी एकदा विद्येच्या क्षेत्रात गाजत होती, तिचाही आता लोप होऊ लागला आहे. महाराष्ट्राने गुजरात्यांप्रमाणे कापडाच्या गिरण्यांचा नाद न धरता काचशाळा काढून आपले बुद्धिस्वातंत्र्य व्यक्त केले, असे अभिमानाने म्हणता येईल. किर्लोस्करांच्या कारखान्याचे नाव या संदर्भात घेता येईल. प्रो० गज्जर यांच्या अलेम्बिक रसायनशाळेच्या मुळाशी कै० कोटिभास्कर यांचे नाव दिसेल. परंतु असल्या अभिमानाने भवितव्याला योग्य गती मिळेलच असा भरवसा धरता येत नाही. महाराष्ट्राच्या अनेक शिक्षणसंस्थांच्या उत्कर्षाचा पाया गुजराती, पारशी यांच्या देणग्यांनी भरलेला आहे. वकील, डॉक्टर, प्राध्यापक यांची देशाला गरज आहे; परंतु कारखानदारी, व्यापार यांच्याशिवाय देशाच्या वैभवाची कमान वर चढत नाही. एकदा एका ठिकाणी वीस-पंचवीस महाराष्ट्रीयांमध्ये 'महाराष्ट्राची पिछेहाट' हा विषय चर्चेस निघाला. हे सारे चर्चाकार ब्राह्मण होते व महाराष्ट्राची म्हणजे प्रामुख्याने ब्राह्मणांची पिछेहाट असा त्यांच्या बोलण्याचा रोख होता. महाराष्ट्र देश हा ब्राह्मण समाजाहून फार मोठा आहे याची जाणीव त्या चर्चाकारांच्या शाब्दिक घासाघिशीत नव्हती. शेवटी एकाने "ब्राह्मण हा जुन्या धर्मशास्त्राने इतर समाजाच्या गुरुस्थानी बसविला असता ब्राह्मणांनी गेल्या शंभर वर्षांत कारकुनीच्या खर्डेघाशीखेरीज काय केले?" असा बाकीच्या चर्चाकारांपुढे सवाल टाकून त्यांना चर्चेचा सूर बदलण्यास भाग पाडले. जोवर दुसऱ्या समाजांतील बुद्धिमान विद्यार्थी ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या स्पर्धेला नव्हते तोवर विद्यापीठाची बक्षिसे ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या पदरात पडत होती. स्पर्धा सुरू होताच ब्राह्मणांची बुद्धिमत्ता असामान्य नाही असा अनुभव आला. इंग्रजाने कारकुनीची ब्राह्मणांना गोडी लावून इतिहासकाळामध्ये व्यक्त होणाऱ्या त्यांच्या अनेक गुणांचा ऱ्हास घडवून आणला, याची उदाहरणे त्या चर्चेतील आक्षेपकाने बैठकीत उपस्थितांपुढे ठेवली. कारकुनीने विद्या बुडवून, अडाणी भाविकपणा मात्र विद्या आपलीच असे म्हणणारांमध्ये उत्पन्न केला. कारकुनी करीत असताही विद्येच्या जोपासनेकडे लक्ष पुरविणारी काही अपवादात्मक माणसे दाखविता येतात. परंतु अपवादाने नियम सिद्ध होतो, हे न विसरणे चांगले.

हा ऊहापोह आता महाराष्ट्र राज्य झाले असून त्याच्या संगोपन-संवर्धनाच्या दृष्टीने केलेला आहे. आता साऱ्या नागरिकांची जबाबदारी वाढलेली आहे. ही जबाबदारी जास्तीत जास्त सांभाळून श्रेष्ठपणा मिळवावा आणि मिरवावा.

पंधरा

डॉ० जॉन विल्सन

ज्यांच्या स्मरणार्थ मुंबईत विल्सन कॉलेज चालू आहे ते डॉ० जॉन विल्सन गेल्या शतकाच्या मध्यात अनेक वर्षे आपल्या परोपकाराच्या व विद्वत्तेच्या गुणांनी लोकांत व सरकारात गाजत होते. मुंबई इलाख्यात व अन्यत्र खिस्ती धर्मप्रसाराला ज्यांनी वाहून घेतले होते अशा सर्व नामांकित मिशनरी वर्गाचे प्रतिनिधी म्हणून मुंबईच्या मानकऱ्यांत डॉ० विल्सन यांची निवड केलेली आहे. विल्सन हे मुंबईस येण्यापूर्वीच मिशनऱ्यांनी मुंबईत ठाण मांडून आपले शिक्षणाचे व धर्मप्रसाराचे कार्य आरंभले होते. मुंबई शहरी १८१५ मध्ये मिशनऱ्यांच्या शिक्षणसंस्था येथील नव्या पिढीला ज्ञान देण्याचे काम करीत होत्या. त्यांच्यामागून एल्फिन्स्टनसाहेबांनी सरकारी शिक्षण-खात्याचा पाया घातला. डॉ० विल्सन वयाच्या पंचविसाव्या वर्षी १८२९ साली मुंबईस आले. यावरून त्यांचा जन्म १८०४ सालचा हे सहज लक्षात येईल. पुढे ४७ वर्षांनी त्यांचा मुंबईतच अंत घडला. हे स्कॉटलंडचे राहणारे. भाऊ-बहिणी असा त्यांचा मोठा परिवार होता. बापाच्या मनातून या थोरल्या मुलाने घरच्या शेतीत लक्ष घालावे असे असता, विद्यार्जनाच्या काळात खिस्ताची व त्याच्या शिकवणीची अनन्यसामान्य योग्यता मनावर ठसून विल्सनची ह्याविषयी अतोनात श्रद्धा वाढली आणि इंग्रजांनी काबीज केलेल्या भारतीय प्रदेशातील जनतेमध्ये खिस्ताची व त्याच्या धर्माची भक्ती वाढवून तिचा उद्धार करावा असा विल्सनचा निश्चय झाला आणि त्याप्रमाणे तो मुंबईत आला. येथे त्याने प्रथम मुलींच्या अनेक शाळा काढल्या, त्या योग्य प्रकारे चालू झाल्याच्या अनुभवानंतर त्यांनी मुलांची शाळा स्थापन केली. सरकारी शाळांना प्रारंभी फी ठेवलेली नव्हती. उलट, हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ सरकारातून थोडीफार देणगी मिळत असे. शिवाय सरकारी शाळांतून जातिभेदाकडे लक्ष पुरविले जात असे. अस्पृश्यांना तिथे बसू देण्याला सरकार धजत नव्हते याची प्रमाणे सरकारी शिक्षणखात्याच्या अहवालांतून दृष्टीस पडतात. मिशनऱ्यांच्या शाळांतून जातिभेदाला थारा नव्हता. शिक्षणात जातिभेदाचा संदर्भच येऊ द्यायचा नाही, असा मिशनऱ्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या शाळेत फी होती. ती अगदी थोडी होती, परंतु फी भरणारा विद्यार्थी अभ्यासाची आस्था जास्त बाळगतो, अशी फी घेण्यामागे

कल्पना होती. ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या शाळेत मुलींना पाठविणाऱ्या पालकांचे आश्चर्य वाटते. या शाळांसंबंधात लोकांनी मिशनऱ्यांना त्रास दिल्याचेही दाखले आढळत नाहीत. शाळेत शिकविण्यासाठी मिशनऱ्यांनी पुस्तकेही तयार केली होती. मराठी भाषेतून सर्व विषयांचे शिक्षण मिळावे, असा एक प्रकारे मिशनऱ्यांचा आग्रह होता.

डॉ० विल्सन यांच्या कामाचे ठोकळमानाने त्रिविध स्वरूप होते. शिक्षण, धर्मप्रसार, धर्मप्रसाराच्या द्वारे सामाजिक सुधारणा, आणि इतिहाससंशोधन. डॉ० विल्सन हे संस्कृत, मराठी, गुजराती या भाषांप्रमाणेच कानडी, तामीळ वगैरे लिप्यांचेही ज्ञाते होते. ज्या काळी त्यांनी मुंबईत बिऱ्हाड मांडले, त्या काळी सारा भारत देश इंग्रजांच्या ताब्यात आलेला नव्हता. सतलज नदीपलिकडील पंजाब शिखांच्या ताब्यात होता. सिंधप्रदेश स्वतंत्र होता. लखनौची नबाबशाही जिवंत होती. पूर्वीचा जो मध्यप्रदेश त्यावर नागपूरकर भोसल्यांचे प्रभुत्व होते. तथापि मुंबई इलाख्यापुरते बोलायचे झाल्यास महाराष्ट्र, कर्नाटक, बडोद्याचे राज्य, काठियावाडातील संस्थाने सोडून बाकीचा गुजरात, असा मोठा प्रदेश मुंबई सरकारच्या अधिकाराखाली होता. बडोदे, काठियावाड, राजस्थान येथील संस्थाने इंग्रजाची अंकित होती. यामुळे डॉ० विल्सन यांना आपली प्रवासाची हौस भागवायला मोठा मुलूख होता, व त्यांनी स्वधर्माभिमानाने या मुलखात फेरफटका केला. इतिहासाच्या संशोधनाचे व्यसन असल्यामुळे जुनी हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपत्रे वगैरे साधने जमविण्याची संधी त्यांनी कधी वाया दवडली नाही. गिरनारच्या डोंगरातील अशोकाच्या शिलालेखांची लिपी लावून त्यांचे वाचन करण्यातही विल्सन यांचा हात होता. त्यांच्या आधी प्रिन्सेप नावाच्या इंग्रजाने लिपी लावली होती. परंतु संस्कृतचे ज्ञान नसल्याने बरीच अक्षरे व काही मजकूर नीट जुळविण्याचे प्रिन्सेपला साधले नव्हते. विल्सन यांनी काठियावाडच्या दौऱ्यात, सबंध शिलालेख ओला कागद पसरून अक्षरांचा खोलगट भाग शाईने भरून काढण्याची कल्पना काठियावाडी संस्थानांवर देखरेख करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्याला सुचविली. त्याने कागदाऐवजी कापड पसरून आपले काम बजावले. हे प्रतिलेख हाती पडल्यावर तर विल्सन यांना प्रिन्सेपच्या कामाची महती समजली व त्याचे श्रेय आपण घेऊ नये अशा उद्देशाने ते प्रतिलेख त्याला दाखविण्याची तयारी केली. प्रिन्सेपने आपले संस्कृत भाषेचे अज्ञान विल्सन यांना कळवून लेखांच्या समग्र वाचनाचे काम विल्सन यांजकडे राहू दिले. आजकालच्या भारतीय विद्याव्यासंगी व्यक्तींना प्रिन्सेस व विल्सन यांच्या वागणुकीमध्ये शिकण्यासारखा भाग सापडेल. विल्सन यांनी आपल्या संशोधनाचा उपयोग मुंबईतील रॉयल एशियाटिक सोसायटीला होऊ दिला. त्यांच्या विद्वत्तेमुळे अगदी अल्प वयातच त्यांना सदर संस्थेच्या अध्यक्षत्वाचा मान मिळाला होता. त्या दिवसांत भारतीय विद्वानांना या संस्थेत प्रवेश नव्हता. हा अन्याय दूर व्हावा म्हणून विल्सन यांची खटपट चालू होती. १८४० नंतर हा अन्याय दूर झाला. भारतीय इतिहासाचे संशोधन हा ज्यांचा

जिव्हाळ्याचा विषय त्यांनाच प्रतिबंध ही स्थिती विल्सन यांना विपरीत वाटत होती.

हिंदू, मुसलमान, पारशी या धर्मांचा सूक्ष्म व गाढ अभ्यास करून हे धर्म ख्रिस्ती धर्माच्या मानाने हीन होत असे त्या त्या धर्माच्या अनुयायाला पटविणे हे विल्सन यांच्या जीवनाचे खरे ध्येय होते. त्यास अनुसरून त्यांनी या धर्मांसंबंधीची पुस्तके लिहिली. हिंदू शास्त्री, मुसलमानांचे मुल्ला-मौलवी, पारश्यांचे धर्मगुरू यांना भेटून त्यांच्याशी विल्सन यांनी वादविवाद केल्याची उदाहरणे त्यांच्या चरित्रात आहेत. या वादविवादाने हिंदू, मुसलमान, पारशी इत्यादिकांना ख्रिस्ती धर्मामध्ये विल्सनसाहेब हे मोठ्या प्रमाणात ओढू शकले नाहीत. फक्त दोन पारशी तरुण वाटले व त्या योगाने मुंबईत काही दिवस अतिशय कोलाहल माजला. एक हिंदू ब्राह्मण ख्रिस्ती झाला, पण तो हिंदू धर्मात परत गेला. बाटणारे बहुधा खालच्या वर्गातील असत व तेही एका वेळी शेकड्याच्या संख्येने मोजता येतील असे नव्हते. विल्सन यांच्या वादविवादाची अथवा चर्चेची निष्पत्ती एवढीच सांगता येईल की, हिंदूंतील पुराणोक्त रूढाचार ढिलावण्याकडे त्यांचा उपयोग झाला. जातिभेदाचे दुष्परिणाम, स्त्रियांच्या शिक्षणाची आवश्यकता वगैरे गोष्टी लोकांना पटल्या. हिंदु-मुसलमानांच्या धर्मावर हल्ला चढवूनही विल्सन यांची लोकप्रियता कायम राहिली, याचे कारण एकच दिसते व ते म्हणजे हे हल्ले सहिष्णू भावनेचे होते. त्या हल्ल्यांची भाषा जर दारुण तिरस्काराची असती तर विल्सन यांचा जो मान शेवटपर्यंत होत राहिला तो राहिला नसता. अडीअडचणीच्या वेळी सर्व धर्मांच्या लोकांना उपयोगी पडण्याचा त्यांचा स्वभाव होता. सरकारी अधिकारीवर्गात त्यांच्याविषयी आदर होता, परंतु त्यांनी या अधिकाऱ्यांच्या मेहरबानीचा मिंधेपणा कधी पत्करला नाही. हायकोर्टाचा कोणी न्यायाधीश हा विद्यापीठाचा उपकुलगुरू असावा, हा सरकारी दंडक विल्सन यांनी आपल्या शिक्षणविषयक कामगिरीने आणि विद्वत्तेने मोडला. ते एकदा उपकुलगुरू नेमले गेले. अर्थात या सन्मानाशी ख्रिस्ती धर्मप्रचाराचा संबंध नव्हता. मात्र ख्रिस्त व ख्रिस्ताचा धर्म हाच जगाला तारील, ही विल्सन यांची भावना प्रखर होती. त्यांच्यामागून महाराष्ट्र-संतांची चरित्रे लिहिणाऱ्या मिशनऱ्यांच्या पुस्तकांतून ख्रिस्ताच्या मानाने हे संत कच्चे, अपुरे, असा अभिप्राय पाहायला सापडतो. सातारच्या एका मिशनऱ्याने रामदास व एकनाथ यांची चरित्रे लिहिलेली आहेत. त्यांपैकी एकनाथाविषयी ख्रिस्ताच्या तुलनेने तारतम्य त्या लेखकाने दाखविले नाही म्हणून ते पुस्तक मिशनरी संस्थेमार्फत प्रसिद्ध होण्याचा मार्ग खुंटलेला पाहून सदर लेखकाने आपल्या एका प्रार्थनासमाजी मित्राच्या शिफारशीने एकनाथावरचे हे पुस्तक मुंबईतील एका नामांकित मुद्रणालयातून छापून घेतले. मिशनऱ्यांच्या धोरणावर प्रकाश पडण्यासाठी हे उदाहरण नमूद केले आहे. हे जर या शतकातले धोरण तर गेल्या शतकाच्या मध्यकाळात ते कसे प्रखर असेल हे सांगायला नको. विल्सन यांचा विशेष हाच की, धर्मप्रसाराची फार उमेद नसताही त्यांना कधी निरुत्साहाने पछाडले नाही.

विल्सन हे स्कॉटलंडच्या ज्या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून मुंबईस काम करीत होते त्या संस्थेच्या चालकांत धार्मिक मतभेद उपस्थित होऊन विल्सन यांना त्या संस्थेचा संबंध सोडण्याची पाळी आली. हा त्यांच्या आयुष्यातील कसोटीचा प्रसंग होता. परंतु विल्सन यांनी स्वाभिमानाला जागून आपल्या कार्यांत खंड पडू दिला नाही. संकटाच्या कसोटीवर ते उतरले. धार्मिक मतभेद वैराच्या स्वरूपाचा नव्हता हे लक्षात ठेवणे अवश्य आहे. विल्सन यांच्या कामाचा रगाडा कसा होता याची थोडीशी कल्पना दिल्यास अनाठायी होणार नाही. व्याख्याने, वादविवाद, ख्रिस्ती समाजाला धर्माची योग्य ओळख व्हावी म्हणून उपदेशपर भाषणे, परधर्मांतील दोषाविष्कारणाचे लेखन, मुद्रण यांखेरीज जेथे प्रवास घडेल तेथील इतिहासाची साधने संपादून संशोधन, त्यासंबंधी पत्रव्यवहार आणि वक्तृत्व, ज्या संस्थांवर नेमणूक किंवा निवड झाली असेल त्या संस्थेच्या कारभाराची कामे, न्यायाधीशांना गुंतागुंतीच्या धर्मपर खटल्याविषयी सल्लामसलत, ही विल्सन यांच्या उद्योगाचा व्याप ध्यानात आणून देणारी लहानशी यादी आहे. इंग्रजांच्या राज्याचा जसजसा विस्तार वाढला तसतसा विल्सन यांचा प्रवास वाढला. विल्सन हिंदुस्थानात आल्यावर इंग्रजांनी सिंध, पंजाब हे देश जिंकले व सातारा, झाशी, नागपूर येथील राज्ये खालसा करून आपल्या राज्याला जोडली. विल्सन यांना धर्मप्रसारार्थ संचार करायला नवा प्रदेश मिळाला. ह्या प्रदेशातील लोकांचे जुने रूढ दुराचार सरकारच्या निदर्शनास आणून त्यांच्या उच्चाटनाची खटपट करायला अशा जिंकलेल्या नव्या प्रदेशातून विल्सन यांना सवड सापडली. १८५७ च्या धुमाकुळात सरकारने पकडलेला पत्रव्यवहार वाचण्याला अनेक देशी भाषांच्या ज्ञानामुळे विल्सन यांनी सरकारला मदत केली. ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचा हेतू असे एक कारण शिपायांच्या उठावासंबंधात उच्चारले जाते; परंतु मुंबईत शिपाई उठावाची कारस्थाने करीत असता ज्या निर्भयपणाने विल्सन शहरात हिंडत-फिरत होते, तिकडे लक्ष दिल्यास शिपायांच्या उठावाचे पूर्वोक्त कारण सबळ ठरत नाही.

विल्सन यांच्या धर्मप्रसाराच्या कार्याचे मोजमाप करण्याऐवजी त्यांनी विद्यापीठ, इतिहाससंशोधन, भिन्न भाषांचा व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास इत्यादी कार्यांची मेहनत न मशागत केली, ती भारताच्या अर्वाचीन इतिहासाला सदैव महत्त्वाची वाटणारी आहे. स्वीकृत ध्येयासाठी सर्वस्व वेचण्याचा जो आदर्श त्यांनी निर्माण केला, तो महाराष्ट्राला व इतर प्रदेशांना मार्गदर्शक होऊन भारताला सांप्रतची ऊर्जितावस्था लाभली, हे कबूल करण्यात कसलाच कमीपणा नाही. विल्सन यांच्या स्मरणार्थ मुंबई विद्यापीठाने भाषाशास्त्रविषयाची व्याख्याने 'विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चर्स' या नावाने चालू केली. दुसरे स्मारक जे विल्सन कॉलेज त्याचा निर्देश आरंभीच केलेला आहे.



REFBK-0023229